
"गर्भगृह"
सूरज काशिनाथ गताडे

a

# गर्भगृह

(कादंबरी)

सूरज काशिनाथ गाताडे

ई साहित्य प्रतिष्ठान

# गर्भगृह


## सूरज काशिनाथ गाताडे

स्क्रिनरायटर्स असोसिएशन मेम्बरशीप नंबर - २१८३१

रा. पेठवडगांव, ता. हातकणंगले, जिल्हा - कोल्हापूर, महाराष्ट्र - ४१६११२

ई-मेल आयडी - surajgatade26@gmail.com

मोबाईल व व्हॉट्सऍप - 9890137797

फेसबुक - http://www.facebook.com/suraj.gatade.140

इन्स्टाग्राम - http://www.instagram.com/surajgatade26



या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची परवानगी घेणे आवश्यक आहे तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author’s copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक: ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com
esahity@gmail.com
Whatsapp- 9987737237
(विनामूल्य पुस्तके मिळण्यासाठी आपले नाव व गाव कळवा)

प्रकाशन: १७ एप्रिल २०२४

©esahity Pratishthan®2024

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.

**हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापूर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे.**



प्रस्तावना : -

नमस्कार, मी सूरज काशिनाथ गाताडे. ' गर्भगृह ' हे माझे पंधरावे प्रकाशित पुस्तक वाचकांच्या हाती देताना मला आनंद होत आहे. मी कायम हा प्रयत्न करत आलो आहे की आपली प्रत्येक नवीन कादंबरी ही आधीच्या कादंबरीहून वेगळी आणि अधिक परिणामकारक असावी. त्यामुळे माझा बराच काळ हा स्वतःचेच लेखन रिजेक्ट करण्यात जातो. जेव्हा मला आपले हे लेखन खास आहे असे स्वतःअला वाटते तेव्हाच मी ते सादर करतो.

गर्भगृह लिहायला सुरुवात केली होती, ती नोव्हेंबर 2022 च्या शेवटच्या दोन आठवड्यात. पुन्हा पुढे तीन प्रकरणं लिहून कथा तशीच पडून राहिली. मग मार्च 2023 मध्ये लिहायला घेतली. एक प्रकरण लिहिले, पुन्हा कथा तशीच पडली, मग एप्रिल मध्ये एक प्रकरण लिहिले आणि पुनः कथा जी बाजूला पडली, ती पडलीच...

आता 2024 ला निवडणूक असल्याने ही कथा पूर्ण करायचीच हे ठरवून अखेर अनेक मानसिक संघर्षांनंतर ही कथा लिहून पूर्ण केली आहे, जी आपल्यापुढे सादर

a

आहे. 23 जानेवारीच्या आसपास ही कथा लिहायला चालू केली, आणि पूर्ण करायला साधारण दोन महिने लागले, 18 मार्चला कथा पूर्ण झाली. तिथून 26 तारखेपर्यंत थोडेफार एडिशन्स होतच गेल्या. असो...

काय होणार कसं होणार हे सगळं कथा पुढे सरकेल तसं डेव्हलप होत चाललं होतं, फक्त ते सम-अप कसं करायचं, एकसूत्री कसं बांधायचं यातच कसरत चालली होती. म्हणून एवढा वेळ लागला कथा समाप्तीसाठी.

सार्थक नेर या वाचक मित्राला आवर्जून धन्यवाद देईन ज्याने कथा प्रूफ रीड केली. मी करत बसलो, असतो, तर कथेत अजून भर पडत गेली असती, आधीच बऱ्याच गोष्टी मी टाळल्या आहेत कथा वेळेत सादर करता यावी म्हणून. त्यामुळे यात मला अजून वेळ घालवायचा नव्हता. सार्थकला विचारल्यावर त्याने ते करून दिले, त्याबद्दल त्याचे आभार.

आधीच आणि ठळक नमूद करतो, की सदर 'गर्भगृह' ही कथा पूर्णत: काल्पनिक आहे. याचा कोणत्याही जीवित, व्यक्ती अथवा संस्था यांच्याशी काही एक संबंध नाही. मला जो विचार मांडायचा होता, जे सांगायचं होतं, त्यासाठी जशी गरज होती, तशा घटना आणि पात्रे व त्यांचे स्वभाव आणि विचार कथेत आपसूक आले आहेत, इतकंच. कृपया कोणीही याचे संदर्भ खऱ्या आयुष्यात जोडू नयेत. फक्त माझे काही विचार लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी ही कथा लिहिली गेली आहे. इतकाच काय तो उद्देश आहे या कथेमागील.

माझी कोणतीही कथा आली, की त्याचे कथाबीज काही वर्षे आधीच उपजलेले असते. फक्त ती घेऊन येण्यास मला वेळ लागतो. जोपर्यंत ती कथा लिहिण्यास एक प्रेरणा मिळत नाही, तोपर्यंत कथा तशीच पडून राहते. निवडणूक

नसती, तर कदाचित ही कथा अजून किती वर्षे पडून राहिली असती, माहीत नाही. पण आता जेव्हा ही आपल्याला समर्पित करत आहे, आशा आहे, यात जे मी सांगू पाहतोय, ते अन्यथा न घेता वाचकांकडून त्यावर विचार व्हावा ही नम्र विनंती...

ही कथा परफेक्ट आहे का? तर कदाचित नसेल. कदाचित पुढे मागे मी ती रिफाईन करण्याचा प्रयत्न करेन, पण आता वेळच नसल्याने काही बदल न करता जो फर्स्ट ड्राफ्ट आहे कथेचा, तो जसाच्या तसा तुमच्यासमोर ठेवत आहे. तरी लिहिताना श्ववती श्ववती खूप हात आखडता घेतला, अन्यथा मी लिहितच बसलो असतो. परंतु कथा लवकरात लवकर वाचकांच्या पुढे ठेवायची असल्याने बऱ्याच गोष्टी मग मला मन मारुन वगळाव्या लागल्या. अजून बरेच मटेरियल पण बाकी आहे सदर कथेचे, पण ते वापरू शकलो नाही कथेत वेळेअभावी. तरी कथा कुठेही निरस वाटणार नाही आपल्याला इतकी खात्री मी देतो. जेवढं झालं आहे (तेही तसं खूपच आहे) ते मनोरंजन आहे व रोमांचक आहे हे मी अगदी पक्के सांगतो.

ही कथा पुढे नेण्यासाठी ऐनवेळी कथेत आलेली दोन पात्रे कारणीभूत ठरली आहेत. त्याबद्दल थोडं सांगावंसं वाटतं.

इब्लिस या कथेत राजन हे नांव आलं आहे, तेव्हा एक वाचक आहेत, त्यांनी मला विचारलं, की मला ते नांव त्यांच्या नावावरून सुचलं का? मी त्यांना सांगितलं, की तसं नाहीये, ते नांव माझ्या मित्राचे राजन कांबळे याचे आहे. पण हे सांगताना त्यांच्या अपेक्षा दुखवल्याचं मला वाईट वाटलं, म्हणून मग या कथेत मुद्दाम त्यांच्याही नांवाचे एक पात्र मी घेतले. 'राजन सावत' असे त्या पात्राचे नांव. ते पात्र आपसूक आलं कथेत. त्याला नांव देणं गरजेचं होतं, तेव्हा मग ही घटना आठवून या पात्राला 'राजन सावत' असं नांव दिलं.

आणि दुसरे एक पात्र म्हणजे, वैष्णवी सोनुने. हे पात्र देखील अचानक कथेच्या फ्लो मध्ये निर्माण झालं. मग त्या पात्राला नांव देताना देखील मग वाचकांमधील हे नांव निवडले, कारण कथा लिहीत असतानाच पण हे पात्र निर्माण हो याच्या काही दिवस आधीच त्यांचा 'अ प्योर वन' वाचल्याने प्रतिक्रिया देणारा मला मेसेज आला होता. माझ्या कथा वाचण्यासाठी वैष्णवी यांना राजन यांनीच सुचवले होते.

आता दोघांना कथेत गुंफले आहे, तर त्यांना योग्य न्याय देण्याचा माझ्यापुढे पेच होता. मग त्यांचे कथेत जसे प्रोफेशन्स आहेत, त्यानुसार मग कथा पुढे नेण्याचे सुचत गेले आपसूकच. आणि कथा पूर्णत्वास सरकत गेली. शक्तीसेनचा कथेवर डॉमिनन्स, आणि राजन व वैष्णवी ही पात्रे हा कथेत नसती, तर कथा वेगळया अंगाने पुढे गेली असती. पात्रं कथा घडवतात असं मी म्हणतो, तेव्हा त्याला पुष्टी देणारी ही उदाहरणे म्हणून आवर्जून नमूद केली. कथा म्हणजे आपल्या पात्रांचं ते आयुष्यच. त्यामुळे त्यांनाच त्यांचे आयुष्य घडवू द्यावे असे माझे मत आहे. ज्या कथा त्यांतील पात्रं घडवतात ना की लेखक आशा कथाच सर्वोत्तम असतात असं माझं म्हणणं आहे. तर असो,

सदर कथेत शक्ती आपल्याला अंतःपुर पेक्षा हसमुख, चेष्टा-मस्करी, प्रियसीवर अतोनात प्रेम करताना वगैरे दिसेल. आयुष्यात झालेल्या उलथापालथी पूर्वी व त्यामुळे आंतरिक तुटण्यापूर्वी शक्ती कसा होता याचं चित्रण या कथेत वाचकांना होईल.

निवडणूक आधी मी कथा लिहून पूर्ण जरी केली असली, तरी ही कथा पूर्ण करायला मी तसा खूप वेळच केला आहे असे वाटते. कारण जरा आधी ही कथा मी

पूर्ण करू शकलो असतो, तर अधिक लोकांनी वाचली असती... असं वाटतं. पण असो...

सदर गर्भगृह कथेतून मी काही विचार समोर ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. तरी ही कथा वाचून एकाचे जरी मन व मत परिवर्तन झाले, तर ती माझी सर्वांत मोठी उपलब्धी असेल, देशसेवेच्या कार्यात हे माझं अगदी लहानसं, नगण्य, परंतु योगदान असेल माझे, असे मी मानेन!

पुनः ईसाहित्य आणि टीमला देखील उदंड धन्यवाद, की ते नेहमी मला एक प्लॅटफॉर्म उपलब्ध करून देतात, माझ्या कथा लोकांना समर्पित करण्यासाठी, ज्या माध्यमातून मी माझे काही विचार मांडू शकतो.

तर आता, कथेचा आनंद घ्या. कथा पूर्णतः काल्पनिक आहे, त्यामुळे कोणी पर्सनली घेऊ नका ही नम्र विनंती. फक्त काय लिहिलं आहे यावर विचार करा ही नम्र विनंती... आशा आहे चार वर्षांनी परत आलेला शक्तीसेन व त्याची ही नवी संघर्षकथा आपल्याला नक्की आवडेल. आभार...!!!

a

**"आम्ही भारताचे लोक" यांना समर्पित...**

**"IN POLITICS, NOTHING HAPPENS BY ACCIDENT. IF IT HAPPENS, YOU CAN BET IT WAS PLANNED THAT WAY!"**

**- Franklin D. Roosevelt**

**"THE DUTY OF A TRUE PATRIOT IS TO PROTECT HIS COUNTRY FROM ITS GOVERNEMNT!"**

**-Thomas Paine**

**"SPEAK THE TRUTH, EVEN IF YOUR VOICE SHAKES!"**

**- Maggie Kuhn**

# गर्भगृह

ही कादंबरी पूर्णतः काल्पनिक असून त्यातील घटना, स्थळे व पात्रे यांचा वास्तव व्यक्ती वा घटनेशी साम्य आढळल्यास तो केवळ योगायोग मानावा.

a



Modified 'Ashani .32 GSF Mk2'
(कथेत शक्तीसेन वापरत असलेली पिस्टल)

# १. संदिग्ध...

"मग? आज सूर्य काय विरुद्ध दिशेला मावळलाय की काय?" ती उपहासाने पण मस्करीच्या सुरात म्हणाली.

"काही तरी चुकतंय तुझं. उगवलाय का असं म्हणतात." त्याने तिला चिडवण्यासाठी विरुद्ध खिल्ली उडवली.

"हा... पण मी मावळलाय का? असं मुद्दामच म्हणाले. तू डिनरला जो घेऊन आला आहेस?" तिने कडी केली.

आणि गोड लाघवी स्मित करत तिने ज्यूसचा ग्लास ओठांना लावला व त्यातील ज्यूस घोळवत राहिली.

त्याची तीक्ष्ण नजर मात्र त्या महागड्या हॉटेल मधल्या रेस्टॉरंटच्या कोपऱ्यात लागून होती.

एक उंची वस्त्रं म्हणजे थ्री पीस सूट घातलेला. खिशात लाल रेशमी रुमाल असलेला माणूस तिथं आपला आहार घेऊन बसला होता. ऑर्डर केल्यापासून व ती आल्यापासून त्यानं खाल्लं मात्र काही नव्हतं. ही गोष्ट खटकणारी होती. शिवाय सतत त्याचे डोळे घड्याळ तपासत होते. मिनिटाला जणू तास गेला असल्यासारखा तो पुनःपुन्हा वेळ पाहत होता.

घड्याळावरून नजर काढून त्याने ती इतस्ततः फिरवली आणि ती शक्तीसेनच्या नजरेला भिडली व तिथेच ती काही क्षण लॉक झाली. हा अनोळखी माणूस आपल्यावर लक्ष ठेवून आहे हे समजायला याला अधिकच

a

वेळ लागला नाही, जरी शक्तीसेननं आपलं अटेंशन जिज्ञासाकडं वळवलं होतं. आपल्याबाबत त्याला संशय आलाय हे शक्तीही उमजून गेला होता.

तिच्याही ध्यानात आलं होतं, शक्तीसेन आपल्याला आऊटिंगसाठी, डिनरसाठी म्हणून घेऊन आला आहे खरा, पण याचा खरा इरादा काही औरच होता. ती खवळलीच!

"वाटलंच होतं! तरी म्हंटलं याला आपली आठवण कशी झाली?" ती उखडून बोलली.

शक्तीसेन तिला शांत राहण्यास खुणावू लागला.

"प्लिज शांत बस." तो हळू पण जोर देऊन बोलला.

"काय प्रकार आहे?" तिने तडकून विचारलं.

तो खजील हसला.

"काही नाही गं... पोलिसी नजर. निरीक्षण करत फिरायचीच... तू जेव..." तो मधाळ हसत बोलला.

"घोळात घेऊ नको!" तिने भुवई उडवून चेतावणी दिली.

"हे! तुला? आणि मी? तुला कोणी गंडवू शकतं का?" त्याने हसत विचारलं.

"तुझं नक्की काहीतरी चाललं आहे." ती शंकीत म्हणाली.

"नाही गं." तो निरागस तोंड करून बोलला.

जिज्ञासा संशयीत डोळे बारीक करून त्याच्याकडं पाहू लागली. तशा मुद्रेतच ती जेवू लागली. शक्तीसेननंही मग काटे चमचे हाती घेतले.

a

कोल्हापूरमध्ये मानवत नसून पण आपल्या प्रियसीला आवडतं म्हणून टक्सिडो घातलेला शक्तीसेन त्याची प्रियसी जिज्ञासा हिला डिनरसाठी या थ्री स्टार हॉटेलला घेऊन आला होता. तीही एक पर्ल कलरचा सिल्क गाऊन परिधान करून आली होती. कर्ल केलेले तिचे काळेभोर रेशमी केस... कोणीही मोहात पडावं इतकी ती निरागस सूंदर दिसत होती. शक्तीचं मात्र त्याकडे लक्ष नव्हतं.

त्याला काही उचापत करायची असली, की ही त्याची नेहमीची आणि हक्काची छद्मसाथी असायची. आज हा असा डिनरला घेऊन आलाय आणि त्याचं लक्ष आपल्याकडं नसून वेगळंच काही धुंडाळत आहे म्हटल्यावर हा आत्ताही काहीतरी हल्लकल्लोळ करण्याच्या तयारीत आहे हे आजपर्यंतच्या अनुभवातून ती जाणती झाली होती. तिचे विचार वेगळीकडं फिरवण्यासाठी म्हणून परंतु खरंच मनापासून तो तिची विचारपूस करू लागला,

"मग? मुंबईच्या मोठ्या हॉस्पिटलकडून तुला तिथं प्रॅक्टिस करण्याची ऑफर आलेली म्हणे? काय झालं?" त्यानं घास घेत विचारलं.

"मी नाही सांगितलं." ती सहज म्हणजे काही विशेष नसल्यासारखी बोलली.

"का?" त्यानेही उत्तर ठाऊक असल्यागत सहज विचारलं.

तिने हात खाली टेबलावर टेकवले.

"तुला माहीत आहे. तुला सोडून मी कुठं जाणार नाही." ती बोलली.

"आणि माझीच बदली झाली तर?" शक्तीनं विचारलं.

"मी तिथं येईन." ती हसत म्हणाली.

तोही हसला.

"वेडी आहेस तू!" तो तिला म्हणाला.

"नाही! पण तुझ्यासारख्या वेड्याला ताळ्यावर आणायला डॉक्टर नको?" ती लाडिक बोलली.

शक्तीसेन यावर मात्र खरेच गंभीर झाला.

"माझ्यामुळं तुझी फरफट होते आहे कळतंय मला... तू माझा विचार सोड असंही सांगू शकत नाही, कारण मीही प्रेम करतो तुझ्यावर..." तो गांभीर्यानं बोलला.

"आणि सांगितलंस तरी मी ऐकणार नाही!" ती गोड प्रेमळ हसली.

"तू तुझं स्वप्न पूर्ण कर. आपण लॉंग डिस्टन्स रिलेशनशिपमध्ये राहू ना." त्यांनी अनेकदा चर्चिलेला विषय पुन्हा काढत तो बोलला.

"मला तुझ्या सोबत रहायला आवडतं." ती जास्ती स्पष्टीकरण न देता मोजकं बोलली.

"तुला तुझ्या हॉस्पिटल ग्रुपच्या मुंबईतील कार्डीएक स्पेशलिस्ट हॉस्पिटलची हेड सर्जन होण्याची ऑफर आहे, आणि तू नाही म्हणतेस जायला. तेही माझ्यामुळं... गेलीस तर तुझं स्वप्न पूर्ण करता येईल तुला." तो अपराधी बोलला.

"माझं काम मी इथंही करतीएच की. डॉक्टरकी बरी चालली आहे माझी. तुला उगाच वाटतं माझं काही बिघडलय म्हणून." ती समजावत बोलली.

"पण हे तेवढं नाही जेवढं तू डिसर्व्ह करतेस." तो हताश बोलला.

तिनं प्रेमानं त्याच्या हातावर हात ठेवला.

"मी जे डिसर्व्ह करते ते माझ्याजवळ आहे." ती समजूतदार बोलली. स्नेहशील मिठास हसली.

तिच्या या बोलण्यानं त्याला अजून जास्तीच अपराधी वाटलं.

"प्लिज माफ कर..." तो म्हणाला.

"स्वतःला विनाकारण गिल्ट देणं बंद कर." ती प्रेमानं बोलली.

संवाद चालू असतानाच त्याची नजर सहज त्या माणसाकडं वळली. त्या संशयितानं अखेरचं घड्याळ बघितलं व आपली ब्रिफकेस घेऊन तो उठला. वॉलेट काढून त्यानं हाताला येईल ती रक्कम टेबलच्या मेनूत सारली व त्यानं टेबल सोडला.

त्याला शक्तीसेनला पास करूनच बाहेर जाणं भाग होतं. त्यानं जाणूनबुजून पण सहज वाटावं अशा तऱ्हेनं मोठ्या खुबीनं शक्तीसेनशी नजरानजर टाळली होती.

तो गेला तसा शक्ती उठला. बिलाचा अंदाज लावत आपल्या वॉलेट मधील जरा अधिकच पैसे काढून त्यानं टेबलवर जिज्ञासा जवळ सरकवले.

"आवरलं, की सरळ घरी जा." तो अत्यंत सिरीयस भावानं तिला बोलला.

जिज्ञासा आता खरी गंभीर झाली. काही तरी सिरीयस मॅटर आहे हे ती ओळखून चुकली. ती काही विचारणार, पण तिला उत्तर देण्यास तो तिथं थांबला नव्हता.

शक्तीनं कधीच त्या माणसाच्या मागून ते पॉश रेस्टॉरंट सोडलं होतं.

त्या थ्री-स्टार हॉटेलच्या कॉरिडॉर मधून चालताना तो माणूस फोनवर कोणाशी तरी बोलत होता. आपला मागोवा घेतला जातोय का हे पाहण्यासाठी तो थोडा रेंगाळला.

माणूस थोडा विचारात पडला. त्यानं सगळीकडं आपली सावध पण कोणाच्या लक्षात येणार नाही, इतक्या सहज नजर आधी मागे व मागावर कोणी न दिसल्यानं चौफेर फिरवली.

त्याची मान आपल्याकडे फिरतीये असं ध्यानी येऊन शक्ती एका भिंतीच्या मागे झाला लगोलग. त्यांच्यात फार अंतर नव्हते. त्यामुळे तो माणूस का बोलतो, हे शक्तीला स्पष्ट ऐकू येणे स्वाभाविक होते.

"ठीक आहे. पण सब्स्टन्स लगेच एक्स्चेंज करू आणि निघू! अजिबात बोलायचं नाही. काय चर्चा असेल, ती नंतर होईल." त्या इसमाने पलीकडील व्यक्तीला ठणकावलं.

*"कबूल!"* तिकडून संमती दिली.

"आलो." त्यानं पुन्हा सभोवार पाहिलं. आणि तो हॉटेलच्या बाहेर पडून बेसमेंटच्या पार्किंग लॉटकडं सरकला.

एका भिंतीमागे दडलेला शक्तीसेन मग पुढे आला व कोणाला फोन लावतच त्यानं बाहेर जाण्याची घाई केली.

"शक्तीसेन बोलतोय. हॉटेल सनशाईनला बॅक अप पाठवा." कंट्रोल रुमशी बोलत तो रस्त्यावर आला.

शक्तीसेन त्या माणसाला पार्किंगला जाताना पाहत होता. आता जास्त वेळ घालवून चालणार नाही असं त्याचं मन त्याला सांगत होतं. त्यानं बॅक-अप टीमची वाट न पाहता स्वतःच्या जबाबदारीवर एक्शन घेण्याचा निर्णय घेतला आणि तो त्या माणसाच्या मागं झाला. त्यानं असलं धाडस करण्यामागे कारण काय होतं...? इतकं काय निकडीचं होतं, ती जीवावर उदार झाला होता...?

●●●

पार्किंग लॉटच्या प्रवेशालाच एक हट्टाकट्टा आदमी होता. त्यानं तत्परतेनं शक्तीला अडवलं.

"माझी गाडी आहे आत." शक्ती त्या माणसाला म्हणाला.

"घ्या नंतर. जरा काम चालू आहेत आत. आत जाता येणार नाही!" तो मुर्दाड भारदस्त अशा धमकवल्या आवाजात बोलला.

"तुम्ही काम करता इथे?" शक्तीचा प्रश्न.

"तुम्हाला काय त्याचं? निघा!" तो उर्मट बोलला.

शक्तीसेननं खांदे उडवले व तो मागे वळला. 'ब्याद टळली' असं वाटून तो आडदांड जरा ढिलावला व ती संधी साधून शक्तीसेननं त्याच्यावर हल्ला चढवला. टेजरने जोराचा शॉक देऊ शक्तीनं त्याला धराशाही केलं होतं. आतील

जे कोणी असतील त्या लोकांना सावध करण्यासाठी अगर स्वतःला होणाऱ्या वेदनेनं म्हणून पण त्याला ओरडण्याची साधी संधी मिळाली नव्हती. एकही अवयव हलवता येण्याची त्याच्यात क्षमता राहिली नव्हती. तडफडणाऱ्या त्याच्याकडं लक्षही न देता तो लोळण घेऊ लागताच शक्ती आत शिरला.

पार्किंग लॉटमध्ये तो खूप दक्षतेनं आपली चाहूल न लागू देता आत शिरला. एन्ट्रन्स जवळूनच त्यानं त्या संदिग्ध माणसाला शोधलं. पार्किंग लॉट मोकळं होतं. ओळीनं उभ्या गाड्या सोडल्यास जिवंत असं कोणी तिथं नव्हतं.

नाही!

कोणी दिसत होतं... एका कोपऱ्यात तो माणूस कोणाशी हस्तांदोलन करताना शक्तीला दिसला.

टेजर गन आपल्या जागी जाऊन बसली होती व त्याची ग्लॉक सेव्हन्टीन त्यानं होलस्टरची काढून कधीची हाती घेतली होती. ती सज्ज ठेवून तो एका पिलरच्या जवळ जाऊन त्यामागे लपला. जेणेकरून त्याला या दोघांचं बोलणं ऐकता येईल.

दुसऱ्या नव्या इसमाने शक्ती पाठलाग करत असलेल्या इसमाला कसलीशी प्लास्टिक झिप पिशवी हँड ओव्हर केली. त्या संदिग्ध माणसानं त्याच्या ब्रिफकेस मधून एक निळी वेलवेटची थैली बाहेर काढून ती त्या माणसाला देऊ केली.

त्या माणसानं ती थैली उघडली. आतील जिन्नस पाहिले. योग्य असल्याची खात्री केली. त्याने सोनाराचा असतो तसा छोटा मॅग्नीफाईन ग्लास कोटाच्या खिशातून काढून उजव्या डोळ्याला लावला. त्यातील खडे...

नव्हे,

'हिरे!'

ते हिरे हातात घेऊन तो एकेक हिरा जोखून घेऊ लागला.

"हे नंतर करा. आता घाई करा. आणि ही सॅम्पल झाली." हातातली प्लास्टील पिशवी वर करून तो बोलू लागला,

"ठरलेली शिपमेंन्ट?" काही न बोलण्याचा आपला नियम मोडत त्यानंच विचारलं.

ही वस्तू घ्यायला तो आला होता, ती लागलीच हाती पडेल अशी त्याची आशा असावी, जी पुरी झाली नव्हती. ठरलेली क्वांटीटी न देताच त्याच्या हाती सॅम्पलचं पुडकं हाती टेकवलं होतं.

"मिळून जाईल." हिरे तपासतच तो सहज म्हणाला.

"विश्वासघात झाला तर? याद राखा ऍडव्हान्समध्ये फुल पेमेंट केलं आहे. शिपमेंन्ट मिळाली नाही तर..." तो जरा धमकावत बोलला.

"मिळेल! काळजी नको." तो आश्वस्त करत बोलला.

त्याचे हिरे तपासून झाले होते. त्यानं ते निळया थैळीत कैद केले व सोनेरी दोरी आवळली.

"ए!" त्या आडदांडचा आवाज घुमला.

लपून असलेल्या शक्ती सोबत त्या दोघांच्या माना एन्ट्रन्सला वळल्या.

"काय आहे?" हिरे घेतलेला माणूस ओरडला.

a

"बॉस! हा माणूस आत शिरलाय! गन आहे त्याच्याकडे!" तो भारदस्त माणूस पिलरकडे बोट करून बोलला.

आणि कोटाच्या आत दडवलेली पिस्टल काढून त्यानं त्याची ती पिस्टल शक्तीवर उगारली. ती तो चालवणार तोच शक्तीनं त्याच्या मांडीत गोळी झाडली. तो माणूस गुडघ्यांवर आला. वेदनेनं तो कळवळत रक्त सांडत बसून तो दुखणं सोसत गुडघ्यांवर राहिला.

शक्ती त्या दोघांवर त्याची पिस्टल ताणून पिलर मागून बाहेर आला. तो मागेही लक्ष देत मागे चालू लागला. त्यानं त्या आडदांड माणसाची गन काढून घेतली. तो हल्ला करू नये याची दक्षता म्हणून आणखी एक टेजर शॉक देऊन त्याला अर्धमेला करून सोडून दिला.

समोर त्या दोघांपैकी नव्या संदिग्धाची पिस्टल शक्तीवर रोखली गेली होती. कोणतीही विचारपूस करण्यात हिरे घेतलेल्या माणसाला रस नव्हता. तो गोळी मारणार इतक्यात शक्ती पाठलाग करत आला त्या व्यक्तीनं त्यास थांबवलं. मानेने 'नको' अशी खूण केली. थंड डोक्याचा होता तो. त्याच्या डोक्यात नक्की काही शिजत होते. परंतु दुसऱ्या इसमाला कड नव्हती. तो पिस्टल ताणूनच पुढे झाला.

"कोल्हापूर पोलीस! अँटी टेररीजम युनिट! कोणताही मूर्खपणा करू नका. तुमची चुकीची कृती तुमच्या विरोधात जाईल!" शक्ती त्याला चेतावणी देत बोलला.

त्यानं ऐकलं नाहीच. 'पोलीस' हा शब्द ऐकून तो अधिकच बिथरला आणि त्यानं शक्तीवर गोळी झाडली.

शक्ती ती गोळी चुकवण्यासाठी हवेत झेपावला. हातांच्या सहाय्यानं पाठीवर रोल होऊन तो पुन्हा त्या पिलर मागे जाऊन लपला.

चिडलेला तो माणूस पुढे येतच राहिला. तो शक्ती समोर आला. त्यानं शक्तीवर पिस्टल रोखली. शक्तीला जित्ता जाऊ देणार नव्हता तो. त्यानं ट्रिगर ओढला. गोळी सुटली. शक्ती जातीचा चपळ म्हणूनच वाचला. प्रसंगावधान राखून त्यानं मान तिरकी केली होती.

गोळी पिलरमध्ये घुसली होती. पण या गडबडीत शक्तीकडूनही गोळी सुटली होती. तो माणूस जवळून पोटात अगदी जिव्हारी गोळी लागल्यानं जमिनीवर कोसळला होता.

शक्ती मग झटक्याने पुढे झाला. त्यानं तो पाठलाग करत असलेल्या माणसावर गन ताणून उभा राहिला.

तो माणूस निश्चल निष्क्रिय होता. विखारी नजरेनं जणू शक्तीला तो नजरेनंच जाळून टाकेल असा तीव्र तो त्याला पाहत होता.

शक्ती पुढे सरकला, तर मागे पोटात गोळी लागलेला माणूस उठला. त्यानं शक्तीवर मागून गोळी झाडली. आणि रक्ताची एक धार हवेत उडाली...

# २. फरार...

सुदैवे; त्या व्यक्तीचा नेम चुकला. शक्तीला कोणत्याही वाईटल (नाजूक, आघात झाल्यावर मृत्यू होईल अशा) बॉडीपार्टवर गोळी लागली नव्हती, परंतु शक्तीचा डावा हात मात्र जायबंदी होऊन गेला. शक्ती मागे फिरला. पाहतो, तर तो माणूस पुनःश्च शक्तीवर फायर करण्यास बंदुकीचा चाप ओढत होता. शक्तीने बचावासाठी त्याच्या पिस्टल मधील गोळी त्या माणसाच्या शरीरात सारली. ती नेमकी घुसली ती त्याच्या छातीत. हृदय भेदून ती बाहेर पडली होती.

तिकडे तो संदिग्ध माणूस तसाच उभा होता अगदी निश्चल. शक्तीची गन तातडीने पुनः त्याच्यावर रोखली होती.

तो हलतही नव्हता. शक्ती तरीसुद्धा त्याच्यावर सावध डोळा ठेऊन होता. काही काळाच्या अंतराने पोलीस सायरन्सचा आवाज घुमू लागला. शक्तीने मोबाईल काढला. फोन केला.

"पार्किंगला या." तो मोबाईलमध्ये म्हणाला.

त्याची घारनजर त्या संदिग्धावरच रोवली गेली होती. आणि त्याची घातनजर शक्तीवर!

तीन-चार पोलीस गाड्या धडाधड पार्किंगला शिरून स्थिरावल्या. समोरील दृश्य पाहून काळजीत पडलेले पोलीस ऑफिसर्स गाड्यांतून पटापट बाहेर पडले.

दोन जण त्या आडदांड पहारेकऱ्याला सावरायला गेले. दोन त्या संदिग्ध व शक्तीवर डोळ्यांतून आग ओकणाऱ्या माणसाकडे पळाले व त्याला त्यांनी ताब्यात घेतला. तर अतिचिंतीत असलेला फ्रान्सिस शक्तीकडे धावत आला.

"हे काय झालं इथं?" त्यानं काळजीत विचारलं,

"आणि तू... जखमी आहेस?" फ्रान्सिसला धक्का!

"लेट्स मूव्ह!" इतकंच शक्ती त्याला म्हणाला.

ऑफिसर्स त्या संशयिताला गाडीकडे नेण्यास धरणार इतक्यात तो बोलला,

"व्हॉट्स दि चार्जेस ऑन मी ऑफिसर?" त्याच्या आवाजाला धार होती.

शक्ती काही बोलला नाही. तो फक्त आपल्या खिशातील एक ग्लव्ह काढून ते उजव्या हातात घालत त्या माणसाकडे चालत गेला. त्याच्या हातातील ती पॉलिथिन त्याने स्वहाती घेतली व त्या माणसाच्या डोळ्यांसमोर उंचावली.

"इस थिस इनफ?" तो त्या माणसाकडे तीव्र दृष्टीने बोलून म्हणाला.

त्या माणसाला तात्पुरती तरी बोलायला जागा राहिली नाही. त्याला घेण्यास आलेले दोन ऑफिसर्स दोन्ही बाजूंनी त्याला धरून घेऊन गेले व त्यांनी त्याला गाडीत कोंबला.

गार्डला सुद्धा एका गाडीत बसवण्यात आले. त्या गाड्या निघून गेल्या.

"तूही जावंस." फ्रान्सिसने शक्तीला सुचवलं.

शक्तीने मरून पडलेला माणसाकडे पाहिलं.

a

"त्याची काळजी नको. मी सांभाळतो." तो शक्तीला म्हणाला.

शक्ती मग मेलेल्या माणसाकडे गेला. त्याच्याकडील हिऱ्यांची थैली त्याने घेतली व गाडीत जाऊन बसला. गाड्या हलल्या. त्या जाताच फ्रान्सिसने फोन काढला.

"हॅलो एम्ब्युलन्स!"

●●●

जिज्ञासा हॉटेल बाहेर आलेली होती. अत्यंत काळजीत. पोलीस गाड्या तिच्या समोरून जाताना ती पाहत होती. आत तिला शक्ती दिसला. याहीवेळी त्याने कोणालातरी पकडण्याच्या त्याच्या प्लॅनमध्ये आपला कॅमोफ्लाज (मायावरण) म्हणून वापर केला याचा तिला भयंकर राग आला होता.

◆◆◆

"व्हॉट ईस थिस बिहेवियर शक्तीसेन?" सुप्रीटेंडेंट किशोर निंबाळकर चांगलाच तापला होता,

"एक माणूस मारला! दुसरा जखमी केलास! बॅक अप आलेला नव्हता, तर तुम्हाला वैयक्तिक एक्शन घेण्याची परवानगी कुणी दिली होती? त्यावर तुम्ही या कार्यवाहीत सामान्य नागरिकाला गोवलत! कोल्हापूर पोलीस डिपार्टमेंटच्या अँटी टेररीजम युनिटचे तुम्ही इंचार्ज आहेत आणि तुमचा हा बेजबाबदारपणा?

a

काही झालं असतं तिला तर?" त्याच रात्री एसपी शक्तीला केबिनमध्ये घेऊन मस्त झापत होता.

शक्ती काही न बोलता फक्त ऐकत होता. त्याने हात मागे बांधले होते. त्याची जखम सहसा दिसत नव्हती. त्यामुळे तरी त्याचे रक्त वाहून हात ओला करत होते.

त्याने शांतपणे डावा हात मागे ठेवूनच उजव्या हाताने आपल्या खिशातील ती झिप पॉलिथिन आणि हिऱ्यांची निळी थैली एसपी समोर ठेवली.

"काय आहे हे?" तो अजूनच तडकला.

"ज्यासाठी मी गेलो होतो ती वस्तू! युरेनियम आहे हे. आणि त्यात हिरे!" शक्ती दोन्ही थैल्या क्रमवार दर्शवत म्हणाला.

"म्हणजे?" एसपी गोंधळात.

"युरेनियमचं डिलिंग चालू होतं तिथं." शक्ती थंडपणे बोलला,

"बॅक-अप वेळेवर आला नसता, तर मी तिथं असून सुद्धा हे डेंजरस लोक हातून सुटले असते, तुमच्याही जीवाचं काही बरं वाईट झालं असतं, आणि जिज्ञासाच्या पण जीवावर बेतलं असतं!" त्याने त्याच्या आततायी वागण्यामागील भूमिका स्पष्ट केली.

"आणि तुम्हाला काही झालं असतं तर?" एसपी तडकत बोलला.

"लोकांच्या सुरक्षेपेक्षा माझा जीव मोठा नाही!" शक्ती शांतच.

a

"ते सगळं बरोबर आहे, पण पुन्हा असलं काही वागू नका. आणि तुम्हाला ही इन्फॉर्मेशन मिळालीच कुठं?" एसपी अक्षरशः जाब विचारत होता. ही त्याची शक्तीप्रति काळजी बोलत होती.

"माझा इंफॉर्मर आहे. अधिक माहिती नाही सांगू शकत." शक्ती निर्वाणीचं बोलला.

"मलाही नाही?" एसपीने भुवई उडवली.

"सध्या तरी नाही. त्याचा जीव धोक्यात येऊ शकतो." शक्तीचे स्पष्टीकरण.

"आणि हे हिरे?" एसपीनं विषय बदलला.

"एक्स्चेंज म्हणून!" शक्ती उत्तरला.

"पण हिरेच का?" एसपी अजूनच पेचात.

"मोठ्या रकमेपेक्षा कॅरी करायला सोपे जातात म्हणून असेल. ऑनलाईन ट्रांजेक्शन मध्येही रेकर्ड, ट्रेसेस राहतात. डायमन्ड्स आर दि बेस्ट ओप्शन्!" शक्तीनं तर्क बोलून दाखवला.

"क्वाईट पोसिबल." एसपी विचार करत शक्तीशी सहमत होत बोलला.

आणि त्याने वर पाहिलं. आता डोकं बरंच शांत झाल्यानं त्याचं लक्ष शक्तीच्या हाताकडे गेलं.

"अरे! तुम्ही तर जखमी आहात!" तो आश्चर्याने बोलला.

"जास्त काही नाही. फक्त गोळी घासून गेली आहे."

"ट्रीटमेंट घ्या! पुढची सगळी प्रोसिजर आम्ही सांभाळतो आता."

a

शक्ती त्यावर काहीच बोलला नाही. विश्राम मध्ये असलेला तो सावधान झाला आणि एसपीला सल्युट करून त्याने केबिन सोडलं. एसपीने त्याच्या कपाळावरील चिंतेचं जाळं अधिकच गडद केलं.

◆◆◆

शक्ती फ्लॅटचं दार उघडून आला. तो दमल्यासारखा झाला होता. अंगात अशक्तपणा भरला होता. त्यानं दार बंद केलं. फ्लॅटमध्ये अंधारच. त्याने लाईट्स वगैरे काही लावल्या नाहीत. जाऊन तो सोफ्यावर आता स्वतःला ताणून देणार होता. रक्ताने डावा हातोबा भरलेला तो कोट शिस्तीत काढून टेबलवर ठेवून दिला आणि आत चालला, तर लिव्हिंग रूममध्येच चिडून त्याच्याकडेच बघत उभारलेली जिज्ञासा त्याला दिसली. हाताची घडी घालून जाब विचारण्याच्या पवित्रातच ती होती.

परंतु त्याच्या हाताची जखम बघून ती तिचा राग पार विसरून गेली. लगबगीने ती शक्तीकडे धावली. त्याचा डावा दंड काळजीने बघत ती बोलली,

"काय हे किती लागलं आहे. रक्त पण खूप गेलंय. तुला ही असली धाडसं करण्यात काय मजा येते कळत नाही!" ती त्यातूनही त्याच्यावर उखडून त्याला झापत होती.

"पोलीस म्हणून माझं ते कामच आहे!" तो जबाबदार बोलला.

"पोलीस म्हणून दुसऱ्याचं रक्षण करणं जसं तुझं कर्तव्य आहे, तसं स्वतःचं रक्षण करणं हे पण तुझं कर्तव्यच आहे हे विसरतोस का तू दरवेळी?" ती उखडली.

"ते करतानाच हे झालं आहे." तो लाघवी हसत बोलला.

a

"गप आता काही बोलू नको." तिने ठणकावलं.

ती त्याला आधार देत सोफ्याकडे घेऊन गेली. त्याला बसवलं. तो तोल गेल्यागतच सोफ्यावर पडला.

"तुला लोकांसमोर दुसरं काही सुचत नाही." ती बोलतच फस्टएड बॉक्सकडे गेली.

त्याच्या जवळ बसून स्वच्छ कापूस घेऊन हायड्रोजन पॅरॉक्साईडने ती शक्तीची जखम पुसून घेऊ लागली. ती अगदी तन्मयतेनं व आपुलकीनं त्याहून प्रेमानं हे काम करत होती. शक्ती नुसताच तिच्याकडे बघत होता. जखमेला डिसइन्फेक्टन्ट लावून त्याला मलमपट्टी करण्याचं तीच काम चालू झालं...

दरम्यान तिची अखंड बडबड चालूच होती,

"बरं तर बरं. गोळी रुतून राहिलेली नाही. तरी जखम खोल आहे. तुला नेहमी नको ते धाडस हवं असतं! कोणाची काळजी करायची नाही काही नाही... मागे कोणी आहे काळजी करणारं हे पहायचंच नाही. होय की नाही...?" जिज्ञासा शक्तीला रागे भरत होती.

"एवढा त्रास होतो तर सोडून का जात नाहीस मला? चांगलं भविष्य सोडून माझ्या सोबत हे असलं आयुष्य जगतेस तू..." तो तिला बोलला.

ती भयंकर म्हणून चिडली. तिने शक्तीची ती पट्टी करत असलेली जखमच दाबली.

"ए! दुखतंय!" तो मस्करीत ओरडला.

"तेच! दुखतंय. तुझं असं बोलणं!" ती गुश्श्यात बोलली.

शक्ती निरागस हसला. परंतु त्याच्या त्या स्मितामध्ये एक अपराधीपणाची झाक होती. आपल्यावर एवढा जीव लावणाऱ्या या मुलीला आपल्या अशा वागण्याने आपल्याकडून कधी सुख मिळणार नाही याची त्याला जाणीव होती...

पट्टी बांधून घेता असतानाच...

"मी खूप त्रास देतो ना तुला?" तो अपराधी बोलला,

"यु डोन्ट डिसर्व्ह मी." तो तिला म्हणाला.

"ते मी ठरवू प्लिज!" ती जरा चिडूनच बोलली,

"बरं चल. हॉस्पिटलला जायला पाहिजे. तुला अतिदक्षतेची गरज आहे. आवश्यकता भासली, तर रक्त पण चढवावं लागेल." तिची पट्टी करून झाली होती. ती त्याला उठण्यास आधार देत म्हणाली.

◆◆◆

शक्तीसेनचा दुसरा दिवस रात्रीच्या अंधाऱ्या पाठीवर दस्तक देऊन उगवला तो जिज्ञासाच्या हॉस्पिटलमध्ये. स्पेशल वॉर्डमध्ये तो आराम करत होता. रक्ताची एक बॉटल संपली होती. आता त्याला आईव्ही चढवलं जात होतं, जे रिकामी ब्लड बॉटल असलेल्या त्याच स्टँडला लटकत होतं.

एसपी दुष्यंत इराणी शक्तीची शांती भंग करण्यास येऊन ठेपला होता. त्याच्या हातात एक काळी सुटकेस होती. त्याने शक्तीला हाक मारून उठण्यास बाध्य केलं.

शक्ती उठण्याचा प्रयत्न करू लागला.

"सर तुम्ही...?" एवढ्या सकाळी एसपीचा हॉस्पिटलमध्ये बघून शक्ती अचंबित झाला.

"कशी आहे तब्येत?" एसपीचं तोंड अगदी स्ट्रेट पोकर होतं.

परंतु त्याच्या आवाजात नक्कीच काळजी होती, असं शक्तीला जाणवलं.

"बरा आहे. तसंही जास्त काही नाही. आपण इथं?" शक्तीने विचारलं.

"यू वर् राईट शक्तीसेन. काल तुम्ही जे पकडलं ते नॅचरल युरेनियमच आहे. भाभा एटॉमीक रिसर्च सेंटरला ते मटेरियल चेक करण्यास पाठवलं होतं. त्यांनी कन्फर्म केलंय!" एसपी शक्तीला माहिती देत बोलला.

शक्तीची मान होकारात हलली. आणि त्याला हे जाणवलं, की एवढ्या सकाळी का भेटायला आला. शक्तीला खात्री असली, युरेनियम बद्दल, तरी भाभा एटॉमीक सेंटर कडून पुष्टी आल्यावर ती बातमीच तशी चिंतेची होती, एसपीसाठी.

"पण धोका टळलेला नाही ऑफिसर! उलट वाढलाय!" एसपी बोलला. तो अजूनही भावहीनच होता.

"काय झालंय सर?" शक्तीने थोडं चिंतेनेच विचारलं.

"शक्ती! सगळा खेळ तुझ्यावर उलटला आहे! तुझ्याविरुद्ध चौकशी समिती बसवली जाणार आहे!" एसपी थेट मुद्द्याचं बोलला.

"काय?" शक्तीसाठी हा मोठा शॉक होता.

"यु हर्ड् इट राईट!" एसपीने खात्रीचा निर्वाळा दिला.

"पण का सर? मी काय केलं?" शक्तीचा प्रश्न.

"यु किल्ड अ पर्सन." एसपीचं उत्तर.

"दॅट वॉस दि सडन रिएक्शन सर, आऊट ऑफ सेल्फ डिफेन्स!" शक्ती कन्विन्स करण्यासाठी कळकळला.

"पुरावा? पार्किंगमध्ये जिथे ही घटना घडली, तो ब्लाइंड स्पॉट होता. तिथं सीसीटीव्ही नसल्यानं काही सिद्ध नाही करू शकत." एसपी शांतपणे बोलला.

"पण ते गुन्हेगारच आहेत ना. तुम्ही मघाशी सांगितलंत, जे मटेरियल ते एक्स्चेंज करत होते, ते युरेनियम होतं." शक्ती प्रोटेस्ट करत बोलला.

"तिथंच तर खरी मेख आहे. दोघांच्याकडेही युरेनियम खरेदी विक्रीचं भारत सरकारने इशू केलेलं लायसेन्स आहे. याचा अर्थ तू एका इनोसेंट सिटीझनला मारलं आहेस असा होतो." एसपी हतबल सांगता झाला.

"आधी त्यानेच माझ्यावर हल्ला केला होता." शक्तीने आपली बाजू ओरडून अधोरेखित करण्याचा प्रयत्न केला.

"आपण सिद्ध नाही करू शकत. गोळी दोन्हीकडून चालली हे मान्यच होतं, पण कुणी गोळी आधी चालवली आणि कुणी सेल्फ डिफेन्ससाठी फायर केलं हे स्पष्ट होत नाही." एसपी त्याची हतप्रभता दर्शवत होता.

"माझ्यावर विश्वास नाही डिपार्टमेंटचा?" शक्तीने रागात थेटच विचारलं.

a

"तसं नाही. पण कोर्टाला पुरावे लागतात. वी कांट हेल्प इट. प्रोसिजर तुला ठाऊक आहेच." एसपीची पुनः हतबलता.

"माझं सस्पेन्शन..." शक्ती निराश बोलला, परंतु तेवढ्यातही त्याने काही तरी पक्कं केलं मनाशी,

"ठिकेय. मी जाईन चौकशीला सामोरा. माझी बाजू मी मांडीन." शक्ती ठाम बोलला.

"मी तेच तुला सांगायला आलो आहे. शक्ती; मला ही काहीतरी मोठी कॉन्स्पिरसी वाटते. जर काही ग्रॅम युरेनियम कोल्हापूरात येऊ शकतं, तर डिलिंग वेळी ते ज्या शिपमेंन्टचा उल्लेख करत होते, ती किती मोठी असेल याचा आपल्याला अंदाज नाही. ते म्हणतात चारशे ग्रॅम. पण मला विश्वास नाही. डिलिंगवेळीच युरेनियमची शिपमेंन्ट हँड ओव्हर का केली गेली नाही? याचा अर्थ शिपमेंन्ट खूप मोठी असणार आणि ती कुठंतरी दडवून ठेवली असणार योग्यवेळी सुपूर्द करण्यासाठी. त्यामुळे शिपमेंन्टही इथंच असल्याची शक्यता आहे. ते युरेनियम कशासाठी ट्रेड केलं जातं होतं? माहीत नाही. त्याचा काही चुकीचा आणि घातक वापर होणार आहे का? तू अटक केलेला माणूस म्हणतो, त्याचा कन्स्ट्रक्शन डिमॉलिशनचा व्यवसाय आहे आणि मोठमोठ्या बिल्डिंग्स पाडण्यासाठी त्याची कंपनी एक्सप्लोसिव्ह्जमध्ये युरेनियमचा अगदी स्मॉल कॉन्टिटीमध्ये युज करते. बट आय डाऊट. यासाठी पुरावा म्हणजे त्याने तुझ्यावर लावलेले खोटे व संगीन आरोप. सगळंच अंधारात आहे. हे सगळं शोधून काढावं लागेल. आणि तूच जर चौकशीत अडकलास, तर याचा शोध घेणार कोण?"

"आपलं डिपार्टमेंट आहे ना?"

"ते आहेच. एकसे एक कुशल ऑफिशियल्स पण आहेत, नो डाऊट. पण प्रॉब्लेम असा आहे, ही केस आता एटॉमीक एनर्जी ऍक्ट नाइंटिन सिक्टी टू नुसार नव्याने रजिस्टर केली जात आहे व त्या शिपमेंन्टच्या इन्व्हेस्टीगेशनची जबाबदारी आता नॅशनल इन्व्हेस्टीगेशन एजन्सीकडे सुपूर्द करण्यात येत आहे."

"मला प्रॉब्लेम दिसत नाही. जर युरेनियम खरेदी व विक्रीचं लायसन्स आहे त्यांच्याकडे, तर त्यांची शिपमेंन्ट हरवली असं कसं म्हणत आहेत? जो माणूस मेला त्याच्या कंपनीकडून किंवा माणसांकडून खरेदी करणाऱ्याला शिपमेंन्ट मिळायला हवी."

"हो पण तेच आता त्यांच्याकडे ती शिपमेंन्ट नाही असं म्हणत आहेत. त्यांनी तुझ्यावर आळ घेतला आहे, की तू ती शिपमेंन्ट चोरून कुठेतरी लपवली आहे!"

हा आणखी एक बॉम्ब! अणुबॉम्ब!

"काय?" शक्तीला स्वतःच्या कानांवरूनच विश्वास उडाला.

"होय. एवढंच नाही, तर तू त्या माणसाला युरेनियम तस्करीच्या खोट्या केसमध्ये गोवण्याची धमकी देऊन त्याच्याकडे ब्राईब् मागितली असल्याचं त्यानं मॅजिस्ट्रेट समोर रजिस्टर केलंय. तू त्यासाठी नकार दिलास आणि म्हणून त्याला धमकवण्यासाठी तू युरेनियम विक्रेत्याला जीवे मारलंस. त्याच्या बॉडीगार्डला जखमी केलंस. एवढं करूनही तो बधला नाही म्हणून तू त्याला आत टाकलंस आणि युरेनियमची शिपमेंन्ट गहाळ केलीस असा त्याने आरोप केला आहे तुझ्यावर." एसपी शांत बोलला.

a

शक्तीची मान खाली गेली.

"आता माझ्यासाठी काय ऑर्डर्स आहेत." तो नाराज झाला होता.

"भूमिगत हो! बी फगिटिव्ह!" एसपीने पुन्हा बॉम्ब फोडला.

शक्तीने ताडकन मान वर करून एसपीकडे पाहिलं. त्याला विश्वास बसला नाही, जे एसपी बोलला त्याच्यावर.

"हो मी बरोबर तेच बोललोय जे तू ऐकलं आहेस! हॉस्पिटलाइज्ड् आहेस म्हणून अजून तुझ्या कस्टडीचे आदेश निघाले नाहीत. एनआयएची टीमही अजून यायची आहे. त्या आधीच बाहेर पड आणि सत्य शोधून काढ!" एसपीने ऑर्डर दिली.

"सर, मी कधी पळपुटेपणा केला नाही!" शक्ती निश्चयी बोलला.

"ही गोष्ट फक्त तुझ्या एकट्याची नाही शक्ती! अनेकांचे जीव धोक्यात आहेत!" एसपीही तितकाच ठाम होता.

त्याने आणलेली सुटकेस शक्ती समोर धरली आणि ती उघडली. त्यात एक जोडी कपडा आणि एक पिस्टल!

आपल्यासमोर दुसरा पर्याय नाही हे पाहून शक्ती उठला. त्याने सलाईनची सुई काढली. त्याच्या नसेतून रक्त ठिबकू लागलं. बाजूच्या ट्रे वरील एक कापसाचा बोळा त्याने घेतला व शिरेवर दाबून धरला. रक्तामुळे तो जखमेवर चिकटून तसाच राहिला. तरी त्याने चिकपट्टीने तो कापूस अजून मजबूत केला. सुटकेस घेऊन तो बाथरूममध्ये शिरला.

त्याची चलबिचल चालू होती. उघडी सुटकेस बेसिनवर पडली होती. आरशात शक्ती स्वतःला न्याहाळत होता. आपलं कर्तव्य बजावत असताना अचानक सगळंच त्याच्यावर उलटलं होतं. एसपीने त्याच्यासमोर काही मार्ग ठेवला नव्हता.

स्वतःला ठाम करून त्याने ते कपडे केले. डाव्या दंडाची जखम व तिला केलेली पट्टी सांभाळून त्याने शर्ट व जॅकेट चढवलं होतं. पायांत डेनीमची काळपट निळी जीन्स.

त्याने मग केसमधली पिस्टल उचलली. तिची मॅगझिन् त्याने चेक केली. गोळ्या पाहून त्याने ती पुन्हा पिस्टलमध्ये सारली. पिस्टलचं सेफ्टी लॉक ऑन करून तो बाथरूम मधून बाहेर गेला.

एसपी बाथरूम मधून बाहेर आलेल्या शक्तीकडेच पाहत होता.

शक्ती त्याला काही न बोलता, कसलीच क्रिया-प्रतिक्रिया न देता दरवाज्याकडे चालला. इतक्यात...

"शक्ती!" एसपीची त्याला हाक.

शक्ती थांबला, पण मागे वळला नाही.

"व्हॉट एवर यु डू! गो बाय बुक्स!" एसपीनं कायदा मोडू अगर उलंघू नको असा सूचना वजा सल्ला शक्तीला माफक शब्दांत दिला.

शक्तीची काहीच प्रतिक्रिया आली नाही. तो निर्धाराने तिथून निघाला हे निश्चित!!!

# ३. तुरुपचाल...

आपल्याला कोणी ओळखू नये यास्तव शक्तीनं डोक्यावर जॅकेटची हुडी टाकली होती. होताहोईल तेवढं तो आपलं तोंड लपवण्याचा यत्न करत होता. हॉस्पिटल मधून बाहेर पडताना त्याची मान खालीच होती. आपल्याला कोणी पाहू नये, ओळखू नये, आपण सीसीटीव्हीच्या कॅमेऱ्यात कैद होऊ नये यासाठी तो अखंड सावध होता.

हॉस्पिटलच्या आवारातून बाहेर पडेपर्यंतच काय ती धास्ती होती. एकदा तो मेन रोडला लागला, तेव्हा जरा रिलॅक्स झाला. तरी डोक्यावरून टांगती तलवार हटली नव्हती, तशीच होती. एक रिक्षा पकडून तो तेथून निघाला.

रिक्षा त्याच्या अपार्टमेंटला लागली. द्यायला पैसे नव्हते. रिक्षावाल्याला थांबायला सांगून तो वर गेला.

किल्लीचा प्रश्न उभा ठाकला तोवर. शेजारी त्यानं बेल वाजवली. एक स्पेअर की तिथं ठेवलेली असायची. शक्तीवर ओढवलेल्या संकटाची अजून बातमी झाली नव्हती. शेजाऱ्यांना तो आलाय हे समजलं तरी काही हरकत नव्हती. त्याने तिकडून किल्ली घेतली.

एव्हाना रिक्षावाला तरातर वर आला होता. शक्ती दार उघडतच होता, की रिक्षावाल्याने त्याला हाक दिली.

"साहेब!"

a

शक्ती काही बोलला नाही. आपणास खाली जायला उशीर झाल्याने हा वर आला आहे हे त्याने ओळखलं होतं. त्याला थांबण्यास इशारा करून शक्ती आत गेला. पैसे घेऊन बाहेर आला. जे पैसे त्याने देऊ केले, त्याने रिक्षावल्याचं समाधान झालं नाही. त्यानं अधिक पैशांची मागणी केली. शक्तीने त्याच्याकडे शंकीत पाहिलं.

"वेटिंगवर आहे ना!" शक्तीने तोंडून काही न विचारता त्याची नजर ओळखून रिक्षावाल्याने स्पष्टीकरण दिलं.

शक्तीला कशाचंच काही राहिलं नव्हतं. आयुष्याची अचानक अशी उलथापालथ होत असताना त्यापुढे चार पैशांची काय कथा? त्याने अधिकचे पैसे त्या रिक्षावाल्याला देऊ केले आणि त्याला रवाना केले तेथून.

शक्ती घरात शिरला. त्यानं आतून दार लावून घेतलं. जागेवर उभा राहून घरावर त्यानं एकवार दृष्टी फिरवली. सारं घर त्याला रितं रितं वाटत होतं. एवढी पोकळीआजवरच्या एकटेपणाच्या आयुष्यात त्याला कधीच जाणवली नव्हती. काही काळ त्या गर्द अवस्थेत स्थिरचित्त राहून त्या पोकळीचा अनुभव साठवून घेऊन त्यानं मग मनावर आलेली मरगळ झटकली.

तो त्याच्या बेडरूममध्ये गेला. एसपीने दिलेले कपडे त्याने काढून टाकले. त्याच्या कपाटातील त्याने त्याचे त्याचे कपडे घातले. एसपीने दिलेली पिस्टल देखील त्याने पिस्टल बॉक्समध्ये ठेवून दिली. तत्पूर्वी त्याने 'इंडियन ऑर्डीनन्स फॅक्टरी' निर्मित '.32 जिएसएफ मार्क 2' (आशनी) पिस्टल व त्याचे '.32 एसीपी' कार्टेजेस बॉक्स मधून काढून खिशात टाकले होते. या पिस्टलचे लूक व्हाईज डिझाईन शक्तीला तितके आवडले नव्हते. म्हणून पिस्टल शक्तीने

लुक्स व्हाईज कॉस्मेटिक मॉडिफाईड करून घेतली होती. परंतु आतील व मुख्य मॅकेनिजमला त्याने धक्का लावला नव्हता.

घरात जितकी कॅश होती, सोबत घेतली. कशाला पैशे लागतील सांगता येत नव्हतं. आणि तो ऑनलाईन पेमेंट्स व एटीएमचा वापर करून त्याचे ट्रेसेस मागे सोडू इच्छित नव्हता. घरात जी काही कॅश होती, त्यावरच त्याला समाधानी रहावं लागणार होतं. हाती लागलेल्या सर्व नोटा व्यवस्थित घडी करून त्याने पॅन्टच्या खिशात ठेवून घेतल्या.

जखम डाचत होती. तडकत होती. त्याकडे लक्ष देण्यात आता वेळ नव्हता. दुख (जखम) गोंजारत बसण्यात अर्थ नव्हता. आलेलं बालंट त्याला धुवून टाकायचं होतं.

आता त्याला घर सोडणं आवश्यक होतं. त्यापूर्वी त्याने एक चिठ्ठी लिहण्याचा घाट घातला. पेन पेपर घेऊन त्याने जिज्ञासासाठी एक संदेश लिहून ठेवला.

बेडशेजारी टेबलवरच तो निर्वाणीचा(?) संदेश लिहून तो उठला. कागद उडायला नको म्हणून पेन त्यावरच ठेवला होता त्याने. लिहिलं ती डायरीच होती, परंतु संदेशाचं पान त्याने वरच करून ठेवलं जिज्ञासाला सहज दिसावं यासाठी. एरव्ही ती त्या डायरीकडं कधी जाईल आणि गेलीच, तर तो संदेश पाहिलंच याची शाश्वती नाही व पाहिला तरी त्यास किती वेळ लागेल हेही सांगणे कठीण.

a

आपले मघाशी घालून आलेले शूज देखील तसेच ठेवून त्याने दुसरे शूज पायांत चढवले. घर लॉक करून तो पुनः किल्ली परत शेजारी ठेवायला गेला.

आपण इथं येऊन गेलो हे कोण चौकशीला आलं तर त्यांना सांगू नये अशी सूचना शेजाऱ्याला करण्याचा विचार एकदा त्याच्या मनात डोकावला, पण त्याने तो झटकून टाकला. आत्ताच आपण यांना असं काही बोललो, तर त्यांना उगाच कसला तरी संशय यायचा व हे कुठं तर बोलून बसायचे, त्यापेक्षा आपलं इथं येणं जितका वेळ लपून राहील तितका वेळ आपल्याला हातचा मिळेल व आपल्या मागावर कोणी आलंच, तर आपण काही पावलं तरी त्यांच्या पुढं असू या दुसऱ्या विचाराने त्याने काही मनातील वाच्यता केली नाही.

किल्ली सोडून तो निघून गेला. डोक्यावर हुडी टाकून तो दोन्ही हात खिशांत टाकून पायऱ्या उतरत होता...

परत तो या घरी कधी येऊ शकणार होता का? की नाही? त्यासही ठाऊक नव्हतं...

सगळं त्याने मागं सोडलं होतं. गाडी मात्र तो सोबत घ्यायला विसरला नव्हता. गाडी घेऊन तो उत्तरेला लागला... एकोणीस किलोमीटर कोल्हापूर पासून दूर गाडी पळवल्यानंतर त्याने तेरा किमी पूर्वेला गाडी पळवली. एका बंद पडलेल्या क्रशर मायनिंग प्लांटला आपली गाडी थांबली. मोबाईल काढला. त्यातील दोन चार महत्त्वाचे नंबर त्याने मुखोद्गत केले व मोबाईल त्याने गाडीतच ठेवला. गाडी व्यवस्थित लॉक केली. किल्ली सोबतच घेतली. मात्र गाडी सोडून तो तिथून बाहेर पडला.

a

मुख्य रस्त्याला आल्यावर त्याला काही चालल्यावर दुकानं दिसली. एका दुकानावर लोकल कॉलची पाटी भिंतभर रंगवलेली त्याला दिसली. तो तिथं गेला. लोकल कॉल सेंटरबद्दल चौकशी केल्यावर त्याला समजलं, की दुकानदाराने लोकल कॉल सर्व्हिस बंद करून दहा बारा वर्षे झाली होती. रंगवलेली भिंत बरीच जुनी जाहिरात दर्शवत होती. त्यावरून ध्यानात यावं तर गावाकडे एकदा इमारती, जाहिराती रंगवलेल्या वर्षानुवर्षे तशाच राहतात, त्यामुळे ती रंग उडालेली जाहिरात बघून तिथं लोकल कॉल सर्व्हिस नसावीच असं पटकन लक्षात येणं शक्य नाही. तरी शक्तीच्या मनात ही शंका डोकावली होतीच, कारण या काळात प्रत्येकी मोबाईल्स झाले आहेत. पीसीओ, लोकल कॉल्स बंदच झालेत. तरीही पर्याय पहावा म्हणून तो इथं आला होता.

दुकानदारानेही त्याला हेच खरं कारण सांगितलं कॉल सर्व्हिस बंद करण्याचं.

मग शक्तीने दुकानदाराकडेच त्याच्या मोबाईल वरून फोन करण्याची परवानगी मागितली.

सहसा तो अनुमती देईल न देईल म्हणून त्याने दुकानातून खाण्याची काही पाकीटं घेतली. दुकानदाराने पण त्याच्यावर कसला संशय न घेता त्याला फोन करू दिला.

"कुठं आहेस?" शक्तीने मोबाईलमध्ये विचारलं.

"एमआयडीसी एरिया." पलीकडचा माणूस बोलला.

"पुढच्या तासात घरी पोहोच. मी येतोय!" शक्तीने निक्षून सांगितलं आणि फोन ठेवला.

a

केलेला नंबर त्यानं डिलीट केला. फोन परत करून शक्तीने तिथल्या ट्रान्सपोर्टेशन बद्दल चौकशी केली. काही वेळात कोल्हापूरकडे जाणारी बस येईल दुकानदाराने सांगितलं.

शक्तीने दुकानदाराला धन्यवाद दिले आणि रस्त्याच्याकडेला जाऊन थांबला. भूक भडकलीच होती. वाट पाहत त्याने घेतलेलं अन्न पोटात ढकललं. पाकीटं त्यानं कचरापेटी शोधून त्यात टाकलं. पुन्हा जागी येऊन थांबला.

दुकानदाराने सांगितल्याप्रमाणे बस काही लवकर आली नाही. अधिक थांबणे संयुक्तिक नव्हते. एक वडाप त्याला आलेलं दिसलं. खचाखच भरलेलं.

कितीही भरलेलं असलं, तरी वडापवाले त्यांच्या कौशल्याने किमान एका सिटची (दोन असतील तर दोन, तीन असतील तर तीनची) जागा करतातच. तशीच शक्तीसेनसाठी पण जागा झाली. वडापचं एक बरं असतं. कुठंही थांबतं. बसेसचं काम कंडक्टर व ड्रायव्हरच्या मर्जीवर. थांबली तर थांबते अगर नाही.

वडाप थेट कोल्हापूरला जाणारं नव्हतं. गाडी एक गावी रिकामी झाल्यावर त्याने त्या वडापवाल्यालाच त्याला हवी तेवढी रक्कम देण्याचं कबुलून कोल्हापूरला येण्यास राजी केलं.

दोन चार स्टॉप्स करून गाड्या बदलून तो गेला असता, तर त्याचे पैसे वाचले असते. पण वेळ गेला असता. सोबत पकडले जाण्याचा धोका. एकेक सेकंद त्याच्यासाठी महत्त्वाचा होता. ड्रायव्हरने टोल्सवर जर काही गोंधळ केला नाही, तर कुणाचं लक्ष जाण्याचं काम नव्हतं. बातमी अजून झाली नव्हती,

a

त्यामुळे चेकपोस्ट्स लागले असण्याची शक्यता कमी होती. म्हणून शक्तीने जोखीम घेऊन हा पर्याय चोखंदळला होता. चेकपोस्ट्स लागले असतील, तर मात्र शक्तीला नवीन युक्ती करावी लागणार होती...

कोल्हापूर म्युनिसिपल ट्रान्सपोर्ट, 'केएमटी'चा पर्याय होताच, पण तीवरही पोलिसांची किंवा एनआयएच्या टीमची (आली असेल तर) कधीही धाड पडेल सांगता येत नव्हती. तिकीट चेकर्स व सुपरव्हाईजर्सना सूचना दिली असेल, तर तिकीट चेकिंगच्या नांवाखाली ती वाटेत कुठंही थांबवू शकत होते. या पर्यायात वेळ व पैसेही वाचले असते, पण सापडले जाण्याचा धोका अधिक मोठा होता.

त्याच्या विचारांच्या वेगाने ते डगडगणारे वडाप धावत होते. नजाणो किती वर्षांपूर्वी या वडापची अखेरची सर्व्हिसिंग केली होती... केली होती का नव्हती चालकच जाणे. का नवीन जीप घेतल्यापासून तो इतकी वर्षे माणसांची मेंढरभरती करून तो ती फक्त पिटाळत होता त्यालाच माहीत...

कसल्याही अडचणी शिवाय शक्ती एकदाचा पोहोचला. गंतव्यापासून काही दूरच शक्तीने कोल्हापूरात आल्यावर ती पुराणी जीप थांबवली. ठरलेले हजार देऊन तो चालू लागला. हुडी डोक्यावर होतीच. त्यात त्याने आपलं बरंच तोंड झाकलं होतं. सावध होता तो तरी चालण्यात गडबड नव्हती. नाही तर हीच गडबड कोणाचंही लक्ष वेधून गेली असती.

अखेर एका झोपडपट्टीत शक्ती पोहोचला. एका घरासमोर तो येऊन थांबला. पत्र्याचे दार वाजवले. काही पळातच आतून दार उघडलं गेलं. वादळ

a

आत शिरावं तसा शक्ती आत शिरला. त्यानं दार जोरात लोटून दिलं, ते लाकडी चौकटीत अडकून घट्ट बंद झालं.

शक्ती त्या दार उघडणाऱ्या इसमावर तुटून पडला. तो नेमकं का मार खातोय हे विचारायला सुचण्याची सुद्धा उसंत शक्ती त्याला देत नव्हता. काही वेळाच्या धुलाई नंतर शक्तीही दमला आणि त्याने प्लास्टिक खुर्चीवर स्वतःला झोकून दिलं. तो माणूसही जसा उभा होता, तसाच लोखंडी कॉटच्या गादीवर कलंडला.

"तू मला चुकीची माहिती दिलीस!" शक्ती वेदनेने कळवळणाऱ्या त्या माणसाला ओरडला,

"आणि आता मी खूप वाईट अडकलोय!" तो त्याला दोष देत बोलला.

दुखणारं पोट धरून सरळ बसत तो माणूस बोलला,

"नाही. मी स्वतःच्या कनांनी ऐकलंय. ते पण खुद्द त्या माणसाला बोलताना! तिऱ्हाईताकडनं आलेली माहिती मी दिलेली नाही तुम्हाला. त्यामुळं ती खोटी नाही असू शकत." त्याने वेदना सोसत स्वतःची बाजू मांडली.

"काय आणि कुठं ऐकलंस ते मला नक्की सांग." शक्ती त्याला म्हणाला.

"तुम्हाला माहित आहे मी स्क्रॅपचा धंदा करतो. एका डिमॉलिशन साईटवरचं स्क्रॅप त्या कंपनीला विकायचं होतं. माल बघायला तिथं गेलो होतो. तिथंच त्या माणसाला बोलताना ऐकलं होतं मी. युरेनियमचं स्पष्ट नांव घेतलं होतं त्यानं."

"काही घातक प्लॅनसबद्दल त्यानं चर्चा केली होती?"

a

"तसं काही बोलल्याचं आठवत नाही. बहुतेक नाहीच."

"किती क्वॉन्टिटीचा लॉट होता याबद्दल काही?"

"नाही. त्यानं फक्त भेटायची वेळ आणि जागा ठरवली होती फोनवर."

"आणि तू निष्कर्ष काढलास की, ते काही तरी उपद्रव करणार आहेत?" तिडीक जाऊन शक्तीच्या भुवया उंचावल्या. त्याची मान हलली.

"बाकी काही माहीत नाही साहेब, पण युरेनियम अणुबॉम्ब बनवायला वापरतात एवढं सगळ्यांना माहीत असतं. त्या माणसाचं बोलणं प्रत्यक्ष तुम्ही ऐकलं असतं, त्याला बोलताना बघितलं असतं, तर तो नक्कीच त्याचा चांगला उपयोग करणार नव्हता. हे तुमच्या पण ध्यानात आलं असतं." शक्तीच्या खबरीने स्वतःला डिफेन्ड केलं.

शक्ती जरा विचारात गेला. त्या संदिग्ध माणसासोबतचं इंटरॅक्शन त्याला आठवलं. तो ज्यापद्धतीने शक्तीकडे बघत होता ती नजर खासच सज्जन माणसाची नव्हती.

तशातच आणखी एक म्हणजे एसपीने सांगितल्या प्रमाणे जर तो युरेनियम बिल्डींग्सच्या डिमॉलिशनसाठी वापरत असेल, तर डिलिंग असं लपूनछपून करण्याचा अर्थ काय? ही गरज त्यांना का भासावी जर त्यांच्याकडे लायसेन्स आहे युरेनियम खरेदीविक्रीचं...

खबरीचं म्हणणं शक्तीलाही खरं वाटून गेलं. त्याचा तर्क, त्याचा त्या माणसाचा अनुभवही हेच सांगत होता त्याला, की काहीतरी गडबड आहे... कसला तरी मोठा धोका घोंगावत आहे... कोल्हापूरच्या डोक्यावर... की आणखी कोणत्या शहराच्या... की अखंड देशाच्या....?

a

एक शर सपकन छातीत घुसावा असं त्याला चमकून गेलं. त्यानं ताडकन खबरीकडं पाहिलं. खबरीला एकदम धस्स घाबरल्यागत झालं. शक्ती आपल्याला काही करणार तर नाही? अशी त्याला भीती वाटून गेली. शक्ती त्याला काही करणार नव्हता. त्याचं असं पाहणं म्हणजे त्यानं काहितरी मनमस्तिष्कशी निश्चिती केल्याची ती नांदी हाती.

"आधार कार्ड आहे? कुठलं आयडी?" त्यानं आपल्या खबरीला विचारलं.

"अ... आहे." तो वचकतच बोलला.

"तुझ्या नांवावर एक नवीन सिम कार्ड आन. आणि माझी गाडी मी नरंदे आळत्याच्या दरम्यान छोटा घाट आहे तिथून जरा पुढं एका बंद क्रशरची खाण आहे तिथं सोडलीये. तिथून ती लांब कुठंतरी नेऊन सोड. ही किल्ली!" त्याने किल्ली कॉटवर खबरीच्या शेजारी टाकली.

ती किल्ली घेऊन तो उठला.

"सगळ्यात आधी कार्डाचं काम कर." शक्ती त्याला म्हणाला.

त्यानं गादी खालून आपलं आधार कार्ड घेतलं. तो निघाला.

"कुलूप लाव. मी इथंच थांबतोय. माझ्याबद्दल कुणाला काही कळू देऊ नको." शक्तीने सूचना केली.

कुलूप घेऊन मग बाहेरून त्यानं कुलूप लावून घेतलं. शक्तीच्या सुरक्षेसाठीच खबरी त्याला बंद करून गेला होता.

a

शक्ती त्याच्यावर विश्वास ठेवू शकत होता. नव्हे; त्याच्या खबरीवर त्याचा विश्वास होताच, की तो त्याला काही अपाय होईल ऐसा वागणार नाही. तरी थोडीफार शक्यता तशी असली तरी ती तशी रहायला नको म्हणून शक्तीने त्याच्या मनात जरब बसवायला त्याला आल्याआल्या बदडला होता.

◆◆◆

त्या संदिग्ध माणसाला जामीन मिळाला असला, तरी पुन्हा चौकशीला बोलवलं गेलं होतं.

पुलिस हेडकोर्टर्सच्या इंटेरोगेशन रूममध्ये कॅमेराज, माईक्स सगळा सेटअप उभा होता.

'एनआयए'ची टीम आली होती. टीम इंचार्ज सुशील मकवाना त्या इसमाची चौकशी करत होता. त्याला समोर बसवून बराच वेळ त्याच्या बद्दलची फाईल तो वाचत बसला होता. तो माणूस चिडल्यासारखा दातांवर दात घासत त्याच्याकडे पाहत बसून राहिला होता.

"आपलं नांव?" सुशीलने प्रश्न केला.

"जिग्नेश ओसवाल." तो संदिग्ध म्हणाला.

"तर मिस्टर जिग्नेश..." फाईल बंद करून सुशील काही बोलणार तोच...

"तुम्ही काही विचारण्याआधी, ऑफिसर; मी सांगू इच्छितो, की माझी बाजू मी मॅजिस्ट्रेट समोर आणि पुन्हा कोर्टात जजसमोरही मांडली आहे. त्या

a

उपर अजून काही बोलण्याची मला आवश्यकता दिसत नाही. तुम्ही बोलवलंत. कायद्याचा मान म्हणून इथं आलो!" ओसवाल अगदीच तोडत बोलला.

"गुड! तसाच मान कंटीन्यू ठेवून उत्तरंही द्या! काय?" सुशील खिल्ली उडवत हसला.

"शो सम रिस्पेस्ट ऑफिसर!" तो दुखावला जाऊन सख्त बोलला.

"एन्ड यु शो सम रिसपेस्ट टुवर्ड्स दि लॉ मिस्टर!" सुशीलने त्याला प्रत्युत्तर केलं.

सुशीलनं थोडं आवरतं घ्यायचं ठरवलं. त्याने डोळे मिटले आणि स्वतःला काबूत केलं.

"बोला!" डोळं उघडून तो म्हणाला.

"सगळ्यात आधी, तुम्ही जे बोलाल, ते तुमच्या विरोधात वापरलं जाऊ शकतं. त्यामुळं तुमचं आधीचं स्टेटमेंट आणि आत्ताच बोलणं वेगळं आढळलं, तर तुम्ही अडचणीत येऊ शकता!" सुशीलनं चेतावणी दिली.

"मला त्याची पूर्ण कल्पना आहे ऑफिसर."

"त्याआधी तुम्हाला तुमच्या वकीलाशी बोलायचं असेल, तर बोलू शकता!"

"त्याची गरज नाही!"

"आधीच पढवलं असेल त्यांनी. नाही?" पुन्हा सुशील जिग्नेशला अपमानित करणारं हसला.

"तुम्ही पुन्हा पुन्हा माझा अपमान करताय ऑफिसर! हे लक्षात असू द्या! मी या देशाचा सन्माननीय नागरिक आहे. तुम्ही पदोपदी माझा असा अपमान करू शकत नाही!" जिग्नेश उखडला.

"आणि तुम्ही हे विसरू नका, की हे सगळं रेकॉर्ड होतंय. तुमचं हे बिहेवीयर तुमच्या विरोधात जाऊ शकतं. काही केलेलं नाही, तर माझी कोणतीही टिप्पणी असो, तुम्हाला वाईट वाटण्याचं कारणच काय?" तो सौम्य स्मित करून बोलला.

"असा अपमान होताना कोणीही चिडेल. तेव्हा तर नक्कीच जेव्हा काही केलेलं नसताना त्याला गुन्हेगाराची वागणूक दिली जात असेल!" तो तापून बोलला.

"ठीक आहे. मुद्यावर येऊया. तर तुम्ही म्हणता त्याप्रमाणे तुमचा कंस्ट्रक्शनचा व्यवसाय आहे."

"हो."

"नांव?"

"ओसवाल कन्स्ट्रक्शन्स!"

"मोडकळीस आलेल्या किंवा अवैध बांधकाम असलेल्या बिल्डिंग्सच्या डिमॉलिशनची कामं पण तुम्ही घेता? बरोबर ना?"

"हो."

"त्यासाठी युरेनियम? रेडिएशनचा धोका नाही उद्भवत?"

a

"एक्स्पोसिव्ह्समध्ये वापर होतो त्याचा. अगदी स्मॉल अमाऊंटमध्ये कॉन्टिटी असते. तेवढं रेडिएशन कोणीही सहन करतं. तरीही आमचं सेफ्टी प्रिकॉशन पुरजोर असतं. तुम्हाला आवश्यकता वाटत असेल, तर माझ्या डिमॉलिशन डिपार्टमेंटचा हेड तुम्हाला सविस्तर माहिती देईल त्याची."

"ती तर घेऊच. तुम्ही हे सांगा, की युरेनियमची गरज खूप कमी प्रमाणात लागते असं तुमचं म्हणणं आहे, तर तो जो कोणी मेला, त्याच्यासोबत तुम्ही जी डील केली, ती नेमकी किती क्वॉन्टिटीची होती? कारण तुम्ही कोणत्यातरी शिपमेंन्टचा उल्लेख केला होता. तुम्हाला अटक केलेल्या सिनियर इन्स्पेक्टरचं तसं म्हणणं आहे."

"हार्डली फाईव्ह हँड्रेड ग्रॅम्स. पण त्याने जवळपास दहा ग्रॅमच हँड ओव्हर केली होती. आणि तुम्ही त्या ऑफिसरला जास्त सिरियस्ली घेऊ नका. त्यानेच आमची शिपमेंन्ट कुठंतरी लपवून ठेवली आहे! करप्ट आहे तो! माझ्याकडे पैशांची मागणी केली, नाहीतर तुम्हाला युरेनियम तस्करीच्या खोट्या केसमध्ये अडकवतो म्हणाला. माझा सेलर मारला त्याने. त्याच्या बॉडीगार्डला जखमी केलं. थ्रेट केलं मला! बॉडीगार्डची चौकशी करा. मी सत्य बोलतोय तुम्ही समजून जाल. सगळं त्याच्याही डोळ्यांसमक्ष झालं आहे!" तो खवळून बोलत होता.

"पढवलेली पट्टी एकदाची एकदम बाहेर पडली. आता मोकळं वाटत असेल. नाही?!"

"ऑफिसर!"

"आता असं ओरडून तुम्ही माझा अपमान करताय!"

a

"सॉरी. पण तुम्ही पण जरा अदब राखून बोला!"

"युरेनियम खरेदी आणि विक्रीचे लायसेन्स तुम्हा दोघांच्याकडे आहे असं तुम्ही सादर केलंय."

"माझं मी. सुलेमानचं त्याच्या कंपनीने."

"हा तेच. पण ते खरं आहे?"

"म्हणजे कोर्ट मूर्ख आहे का?"

"आता तुम्ही कोर्टाचा अपमान करताय!"

"त्यांच्या निष्कर्षावर प्रश्न उभा करून तो अपमान तुम्ही करताय मी नाही! कोर्टाने आम्ही सादर केलेली लायसन्सेस ओथेंन्टीकेट केली आहेत!"

"मला सांगा. पाचशे ग्रॅम नॅचरल युरेनियम! त्याने काय होऊ शकतं माहीत आहे ना तुम्हाला?"

"कल्पना आहे." तो एकदम चेहऱ्यावरची माशीही न हलू देता स्ट्रेट फेसने बोलला.

"हार्डली फाईव्ह हंड्रेड?! पाचशे ग्रॅम हार्डली नसतं ओसवाल साहेब! एवढ्या जास्त कॉन्टिटीची तुम्हाला आवश्यकता काय? अहो एवढ्याने अख्खं शहर बेचिराख होईल! आणि ते तुम्ही खरेदी करत होतात. फक्त डिमॉलिशनसाठी... त्च्च्... गोष्ट पचनी पडत नाही..." डोळे बारीक करून मान डोलवत तो ओसवालला उचकवत बोलला. त्याच्या अविर्भावात उपहास होता.

a

"तुम्हाला अजीर्ण असेल तर त्याचं औषध आमच्याकडे नाही. जे सांगतोय ते सत्य आहे. त्यानं तुमची पोटदुखी सरत नाही ही माझी समस्या नव्हे!" ओसवाल खवळून बोलला.

"मला उत्तर नाही मिळालं." सुशील जिग्नेशने केलेल्या अपमानाचा स्वतःवर काही परिणाम न होऊ देता मुद्यावरून ढळला नाही.

सुशीलचं असं तंडणं जिग्नेशच्या डोक्यात जात होतं. पण तो काही करू शकत नव्हता. इथं... तूर्तास तरी...

"माझा व्यवसाय देशभर पसरला आहे. इतकंच नाही, तर आम्ही अजून दहा बारा देशांत एक्टीव्ह आहोत."

"त्याची माहितीही तुमची कंपनी देईल. राईट?!" सुशील कुत्सित हसला.

"राईट!" तो चिडला असला, तरी स्वतःला कन्ट्रोल करत बोलला.

"शक्तीसेन नाईक यांच्या कडून मारला गेला, तो सुलेमान तोपची एकटाच तुमचा सेलर होता?"

"भारतात? हो!"

"आणि इतर देशांत?"

"आहेत."

"त्यांची माहिती पण नंतर कंपनीकडून दिली जाईल हो ना??" सुशीलचा उपहास.

"हो!" जिग्नेश तडकला.

a

"तो कोठून युरेनियम मिळवायचा?"

"ते त्याच्या कंपनीला विचारा!"

"तुम्ही कधी चौकशी केली नाही त्याच्याकडे?"

"मला गरज नव्हती. माझ्या मागणीचा तो पुरवठा करत होता. तेवढं मला पुरेसं होतं."

"आणि तो कुठून अवैध मार्गातून युरेनियम मिळवत असला असेल आजवर तर?"

"तो काही करत असेल? मी तर त्या युरेनियमचा चुकीचा वापर कधी केला नाही? मग त्याने गैरमार्ग अवलंबला असेल, तर त्याच्या गैरवर्तनाची जबाबदारी माझी कशी ऑफिसर? आणि त्याच्याबद्दलचे प्रश्न मला विचारु नका! तुम्हाला स्पष्टीकरण हवं असेल, तर त्याच्या कंपनीशी संपर्क करा. मला माझे प्रश्न विचारलेत तर बरं होईल. आणि तुमच्याकडे काही नसेल माझ्याविषयी, तर तसं सांगा!"

"ओके! तुमच्या विषयी विचारतो. आजपर्यंत कोणत्या कोणत्या डिमॉलिशन साईट्सवर तुम्ही युरेनियमचा वापर केला आहे, त्या त्या देशांतील गव्हर्नमेंटची घेतलेली परवानगी, सगळं सादर करावं."

"मिळून जाईल. काय आता मी जाऊ शकतो?" तिखट नजर सुशीलवर रोखून जिग्नेशने विचारलं.

सुशीलला हसू फुटलं. स्मित करत तो म्हणाला,

"वि आर इन अ फ्री कन्ट्री!" सुशील पुन्हा हसला.

a

त्याचं हसू जिग्नेशच्या इतकं डोक्यात गेलं, की काय सांगावं. तो करू काहीच शकत नव्हता. तो स्वतः सिंह असला, तरी सध्या तो असंख्य सिहांच्याच कळपात त्यांच्या गुहेत उभा होता. इथं समोरच्याला भेदरवणारी डरकाळी फोडणं त्याला रास्त नव्हतं. त्याला ते शक्य नव्हतं असं नाही. त्यावेळी ते करणं त्याला उघडं पाडून गेलं असतं. अपमान सहन करून मूग गिळण्याशिवाय त्याला पर्यंत नव्हता.

भस्म करू शकेल अशी जळजळीत नजर सुशीलवर टाकूनच जिग्नेश तिथून निघून गेला.

"तुम्ही शहर सोडू शकत नाही. लक्षात असू द्या!" त्याच्याकडे न वळता सुशील बोलला. त्याचं ते कुचकट हसू मावळलं नव्हतं. तो त्याच्या जाग्यावरच बसून होता.

चरफडणारा जिग्नेश ओसवाल पाय आदळत निघून गेला. राग काढण्यासाठी त्याच्याकडे एवढाच काय तो पर्याय होता. सुशीलच्या चेहऱ्यावरचं हसू अधिकच रुंदावलं.

तोही मग खुर्चीच्या दोन्ही हातांवर आपले दोन्ही हात आपटत उठला.

आणलेलं नवीन सिम शक्ती त्याच्या खबरीच्या मोबाईलमध्ये टाकत होता.

"थोडे दिवस तुझा मोबाईल वापरणार आहे."

"काहीच हरकत नाही."

a

"आता ती गाडी हलव. जा!" शक्ती त्याला म्हणाला.

त्याची फक्त मान हलली. त्याने जाताना पुन्हा ती खोली बाहेरून लॉक केली.

शक्तीने स्विचऑफ काढून नंबर डायल केला.

इकडे हेडकोर्टर्सवर कामात असलेल्या फ्रान्सिसचा मोबाईल वाजला. त्याने तो पाहिला. नंबर नवीन दिसत होता. म्हणून त्याने फोनकडे दुर्लक्ष केलं. इथलं आटोपल्यावर रिव्हर्ट करायची त्याने मनाशी गाठ मारली. पोलिसाला कोणतेही नंबर वर्ज्य नसतात. काय महत्त्वाचं असेल सांगता येत नाही. तुर्त तो अगदीच महत्त्वाच्या कार्यात अडकला होता, कामात कसला; सुशील कमवाना शक्तीबद्दल त्याच्याकडे चौकशी करत होता...

चहाचं कारण काढून हेडकोर्टर्सच्या एका केबिन मध्ये सुशील फ्रान्सिसला घोळात घेऊ पाहत होता.

शक्तीला कोणत्याही परिस्थितीत पकडायचाच असा त्याने चंग बांधला असल्याचं त्याच्या अविर्भावातून सहज स्पष्ट होत होतं. फ्रान्सिस जरा दडपणाखालीच होता.

"शक्तीसेन नाईक तुमचे खास दोस्त! नाही? कुठं आहेत सध्या? मोठा माल दाबून बसलेत. शोधायला हवं. नाही?" सुशील मुत्सद्दी हसला.

"सर, विथ ड्यु रिस्पेक्ट, मी सांगू इच्छितो, की तो असं काही करू शकत नाही." फ्रान्सिस तीक्ष्ण बोलला.

"अंधभक्ती वाईट असते फ्रान्सिस साहेब. सगळे पुरावे त्यांच्या विरोधात असताना तुम्ही अजून असं बोलता? की तुम्हीही त्याच्यासोबत सामील..."

"सर!" फ्रान्सिस संतापाने ओरडला.

मग आपला प्रमाद लक्षात येऊन निवळला.

"माफ करा." फ्रान्सिस सुशीलला बोलला.

सुशील हसला होता.

"चिडलात, याचा अर्थ तुम्ही हे मान्य करताय, की तुम्ही असं काही करू शकत नाही, परंतु तुमच्या मित्राबद्दल, शक्तीसेनबद्दल तुम्ही ही हमी देऊ शकत नाही!"

"पूर्ण हमी देतो मी. मी चिडलो, कारण तुम्ही आमच्या दोघांच्या प्रामाणिकपणावर संशय घेतलात!" फ्रान्सिसने रागाचं कारण स्पष्ट केलं.

त्यानं रिसिव्ह न केल्याने बंद झालेला फोन पुनःश्च वाजला. त्याने मान तिरकी करून फोन बघितला. परत तोच नंबर.

"घ्या!" सुशील हसत फ्रान्सिसला म्हणाला.

"एक्स्क्यूज मी." फ्रान्सिस बोलला.

आणि बाजूला येऊन फ्रान्सिसने फोन रिसिव्ह केला.

"दोन मिनिटं." तो मोबाईलमध्ये बोलला आणि त्याने हेडकोर्टर्स सोडलं.

पार्किंगला येऊन तो आपल्या गाडीत बसला.

"बोल!" तो म्हणाला.

गाडी पूर्णतः बंद करून त्याने ती साऊंडप्रूफ केली.

"काय परिस्थिती?" शक्तीने विचारलं.

"बिकट आहे. एनआयएची टीम आली आहे. आल्या आल्या त्यांनी केस हातात घेतली आहे. आम्ही आपले शेपटी बनून त्यांच्या मागे करणार आहोत आता. तुझ्याबद्दल पण कसून चौकशी सुरू आहे. तू ठीक आहेस ना?" फ्रान्सिसने काळजीत विचारलं.

*"आता तरी आहे."* शक्ती तिकडून निर्विकार बोलला होता.

"तुला शोधून कस्टडीत घेण्याचे कोर्टचे आदेश आहेत. त्यात त्या माणसाने तुझ्यावर त्याचं युरेनियम चोरल्याचा आळ घेतलाय. त्यामुळं एनआयए पण तुझ्या मागावर आहे आता..." तो नाराज व दुःखी बोलला,

"तू जपून रहा." फ्रान्सिसने चिंतीत सूचना केली.

"मी काळजी घेईन. पण मला तुला एक काम द्यायचं आहे."

*"सांग ना."*

"एसपीवर नजर ठेव जरा."

शक्तीची ही विचित्र सूचना फ्रान्सिसला धक्का होती.

"का रे?"

"चौकशीला सामोरं जाण्याचा माझा निर्धार होता. पण एसपीने मला पळण्यास भाग पाडलं."

"म्हणजे तुला एसपी सरांवर कसला संशय आहे की काय?"

"तुर्तास मी काही सांगू शकत नाही. त्यांच्या हालचाली समजल्या, तर काही अर्थ काढता येईल. म्हणून सांगतोय नजर ठेव."

"ओके. काळजी घे. मला जास्त बोलत येणार नाही. काही महत्वाचं असलं तर ताबडतोब ज्या त्या वेळी कळवत जाईन. हा नंबर तुझाच ना?"

*"हो."* तिकडून शक्तीचा दुजोरा.

"बरं त्या माणसाचं नांव काय?" शक्तीने पुढं विचारलं.

"जिग्नेश ओसवाल."

"आणि मेला तो?"

"सुलेमान तोपची!" फ्रान्सिस बोलला.

*"बरं. मला वेळोवेळी अपडेट करत जा."* शक्तीने त्यास परत आठवण करून दिली.

"ओके."

इतक्यात फ्रान्सिस बसलाय त्या बाजूच्या काचेवर एका हाताने नॉक केलं!

तिकडं पाहिलं, तर फ्रान्सिस प्राणांतिक दचकला. चाट पडला...

सुशील मकवाना त्याच्या गाडी बाहेर सुहास्य वदन उभा होता. व तो त्याला हात हलवून 'हाय' करत होता...

मोबाईलवर शक्ती आणि गाडी बाहेर सुशील...!!!

फ्रान्सिक घाबरून घट्ट!!!

a

## ४. धांडोळा...

काच खाली घेण्यास सुशील फ्रान्सिसला खुणावत होता. भ्यायलेल्या फ्रान्सिसने बटन प्रेस करून काच खाली केली.

"कुठे जात आहात का? जरा लिफ्ट द्याल?" स्माईल करणाऱ्या सुशीलनं विचारलं.

"कुठं?" आपली भीती उजागर न होऊ देता फ्रान्सिसने विचारलं.

"शक्तीसेन नाईक एडमिट होते त्या हॉस्पिटलला जायचंय जरा. त्यानंतर तोपचीच्या बॉडीगार्डला पण भेटायचं आहे." सुशील दरवाजा उघडून आत बसत बोलला.

त्या दरम्यानच्या काळात फ्रान्सिसने मोबाईल बाजूला ठेवतच शक्तीचा नंबर उडवला होता. काही सेकंदाचाच तो काळ, परंतु फ्रान्सिसला ब्रह्मांडाहून मोठा वाटला होता.

"चला!" मोबाईल बघत असणाऱ्या फ्रान्सिसला सुशील बोलला.

"हा हो." मोबाईल सोडून फ्रान्सिसने पुढं पाहिलं.

आणि तो गाडी दवडू लागला...

◆◆◆

शक्तीच्या खबरीने गाडी सांगली जिल्ह्याच्या हद्दीत आणून सोडली. शेताचा भाग होता सगळा. खिंडीतून एकच सळसळणाऱ्या सापासारखा वळणदार रस्ता जात होता. दोन्ही बाजूला उंच डोंगर...

रस्त्याला येऊन तो थांबला. हा रस्ता हायवेला पोहोचण्यासाठी शॉर्टकट म्हणून वापरात असल्यानं त्याला कोणी ना कोणी गाठ पडणार होतं.

अधिक वाट त्याला पहावीच लागली नाही. एक टुव्हीलर त्याला हायवेकडे जाताना दिसली. त्याआधी हायवेकडून येणाऱ्या दोन गाड्या त्याने सोडल्या होत्या. गावाकडची माणसं मदतीला नाही म्हणत नाहीत. खबरीच्या एका विनंतीवरून तो त्याला लिफ्ट द्यायला तयार झाला.

संध्याकाळची ती दुचाकी त्या रस्त्यावरून हायवेच्या दिशेने पळू लागली...

सुशील शक्तीला ठेवलेल्या वॉर्डमध्ये आला होता. शक्ती तिथं नव्हता. एक एक कोना तो जागेवरून निरीक्षण करत होता.

संशयास्पद तिथं काही नव्हतं. काही घडलंच नव्हतं इथं, तर काय असणार...?

"मिस्टर फ्रान्सिस!!" तो बोलला.

फ्रान्सिस तंद्री भंगावी तसा गडबडून...

"क... काय?" विचारता झाला.

"बाथरूम चेक करा." सुशीलने त्याला फर्मावलं.

बेमन तो पुढे झाला व त्याने बाथरूमचं दार उघडून पाहिलं. आतला प्रकार पाहून त्याचे डोळे मोठे झाले. आडोसा असल्याने व त्याचे तोंड आतील बाजूस असल्याने त्याचे ते विस्मित भाव सुशीलला दिसणे, समजणे शक्य नव्हते. सदर प्रकार सुशीलला कळूच नये अशी त्याने मनोमन प्रार्थना केली व फ्रान्सिस तसाच मागे झाला. दरम्यान त्याने आपले भाव मख्ख केले होते. चेहरा उभट करून तो कसलेच भाव न दर्शवता सुशीलकडे पाहत होता. बाथरूम समोरून तो हटला नव्हता. सुशीलला आत डोकावण्याची संधी तो देऊ इच्छित नव्हता. तरी सुशील त्याला सरकून पुढे झालाच तर हा करू काय शकत होता? पण तरीही फ्रान्सिस प्रयत्न करणार होता, की आतील शक्तीचे कपडे सुशील पाहू नये...

"काही संदिग्ध?" सुशीलचा जाग्यावरूनच प्रश्न?

"नाही." फ्रान्सिसचं स्वाभाविक सपट चेहऱ्याने उत्तर.

सुशीलने खाली पाहून एक निराशेचा उसासा सोडला आणि तो मागे वळला.

त्या हॉस्पिटलचा मुख्य सर्जन तिथं हजर होता. सुशील त्याच्याकडेच वळला होता.

"तर शक्तीसेन इथून पळून गेले आणि तुम्हाला त्याचा पत्ता लागला नाही." तो त्या सर्जनला म्हणाला.

"अगदी तसं नाही. आम्ही आमच्या पेशन्ट्सकडे पूर्ण लक्ष देतो. त्यांची काळजी घेतो. पण शक्तीसेन नाईक यांची केस जरा वेगळी आहे." सर्जन म्हणाला.

"वेगळी? ती कशी?" सुशीलने चौकस डोळे बारीक केले.

"आमची कार्डीओ सर्जन जिज्ञासा परशुराम आणि शक्तीसेन रिलेशशिपमध्ये आहेत."

"ओह... म्हणजे हे हॉस्पिटल शक्तीसेन यांचं सासर आहे म्हणायचं तर... बोलवा. मिस जिज्ञासा यांना, बोलवा जरा. शक्तीसेन नाहीत तर त्यांच्याशी बोलून घेऊ."

"त्या इथं नाहीत आत्ता."

"म्हणजे?" सुशीलचा स्वाभाविक आश्चर्य प्रकट करणारा प्रश्न.

"काल जरा त्यांना पुण्याला पाठवलं आहे..." सर्जन बिचकत बोलला.

"असं अचानक?" सुशीलनं संशयी विचारलं.

"तिथल्या हॉस्पिटलला एक कॉम्प्लिकेटेड केस होती. पेशन्ट् इकडं आणणं शक्य नव्हतं. अजिबात हाती वेळही नव्हता आणि लवकरात लवकर ऑपरेट करणं गरजेचं होतं. म्हणून शक्ती यांना इथं एडमिट केल्या केल्या त्यांना इमर्जन्सी जावं लागलं."

"मला त्या पेशन्टची सगळी माहिती हवी आहे. बघू तर किती खरं आहे यात?"

"माहिती देऊच. पण विश्वास ठेवा ऑफिसर. यात काही खोटं नाही. हॉस्पिटलकडूनच त्यांना पाठवण्यात आलं आहे. त्यामुळे त्यांनी काही बहाणा करून त्या पळून गेल्या असतील अशी तुम्हाला शंका वाटत असेल, तर ती डोक्यातून काढून टाका."

a

"आयसी!"

"हो. आणि पेशन्टची माहिती हवीच असेल, तर पुण्याच्या महापौरांच्या आईच आहेत त्या, ज्यांची कार्डीयाक सर्जरी करायला जिज्ञासा परशुराम गेल्या आहेत. कदाचित बातमी तुम्ही पाहिली असेल. त्यामुळं यात काही खोटं असण्याचं कारण नाही." सर्जन म्हणाले.

"म्हणजे शक्तीसेन इथून पळालेत हे त्यांना अजून माहीतच नाही असं तुमचं म्हणणं आहे."

"इथं जे घडलं आहे ते आम्ही त्यांना अजून कळवलं नाही. त्यांना कोणत्याही प्रकारे स्ट्रेस येऊ नये असा आमच्याकडून प्रयत्न होता. कारण ज्या सर्जरीसाठी त्या गेल्या आहेत, ती किती महत्त्वाची होती हे तुम्ही आत्ताच ऐकलंत. अशा परिस्थितीत त्यांचं मन आणि डोकं शांत राहणं गरजेचं होतं." मुख्य सर्जन सुशीलच्या मनातील काही किंतु असल्यास तो मिटवण्याच्या हेतूस्तव समजावण्याच्या प्रयत्नाने बोलला.

"ठीक आहे. शक्तीसेन गायब झालेत हे कधी लक्षात आलं?"

"साडे नऊ दहाला."

"ठीक. शक्तीसेन इथं नाहीयेत हे समजण्याच्या आधी शक्तीसेन यांना अखेरचं कधी पाहिलं होतं? आणि कुणी? कोणी इथं आलं होतं?"

"एसपी सर आले होते. त्यांनीच शक्तीसेन इथं नसल्याचं आम्हाला कळवलं."

"ते माहीत आहे."

"हॉस्पिटलचं कोणी आलेलं?"

"हा. जनरल डॉक्टर राऊंडला येऊन गेले होते."

"त्यावेळी शक्तीसेन इथं असणार?"

"हो. सेडेटिव्ह दिल्याने झोपेत होते. तब्येत पण बरीच होती. जास्त काळजी करण्यासारखं काही नव्हतं. ते झोपलेत बघून डॉक्टर पुढील वॉर्डला सरकले होते."

"या नंतरची सीसीटीव्ही फुटेजेस हवीत मला." आणि काही प्रतिक्रिया ऐकायच्या आतच सुशील त्या स्पेशल वॉर्डमधून बाहेर पडला.

●●●

काहीच मिनिटांत सर्व्हीलीयन्स रूममध्ये सर्व उभे होते. फ्रान्सिस चिंतेत होता. शक्तीची यातून लीड मिळाली, तर सगळं संपणार अशी त्याला भीती होती.

ज्याची भीती होती ते झालंच होतं. शक्ती त्याच्या वॉर्ड पासून बाहेर पर्यंत प्रत्येक कॅमेऱ्यात बद्ध झाला होता. त्याने स्वतःला लपवण्याचा प्रयत्न केला होता, पण कुठं ना कुठं तो दिसलाच होता. म्हणजे त्यानं तोंड लपवण्याचा यत्न केल्याने तोंड कशात आलं नव्हतं, पण देहयष्टी वरून शक्तीला ओळखणं अवघड नव्हतं कुणालाच. एवढं कमी की काय म्हणून फ्रान्सिसला चिडवण्यासाठी म्हणून सुशीलने फ्रान्सिस कडूनच फुटेजमध्ये दिसणारी व्यक्ती शक्ती असल्याची खात्री करून घेतली होती. कारण फ्रान्सिसच्या चेहऱ्यावर झळकणारी विवंचना सुशीलच्या नजरेतून सुटली नव्हती.

a

"मला शक्तीसेन यांना ते जाण्याआधी कोण कोण भेटलेलं त्याची फुटेज पाहिजे." सुशीलची इच्छा...

शिरसावंद्य मानून काही ऑर्डर येण्या आधीच सर्व्हीलीयन्स ऑफिसर त्याच्या कामाला लागला होता.

काही तासांच्या धुंडाळ्यानंतर त्या फुटेजेसमधून डॉक्टर्स सोडले, तर फक्त एसपी शक्तीसेनला भेटून गेल्याचं उघड झालं.

हातात कसलीशी ब्रिफकेस घेऊन गेलेला एसपी तीच ब्रिफकेस घेऊन स्पेशल वॉर्डमधून बाहेर पडलेला दिसत होता.

"समथिंग्स स्ट्रेंज!" सुशीलने रिमार्क दिला.

त्यावर फ्रान्सिस भयचकित झाला. आता याला काय कळालं? हा त्याच्या पोटात मोठा प्रश्न गोळा होऊन उभारला.

"क... काय झालं...?" त्यानं बिचकत विचारलं.

या प्रश्नावर सुशीलने आत्मप्रौढीचं स्मित केलं,

"सुप्रीटेंडेंटना भेटायला लागतंय." तो म्हणाला.

आणि त्याचे डोळे फ्रान्सिसकडे फिरले. एका शिकाऱ्याने सावज हेरावे तशी त्याची ती मग्रूर भेदक नजर होती.

"आपल्याला काही मिळालंय का?" फ्रान्सिसने आपली चलबिचल दाखवू न देता बळेच पण सुशीलला नेमकं काय समजलंय यामागचं सत्य जाणून घेण्याच्या खऱ्या हेतूने पृच्छा केली.

a

"लूक एट दि डिफ्रंस बिटविन द वेट्स ऑफ दि ब्रिफकेस व्हाईल ही वॉज एंटरिंग अँड देन कमिंग आऊट ऑफ द वॉर्ड!" सुशील म्हणाला,

"लूक एट दि वे ही वॉज हँडलिंग दि केस व्हाईल गोइंग इन शक्तीसेन्स वॉर्ड अँड देन, वेन ही वॉज कमिंग बॅक..."

दोन्ही फुटेजेस पुन्हा न सांगताच सर्व्हीलीयन्स ऑफिसरने शिताफीने पुन्हा ऑपरेट केले. निरीक्षणासाठी ते डोळ्यांसमोर असणे आवश्यक आहे हे त्यास पक्के ठाऊक होते.

ते व्हिडिओज पाहून फ्रान्सिसच्या डोळ्यांसमोर देखील चांदण्या चमकल्या. एसपीनं शक्तीला पळवण्यास मदत केली हे खुद्द शक्तीकडूनच त्याला समजलं होतं, पण त्याचा पुरावा तो आता प्रत्यक्ष पाहत होता. यामुळे त्याला चिंतेत पडण्याचं कारण म्हणजे आता संपूर्ण कोल्हापूर पोलीस डिपार्टमेंट सुशील आणि त्याच्या माध्यमातून एनआयए व एनआयएच्या मार्फत संपूर्ण देश यांच्या नजरेत संशयाच्या आणि अविश्वासाच्या खाईत लोटलं जाण्याची मोठी शक्यता नव्हे भीती होती...

फ्रान्सिसची विस्फारलेली नजर तो काय समजून गेला आहे याची सुशीलला ग्वाही देऊन गेली. त्यावर सुशील मंद हसला,

"दॅट्स राईट! दोन्ही वेळेला त्यांनी बॅग एकप्रकारेच हाताळली आहे, पण त्यांच्या हाताला ब्रिफकेसमुळे पडलेल्या स्ट्रेनमध्ये फरक आहे. वॉर्डमध्ये गेले त्यावेळी केस वजनदार होती आणि परतल्यावर ती हलकी भासत आहे." सुशील बोलला.

"सर..." फ्रान्सिस अडखळला.

"तुम्हाला हे माहीत नव्हतं असंच म्हणायचंय ना? लेट्स सी; शक्तीसेन एसपी साहेबांनी दिलेले कपडे बदलून इथून निसटले. पण वॉर्डमध्ये आपल्याला शक्तीसेन यांचे हॉस्पिटलचे कपडे दिसले नाहीत. हो ना? मिस्टर फ्रान्सिस; बाथरूम तुम्ही चेक केलीत ना?" त्याने आपले डोळे फ्रान्सिसवर फिरवले.

फ्रान्सिस खजील होत खाली पाहता झाला. सुशील त्याला काही बोलला नाही. तो पुन्हा शक्तीसेनच्या वॉर्डकडे चालला. फ्रान्सिसला त्याच्या मागून जाण्याशिवाय पर्याय नव्हता.

●●●

वॉर्ड गाठून सुशीलने बाथरूम गाठले. त्याच्या अपेक्षेप्रमाणे तिथे त्याला शक्तीचे हॉस्पिटलमधील कपडे हाती लागले. इथं आपल्याला कोणाकडून को-ऑपरेशन मिळणार नाही हे समजून त्याच्या भुवया निराशेत उंचावल्या. ओठ दाबले गेले. सहकार्य न करणे हा काही गुन्हा नव्हता, त्यामुळे त्याला यांच्या विरोधात काहीच करता येत नव्हतं. ती कपडे घेऊन तो बाहेर आला.

वॉर्डमध्ये फ्रान्सिस अपराधी मान झुकवून उभा होता. त्याला बोलून फायदा नाही हे ध्यानात आले असल्याने ते कपडे तिथेच टाकून सुशील बाहेर पडला.

फ्रान्सिस तिथंच तसाच उभा राहिला. मग सुशील पुनः मागे आला,

"कांट यु इव्हन टेक मी टू दि हेडकोर्टर्स?" तो वैतागाने ओरडला.

तसा फ्रान्सिस हरकतीत आला व मागे फिरला. आता कोणाची काही खैर नाही असं त्याला भासून गेलं. त्यामुळे तो अजूनच दडपणात गेला. सुशीलने

a

होप्लेस्ली मान डोलावून बाहेरचा रस्ता धरला. फ्रान्सिसही संथ गतीने दार जवळ करू लागला...

●●●

सुशील तावातावाने एसपीच्या केबिनकडे चालला होता. फ्रान्सिस त्याच्या वेगाला वेग मिळवत त्याच्या मागे पाऊल जुळवत होता. केबिन जवळ आलं तसं...

"तुम्ही इथंच थांबा!" सुशीलने करड्या आवाजात अक्षरशः आज्ञा केली.

अपराधबोध मनात असल्याने सुशील वरिष्ठ असल्याने त्याचं ऐकण्याशिवाय फ्रान्सिसला गत्यंतर नव्हतं. तो जागीच थांबला. सुशील धाडकन परवानगीही न घेता केबिनमध्ये शिरला. आपलं डेस्क जवळ करण्याऐवजी फ्रान्सिस दाराबाहेर उभा राहिला.

केबिनमध्ये सुशील शिरल्या शिरल्या एसपी संतापाने उभारला होता.

"हा काय प्रकार आहे ऑफिसर? मान्य आहे तुम्ही एनआयए कडून आलात. पण म्हणून तुम्हाला आमची प्रायव्हसी भंग करण्याचा अधिकार मिळत नाही!"

"आय वॉन्ट सम अँसर्स! सम एक्सप्लिनेशन!" सुशील त्याला प्रत्युत्तर न करता मुद्यावर आला. त्याच्याही आवाजाला धार होती.

कदाचित तो भांडण्याच्या प्रवित्र्यात होता. याला नक्की काहीतरी समजलंय हे उमजून प्रकरण शांतपणे हाताळले पाहिजे हे एसपीने ताडलं.

तो आपल्या चेअरवर बसला.

"बसा!" त्याने समोरील खुर्चीकडे हात केला. आणि चिडलेल्या सुशीलकडे फक्त पाहत राहिला.

सुशील अजूनच चिडला. पण उत्तरं अशी मिळायची नाहीत हे लक्षात घेऊन गुश्श्यातच चेअर मागे खेचून तो तीवर स्थिरावला.

"आता बोलाल?" तो संतापाने हट्ट करत बोलला.

"काय म्हणणं आहे तुमचं?" एसपीनं शांत विचारलं.

"तुम्ही शक्तीसेन यांना पळण्यास मदत केलीत? तुम्हाला माहित आहे, ही इज दि प्राईम सस्पेक्ट फॉर् दि डिसअपेरियन्स ऑफ दि युरेनियम!" सुशीलने त्राग्यात विचारलं. तो त्रागाही त्याचा संयत होता. आततायी नव्हे.

एसपी नुसता पाहत होता. समोर उभ्या ठाकलेल्या सुशील रुपी आकस्मिक प्रश्नाला काय समाधानकारक उत्तर करावं याची त्याचं मन व बुद्धी जुळवाजुळव करू लागलं होतं...

a

# ५. आरंभ...

"बोलताय ना?" सुशीलने दबाव टाकण्यासाठी विचारलं.

"इट व्हॉज फॉर टू कंफ्रंट हिम." एसपी बोलला.

"अँड हाऊज दॅट?" सुशीलने शंकीत विचारलं. त्याची एक भुवई आपसूक उंचावली होती.

"तो फ्री असला, तरच तो कोणाला भेटतो, काय करतो, हे समजू शकेल हा माझा प्लॅन होता. कदाचित तो युरेनियमचा साठा सुरक्षित आहे का हेही चेक करेल?" एसपी वाक्ये जोडत होता.

"आणि तुम्ही त्याला ट्रॅक करताय? कुठाय तो आत्ता?" सुशील अजूनही अविश्वासातच होता.

"तुमचा विश्वास नाही." एसपी नाराज बोलला.

"असण्याचं कारणच नाही. कारण तसं असतं, तर याबद्दल तुम्ही आम्हाला ऑलरेडी इंफॉर्म केलं असतं. त्याची लीड दिली असती. आम्हाला असं शक्तीसेनला शोधत बसावं लागलं नसतं." सुशील त्याची अविश्वासाची भूमिका स्पष्ट करत बोलला.

"आता या तर्कावर आम्ही काही बोलू शकत नाही." स्वतःला डिफेन्ड करण्यासाठी उसासा टाकत एसपी बोलू लागला,

"पण तुम्हीच सांगा, मलाच काही कन्फर्म नसेल, तर मी तुम्हाला काय सांगणार? म्हणून मी गप्प होतो. म्हंटलं, नीट इंटेल मिळू दे, मग तुम्हाला कळवू.

पण त्यापूर्वीच तुम्ही समोर आलात; जाब विचारायला!" एसपीनं आपली नजरही करडी केली.

"आता जर समोर आलंच आहे आमच्या, तर मग आत्ताचं लाईव्ह लोकेशन मला हवंय शक्तीसेनचं." सुशील बोलला.

आणि तो मनोमन प्रौढावला. त्याची ती आत्मपौढी गैर नव्हती. त्याच्या त्या वाक्याने हुकुमी काम त्याच्या अपेक्षेनुसार केले होतं. एसपीच्या कपाळावर आठ्यांचं जाळं पसरलं होत. दाट नव्हतं ते, विरळच होतं, परंतु ते सुशीलच्या तीक्ष्ण पारखी नजरेतून सुटलं नव्हतं.

आपली चलाकी आता याने पकडू नये म्हणून जराही विलंब न लावता एसपी बोलला,

"त्याचं शेवटचं लोकेशन त्याच्या घरी ट्रॅक झालं होतं." एसपी बोलला.

खरेतर त्याने लोकेशन सांगितलं नसतंच. पण शक्ती तिथून अनट्रेसेबल झाल्याने त्याला ते सांगणं गैरसोयीचं वाटलं नाही. किमान याने सुशीलचा अविश्वासी पवित्रा तरी गळून पडेल यासाठी एसपीची ही खेळी... किती यशस्वी झाली? ठाऊक नाही... कदाचित नाहीच... कारण...

"आणि?" सुशीलने पुनः त्याचा अविश्वास प्रगट करत थेट विचारलं.

"त्यानंतर तो सर्विलीयन्स वरून डिसअपिअर झाला." एसपीने आपला मेक बिलिव्हचा प्रयत्न चालू ठेवत सुशीलला स्पष्ट केलं.

"आणि तरी तुम्ही गप्प आहात?" सुशीलचा अजूनही भरवसा व्हायला तयार नव्हता.

"गप्प नाही. प्रयत्न करतोय त्याला ट्रेस करण्याचा." एसपी ठणकावत बोलला.

"रिजल्ट?" सुशीलचा तिरकस प्रश्न.

"सध्यातरी झिरो." एसपीचं खोटं हताश उत्तर.

"फर्गेट इट. आई'ल हँडल इट ऑन माय ओन. आणि आता; शक्तीसेन हे फरार आरोपी आहेत अशी बातमी आऊट करण्याशिवाय मला पर्याय उरला नाही!" सुशील ठणकावत होता.

"पण..." एसपी त्याला अडवण्याचा प्रयत्न करणार तोच...

"नो मोअर डिस्कशन! अँड वन मोअर थिंग्; आय वॉन्ट हीज अड्रेस!" असा हुकूम सोडून सुशील उठला.

पुढं काहीही ऐकून न घेता त्याने केबिन सोडली होती.

तो जाताच एसपीचा हात मोबाईलला गेला.

"वी नीड टू टॉक!" तो पलिकडे एवढंच म्हणाला. त्याच्या बोलण्यात आज्ञा नव्हे, तर कळकळीची विनंती झळकत होती...

◆◆◆

शक्ती लपला होता त्या पत्र्याच्या झोपडीचे कुलूप काढले जात होते, ती चाहूल लागताच शक्ती जरा सावध झाला. तो दाराच्या मागे सरकला. त्याची 'आशानी' त्याच्या हाती आली होती. ती त्याने आवाज न होऊ देता सावध

a

सावकाश लोड केली होती. आत येणाऱ्याचा वेध घेण्यास तो सज्ज असतानाच...

खबरी आत आला. त्याच्या हाती कुलूप होते. शक्ती रिलॅक्स झाला. आशानी अनलोड करून तो खबरी समोर आला. खबरीने वळून दार लावून घेतले. सूर्य अजून मावळला नव्हता. उन्हाची लकाकी थेट आत येत होती, ती दार झाकल्याने बाहेरच अडवली गेली. खोली पुन्हा अंधारमय झाली.

"काही चर्चा बाहेर?" शक्तीने खबरीला विचारलं.

"अजूनतरी काही कानावर नाही." खबरी म्हणाला.

त्याला माहिती काढायला उसंत होतीच कुठं? पण त्याच्यावर सोपवलेलं जे काम होतं, ते करत असताना इथून तिथून काही कानावर पडण्याची किंचित शक्यता होती व त्या विचारातून शक्तीचा हा प्रश्न होता. आणि तोच विचार ध्यानात येऊन खबरीचं उत्तर होतं.

"एक काम करशील?" शक्ती विनंतीचा स्वरात विचारत होता.

"नक्कीच साहेब. बोला की " खबरी संकोचत बोलला.

"सनशाईन हॉटेल माहीत आहे?"

"होय. का?"

"मला त्या हॉटेलची आणि त्या मालकाची सगळी माहिती हवी आहे. हॉटेलचा मालक हॉटेलमध्ये कधी असतो? आणि मी हॉटेलमध्ये कोणालाही न माहीत होऊ देता एन्ट्री कशी घेऊ शकतो जरा बघ."

a

खबरी जरा खोल हरवला. त्याच्या चेहऱ्यावर प्रश्नचिन्ह सादर होतं. ते ताडून...

"जमेल?" शक्तीने विचारलं.

"अं... हं. हं." भानावर येत तो बरळला.

शक्तीने मग जास्त विचार केला नाही. त्याने लगेच मोबाईलवर त्याचा नवीन नंबर टाइप केला व खबरी समोर धरला.

"हं. हा नंबर वाच आणि नीट लक्षात ठेव. सेव्ह करून किंवा कुठं लिहून ठेऊ नको." शक्तीने त्याला सूचना केली.

खबरीने तो नंबर वाचला. एक दोनदा मनाशी घोकला, घोळला.

"राहील लक्षात?"

"होय."

"गुड. काही समजलं, तर मला या नंबरवर कळंव. पण फोन झाल्याझाल्या लॉग मधून नंबर काढून टाकायचा. जा कामाला लाग. पण रात्रीच्या आत परत ये."

खबरीची नुसतीच मान डोलली.

"गो देन!" खबरीच्या खांद्यावर थोपटून शक्तीने त्याला गती दिली.

तो पत्र्याच्या त्या खोलीबाहेर पडला. दार बाहेरून लावलं गेलं. शक्ती गहन विचारात हरवला होता एव्हाना...

◆◆◆

एसपी अज्ञात ठिकाणी 'त्या' गूढ माणसाच्या समोर एकजण बसला होता. विंटेज वेल फर्निश्ड् लाकडी सामानाने ती खोली खच्चून भरली होती. कुठून तरी उजेडाची तिरीप येत होती, जी धुळीकणांनी माखून शुभ्र दिसत होती. नाहीतर ती खोली बरीच अंधारमय होती.

"बोला एसपी साहेब. एवढ्या घाईत काय बोलायचं होतं?" विस्कीचा घोट घेत त्याने विचारलं.

"आपण इतके रिलॅक्स कसे?" एसपी तणावात होता.

"बिकज एव्हरीथिंग् इज अंडर् कन्ट्रोल." तो माणूस निवांत बोलला.

"नो. देअर् इज नॉट! तो एनआयए ऑफिसर जरा जास्तच सिरीयस होऊन तपास करतोय." एसपी काळजी व्यक्त करत बोलला.

"करू देत. सगळंच आपल्यासारखं झालं, तर बाहेर संशय नाही का येणार?" तो इसम छद्मी हसला.

"म्हणजे त्याला आपण सांगितलंय तसं वागायला?"

"नाही! त्याचा आणि आपला काही संबंध नाही!"

"म्हणजे तो धोकादायक ठरू शकतो!"

त्या माणसाची थंड नजर एसपीवर गेली. एसपी जरा बिचकला.

"ते सगळं सोडा एसपी साहेब! आम्ही आहोत ना? आधी मला सांगा, तुम्ही त्या तुमच्या ऑफिसरला पळवून का लावलंत?" त्याची भेदक नजर एसपीला आरपार छेदत होती.

एसपी गडबडला. काय बोलावं त्याला प्रथमतः ध्यानी आलं नाही. मग काही वेळ दवडल्यावर तो सावध झाला.

"मी... मी ते केलं कारण... तो असा फरार असेल त्यावेळी तो जास्तीत जास्त चूका करत जाईल आणि त्यामुळे त्याच्यावरचा आरोप अधिक मजबूत होईल..." एसपी गडबडीत शब्दांची जुळवणी करून बोलला.

"आम्ही तुम्हाला सांगितलेलं हे करायला?" तो गूढ माणूस घोर आवाजात, परंतु आवाज कमालीचा शांत ठेवून बोलला.

त्याचा आवाज जराही वाढला नव्हता. त्याच्या आवाजातली शांतताच मात्र एसपीला अधिक कमालीची भिववून गेली.

"न... नाही..." एसपी घाबरा झाला.

"मग स्वतःचं डोकं का चालवलंत?" त्याची ती थंड भेदक नजर अजूनच कडवट तीक्ष्ण झाली.

"स... सॉरी..." एसपी गडबडला.

"त्याला अटक झाल्यावर विषय तिथंच संपला असता आणि आपल्याला धोका ठरणारा सर्वांत मोठा रोडा, तुमचा तो ऑफिसर आत गेल्याने आपल्याला आपलं काम करणं सहज झालं असतं! पण आता तो मोकळा आहे. थँक्स टू यु एसपी साहेब." तो धमकवल्यासारखं बोलत होता.

त्याचा तो अविर्भाव पाहून एसपी बावचळला. इतका थंड क्रूर माणूस त्याने आजतागायत पाहिला नव्हता. शहरात मोठं काही तरी घडू पाहत होतं आणि त्यासाठीच यांचा काय तो संबंध आला होता... नाहीतर यांच्या वाटा कधी छेदल्या गेल्या नसत्या त्यांच्या हयातीत...

"सर, आपल्याला जे करायचं आहे, ते जोखमीचं आहे. एक दोन दिवसांत होणारं काम नाही हे. आपल्याला एखादं टार्गेट हवंच आहे, ज्याच्यावर सर्वांचं लक्ष केंद्रित राहील आणि त्यासाठीच मी शक्तीसेन नाईकला फरार व्हायला लावलं. त्याला आत घेतला असता, आणि पुन्हा आपल्या प्लॅन मधलं काही समोर आलं असतं, तर आपल्यासोबत..."

"बास!" एसपी काय म्हणणार आहे ते समजून त्या व्यक्तीने त्यास थांबवलं.

एसपी कोणाला तरी संबाधित करणार होता, हे लक्षात येऊन त्या गूढ व्यक्तीने एसपीला रोखलं होतं.

"सॉरी सर. पण आय होप मी हे का केलं ते तुमच्या लक्षात आलं असेल..." एसपी स्वतःची बाजू नितळ करत बोलला.

त्या गूढ माणसाने थोडा विचार केला. आणि...

"होप तुम्ही म्हणता तसं होईल. कारण नाही झालं, तर..." त्याची नजर क्रूर झाली.

"मी समजून आहे सर. पण माझ्यावर विश्वास ठेवा. मी शक्तीसेनला आतून बाहेरून ओळखतो. तो शांत बसणाऱ्यातला नाही. तो नक्की काही ना काही उपद्रव करेल. आपण मीडिया आणि जनतेचं सगळं लक्ष त्याच्याकडे डायव्हर्ट करू. आपल्याला मुबलक वेळ मिळेल आपलं काम मार्गी लावण्यासाठी आणि कोणी आडकाठीही करणार नाही. शक्तीसेन नाईकचं फरार असणं आपल्या प्लॅनसाठी आर्मरचं काम करेल."

a

"निघा! फक्त पुन्हा डोकं चालवू नका!" तो पाऱ्याच्या नजरेने एसपीला बघत होता.

त्याची ती नजर पारा कातळ चिरत जावा तसं एसपीचं काळीज चिरत चालली आहे असंच एसपीला भासवून गेली.

एसपीची मान समजुतीत नकळत हलली. टेबलवरची आपली टोपी आणि काठी उचलून त्याने ती रूम त्यागली.

त्या अज्ञात माणसाचे डोळे लाल झाले होते, तशा रक्तवर्णी नेत्रांनी तो जाणाऱ्या एसपीला बघत आपला घसा व्हिस्कीने कडवट करत केला. जणू साप असलेल्या त्याने आपल्यात विष भरून घेतलं असावं. आणि वेळप्रसंगी तो ते विष अगदी एसपी विरुद्ध वापरायलाही कमी करणार नाही, मागेपुढे पाहणार नाही...

# ६. षडयंत्र...

'शनशाईन'ला एक मोठा ट्रक येऊन थांबला. किचनमध्ये लागणारे सामान, भाज्या वगैरे कंटेनर्समध्ये भरून त्यातून आणले गेले होते, जे उतरवले जात होते.

हॉटेलच्या मागच्या बाजूने दार उघडून ती स्टीलची कंटेनर्स आत घेतली गेली. त्यात एक लाकडी उभी कंटेनर होती. ती देखील ट्रॉलीवर टाकून इतर सामासोबत थेट हॉटेलमधील किचनमध्ये नेण्यात आली. समोर मुख्यद्वारापाशी लोकांची वर्दळ असल्याने त्यांना त्रास नको म्हणून सामानाची उतरन इथून चालू होती.

किचनमध्ये ती पेटी आणली गेली आणि कटावणीने तिचे खिळे उखडून तिचे सहा फूट उंच व चाळीस इंच रुंद दार उघडले गेले. आणि आत दिसला तो...

'शक्तीसेन!'

शक्तीसेनला इथं आणण्यासाठीच हा प्रपंच होता, त्यामुळे उघडणाऱ्या कुणालाच आश्चर्य वाटलं नाही. पेटीला खिळे असल्याने ती उघडून पाहण्याची तसदी कोणी घेऊ नये म्हणून शक्तीसेनचीच ही युक्ती होती. हवा खेळती रहावी म्हणून दोन-चार लहान नकळती छिद्रे होती, ज्याने शक्तीला कोंदटल्यासारखे होऊ नये व प्राणवायू व्यवस्थित मिळून श्वासोच्छवासास त्याला त्रास होऊ नये. शक्तीसेनच्या त्या निनावी खबरीने हे सगळं जुळवून आणलं होतं. इथं खाद्य सामान पुरवणारा त्याच्या ओळखीचा होता. त्याला व त्याच्या योगे इथल्या

a

शेफ्सना विश्वासात घेऊन शक्तीसेन कोणाच्या नजरेत भरू नये यास्तव त्याचं इथं येणं अशाप्रकारे साधलं होतं.

शक्तीसेनबद्दल बातमी अजून बाहेर आली नव्हती, म्हणून त्याला हे लोक मदत करायला तयार झाले होते. त्यासाठी एक कहाणी सांगितली गेली होती त्यांना, की इथं कोणी अतिरेकी आहे व त्यास पकडायला शक्तीसेनला हे मदत करत होते. त्यांना बिचाऱ्यांना काय माहित, की शक्ती भाऊ त्यांच्याच मालकावर विळखा घालायला आलेत, ते त्यांच्या गावीही नव्हतं. मालकापासून तर शक्तीचं इथं येणं खास लपवून ठेवण्यास यांना ताकीद द्यायला शक्तीने आधीच त्याच्या खबऱ्याला सूचित केलं होतं. अन्यथा मालक बिथरेल व अतिरेक्यांना हे समजून ते पळून जातील असं काहीसं सांगून इथल्या कर्मचाऱ्यांना मालकपासून सगळं दडवण्यास सांगितलं होतं, जे साध्य झालं होतं. देशभक्तीपर असं काहीसं करतोय या भावनेने हे स्वयंपाक कर्मचारी भारले गेले होते व त्या भावनेतून त्यांची ही शक्तीला उत्स्फूर्त मदत होती.

शक्ती पेटीतून बाहेर येताच त्याने याची कुठेही वाच्यता करायची नाही अशी त्या कर्मचाऱ्यांना इशारत देऊन तो किचन मधून हॉटेलच्या अंतर्गत भागात प्रवेशकर्ता झाला. मालकाचे दालन तो यांना विचारू शकत नव्हता, अन्यथा इथं असं येण्याचं त्यानं जे कारण यांना कळवलं होतं, ते त्यांना खोटं वाटून मालकाला वाचवण्याचा प्रयत्न हे करतील असा शक्तीचा विचार झाला होता. त्याचं त्यालाच हॉटेल मालकाला शोधावं लागणार होतं. तो यावेळी इथं असणार हे त्याच्या खबरीने कोणाला संशय न येता पक्कं काढून घेतलं होतं,

a

त्यामुळे मालक इथं असेल, की नाही याची चिंता शक्तीला असण्याचं काही कारण नव्हतं...

●●●

शक्ती कॉरिडोर पॅसेज पार करत लॉबीत आला. लॉबी गजबजलेली होती. त्या लोकांच्यात त्याला एक व्यक्ती दिसली, तीच जिला त्याने पकडले होते...

'जिग्नेश ओसवाल!'

*'हा... हा इथं काय करतोय...?'* शक्तीच्या डोक्यात प्रश्न कुंधला.

जिग्नेश आतच येत होता. त्याचा पाठलाग करायचं शक्तीने मन बनवलं होतं. हा आपल्याला योग्य त्या व्यक्तीपर्यंत नक्कीच पोहोचवेल हे शक्तीला पक्कं ठाम झालं होतं. शिवाय हो ना हो या हॉटेलच्या मालकाचा यात वस्तुतः हात आहे हे देखील त्यास बावनकशी झाले.

जिग्नेश लॉबीतील लिफ्टकडे गेला. जाताना तो शक्तीच्या जवळूनच गेला होता. परंतु तो जवळ येत आहे हे पाहून शक्तीने आपल्या जॅकेटचे डोक्यावरील हुड व्यवस्थित पुढे करून आपले झाकलेले तोंड अजूनच आडोशाला घेतले होते. आपल्या वाटेत कोणीतरी आहे व ते कोण आहे हे पाहण्याचेही जिग्नेशला उसंत नव्हती. तो घाईत होता. त्याला कसली घाई लागली होती, हे त्याच्या मागुती जाऊनच समजणार होते. आणि त्याप्रमाणे शक्ती त्या बंद झालेल्या लिफ्टसमोर उभा राहिला.

a

तो लिफ्टच्या डिस्प्लेवर पडणाऱ्या आकड्यांवर नजर ठेवून होता. लिफ्ट कुठे थांबली आहे हे ध्यानी घेऊन मग त्याचे पाय हरकतीत आले. तो पायऱ्यांकडे लगोलग धावला. नाही म्हणायला दुसरी लिफ्ट होती, परंतु यावेळी संथ जाणाऱ्या लिफ्टपेक्षा त्याला पायऱ्याच जास्त विश्वसनीय वाटल्या. कासवगतीने वर सरकणाऱ्या लिफ्टहून लवकर तो पायी पळतच हव्या त्या फ्लोअरवर जलदीने जाऊ शकणार होता हे त्यास ठाऊक होतं.

त्याप्रमाणे तो चौथ्या फ्लोअरवर पोहोचला देखील, तेही अवघ्या काही मिनिटांतच. तो फ्लोअर पूर्णतः रिकामा होता. फक्त हॉटेल मालकाच्या व्यैयक्तिक वापरासाठी तो राखीव ठेवला होता. त्यामुळे त्याला हॉटेल मालकाची सुईट शोधण्याची तशी मुळी तसदीच घ्यावी लागली नाही.

त्याने फक्त तिथल्या सर्व सुईट्सच्या दारांचे नॉब्स पाहायला सुरवात केली. एकच दाराचे नॉब् त्याला चकचकीत आढळून आले. त्याला लखाकी इतकी होती, की फिंगरपिंट्सचे ठसे देखील तिथं हजर होते.

शक्तीला लक्षात आले, की या फ्लोअरवर हीच खोली वापरात आहे आणि त्यामुळेच बाकीच्या दारांच्या नॉब्सवर जशी थोडीबहुत धूळ जमा आहे, तशी ती इथं नाही. हा दरवाजा सतत उघडला जातोय, त्यामुळे हा नॉब् स्वच्छ आहे, व इथल्या याच सुईटचीच फक्त काळजीपूर्वक सफाई देखील होत आहे. बाकीचे सुईट्सची जीवावर उदार होऊन सफाई होत असणार कारण मालक कुठे लक्ष देणार आहे ही कदाचित कर्मचाऱ्यांची भावना असावी. असो, शक्तीला बाकीच्या या उवापोहची आवश्यकता नव्हती. त्याला जिग्नेश कुठं गेला आहे हे शोधून काढायचं होतं आणि त्याचं काम झालं होतं. त्यांचं आणखी एक काम

लागलीच झालं होतं कारण जिग्नेश भेटायला आला होता तोच मुळी या हॉटेल मालकाला. त्यामुळे त्याला वेगळं जाऊन शोधण्याची तोशीस शक्तीची वाचली होती.

शक्तीने दारास कान लावून आतील बातचीत ऐकण्याची नाकाम कोशिश केली. परंतु त्याला काही ऐकू आलं नाही. साहजिकच ही सुईट साऊंडप्रुफ होती. बाहेरील आवाज आत जात नव्हता, तसा तो आतील देखील बाहेर येणे दुरापास्त होते.

काय करावे? आत काय बोलणे चालू असेल? या विवंचनेत शक्ती पडला. धडक मारून आत जावे आणि सत्य उकळून काढावे का यांच्याकडून? तेच योग्य, परंतु त्याआधी हे आपापसात काय बोलतात हे ऐकणे गरजेचे होते. त्यायोगे त्यांचे हमखास काय योजना चालली आहे ते त्यास समजेल असाही त्याचा विचार झाला, म्हणजे आपण तडाख्याने आत गेलो, तर ते आपल्याला गुमराह करत खोटे सांगत आहेत की नाही, हे त्यास स्पष्ट होणार होते आणि त्यासत्व त्यास पहिले त्यांचे संभाषण ऐकणे क्रमप्राप्त होते... पण पुन्हा प्रश्न तसाच उर्वरित होता, की कसे?...

शक्तीसेनच तो काही न काही मार्ग काढल्याशिवाय शांत थोडीच बसणार होता... त्याचे विचारचक्र चालू झाले...

आणि दुसऱ्या क्षणी एक वीज तळपावी तशी एक कल्पना त्याच्या मस्तिष्कात प्रकट झाली.

लाईट प्रुफिंग जसे लाईट म्हणज प्रकाश अवरुद्ध करते, तसे साऊंड प्रुफिंग आवाज पूर्णतः सपशेल अवरुद्ध करत नाही. साऊंड प्रुफिंगने फक्त

आवाज कमी होतो व व्हॅक्युमवर त्याचा परिणाम होत नाही, कारण आवाजाला प्रवास करण्यासाठी माध्यमाची आवश्यकता असते. आणि सर्वप्रकारची माध्यमेही प्रकाश प्रसारित, प्रक्षेपित करण्यास सक्षम आहेत. आता आतील गोष्टी ऐकण्यासाठी शक्तीसेनला केवळ एक माध्यम हवे होते, पण काय...

त्याच्याकडे तक्षणी असे कोणतेच साधन उपलब्ध नव्हते, ज्याचा तो माध्यम म्हणून उपयोग करेल... किंवा त्यावेळी त्याच्याकडे जे उपलब्ध होते, त्याच गोष्टींना त्याला उपयोगात आणावे लागणार होते...

परंतु त्याच्याकडे होते काय... त्याने खिसे चापचले. त्याच्याकडे फक्त मोबाईल आणि तोही त्याच्या खबरीकडून घेतलेला आणि एक इयरबड्सची केस होती. वायर टॅपिंग करण्यासाठी त्याला वेळही नव्हता आणि तशी सुविधाही नव्हती. शिवाय एटियुची देखील तो सद्य घडीला मदत घेऊ शकत नव्हता, की त्यांच्या माध्यमातून त्यांच्याकडून इथे त्याने पूर्वी वायर टॅपिंग, फोन टॅपिंग, वगैरे उद्योग आधीच करून ठेवता येतील...

शक्तीसेन निव्वळ 'शक्ती'च नाही, तर 'बुद्धी' देखील बाळगून होता. 'शक्ती-बुद्धी'चा उत्तम मेळ म्हणजे 'शक्तीसेन नाईक!'

तरी आतील गोष्टी ऐण्यास तो सज्ज होता. त्याच्याकडे नामी युक्ती होती. त्याने त्याच्या मोबाईलमध्ये एक एप डाऊनलोड करून घेतले. ते इन्स्टॉल होताच, त्याने आपले इयरबड्स कानात लटकवले.

प्रथम त्याने की-होल मधून आत पाहिले. ओसवाल दरवाजाला पाठ करून बसला होता. दरवाज्याकडे फेसिंग करून कोणी बसले होते. त्या श्रीमंत खोलीत दोघेच असल्याने हा इकडे तोंड केलेलाच हॉटेल मालक असावा.

a

एप चालू करून त्याने सुईटच्या दरवाजाच्या खालील फटीतून त्याचा स्लिम मोबाईल माईकच्या बाजूने आत सरकवला.

त्या 'सराऊंडिंग हियरिंग' एपमुळे आता आतील हरएक बारीक गोष्ट देखील त्याच्या कानात ऐकू येत होती. अशाप्रकारे त्याने त्याचा मोबाईल फोनच 'हियरिंग डिव्हाईस' म्हणून वापरात आणला होता...

सर्व सुविधांनी युक्त अशा संपन्न भव्य दालनात -

"काम झालं बॉस! आपण सांगितलेली सर्व अरेंजमेंट झाली आहे!" ओसवाल बोलत होता.

आणि हे खोली बाहेर शक्ती ऐकत होता. फक्त तो इथं पोहोचण्यापूर्वी व त्याने केलेल्या या जुळवाजुळवी आधी त्यांच्यात काय बोलणे झाले हे मात्र त्यास समजले नाही. परंतु त्यांच्या संभाषणावरून हेच दिसून आले होते, की त्यांच्या विशेष महत्वाचे असे काही बोलणे याआधी झाले नसावे... त्यामुळे शक्तीसेन चिंतामुक्त होता...

"गुड फॉर यु!" त्या मालकाने कठोर रिमार्क दिला.

ओसवाल चपापला. त्याला काय बोलावं समजलं नाही...

"बाकी त्या नाईकला यात अडकवण्याचा प्लॅन भारी होता नाही...?! म्हणजे आता त्याच्या नावे शेकवून आपल्याला हवे ते करण्यास आपण फ्री आहोत..." ओसवाल आत्मपौढीने बोलला.

त्याला कदाचित आपल्या बॉस कडून त्या कामगिरीसाठी शाबासकी हवी होती, मात्र त्याला ती देण्यात हॉटेल मालकाला काही स्वारस्य नव्हतं.

"सो, यू थिंक दॅट वॉज युअर प्लॅन?" श्रीमंतीचे दुसरा पर्याय म्हणून दाखवता येईल अशा या हॉटेलच्या एकुलत्या मालकाने भुवई उडवत त्याला प्रश्न केला,

"तुला काय वाटतं, तू डील करणार होतास ही बातमी शक्ती नाईकच्या खबरीपर्यंत कशी पोहोचली? विसरू नको, शक्तीसेनचं नांव घेण्यास माझ्या वकिलाने तुला इफॉर्म केलं होतं. यात तुझं काम फक्त मेडीएटिव्ह होतं!" तो घोगऱ्या आवाज बोलत होता,

"त्यामुळे तू ब्रॅग करावंस असं तू काही केलं नाहीयेस!" हॉटेल मालकाने जिग्नेश भाईला ठणकावलं.

बाहेर ऐकणारा शक्तीसेन चमकला! त्याचे डोळे विस्फारले... काहीतरी त्याला स्ट्राईक झालं होतं...

"सॉरी बॉस!" ओसवाल चरकला.

"जे सांगितलेलं ते झालं ना?" मालकाने कठोर विचारलं.

"ह... हो..." ओसवाल चरकला.

"मग निघा! आणि वाच्यता कुठं होता कामा नये!" हॉटेलचा मालक आणि जिग्नेशचा बॉस त्याला ताकीद देत होता.

"हो.. होय बॉस!" जिग्नेश ओसवाल उठला,

"थॅंक्यु!" तो कमरेत वाकून बोलला.

हॉटेल मालक त्याच्याकडे पाहत देखील नव्हता. त्याने फक्त हात उंचावून त्याला जाण्याची आज्ञा केली. ते जवळजवळ ह्युमिलिएशनच होतं. मात्र ओसवाल ते सहन करून दरवाज्याकडे वळला.

तो वळण्यापूर्वीच शक्तीसेनने फटी खालून मोबाईल ओढून घेतला होता आणि तो त्या सुईटच्या दारापासून चपळाईने दूर जाऊन दुसऱ्याच एका दाराशी उभा झाला. त्याने आपले हुड डोक्यावर टाकून घेतले होते. त्याचा चेहरा लपला होता. आणि तो दरवाजा उघडण्याच्या स्थितीत उभा होता, जणू पाहणाऱ्याला वाटावे तो दरवाजा उघडून आत जात आहे...

हॉटेल मालकाच्या सुईट्‌ मधून बाहेर येऊन जिग्नेश चालता झाला. तिथं कोणी आहे, याकडे त्याने लक्ष देखील दिलं नाही. त्याला गरजच काय होती? या हॉटेलची आणि या फ्लोअरची मिल्कीयत थोडीच याच्याकडे होती...

जिग्नेश ओसवालची लिफ्ट खाली गेल्याची खात्री होताच तिकडे तिखट कान लावलेला शक्ती हॉटेल मालकाच्या सूईटकडे वळला.

त्याने दरवाजा नॉक केला. त्या शांत मजल्यावर तो किंचित आवाज दिकून मोठाला भासला. टकटक आवाज फ्लोअरभर घुमला होता.

आतील हॉटेल मालक खिडकीतून बाहेर पाहत उभा होता. त्याचे दोन्ही हात मागे बांधले गेले होते. त्याची मान किंचितही मागे वळली नाही.

"कम इन! दरवाजा उघडा आहे!" तो आवाजात जोर आणून ओरडला.

शक्तीसेनला काही उजल्यासारखं झालं. तो संथपणे नॉब् फिरून आत जाता झाला, तेही संथच...

"वेलकम! वेलकम! आय वॉज एक्सपेक्टिंग यु... मिस्टर शक्तीसेन नाईक!" तो कठोर आवाजात बोलला!

आणि शक्तीसेनने चमकून वर त्याच्याकडे पाहिलं.

"हे हॉटेल माझं आहे. नाईक साहेब! तुम्हाला वाटतं, इथं काय घडतंय ते मला माहित नसेल?" मालकाने प्रश्न केला.

प्रश्नाहून ती माहिती अधिक होती शक्तीसाठी!

*'याचा अर्थ मी इथं आलोय हे पहिल्यापासून याला माहीत होतं... आणि त्या ओसवालला सुद्धा! तरीच त्यानं बाहेर माझ्याकडं बघितलं सुद्धा नाही... दिज गाईज आर हायली डेंजरस...'* शक्ती मनात स्वतःशीच बोलत होता... इथून

a

बाहेर पडून एक काम करायचं त्यानं पक्कं केलं होतं, पण तत्पूर्वी त्याला इथला बिझनेस संपवायचा होता...

"हे सगळं का? आणि ते युरेनियम कुठं आहे?" शक्ती अंदाज घेत सावध बोलत होता.

हॉटेल मालक वळला आणि ओल्या पूर्ववत जागेवर स्थिरावला. एक कुटील हसू त्याच्या ओठांवर होतं.

"ते मलाही माहीत नाही!" तो शक्तीकडे बघतच शांत बोलला.

"हे सगळं कशासाठी चालू आहे? याचं उत्तर अजून दिलं नाहीस!" शक्ती कठोर होता.

"ते मलाही माहीत नाही!" त्याचं पुन्हा तेच रिपीटेटीव्ह उत्तर.

शक्तीला हे उत्तर पटलं की नाही माहीत नाही, पण आवडलं नक्कीच नाही. त्याने त्याची पिस्टल बाहेर काढली. ती कॉक केली.

"याचा काही फायदा होणार नाही मिस्टर नाईक! या खेळात अनेक प्यादी आहेत... आणि त्यांतलाच मी पण एक आहे." तो हॉटेल मालक बोलला, "त्याही उपर, तू हे विसरू नको, की तुझ्या बॉसने तुला बाय बुक्स जायला सांगितले आहे! तू कायदा हाती घेऊ शकत नाहीस!" तो कुटील हसला.

शक्ती हादरलाच! याला हे कसं माहीत... त्याच्या डोक्यात जोरजोरात आघात होऊ लागले. म्हणजे एसपी...??? शक्तीचा त्याच्या बाबतचा अंदाज खरा होता का...??? तो या लोकांशी मिळाला होता का...???

शक्ती विचारात असतानाच बाहेरून काही लोकांनी येऊन शक्तीला घेतले. त्यांच्या गन्स त्यांच्या हाती दृश्यमान होत्या. आणि ते तिन्ही बाजूंनी आपला नेम शक्तीवर साधून उभे होते. आणि त्याच्या समोर उभा होता तो हॉटेल मालक आपल्या अधरावर विजयाचे कुटील स्मित घेऊन...

त्याला वाटले आपण शक्तीला हरवले आहे. पण हरेल तो शक्ती कसला?! शक्ती विद्युतगतीने हरकतीत आला आणि त्याने त्याला घेतलेल्या तिन्ही लोकांना निरस्त करून जमीन दाखवली. हॉटेल ओनरचे स्मित क्षणात मावळले. तोच पुन्हा त्याच्या ओठांवर स्मित खिळले कारण आणखी काही लोकांनी त्याच्या सुईट बाहेर आपल्या शस्त्रांसह हजेरी लावली होती.

"देखो, साहब को मारना मत! अभी ये हमारे और भी बहुत काम आनेवाले है। हा... हड्डीवड्डी तोड़ सकते हो, उसके लिए परहेज़ नहीं!" हॉटेल मालक हसून कुत्सित बोलला.

त्यांतील एका करवी जो त्या टीमचा लीडर होता, शक्तीला त्या सुईट मधून ओढत बाहेर नेण्यात आले. शक्तीची नजर त्यावेळी हॉटेल मालकावर तीक्ष्ण रोखलेली होती, तर त्या मालकाच्या डोळ्यांत शक्तीबद्दल शूद्र भावना स्पष्ट झळकत होती.

खाली लिफ्ट उघडताच, शक्तीला हॉटेल रेसिडेंट्स मधून असं बाहेर नेण्यात आले, की ज्याने कोणाला कसला संशय येऊ नये! मर्सिनरीजचा टीम लीडर शक्तीच्या मागे शक्तीला सटून चालला होता. त्याने आपली पिस्टल शक्तीच्या मणक्यावर दाबून धरली होती. त्यांच्यात अंतरच नसल्याने ती

कोणाला दिसणे तसे शक्य नव्हते. शक्ती देखील शांत राहिला. त्याला इथून बाहेर पडणे अधिक महत्त्वाचे होते. त्यामुळे त्यानेही काही गोंधळ केला नाही.

रात्रीची वेळ होती. रस्ता तसा सुमसान होता. हॉटेल पासून थोडं दूर येऊन मर्सिनरीजच्या लीडर कडून शक्तीला ढकलण्यात आलं. शक्ती चार पावलं जाऊन थबकला, तोच त्याला सर्व मर्सिनरीजनी घेरलं. ते चांगलेच हाथसुख घेण्याच्या इराद्यात होते हे त्यांच्या खुललेल्या चेहऱ्यावरून कोणालाही कळून चुकले असते. त्यांना वाटलं असावं, 'शक्तीसेन इज ए सॉफ्ट नट टु क्रॅक...' पण हा त्यांचा शर्करासम गोड गैरसमज होता. त्यांना हे माहीत नव्हतं, की 'शक्तीसेन इज इंडीड ए मोस्ट हार्डन्ड् नट टू क्रॅक!' आणि कदाचित यांच्या आकांना देखील हे माहीत नसावं म्हणून ब्लिच बकरा म्हणून त्यांनी शक्तीसेनची निवड केली होती.

शक्तीवर हल्ला करण्यासाठी एक बलदंड असा मर्सिनरी समोर होत होता, तो हरकतीत येतोय हे शक्तीने आधीच ताडले होते. त्याने वीजगतीने त्याच्या दिशेने येणारी त◌ी बलदंड मुष्टी रोखून त्या मर्सिनरीला गती देऊन त्याला रस्त्यावर आदळला होता.

त्यामुळे मग चिडून इतर मर्सिनरीज शक्तीवर एकदम हल्ला बोलण्यासाठी सरसावले, परंतु त्यांच्या लीडरनेह◌ात वर करून त्यांना हटकले.

"लेट हिम गो!" तो ओरडला.

सर्व मागे सरले. शक्तीने मग सावधपणे मागे मागे सरकत यांच्याकडून काही धोका नाही हे ताडून आपली वाट धरली. इथे येण्याचा त्याचा मनसुबा

a

वाया गेला होता. त्याच्या इथे काही माहिती मिळेल याची आशा होती, पण ती मिळाली नव्हती. पण काही प्रश्न मात्र नव्याने डोके वर काढून उभारले होते.

जाणाऱ्या शक्तीसेनकडे अत्यंत जळजळीत नजरेने पाहत मर्सिनरीजचा लीडर उभा होता. त्याच्या डोळ्यांत शक्ती विषयी अंगार होता...

"वाय डिड यू स्पेअर हिम बॉस?" एक मर्सिनरी तडकला.

"बिकाऊज देअर् इज नो ऑर्डर टू किल हिम ऐट, अदर् वाईज ही वुड हॅव बिन डेड बाय नाऊ!" लीडर दात ओठ खात करकरला.

a

# ७. घनगर्द...

शक्तीसेन त्याच्या खबरीला भेटण्याच्या त्यांच्या पूर्व नियोजित ठिकाणी पोहोचला होता. एक संकरी गल्ली होती ती. रात्रीची अगदीच शांत व निरव अशी ती जागा होती.

दरम्यानच्या वाटेत त्याचा पाठलाग तर होत नाही ना याची त्याने पूर्णता दक्षता घेतली होती. कोणी त्याच्या पाठी नव्हते हा त्याला दिलासा होता, पण हे असं असणं देखील त्याच्यासाठी चिंता होती. एवढ्या मोठ्या प्रकरणात त्याला अडकवलं गेलं होतं आणि त्याचा पाठलाग होत नव्हता हेच मुळी संशयाला मोठी जागा निर्माण करणारं होतं.

त्याला युरेनियमच्या प्रकरणात गोवणं हा कोणत्या मोठ्या नियोजनबद्ध योजनेचा भाग होतं का? त्याखेरीज फक्त इतकं घडवून आणल्याने कोणाला काय फायदा होता? कोणी शक्तीसेनवर सूड उगवण्यासाठी हे करत असेल म्हंटलं, तर या प्रकरणातील कोणीच शक्तीच्या पूर्व ओळखीचे नव्हते. मग काय... मग काय कारण होते, की शक्तीसेन नाईकवर हे बालंट आणले गेले होते? फक्त युरेनियमची तस्करी करताना पडकले म्हणून शक्तीलाच त्यात गुंतवण्याची ऐनवेळी सुचलेली ही कल्पना नव्हती. तर हे पूर्व नियोजनाने घडवून आणले होते हे शक्तीने आपल्या कानाने ऐकले होते... हा प्रपंच का? व कशासाठी...? शक्ती विचार करतच इथे पोहोचला होता...

"सर, हे लोक काय बोलतायत सर...?" खबरी घाबरा बोलला.

आणि त्याने त्याचा नवीन मोबाईल काढून त्यातील बातम्या शक्तीला दाखवल्या, ज्या ओरडून ओरडून सांगत होत्या, की शक्तीने युरेनियम हा घातक पदार्थ लंपास करून पोबारा केला आहे. आणि त्याच्यावर एक्स्टॉर्शन व अगदी खुनाचे आरोप देखील झाले आहेत.

"ते सगळं खोटं आहे!" शक्ती ठाम म्हणाला.

"ते माहीत आहेच सर... पण... आता...?" खबरी गडबडला.

"तू आज पासून माझ्याशी संपर्क ठेवू नको." शक्ती त्याच्या खबरीला मोबाईल परत करत खबरीला म्हणाला.

"का? अशा परिस्थितीत तुम्हाला एकटं सोडू? तुम्हाला माझी मदत होईल." खबरी काळजीने बोलला.

"तू यात खर्ची पडावास अशी माझी इच्छा नाही! हे जसे काही चाललं आहे, त्यात मी मुख्य नाही! माझ्यापेक्षा खूप मोठं काहीतरी षडयंत्र चालू आहे, फक्त त्यापासून ध्यान भरकटवण्यासाठी मला गुंतवलं गेलं आहे! पण ते जे काही आहे, त्याचा मी स्वतः शोध घेईन!" शक्ती खबरीला ठणकावत बोलला,

"तू जा!" शक्तीने खबरीला आग्रह केला.

तेव्हा खबरी मग मन मारून तिथून चालता झाला...

◆◆◆

शक्तीसेन डोक्यावर हुडी टाकून चालत होता. कोणत्या दिशेने जायचं हे त्याचं त्यानं पक्कं केलेलं होतं. त्यामुळे त्याचे पाय आपसूक त्या दिशेला पडत

होते. वाटेत एक इलेक्ट्रॉनिक्सचं दुकान लागलं. त्याला आपल्या नावाचा उद्घोष ऐकू आला म्हणून तो थबकला. दुकानाच्या डिस्प्लेसाठीच्या काचेतून त्याने आत पाहिले, तर त्याला आरोपी दाखवणारी बातमीच दाखवली जात होती. रात्र बरीच झाली होती. रस्ताही तसा सुमसान होता, म्हणून काचांनी न रुद्धला जाता आतील टिव्हींमधून निघणारा ध्वनी किंचितसा बाहेर ऐकू येत होता. सुशील मोठ्या जबाबदारीने शक्तीसेन नाईक हा आरोपी असल्याचं प्रेस समोर सांगत होता.

शक्तीला ते असह्य झालं. इथं चूक कुणी असलाच, किंवा दुकान मालकाचंच चुकून लक्ष गेलं, तर आपल्याला इथंच या लोकांच्या आरोप करणाऱ्या व दोषी ठरवणाऱ्या तीक्ष्ण नजारांना व कदाचित देशद्रोही वगैरे डाचणी देणाऱ्या असह्य शब्दबाणांना छाती करावी लागेल हे त्याला नको होतं. आणि म्हणून त्याने हुडी अजूनच समोर ओढून घेतली, ज्याने त्याचा झाकलेला चेहरा आणखी झाकला जावा. आणि मग त्याचे थबकलेले पाय पुन्हा गतिमान झाले, त्याच्या गंतव्याकडे नेण्यासाठी...

◆◆◆

शक्ती कुठे गेला असेल याची चिंता जिज्ञासाला सतावत होती. त्याचा फोन देखील लागत नव्हता. तिने पोलीस हॅडकोर्टरसला फ्रान्सिसशी संपर्क केला होता. तिथून देखील तिला काही माहिती गवसली नव्हती. जिज्ञासाला दरम्यान शक्ती बाबत काय घडलं आहे, ते तिला ठाऊकच असेल असं गृहीत धरून तिकडून तिला याबद्दल वाच्यता कसली केली गेली नव्हती. ते बोलून तिच्या

व्याकुळ अगतिकतेची व काळजीची खपली काढण्याचा पलीकडून बोलणाऱ्या सिनियर पोलीस ऑफिसर फ्रान्सिस याचा हेतू नव्हता. शक्ती इकडे नाही इतकेच मोजके उत्तर तिला देण्यात आले होते व ती अधिक काही विचारू नये नाही, तर आपल्याला बोलण्याची पंचाईत होईल हे ताडून गडबडीच्या कामाचा बहाणा करून तिकडून फ्रान्सिस करवी फोन ठेवण्यात आला होता. पुण्याहून आल्यापासून जिज्ञासा शक्तीचा शोध घेत होती. परंतु हशील काहीच नव्हतं. चिंतेने व्याकुळ झाली होती ती...

शक्तीशी या एक-दोन दिवसांचा विरह देखील तिला सहन झाला नव्हता. आणि म्हणून किती उत्साहाने ती परत आली होती, की शक्तील पाहता यावा, पुन्हा त्याच्याशी बोलत येईल आणि ती आली तर हा शक्ती गायब झालेला... काही मेसेज देखील ठेवला नव्हता याने... असा तिचा विचार, पण ती शक्ती नाही म्हंटल्यावर व्याकुळच इतकी झाली होती, की तिला शक्तीने तिच्यासाठी बेडरूम मध्ये ठेवली चिठ्ठी तिच्या नजरेसच पडली नव्हती.

शक्ती कुठे गेला असेल, काय करत असेल याचा विचार करत असतानाच, इतक्यात तिने बंद केलेल्या दारावर नॉक झाले. शक्ती असेल या अपेक्षेने प्रफुल्लित होऊन तिने दरवाजा उघडला खरा, पण तुरंतच तिचा भ्रम निरास झाला.

दारात सुशील उभा होता. आणि त्याची ती एनआयएची टीम! सर्व तयारी निशी आले होते. त्याच्या सोबत एसपी होते. यांच्यात जिज्ञासा फक्त एसपीला ओळखत असल्याने तिची आपसूक प्रश्नवाचक नजर त्याच्याकडे गेली. त्याने तिला आशवस्तपर नजरेनेच खून केली. ती विचलित झाली होती,

त्यामुळे एसपीच्या इशाऱ्यावर तूर्तास शांत बसण्याची तिची तयारी खास दिसत नव्हती. ती लगोलग एसपीकडे गेली. शक्तीबद्दल त्याला विचारू लागली. हा काय प्रकार आहे हेही तिला जाणून घ्यायचं होतं.

"हे काय चालू आहे सर? एनआयए इथं काय करतीए?" तिचा एसपीला विचलित प्रश्न.

सुशील सोबत आलेल्या सर्वांच्या पेहरावावर छातीवर व मागे पाठीवर एन. आय. ए. अशी इंग्लिश अद्याक्षरे अंकित होती ती जिज्ञासाच्या नजरेतून न सुटणे स्वाभाविक होते.

"सांगतो, सध्या गप्प बस." एसपी तिला समजावण्याचा हेतुस्तव बोलला.

"शक्ती कुठे आहे सर?" तिने गप्प बसण्याचे साध्य केलं नव्हतं अजूनही.

"आणि... या...?" सुशील उद्धट अविर्भावात जिज्ञासा बद्दल चौकशी करत एसपीला विचारता झाला.

"जिज्ञासा!" एसपी म्हणाला.

"सिलिब्रिटी आहेत?" सुशीलचा खोचक प्रश्न.

"अं?" एसपीचा गोंधळ.

"नाही आगापिछा काही सांगितलं नाहीत!" सुशील पुन्हा खोचक बोलला.

मग सुशीलच्या आशा तिरकस वागण्या बोलण्याने तडकलेली जिज्ञासा खुद्दच बोलती झाली.

a

"जिज्ञासा परशुराम! शक्ती... सिनियर इन्स्पेक्टर शक्तीसेन नाईक यांची प्रियसी. आम्ही लिव्ह इन राहतो इथे!" तिने सांगितले.

"ओह आयसी... म्हणजे शक्तीसेन यांच्या अर्धभार्या तुम्हीच तर..." सुशील कुत्सित बोलला.

"तोंड आवरा! काय बोलताय...? लिव्ह इन इज लीगल इन आवर् कन्ट्री! तुम्ही असं उच्चारताय जणू मी रख..."

"जिज्ञासा! शांत हो! त्यांना त्यांचं काम करू दे!" एसपी तिला अडवत मधेच बोलला. तो अत्यंत गंभीर व नाराज असा दिसत होता. की हा त्याचा लटका आविर्भाव होता...?

"तुम्ही फ्रान्सिसला संपर्क केलात, त्यामुळे तुम्ही आल्याचं समजलं. म्हंटलं लगेच जाऊन भेट घेऊ! शाल वी प्रोसिड?" सुशील कुचकट बोलला.

"तुम्हाला काय हवंय? आणि आधीच सांगून ठेवते, तोंड आवरून बोला, नाही तर मी तुमच्यावर डिफेमेशनची केस करायला मागेपुढे पाहणार नाही. सिव्हीलीयन्सना ट्रीट करण्याची ही पद्धत नाही!" जिज्ञासा संताप व्यक्त करत होती.

"वाह! कायद्याचं चांगलंच ज्ञान दिलं आहे की तुमच्या शक्तीसेन यांनी तुम्हाला! पण मग ते स्वतः कायदे का पाळत नाहीत?" सुशील पुन्हा कुचकट बोलला.

"व्हाट इज ही टॉकींग आबाऊट?" जिज्ञासाने त्या उर्मट सुशीलकडे पूर्णतः दुर्लक्ष करून एसीला थेट जाब विचारला.

"जवळपास अर्धा किलो युरेनियम शहरात आहे, आणि ते गायब झालं आहे. संशय..."

"आरोप!" सुशील कठोरपणे ठणकावत मधेच म्हणाला.

"आरोप..." एसपी स्वतःला सुधारल्यासारखं बोलला व त्याने वाक्य पूर्ण केलं,

"...की ते शक्तीने कुठे तरी लपवून ठेवले आहे. आणि आता दुर्दैव हे, की तोही गायब झाला आहे... त्यामुळे संशय अजून बळावतोय!" एसपी खिन्न बोलला.

"काय?" जिज्ञासा किंचाळलीच!

"हो मॅडम! तुम्ही बातम्या बघत नाही वाटतं?! आत्ता या घडीला संपूर्ण शहर हे एका भयंकर एटॉमीक बॉम्बवर वसलेलं आहे असं समजा आणि ते कोणत्याही क्षणी ब्लास्ट होऊ शकतं. तुमच्या प्रियकराच्या कृपेने!" सुशील कटू कुचकट बोलला.

आणि जिज्ञासाच्या परवानगीची वाट न पाहता त्याने मग आपल्या लोकांना फ्लॅट सर्च करण्याचा इशारा दिला. आणि त्याची टीम क्षणात सर्व घरभर पसरली. जिज्ञासा मात्र धक्क्यात तशीच स्तब्ध उभी राहिली होती. तिच्यासाठी सगळं जग जणू थांबलं होतं... सुन्न झालं होतं...

सुशील त्या फ्लॅटवर नजर फिरवत होता. एसपी खाली मान घालून उभा होता.

असा बराचवेळ निघून गेला. एमआयए कडून घराची उलथापालथ चालली होती. आणि मग एक आवाज घरभर घुमला. सुशीलला ती हाक होती. त्या हाकेने तिथल्या सजीवांतील शांतता भंगली होती.

*"सर!"* एनआयएच्या एक लेडी ऑफिसरचा आवाज आला.

सर्वांचीच नजर भानावर येऊन त्या आवाजाकडे वळली होती. ती सोफ्याच्या बसण्याच्या व टेकण्याच्या दरम्यान जी दरास असते, त्यात हात घालून असलेली सर्वांना दिसली. तिच्या हाती काही लागले होते, हे ती हात बाहेर खेचत असल्याच्या तिच्या कृतीवरून सगळयांच्या ध्यानी आले. ते जाग्यावरून तिकडे जाण्यास हलणार, तोच हाक मारलेली एनआयए ऑफिसर एक छोटी झिप करी बॅग बाहेर घेऊन आली. तिने हाताला प्रोटेक्टिव्ह ग्लव्ज् घातले होते. जेणेकरून काही अनुचित सापडलेच, तर त्याच्याशी थेट संपर्क येऊ नये. आणि ही दक्षता इतर ऑफिसर्सनी देखील घेतली होती. तेही तिच्या भोवती गोळा झाले, जेव्हा ती सुशील पक्षी येऊन थांबली. तिच्या हाती ती झिप पॉलिबॅग दृश्य होती आणि त्यात, तो सबस्टन्स... तो एलिमेंट... संदिग्ध असा...

"रॉ युरेनियम...?" ती लेडी एनआयए ऑफिसर शंका व्यक्त करत बोलली.

"दिसतंय तर तसंच. टेस्ट केल्यावर कन्फर्म होईलच की! पण मला तर काही शंका नाही बुवा!" जिज्ञासाकडे डिवचणारी नजर टाकत सुशील म्हणाला.

"गो टू हेल!" जिज्ञासा ओरडली,

"मला शक्तीवर पूर्ण विश्वास आहे, की तो हे असं काही करूच शकत नाही!" जिज्ञासा ओरडूनच पुढे म्हणाली होती.

"खोटं बोलणाराच ते ओरडून बोलत असतो मिस!" सुशील कठोर झाला.

"गेट आऊट फ्रॉम माय हाऊस!" जिज्ञासा संतापून ओरडली.

"जायचं तर तुम्ही मिस! कारण फर्दर् इन्वेस्टीगेशनसाठी आम्हाला तुमचा फ्लॅट सील करावा लागणार आहे! पण जिथे स्थायिक व्हाल, तिथला पत्ता कळवा कारण तुम्हाला पण आता वारंवार भेटत रहावं लागणार आहे,' सुशील अधिकच कठोर झाला.

"हितगुज करायला!" आणि अचानक सुशीलच्या ओठांवर खिजवणारं स्मित तरळलं. कठोरतेने सुरू झालेलं आपलं पूर्व वाक्य त्याने असा अविर्भावात दर्शवत पूर्ण केलं होतं.

तशी ती बाहेर पडली. कुठे जाणार? कशी जाणार? काय करणार? कसलाच विचार न करता ती तडकाफडकी बाहेर पडली.

"विसरू नका, तुमची चौकशी अजून झाली नाही!" तो डिवचत ओरडला होता.

जिज्ञासा रागाने तणतणत जाताच एसपी तिच्या पाठी धावला होता... सुशीलवर मात्र काहीच परिणाम झाला नाही. तो तसाच उभा होता बथ्थड...!

●●●

"कुठे जाणार आहेस?" खाली आल्यावर एसपी जिज्ञासाला विचारत होता.

a

"हॉस्पिटलच्या हॉस्टेलवर जाईन." जिज्ञासा बोलली. काही येईस्तो तिला डोक्यात वाट मोकळी झाली असावी.

"चल सोडतो." एसपी तिला म्हणाला.

पहिला नाही म्हणण्याचाच विचार तिच्या मनात आला, परंतु एक निमिषात तिने विचार बदलून एसपीला "थँक्स!" म्हंटलं.

"चल!" एसपी तिला म्हणाला. आणि पुढे होऊन त्याने आपल्या गाडीचा दरवाजा जिज्ञासासाठी उघडला.

"थॅंक्यु!" असं पुन्हा एकदा म्हणून जिज्ञासा गाडीत मागे बसली, तर एसपी ड्राइव्हिंग करणाऱ्या कॉन्स्टेबल शेजारी स्थिरावला.

मग आज्ञेशिवाय आपलं कार्य जाणून त्या कॉन्स्टेबलने गाडी वळवून घरी तेथून बाहेर काढली.

शक्तीसेन आणि जिज्ञासाच्या घरी पोलीस आले आहेत हे एव्हाना सोसायटी भर झालं होतं त्यामुळे काही चौकस माना बाहेर डोकाबत होत्या. पण शक्तीसेन स्वतः पोलीस असल्याने आणि हे प्रकरणच पोलिसांचे असल्याने कुणी हस्तक्षेप केला नव्हता. कोणी जिज्ञासाला या घटना कळण्याची तसदी देखील घेतली नव्हती, कारण या प्रकरणात पडायची मुळीच इच्छा नव्हती कोणाची. म्हणून जिज्ञासा आल्यापासून अनभिज्ञ राहिली होती. तिला कोल्हापूरला येऊन तसा फार काळ लोटला नव्हता, पण कागाळी करण्याला काय दोन क्षण देखील पुरतात म्हणा... पण शक्तीच्या आरोपी असण्याची कागाळी करण्याची गरज कोणाला वाटली नव्हती. शक्ती ना म्हणायला जवळजवळ अतिरेकी ठरला होता, अशा भयंकर गोष्टीत पद कशाला म्हणून

सर्वच जण दुरी राखून होते. आणि आता त्या प्रत्येकाचा सुटकेचा निश्वास सुटला होता, जिज्ञासाला देखील इथून जाताना पाहून. आणि नेणारा खुद्द जिल्ह्याचा एसपी होता. गाडी गेट बाहेर गेली तसे बाहेर आलेल्या माना कासवांनी आत घ्याव्यात तशा खिडक्यांच्या आत गेल्या. त्या त्रासिक चेहऱ्यांत एक त्रासिक चेहरा मात्र अधिक वैतागी जाळं आभेवर घेऊन होता, तो म्हणजे त्या सोसायटीचा सेक्रेटरी. चौकशीचं नसतं लचांड आपल्या मागं लागू नये याची त्याला तीव्र चिंता. त्याच्या पत्नीची पण काही और अवस्था नव्हती...

●●●

"सर्च दि होल हाऊस प्रिसाईस्ली! तो सोफा अजून तपासा!" सुशील आपल्या सहकाऱ्यांना सूचना देत ओरडला.

आणि सगळे कामाला पुनः लागले. कालावकाशाने आतून बेडरूमच्या दिशेने एक ऑफिसर आली. तिच्या हाती ते लेटर होतं... घर सोडून जाण्यापूर्वी शक्तीने जिज्ञासासाठी मागे सोडलेलं... ते तिने इतबारे सुशील समक्ष धरलं. सुशीलने ते हाती घेऊन त्यावर नजर टाकली. एव्ही सुशीलने असं कुणी कुणाला उद्देशून दिलेलं खाजगी पत्र सुशीलने मुर्दाडा सारखे वाचले नसते, पण हे आत्ता एक पीस ऑफ एव्हीडेन्स होते. त्यामुळे त्याने हा उद्दाम प्रमाद केला होता. त्यातील मजकूर त्यांच्या मेंदूत अंकित होताच, त्याने ते पत्र काळजीपूर्वक वाचलं आणि त्याचा मोहरा गंभीर झाला...

# ८. संभ्रम...

जिज्ञासा व्यथित बसून होती. कॉन्स्टेबलच्या शेजारी बसलेल्या एसपीने रिअर व्ह्यू मिरर मधून तिच्याकडे दृष्टीक्षेप केला. ती खिडकीतून बाहेर पाहत कसलासा विचार करत होती. ती जरूर शक्तीचाच विचार करत असेल हे एसपीला ओळखणे कठीण नव्हते. त्याची अपराधी नजर मग खाली गेली.

एका क्षणाला जिज्ञासाचा बांध फुटला.

"हे सगळं काय चालू आहे सर?" तिने विचलित विचारले.

इतका वेळ ती तिच्यासमोर आलेल्या या अनपेक्षित पण उध्वस्त करणाऱ्या या विलक्षण अविश्वसनीय अशा प्रकरणाची गोळाबेरीज तिचं मन करू पाहत होतं, पण काहीच एकूण हाती लागत नसल्याने अखेर तिने सत्य जाणून घेण्याहेतु प्रश्न केला होता.

"विश्वास ठेव माझ्यावर, मलाही माहीत नाही!" एसपी खिन्न बोलला.

"पण शक्ती असे काही करण्याची शक्यताच नाही!" ती ओरडली.

"ते मलाही मान्य आहे, पण चौकशीत आपण बाधा कशी आणणार? हे लोक थेट केंद्रातून ऑपरेट होतात. मी त्यात हस्तक्षेप नाही करू शकत... उलट मलाच त्यांना सहकार्य करावं लागणार आहे..."

"याची सुरुवात कशी झाली? म्हणजे मी दोन दिवस काय नव्हते, सगळं विस्कळीत होऊन गेलं आहे... आणि शक्तीचा काही पत्ता नाही! व्हॉट इज ऑल धिस?" ती रडकुंडीला आली.

"तुला शक्ती डिनरला घेऊन गेला होता, तेव्हा तिथं शक्तीने युरेनियम तस्करांवर कारवाई केली होती. त्यांतील एकाने शक्तीवर आरोप केला आहे." एसपी मायूस आवाजात बोलला.

"म्हणजे या सगळ्याची सुरवात हॉटेल सनशाईन पासून झाली आहे...?" ती शंकीत उच्चारली.

एसपीची मान होकारार्थी हलली. पण तोही जाणून होता, ती एग्झेक्युशनची सुरवात होती, प्लॅनिंग याही पेक्षा पूर्वी झाले होते. पण ते किती पूर्वी हे मात्र त्याला माहित नव्हतं हे शपथेनिशी... एसपी देखील तर एक मोहराच होता. त्यामुळे त्याला तेवढंच माहीत होतं, जेवढं त्याचं काम पार पाडण्यासाठी त्याला जाणणं आवश्यक होतं...

एकतर यांना देखील काही माहीत नाही, अगर ते सांगू इच्छित नाहीत असे जाणून मग जिज्ञासाने आपली जिज्ञासा दडवली व ती गप्प बसली.

काहीवेळात मग, जिज्ञासा काम करत असलेल्या हॉस्पिटलच्या हॉस्टेलला एसपीची गाडी येऊन थांबली. एसपीला व गाडी हाकणाऱ्या कॉन्स्टेबलला धन्यवाद देऊन ती खाली उतरली. ती आत जाईपर्यंत एसपीची गाडी तिथंच थांबली. अपार्टमेंटच्या प्रवेशाला अदृश्य होण्याआधी जिज्ञासाने मागे वळून एसपीला बाय केलं आणि ती दिसेनाशी झाली. ती सुखरूप गेल्यावर एसपीने गाडी त्याच्या निवासस्थानी घेण्यास कॉन्स्टेबलला सूचना केली आणि गाडी वळून मार्गस्थ झाली.

•••

एसपीने आत येऊन दिवा लावला, तर शक्ती टीव्ही समोर बसलेला त्याला आढळला.

a

"तू आत... म्हणजे इथं कसा...?" एसपीला धक्का बसला होता, शक्तीला तिथं पाहून.

शक्ती उठला. संथपणे एसपीच्या दिशेने वळला.

"विसरू नका सर, संपूर्ण पुलीस डिपार्टमेंट माझ्या पाठीशी आहे. तुम्ही नसलात तरी!" शक्ती कठोर बोलला.

"तू... आरोप करतोयस...? पण मी तुझ्यावर रागावणार नाही. परिस्थिती अशा आहेत, की हे स्वाभाविक आहे. सध्या तुला मी सल्ला देईन, इथून बाहेर पड. नाहीतर एनआयएचे अधिकारी बसलेत टपून तुला आत घ्यायला."

"मी पळून जावा म्हणजे मला कल्प्रिट ठरवून लोकांचं लक्ष माझ्याकडे डायव्हर्ट करून त्या आडून तुम्हाला हवं ते करायला मोकळे नाही का? हाच प्लॅन आहे ना? म्हणूनच मला चौकशीला सामोरं जाऊ दिलं नाहीत तुम्ही?!" शक्ती सत्य वदत होता.

"बोला, काय चालू आहे? कोणती मोठी कन्स्पिरसी जन्माला घातण्याचा कट आहे? आणि या सगळ्याचा सूत्रधार आहे? आणि मीच का? मलाच का टार्गेट केलं गेलं डिकॉय म्हणून...? बोला सर?" शक्तीच सवाल करत होता.

"मला काही माहीत नाही." एसपी थोडा रागाने ओरडला. पण त्याचा आवाज तरीही संयत होता. बाहेर न जावा असा.

"तरी तुम्ही त्या लोकांना मदत करताय?" शक्ती अविश्वासाने म्हणाला.

मला फक्त विचारलं गेलं होतं, की कोल्हापूर डिपार्टमेंटमध्ये सर्वांत प्रामाणिक कोण आहे? मी तुझं नांव घेतलं होतं..." एसपी मवाळ झाला. त्याच्या आवाजात खिन्न मृदुता आली.

a

"म्हणजे ही सुरवात अशी झाली तर... आणि विचारणारे कोण होते...?" शक्तीने भुवया आकसत पृच्छा केली.

"होम मिनिस्ट्री!" एसपीचा हा उच्चार एका स्फोटासारखा झाला.

"काय? म्हणजे... या मागे होम मिनिस्ट्री वर्क करत आहे?" शक्ती जबर धक्कावला.

"पण का?" तो ओरडला.

"मी ठामपणे नाही सांगू शकत, की होम मिनिस्ट्रीकडूनच हे कारस्थान चालू आहे... पण त्या प्रश्नानंतरच हे सगळं घडत आहे. दोन्ही घटना पूर्ण वेगळ्या सुद्धा असू शकतात. मी फक्त मला वाटलेली शंका व्यक्त केली." एसपी चिंतीत स्वरात बोलला.

"तुम्ही खोटं बोलताय असं मी का धरू नये? ही आणखी कोणती चाल नसेल तुमची कशावरून सर? कारण हॉटेल सनशाईनच्या मालकाने मला यात गोवलं आहे हे त्याच्याच तोंडून मी ऐकलं आहे. आणि मी त्याला जाब विचारताना तो मला काय म्हणाला माहीत आहे? तो म्हणाला, एसपीने तुला बाय बुक्स जायला सांगितले आहे हे विसरू नको! आपलं खाजगीतलं बोलणं शब्दानिशी त्याला कसं कळलं सर? सांगू शकाल?" शक्ती जाब विचारत होता.

"हे बघ आता मी तुझ्यापासून काही लपवणार नाही. मला मान्य आहे, मी त्याला भेटलो. मला मान्य आहे, की तो या प्रकरणात गुंतला आहे, पण तो मुख्य सूत्रधार नाही. हे मी खात्रीने सांगू शकतो!" एसपी ठोक बोलला.

"कोणत्या खात्रीने?" शक्तीने पुन्हा जाब विचारला.

a

"माझं इन्स्टिन्क्ट आहे असं समज. पण मला ठामपणे असं वाटतंय, की यामागे कोणती तरी मोठी शक्ती आहे जी काम करत आहे!" एसपी समजावत बोलला.

"मग कोण आहे?" शक्तीचा कठोर प्रश्न.

"कोणालाच माहीत नाही! म्हणून होम मिनिस्ट्री बद्दल पण मी माझा तर्क बोलून दाखवला, ते सत्य असेलच असे काही नाही." एसपी अजूनही समजवण्याच्या सुरात बोलत होता.

"म्हणजे मोठ्या प्रमाणात युरेनियम शहरात आहे हे तुम्हाला आधीच माहीत होतं, पण मी ते तुमच्या समोर घेऊन आलो, त्यावेळी तुम्ही नाटक केलंत, की जसं तुम्हाला धक्का बसला आहे..." शक्ती चिडला.

"विश्वास ठेव. मला माहित नव्हतं. तू प्रथम माझ्यासमोर ते मटेरीयल घेऊन आलास तेव्हा प्रथमच मी ते बघितलं. आणि खरंच मी हादरलो होतो. जे घडू पाहतंय, किंवा जे कोणी काही घडवू पाहतंय ते भयंकर असणार आहे याचा मला त्यावरून अंदाज आला. आणि म्हणून मी तुला फ्री केलं. पळून जाण्यास आणि या प्रकरणाचा शोध घेण्यास सांगितलं. तूच चौकशीत अडकला असतास, तर हे प्रकरण नक्की काय आहे हे कोण शोधून काढणार होतं? माझ्या अंदाजाने जर खुद्द होम मिनिस्ट्री यात सामील असेल, तर सिस्टीममधून राहून ते शक्य नाही. म्हणून तू मुक्त असणं गरजेचं होतं, फक्त ते जस्टीफाय व्हावं आणि तुझ्यावर कोणता हल्ला होऊ नये म्हणून मी सनशाईनचा मालक सत्यजित जैसवालला तसं सांगितलं, की तू फरार असलास, तरच ते त्यांच्या फायद्याचं आहे." एसपी त्याची बाजू खुलासा करत होता.

"मी याच्यावर विश्वास ठेवू?" शक्तीने अविश्वासाने विचारलं.

"हेच खरं आहे. बाकी विश्वास ठेवायचा, की नाही हे तुझ्यावर आहे!" एसपी नाराज बोलला.

"मग तुम्ही मला आधी कल्पना का नाही दिली?"

"मलाच काही माहीत नाही, तर तुला कशाची कल्पना देऊ? आणि जेवढं माहीत आहे तेवढं जरी सांगायचं झालं, तरी कोण आपलं आणि कोण परकं हा भेदच जिथं करता येत नाहीये तिथं ही गोष्ट कोणाला कळली असती, की मी त्या लोकांच्या बाजूने नाहीये, तर मलाच इथून हटवला असता. आणि मग गोष्टी अजून कॉम्प्लिकेटेड झाल्या असत्या. इथं माझ्या जागी जो आला असता, त्याने या लोकांना साथ द्यायला जराही कमी केली नसती, म्हणून मी ठरवलं, की यांना असं दाखवायचं की मी त्यांना मदतच करतो आहे, पण तुझ्या मार्फत सत्य शोधून काढायचं आणि जे सूत्रधार आहेत त्यांचे जे काही मनसुबे आहेत ते उधळून टाकायचे. म्हणूनच मी तुला पळून जाण्याचा आणि शोध घेण्याचे आदेश दिले." एसपी स्वतःची भूमिका स्पष्ट करत होता.

"कोल्हापूर पोलीस डिपार्टमेंट मधले कोण कोण सामील आहेत?" शक्तीचा थेट प्रश्न.

"मला अजून तरी ठाऊक नाही." एसपी हतबल उत्तरला.

शक्तीने मग तो विचार सोडला आणि आपला वैयक्तीक तपास किमान पुढे सरकवावा असं ठरवून त्याने हवी असलेली अन्य माहिती मिळवण्यासाठी एसपीवरील आपली नजर करडी केली.

"मला माझ्या हातून मेलेल्या सुलेमान तोपचीच्या बॉडीगार्डचे डिटेल्स हवे आहेत. तोच युरेनियम बद्दल काही खुलासा करू शकतो." शक्ती एसपीच्या डोळयांना तीक्ष्ण बघत बोलला.

"मिळतील." एसपी एवढंच म्हणाला. आपली बाजू मांडण्यासाठी जेवढं सांगायचं तितकं त्यानं सांगितलं होतं. आता अधिक स्पष्टता तो करू इच्छित नव्हता. शक्तीला जर विश्वस ठेवायचा नाही तर तो कितीही सांगितलं तरी विश्वास ठेवणार नाही, अलबत्ता कृतीतून आपली बाजू आणि प्रामाणिकता कुठे वाहिलेली आहे हे तो दाखवू पाहत होता.

"ती मला मिळाली, तर आपण देशाच्या रक्षणासाठी घेतलेली शपथ खरी आहे असं मी मानेन!" शक्ती त्याला फक्त इतकंच म्हणाला. शक्ती थोडं उद्धट वाटावं असं बोलत होता खरं, पण राष्ट्राच्या वर त्याला कोणी नव्हतं. देशद्रोही कोणीही असो, कोणत्याही पदावर वाया हुद्यावर; त्याच्यालेखी त्या व्यक्तीची किंमत शून्य होती. आणि तो एसपीशी सध्या असं बोलत होता, कारण अजून एसपी बद्दल त्याला आशंका कुठंतरी होती. ती शंका जेव्हा मिटेल, तेव्हा एसपी पुनः शक्तीच्या आदराचा धनी होईल... तुर्त...

"मी वाट बघतोय..." शक्ती म्हणाला.

"तुला लागेल ती मदत मिळेल! हे माझं आधीही तुला वचन होतं." एसपी गंभीर बोलला.

शक्ती अजूनही तीव्र भेदक नजरेने एसपीला जोखत होता...

# ९. युद्धारंभ...

"सर?!"

त्या आश्चर्योद्गाराने शक्ती थबकला. तो मागुती वळला. आवाज कोणाचा होता हे शक्तीने ओळखले होते. फ्रान्सिस त्याच्या समोर उभा होता.

"तुला सांगितलेलं काम केलंस?" शक्तीने फ्रान्सिसला त्याला विचारलं.

त्याचवेळी लागलीच फ्रान्सिसने एक कागद शक्तीच्या हाती सोपवला. शक्तीने तो पाहिला आणि दुसऱ्याचक्षणी त्याचा बोळा करून त्याने दाताखाली दाबला.

"सर... एसपी सर... तुमचा संशय खरा आहे त्यांच्याबद्दल... कसं सांगावं मला कळत नव्हतं, पण... तुम्हाला प्रत्यक्ष पाहता, मी आपल्याशी हे लपवून सुद्धा नाही ठेवू शकत... सनशाईनचा ओनर जैसवालला खाजगीत भेटले होते. त्यांच्यात जे बोलणं झालं ते मी टॅप केलं आहे आणि ते आपल्यासाठी सयुक्तिक नक्कीच नाही..." फ्रान्सिस कचवचत बोलला.

"मला कळलंय ते आणि तेही स्वतः सरांकडून!" शक्ती भावणारहित बोलला,

"हे करण्यामागील त्यांचा हेतू त्यांनी मला स्पष्ट केलं आहे. पण तरी तू त्यांच्यावर लक्ष ठेवून रहा. ते माझ्याशी सत्य बोलत असतील नसतील, पण त्या लोकांसोबत काम करून त्यांचा जीव सुद्धा एक ना एक वेळ धोक्यात येईल आणि ते आपल्याला होऊ द्यायचं नाही!" शक्ती ठणकावत बोलला.

सद्गदीत फ्रान्सिसची होकारार्थी मान डोलली.

"माफ करा सर, मी उघड आपल्याला साथ नाही देऊ शकत. मला माझाच राग येतोय..." फ्रान्सिस स्वतःला दोष देत दुःखी बोलला.

शक्तीने यावर काही गैर प्रतिक्रिया दिली नाही. फ्रान्सिसची व एकूणातच संपूर्ण डिपार्टमेंटची असहायता तो पुरेपूर जाणून होता. तो आडे राहून मदत करत आहे हेच काय कमी होतं त्याच्यासाठी? शक्तीने केवळ दिलासापर त्याच्या खांद्यावर हात ठेवला. आभार मानण्याची त्याची ही कृती होती. शक्तीची ती कृतज्ञभाव त्याच्या पर्यंत पोहोचली देखील त्यामुळे फ्रान्सिसने शक्तीचा तो हात आपल्या हाती घेतला.

"मला कळत नाही, की सरांनी तुम्हाला बाय बुक जायला सांगून तुमचे हात का बांधले, जर त्यांना वाट आहे की तुम्ही या प्रकरणाचा स्वतःहून शोध घ्यावा?" फ्रान्सिसने शंका व्यक्त केली. तो खूपच भावनावेगी होता.

इतक्यात आतून एसपी चौकटीत आला. शक्तीची तिकडे नजर वळलेली पाहून फ्रान्सिस देखील मागे वळला. आणि दारात एसपी येऊन उभा राहिलेला पाहून त्याचे तोंड भीतीने पांढरे पडले. परंतु त्याच्या बोलण्याने एसपी रागावला नव्हता हे त्याच्या शांत, गंभीर चेहऱ्याने स्पष्ट केले होते.

"ते यासाठी, की शक्तीच्या हातून काही चूक घडू नये. तो बेकायदेशीर वागला, तर त्याला अडकवायला पुरावेच तयार होतील आणि म्हणून त्याने संयत राहून कायद्याच्या चौकटीत काम करणे आवश्यक आहे, तो सस्पेंडेड आणि फगिटिव्ह असला, तरी! यावेळी जर तो कायदा न मोडता तपास करत राहील, तर अंती त्याची ही कृती त्याच्यासाठी एक भक्कम युक्तिवाद म्हणून त्याच्या बाजूने आपल्याला मांडता येईल! आणि अखेर, कायद्याच्या पुस्तकांत जशी प्रोसिजर आहे त्यानुसार काम करणं हे आपलं कर्तव्य आहे! ते उल्लंघणं म्हणजे आपण घेतलेल्या वचनाशी आणि पेशाशी प्रतारणा होईल आणि

a

शक्तीच्या हातून ते होऊ नये असं मला वाटतं म्हणून!" एसपी आपली भूमिका स्पष्ट करत बोलला.

आतापर्यंत शक्ती आणि फ्रान्सिस एसपीच्या निवासस्थानाच्या व्हरांड्यातच उभे होते. शक्ती बाहेर आल्याच फ्रान्सिसने त्याला हाक दिली होती. एसपीच्या स्पष्टीकरणावर काही प्रतिक्रिया विदित न करता शक्ती जाण्यास वळला. मात्र आतून त्याला एसपीचं हे म्हणणं पटलं होतं. एसपीनं सांगितलं नसतं, तरी आपल्या कर्तव्याप्रति सजग असणारा शक्ती, स्वबुद्धीने त्याने जे करायचं ते कायद्याच्या मार्गेच केलं असतं.

"काळजी घे!" एसपी शक्तीला चिंतेच्या स्वरात म्हणाला.

शक्तीची होकारात मान हलली. शक्ती निघून गेला. मागे राहिलेल्या एसपी आणि फ्रान्सिस मध्ये एक अवघडलेपण आपसूकच भरले.

"सॉरी सर..." फ्रान्सिस संकोचत बोलून गेला.

"नेवर् माईंड!" म्हणत एसपीने ते अवघडलेपण आणि आपला अप्रदहबोध कमी करण्याचा प्रयत्न केला.

"गो टेक सम रेस्ट!" तो फ्रान्सिसला पुढे म्हणाला.

आणि त्याला सल्युट करून फ्रान्सिस आपल्या वास्तव्याकडे वळला. एसपी देखील आत निघून गेला होता.

दुरून एक पुरुषी सावली मात्र हा भरत मिलाप बघत होती. आणि एक कुत्सित स्मितरेषा त्याच्या ओठांवर खिळली.

"सारे के सारे मिले हुए है!" तो आपल्याशीच बोलला आणि ती सावली त्या झुडुपातून हलली, तशी ती झुडुपाची बारीकशी सळसळ झाली.

●●●

त्रासलेला एसपी आराम खुर्चीत डोळे मिटून बसलाच होता, की त्याच्या दारावर टकटक झाली. आलेली व्यक्ती बहुदा बेल दाबून गोंगाट करू इच्छित नव्हती. डोळे मिटून पडलेला एसपी वैतागी भाव आणि आठ्या घेऊन उभारला. एवढ्या रात्री आता कोण? हा त्रासिक भाव त्याचा मोहरा साहजिक दृश्य करत होता. एवढा ताण सहन करत असताना आणि ते आपण कशासाठी सहन करतोय हेच मुळी माहीत नसताना यामुळे तो वैतागला तर होताच पण अधिक शिणला होता.

स्वतःच जाऊन त्याने दार उघडले, तर दरवाजातील व्यक्ती पाहून त्याच्या चेहऱ्याचा रंग उडाला.

"गुड इव्हीनिंग!" हसऱ्या चेहऱ्याने ती व्यक्ती बोलली. जणू ती एसपीची चेष्टा करत आहे.

"तुम्ही इथे? यावेळेला?" एसपी त्या व्यक्तीला म्हणाला.

"काय करावं? तुम्ही अहोरात्र काम करता, तर त्यामुळे आम्हालाही करावं लागतंय." ती व्यक्ती म्हणाली.

"आत बोलावणार नाही?" त्यानेच पुढे विचारले.

"हो... हो... या ना..." एसपी मागे सरला. आणि ती व्यक्ती आत शिरली.

खिडकीतून येणारा प्रकाश त्याच्या चेहऱ्यावर पडला, तर त्याचा चेहरा अधिक स्पष्ट झाला. तो सुशील होता! आणि काहीतरी मनात हेतूनच तो आला होता.

त्याचा हा 'चोर पकडल्याचा' आविर्भाव पाहून एसपी चाचरला. तो आतून भ्याला होता, *'न जाणो हा अपरात्री कशासाठी आला आहे? काही कळलं आहे का याला? शक्तीबद्दल? माझ्याबद्दल? माझ्याबद्दल तर, ते नेमकं*

*कशासंदर्भात? शक्तीला मदत करण्याबद्दल, की खऱ्या गुन्हेगारांना मदत करण्याबद्दल?'* जसजसे प्रश्न वाढत गेले एसपीच्या मनात... त्याच्या जीवाची धडधड जास्तीतजास्त वाढतच गेली... त्याची भीती वाढतच गेली...

"शक्तीसेन इथे येऊन गेले! नाही?" सुशील स्पष्टच बोलला. जाब विचारल्याचा त्याच्या आवाजात कठोरपणा होता.

एसपीला काही सुचलेच नाही, की काय बोलावे. सुशीलच्या अशा अचानक शब्द हल्ल्याने तो स्तंभित झाला होता. पण त्याला एक दिलासा नक्कीच वाटून गेला, की तो गुन्हेगारांना देखील सामील आहे हे अजून सुशीलला समजलेलं नाही... की समजलं असेल पण तो अजून ते उद्धृत करत नाहीये...? कदाचित नाही! अजून त्याला याबद्दल समजलेलं नाही! नाहीतरी त्याचा पहिला प्रश्न याबद्दलच असता... त्यामुळे एसपीने तूर्त याबाबत तरी सुटकेचा निःश्वास सोडला. पण शक्ती इथं येऊन गेला आहे हे याला समजलं ही देखील खूप मोठी चिंतेची बाब होती. आणि ती चिंता एसपीच्या चेहऱ्यावर सकल सुस्पष्ट होती.

"आपला चेहराच खरं काय ते सांगतोय. पोलीस हॅडकोर्टर्सच्या आवारात, खुद्द एसपीच्या निवासस्थानी एक आरोपी येऊन अटक न होता निघून जातो आणि ते मला समजणार नाही असं तुम्हाला कसं वाटलं एसपी साहेब?! शक्तीसेन आल्याआल्याच मला वर्दी मिळाली होती! घाबरू नका! तुमच्या लोकांनी नाही! माझ्या एनआयएच्या लोकांनी कळलं. तुमच्याकडून आणि तुमच्या लोकांकडून मला काही अपेक्षा नाही! शक्तीसेन आले नाहीत असं म्हणण्याचा जराही विचार करू नका! तुमचा भरत मिलाप मी स्वतः पाहिला आहे!" सुशील एसपीला अडकीत्त्यात पकडत दोष देत बोलला.

"शक्तीसेन निर्दोष आहे!" एसपी ठाम बोलला.

त्याला हे बोलणं क्रमप्राप्तच होतं, नाहीतर त्याला जाऊ देण्याचा दोष त्याच्यावर येत होता.

"मग कोण दोषी आहे? हे तुम्हाला माहित असेल?" सुशील कुचकट बोलला.

कोण ते एसपीला देखील माहीत नव्हतं, पण कोणामार्फत हे घडवलं जात होतं, हे तो जाणत होता. पण ते तो सुशीलकडे उघड करू शकत नव्हता, अन्यथा तोही अडकला असता. त्याचं मौन पाहून सुशीलच पुढे बोलला,

"शक्तीसेन यांच्या घरी जप्त झालेले मटेरियल हे युरेनियमच असल्याचा रिपोर्ट आला आहे. क्वांटीटी टेन ग्रॅम आहे फक्त, खंत ही वाटते, की ते अर्धा किलो युरेनियम त्यांच्या घरी सापडले नाही! ते सापडले असते, तर आमचे काम अधिक सोपे झाले असते. असो, तरी हेही नसे थोडके! त्यांना दोषी ठरवायला हा पुरावा पुरेसा आहे. नाही?! म्हणजे ओसवालने जे आरोप शक्तीसेन यांच्यावर केले तेही इथे सोशल होतात."

"स्पष्ट नाही होत, फक्त त्या आरोपांना बळकटी मिळते इतकंच!" एसपी ठणकावत बोलला.

"तुम्ही तसंच म्हणणार! असो! तुम्हाला पटवण्यासाठी हे इन्वेस्टीगेशन चालू नाही, तर जनतेला सुरक्षित ठेवण्यासाठी आणि गुन्हेगारांना कायद्यासमोर झुकवण्यासाठी चालू आहे. त्यामुळे तुम्हाला काय वाटते, हे माझ्यासाठी काडीचेही महत्त्वाचे नाही एसपी साहेब!" सुशील बोलला.

त्याच्या या बोलण्याने एसपी चिंतेच्या गर्तेत लोटला गेला.

"आता तुम्ही काय करणार आहात?" त्याने डोळे बारीक करत थेटच प्रश्न केला सुशीलला.

सुशील हसला.

"यू नो व्हॉट? तुम्ही शक्तीसेन यांच्याबद्दल जो प्लॅन मला ऐकवलात, त्यावरच अंमल करणार! आय एम अलसो गोन्ना सेट हिम फ्री! त्यामुळेच ते कुठे जातात, कोणाला भेटतात, काय बोलतात, काय करतात इत्यादी इत्यादी मला समजत राहील!" आणि तो कुटील हसला.

एसपी मख्खं चेहऱ्याने त्याच्या त्या कुचकट चेहऱ्याकडे पाहत राहिला.

"गुड नाईट एसपी साहेब!" म्हणत तो वळला आणि चौकटीतून बाहेर नाहीसा झाला.

एसपीची झोप उडवून त्याच्या निश्चिंत झोपेची कामना करून तो गेला होता. हा एसपीचा उडवलेला त्याचा निव्वळ उपहास होता!

# १०. हुलकावणी...

शक्ती जिग्नेश ओसवालच्या घराबाहेर पोहोचला. त्याला पोलीस प्रोटेक्शन देण्यात आलं होतं. एक तर तो आरोपी होता आणि आता जामिनावर होता आणि दुसरं शक्ती त्याच्या मागावर येण्याची दाट शक्यता होती.

पण झालं उरफाटंच. शक्तीला समोर पाहून सुरक्षेसाठी तैनात अधिकाऱ्यांनीच त्याला सल्युट ठोकला. त्यांचा सल्युट स्वीकारून शक्ती पुढे झाला. त्याच्यासाठी मुख्य दरवाजा बाहेरूनच त्याला खुला करून दिला आणि शक्ती आत प्रवेशकर्ता झाला.

फ्रान्सिसने जो कागद दिला होता व ज्याला शक्तीने वाचून दातात दाबला होता, त्यावर पत्ता जिग्नेश ओसवालचाच गिरगटला होता व शक्तीच्या मागणीनुसार त्याला तो हस्तांतरित केला होता. त्यानुसार शक्ती आता इथं हजर झाला होता.

आतमध्ये, जिग्नेश ओसवाल याला तरी कुठची निज होती...? तो सोप्यातच सोफ्यावर आढ्याकडे नजर एकटक लावून पडून होता. कसल्याशा अव्यक्ताच्या भीतीने त्यालाही पछाडलं होतं. बाहेर इतरांना तो कितीही आपण निर्भीड आहोत असा माज दाखवत असला, तरी जे अजाणतं, गूढ उभं ठाकू पाहत होतं ते काय आहे हे त्यालाही माहीत नसल्याने त्याने तोही दडपून गेला होता.

"ओसवाल!" शक्तीचा भारदस्त आवाज त्या रिकाम्या मोकळीत घुमला.

a

तसा ओसवाल ताडकन भानावर आला. तो उठून उभारला आणि शक्तीकडे वळला. त्याला पाहून ओसवालची बोबडी वळली.

"तू... तू..." तो वेडगळ बडबडला. दिवसभर इतरांसमोर जो खोटा माजलेला आविर्भाव घेऊन तो मिरवत तो शक्तीला असा एकांतात समोर पाहून खासकन उतरला होता.

पण क्षणात त्याने त्याचा तो खोटा पडदा स्वतःच्या चेहऱ्यावर ओढून घेतला आणि तो मुत्सद्दी हसला.

"मला समजून जायला हवं होतं, की लांडग्यांना कळप राखायला ठेवायचं नसतं. पोलीस तुला अडवणार नाहीत हे माझ्या लक्षात यायला हवं होतं." ओसवाल उद्धट बोलला.

"हे तुला समजलं आहेच, तर हेही आत्तापर्यंत समजलं असेल, की मला कोणी अडवू शकत नाही! बेटर वे, मला जी माहिती हवी आहे ती सांगावीस! तुझ्या भल्याचं होईल ते!" शक्ती कठोर बोलला.

"या खेळाचा तू जसा एक प्यादा आहेस, तसाच मीही आहे! तुला जेवढी माहिती, तेवढीच मला. तुला एक सांगतो; काय चालू आहे? का चालू आहे हे कोणालाच माहीत नाही! या खेळात जेवढी प्यादी आहेत, त्यांना जे काम नेमून दिलं आहे, त्या व्यतिरिक्त कोणाला अधिकची माहिती नाही! आता तू जैसवाल साहेबांचं आणि माझं बोलणं ऐकलंच आहेस, तर मी मान्य करतो, तुला अडकवण्याचं काम माझं होतं, ते मी केलं. माझा या खेळातील भाग संपला. या उपर ते कशासाठी ते मला माहित नाही! आता तू जाऊ शकतोस!" ओसवाल उसने आवसन आणून बोलला.

शक्तीच्या कोपातून वाचण्यासाठी त्याने आपण घाबरले नाही आहोत असे भासवत त्याला जे माहीत होतं ते तो बकून गेला होता. 'सुरक्षेसाठी जे पोलिसकर्मी शक्तीला आत येण्यापासून रोखू शकले नाहीत, ते तो आपले अहित करत असताना थोडीच त्याला अडवणार आहेत?!' हा विचार त्याच्या डोक्यात धडक देऊन गेला होता. शक्ती वचनात अडकून होता त्यामुळे तो कायदा हाती घेणार नाही हे ओसवालला माहित असलं, तरी आपण अडमुठेपणा केला आणि शक्तीचा तोल, संयम ढळला, तर हा काय करून बसेल याची प्रचिती त्याला अलबत नको होती. विषाची परीक्षा तो घेऊ इच्छित नव्हता. तेव्हा तर नक्कीच नाही, जेव्हा तो एकटा होता. कॉर्नर्ड होता! त्याचे सुरक्षारक्षकच शक्तीच्या एका हाकेवर त्याच्याकडून उभे राहून आपला जीव घ्यायला मागे पुढे पाहणार नाहीत हे तो ओळखून चुकला होता, ज्या अर्थी तो सहज आत शिरला होता त्या अर्थी... त्यामुळे, जिग्नेश ओसवालने संघर्ष न करता बोलणे निवडले होते.

"मला अडकवण्याचं कारण?" शक्तीने त्याला सतावणारा प्रश्न भावणारहित विचारला.

"मी तुझी माफी मागतो, पण मला माहित नाही!" उपहास करत ओसवाल शक्तीला म्हणाला.

"आणि ते अर्धा किलो युरेनियम?" शक्तीचा चप्पट चेहऱ्याने दुसरा पण अधिक महत्त्वाचा सवाल.

"मला खेद आहे मित्रा, मला माहित नाही! ते प्रत्यक्षात आहे की ती फक्त अफवा आहे हे देखील मला माहित नाही! तुला अडकवण्यासाठी म्हणून युरेनियम डिलिंगचा एक फार्स उभा करण्यात आला होता. तोपची, मी आम्ही

फक्त आमच्या भूमिका पार पाडत होतो. सॉरी बॉस तुला हवी ती माहिती इथे मिळणार नाही. आणि ती कुठे मिळेल, हे मला माहित नाही!" ओसवाल कुचकट हसला. आणि त्याने दरवाज्याकडे निर्देश केला. शक्तीला तो जाण्यास फर्मावत होता.

"आता आपली हरकत नसेल, तर मी थोडा आराम करावा म्हणतो!" तो शक्तीला म्हणाला.

"आता तू हसून आणि आराम करून घे, पण जेव्हा मला सत्य समजेल आणि त्या गाळात तू नक्की किती रुतला आहेस हे समजेल, तेव्हा विश्वास ठेव! मी तुला सोडणार नाही! कारण त्यावेळी सर्व ओथेरिटी पुन्हा माझ्याकडे असेल!" शक्तीने त्याला निश्चयी ठणकावले.

आणि शक्ती निघून गेला. शक्ती जाताना आणखी बाहेरील ऑफिसर्स त्याला सल्युट करायला विसरले नव्हते. शक्ती जाताच एकवटलेलं खोटं आवसान गळून गेलं ओसवालचं. त्याला दरदरून घाम फुटला शक्तीचं वचन आठवून...

त्याने लागलीच टेबल वरील कॉडलेस उचलला.

"जैसवाल साहेब! तो आला होता... तो शांत बसेल असे वाटत नाही! मी इथेच त्याला संपवला असता, पण एकतर तुमचे ऑर्डर्स नाहीत आणि दुसरं म्हणजे प्रोटेक्शनसाठी असलेले पोलीस! त्यांच्यामुळे देखील मी त्या नाईकला काही करू शकलो नाही. आपल्याला त्याची नकेल कसावी लागेल! तो डोईजड होण्याआधी! त्याला असं फिरू देणं योग्य नाही!" तो तावातावात कठोर बोलला.

a

आपण घाबरलो होतो आणि अजूनही आपल्याला शक्तीकडून जीवाची भीती वाटत आहे हे त्याने जाहीररीत्या दडवले होते आणि तो आपला कणखर बाणा दर्शवत होता. पण तो खोटं नक्कीच बोलत नव्हता. ऑर्डर्स असत्या आणि पोलीस नसते त्याने शक्तीला मारण्याचा अटेंप्ट हमखास केला असता.

"रिलॅक्स ओसवाल!" आपल्या बेडवर निवांत पडलेला आणि अजूनही झोपेच्या अर्धग्लानीत असलेला जैसवाल झोपल्याने विस्कटलेले केस मागे सारत म्हणाला.

"आपल्याला त्याला असं रोम करू देणंच गरजेचं आहे. कन्सिडर हिम एज ए वॉकिंग घोस्ट! पण जे पूर्णपणे घातरहित आहे. तो असं फिरून कोलाहल निर्माण करत राहिला, तरच सर्वांचे लक्ष त्याच्याबर लागून राहिल आणि त्याच्या आडून जे साधायचं आहे ते साधता येईल. हाच तर प्लॅन आहे!" वास्तविक शक्तीला मुक्त संचार करू देणं ही योजना एसपीची होती. आणि त्यामागील कारण त्यानेच जैसवालला पटवलं होतं, पण हा ती त्याची कल्पना असल्यासारखं आत्ता शेखी मारत होता.

कायद्याने त्याचे हात असे बांधले आहेत, की तो आपलं काही वाकडं नाही करू शकत. आणि त्याने काही केलंच, तर त्याच्याविरुद्ध रान उठेल! या कर्तव्यदक्ष ऑफिसर्सची हीच नस असते, जी दाबली, की ते कळवळण्या व्यतिरिक्त काही करू शकत नाहीत. याला म्हणतात कायद्याने काटा काढणे! आपलं इप्सित सध्या करायला कायद्याचाच असा काही वापर करायचा असतो,

की कायदा मोडून देखील आपण सुरक्षित राहू! समजलं?! त्यामुळे तू त्याला काही इजा करू नकोस! तूर्त ऑर्डर येईपर्यंत तरी!" जैसवाल बेरकी हसला.

'पण यात माझा जीव जाईल त्याचं काय?' असा विचार ओसवालच्या मनी दाटला, पण त्याने तो जैसवालला बोलून नाही दाखवला. नाहीतर त्यांच्याकडूनच आपलं मरण आधी ओढवेल हे ओसवाल जाणून होता. कधी न कधी मरण येणारच हेही तो जाणून होता, फक्त ते जितकं दूरवर टाळता येईल व टळेल तर बरे असे तो पाहत होता...

फोन ठेवून त्याने आलेला घाम हाताच्या बाहीनेच टिपला होता...

●●●

ही रात्र शक्तीला मारुतीच्या शेपटी समान भासत होती. रात्र संपता संपत नव्हती. आणि संपत नव्हता तो शक्तीचा शोध. जिथे जाईल तिथे तुकड्यांत माहिती मिळत होती आणि तीही आताशा तरी तितकी महत्त्वाची अशी दिसत नव्हती.

शक्तीचा पुढचा ठिकाणा होता, तो सुलेमान तोपचीचा बॉडीगार्ड! आणि त्याचा पत्ता अजून शक्तीला मिळायचा होता. हा विचार चालू असतानाच त्याचा मोबाईल मेसेज आल्याने वायब्रेट झाला. त्याने चालत चालता मोबाईल पाहिला. फ्रान्सिस कडून तोपचीच्या बॉडीगार्डचा पत्ता आला होता. त्याच्या नांवासहित... ते शक्तीने मोठ्याने वाचले,

"रफिक पटाईत!"

शक्तीला याचा पत्ता फ्रान्सिस कडूनच काढता आला असता, जसा त्याने ओसवालचा पत्ता मिळवला होता; पण त्याला एसपीची सत्यता पडताळायची होती आणि त्यामुळे त्याने याचा पत्ता एसपीकडे मागितला होता. सदर एसपी व शक्ती मधील बोलणे फ्रान्सिसला माहीत असण्याचे कारण नव्हते. तरी त्याच्या कडून हा पत्ता आला होता. याचा अर्थ सोशल होता, एसपीने फ्रान्सिस करवी हा पत्ता शक्ती पर्यंत पोहोचवला होता.

डोक्यावर हुडी टाकलेला शक्ती त्या पत्याच्या वाटेवर वळला. आज त्याचे पाय थकत नव्हते. इतका पायी प्रवास करून सुद्धा त्याला शिण आला नव्हता. तो येणार नव्हता, जो पर्यंत शक्ती सत्याचा शोध लावत नाही!

चालता चालता शक्ती अचानक थबकला. समोर पोलिस नाकेबंदी होती. तैनातीत असणारे पोलिस डोळ्यांत तेल घालून जगता पहारा देत होते. आता पोलिस होते, तरी शक्तीला थबकण्याचे कारण होते, कारण... त्या नाकेबंदीचा जो इंचार्ज होता, तो होता डिपार्टमेंट मधील सर्वांत भ्रष्ट अधिकाऱ्यांपैकी एक, महेश देशमुख!

साहजिक अंधारातून जाळं फेकलेल्या दुष्टकर्मींशी हा मिळेला असणार हे शक्तील ओळखायला उशीर झाला नाही. शिवाय प्रामाणिक शक्ती हा त्याचा मोठा दुष्मन! शक्तीने अनेकवेळा याला अडचणीत आणला होता. एकदोनदा शक्तीमुळे तो सस्पेंड देखील झाला होता, असं असताना शक्ती आत्ता त्याच्या तावडीत सापडला, तर महेश शक्तीचा उकटा काढल्याशिवाय राहणार नव्हता. आणि शक्ती देखील कायद्याच्या बाहेर जाऊन महेशचा मुकाबला करू शकणार नव्हता. मोठा पेच उभारला होता शक्ती समोर! काय करावे याचा विचार चालू

a

होता शक्तीचा. कारण तोपचीच्या अंगरक्षकला गाठण्यासाठी शक्तीला या महेश देशमुखला लांघावे लागणार होते. पण कसे? पण... कसे...?

शक्तीने त्याची पिस्टल बाहेर काढली, जी एसपीने तो दवाखान्यात असताना त्याला दिली होती. एक क्षण त्याने काही विचार केला. दरम्यान त्याची पिस्टल त्या मंद प्रकाशात लकाकत होती. धीर पक्का करून त्याने एक दीर्घ श्वास सोडला. बंद केलेले डोळे त्याने उघडले.

आणि एक गोळी शक्तीने महेश देशमुखच्या दिशेने फायर केली!

दोन इंचाने गोळी हुकली आणि महेशच्या डोळयांसमोरून ती पलीकडे पार झाली. महेशच्या सर्वाईव्हल इन्स्टिन्क्टने तात्काळ प्रतिक्रिया देऊन गोळी त्याच्या पासून पास होताना तो मागे झाला होता. लगेच तो हरकतीत आला. ही गुस्ताख हरकत कोणी केली हे पाहण्यासाठी त्याचे तीक्ष्ण चक्षु इतस्ततः फिरून गोळी अली त्या दिशेला ताडून तिकडे रोखले गेले.

"सर्च द एरिया!" तो मोठ्याने ओरडला. एड्रनलिन रश झाल्याने त्याचा श्वास फुलला होता.

सर्व पोलीस चारी दिशांना विभागले गेले. त्यांच्या बंदुका त्यांच्या हाती सज्ज झाल्या होत्या.

महेश देखील त्याची सर्व्हिस पिस्टल हाती घेऊन ती लोड करून गोळी आलेल्या दिशेने सावध चालू लागला होता.

अंधारात उभारलेला शक्ती त्याला पाहत होता. त्याची पिस्टल त्याच्या छातीशी लागली होती. त्यालाही श्वास लागला होता.

महेश तिथे पोहोचला. त्याने आपली पिस्टल त्या आडोशाला ताणली. पण...

तिथं कोणी नव्हतं. तिथं उभारलेला शक्ती नाहीसा झाला होता. महेशला मारणं हा शक्तीचा उद्देश नव्हताच. सर्वांचं आणि मुखतः महेशचं लक्ष विचलित करणं हा त्याचा प्रमुख हेतू होता. अन्यथा शक्तीचा नेम कमजोर नव्हता, की तो चुकेल. त्याच्या गोळीने महेश कधीच मृत्यूस प्रिय झाला असता, जर शक्तीने त्याला मारण्याचे इच्छिले, योजिले व अंमलात आणले असते व तेही अंधारछायेत असताना देखील.

महेश जरा पुढे झाला. ज्या घराचा शक्ती आडोसा म्हणून वापर करत होता, त्या घराच्या कम्पॉउंड भिंतीच्या पलीकडे शक्तीने कधीची उडी मारली होती.

त्याने वेग धरून तो लॉन पार केला आणि पुन्हा कम्पॉऊंड भिंत उल्लंघून तो पुन्हा रस्त्यावर आला. समोर आता फक्त मोकळी बॅरिगेट्स व पोलीस गाड्या होत्या. महेश ते घर गोल फिरून तपासण्यात व्यग्र होता, आणि इतर ऑफिसर्स गोळी चालवण्याऱ्या अज्ञाताला शोधण्यास विखुरले होते, ती संधी साधून शक्तीने ती रिक्त पडलेली नाकेबंदी पार केली.

शक्ती जोराने आणि जोमाने तिथून पळाला होता. पण, गोळी तिथून अली, त्या घराची चौफेर रेकी करून पुन्हा समोर आलेल्या महेशने त्याला ताडलेच. त्याने बहुदा पाठमोऱ्या शक्तीला ओळखले नव्हते पण एक मानवाकृती पळताना त्याने पाहिली होती. कोणताही मागचा पुढचा विचार न करता त्याने त्या आकृतीवर फायरिंग केले.

a

गोळीच्या आधी आवाज शक्तीपर्यंत पोहोचला होता. त्याने ती गोळी चुकवण्यासाठी जवळच्या एक झाडाची मदद घेतली. तो झटकन त्या झाडाच्या आडोशाला झाला होता. महेशने आपल्या बंदुकीतून फेकलेल्या गोळया त्या झाडाच्या बुंध्यावर येऊन आढळत होत्या, शक्तीचा खांदा जरकमी वाचला होता जखमी होण्यापासून. मग शक्ती तिथं थांबला नाही. झाडाला लागून असलेल्या कम्पॉउंड वरून त्याने दुसऱ्या बाजूस उडी घेतली आणि काटकोनात असलेल्या लगतच्या कम्पॉउंड भिंतीला पार करून तो क्रॉसिंग रोडला लागला व तो तिथून धावत सुटला. महेश धावत त्या झाडाशी आला होता. तिथं पुन्हा कोणी नव्हतं. हा हल्लेखोर पुन्हा हातच निसटला होता...

# ११. घातसत्र...

सुलेमान तोपचीचा बॉडीगार्ड रफिक पटाईत बेडवर पडला होता. दार जोरात वाजवलं गेलं. इतकं जोरात, की ढगांचा गडगडाट झाला असावा असं वाटावं कुणाला. प्रकरण सांभाळायला त्याला माहित असलेली मोठमोठी लोकं होती. त्यामुळे हा तसा निर्धास्त होता. खिडकीतून बाहेर पाहिले, तर ढगांचे लक्षण काही दिसत नव्हते. मग काय? थोडं भानावर आल्यावर, नीट जाग आल्यावर त्याला समजलं, की मुख्य दरवाजा कोणी वाजवत आहे.

त्याने बेडवरून उठण्याआधी जवळच्या टेबलचा खण ओढला, तशी त्यातली त्याची पिस्टल पुढे सरकली. कोणी का आलं असेना, पण आत्मरक्षा ही त्याची स्वाभाविक प्रतिक्रिया होती.

त्यानं ती पिस्टल लोड करून छातीशी धरली आणि तो सावध पुढे सरकला.

बेडरूम, किचनचा पॅसेज असं करत तो हॉल मध्ये आला. दरवाज्याला डोळा लावून त्याने पीपहोल मधून बाहेर नजर मारली. बाहेर शक्ती उभा त्याला दिसला. शक्तीला पाहून त्याचा तिळपापड झाला. तळपायाची आग मस्तकात गेली त्याच्या. त्याचा मोहरा विचित्र क्रुद्ध झाला. शक्तीला आत्ता, इथे संपवण्याचा त्याने निर्धार पक्का केला. आणि त्या निर्धारासह त्याने दरवाज्याला पाठ करून हळूच दरवाजा उघडला.

दार उघडले, तसा तो आपसूक त्या दारामागे लपला गेला. शक्ती बाहेर उभा आतील हॉल त्याला मोकळा दिसला. दरवाजा उघडला, तरी समोर कुणी

नाही यामुळे शक्ती शंकीत झाला. त्याची नजर करडी झाली. एका निर्धाराने शक्तीने आत पाऊल ठेवले. त्याची नजर त्याच्या डावीकडे गेली, तिथं भिंतीला लागून कोणी लपलेलं नाही याची खात्री झाली आणि मग त्याचा दुसरा पाय पूर्ण शक्तीनिशी दारावर आदळला. दार वेगाने जोरात मागे जाऊन पटाईतच्या अंगावर आदळले. त्याचा दाराचे नॉब धरलेला हात भिंत व दार यांत चेंदले गेले. उजव्या हातातील पिस्टल ग्रीप सैल होऊन खाली कोसळले. शक्तीने ते पायाने आपल्याकडे खेचले आणि बुटाच्या दर्शनीभागावर घेऊन हवेत टॉस केले. वर उडालेली पिस्टल शक्तीने कॅच केली. आणि डिसमेंटल करून त्याचे सर्व पार्ट्स बुलेट सकट जमिनीवर विखरून दिले. शक्ती हे करत असताना घात लावायला बसलेल्या जहरी सापाच्या नजरेने पटाईत त्याला पाहत होता. त्या सापाप्रमाणेच पटाईतची जीभ त्याच्या ओठांवर आपसूक फिरली होती, जणू तो शक्तीच्या नरडीचा खोट घेऊन त्याचे रक्त पिण्यास आसुसला असावा.

शक्तीने पटाईतची पिस्टल विखुरली असता, तिथल्या भयाण शांततेत त्यांचा खण खण आवाज कानाला दडे पडत होता.

"या खेळण्यांनी खेळण्यात वेळ घालवण्यापेक्षा माझ्या प्रश्नांची उत्तरं दिलीस, तर माझा वेळ सत्कारणी लागेल!" शक्ती त्या गडद अंधारातही पटाईतच्या विखारी डोळ्यांत रोखून पाहत म्हणाला.

शेवटी हाती राहिलेली ग्रीप शक्तीने जशी फेकली, तशी पटाईतने त्याच्या अंगावर उडी फेकली. शक्तीच्या अंगावर कोसळणाऱ्या त्याला शक्तीने धरून फक्त त्याची दिशा बदलली आणि त्याला आपल्या मागे भरकावून दिले. पटाईत जमिनीवर आदळला, पण कशात तो पडलेल्या जागेहून दिसेनासा

झाला, जसा तो अंधारात विरून गेला असावा. शक्ती असमजस झाला. त्याला कळलंच नाही की हा पटाईत असा अदृश्य कसा झाला?

शक्ती समजून चुकला, की हा पटाईत फक्त नावाचा पटाईत नाही, तर हा युद्ध कौशल्यात देखील पटाईत आहे. त्याची चपळता वाखाणण्याजोगी आहे. अंधाराचा आणि आपल्या वेगाचा फायदा घेऊन याला आपल्याला नेस्तनाबूत करायचं आहे खास!

त्याला उचलून फेकत असताना शक्तीच्या हाताला जबर झटका बसला होता. लागलेल्या गोळीच्या जागेतून पुन्हा ताजा रक्तस्राव सुरू झाला होता. आशा परिस्थितीत युद्धास समोर हे राक्षसी धुड!

शंभर किलोच्या वर शरीरी वजन घेऊन रफिक पटाईत त्या अंधाऱ्या खोलीत घात लावून होता. कोणत्याही क्षणी त्याची मगरमिठी शक्तीवर पडून शक्तीचा अंत करणार होती. आणि तरी शक्ती शांत होता. डोळे मिटून तो उभा होता. काय करत होता तो?

तर तो रफिकच्या पायांचा आणि शक्यतर श्वासांचा वेध घेण्याचा कोशीष करत होता.

अंधारात सावली सारखा मिसळलेला पटाईत शक्तीला वैरी नजरेने बघत होता.

आणि अचानक त्याची झडप मागून शक्तीवर पडली. शक्तीला त्याच्या पाठीवर अजस्त्र असं काही जोरात काही आदल्याचं क्षणात जाणवलं. पटाईतने शक्तीला मागून घट्ट पकडलं होतं. शक्तीच्या जखमेतून अधिकच रक्त सरवू

a

लागलं. असह्य अशा वेदना त्याला झाल्या, त्या इतक्या की नसानसांतून प्रवास करत त्या शक्तीच्या मेंदूत झिणझिण्या उठवून गेल्या.

शक्ती पेक्षा सहा-सात इंच उंच पटाईतने शक्तीला आपल्या छातीवर उचलून धरलं आणि शक्तीला आवळण्यासाठी त्याने आपला जोर वाढवला. शक्तीची छाती आणि बरगड्या आकुंचन पावू लागल्या. कोणत्याही क्षणी त्या आता तुटतील आणि त्वचा फाडून बाहेर येतील असं काहीसं झालं होतं. शक्ती वेदनेने विव्हळत होता. गोळी लागलेला हात अजूनच दुखावला जात होता. पटाईत दात ओठ खात शक्तीला अगदी पिळून काढत होता. त्याचे डोळे रागाने रक्त उतरल्यासारखे लाल झाले होते. शक्तीने या अजस्त्र अशा अजगराच्या विळख्यातून सुटण्यासाठी माणसाच्या चेहऱ्यावरील नाजूक अंगाला म्हणजे पटाईतच्या नाकाला निशाणा करण्याचे ठरवून आपले डोके त्याच्या नाकावर आदळण्याचा प्रयास शक्ती करत होता, पण पटाईत देखील हुशार होता. शक्तीची चाल ओळखून तो आपले तोंड शक्तीच्या डोक्यापासून वाचवत होता, आणि शक्तीला जोरात दाबण्याची आपली इंटेनसिटी तो शक्तीच्या प्रत्येक प्रयत्नांनीशी वाढवत होता.

अखेर शक्तीला असह्य झालं. त्याने आपले दोन्ही हात वर घेतले आणि पूर्ण बळानिशी त्याने आपले दोन्ही अंगठे मागे अंदाज घेऊन पटाईतच्या डोळयांत खुपसली. डोळे; नाकापेक्षाही नाजूक भाग! पटाईतच्या त्याचा अंगांना शक्तीने टार्गेट केलं होतं. जालीम उपाय कारीगर ठरला होता. पटाईतची मिठी सुटून त्याचे हात निमिषार्धात आपल्या डोळयांकडे गेले होते आणि शक्तीचे पाय जमिनीला लागले होते.

शक्ती काही कृती करणार इतक्यात चिडलेल्या पटाईतचा भरकस हात त्याच्या दिशेने दुसऱ्याच क्षणी झेपावला. पण शक्ती सावध होता.

त्याने पटाईतचा हात धरला आणि त्याला जोराने फिरवला. जसा तो फिरला, तसा शक्तीने एक जोरदार साईड किक त्याला घातली. पटाईत मागे भिरकावला गेला. शक्तीने न थांबता हवेत झेप घेतली आणि आपल्या कोपराचा एक बलशाली फटका त्याने पटाईतच्या डोक्यात हाणला, माणसाचे तिसरे नाजूक अंग!

तो फटका इतका वर्मी बसला, की त्याची शक्ती डोक्यापासून अगदी मणक्याच्या खालील माकड हाडापर्यंत पटाईतला जाणवून गेली. आणि तो अक्षरशः खाली आदळला आणि तसाच बसला. मग शक्तीची पिस्टल मागून त्याच्या हाती आली.

"टाइम टू टॉक!" शक्ती त्याला म्हणाला.

पण; दुसरा क्षण जातो न जातो, एक गोळी सुटली आणि ती पटाईतचे मस्तिष्क छेदून बाहेर पडली. पटाईत बसल्या जागी आडवा झाला.

वास्तविक त्या बंदुकीने शक्तीचाच वेध घेतला होता प्रथम, पण बंदुकधारीचा काही क्षणभरात विचार झाल्यावर बंदुकीची नळी उजवीकडे सरली होती आणि तिने पटाईतच्या मेंदूचा वेध घेतला होता.

शक्ती लगेच गोळी आलेल्या दिशेने धावला. खिडकीचे दार उघडे होते आणि तिथून गोळी आत आली होती. गन पावडरचा वास आणि अवशेष तिथं दिसत होते. दिसत नव्हती, ते ती व्यक्ती, जिने हे कृत्य केले होते...

a

शक्ती मग दार उघडून झपाट्याने बाहेर झाला, तर गेट बाहेरून एक गाडी आपला वेग वाढवत जाताना त्याला दिसली. त्या गाडीचा नंबर दिसण्या इतका प्रकाश तिथं नव्हता. आणि असता, तरी गाडी इतक्या वेगात हलली होती, ती तो पाहता ही आला नसता, इतक्या कमी वेळात. ही व्यक्ती हाती आली असती, तर काही घावलं असतं, पण ते शक्य न झाल्याने शक्ती वैतागला, परंतु त्याने अजून हार मानली नव्हती. शक्ती पुन्हा घरात झाला.

शक्तीने मग धांडोळा घेतला तो पूर्ण घराचा. प्रश्नांची उत्तरं देणारं काही मिळतंय का हे तो शोधत होता. ज्या अर्थी याला मारण्यात आलं, त्या अर्थी याला काही माहीत असावं हे अलबत होतं.

आणि ज्या अर्थी हा माहिती ठेवून होता, त्या अर्थी याने काही रिकर्ड्स ठेवले असणेही शक्य आहे हा शक्तीचा तर्क होता. त्या तर्कावर आधारूनच शक्तीची शोध मोहीम चालू होती.

अखंड घर धुंडाळून देखील परंतु त्याच्या हस्ती काही लागले नाही. पटाईतचे हॉल आणि आता बेडरूम उधळून लावले होते त्याने व अखेर शक्तीची नजर पटाईतच्या पीसीवर पडली. त्याने तो चालू करून पाहिला, किंतु त्याला पासवर्ड लॉक होता.

शक्तीने क्षण गमावला नाही मग. काही सापडले तर यातच आणि नाही सापडले तर एक प्रयत्न; असं मन ठाम करून शक्तीने स्क्रू ड्राइव्हर शोधून पीसीचा कॅबिनेट खोलला.

त्यातील हार्डडिस्क घेऊन शक्ती बाहेर पडला होता...

# १२. सन्मित्र...

शक्ती एका घरासमोर उभा होता. अत्यंत थकलेला, शीण असा तो बेल वाजवत होता. आपलाच भार न सहन झाल्याने त्याने आपला सर्व बोजा बेल वाजवणाऱ्या आपल्या एका हातावर टाकला होता व भींतीचा टेकू घेऊन तो उभा होता.

बेलला गोंगाट आत निजलेल्या त्या इसमाला झोपेतून खाडकन जागा करून गेला. बावचळत तो मुख्य दाराकडे पळाला.

दरवाजा खोलला, तसा शक्ती त्या माणसावर कोसळला. त्या माणसाचा नाईट ड्रेस शक्तीच्या रक्ताने भिजला.

"सर..." तो काळजीच्या स्वरात अस्फुट उद्गारला.

दुसऱ्याच क्षणी शक्ती त्या घराच्या लिव्हिंग रूममध्ये एक सोफ्यावर विसावला होता. त्याने हार्डडिस्क उंचावली.

"कदाचित इन्क्रीप्टेड असेल. कामावर लाग!" शक्ती अशक्त आवाजात त्याला बोलला.

"आधी तुमच्या तब्येतीचं बघायला पाहिजे." तो कळवळून बोलला.

"त्यापेक्षा हे महत्त्वाचं आहे. तू माझी काळजी सोड. आणि मी दिलेल्या नावाला जाग आयटी सॉर्सरर!" शक्ती कणकणलेल्या आवाजात बोलला.

"ते मी करतो. तुम्ही माझ्या बेडरूममध्ये जा. अंघोळ करा. वोडरोब मध्ये फस्ट एड पण आहे. तुमचं आवरेपर्यंत मी तुम्हाला काही खायला करतो. ते घ्या आणि जरा रेस्ट करा. तुम्ही उठाल, तेव्हा हा पेंदोराज बॉक्स तुमच्यासाठी खुला झाला असेल!" तो हार्डडिस्क वर करत माणूस म्हणाला.

"राजन; तू ऐकणार नाहीस!" शक्ती उठत म्हणाला.

"ही घाण सवय तुम्हीच लावली आहे." तो हसून म्हणाला आणि शक्तीला आधार द्यायला पुढं झाला.

शक्तीने नकारात हात उंचावला.

"मी जाईन. तू तुझं काम कर राजन!" शक्ती त्याला बोलला आणि स्वतःचं अशक्त झालेलं शरीर सावरत तो मागे वळून बेडरूमकडे चालला.

तो पायऱ्या चढून वर निघून जाताच राजनची नजर शक्तीने त्याच्याकडे सोपवलेल्या हार्डड्राइव्हकडे वळली.

ताप, संताप, क्लेश, वेदना, शीण सगळ्याचा एकत्र निचरा करायला म्हणून शक्ती शॉव्हर खाली उभा होता. त्याच्या अंगावर वाफ नाचत होती. सांगणं कठीण होतं मात्र, की पाणी गरम असल्यानं हे होतं, की शक्तीचा त्रागा वाफ बनून त्याच्या देहातून निघत होता. गोळी लागलेल्या जखमेतून देखील लालबुंद रक्त पाण्याशी स्पर्धा करत खाली उतरत होतं. कुठेतरी पाण्यात एकत्र होऊन ते बाथरूम टाईल्सवरून वाहत सांडपाण्याच्या नळाची वाट धरत होतं.

शक्ती भिंतीचा आधार घेऊन उभा होता. डोळे मिटून ध्यानात होता. अलबत त्याला जिज्ञासाची आठवण येत होती.

*'आतापर्यंत ती परत आली असेल. आपला शोध तिने चालू केला असेल, आपण शोधू नको असे पत्रात सांगितलेले असताना. सुरक्षित असली म्हणजे झालं... वेडी आहे ती... आणि त्याहून अधिक हट्टी! बिचारी कशात अडकू नये म्हणजे झालं...'* शक्तीचा मेंदू विचार करत होता,

तर त्याच मेंदूच्या दुसऱ्या कप्प्यात आतापर्यंत त्याला मिळालेल्या माहितीचा ताळेबंद मुद्देसूदपणे मांडत होता. एकाचवेळी कोमल हळवे क्षण-विचार तर, त्याचवेळी डोंगरा एवढ्या मोठ्या समस्येवर उपाय शोधण्याचे विलक्षण कसब त्याचे डोके करत होते.

अंघोळ झाल्यावर शक्तीने राजनच्या वोडरोब मधील फस्टएड काढलं. स्वतःच तो भलभळलेली जखम औषध लावून बँड एड करू लागला. जिज्ञासा सोबत राहून तो इतकं तरी नक्कीच शिकला होता.

खाली किचन मध्ये राजनचे नाष्टा बनवणे चालू होते. इतक्या कमी वेळात काय बनवावे म्हणून त्याने काही सॅंडविचेस तयार केले होते.

आणि ते घेऊन तो बेडरूमकडे आला.

शक्ती उघडा बसला होता. पट्टीची काठ मारत त्याने कात्रीने जास्तीचा घोळ कापला इतक्यात राजन आत प्रवेशाला.

"आता बरे दिसत आहात!" तो हसत मुखाने शक्तीस म्हणाला. आणि पुढे बोलला,

"मी इतका चांगला कुक नाही, पोट भरण्या इतपत चार साधारण गोष्टी करू शकतो, इतकंच. पण घ्या हे कदाचित आवडेल आपल्याला!"

"थँक्स!" शक्तीही स्मित करत बोलला.

a

कित्येक तासांनी शक्ती आत्ता प्रथम मनमोकळं हसला होता.

"खाऊन घ्या! आणि झोपा जरा. तोपर्यंत मी आपलं काम करतो!" म्हणत राजनने सॅंडविच आणलेली ट्रे प्लेट शकट शक्तीसमोर बेडवर ठेवत तो आपल्या पीसीकडे वळला.

शक्तीचे खाणे चालू असता त्याचवेळी त्याने शक्तीने दिलेली हार्डडिस्क त्याच्या पीसीला कनेक्ट केली होती.

"मे बी काही महत्त्वाचं नसेल ही, बट वी हॅव टू लूक! आणि तुझ्याशिवाय हे डिपार्टमेंट मध्ये कोणी करू शकत नाही म्हणून तुझ्याकडे आलो!" शक्ती सॅंडविच खात त्याला म्हणाला.

"तुम्ही काळजीच करू नका सर! मी आहे!" राजनने वळून शक्तीला म्हणाला.

राजन सावत हा कोल्हापूर पोलीस डिपार्टमेंटच्या सायबर क्राईम सेलचा सिनियर ऑफिसर होता, पण शक्तीचा अत्यंत विश्वासू!

राजनला सत्य-असत्य, चांगलं वाईट याची सद्सद्विवेकी उत्तम नेनिव होती. विवेकाची त्याला उच्चकोटीची जाण व त्याहून चाड होती. आणि यामुळेच राजन हा शक्तीला अत्यंत विश्वास पात्र वाटत होता.

असा विकट परिस्थितीत राजनवरच आपण विसंबून राहू शकतो हे शक्तीला बिनदिक्कत वाटत होतं आणि त्या विश्वासावरच शक्ती इथं आला होता, की इथे त्याला दगाफटका होणार नाही, ना त्याच्या जीवाला धोका असेल!

a

राजनवर सगळी भिस्त टाकून शक्ती आराम करत होता. संपूर्ण दिवस आणि रात्र शक्ती जवळपास संपूर्ण कोल्हापूर शहर भर पायी हिंडत होता सत्य शोधण्यासाठी! आणि अशात त्याला काही शारीरिक तर बऱ्याच मानसिक लढायांचा देखील सामना करावा लागला होता, समोर होणारे खून त्याने पाहिले होते. एक रात्रीसाठी हे खूप म्हणजे खूपच होते. कोणत्या सामान्य व्यक्तीसाठी हा काळदिन व ही अशी काळरात्र म्हणजे त्याचे मानस खराब झाले असते, मात्र शक्ती तगून होता. अजून प्रयत्नरत होता... सत्य शोधणं हे त्याचं अंतिम ध्येय होतं.

प्रश्न त्याचा नव्हता त्याच्यासाठी कधीच! पण त्याला या गोष्टीचं पुरेपूर इल्म (ज्ञान) होतं, की त्याने सत्य शोधण्यासाठी जीवाचे रान केले नाही आत्ता, तर कदाचित भारतीय नागरिकांना मोठ्या जीवित व वित्त हानीला सामोरे जावे लागण्याची शक्यता आहे. कदाचित भारताच्या सद्य व भावी पिढ्यान पिढ्या नष्ट, नामशेष होऊ शकतात. म्हणून तो विसवायला तयार नव्हता. पण आलेला शीण व घेतलेल्या औषधांनी त्याच्यावर अंमल करून मात करत कडी केली होती. आणि तो निजेच्या घोर अंधःकारात बुडून गेला होता. हे तरी त्याच्या भल्या स्वास्थ्यासाठीच होतं. म्हणून त्याच्या मेंदू व शरीराने या अंमलीला विरोध केला नव्हता.

इकडे राजनचे त्याच्या कॉम्प्युटर कीबोर्ड वरती खाटपाटी चालू होतं, तर तिकडे शक्ती निद्रेच्या मुशीत गाढ निजला होता.

राजन एकाग्र होता. त्याचे डोळे चष्म्याच्या काचांमधून भिंतीवर लटकत असलेल्या त्याच्या बेचाळीस इंच कम्प्युटर स्क्रिनवर लागलं होतं.

●●●

अंधाराला बाजूला सारून सूर्याचा कोमल प्रकाश धरतीला स्पर्श करत होता, आपल्या द्युती तत्वाने पृथ्वीला न्हाऊन घालत होता.

वॉर्डन बाई घाईने जाऊन जिज्ञासाच्या खोलीला टकटक करत होती.

"काय आहे मॅम?" दार उघडून जिज्ञासाने विचारलं.

"कोणी भेटायला आले आहे तुला!" वॉर्डन इतकंच म्हणाली.

आणि कोण आहे हे विचारण्याची कल्पना जिज्ञासाला न होऊन ती आनंदाने खाली पळाली.

बिचारीला वाटलं होतं शक्तीच आला आहे, पण समोरील व्यक्ती पाहून तिचा मोहरा उतरला, थोडा रागिष्ट झाला.

कडूस पडलं, तसं सुशील जिज्ञासाच्या हॉस्पिटल हॉस्टेलला येऊन धडकला होता.

"तुम्ही इथं?" ती नाराजीने त्याला म्हणाली.

"हा. तुम्ही पत्ता दिला नाहीत, पण तो मला मिळणारच नव्हता असं नाही ना!" तो कुचकट हसला.

"मला तुमच्याशी काही वार्ता करायची नाही!" जिज्ञासा ठाम बोलली.

"पण मला बोलायचं आहे. आपलं आवरलं असेल, तर तुम्हाला आत्ता या क्षणी माझ्यासोबत यावं लागेल!" सुशीलही तितकाच ठाम होता.

जिज्ञासा जागची हलली नाही.

"आपल्याला आवरायला वेळ हवा असेल, तर मी वाट पहायला तयार आहे!" तो हसून पुढे असा म्हणाला, की जणू तो तिला चिडवत आहे.

जिज्ञासा मग बेमनानेच सुशीलने आणलेल्या गाडीत जाऊन बसली. सुशील मनाशीच हसला आणि त्याने स्टेअरिंगचा चार्ज घेतला. गाडी वळून मार्गस्थ झाली.

◆◆◆

गाडीत, जिज्ञासा संतापून बसलेली होती. सुशील मात्र ओठांवर स्मित घेऊन बसून होता. रियर व्ह्यू मिरर मधून त्याची नजर जिज्ञासावर होती.

गाडी लागली ती एका नजीकच्याच रेस्टॉरंटला. येतानाच सुशीलने ते हेरून ठेवलं होतं.

जिज्ञासा गोंधळली.

"असं कोड्यात पडू नका. उतरा." सुशील आपला सीटबेल्ट काढत म्हणाला.

"मला वाटलं, तुम्ही मला पोलीस हॅडकोर्टर्सला नेत आहात चौकशीला... तुम्ही मग मला इथं का आणलं आहे?" जिज्ञासा थोडी रागे विचारत होती.

"चौकशी करण्याची माझी पद्धत जरा वेगळी आहे." तो हसून म्हणाला आणि गाडीतून उतरला.

जिज्ञासा तशीच बसून होती.

a

"चला लवकर. पूर्ण दिवस नाही माझ्याकडे!" सुशील हसत म्हणाला.

"यू कॅन नॉट हॅरॅस मी लाईक धिस!" ती फणकाऱ्याने बोलली.

"घ्या! एकतर तुम्हाला ब्रेकफास्टला घेऊन या आणि असलं काही तरी ऐका! एक सांगून ठेवतो मिस, जर तुम्ही को-ऑपरेट केलं नाही, तर सरकारी कामात व्यत्यय आणला म्हणून मी तुमच्यावर कायदेशीर कारवाई करू शकतो." तो तिरकस बोलला.

जिज्ञासा मग गाल फुगवूनच उतरली आणि तिने दार जोरात लावून दिले.

"गाडी माझी असती तर मला नक्कीच वाईट वाटलं असतं." सुशील कुचकट हसून जिज्ञासाला डिवचत बोलला.

आणि तो रेस्टॉरंटकडे चालला. जिज्ञासाला अजूनच राग आला.

रेस्टॉरंट सकाळ असल्याने तसं रिकामं होतं. सुशीलनेच स्वतः ऑर्डर दिली. जिज्ञासा काही करू शकत नसल्याने गुश्शात रागिष्ट बसून होती.

ऑर्डर घेऊन वेटर गेला, तसा सुशील बोलला,

"माफ करा स्वतःच ऑर्डर दिली. मला यात वेळ घालवायचा नव्हता!" आणि तो हसला.

"हे बघा, तुम्ही माझा सतत अपमान करायला बोलवलं आहे का? काय ते विचारा आणि मला मोकळं करा. माझ्याकडेही पूर्ण दिवस नाहीए!"

"मी तुम्हाला सुचवेन, थोडे दिवस हॉस्पिटलमध्ये जाऊ नका. शक्तीसेन यांच्यावर जे आरोप आहेत, त्याचा परिणाम थेट तुमच्यावर होऊ शकतो.

हॉस्पिटल ऑथोरिटीज कडून त्रास होऊ शकतो. पेशंट्स कडून तक्रार होऊ शकते, की तुमच्याकडून उपचार नकोत. आणि त्यावरून तुमच्या मानसिक स्वास्थ्यावर असर होऊ शकतो! शिवाय तुम्हाला चिडलेल्या लोकांकडून इजा होण्याचीही शक्यता आहे." तो थोडं गंभीर म्हणाला.

"आश्चर्य आहे, की तुम्हाला माझी काळजी वाटते मिस्टर! पण मी हे नाही करू शकत. मी जर स्वतःहून कामावर जाणं बंद केलं, तर शक्तीला तिथले सगळे खरंच गुन्हेगार समजतील, तर्क करतील, की त्याने नक्कीच काहीतरी केलं असणार! नाहीतर मी असं तोंड लपवलं नसतं. भले त्यांनी मला काढून टाकोत, पण मी आपणहून जाणं नाही थांबवणार! मला माझ्या अवहेलनेची चिंता नाही. पण माझ्या कृतीने शक्तीला कोणी बोल लावलेलं मला खपणार नाही!" ती निश्चियी बोलली.

सुशीलने प्रभावित होत भुवया उडवल्या.

"बाय द वे तुमची भेट कशी झाली?" सुशीलने विचारलं.

"पर्सनल लाईफ बद्दल तुम्हाला सांगावं अस नाही वाटत मला!" ती रागे म्हणाली.

"आणि मी म्हणालो, हा चौकशीचा भाग आहे, तर?" तो हसला.

तिने एक उसासा टाकला. एकदा काय ते याला सांगून यांच्यापासून सुटका करून घेऊ म्हणून मग ती बोलली,

"हॉस्पिटलमध्येच! एका दहशतवादी कारवाई दरम्यान तो जखमी झाला होता. त्याने तरी त्या दहशतवाद्यांना हातच जाऊ दिलं नव्हतं!"

"

a

इतक्यात वेटर ऑर्डर घेऊन आला. ओटमील-आमंड प्रोटीन पॅनकेक्सच्या डिशेस आणि चॉकलेट-पीनट बटर प्रोटीन शेकचे दोन ग्लास त्याने त्यांच्यासमोर व्यवस्थित मांडल्या.

"घ्या!" सुशील बोलला.

वेटर रिकामा ट्रे घेऊन त्यांना एकांतात सोडून निघून गेला. जिज्ञासा कृतीत आली नाही.

"संकोचू नका. घ्या!" तो पुन्हा म्हणाला.

जिज्ञासाने डिश अजून नजीक ओढली.

"तुम्ही डॉक्टर आहात, अवश्य हेल्थ कॉन्शियस असाल असं वाटलं, म्हणून हलका नाष्टाच मागवला." सुशील हसून म्हणाला.

"थॅंक्स!" जिज्ञासा भावना रहित बोलली. तिच्या मनात व डोक्यात शक्तीचाच विचार घोटाळत होता.

तो काही खाऊ शकला असेल, का? कुठे असेल तो? काय करत असेल? त्याला काही इजा तर...?

विचार चालू असताच तिच्या डोळ्यांतून अश्रूबिंदू ओघळले. तिने ते आपसूक टिपले. तिने याची काळजी घेतली होती, की सुशीलच्या हे ध्यानी येऊ नये. पण त्याचा काही उपयोग झाला नव्हता. सुशीलच्या पोलीसी नजरेतून हे सुटणं शक्य नव्हतं, तेव्हा तर नक्कीच नाही, जेव्हा तो जिज्ञासाच्या अगदी नजदीकच बसला होता.

"शक्तीसेन खूप भाग्यवान आहेत, त्यांना तुमच्यासारखी जीवनसंगिनी मिळाली आहे. मला कौतुक वाटतं तुमचं, तुम्ही त्यांच्यासाठी झगडत आहात. त्यांना शोधण्यासाठी जीवाचा एवढा आकांत करत आहात. पण मला खेद आहे, कदाचित शक्तीसेन यातून वाचणार नाहीत!" तो निर्णायक बोलला.

जिज्ञासाला खाडकन भानावर आल्यासारखं झालं. तिच्या डोळ्यांत अधिकच पाणी उभारून, दाटून आलं.

"सध्या त्याची काळजी करू नका. इट इट. चांगलं आहे!" सुशील नाष्टा चावत बोलला. तो पुन्हा आपल्या बेफिकरी मूळ पदावर केव्हाच आला होता.

●●●

शक्तीला जाग आली. त्याने बाजूच्या टेबल वरचं गजर घड्याळ पाहिलं. दहा वाजून गेले होते. आपण जास्तच झोपलो याचं त्याला आश्चर्य वाटलं. कालच्या त्रासिक घटनांनी आलेला थकवा शरीराने भरपूर झोप घेऊन भरून काढला होता. त्याची नजर पुढे गेली. राजन देखील त्याच्या कीबोर्डवरच डोके ठेवून निजला होता. रात्रभर त्याने डोके आणि डोळे खपवले असणार हे शक्तीला लक्षात आलं. आणि आपल्यासाठी कोणत्याही फलाशारहित राबणाऱ्या या आपल्या लोकांचे ऋण आपण कसे फेडणार आहोत हेच त्याला समजेनासे झाले.

तिकडे फ्रान्सिस आणि इथे हा राजन. आणि असे बरेचजण शक्तीच्या भल्याची कामना करत होते. आणि शक्ती त्याच्या उपकरखाली स्वतःला कृतज्ञ समजत होता.

a

शक्तीला घाई होती, तरी देखील त्याने राजनची झोप पूर्ण होऊ दिली. तो निजेतून जागा होईस्तोवर शक्ती बसून राहिला.

काही काळांती राजन जागा झाला.

"गुड मॉर्निंग!" शक्ती कृतज्ञ हसत त्याला म्हणाला.

आणि राजन भानावर आला. त्याला काल रात्रीची खरेतर आज पहाटेची जाण आली. जखमी शक्ती आपल्या घरी आला होता.

"गुड... गुड मॉर्निंग सर..." तो पुटपुटला.

आणि त्याला अजून एक जाण आली, ती शक्तीने त्याच्यावर सोपवलेल्या कामाची!

तो लगबगीने उठला. आणि तसाच घाईने शक्तीकडे झाला.

"यू वोन्ट बिलिव्ह सर, मला काय सापडलं आहे?!" तो म्हणाला.

"मला विश्वास बसणार नाही? अरे अशा अतार्किक गोष्टी सध्या घडत आहेत माझ्यासोबत, मला विश्वास बसणार नाही असं अलौकिक आता सध्या तरी काही असेल असे मला वाटत नाही. तू बोल!" शक्ती वेदनारहित हसत बोलला.

"सांगतो सर. तुम्ही म्हणाला होतात तशी ही हार्डड्राइव्ह खरंच इन्क्रीप्टडेड होती. इट वॉज हार्ड टू क्रॅक!" राजन बोलला.

"पण तरी तू ते केलंस! माझा विश्वास सार्थ ठरला तर. तूच हे काम करू शकत होतास!" शक्ती त्याच्या प्रशंसा करत हसला.

"थँक्स सर. पण माहिती चिंतेची आहे. असं मला तरी वाटतं. काही तरी गडबडीचं प्रकरण आहे नक्की!" राजन चिंतीत बोलला.

"हो म्हणून तर मला अडकवण्यात आलं आहे. तू बोल!" शक्ती गंभीर झाला.

"हा खरंच एक पेंदोराज बॉक्स निघाला बॉस! हा उघडला आणि समजलं, की भारतात कदाचित सॉरो, डिजीज, मॅडनेस, ग्रीड, वायलेन्स, आणि मृत्यूचं द्वार इघडल गेलं आहे... फक्त म्हातारपण येणार नाही कदाचित, कारण म्हातारे होण्यासाठी कोणी जिवंत शिल्लक राहिल की नाही हीच शंका आहे..." काळजीने युक्त राजन घाबरा बोलला.

"असं काय भयानक आहे त्या पेंदोराज बॉक्स मध्ये?!" शक्तीची उत्सुकता पण भीतीने व्यापून टाकली काही क्षणी.

मग राजनला जे समजलं आहे ते गूढ सांगण्यापूर्वी त्याने एक दीर्घ श्वास घेऊन स्वतःला सज्ज केलं... काही काळ त्याने मौन बाळगले. शब्द आणि वाक्यांची तो जुळवाजुळव करत होता. आणि तिकडे शक्तीची उत्कंठा शिगेला लागली होती...

a

# १३. पायदान...

सुशीलचा मोबाईल वाजला. त्याने मोबाईल पहिला, तर फ्रान्सिसचा कॉल होता.

*'हा का फोन करतोय?'* सुशील मनाशीच म्हणाला.

"यू इट!" तो जिज्ञासाला म्हणाला आणि त्याने कॉल रिसिव्ह केला.

"हा... बोला मिस्टर डी'कुन्हा! काय झालं? सकाळी सकाळी आठवण काढलीत?!" आपल्या मूळ खेळकर व अधिक खोडकर अविर्भावात सुशील बोलला.

फ्रान्सिस एका घरात उभा होता... पटाईतच्या! मेलेला पटाईत त्याच्या समोर पडला होता. आणि त्याचा पंचनामा चालू होता. त्याच्या मृत शरीराभोवती चॉकची आकृती रेखण्यात आली होती, काही फोटोग्राफर्स फोटो काढत होते, त्या निश्चल देहाचे व संपूर्ण घराचेही... तर फॉरेन्सिक ते शरीर तिथल्या तिथे एग्झमीन करत होती.

"रफिक पटाईत मेला! खून झालाय त्याचा! लोकेशन पाठवतोय. लवकर पोहोचा!" फ्रान्सिस थंड व तीक्ष्ण कठोर आवाजात बोलला.

शांत आणि खेळकर स्वभावाचा हा सुशील मकवाना फ्रान्सिसचं वक्तव्य ऐकून उडालाच! तो चाट पडला. गडबडला. त्याची विचलता

जिज्ञासाच्या ध्यानी आली. फ्रान्सिसने पलीकडून फोन कट केला असल्याने सुशीलचा हात खाली आला.

"फ्रान्सिस यांचा फोन होता?" जिज्ञासाने प्रश्न केला.

चिंतीत सुशीलची मान होकारात हलली.

"काय म्हणाले?" जिज्ञासाने काळजी व भीतीने विचारलं. तिच्या मनात विपरीत आलं होतं, की कदाचित शक्तीलाच तर काही....?

"थोडं अर्जंट आहे, जावं लागेल. माफ करा तुम्हाला काही सांगू शकत नाही."

"शक्तीबद्दल काही?..." ती घाबरे विचारती झाली.

एक हसू त्याच्या ओठांवर रेंगाळलं.

"तूर्तास नाही. काळजी करू नका." त्याने तिच्या मनाची भीती घालवली.

"प्लिज तुम्ही स्वतः जा. मी तुम्हाला सोडू शकत नाही. मला लगेचच गेलं पाहिले." तो पुढे म्हणाला आणि लगोलग काऊंटर कडे पळाला. बिल पे करून त्याने रेस्टॉरंट सोडलं देखील. इकडे टेबलपाशी, जिज्ञासा आजूनच चिंतीत होऊन बसून होती. तिची नजर सुशील निघून गेलेल्या दाराला लागून होती...

◆◆◆

"सर, या हार्डडिस्कच्या स्टोअर्ड माहिती नुसार उत्तराखंड मधील 'बगजाता' येथील युरेनियमची जी अंडरग्राऊंड खाण आहे, तिथून अर्धा किलो रॉ युरेनियम बाहेर आणलं गेलं आहे." राजनने चिंतीत सुरात खुलासा केला.

"म्हणजे युरेनियम कोल्हापूर मध्ये अलबत आहे आणि हे यावरून स्पष्ट आहे..." शक्ती विचारात पुटपुटला.

"पण सर... ही जी 'अध्वर्यू युरोकॉर्प्' कंपनी आहे, ती भारत सरकारच्या युरेनियम कॉर्पोरेशन ऑफ इंडिया या पीएसयु सोबत टाय-अप मध्ये तिथे उत्खनन करत आहे आहे. सरकार कडूनच त्यांना युरेनियम उत्खननाचा परवाना मिळाला आहे. पण असं आहे, तर हे इतक्या मोठ्या प्रमाणात युरेनियम खाणीतून लंपास केलं आहे हे सरकारला ठाऊक नसेल? हे शक्यच नाही..." राजनने आणखी एक भीती व्यक्त केली.

"आणि... जर सरकारच यात सामील असेल तर?!" शक्ती करड्या नजरेने तीक्ष्ण आवाजात राजनला बोलला.

शक्तीचं हे संबोधन राजनसाठी एक मोठा स्फोट साबित झालं. अगदी अणुबॉम्ब इतका.

आणि त्याचं डोकं भण्ण झालं!

"आपल्याला काय म्हणायचंय सर...?" तो घाबरून कापरे बोलला.

"एसपी सरांचा तसा तर्क आहे! मला या प्रकरणात दोषी ठरवण्यात केंद्रीय गृहखात्याचा हात आहे अशी त्यांची शंका आहे. आणि आता तर पटाईतच्या या रेकर्ड्स वरून शंकेला ठोस जागा नक्कीच झाली आहे. पण असं असेल, तर का? आपल्याच खाणीतून युरेनियम चोरण्याची काय गरज पडली

सरकारला? आणि त्यात मला अडकवण्याची आवश्यकता का भासावी? जर अडकवायचंच होतं, तर कोणत्याही ऑफिसरला किंवा इंटेलिजन्स एजंटला अडकवणं सरकारला सहज सोपं आहे, आणि तेही दिल्लीतल्या दिल्लीत. किंवा कुठेही, पण मग दिल्लीपासून इतक्या दूर कोल्हापूरातल्या मलाच का? नक्कीच काहीतरी किंवा कोणीतरी अगदी महत्त्वाचं आहे इथं... ज्याला ते युरेनियम पोहोचतं करायचं होतं, पण ते त्यांच्यापर्यंत पोहचण्याआधी कुठेतरी गहाळ झालं, किंवा कदाचित चोरी झालं. त्याशिवाय हे सगळं कोल्हापूरात घडण्याचं काही कारण नाही. कोणती कन्स्पिरसी जन्माला घालत आहेत हे सत्ताधारी?" शक्तीही बुचकळ्यात पडला होता.

तूर्त तरी शक्तीला या प्रश्नांची उत्तरे फक्त तर्काच्या आधारे मिळणार नव्हती. त्यामुळे त्याने सध्या तो नाद सोडला. आणि पुढील माहितीतून काही साध्य होतं का व नवीन माहिती हाती लागली, तर त्यांतून प्रश्नाचे समाधान होते का ते पहावे यास्तव मग त्या प्रश्नांतून स्वतःला बाहेर काढत शक्तीने राजनकडे पाहिलं.

"पण तुला हे विचित्र नाही वाटत, की एका बॉडीगार्डकडे एवढी कृशियल आणि कॉन्फिडेन्शियल माहिती असावी? आणि ती सुद्धा इन्क्रीप्टड केलेली... तुला या पटाईत बद्दल काही सापडलं नाही त्याच्याच असलेल्या हार्डड्राइव्ह मध्ये?" शक्तीने राजनला प्रश्न केला.

"कमिंग टू दॅट सर, द इन्फो विल शेक यु..." राजन बोलला.

"का? असं काय आहे?" शक्ती अधिकच चिंताग्रस्त झाला.

आता स्फोट करण्याची बारी राजन सावत यांची होती.

a

"पटाईत हा त्या कंपनीचा अदृश्य मालक आहे." तो घोर बोलला.

"व्हॉट?" शक्ती अविश्वसाने ओरडला.

"हो सर. त्याच्या हार्डड्राइव्हवर कंपनीच्या सर्व आर्थिक व्यवहारांची बॅलन्स शिट, सरकार व इतर प्रायव्हेट कंपन्यांसोबतचे करार वगैरे अशा अनेक कॉन्फिडन्शियल गोष्टी मिळाल्या आहेत. म्हणून मलाही आपल्यासारखीच शंका आली. आणि मी याची हिस्ट्री तपासली. तर मला समजले, की रफिक पटाईत हे त्याचं बदललेलं नांव आहे."

"छद्म नांव?"

"नाही. त्याने नांवच बदलून घेतलं आहे. त्याचं पूर्वीचं नांव होतं, जतीन अध्वर्यू!"

"आणि त्याच्या पुर्वेतिहास काय आहे?"

"त्याच्यावर एका महिलेचा विणयभंग करण्याचा गुन्हा दाखल झाला होता. ही केस चालू असतानाच कंपनीत खूप मोठे मोठे फ्रॉड्स झाले असल्याचं देखील बाहेर पडलं. त्यामुळे अध्वर्यू युरो-कॉर्पच्या फायनान्सर्सनी आपापले फायनान्स काढून घ्यायला सुरुवात केली. कंपनीचे शेअर्स खूप मोठ्या प्रमाणात पडले. आणि म्हणून मग जामिनावर बाहेर असलेल्या जतीन अध्वर्यूने लोकापवादाचे भय बाळगून आत्महत्या केल्याचं चित्र उभं केलं गेलं. नंतर याने आपलं नांव आणि अपियरन्स बदलून तो राहू लागला. आणि या सगळ्यात त्याला मदत केली, ती..."

"सरकारने!" शक्तीने राजनचं वाक्य गंभीरपणे पूर्ण केलं. तो कमालीचा थंड झाला होता.

a

"आपल्याला कसा अंदाज लागला सर?" राजनने संभ्रमित प्रश्न केला.

"साहजिक नाही का? अध्वर्यू हे सत्तेत असलेल्या जनहित पक्षाचा मोठा डोनेटर आहे. त्याची चामडी तर हे वाचवणारच ना! आणि सरकारच्या मदती शिवाय आत्महत्येचा फार्स उभारणं आणि नंतर दुसरी आयडेंटी तयार करणं हे सगळं थोडीच शक्य आहे? आणि आताही जे होतंय, त्यात केंद्र सरकार आणि हा यांचं साटंलोटं उघड दिसतच आहे. मग त्याला मदत करणारं सरकारच आहे याचा तर्क करणं काय कठीण राजन?!" शक्ती बोलला.

"सर, हे सगळंच फिशी आहे..." राजन खूपच उद्विग्न झाल्याचं शक्तीच्या लक्षात आलं.

"जे घडतंय, जे घडू पाहतेय ते जनहितकारी नाही हे तर आता उघडच आहे..." शक्ती नाराज बोलला.

"हो सर... म्हणूनच म्हटलं, की ही हार्डडिस्क खरंच पेंदोराज बॉक्स साबित झाली आहे..." राजन देखील कष्टी होता.

"अलबत नक्कीच. नाही तर यात या गुन्हेगार अध्वर्यूला सरकारने हाताशी धरलं नसतं. अध्वर्यू युरो-कॉर्पचा आणखी एक मालक आहे ना? जनक अध्वर्यू?!" शक्ती बोलला.

"हो. जतीनचा मोठा भाऊ." राजनने पुष्टी केली.

"तो आणि ही पूर्ण कंपनी देखील यात सामील आहे. बरोबर ना?" शक्तीचा सवाल.

"हो सर. त्याशिवाय युरोनियम खाणीतून बाहेर इथपर्यंत आलंच नसतं." राजनने दुजोरा दिला.

"मग त्यांची पण माहिती काढ."

"ते करतोच सर, पण आता एक महत्त्वाची गोष्ट तुम्हाला दाखवायची आहे..." राजन जरा संकोचत बोलला.

"बोल ना." शक्तीने त्यास अभय दिलं.

तसा राजन आपल्या कम्प्युटर सेट-अप कडे वळला. आणि त्याने एक व्हिडिओ प्ले केला.

त्या व्हिडिओत -

*रात्रीची वेळ होती. दोन जणांचा एक जथ्था शक्तीच्या अपार्टमेंटच्या पायऱ्या चढताना त्यात दिसत होते. त्यांच्या मागे एकजण सतत कानाला हात लावून काही ऐकण्याचा प्रयत्न करत होता. त्याचा वर झालेला फक्त हातच त्या व्हिडिओत दृष्यमान झाला. उघड होतं, की याच्या कानात इयरपीस होता, व त्याला पलीकडून काही इन्स्ट्रक्शन्स दिल्या जात होत्या व त्याच तो ऐकण्याची कोशीष करत होता आणि त्याप्रमाणे तो आपल्या साथीदारांना कृती सांगत होता.*

शक्ती समजून चुकला, की हे रेकॉर्ड होत आहे याचा अर्थ लाईव्ह कॉल करणारी तिसरी व्यक्ती देखील तिथं होती, जी हे लोक काम नीट करत आहेत का हे पाहण्यासाठी व ते लाईव्ह करून आपल्या बॉस पर्यंत म्हणजेच जतीनपर्यंत थेट प्रक्षेपणातून पोहोचवत होती. त्यानुसारच जतीन फोनद्वारे त्या व्यक्तीला सूचना करत होता. जतीनचा चेहरा खाली उजवीकडे एक चौकोनात झळकत होताच. अंधारात बसून तो हे सर्व पाहत व त्या लोकांना कार्यकारणी सूचित करत होता.

a

आपल्या फ्लॅट जवळ हे नक्की काय करताहेत हे तो अधिक काळजीने पाहू लागला... व्हिडिओत पुढे -

*दुसऱ्या व्यक्तीने फ्लॅट मास्टर की ने बेमालूम उघडला. आणि सोबतच्या दुसऱ्या व्यक्तीने त्याच्याकडे अभिमानाची नजर टाकली. दाराचे लॉक खोलणारा देखील आत्मप्रौढीने त्या आपल्या साथीदाराकडे पाहत होता.*

*मग लाईव्ह करणाऱ्याने त्यांना डिवचले आणि वेळ न घालवता घरात होण्यास इशारा केला.*

*ते दोघे दार उघडून आत झाले व तसाच मागील इसम देखील आत शिरला.*

*"पटकन ते पॅकेट ठेवा आणि चला!" मोबाईल वरून लाईव्ह करणारी ती व्यक्ती हळू पण दणकट आवाजात गुरगुरली,*

*"आणि असं लपवा, की ते लपवलं गेलं आहे असं वाटावं!" तो पुढे दरडावला.*

*आणि मग काही उत्तम कल्पना सुचवल्या सारखी त्या दोघांतील एकाने सोफ्याच्या रुख केला. दुसऱ्याला आपल्याजवळ बोलावले. त्याच्याकडील ते युरेनियमचे पॅकेट घेऊन त्याने सोफ्याच्या बसण्याच्या व टेकण्याच्या कुशन्स दरम्यान जी पोकळी असते, तीत ती छोटी प्लास्टिक बॅग सरकवली.*

*"विस्कळीत असू द्या! नाही तर पोलिसांना शोधायचं कुठं ते कसं समजेल?" जतीनचा आवाज त्या लाईव्ह करणाऱ्याच्या कानात घुमला.*

*तक्षणी त्याने पुढील दोघांना कठोर आवाजात आदेश केला.*

a

*"कुशन जरा वरच असू द्या!" तो बोलला.*

*तसं मग दोघांनी चित्र उभा केलं आणि मग लाईव्ह करणाऱ्या व्यक्तीने त्यांना चलण्याचा इशारा केला. ते दोघे पटकन दाराकडे झाले आणि*

*"काम झालं बॉस! ठेवतो!" म्हणून त्याने लाईव्ह कॉल कट केला आणि इकडे व्हिडीओ देखील बंद झाला.*

आपल्याला युरेनियमच्या तस्करीत अडकवण्याचा हा मोठा प्लॅन दिसतोय."

"फ्रान्सिसला फोन लाव!" शक्तीने त्याला जवळजवळ आज्ञाच दिली.

राजनने विनाविलंब फ्रान्सिसला फोन घुमवला.

तिकडून फोन उचलला जाताच,

फ्रान्सिस सर! कुठं आहात?" राजनने चिंतीत विचारलं.

*"इथे शाहूपुरीत आहे. का? काय झालं?"* फ्रान्सिसचा प्रतिप्रश्न.

"एकटे आहात? नसाल, तर जरा बाजूला या." राजन त्याला सूचित करत बोलला.

पोलिसांच्या घोळक्यात असलेला फ्रान्सिस शंकीत मनोधारणेने त्यांच्यातून जरा बाजूला झाला.

"काय झालंय?" तो चिंतीत हळू बोलला.

*"शक्ती सर बोलणार आहेत."* राजन तिकडून बोलला.

शक्तीचं नांव ऐकताच फ्रान्सिस असहज झाला. तो स्तब्ध उभा राहिला.

इकडे राजनकडून शक्तीने फोन खेचून आपल्या कानाला लावला होता.

"मला कळलंय, की मला युरेनियम चोरीच्या प्रकरणात अजून अडकवण्यासाठी माझ्या घरी युरेनियम ठेवलं गेलं आहे. पोलिसांकडून काही हालचाल यावर?" शक्तीने त्याला थेट प्रश्न केला.

"होय सर... आपल्या घरी काल रेड केली आहे हे डिपार्टमेंट मध्ये सर्वांना माहीत आहे, पण तिथं युरेनियम सापडलं असल्याची बातमी काही आऊट झाली नाही अजूनपर्यंत तरी..." फ्रान्सिस कचरत बोलला.

"स्ट्रेंज आहे! रेड कुणी कंडक्ट केली होती?"

"एसपी सर होतेच, पण रेड करण्याची सर्व ओथोरिटी ही एनआयएचे सिनियर इन्वेस्टीगेटर सुशील मकवाना यांच्याकडे होती."

"आणि याबाबद्दल मला कुणीच काही बोललं नाही. ना एसपी, ना कालपासून तू!" शक्ती नाराज झाला.

"आपल्याला अजून मानसिक त्रास नको म्हणून... कदाचित एसपी सर यांचा देखील तोच विचार असावा..." फ्रान्सिस घाबरत बोलला.

"आणि तुला वाटतं, की याने मला मदत होईल? माझ्यावर काय काय आरोप लावले जात आहेत हे मला समजलेच नाहीत, तर मी त्यांचे खंडण कसे करणार आहे? आणि इथं माझीच माणसं माझ्यापासून हे सगळं लपवून ठेवत आहेत..." शक्ती थोडं चिडला होता.

"तसं नाही सर... आपली काळजी आहे म्हणून..." फ्रान्सिस समजवत होता.

a

"माझी काळजी वाटते, तर प्लिज मला सांगत जा जे घडतंय ते. त्यानेच मला मदत होईल." शक्ती रागे बोलला.

"स... सॉरी सर..." फ्रान्सिसने अपराधी भावनेने माफी मागितली.

"मी तुझ्यावर विश्वास ठेवायचा आहे की नाही तेवढं मला सांग!" शक्ती जर कठोरच बोलला.

"असं का बोलता सर..." फ्रान्सिस दुखावला.

"हे बघ फ्रान्सिस, डिपार्टमेंट मध्ये मोजकेच लोक आहेत ज्यांच्यावर माझा पूर्ण विश्वास आहे. आणि त्यांतील एक तू आहेस! प्लिज जे काय होत असेल तिथे ते मला कळवत जा."

हो... हो सर..." शक्तीचा मोलाचा विश्वस पुनः संपादन करणे हेतू फ्रान्सिस अजिजीने बोलला.

फ्रान्सिस हळवा आहे हे शक्ती जाणून होता, आणि त्यामुळे त्याने जे केले ते आपल्या काळजीपोटी हे शक्ती ओळखून होता, त्यामुळे त्यानेही फ्रान्सिसला माफ केलं.

"आणि जिज्ञासाची काही खबरबात? कुठे आहे ती?" शक्तीने फ्रान्सिसला विचारलं.

"त्या काल रेड केली तेव्हा घरीच होत्या. त्यांनी तुमच्या चौकशीसाठी त्याआधी फोन पण केला होता. बिचाऱ्या खूप काळजीत आहेत तुमच्यासाठी." फ्रान्सिस दुःखी बोलला.

"कुठे आहे ती आत्ता?" शक्तीने उत्तेजित होत विचारलं.

"रेड नंतर त्यांच्या हॉस्पिटलच्या हॉस्टेलला एसपी सर त्यांना सोडून आले होते." फ्रान्सिसने खुलासा केला.

पण त्यानंतर काय झालं ते माहीत नसल्याचं तो बोलला.

"पण सर, त्यानंतर त्या अजून तिथंच आहेत का हे मात्र माहीत नाही. दुसरी गोष्ट सर, आता मी शाहूपुरीत आहे. सुलेमान तोपचीचा बॉडीगार्ड पटाईतच्या घरी. त्याचा खून झाला आहे सर. आणि त्याच्या घरच्या सीसीटीव्ही फुटेज मध्ये तुम्ही त्याच्या खुनाच्या आधी घरात प्रवेश करताना दिसत आहे... त्यामुळे त्याला पण तुम्हीच मारल्याचा संशय व्यक्त केला जात आहे..."

"मला त्याविषयी कल्पना होतीच. पण मी त्याला नाही मारलं!" शक्ती ठाम बोलला.

"ते आलंच सर! तुम्ही स्पष्टीकरण देण्याची गरज नाही!" फ्रान्सिस समंजस बोलला.

"थँक्स! किप मी इंफॉर्म्ड्." शक्ती त्याला बोलला आणि शक्तीने फोन कट केला.

"काय झालं सर?" शक्तीचा चिंतीत मोहरा पाहून राजनने विचारलं.

"पटाईतच्या खुनाचा आरोप!" शक्ती थंड सुरात बोलला.

"म्हणजे जतीन अध्वर्यूचा खून?" राजन गारठला.

"होय! माझ्या समोरच त्याला कुणीतरी मारलं आहे." शक्ती खात्री देत स्पष्ट बोलला.

"काय लोकं आहेत ही... इतक्या मोठ्या माणसाला मारायला देखील कमी केलं नाही!"

"सामन्यांच्या नजरेत तो होता फक्त एक बॉडीगार्डच ना! जतीन तर केव्हाच मेला आहे. आणि शिवाय या खुनाच्या आरोपात अडकवण्यासाठी एक सावज आहेच, तो म्हणजे मी!"

"पण सर, ज्यांनी हे केलं त्यांना तर माहीत असेलच ना... की हा कोण आहे?!"

"जर सरकारने किंवा जनक अध्वर्यूने जतीनला मारलं नसेल, तर जतीनची खरी आयडेंटिटी त्याच्या खुन्याला माहीत असण्याचं कारण नाही." शक्ती त्याचा खात्रीशीर तर्क बोलला.

"पण मग त्याला मारलं कोणी असेल? सरकार? जनक? की आणखी कोणी?"

"त्यांनी ज्यांना त्याच्याकडून धोका वाटत असावा. आता ते कोण? हे शोधून काढावं लागेल! माझ्या डोक्यात आणखी एक नांव येतंय... जिग्नेश ओसवाल! रफिक पटाईत उर्फ जतीन अध्वर्यू याच्या घरी जाण्यापूर्वी मी त्यालाच भेटलो होतो. हा जिग्नेश जर मेला नसेल, तर त्याने पटाईतचा खून करण्याची मोठी शक्यता आहे! आणि त्याला पटाईत हा जतीन अध्वर्यू आहे हे माहीत असेलच असं नाही. त्याची शक्ती इतकी मोठी नाही, की तो अध्वर्यू सारख्या जायंटला मारण्याची गुस्ताखी करेल." शक्ती तर्क बोलला.

"जिग्नेश जिवंत आहे का हे कन्फर्म केलं पाहिजे!" राजन विचारी बोलला.

"तू हे करू शकतोस? कारण तोच जतीनचा खुनी असला, तर प्रश्नच मिटला. आत्ताच्या घडीला हाच असा आहे ज्याला आपण इन्वेस्टीगेट करू शकतो. आणि तो जर जतीनच्या खुनात इनोसेंट सापडला, तर मग हे सरकारचं किंवा अध्वर्यू कंपनी कडून कुणाचं तरी काम असल्याचं तरी किमान स्पष्ट होईल." शक्ती राजनला आपला तर्क वदला.

"तो ज्या एरियात राहतो, तिथले म्युनिसिपल सीसीटीव्ही फुटेज आपलं कंट्रोल रूम एक्सेस करू शकतं. त्यावरून जिग्नेश ओसवालचं करंट स्टेटस कळेल आपल्याला." राजनने पर्याय काढला.

"देन डू इट एसॅप!" शक्तीने त्याला हुकूम सोडला.

तसा राजन कामाला लागला. त्याने कंट्रोल रूमला फोन घुमवला...

◆◆◆

रफिक पटाईत याचे निष्प्राण शरीर आहे तसेच खडूने आखलेल्या कोंडल्यात पडून होते. पंचनाम्यासाठी आलेल्यांचे काम पूर्ण झाल्याने ते आता इथून हलले होते. एकटा सुशील मेलेल्या पटाईतला पाहत उभा होता.

"तुम्ही याला चौकशीसाठी भेटणार होतात, पण भेटला नाहीत..." मागून पुढे येत फ्रान्सिस सुशीलच्या कानात बोळ्यासारखा बोलला.

"काय तुम्ही मुद्दाम याला भेटणं टाळलंत? काय तुम्ही मुख्य आरोपींना सामील आहात असेच आम्ही समजायचे का?" तो सुशीलवर दोषारोप करत होता.

a

सुशीलला राग आला नाही. उलट तो हसला आणि फ्रान्सिसकडे वळला.

"वेल प्लेड मिस्टर फ्रान्सिस डि'कुन्हा! मला माहित आहे तुम्ही माझ्यावर आरोप का करत आहात! पण याने काही फायदा होणार नाही!"

"मला तुम्हाला फक्त ही जाणीव करून द्यायची होती, ती कोणी आरोप करत असलं आणि आपल्या प्रमाणिकपणावर संशय घेत असलं, की कसं वाटतं?!" फ्रान्सिस त्याला कठोर बोलला.

"पण विसरू नका, शक्तीसेन नाईक यांच्या विरुद्ध पुरावे आहेत, साक्षीदार आहेत!" सुशील हसला.

"कोण साक्षीदार? जिग्नेश ओसवाल? तो स्वतः एक आरोपी आहे. आणि शिवाय तो तसा नाही असं धरलं, तरीही त्याच्या जबाबला तुम्ही काऊंट करणारा कोणता पुरावा, किंवा साक्षीदार शोधलात? उलट तपासणी केलीत त्याच्या जबाबाची? क्रॉस चेक केलंत जे समजलं त्याला? यातलं काहीच केलं नाहीत तुम्ही!"

सुशील पूर्ण त्याच्याकडे फिरला आणि त्याने फ्रान्सिसच्या खांद्यावर हात टाकला. आणि तो चिडवणारं हसला.

"मला त्याची गरज वाटत नाही डि'कुन्हा!"

आणि फ्रान्सिस चरफडला!

◆◆◆

"पण सर, राहून राहून एकच गोष्ट माझ्या मनात घुमते आहे आणि मला खाते आहे ती ही, की पटाईत जर जतीन अध्वर्यू होता, तर त्याला सिक्योरिटी का नव्हती?" राजनने बराचवेळ त्याला सतावणारा प्रश्न उद्धृत केला.

शक्तीकडे याचा काही तर्क वा उत्तर नक्की असेल हे त्याला माहित होतं.

"त्याला होती. आणि तगडी होती! त्याच्या घराकडे जाणाऱ्या रस्त्यावर महेश देशमुखने नाकाबंदी केली होती!" शक्ती डोळे करडे करून म्हणाला.

"महेश देशमुख, द मोस्ट करप्ट ऑफिसर..." राजन पुटपुटला.

"राईट. आता तुला कळलं असेल, की या करप्ट लोकांना डिपार्टमेंट मधून तोच मदत करत आहे. जरीन रफिक म्हणून राहत असलेल्या त्याच्या घराबाहेर जर सिक्युरिटी ठेवली असती, तर कोणाला प्रश्न पडला असता, की एवढ्या साधारण माणसाला एवढं प्रोटेक्शन का? म्हणून मग त्याच्या घरापासून थोडं दूर अशी नाकेबंदी केली होती. आणि फक्त एकच दिशेला नाही, तर चारी दिशेला होती."

"मग आपण तिथून सुटलात कसे?"

"महेश जिथं तैनात होता, तिथं त्याला हुलकावणी दिली. बाकी तुझ्या घराकडे येणाऱ्या रस्त्यावर मला बघून आपल्या ऑफिसर्सनी मला जाऊ दिले."

"म्हणजे महेश देशमुखला समजलं असेल, की तुम्ही रफिकच्या घरी जाणाऱ्या रस्त्यावर गेला होतात... आणि तो तशी साक्ष देऊ शकतो व त्या ऑफिसर्सना सुद्धा तुम्ही त्या एरियात दिसला होतात हे सांगण्यास भाग पाडू शकतो."

a

"रफिकच्या खुनाचा आता आरोपच आहे माझ्यावर त्यामुळे ते ओघाने आलंच, माझं उकटं काढायची संधी चालून आल्यावर तो सोडणार आहे थोडीच. आणि एक राग त्याचा माझ्यावर असणार आहे. काल त्याला डिस्ट्रॅक्ट करायला मी काल त्याच्यावर गोळी चालवली होती!"

"काय?" राजन उडालाच.

"घाबरू नको. त्याला फक्त विचलित करायला त्याच्या जवळून गोळी पास केली होती मी!" शक्ती राजनला शांत करण्याच्या हेतुस्तव बोलला.

"थॅंक् गॉड!" तो सुटकेचा उसासा टाकत उद्गारला.

परंतु अचानक त्याला आणखी काही तरी खटकलं.

"पण सर, आणखी एक प्रश्न उद्धवतोच! ती ज्या कोणी जतीनला मारलं, तो तिथल्या सीसीटीव्ही फुटेज मध्ये कसा कॅप्चर झाला नाही?"

"जतीनवर गोळी ज्या खिडकीतून चालवली होती, तो ब्लाइंड स्पॉट होता. तिथे कोणतेही सीसीटीव्ही फुटेज नव्हते. खुनी इसमने त्याची गाडी देखील ब्लाइंड स्पॉटमध्येच उभी केली होती. त्यामुळे तो आलेलं, त्याने गोळी चालवलेलं आणि तो निघजन गेलेला काहीच चित्रित झालं नाही. तुझ्या लक्षात आलंय का बघ, खुनी व्यक्तीला घराचे ब्लाइंड स्पॉट्स माहीत होते, त्याअर्थी खुनी जतीनच्या परिचयाचा तर असावाच शिवाय ज्या अर्थी नाकाबंदी पार करून ती व्यक्ती आत आली, त्या अर्थी ती या भयंकर षडयंत्रातील महत्वाची व्यक्ती तरी असेल, नाही तर महत्त्वाच्या व्यक्तीसाठी तो खुन काम तरी करत असणार म्हणून त्याला सहज एक्सेस मिळाला."

"खरंय सर... आणि जाहीर आहे... तो खुनी इसम महेश देशमुखच्या परिचयाचा देखील आहे..." राजन चिंताक्रांत बडबडला.

"राईट! पण मला अडकवण्याची संधी तो सोडणार नाही! खरा खुनी त्याला माहित असला तरी! ते त्याच्या पण फायद्याचं आहे आणि तो ज्यांना मदत करत आहे त्यांच्या फायद्याचं सुद्धा!" शक्ती दात खात बोलला. बोलताना त्याचे डोळे बारीक व चेहरा रागीट झाला होता.

त्यांचं संभाषण संपलं आणि त्याचवेळी त्याला काही मेल आल्याच्या टोन्स ऐकू आल्या. आणि दोघांच्या माना स्क्रिनकडे वळल्या.

कंट्रोल रूम कडून काही व्हिडीओ फाईल्स पाठवल्या गेल्या होत्या. आणि त्या पाहण्यात शक्ती व राजन गुंग झाले...

a

# १४. आगंतुक...

सत्यजित जैसवाल त्याच्या सनशाईन हॉटेलच्या त्या आलिशान सुईटमध्ये चिंतेत बसला होता. त्याची जान खतरे में आली होती. आता आपलं काही खरं नाही. हे तो पुरतं ओळखून होता.

कोणत्याही क्षणी आपल्यावर धाड पडेल आणि आपले प्राण पखेरू उडतील या विवंचनेत तो भयग्रस्त बुडाला होता.

स्वतःला श्रेष्ठ समजणारा त्याचा आविर्भाव खाडकन उतरला होता आणि तो भिगी बिल्ली बनून बसला होता.

काही क्षणात जिग्नेश ओसवाल आत प्रवेशकर्ता झाला.

"बॉस! बोलवलंत?" तो विचारता झाला.

बराच चितांमुक्त दिसत होता तो. कमालीचं समाधान आणि बेफिकरी त्याच्या चेहऱ्यावर ओसंडत होती.

आतापर्यंत जमिनीत नजर गाडून बसलेल्या जैसवालची मान वर झाली. ती ओसवालवर पडताच तप्त झाली.

भिऊन बसलेल्या सत्यजित जैसवालचा चेहरा जिग्नेश ओसवालला बघून रागाने विचित्र झाला.

"काल रात्री तू कुठं होतास?" दात खात त्याने जिग्नेशला विचारलं.

"एक काम मार्गी लावत होतो!" जिग्नेश गर्विष्ठ बोलला.

a

"रफिकला तू मारलंस?" सत्यजित जैसवालने काय ते समजून आपल्या अंदाजाची खात्री व्हावी म्हणून जिग्नेश ओसवालला थेट प्रश्न केला.

"होय! त्याला जर काही माहीत असेल, तर तो नाईक समोर काही बकू नये म्हणून. त्याच्या खुनाचा आरोप पण नाईकवर आला आहे, त्यामुळे आपण सेफ आहोत सर." जिग्नेश ओसवाल गर्वाने बोलला.

आपण काही मोठा तीर मारला आहे असा त्याचा भास होता. पण तो किती मोठी चूक करून बसला आहे, हे या खोलीत फक्त सत्यजित जैसवाल याला माहीत होतं.

त्याची हटली, तडकलेली शीर सणकत गेली आणि त्याच्याही नकळत त्याचा हात त्याच्या 'वेब्लि नाइंटिन इलेव्हन पॉईंट फोर्टी फाईव्ह एसीपी पँथर' या नव्याने भारतीय बाजारात आलेल्या पिस्टलला गेला. त्याने दुसऱ्या सेकंदाला जिग्नेश जैसवालचा गोळ्या घालून जागीच खून केला. सातीच्या साती पॉईंट फोर्टी फाईव्हचे राऊंडस त्याने जिग्नेश ओसवालच्या अप्पर बॉडीत ठोकून अगदी चाळण केली होती त्याच्या धडाची!

"सडे हुए कुत्ते! तुझे जरा भी होश था, की वह कौन था? तेरी वजह से अब मेरी जान आफत में आ गई है!" तो तुच्छतेने ओरडला.

जिग्नेश ओसवालकडे रागाने बघत सत्यजित जैसवालने त्याच्या बाजूच्या छोट्या राऊंड टेबलवरून कोडलेस उचलला.

"जल्दी कोई आओ और यहाँ की गंदगी साफ करो!" तो क्रुद्ध बोलला. त्याची जळजळीत नजर जिग्नेश ओसवालच्या निष्प्राण देहाला जाळू पाहत होती.

a

काही काळातच दोन व्यक्ती आले आणि काही काळापूर्वी जिग्नेश ओसवाल नामाभिदान असणाऱ्या त्या मृतदेहाला फरफटत घेऊन जाऊ लागले.

"ख्याल रखना, किसीं कस्टमर को इसके बारे में पता न चलें। मेरे धंदे में कोई फरक आया, तो अगली बार तुम जाओगे!" सत्यजित जैसवाल त्या उत्तर भारतीय कामगारांना दम भरत दरडावत कुंध बोलला. त्याचा राग अजून मावळला नव्हता.

●●●

शक्ती आणि राजनने आलेले सारे व्हिडीओज पाहण्याचा सपाटा लावला होता. आणि त्यांना हवी ती माहिती त्यातून उपलब्ध झाली होती.

रफिक उर्फ जतीन याचा खून झाला त्याच्या अर्धातास आधी तो घरातून बाहेर पडल्याचं दोघे एका सीसीटीव्ही फुटेज व्हिडिओत पाहत होते.

"टाईम बघ राजन, जतीनला मारलं त्याच्या फक्त अर्धातास आधी." शक्ती राजनचं लक्ष वेधत म्हणाला.

"पण यावरून हे सिद्ध होत नाही सर, की तो जतीनच्या घराकडे आला होता... आणि जतीन राहतो, त्या एरियातील सीसीटीव्ही काही काळ बंद ठेवण्यात आले होते त्यामुळे खुनी तिथं कॅप्चर झाला नाहीये." राजनने शंका व्यक्त केली.

a

त्याचं म्हणणं पण बरोबर होतं, एव्हीडेन्स हे वॉटर टाईट असणे आवश्यक होते.

"पण मी खात्रीने सांगतोय राजन. कारण हा ज्या गाडीत बसून गेला, तीच गाडी मी पाहिली आहे, जतीनचा खून झाल्यावर मी आधी ज्या बाजूने गोळी आली तिकडे धावलो, खिडकीतून बघितलं, तर खुनी याच गाडीच्या दिशेने पळत होता. म्हणून मेन डोरने मी बाहेर पळालो, तेव्हा हीच गाडी तिथून भरधाव निघून गेली." शक्ती खात्रीलायक बोलला.

"म्हणजे... जिग्नेश याने खून केला आहे तर जतीनचा."

"आणि त्याला मदत केली गेली, ती म्युनिसिपल सिव्हीलीयन्स मधून. नाही तर रफिक म्हणजे जतीन राहत असलेल्या एरियाजचे सीसीटीव्ही बंद कसे झाले असते? त्यानेच ते करवले असणार आहेत आणि मग तो तिथं गेला."

"जिग्नेश ओसवालनेच जतीन अध्वर्यूचा खून केला आहे हे स्पष्ट आहे तर. पण आता प्रश्न असा उभा राहतो सर, की जिग्नेश ओसवालला जतीनच्या घरातील सीसीटीव्ही कॅमेराज बद्दल माहिती होतं, म्हणजे त्यांचा परिचय असणार हे आपण मघाशी बोललातच. म्हणजे सुलेमान तोपची आणि जिग्नेश ओसवाल हे पण एकमेकांना ओळखत असणार. मग डिलिंग वेळी हे अनोळखी म्हणून किंवा पहिल्यांदा डिलिंग करतोय असे का भेटले?"

"तो सगळा मला अडकवण्यासाठी बनाव होता, त्यामुळे त्यांनी तसे चित्र उभे केले होते. यासाठी डोक्याची खपत खालवावी याला काही अर्थ नाही." शक्ती म्हणाला.

a

"पण ओळख होती, तर जिग्नेशला माहिती नव्हतं हा रफिक म्हणजेच जतीन अध्वर्यू आहे?"

"तो नांव आणि अपियरन्स बदलून राहिल्यानंतर त्यांची ओळख झाली असेल, कदाचित या डिलिंगसाठीच ते आधी घरी भेटले असतील. जिथं हे घर सुलेमान तोपचीचं आहे आणि त्याचा बॉडीगार्ड असलेला रफिक पटाईत तिथं त्याच्या सोबत राहतोय असं काही चित्र जिग्नेश ओसवाल समोर उभं केलं असेल. या गोष्टी आपल्याला आता कळणं कठीण आहे. आपण फक्त तर्क करू शकतो. पण खात्रीने हे बघ, जिग्नेशची ताकद कोल्हापूरात मोठी असली, तरी या लोकांसाठी त्याचं इतकं महत्त्व आहे असं मला वाटत नाही. तो फक्त उपयुक्त आहे म्हणून सोबत ठेवला होता. त्याला त्यामुळे आतील डिटेल्स माहित असणे आवश्यक तर नाहीच, पण शक्य पण नाही असा माझा विचार आहे. तू या जिग्नेशला आता जरा शोधून काढ. म्हणजे आपल्याला वर्क आऊट करायला नवी पायरी मिळेल, एक ब्रेकथ्रू मिळेल." शक्तीने इती केली.

"नक्कीच सर!" आणि तो त्याचं काम पार पाडण्यासाठी त्याच्या कम्प्युटरकडे वळला.

आणि अचानक विचारात असलेला शक्ती खाडकन जागा झाला. तो ताडकन उठला आणि त्याने एक पेन आणि वही घेऊन त्यावर एक नंबर खरडला. बेडवर पडलेला आपला हुडी सदरा खासकन ओढला व त्याने तो खांद्यावर टाकला.

"काही कळलं तर मला या नंबरवर कॉल कर." बाहेरच्या दरवाज्याकडे पळत तो राजनला ओरडला. राजन संभ्रमात उठून उभारला.

"काय झालं सर?" अचंब्यात पडलेल्या राजनने झटकन शक्तीकडे वळून विचारलं.

"मला अडकवायला हे सर्व घडवलं गेलं असेल, तर सुरवातीपासून माझा पाठलाग होतोय! त्याशिवाय मी हॉटेल मध्ये जिज्ञासाला घेऊन जाणार आहे हे त्यांना कळलं कसं? आणि त्यांनी त्याच हॉटेलच्या पार्किंग मध्ये ही खोट्या डीलचा बनाव केला कसा? मला खात्री आहे मी त्या हॉटेलला जाणार हे समजल्यावरच सत्यजित जैसवालला यात सामील करून घेतलं असणार आणि त्याच्या सोबतच त्याच्यासाठी काम करणारा व त्याची कन्स्ट्रक्शन कंपनी सांभाळणाऱ्या जिग्नेश ओसवालला त्याने मग सामील यात केलं असणार. मला जास्त वेळ एकाच ठिकाणी नाही थांबता येणार! तुझा जीव पण मला धोक्यात टाकायचा नाही!" तो बाहेर पडत ओरडला.

"किप मी इंफॉर्म्ड्!" असं सूचित करत त्याने बेडरूमचं दार बाहेरून लावून घेतलं. काळजीत पडलेला राजन खिन्न मनाने आपल्या कामाला लागला...

"बी सेफ सर..." तो स्वतःशीच शक्तीच्या खुशहालीची कामना करत काळजीत पुटपुटला.

◆◆◆

एक आलिशान गाडी सनशाईनच्या समोर येऊन उभा राहिली. आणि त्यातून एक अतिश्रीमंत इसम बाहेर आला. थ्री पीसी सूट असलेल्या त्याचा नेव्ही ब्लू कोट त्याच्या दोन्ही खांद्यांवर लटकट होता.

a

दरबान धावत समोर झाला.

"आपण इथं गाडी उभी नाही करू शकत सर." तो अदबीने म्हणाला.

तद्वत आधीच चिडलेल्या त्या इसमाचा भारदस्त हात त्या दरबानाच्या कानशिलावर जोराचा आदळला. आणि तो दरबान खालच्या लाल कार्पेटवर आडवा झाला.

दुसऱ्याच क्षणी सत्यजित जैसवाल अजिजीने हॉटेल मधून बाहेर आला. अदबीने व गरीब याचनावत चेहऱ्याने तो त्या श्रीमंतांच्या समोर झाला.

"इसकी तरफ से मैं मुआफी मांगता हूँ सर!" सत्यजित विनंती दाखल बोलला.

"मुझे यह आदमी दिखना नहीं चाहीए!" त्याने क्रोधावर्ती आज्ञा सोडली.

"हा सर. हा..." सत्यजित अदबीने म्हणाला आणि तो बाहेरच असणाऱ्या आपल्या काही कर्मचाऱ्यांना ओरडला,

"घेऊन जा रे याला!"

तसे या घटनेने जागीच स्तब्ध झालेले हरकतीत आले आणि लगोलग पुढे होऊन दोघांनी दरबनाला बाजूला नेलं.

"आपण चलावं." सत्यजित अदबीने त्या इसमाला बोलला.

पण मराठीत असल्यानं त्याला समजलं नाही. मग आपलीच चूक ध्यानी येऊन त्याने ती सुधारली व तो हिंदीत बोलला,

"आप चलिए!" आणि त्याने अदबीने वाकून परत आतील बाजूस चलण्यास हस्तनिर्देश केला.

आणि तो अतिश्रीमंत इसम एक तुच्छ हुंकार भरून पायऱ्या चढू लागला. सत्यजित त्याच्या मागून गडबडीने आत झाला.

लॉबी मधले देखील आहे तसे जागीच थांबून त्या माणसाला विचित्र व घाबऱ्या नजरेने पाहत होते. कारण याने बाहेर काय केलं तो सर्व प्रकार यांनी काचेतून पाहिला होता. हा स्टेटसने मोठा असल्याने याच्यामुळे धंद्यावर परिमाण होत असला, तरी ते सत्यजितला चालणारं होतं. आणि चालणारं नसलं, तरी त्याच्यापेक्षा पैसा, शक्ती या सर्वांतुलनेत अजस्त्र असणाऱ्या या इसमाचे तो करू काहीच शकत नव्हता.

"तुम मराठी में बात करते हो?" तो इसम लोकांमधून हॉलवेकडे चालत तुच्छपणे सत्यजितला बोलला.

"हा. यहाँ हमारी सातवी पिढी है, इसलिए जानते है मराठी। यहाँ के लोगों के साथ बोलनी पडती है।" तो जणू काही अपराध करत असल्यासारखं स्पष्टीकरण देत होता त्याला.

ते लिफ्ट पर्यंत पोहोचले होते. सत्यजितने पुढे होत आपल्या सूईटच्या फ्लोअरचे बटन दाबले.

लिफ्ट उघडली आणि सत्यजितने आत होण्यास त्या इसमाला हात केला. तो चिडखोर चेहऱ्यानेच लिफ्टमध्ये शिरला. आणि मागून मग सत्यजित आत झाला.

त्याचे पाहणारे कर्मचारी हे चित्र पाहून आवक होते. आपल्या कोपिष्ट, अभिमानी आणि मग्रूर मालकाला अचानक झाले काय हा प्रश्न प्रत्येकाच्या चेहऱ्यावर रेंगाळला होता. आणि ते एकमेकांकडे पाहून फक्त नजरेनेच

a

एकमेकांच्या चेहऱ्यावरचा तो एकच प्रश्न वाचत होते. आणि कुणाकडून उत्तरच मिळणार नसल्याने कुणी तोंड उघडत नव्हते. आणखी एक मोठा प्रश्न त्यांच्या चेहऱ्यावर उभा होता आणि तो म्हणजे, हा आलेला माणूस नक्की कोण आहे, जो आपल्या मालकापेक्षा अधिक मस्तवाल आहे???

●●●

"जे झालं ते अत्यंत वाईट झालं सर... मी त्याबद्दल दिलगिरी व्यक्त करतो... माफी मागतो... मला खेद आहे... मिस्टर जनक... सर..." सत्यजित बोलला.

आणि त्याच क्षणाला त्याच्या कानशीलावर मोठा आघात पडला. सत्यजितला पाठमोऱ्या कोपिष्ट जनकने जोरात मागे फिरून उलट्या हाताने त्याचं मुस्काट भिरकावलं होतं.

"मेरे से मराठी में बात मत कर बेगैरत!" तो डोळ्यांतून आग ओकत खाली पडलेल्या सत्यजितला म्हणाला.

बोलताना तो सत्यजितच्या तोंडासमोर आपलं रागाने लालबुंद झालेलं तोंड घेऊन ओरडला होता. सत्यजित पैशाने होता मोठा, आपण असे लाखोंनी सत्यजित घातले, तरी हा 'एक' निर्माण होणार नाही, इतकी याची ताकद सत्यजित पेक्षा मोठी होती. त्यामुळेच त्याची ताकद ओळखूनच सत्यजित त्याचा हा उपमर्द सहन करत होता.

"मेरा भाई मारा गया! और वो भी तुम्हारे आदमी के हाथों! और तुम सिर्फ माफी मांगना मुनासिब समझते हो?" तो रागीट ओरडला.

"ऐसी बात नहीं है... सर... पर... और मैंने उस आदमी की गलती सुधार दी है, उसे सजाए मौत देकर!" सत्यजित भीत भीत बोलला.

"शुक्र मनाओ, की काम अभी पूरा नहीं हुआ, और यह भी शुक्र मनाओ, की तुम ग्रहमंत्री के साडू हो! वरना अभी के अभी तुम्हे मौत के घाट उतार देता!" तो नजर बारीक करून क्षुद्र भावनेने सत्यजितच्या डोळ्यांत पाहत बोलला.

"अगर मैं चाहूँ, तो दो दिन में उसके पार्टी की सरकार गिर सकती है, और अब मैं यह भी देखूँगा, की अगले चुनाव में उसकी पार्टी ना जीते! और उसके बाद में तुम्हारा जो चाहूँ करने के लिए स्वतंत्र हूँ! सब प्लानिंग गई भाड़ में!" त्याने सरळ सरळ धमकी दिली.

बोलताना जनक दात ओठ खात होता. तो इतका संतापला होता, की त्याच्या दातांच्या फटीतून त्याची थुंकीचे तुषार सत्यजितच्या भ्यायलेल्या आभेवर उडून त्याचा अपमान करत होते...

# १५. द्विधा...

रात्रीची वेळ होती. धुकं पसरलं होतं. डिसेंबर महिन्याचा सुरवातीचा आठवडा चालू असल्याने अंधार तर लवकर पडला होताच, शिवाय कडाक्याच्या थंडीचे लोटही उडले होते, त्यामुळेच थंड धुकं रात्रीच्या वेळी सुद्धा, कोल्हापूर सारख्या उन्हाळ्यात भयंकर उष्ण होणाऱ्या प्रदेशाला, हिवाळ्यात मात्र ही थंडी, आपल्या कवेत कवटाळत होती. थंडीचा हा प्रताप जून ते सप्टेंबर मुबलक पाऊस पडत असल्याने असतो. तरी लागोपाठ दोन वर्ष पावसाने लपंडाव खेळत दडी दिली असली, व अवेळी हजेरी लावली असली, तरी तसा थंडीनेही लपाछपीचा डाव खेळत अखेर अवकाशाने का होईना आपली हजेरी लावली होती आणि तीही अगदी कडकडून... तप्रमाण आजही गारठा तसा गोठवणाराच होता.

अशा थंडीत एक नाराज आणि त्याहीपेक्षा संतापलेली युवती आपलं काम संपवून तिच्या वर्क प्लेसच्या बिल्डींग मधून बाहेर पडून पार्किंगला आली होती. तिचा दिवस अगदीच वाईट गेला होता. त्यामुळे ती चांगलीच रागावली होती. तिची फोर व्हीलर ती बाहेर काढणार तोच तिला पार्किंगच्या कोपऱ्यात काही हालचाल जाणवली. आधी ती भ्यायली. मग धाडस एकवटून तिने त्या दिशेने रुख केला.

हळू संथ सावध ती पुढे होत होती. चालता चालतच तिच्या हाती तिच्या पर्स मधील पेपर स्प्रेची कॅन तिच्या हाती आली होती. कोणी अपायकारक इसम असलाच तर प्रतिकार म्हणून ही तिची स्वाभाविक बचावात्मक प्रतिक्रिया होती.

a

तिने पुढे होऊन पाहिलं, तर शक्तीसेन नाईक एका पार्किंगच्या अगदी शेवटी एका गाडीच्या मागे वेदनेच्या ग्लानीत पडलेला तिला दिसला. आणि तिचे हावभाव बदलले.

काय करावे हा प्रश्न तिच्या सुमुख वदनावर काही काळ नाचला, पण मग एक ठोस निश्चय होऊन तिने शक्तीसेनला आधार देऊन उठवले आणि आपल्या कारकडे ती त्यास नेऊ लागली.

तिने त्यास आपल्या कॉम्पॅक्ट हॅचबॅक मध्ये मागे शक्तीला निजवले आणि तिने कार दवडण्यास सुरवात केली. कार पार्किंगच्या ब्लॉक मधून बाहेर पडून रस्त्याला लागली.

गाडी चालवताना तिची नजर सतत मागे शक्तीकडे जात होती. शक्ती ग्लानीत होता. कार हलेल तसं त्याचं शरीर गलबलत होतं, शक्ती पूर्णतः आपली शुद्ध व त्राण हरवून बसला आहे याचं ते प्रमाण होतं.

*'हे... हे तर शक्तीसेन नाईक आहेत... एटीयूचे प्रभारी आहेत. आणि आता तर युरेनियम चोरी आणि खुनाचे आरोप असणारे आरोपी... हे आमच्या ऑफिस बिल्डिंगच्या पार्किंग ब्लॉक मध्ये काय करत होते...'* ती मनाशीच विचार करत होती.

*'हॉस्पिटलला नेऊ या का? नाही नको! त्यांना अटक केली जाईल... पण... पण मग काय करावं...?'* ती विचार करत होती... आणि विचार करतच आज दिवस भराचे सर्व क्रम तिच्या स्मृती पटलावर नाचू लागले...

ΔΔΔ

संपादकांच्या केबिनचे तिने काची दार नॉक केलं. त्यांच्या इशाराने ती ते दार उघडून आत आली.

एडिटरच्या डेस्कवर त्याच्या न्यूज चॅनेलच्या नावा सोबत त्याच्या नावाची एक प्लेट झळकत होती.

'सत्यवेधी न्यूज - संपादक - बिपीन पुरोहित!'

"आपण बोलवलंत सर?" तिने आपल्या एडिटरला विचारलं.

"ये. ये. वैष्णवी. तुझ्याकडे एक महत्त्वाचं काम सोपवायचं आहे. तुला शक्तीसेन नाईकच्या गर्लफ्रेंडचा इंटरव्ह्यू घ्यायचा आहे!" एडिटर बिपीन पुरोहित म्हणाले.

"सर? मी? मी स्टुडिओ रिपोर्टिंग करते. फिल्डचा मला अनुभव नाही तुम्हाला माहित आहे."

"होय. पण ती तुझी मैत्रीण आहे. आणि ती त्या मैत्रीच्या खातीर आपल्याला आतील माहिती देऊ शकते." बिपीन कुटील हसला.

"तुम्हाला सर असं खरंच वाटतं, की एक रिपोर्टर म्हणून गेले, तर ती मला काही सांगेल?" वैष्णवी ते न पटून एडिटरच्या बुद्धीची कीव करत बोलली.

"पण रिपोर्टर म्हणून जाऊच नकोस ना. तिची हितेच्छुक म्हणून जा. सहानुभूती दे तिला. आणि गोष्टी काढून घे!" एडिटर पुन्हा आपली अक्कल चालवत बोलला.

त्याच्या डोळ्यांत लोभी भूक वैष्णवी पाहत होती. ते पाहून तिला कसंकसंच झालं.

a

"मला सांग वैशु; ती तुझी मैत्रीण नसती, तर तुला या प्रकरणा विषयी जरा तरी काही वाटलं असतं?" त्याने प्रश्न केला आणि तिला उत्तर द्यायला वेळ न देताच आपलाच विचार तिच्या मनी प्रविष्ट करण्याच्या कुत्सित हेतूने तो बोलला,

"नाही ना? मग इथे का गुंततेस? न्यूज काढणं हे आपलं काम आहे. आणि हे मी तुझ्या सारख्या क्राईम बीटचा स्पेशल शो करणाऱ्या स्टार अँकरला शिकवायला लागावं? भावना महत्त्वाच्या नाहीत! महत्वाचं आहे, ते सत्य शोधणं आणि ते सत्य जगाला सांगणं! कुणी सांगावं, शक्तीसेन नाईक निर्दोष असेल आणि त्याबद्दल काही जिज्ञासा कडून कळेल? प्रयत्न तर कर. विचार कर आपलं हे लोकल चॅनेल किती मोठं होईल जर आपण अशी गोष्ट बाहेर काढू शकलो, जी इतर कोणाला कळणं शक्य नाही! आपल्या जाहिराती वाढतील. पगार वाढतील. कदाचित तुला बढतीही मिळेल..." बिपीन वैष्णवीला आमिष दाखवून कंन्विन्स करण्याचा आटोकाट प्रयत्न करत होता.

पण ती काहीच बोलत नव्हती. तिच्या डोक्यात तिचा तिच्याशीच संघर्ष चालू होता...

"हे काम कर नाही तर राजीनामा दे! का मीच काढून टाकू तुला?!" वैष्णवी ऐकतच नाही म्हटल्यावर मग त्याने शेवटचा परिणामी जालीम रामबाण आपल्या भत्यातून बाहेर काढला.

"काम तर करायचंच आहे!" ती एडिटरला बोलली. बोलताना तिच्या शब्दांत ठामपणा नव्हता.

पण तरी तिच्या तोंडून संमती आली म्हंटल्यावर बिपीन खुलला.

"मला माहित होतं तू हे काम करायला तयार होशील, तशी कर्तव्यनिष्ठ आहेसच तू!"

*'बास! हरभराचं झाड मी पाहिलं आहे! ते छोटंच असतं हे मला माहित आहे!'* ती बिपीनचा खोटेपणा पाहून तिरस्काराने मनाशीच म्हणाली.

"पण माझ्याकडे तिचा अलीकडील नंबर नाही."

"त्याची काळजी नको." एक नोट पॅड घेऊन त्याने ते वैष्णवी समक्ष धरलं.

त्यावर एक नंबर स्क्रीबल केला होता.

"हा जिज्ञासा परशुरामचा नंबर! लगेच कॉल कर तिला!"

"करते!" म्हणत ते स्क्रिबल फाडून ती आपल्या सोबत नेऊ लागली. तोच...

"आत्ता लगेच माझ्या समोर!" धमकी द्यावी तसं बीपीन बोलला.

आणि ती थबकली. मागे फिरली. तिने वैतागी चेहऱ्याने आपल्या मोबाईलवर त्या पानावर खरडलेला नंबर डायल करायला सुरुवात केली.

"स्पीकर कर!" बिपीनची नवी आज्ञा.

त्याप्रमाणे जरा चिडूनच वैष्णवीने फोन स्पीकरवर टाकला. जिज्ञासा कडून कॉल उचलला गेला होता, पण तिच्या विचलित मनःस्थितीचा अंदाज घेऊन बोलण्याचे धैर्य वैष्णवीला होत नव्हते.

"हॅलो डॉक्टर जिज्ञासा परशुराम बोलतीये. आपण कोण कळेल का?" इकडून कोणीच बोलत नाही याचा थोडा वेळ अंदाज घेऊन तिकडून मधुर पण चिंतीत आवाज आला.

कोणी साधारण मुलगी असती तर कदाचित या विकट परिस्थितीत तिने कोणाचा फोन उचलला नसता, पण जिज्ञासा एक डॉक्टर होती. आणि त्यामुळे कधीही कोणतीही इमर्जन्सी येऊ शकते ही कर्तव्य भावना मनी धरून तिने कॉल उचलणं टाळलं नव्हतं.

वैष्णवी समजली, की जे विपरीत चालू आहे त्याने जिज्ञासा खूप विचलित झाली आहे आणि त्यामुळेच तिचा आवाज असा मलूल झाला आहे.

"हॅलो, जिज्ञासा... मी वैष्णवी बोलतीये... गावात आहेस?" वैष्णवीने कचरत विचारलं.

*"हो... खूप वर्षांनी फोन केलास...* घरी *काही मेडिकल प्रॉब्लेम आलाय का?"* जिज्ञासाच पुढे म्हणाली.

"नाही... पण आपण भेटू शकतो..." वैष्णवी समंजस आणि सहानुभूतीपर सूक्ष्म मृदू आवाजात बोलली.

*"काही विशेष महत्त्वाचं आहे का?" जिज्ञासा थोडं इच्छारहित बोलली.*

"हा... आहे थोडं..." वैष्णवी संकोचली.

*"घाई आहे?"* जिज्ञासाने विचारलं.

"घाई नाही तशी..." वैष्णवी जरा चाचरत बोलली.

a

*"तर आपण नंतर निवांत भेटूया प्लिज? जरा मी चांगल्या मनःस्थितीत नाही. माफ कर. खूप दिवसांनी फोन केलास... पण... म... माझी खरंच मानसिक स्थिती ठीक नाही..."* जिज्ञासा तिकडून कसोशीने बोलली.

*"हं? सॉरी बाय!"* ती पुढे बोलली आणि वैष्णवीच्या उत्तराची वाट न पाहता जिज्ञासानेच तिकडून कॉल कट केला.

"काय हे? तुला फोनवर पण बोलता येत नाही का? कॅमेरा समोर तर बडबड करत असतेस!" बिपीन उखडला.

"तिच्याशी काय बोलू तेच समजलं नाही... कशासाठी भेटायचं आहे ते तर सांगू शकत नव्हते..."

"काही महत्वाचं काम नाही असं कशाला म्हणायचं? तिनेच विचारलं होतं, की नाही काही मेडिकल प्रॉब्लेम आहे का? हो म्हणून भेटायला जाऊ शकत होतीस, तर तीही संधी तू चुकवलीस!" बिपीन चिडला.

"आणि आजारपणाचं कारण घेऊन तिला भेटले, तर तिला खरं कळणार नाही? ती विश्वास ठेवेल का मग सर? काही सांगेल विश्वासाने मग ती मला?" वैष्णवीने हुकमी प्रतिवाद केला.

आपल्या बोलण्यातील पक्की कमतर मेख वैष्णवीने शोधून काढल्यावर बिपीन अजूनच चिडला.

"आणि सर, ती खूप हुशार आहे. तिने ओळखलं असणार की मी तिला का भेटू इच्छिते. तशात काल मीच शक्तीसेन यांच्या बाबत रिपोर्टींग केलं आहे. ते तिला माहीत नसेल का?" वैष्णवी जरा उखडली.

ते बीपीनला मात्र आवडलं नाही.

"आता तू आज पूर्णवेळ या जिज्ञासाचा वेळ मिळवण्यासाठी घालवणार आहेस. आज तू अजिबात न्यूज रिडींग स्टुडिओत पाय टाकायचा नाहीस!" बिपीन वैष्णवी हून अधिक वैष्णवीवर उखडला.

"रेस्टिंग एरियात बस! दिवसभर त्या जिज्ञासाला फोन लावण्याचा प्रयत्न कर. निघ!" तो गुरगुरला.

वैष्णवी गुश्शात केबिन मधून निघाली. आपल्या चॅनेलच्या संपादकावर ती कितीही चिडली, तर कुढण्याशिवाय काही करू शकत नव्हती.

स्टुडिओतून कॅमेरा समोर बातमीपत्र देणं हे वैष्णवीचं मनपसंत काम होतं. ड्रीम जॉब म्हणा ना. पण आता त्याच स्टुडिओत पाय न ठेवण्याचे व कॅमेरा समोर न जाण्याचे आदेश तिच्या बॉसने तिला दिले होते, जे तिला क्रूर वाटत होते. लालूच आपल्या बॉसला होती आणि ती पूर्ण न झाल्याने त्याने शिक्षा आपल्याला दिली होती हे वास्तवच तिला चीड आणणारं होतं.

पैसांसाठी तिने हा अपमान सोसला होता असं नाही. पण तिला ही तिची स्वप्न नौकरी प्रिय होती. आणि म्हणून ती कर्मचाऱ्यांच्या आरामासाठी नियोजलेल्या कक्षात बसून जिज्ञासाला फोन करण्याचा प्रयत्न करत होती.

संध्याकाळ पर्यंत तिने चार पाच कॉल जिज्ञासाला केले होते, पण त्यांतील एक ही तिने उचलला नव्हता. आणखी एक कॉल तिने तासाभराच्या अंतराने केला, पण तोही प्रयत्न फोल गेला. जिज्ञासाने हा कॉल सुद्धा उचलला नव्हता.

वैष्णवीला तो अपमान वाटत नव्हता. कारण जिज्ञासा फोन का उचलत नाही हे ती जाणून होती. आणि म्हणूनच तिच्या विषयी सहानुभूती होती. पण आपल्या संपादकामुळे आपल्याला सतत आपल्या मैत्रिणीला त्रास द्यावा लागतोय, आणि तेही त्या जिच्याशी आपला काही वर्षे संपर्कच नव्हता याचंच तिला वाईट वाटत होतं. कामापूरती मला तिची आठवण झाली, मी जणू मड्याच्या टाळू वरचं लोणी खाणारी आहे असं त्या बिचारीला आपल्या विषयी वाटू नये हीच रुखरुख तिला लागून राहिली होती. आणि या घोर कर्मात अडकवल्याबद्दल तिच्या संपादकाविषयी तिचा राग वाढत चालला होता. पण ती हतप्रभ होती. ही नौकरी हवी होती तिला. आर्थिक विवनचना म्हणून नाही. तिची आवडती नौकरी होती म्हणून हवी होती... या नौकरीला लाथाडून दुसरीकडे जावे, तर तिथे का नैतिकदृष्ट्या उत्तम असा संपादक गाठ पडणार होता. असाच किंवा याहून नीच असायचा तिथला संपादक आणि मालक. मग इथे काय आणि दुसरीकडे कुठे काय हेच वाट्याला यायचं. त्यामुळे जॉब सोडण्याचा विचार तिच्या मनी येऊन सदर विचारांती तिने नौकरी सोडण्याचा त्यागला होता. आणि ती अपमानाचा घोट घेत बसली होती.

काही वेळाने मग तिने अजून एक कॉल टाकला. परिणाम पूर्ववत! अखेर तिने मेसेज केला,

*'प्लिज मिट मी, आय वॉन्ट टू टॉक अबाऊट शक्तीसेनजी. सी धिस एज अ चान्स टू प्रेसेंट शक्तीसेनजीज् साईड टू दि नॉर्मल पीपल... थिंक अबाऊट इट ऍट लिस्ट वन्स... प्लिज... अँड रिव्हर्ट मी व्हेन यू आर रेडी...'*

मेसेज लिहून तिने सेंड केला. आणि ती उदास बसून राहिली.

पंधरा वीस मिनिटे गेली असतील... आणि तिच्या मेसेजची रिंग वाजली. मोठ्या आशेने आणि उत्सान्हाने तिने मेसेज बॉक्स उघडला. एक व्हॉईस मेसेज आला होता. तो उघडताना देखील तिला अपेक्षा होती, की काहीतरी सकारात्मक अशी प्रतिक्रिया जिज्ञासाकडून आली असेल. तिने व्हॉईस मेसेज प्ले केला,

*'सॉरी वैशु! बट एट धिस पॉईटं, आय एम नॉट कम्फर्टेबल टू टॉक अबाआऊट शक्तीज् सिच्युएशन राईट नाऊ. अँड आय डोन्ट थिंक इट्स सुटेबल टू टॉक विदाऊट शक्तीज कन्सेन्ट! सॉरी! आय नो इट्स युअर जॉब, बट जेन्युअनली सॉरी! वन थिंग आय कॅन क्लिअर्ली अँड डेफिनेट्ली से, दॅट शक्ती इज प्योअरली इंनोसेंट. विल टॉक अफ्टर ऑल ऑफ धिस गेट्स सॉर्टेड... बाय!'*

जिज्ञासाच्या या ध्वनी संदेशाने वैष्णवीची आशाच पुसून टाकली. परंतु तिने जिज्ञासाला दोष मात्र लावला नाही. ती नाराज मात्र होती... स्वतःसाठीही, जिज्ञासासाठीही आणि शक्तीसेनसाठीही...

तिने मग कुठे खिडकीतून बाहेर पहा, काही वाच, उगाचच बसून रहा असं करत उरलेला वेळ दवडला.

आज दिवसभर कुणीही या रेस्टिंग रूमचा उपयोग करायचा नाही अशी ताकीद संपादकाने आपल्या इतर सर्व कर्मचाऱ्यांना दिली होती. त्यानव्ये जिज्ञासाला कोणी डिस्टर्ब करायला इथं फिरकलं नव्हतं. ज्यांना कामातून थोडा विरंगुळा हवा आहे त्यांनी त्यामुळे स्मोकिंग झोनचा उपयोग केला होता. आणि स्मोक न करणारे कर्मचारी सुद्धा तिथं आरामासाठी जात असल्याने स्मोक करणाऱ्यांची चांगलीच पंचाईत झाली होती. स्मोकिंग झोन देखील आज नो

स्मोकिंग झोन झाला होता आणि त्या खोलीची नॅपरूम मध्ये तब्दीली झाली होती.

संध्याकाळचे सात वाजून गेले. आणि तिची शिफ्ट संपण्याची वेळ झाली तसा तिचा एडिटर बिपीन पुरोहित दारावर दस्तक देत आत शिरला.

"काय झालं का काही?" त्याने करड्या आवाजात विचारलं.

निराश वैष्णवीची नकारात मान हलली.

"मग निघ! आणि तोपर्यंत कामावर येऊ नको जोपर्यंत त्या जिज्ञासा परशुरामची मुलाखत तू घेत नाहीस!" तो उखडला.

आपली पर्स उचलून ती मानहानीचा घोट पिऊन बाहेर झाली.

लिफ्ट मधून बाहेर खाली जात असताना तिच्या डोळयांत पाणी तरळलं होतं. आजपर्यंत तिला या कामाच्या जागी व किंवा संपादकाकडून अशी वाईट वागणूक मिळाली नव्हती. आणि आता तर तिची काही चूक नव्हती.

*'सांगितलेलं काम पूर्ण करण्याचा आपण यत्न केला होताच, पण तो तडीस गेला नाही, समोरून सकारात्मक प्रतिसाद आला नाही यात माझी काय चूक?'* असं ती स्वतःलाच विचारत होती.

या अशा विचारातच ती पार्किंग ब्लॉकमध्ये आली होती आणि तिला शक्ती नजरेस पडला होता...

ΔΔΔ

रियर व्ह्यू मिरर मधून शक्तीवर लक्ष ठेवून ती सावधपणे गाडी चालवत होती.

रात्र गडद असली तरी स्ट्रीट लाईट्सचा प्रकाश होताच. पण दक्षिणायन सुरू असल्याने अंधार तसा लवकरच पडला होता आणि तशात धुक्याचा अस्पष्ट पडदा आणि बेजार करणारी थंडी असल्याने, त्यामुळे वैष्णवी रहात असलेल्या गल्लीतील रस्ताही सामसूम झाला होता. शक्तीला तिथं पाहिलं असं आता कोणी तिथं बाहेर बाहेर नव्हतं. त्यामुळे वैष्णवी बिनधोक होती.

अखेर ती आपल्या घराला लागली. तिने शक्तीला गाडीतून बाहेर काढून त्याला सावरत आत घेतले. शक्तीला सावरतच तिने पर्स मधूळ किल्ली काढून घराचे कुलूप काढले होते.

घरात, वैष्णवीने शक्तीला सोफ्यावर सावकाश निजवले आणि ती हातालाच लटकत असलेल्या आपल्या पर्स मधून मोबाईल काढून त्याच्यावर पहिल्याच मोबाईल नंबरवर गेली.

"इट्स आबाऊट शक्तीसेनजी! ही इज विथ मी! कम एज सून एज पॉसिबल!" तिने व्हॉईस मेसेज रेकॉर्ड करून सेंड केला.

आणि लागलीच त्या नंबरला आपलं लाईव्ह लोकेशन शेअर केलं...

# १६. दिग्गज...

रात्र अधिकच गडद काळी झाली होती. परंतु हे ठिकाण मोठ्या प्रकाशात झगमगत होतं.

सत्यजित जैसवाल एका हेलिपॅड समक्ष उभा होता. आकाशात घिरट्या घालणाऱ्या व खाली उतरू पाहणाऱ्या एका हेलिकॉप्टरवर त्याची बारीक झालेली नजर स्थिर होती. हेलिकॉप्टरच्या पंखांची घरघर करणारी गती इतकी गतिमान होती, की तिथलं सगळं धुकं त्यांनी उडवून लावलं होतं.

सत्यजित आपल्या डोळ्यांवर हात धरून ते हेलिकॉप्टर खाली उतरण्याची वाट पहात होता, जे काही कालावकाशाने योग्य वेळ साधून जमिनीला अखेर टेकलं. त्याच्या मागे सोबत आलेलं आणखी एक हेलिकॉप्टर उतरलं. ती दोन्ही हेलिकॉप्टर्स होती, 'एचएएल ध्रुव!' परंतु ही इंडियन एयर फोर्सची नाही, तर ट्रान्सपोर्टसाठी वापरात येणारी सिव्हिल व्हेरिएंट् होती. 'सिव्हिल ध्रुव!'

सत्यजितने लगोलग घाई करत समोरील हेलिकॉप्टरकडे धाव घेतली. हेलिकॉप्टरचे पंखे अजून चालू असल्याने त्याला कदम पुढे टाकण्यात अवरोध येत होता, तरी तो तिकडे पळतच होता. आलेल्या व्यक्तीबद्दलची आत्मीयता कमी किंतु आपला जीव वाचवण्यासाठीची त्याची ही अधीरता होती. कारण आलेला हा दिग्गज्जच सकाळी आलेल्या दिग्गजापासून आपले प्राण वाचवू शकतो अशी त्याची परमकोटीची आशा होती.

a

त्याचा कोट, शर्ट, पॅन्ट त्याच्या पळण्याने व त्याहून हेलिकॉप्टरने निर्माण होणाऱ्या वाऱ्याच्या लोटाने हवेत उडत होते. त्याचा टाई तो पुढे पळेल तसा मागे उडत होता.

सत्यजित त्या हेलिकॉप्टरकडे जात असतानाच मागील दुसऱ्या हेलिकॉप्टरचे दार उघडले आणि त्यातून हत्यारबंद असे 'नॅशनल सिक्योरिटी गार्ड' (एनएसजी) चे चार ब्लॅक कॅट कमांडोज बाहेर आले. मग पुढे उतरलेल्या हेलिकॉप्टरकडे लगबगीने येऊन त्यांनी आपापली जागा घेतली व ते स्तब्ध उभारले.

समोरच्या दोघांनी सत्यजितवर त्यांच्या सिग एसजी पाईव्ह हंड्रेड फिफ्टी असॉल्ट रायफल्स ताणल्या. सत्यजित कोण हे त्यांना कदाचित माहीत नसावे. पण हे हॅलिकॉप्टर मधील त्या अति महत्त्वाच्या इसमासाठी होतं, त्यामुळे सत्यजित थबकला व दोन पावले मागेच झाला. तशी त्याला चिंता करण्याची गरज नव्हती, कारण कमांडोजची बोटे ट्रिगरवर नव्हती, तर ती रायफलच्या बॅरलला समांतर होती. सत्यजितला आहे तिथं थांबण्याची ती वॉर्निंग होती फक्त!

कमांडोजनी त्या जागेची आपापल्या स्तब्ध जागेवरूनच रेकी केली व ते ठिकाण सुरक्षित आहे हे पाहून मग हेलिकॉप्टरच्या दरवाज्या जवळील एकाने दरवाजा सरकवला आणि आत वाकून,

"एव्हरीथिंग इज क्लिअर सर. यू कॅन कम आऊट!" अशी सूचना दिली.

आणि मग हेलिकॉप्टरच्या त्या छोट्याशा दरवाज्यातून एक खादी कपडे केलेला खांद्यावर हलक्या तपकिरी रंगाची शाल असलेला, केस अर्धे अधिक पिकलेला असा एक इसम बाहेर आला.

a

त्याच्या मागून आणखी दोन ब्लॅक कॅट कमांडोज बाहेर आले होते. तेही सिग फाईव्ह फिफ्टी असॉल्ट रायफलनी सुसज्ज होते.

एवढी टाईट सिक्योरिटी आणि तेही ब्लॅक कॅट कमांडोजची, त्यामुळे ती व्यक्ती काही साधारण नसावी, तर राजकारणातील सत्ता पक्षातील कोणी ताकदवर असामी व मोठी मंत्री वगैरे असावी हे पाहूनच सादर होते.

त्या इसमाचे खाली असलेले तीक्ष्ण डोळे वर झाले व सत्यजितवर ती विखारी नजर रोखली गेली. सत्यजित घाबरला. पण त्या अतिताकदवान हस्तीच्या आवाभागतसाठी तो पुढे झाला. त्या इसमाला पाहून तो कमांडोज विषयी क्षणात विसरून गेला होता, इतकी त्याची दहशत सत्यजितच्या मनात विराजित होती.

तो सादर झाला, तसा एका कमांडोने हात आडवा घालून सत्यजितची अडवणूक केली. पण कमांडोला तो इसम काही बोलला नाही. तोच सत्यजितकडे आपले भारदस्त कदम टाकत आला.

"यायला वेळ केलात..." सत्यजित लाळघोटेपणा करत बोलल्यासारखा बोलला. एक कीव आणणारं हास्य त्याच्या मुखावर नाचत होतं. त्याची कीव त्या इसमाला आलीच.

त्याने हेलिपॅड पासून दूर चालायला सुरुवात केली, तसे ते कमांडोज त्याच्या मागुती येऊ लागले. हे ध्यानी येताच त्याने त्या कमांडोजना आहे तिथं थांबण्यासाठी हात उंचावला आणि तो चालू लागला. सत्यजित त्याच्या कदमांशी कदम जुळत कदमताल करत होता. याचककर्त्याची बाक सत्यजितच्या कमरेला आली होती त्या शक्तिशाली व्यक्तीसमोर.

"इस काम के लिए मैं दिन के उजाले में आऊ ऐसी तुम्हारी मंशा थी?" तो तिरकस खेकसत बोलला.

"नाही तसं नाही... पण जनक अध्वर्यूला सांभाळणं कठीण झालं आहे... म्हणून म्हंटलं..." सत्यजित घाबरत बोलला.

आणि तो इसम चालायचं थांबला.

"आता तुम्ही घाण करून ठेवली आहे, ती साफ करावीच लागेल... वास्तविक माझंच चुकलं. तुमच्यावर विश्वास टाकून मी हे काम तुमच्याकडे द्यायलाच नको होतं!"

त्याचा हात जैसवालच्या खांद्यावर जोरात पडला. तो आपला दाब त्याच्या खांद्यावर वाढवू लागला. सत्यजितला खूपच वेदना होऊ लागल्या, त्या त्याच्या चेहऱ्यावर दृश्य झाल्या.

"एक लक्षात ठेवा, जैसवाल साब, आपण माझे साडू नसतात, तर तुमच्या या गुस्ताखीचा निकाल फक्त सजाए मौत होता! दुर्दैवाने आपली फॅमिली एक असल्याने तुमचा मुलाहिजा बाळगतोय यावेळी, पुन्हा अशी चूक झाली, तर मात्र ती खपवून घेतली जाणार नाही!" तो भारदस्त व्यक्तिमत्त्वाचा माणूस विचित्र तोंड करत बोलला.

अगदी याच आशयाचं वाक्य जनक अध्वर्यू सुद्धा बोलला होता. आणि तसेच वाक्य हा त्याचा साडू बोलला होता. या दोघांचे विचार किती जुळतात याचे सत्यजितला आश्चर्य तर वाटलेच होते, कदाचित यामुळेच यांचा व्यवहार इतके वर्ष एकमेकांवर विसंबून फळत फुलत आहे याचे त्याला प्रमाणही मिळाले. आणि यामुळेच तो किंचित निर्धास्त झाला, हा विचार करत, की यांची

a

वेव्हलेंथ इतकी जुळते म्हंटल्यावर हा त्या जनक अध्वर्यूला समजावू शकेल. तसेही याला काही करून त्याला समजवावे तर लागणारच होते कारण तसे याने केले नाही, तर यालाच मोठे नुकसान होते. त्या उपर आपल्याला तूर्तास या घोडचूकीत, जी आपण केलीच नाही, पण आपल्या अंगलटी आली आहे त्यातून आजमासे तरी जीवनदान दिल्याचे वचन त्याच्या तोंडून आत्ताच बाहेर पडले होते.

"थॅंक्यु थॅंक्यु! पण अध्वर्यूला कसं समजवायचं? तो ही संपूर्ण योजनाच निकलात काढायचं ठरवून बसला आहे. म्हणून तर तातडीने तुम्हाला फोन केला आणि बोलवून घेतलं. फोनवर बोलून मिटणारं हे प्रकरण नाही..." सत्यजित जैसवाल त्या राजकारण्याला अजिजीने बोलला.

"त्याची चिंता तुम्ही करू नका! जेवढी चिंता केलीत तेवढी खूप झाली! देखता हूं मैं!" तो खादीधारी खेकसला.

आणि त्याने ती जागा सोडली. तिरिमिरीने तो काही अंतरावर उभ्या असलेल्या एका आलिशान फार्महाऊसकडे चालू लागला. सत्यजित सुद्धा मग आपली गती वाढवत त्याच्या मागून झाला.

तिथे उभे कमांडोज देखील त्या इसमाच्या सुरक्षेसाठी जागचे हलले व तेही फार्महाऊसकडे चालू लागले.

आलिशान फार्महाऊसच्या एका प्रशस्त खोलीत जनक रागाने धुमसत बसून होता.

a

तो इसम चेहऱ्यावर एका सुमित्राला भेटावे अशा आनंदाने स्मित करत आपले दोन्ही बाहू पसरून त्याच्या दरवाज्यातून आत जनकच्या समोर आला.

खोलीत कोणी तरी प्रवेशलं आहे हे जाणून जनकने वर पाहिलं आणि त्याच्या अजूनच तिडीक डोक्यात गेली.

"तुम्हे ये मजाक लगता है, मधुकांत?" तो फणकाऱ्याने ओरडत बोलला. त्याच्या उच्चारणात एक दर्द देखील होता.

त्यांचे हे संभाषण ऐकायला या खोलीतच काय परंतु अख्या घरात कोणी नव्हते. ब्लॅक कॅट कमांडोजना मधुकांतने बाहेरच तैनात राहण्याचा हुकम दिला होता. तसे ते त्या फार्महाऊसचा चारी दिशांनी विखुरले होते. आत होणारा संवाद कोणाच्या कानावर पडू नये म्हणून मधुकांतने घेतलेली ती काळजी होती.

"बिल्कुल नहीं! पर आप जो कर रहे है, या करना चाह रहे है वह बिल्कुल मजाक ही है!" मधुकांत म्हणाला.

"क्या बकते हो? देखो; मैने मेरा भाई खोया है! और वह भी तुम्हारे इस साडू की गलती से! जिसे जेल ना हो, सजा ना हो इसके लिए उसका अस्तित्व मिटाना पड़ा, बेचारे को दूसरा नाम धरकर रहना पड़ा उसकी ऐसी दशा? उसे ऐसी बदजात मौत? उसकी हैसियत क्या थी, यह तुम भी जानते हो! वह अध्वर्यु था! अध्वर्यु! जो खानदान अभी पूरा देश को चला रहा है, उस खानदान का वारिस! और फिर भी तुम ऐसे मुस्कुराते हुए मेरे सामने आते हो, जैसे कुछ हुआ ही नहीं? जैसे तुम्हे कुछ फरक ही नहीं पड़ता जतीन की मौत का? तुम्हारी ये हिंमत?!"

a

"बैठ कर बात करें?" जनकच्या कोपाचा आपल्यावर काहीच परिणाम करून न घेता मधुकांत शांत स्वरात म्हणाला.

मधुकांतचा मुर्दाडपणा पाहून रागावलेल्या जनकने अधिकच रागवून पण नाईलाजास्तव स्वतःला तो पूर्व बसलेल्या सोफ्यावर झोकून दिले.

काटकोनात जनकच्या उजव्या हाताला असलेल्या सोफ्यावर मधुकांत विराजमान झाला. मधुकांतच्या समोर सत्यजित बसत असताना,

"इसे कहो कि खड़ा रहे!" जनक तडकला.

सत्यजितच्या चेहऱ्यावरच हसूच गायब झालं, आता सगळं सुरळीत होईल म्हणून तो जरा निर्धास्त झाला होता व एक मंद हसू त्याच्या ढिलावलेल्या चेहऱ्यावर पसरलं होतं. तर हा जमदग्नीचा अवतार बनून राहिलेला जनक, अजून चिडलेलाच. मधुकांतने जळजळीत डोळ्यांनीच त्याला खडे राहण्यास दमदाटीचा इशारा केला. जनकच्या करड्या आवाजाने घाबरलेला सत्यजित अधिकच धास्तावला. आणि तो उभाच राहिला. त्याच्याच फार्महाऊस मध्ये त्याच्याशी असं अपमानजनक वागलं गेलं होतं.

याचा पुर्वांदाज सत्यजितने केलाच होता, त्यास्तव त्याने इथल्या आपल्या सर्व नौकरांना रजा देऊन टाकली होती. त्यांच्या समक्ष आपला पाणउतारा होऊ नये आणि तर आपल्याच नौकरा पुढे आपली नाचक्की होईल ही त्यास भीती होती व ते त्याला मानवणारे नव्हते, मान्य नव्हते. त्याच्या अंदाजानुसार झालेही तसेच होते. दोन दिग्जजांकडून त्याचा मानभंग करण्यात आला होता.

पण तो यावर कसली ती नापसंतीची प्रतिक्रिया देऊ शकत नव्हता, कारण त्याच्यासमोर असलेले दोघे ही त्याच्यापेक्षा बेसुमार ताकद बाळगून होते. एक आर्थिक तर एक राजनीतिक महाबली. या दोहों महाबाहों समक्ष त्याची काय बिशाद... त्याची काय हैसियत... यांनी मनात आणलं, तर आपण सकाळचा सूर्य बघणार नाही हे तो चांगलाच जाणून होता. या महाकाय अजस्त्रांच्या समोर सत्यजित म्हणजे हत्तीसमोर मुंगी, नाही त्यापेक्षा एखादा डोळ्यांनीही न दिसणारा सूक्ष्म जीव अशी कथा होती. म्हणून त्याच्याच वास्तूत, त्याच्याच प्रॉपर्टीवर होणारी त्याची मानखंडना तो सहन करत होता.

"सुबह फोन पर तुम बोले, की मिलकर शान्ति से बात करते है, इसलिए मैं रुका हुआ हूँ, पर ध्यान रखना मधुकांत गोस्वामी, मैं मेरा निर्णय बदलने वाला नहीं हूँ!" जनक फणकाऱ्याने म्हणाला.

मधुकांतवर याचाही काही परिणाम झाला नाही. तो सुमित वदनाने बोलू लागला...

"आपने हमारी दोस्ती का मान रखा इसलिए मैं शुक्रगुजार हूँ! जनक जी, यहाँ वहाँ न भटकते हुए, हम सीधे मुद्दे पर आते है! जनक जी, आप भी जानते है, कि आपने यह योजना खंडित की तो हमारे पार्टी से ज्यादा नुकसान आपका होगा! हम तो क्या, पांच, दस साल बाद फिर सत्ता में वापस आ जाएंगे, पर अगर विपक्ष की सत्ता आई, तो वह आपकी, आपके इतने बड़े एम्पायर की ईंट से ईंट बजा देंगे! यह ध्यान में रखे! और मुझे नहीं लगता कि आपके बोर्ड ऑफ डिरेक्टर और इन्वेस्टर्स ऐसा चाहेंगे! और अगर आपके सारे इल्लीगल काम बाहर आ गए तो माफ कीजिएगा आपके शेयर्स तो गिरेंगे ही आप शायद सेबी की लिस्टिंग

a

से भी बाहर फेंक दिए जाएंगे! और उनकी भी जांच बैठेगी! सारी एजन्सीयाँ हाथ धोकर पीछे पड जयेंगी! प्रधानमंत्री जी, मैं, या हमारी सरकार फिर कुछ न कर सकेंगे! आप की बदनामी होगी सो अलग! आपका एक गलत फैसला, और आपका ना भर पाने वाला नुकसान हो जाएगा। इससे उभरना शायद आपको मुमकिन भी ना हो, तो आपके इशारों पे नाचे ऐसी दूसरी सरकार खड़ी करने का तो ख्याल ही आप छोड़ दें। एकबार आप पर शिकंजा कस गया, आपका सारा रुपया डूब गया, तो वह मुमकिन ही नही होगा आपको! जब सारा लूट जाएगा, तो कैसे दूसरी पर्यायी सरकार खड़ी करेंगे आप? क्या वह माद्दा होगा आप में? ध्यान रखें, आपको किसी और कि जरूरत नहीं है, जब तब आपकी सेवा के लिए हम है!" मधुकांत शांत आविर्भाव ठेवून बोलला. आणि त्याच्या संवादाची इति झाल्यावर तो कुटील हसला.

"तुम मुझे डरा रहे हो?! याद रखो मेरा पैसा इस्तेमाल करके तुम सत्ता में आए हो! तुम जो मेरा साम्राज्य जितना देख पा रहे हो, वह रेत का छोटा सा कण मात्र है। तुम्हें अंदाजा नहीं, कि मेरा आकार कितना बड़ा है। मैं जितना ऊपर दिखता हूँ, उससे कई गुना फिट नीचे हूँ! यू आर् जस्ट सीइंग द टिप ऑफ दी आईसबर्ग!"

"वह भी हमारी ही मदद से है!" मधुकांत उपहासात्मक हसला.

"फर्क नहीं पड़ता!" जनक भयानक गुस्सावला!

"ऐसा मत समझो, गृहमंत्री;" जनकने गृहमंत्री हा शब्द असा काही उच्चारला होता, की तो त्याच्या वाक्यव्याची आणि एकुणातच त्याची कुचेष्टा करत होता व हे अधोरेखित करत होता, की तो मधुकांतला ठणकवत होता, की

a

तू त्या पदावर माझ्यामुळे आहेस! आणि वर्चस्ववादी, अधिकारवादी अशा अल्प कलावकाशाने त्याने पुढे बोलणे सुरू केले,

"कि मैं जो हूँ, तुम्हारी वजह से हूँ! मेरा पैसा तुम्हारे पीछे ना होता, तो तुम्हारी पार्टी अभी भी एक-दो राज्यों में ही सिमटी होती! तुम्हे बड़ा करने के ऐवज में तुमने मेरी थोड़ी सी मदद करदी तो तुम यह मत समझो, कि तुमने और तुम्हारी पार्टी ने मुझपर कोई बड़ा एहसान कर दिया। तुम्हारी जगह मैं किसी को भी इतना बड़ा कर सकता था! और वे लोग इसी तरह मेरा एहसान चुकाते!

"कान खड़े करो और सुनो, गोस्वामी; महत्त्व यह रखता है, कि अब के समय में मैं कौन हूँ और कहाँ हूँ! कान खोलकर ध्यान से सुन गृहमंत्री; तो जो धमकी तुम मुझे देने की कोशिश कर रहे हो, उसका मुझपर कोई असर नहीं होने वाला। जब मैं तुम लोगों को गद्दी पे बिठा सकता हूँ, तो मैं जब चाहूँ तुम लोगों को जमीन पर पटक सकता हूँ! दूसरी कोई भी पार्टी मैं फिर खड़ी कर सकता हूँ, तुम्हारी जितनी, या तुमसे भी बड़ी!" जनक धुमसत देशाचा खुद्द गृहमंत्री असलेल्या मधुकांतला विना भीती धमकी देत होता.

त्यावर मधुकांत नुसतं हसला.

"जी आप ताकदवर है, तो ताकद के बल पर कुछ भी कर सकते है, मानता हूँ, और हमारी पार्टी भी मानती है, पर जनक जी हमें बड़ा करने में आपन ने जो समय लगाया है, क्या आप नए सिरे से सब खड़ा करने में वापस उतना वक्त लगाना चाहेंगे? यह असली सवाल है!" मधुकांत जनकची कोंडी करत छद्मी स्मितावला. आणि टेक शकुनी हास्य मंडलावर खेळवत तो पुढे म्हणाला,

"याद रखिए, की सत्ता अभी हमारे हाथ में है, और हम ही आपके भाई की केस को जांच होने से रोक सकते है, सोचिए, अगर उसकी हिस्ट्री बाहर आई, और पता चला, की मर हुआ आदमी रफीक नाम का व्यक्ति नहीं बल्कि जतीन अध्वर्यु है, तो उसके सारे कांड बाहर आ जाएंगे और उसके साथ आपके एम्पायर के भी, तब हम भी कुछ नहीं कर सकेंगे! क्या आप यह चाहते हैं?"

"तुम यह कभी नहीं करोगे गृहमंत्री! क्योंकि अगर जतीन का सच सामने आया तो उसका खामियाना तो तुम लोगों को भी भुगतना पड़ेगा।" जनक आपला अधिकार स्पष्ट अधोरेखित करण्यासाठी पुढे सरकून जळत्या नजरेने गुरगुरला.

मधुकांत परत छद्मी हसला,

"लोगोंको बहकाना हमारे लिए बडी बात नहीं। हम उनका ध्यान भटकाने के लिए कुछ कर देंगे और जतीन की केस में से हमारी जान छूडा लेंगे। और ऐसा न भी हो पाया, तो भी तकलीफ आप को होगी अगर हमारी सत्ता चली गई तो. क्योंकि हमसे सत्ता छीन ली गई, तो आप पर जांच बिठेगी, रोकने के लिए हम नहीं होंगे, और ऐसे तब आप भी बर्बाद होने से नहीं बचेंगे! तो मैं आपको यही सुझाव दूँगा, कि चल रही योजना रोकने का यह ख्याल छोड़ कर आप इलेक्शन के बाद, जब हम वापिस सत्ता में आएंगे, तब आपको जो देस और परदेसियों से अनगिनत बिज़नेस और कॉन्ट्रैक्ट्स मिलेंगे, आप उनको ध्यान में रखें! मेरी माने तो आप हमारी मदद करें और उसके बाद हम आपकी वैसे ही सेवा करेंगे, जैसे अब तक करते आए है!" मधुकांत कुटील हसला.

"पर उसकी तो चांज चालू है, अभी कुछ ना कुछ पुलिस की सामने आया ही होगा..." जनक चिडका खेकसला. परिस्थिती हाताबाहेर गेल्याच्या विचाराने तो खिजला होता.

"बाहर तो नहीं आया ना अभी? और आएगा भी नहीं! पुलिस मेरे हाथों में है, और मीडिया आपके। बाहर आएगा भी तो आएगा कैसे? और वैसे भी आपके भाई के खून के इस केस में शक्तीसेन नाईक करके एक ऑफिसर है, उसे फँसाया गया है, हम ऐसे दिखाएंगे की रफिक पटाईत नाम के उस शख्स की ही शक्तिसेन के हाथों मौत हुई है! मरनेवाला जतीन अध्वर्यु था, और वह आपका भाई था यह बात कभी बाहर नहीं आएगी! पर तब, जब आप अपना विचार बदलें और पहले जैसे हमारे साथ खड़े हो!" मधुकांतने समजावण्याचा यत्न केला.

"बड़े चालाख हो गृहमंत्री! जितने खतरे तुम मुझे गिना रहे हों, तुम्हारे पार्टी को भी उतने ही खतरे तो है, जनता तो तुम पर भी सवाल उठाएगी, कि अगर जतीन जिंदा था, और कोई और नाम से रह रहा था, हमारी कंपनीयाँ फ्रॉडस्टर है, घपले करती है, तो इसके बारे में सरकार को भी पता होगा! तुमने ही हमारे जैसे भ्रष्ट लोगों की इस काले कारनामों में मदद की है, और उसके बाद और खुदाई होती जाएगी और तुम्हारे पार्टी का सारा का सारा सच भी तो जनता के सामने आएगा?! कि तुमने हमसे कितना अवैध चंदा लिया है, और कैसे उन पैसों इलेक्शन्स जीते है! देखो मधुकांत गोस्वामी, ऐसा मत दिखाओ, की गरज सिर्फ मेरी है!" जनकने चिडून गर्जना केली. त्यांच्यामुळे हा मधुकांत होता, याच्या पार्टीची सत्ता होती हे तो अधोरेखित करत होता.

a

आणि ते मधुकांतला देखील अमान्य नव्हतं. म्हणूनच तो स्वतः कोपिष्ट असून सुद्धा जनकचे नखरे सहन करत होता व त्याला आपल्या गोटात कसा ठेवता येईल याचा आटोकाट प्रयत्न करत होता. त्याची ताकद होती त्याचा पैसा आणि ही ताकद हातून गेली, तर आपली सत्ता ही गेली हे तो, त्याचा पक्ष आणि पंतप्रधान जाणून होते त्यामुळे काही झाले तरी जनकची झालेली इतराजी दूर करण्याची जबाबदारी मधुकांत वर सोपवली होती आणि तशी त्याला मोठी गळच घातली गेली होती, त्याद्वारे आता जनहित पार्टी या पूर्ण पक्षाची भिस्त आता मधुकांतवर तरुन होती, व त्यावर मधुकांतला सुद्धा खरे उतरायचे होते. आणि त्यासाठीच जनकला कन्विन्स करण्याच्या कठोर प्रयत्नांत तो होता.

"मैं इनकार कहा कर रहा हूँ जनक जी? मेरा तो यहीं कहना है, कि हमे आपकी जरूरत है, और आपको हमारी! तो अब एक गलती के कारण, मानता हूँ बड़ी हुई है, पर उसके कारण क्यों हम हमारी इतने सालों की अलाइन्स तोड़े? हमको सजा देनेके चक्कर में आप अपनाही नुकसान क्यो कर रहे है? हमारी इतने सालों की दोस्ती को आप क्यों दांव पर लगा रहे हैं? देखिए मेरी बात शायद आपको बुरी लगेगी, पर जो गया वह गया, जो है; उसे संभालिए! आपका भाई तो पहले से ही जनता की आंखों में मरा है, अब कृपया उसे मरा ही रहने दे! और जो योजना हमने मिलकर बनाई है, उसे वैसे ही चलने दे! आपके एम्पायर और हमारे पार्टी दोनों के लिए यह उचित और फायदेमंद होगा!" मधुकांत समजावत बोलला. त्याच्या बोलण्यात कमालीची लुच्चेगिरी तर होतीच, पण कन्विन्सिंग पॉव्हर पण जबरदस्त होती.

a

इतकी की, जनक विचारात पडला. काही वेळ घेतला त्याने आणि अखेर काही काळाच्या वैचारिक घुसळणी नंतर त्याची दृष्टी मधुकांतकडे वळली गेली.

"तुम यह मत समझना कि मैं डर गया हुँ, तुम कितनी भी कोशीश करो, मैं दूसरी पार्टी को तुम्हारे ही खिलाफ खड़ा करके जितवा ही सकता हूँ, पर उन्हें बड़ा करने में सालों लग जाएंगे मुझे, और जितना बडा मेरा एम्पायर हुआ है, उसे संभालने के लिए मुझे और पैसों की जरूरत है, जो तुम लोगों को सत्ता में रखने से ही मुझे प्राप्त हो सकते है। इसलिए उतना समय मैं अब दुसरी तरफ देना नहीं चाहता, इसलिए और सिर्फ इसीलिए मैं तुम्हारी बात मान रहा हूँ!"जनकने रागाच्या भरात ठणकावून सांगितलं.

"दुरुस्त है। मैं, प्रधानमंत्री, मेरी और हमारी पुरी पार्टी की तरफ से आपका तहे दिल से शुक्रगुजार हूँ!" मधुकांत विजयी हसला. अखेर जय त्याच्या पदरात पडला होता. जनकने त्यांची योजना उधळण्याचा आपला विचार बदलला होता व तो पूर्ववत केला होता.

जनकच्या नजरेतील क्रोध आता बव्हंशी निवळला होता.

"तुम बड़े धूर्त हो गोस्वामी!" थोडा राग निवळून जनक अध्वर्यु गृहमंत्री मधुकांत गोस्वामी याला बोलला.

आणि तितक्याच धूर्ततेने मधुकांत हसला.

"पर उस आधा किलो यूरेनियम का क्या? वह अभी भी कही गायब है! जतीन ने माईन से तो वह बाहर निकाला और उसे तुमने बताए सही जगह पर पहुचाने का प्रयास भी किया, पर वह किसीने बीच रास्ते में चोरी कर लिया! वह

a

अभी तक नहीं मिला है. अगर वहीं नहीं मिला तो आगे प्लान कैसे कंटीन्यू करोगे?" जनकने वाजिव प्रश्न केला.

"वह ढूंढने का काम चालू है! किसी तरह यह बात लीक न हो, कि यूरेनियम हमने माईन से बाहर निकाला है। उससे हम क्या करना चाहते है, यह जनता को पता चला, तो हम सब खत्म हो जाएंगे! इसीलिए इस चोरी में किसी को फंसाने की जरूरत थी। हमारी तरह से यूरेनियम के बाहर आने में और खो जाने में कोई गलती नही है और जनता की हिफाजत को प्राथमिकता देते हुए गायब हुए अवैध यूरेनियम की खोज की जा रही है, ऐसा संदेश जनता में जाना चाहिए था और उसके लिए कोई गुनाहगार जनता को दिखना जरूरी था! इसी वजह से यूरेनियम के चोरी के केस में किसी को फंसाने किए लिए यहाँ के एंटी टेररिजम यूनिट के हेड को चुना, शक्तिसेन नाईक! काफी वफ़ादार अफसर है, हमारे काम में वह अड़ंगा जरूर साबित होता, इसलिए यहाँ के एसपी से उसके बारे में जानकर उसे ही इसमें फसाने की योजना बनाई, ताकि हम जो यहाँ करना चाहते है, खोए यूरेनियम को ढूंढना और उसका अपने फायदे की लिए इस्तेमाल करना, हम आराम से कर सके...!" मधुकांत आहिस्ते बोलला. त्याला त्याच्या प्लॅनिंग वर इतका विश्वास होता, की तो जरासा देखील विचलित नव्हता हे त्याच्या शांत बोलण्यावरून खुलं होतं.

"पर वह तो काफी वफ़ादार है, ऐसा सुना है। लोग विश्वास कैसे करेंगे?" जनक के चिंता जाहिर केली.

"लालच के कारण कोई भी बदल सकता है, वहीं इल्जाम उस नाईक के सिर पर डाला है. और उसे फसाने की एक और वजह थी, वह यह कि वह अपने

a

को निर्दोष साबित करने के लिए फिरता रहे, और हम अपना काम इत्मीनान से कर सकें! इसी कारण तो उसे आजाद खुला छोड़ा है, कैद करके नही रखा। इस प्लान में कोई चूक या गलती हो भी, तो उसे भी उसके सिर हम थोप सकते है, जब वह खुला रहे, जैसे कि रफिक की मौत!" मधुकांत गोस्वामी कुटील हसला,

"उसी के लिए तो एनआयए का मोस्ट प्रोमिनन्ट ऑफिसर यहाँ भेज दिया गया है इंन्वेस्टिगेशन के लिए!" मधुकांतच कुत्सितपणे पुढे बोलला होता..

"पर वह टेढ़ी ख़िर है, सुना है वह सुनता किसी की नहीं!" जनकने आणखी एक काळजी व्यक्त केली.

"ऐसा ही आदमी चाहिए, जो अपने कर्तव्य से कुछ भी हो, पीछे न हटे! वरना हमें खोया हुआ यूरेनियम मिलेगा कैसे? और इसीलिए तो उसको यह केस सौंपा है! दुसरा यह भी है, कि वह कुत्ते की तरह शक्तिसेन के पीछे पडा रहेगा, तो उस शक्तिसेन को भी हमारे काम में टांग अड़ाने का वक्त नहीं मिलेगा! इसीलिए तो वह सुशील मकवाना अपने मन की कर रहा है, फिर भी उसे यहाँ से मैंने नहीं हटाया! नहीं तो ऐसे लोग मेरी नजरों में कितने खलते है आप तो अच्छी तरफ जानते है!" मधुकांत बेरकी हसला.

"और अगर शक्तिसेन की बेगुनाही इसी बीच मकवाना के सामने आई तो? या शक्तिसेनने ही अपनी निर्दोषिता सिद्ध कर दी तो?" आणखीन एक काळजीचा पाढा जनकने वाचला.

"वैसा हो भी जाए तो, शक्तीसेन के खिलाफ केस लंबा चलेगा। उस केस का फायदा भी हमको हमारे काम में होगा ही और उसीबीच तबतक हम हमारा काम पुरा भी कर चुके होंगे! सत्ता फिर से हमारे हाथ होगी और हमारा काम हो

a

जाने पर शक्तिसेन निर्दोष भी मुक्त हो जाए, हमारा कुछ बिगड़ने वाला नही है! पर इसके लिए हमें अब और भी यूरेनियम खदान से यहाँ लाना होगा। हमारे पास अब ज्यादा समय नहीं है! मार्च तर्क तो योजना को सार्थ करना होगा, तभी कुछ फायदा हो सकता है। बाद में खोया हुआ यूरेनियम मिल ही जाएगा, उसकी मुझे चिंता नहीं, सिर्फ काम नहीं रूकना चाहिए!" मधुकांत जनकला समजावत बोलला.

"तुम ठीक कह रहे हो। मैं प्रबंध किए देता हूँ।" आतापर्यंत जनक बराच शांत झाला होता.

"और ध्यान रहें किसी को खबर नहीं हो! अब तो काम और कठिन हो गया है!" त्यातूनही थोडी चिंतेची बाब मधुकांतने दाखवून दिली.

या दोघांची चर्चा संपण्याच्या मार्गावर आली होती. दोघांपेक्षा तर सत्यजितचा जीव अधिक भांड्यात पडला होता.

"आह, फॉर नाऊ, लेट्स किप एव्हरीथिंग असाईड, एंड लेट्स हॅव सम ड्रिंक टू नाईट फॉर आर् पार्टनरशिप अँड फॉर आर् फ्रेंडशिप!" मधुकांत उत्साही बोलला.

जी योजना त्याने, त्याच्या पक्षाने आखली होती, आणि ज्या पासून खुद्द विद्यमान पंतप्रधान देखील अलिप्त असण्याची शक्यता दुरापास्त होती, अशी ही योजना काही केल्या यशस्वी होईल यात त्याला शंका नसल्याने तो निर्धास्त व बेफिकर होता.

परंतु ते करू काय पाहत होते, आणि कशासाठी? कोणता फायदा त्यांना साधायचा होता, हे मात्र अजून अंधारातच होतं... पण काय शक्ती हे सर्व उजेडात

a

आणू शकेल का हा मोठा यक्षप्रश्न होता. तो तिकडे बेशुद्ध असा ग्लानीत पडून होता वैष्णवीच्या घरी. त्याची अशी बेहाल हालत कशी झाली, कोणी केली हे अजून कळू शकत नव्हते ते आणखी वेगळेच...

असो, इथे जनकचा काही राग उरला सुरला असेलच तोही निघून जावा या हेतुपुरस्सर मधुकांत बोलला.

"मैं अभी इंतजाम किए देता हूँ!" खुश होत सत्यजित उतेजनेने बोलला.

"मेक शोअर कि बेस्ट ऑफ दि बेस्ट हो! हमारे दोस्त कि तबियत खुश होनी चाहिए!" मधुकांत मनमोकळं हसून तिरकस जनककडे पाहत म्हणाला.

जनक देखील राग विसरून मधुकांतच्या मुत्सद्दीपणाची प्रशंसा करत त्याच्याकडे बघत होता.

"चिंता मत कीजिए जो लाऊँगा, बेहतर ही होगा!" तो खुशीत बोलला.

आणि त्याचा आविर्भाव सौम्य याचकाचा झाला तो जनककडे वळला होता,

"आपका कोटी कोटी धन्यवाद, कि आपने मुझे माफ कर दिया!" तो लाळघोटेपणा करत कमरेत वाकून दिनवाणा बोलला.

"आपने इन्हे खामखा डरा दिया, जो हुआ उसमें इनकी कोई गलती नहीं थी!" मधुकांत सस्मित म्हणाला.

"पर जतीन को मारने वाला आदमी तो इसी का था?!" जनक आपला मूळ हेका धरत बकला.

"मैं फिर से माफी मांगता हूँ! मैंने उस आदमी को मारकर अपनी और उसकी गलती सुधार तो दी है..." दीनवदन सत्यजित पुनः दयनीय बोलला.

"इसीलिए भी तुम अभी भी जिंदा हो!" जनक ज्वलंत नजरेने धारदार आवजाने बोलला.

"धन्यवाद... धन्यवाद..." सत्यजित दीनहीन झाला. तो हे बोलणं थांबतच नव्हता. आणि याचीच जनकला खिज येत होती. सत्यजितच्या माफीच्या अपेक्षेत असलेल्या दिन्मुख याचकाच्या भूमिकेनेही तो अतिशय विटला होता.

"अब निकलो!" जनक त्याची बेअदबी करत बोलला.

"धन्यवाद... धन्यवाद... मैं अभी आपके खाने पीने की व्यवस्था करता हूँ!" म्हणत तो बाहेर उधळला. राक्षसी कचटातून काहीकाळ तरी सुटल्याचा त्याला भास झाला व त्याने तो आतून आनंदला होता...

# १७. उपचार...

जिज्ञासा आली तशी आवेगाने शक्तीला बिलगली... बिचारीचे रडून रडून वाईट हाल झाले होते. शक्तीला समक्ष पाहून तिला अधिकच रडू कोसळलं. ही भावना संमिश्र होती. शक्ती अखेरचा भेटला याचे समाधान तर होतेच पण त्याची ही अशी दयनीय अवस्था पाहून तिला भरून आलं होतं.

शक्तीला बिलगून ती रडत होती.

अजून मेलो नाही... अर्धग्लानीतही शक्ती कण्हत मिश्किल बोलला.

अशी काळजीने लिपटणारी त्याच्या जवळची अशी एकच व्यक्ती होती त्यामुळे त्याच्यावर लीन झालेली ती व्यक्ती जिज्ञासा आहे हे तो अर्धशुद्धावस्थेतही देखील ओळखू शकला होता. शक्तीच्या या चेष्टने जिज्ञासाला मात्र काडीचेही हसू आले नाही. तिला अजूनच भरून आलं उलट... तिचे डोळे थांबत नव्हते अश्रू ढाळण्याचे...

जिज्ञासाचं शक्ती प्रति हे उत्कट, नि:स्पृह प्रेम पाहून वैष्णवीला त्यांच्या अलौकिक प्रेमाची प्रचिती आली. ते आंतरिक होतं, आत्मिक होतं, उच्छृंखल नव्हतं, आकर्षणभर नव्हतं. हे ती समजून चुकली. आपल्या मैत्रिणीच्या आणि तिच्या प्रियकराच्या वाट्याला हे काय आलं हा दुःखी विचार तिच्या मनी उसळला आणि तिचे विमनस्क सहानुभूतीने डोळे पावणावले.

आपण मधल्या काळात पुण्याला जायला नको होतं असं तिच्या मनी डोकावलं, पण आपण इथं राहिल्याने परिस्थिती का बदलणार होती, जे घडलं, शक्तीवर जे खोटं बालंट आलं, ते तर आपण इथं असतानाही आलंच असतं...

पण... पण त्या कठीणकाळी किमान आपण त्याच्या साथी असतो... परंतु कर्तव्य होतं... जाणं गरजेचं होतं, एक जीव वाचवायचा होता आपल्याला... असे दोलायमान विचार तिच्या अंतरीच्या डोहात हेंदकळत होते... शक्ती अजूनच बेशुद्धीच्या खाईत लोटला गेला होता.

शक्ती अखेर आपली शुद्ध पूर्णतः हरवून बसला. शक्तीला ग्लानीत पाहून आणि त्याचा जखमी हात रक्ताळलेला पाहून तिला भडभडून आलं. आपल्या प्रिय शक्तीला पाहून तिच्या अश्रुधारा थांबण्याचं नाव घेत नव्हत्या.

"शक्तीसेन यांच्यावर उपचार करायला हवेत!" मागे खिन्न मनःस्थितीत उभारलेली वैष्णवी जिज्ञासाला भानावर आणण्यासाठी बोलली.

जिज्ञासाला वेदनांच्या लाटांतून कोणीतरी बाहेर खेचल्यासारखं झालं. ती ताळ्यावर आली.

"तू बरोबर बोलतीयेस! थॅंक्यु वैशु! शक्तीला तू जी मदत केलीस..."

"तुझ्याचमुळे! तू मला मेसेज पाठवला नसतास आणि त्यात तू शक्तीसेन यांचं निर्दोषत्व स्पष्ट केलं नसतंस, तर दोषी माणसाला मी कधीच मदत केली नसती! माझा तुझ्यावर पूर्ण विश्वास आहे आणि शक्तीसेन यांना देखील मी इतकी वर्षे पाहत आली आहे एक माणूस म्हणूनही आणि पत्रकार म्हणूनही! मला खात्री आहे ते निर्विकार आहेत." वैष्णवी उदास हसली. तिच्या चेहऱ्यावर सहानुभूती व आपभाव होता.

आणि हे सत्यच होतं, ती वरकरणी तोंड देखलं बोलत नव्हती. शक्ती अपराधी आहे, तो देशद्रोही आहे अशी जराजरी तिला खात्री असती, तर तिने थेट पोलिसांनाच कळवलं असतं, पण शक्तीचा कर्तव्य प्रामाणिक कारभार तिने

पाहिला होता. ती शक्तीला मदत त्याच आधारावर करत होती, ना की यासाठी की तो तिच्या शाळकरी जीवनातील एका मैत्रिणीचा प्रियकर आहे म्हणून. वैष्णवीची सत्यासत्याची जाण ही खरंच उच्च दर्जाची होती आणि तिचा हा विवेकच तिला शक्तीला मदत करण्यास भाग पाडत होता.

पण तिच्या या तर्कशुद्ध परंतु आपलेपणाचा ओलावा असलेल्या शब्दांनी जिज्ञासा मात्र अपराधी झाली.

"माफ कर, तू सकाळ पासून फोन करत होतीस आणि मी... तुझ्याशी असं वागले!"

"नेव्हर माईंड! आमचा एडिटर मी तुझा इंटरव्ह्यू घ्यावा म्हणून मागे लागला होता म्हणून तुला सतत फोन करत होते. उलट मलाच वाईट वाटत होते, की अशा कठीण प्रसंगी तुला माझ्याकडून मदत तर नाहीच उलट त्रास होत आहे. त्याबद्दल मीच तुझी माफी लागते. ते जाऊ दे! आपण शक्तीसेन यांना ट्रीट कसं करायचं याचं काही डोक्यात आहे तुझ्या? यांना कुठल्या हॉस्पिटलला नाही नेता येणार!" वैष्णवी चिंतीत बोलली.

"मी करेन इथंच, तुझी हरकत नसेल तर!" जिज्ञासा घाईने निश्चयी बोलली.

"अंग हरकत कसली? उलट तू हे करू शकतेस म्हणूनच तुला तातडीने बोलवून घेतले!" वैष्णवी संमती खातर बोलली.

"थँक्स! इथं ट्वेन्टी फोन र बाय सेव्हेन मेडिकल कुठं आहे जवळ?" जिज्ञासाने घाईने पृच्छा केली.

"आहे पुढच्या गल्लीतच!" वैष्णवीने तत्परतेने उत्तर केलं.

a

"ओके." जिज्ञासा म्हणाली आणि तिने शक्तीचा रक्ताने ओला झालेला शर्ट बटणे काढून थोडा सरकवला आणि त्याच्या जखमेची नीट पाहणी केली.

ती चिघळलेली जखम वैष्णवीही पाहत होती. तिला कसनुस झालं, शक्तीची ती भळभळणारी घाय (घाव) पाहून. तिचा मोहरा विचित्र झाला. जणू शक्तीची वेदना तीही अनुभूत करत होती. जिज्ञासाला पण ते पाहून क्लेश होत होते. शक्तीला असं पाहून ती अपार पिडेने आंतरिक क्षतिग्रस्त होत होती आतून पण शक्तीला ठीक करणं, त्याच्यावर उपचार करणं आवश्यक होतं त्यामुळे तिने आपली यातना गिळंकृत केली, तरी ती डोळ्यांवटे ओघळलीच, तिच्या वेदनेलाही मोकळं होण्यासाठी वाट जी हवी होती...

भरलेल्या डोळयांनी शक्तीच्या घातव्रणाचं व्यवस्थित व काळजीपूर्वक निरीक्षण करून काय करावं लागेल हे पक्कं करून जिज्ञासा वैष्णवीकडे वळली. तिच्याकडे पाहताना तिने आपले अश्रू टिपून घेतले होते.

"मला काही गोष्टी लागतील, त्या लिहून देते, त्या आणशील प्लिज?" जिज्ञासा आर्जवी बोलली.

"आणते. आणि आता सारखं औपचारिक बोलणं थांबव." ती जिज्ञासाला सहज करण्या हेतूने बोलली व गोड हसली. तरी तिच्या कपाळावरील चिंतेच्या सूक्ष्म छटा हटल्या नव्हत्या.

"पण तत्पूर्वी जरा मला स्वच्छ कापड दे एखादं. याचा रक्तस्राव थांबवावा लागेल." जिज्ञासा काळजीने म्हणाली.

तशी तत्परता दाखवत वैष्णवी आत धावली. आणि बेडरूम मधून एक तिच्या कपाटातून एक पांढरी सुती ओढणी घेऊन गडबडीने आली.

a

"अगं ही खूप महाग आहे..." नजर पडताच जिज्ञासा संकोचली.

"शक्तीसेन यांचा जीव अधिक मूल्यवान आहे." ती मंद मृदू स्मित करून बोलली.

तिच्या या शुद्ध भावनेने जिज्ञासाला तिच्याबद्दल अपार प्रेम दाटून आलं. तिचे अनंत उपकार वाटत होते जिज्ञासाला याक्षणी. एकतर जखमी शक्तीला ती आपल्या घरी घेऊन आली होती. आपल्याला त्याच्याबद्दल कळलं होतं आणि त्याचे उपचार करायला ती अगदी जमेल ती सहाय्य करत होती. किती हिची ही मेहेरबानी... किती हा हिचा उच्च दयाभाव... ती सद्गदीत होती वैष्णवीच्या या परोपकारी वृत्ती पुढे...

"थँक्स..." ती कंठ दाटल्याने अस्फुट बोलली.

तिला नॉर्मल करण्यासाठी आणि आभाराची आवश्यकता नाही हे सांगण्यासाठी तिने जिज्ञासाच्या खांद्यावर आपुलकीने हात ठेवला. तिची सांत्वना स्वीकारून जिज्ञासा शक्तीकडे वळली. तिला पुन्हा भरून आलं, पण ही वेळ भावनेत वाहवत जाण्याची नव्हती हे मनी येऊन ती कर्तव्यकठोर बनली. शक्तीला वाचवणे हे तिचं याक्षणी कर्तव्य होतं. आपले डोळे आपल्या ओढणीने टिपून तिने शक्तीला एका अंगावर वळवण्याचा प्रयत्न केला, ती काय करतीए हे ज्ञानी घेऊन त्यासाठी वैष्णवी मदतीला पुढे झाली. दोघांनी त्याला उजव्या हातावर निजवले.

वैष्णवीकडून तिने आणलेली ओढणी घेतली आणि तिने शक्तीच्या ओल्या झालेल्या जखमेवर तिने ओढणी दाबून धरली. त्याचा रक्तस्राव थांबवण्यासाठीची तिची हा प्राथमिक उपचार होता.

a

मग जिज्ञासाला शक्तीच्या उपचारासाठी जे लागेल ते लिहायला काही हवं असं ध्यानी येऊन पुनः कार्यरप्रवणता दर्शवत वैष्णवीने एक नॉटपॅड व पेन टेलिफोन टेबलवरचं घेऊन जिज्ञासाच्या समोर धरलं.

"तू जरा हे असंच दाबून धरशील?" ती बैष्णवीला विचारतो झाली.

वैष्णवणी ते ऐकून भ्याली. आपल्याला यातलं काही कळत नाही. आपल्याकडून शक्तीसेन यांना अधिकच इजा व्हायची ही भीती तिच्या मनी दाटली.

"काळजी नको करू. फक्त मी दाबून धरलं आहे तसंच प्रेशर देऊन दाबून धर. रक्त येणं बंद थांबावं म्हणून हे करतीए, पण मला रिक्वायरमेन्ट्स लिहाव्या लागतील, त्यामुळे तुला संगतीये. थोडा वेळ धर असं." जिज्ञासा बोलली.

आपण धिटाई दाखवली, तर वैष्णवीची भिड चेपेल या विचाराने ती भावनारहित बोलली होती. पर्याय नाही हे पाहून स्वतःला धाडसी करत वैष्णवी पुढे सरकली. शक्ती आडवा असलेल्या सोफ्यापाशी बसली आणि तिने शक्तीच्या जखमेवर जिज्ञासाने दाबून धरलेली व शक्तीच्या रक्ताने लालचिंब झालेली तिची ओढणी शक्तीच्या जखमेवर दाबून धरली. रक्त पाहून आणि त्या रक्तात आपले हात भिजवून तिला कसंसच होतं होतं. म्हणजे किळस येत होती असं नाही, पण कोणाही सेन (विवेकी) व्यक्तीला जो अशा गोष्टींचा आदी नाही, त्याला असं वाटणं स्वाभाविक होतं. हे काम तिचं नव्हतं. मस्त स्टुडिओच्या गार एसीत बसून बातम्या वाचणं तिचं काम जखम, रक्त हे काय तिचं नित्याचं नव्हतं. त्यामुळे तिला हे असहनिय होतं, पण नाईलाज होता... शक्तीवर इलाज करणं अत्यावश्यक होतं...

जिज्ञासाने मग तितक्याच कार्यतत्परतेने शक्तीच्या उपचारासाठी लागणाऱ्या साऱ्या वस्तू, औषधे सगळं सगळं लिहून कागद फाडून नोटपॅडचा तो कागद वैष्णवी सदृश्य केला. वैष्णवीने चपळतेने तो घेतला. जिज्ञासाने शक्तीच्या जखमेचा ताबा परत घेतला तेव्हा वैष्णवी लगोलग बाहेरच्या दिशेने धावली. शक्तीचे रक्त तिच्या हाताला तसेच होते याचे भानही तिला राहिले नव्हते. शक्तीसेन सारख्या सच्च्या आणि प्रामाणिक आणि अपल्याच्यासारख्या कर्तव्यनिष्ठ परंतु कर्त्यवापेक्षा सत्य निवडावे लागले, तर कर्तव्यालाही झुगारून सत्याला झुकतं माप देणाऱ्या माणसाला वाचवण्यासाठी वैष्णवीची ही खास धडपड चालली होती.

●●●

तिने आपली गाडी काढली. ती तातडीने मेडिकलकडे पळवळी. तिच्या हाताला माखलेलं शक्तीचं र्स तिच्या स्टेअरिंगला माखलं जाऊ लागलं. मेडिकलला तिची गाडी लागली, तेंव्हाना ते बरंच तिच्या हातून निघालं होतं व जे काही राहिलं ते वाळलं होतं. ती तातडीने मेडिकलमध्ये पळाली.

रात्र असल्याने मेडिकल मध्ये कोणी गिऱ्हाईक नव्हतं. जिज्ञासाने दिलेलं प्रिस्क्रिप्शन तिने मेडिकलच्या मालकाला दाखवलं. त्याने एक नजर तिच्याकडे पाहिलं. कारण हे समान हिला का हवंय हेच त्याला समजेना. तिच्या हातात सुद्धा पूसटसं रक्त तो पाहत होता.

"कोणी जखमी आहे का?" ओळखीचा असल्याने त्याने चौकशी केली. वैष्णवी त्याचं नियमितची कस्टमर होती.

त्या प्रश्नाने ती चपापली. काय सांगावे तिला सुचेना. शक्तीबद्दल याला सांगणे उचित नाही असे तिला वाटत होते.

"हा..." ती एवढंच उच्चारली.

"कोण?" मेडिकल मालकाने प्रश्न केला.

'हा' म्हणायला तिने जो वेळ घेतला होता, त्या दरम्यान तिने पुढे काही प्रश्न आलेच, तर काय उत्तरे द्यायची हे मनाशी ठरवलं होतं, तद्वत तिने उत्तर केलं,

"माझी आज्जी गावावरून आली आहे, तिला लागलं आहे पायाला. दवाखान्यात नेणं शक्य नाही म्हणून डॉक्टरना घरीच बोलावलं आहे. त्यांनी हे सगळं आणायला सांगितलं आहे, प्लीन जरा लवकर करा." तिने चिंतीत बोलत त्वरा केली.

"हो. हो." तोही तितक्याच त्वरेने म्हणाला आणि समान काढू लागला.

मोजून एक पाच मिनिटं लागली त्याला. रोजचं काम त्याचं, त्यामुळे साहित्य आणि औषधं बऱ्यापैकी असली तरी त्याला ती काढण्यात वेळ असा लागला नाही. तरी देखील वैष्णवीची अधीरता वाढत जात होती. शक्तीचा रक्तस्राव जिज्ञासा थांबवण्याचा प्रयत्न करत असली, तरी या साधनांशिवाय व औषधांशिवाय जास्त काळ तिलाही काही करता येण्यासारखं नव्हतं हे वैष्णवी समजून होती त्यामुळे ती अधिकाधिक उद्विग्न होत चालली होती. अखेर बिल मारण्यासाठी कलक्युलेटरला केमिस्टचा हात गेला, तेव्हा जरा कुठे ती शांत झाली. तरी तिचं भाळ काळजीच्या जाळीने व्यापले होतेच. या सर्वांत आपण पैसे आणायला विसलो आहोत हे तिच्या गावीही नव्हतं.

a

त्याने अखेर अमाऊंट सांगितली. तेव्हा वैष्णवीचा हात तिच्या पर्सला गेला, तर तिच्या ध्यानी आलं आपण पर्स, मोबाईल काहीच आणलं नाही घाईत. तिचा मोहरा ओशाळला. एवढ्या रात्री आपण पैसे न देता औषधे घेऊन जाणं योग्य नाही दिसणार हा तिचा विचार चालू असतानाच तिचं मन सांगत होतं, की आपण पैशांसाठी परत जाऊ शकत नाही. ते घेऊन येणे व मग या गोष्टी नेणं यात बराच वेळ जाईल असं वाटून ती चिंताक्रांत झाली. तिची चलबिचल केमिस्टच्या लक्षात आली.

"असू दे, द्या नंतर!" तोच म्हणाला.

"थँक्स!" असं घाईतच म्हणून आणि हाती घेता येईल तितकं समान घेऊन ती गाडीकडे धावली. उरलेले समान मग केमिस्टने घेतलं आणि तो तिच्या मागे गेला. आशा कठीणकाळी तिला मदत करावी ही त्याची निर्मळ भावना. तिने आपल्याकडील समान मागे ठेवले. मागून आलेल्या केमिस्टने तिला त्याच्याकडील समान दिले. तिने "थँक्स!" म्हणत तेही मागे ठेवले व दार लावून ती ड्राइव्हिंग सीटकडे धावली. ती सीटवर स्थिर होऊन तिने गाडी घराकडे दवडली.

●●●

ज्या घाईने वैष्णवीने गाडी केमिस्टच्या दुकानाकडे पळवली होती, त्याच लागीने ती आपल्या घरी पोहोच झाली.

तिने कम्पार्टमेंट मधील एक मोठी पिशवी काढली आणि त्यात मागच्या सीटवरचे सगळे समान तिने एकाच वेळेस पिशवीत ओढले आणि ती घरात पळाली.

a

ती एवढ्या गडबडीत होती, की एक चारचाकी गाडी येऊन तिच्या घराबाहेरच रस्त्याच्या दुसऱ्या बाजूला स्थिरावली आहे याकडे तिचे लक्षही गेले नव्हते...

●●●

आत येताच तिने सगळं समोरच्या टी-पॉयवर रिकामं केलं. ती पाहत होती, की जिज्ञासा अजूनही शक्तीसेनची जखम दाबून बसली होती. जिज्ञासाचं किती हे उत्कट प्रेम आपल्या प्रियकराप्रति आणि आपल्या कर्त्यव्याप्रति ती त्यातूनही मनात स्वतःशीच बोलली.

ती रक्ताने भिजलेली ओढणी शक्तीच्या जखमेवर तशीच राहू देऊन जिज्ञासा उठली.

"मी धरू का?" वैष्णवीला वाटलं होतं, की जिज्ञासा थकली आहे. म्हणून तिने काळजीने विचारलं.

जिज्ञासा तिची आपुलकी पाहून किंचित स्मितावली. चिंतेचं जाळं तिच्या माथ्यावरचं तरी कमी झालं नव्हतं.

"आवश्यकता नाही, बऱ्यापैकी रक्त येणं थांबलं आहे आता." ती म्हणाली.

एक स्मिताची लकेर वैष्णवीच्या ओठांवर देखील उकेरली.

"बेसिन कुठं आहे?" तिने वैष्णवीला विचारलं,

a

"मला टाके घालण्यापूर्वी हात धुवावे लागतील. मघाशी रक्त थांबवण्याची खूपच आवश्यकता होती म्हणून तशीच जखम दाबून धरली." ती पुढे म्हणाली.

"हो दाखवते." म्हणून ती आतील बाजूस चालली.

वैष्णवीने टेबलवर विखुरलेल्या साहित्याच्या मधून जिज्ञासाने अँटी-बायक्रोबियल गुणधर्म असलेला क्लोर्हेक्सिडीन इथनॉल हॅन्डवॉश व स्वच्छ नॅपकीनचा बॉक्स घेतला आणि वळून वैष्णवीच्या मागून जाताना तिची आत्मिक दृष्टी शक्तीवर आपसूक पडली होती. अतीव काळजी होती तिच्या डोळ्यांत. शक्ती मात्र मूर्च्छेच्या अंधार डोहात खोल बुडाला होता. ते दृश्य सहन न होऊन एक क्षण तिची नजर खाली झाली. आणि ती वैष्णवीच्या मागून गेली.

दहा पावलांवरच किचन होतं. वैष्णवी जिज्ञासाला तिथं घेऊन गेली.

"इथं डिस्ट्रील्ड पाणी येतं." वैष्णवी म्हणाली आणि तिने बेसिनचा नळ चालू केला.

वैष्णवी किती विचारी आहे आणि ती शक्ती बरा व्हावा म्हणून किती काळजी घेत आहे हे पाहून जिज्ञासाला भरून आलं. शक्तीचे उपचार करायचे तर शुद्ध व स्वच्छ पाण्याचे हात धुवावे लागतील याचा विचार करून वैष्णवी जिज्ञासाला किचन मध्ये घेऊन आली होती.

जिज्ञासाला पुढे झाली. तिने सोबत आणलेल्या वोश रब सोल्युशनने आपले हात नीट स्वच्छ करू लागली. एक सर्जन आपले हात कसे सफाईदार साफ करतो, उपचारापूर्वीची हात धुण्याची त्याची विशिष्ट पद्धत पाहून वैष्णवीला अप्रूप वाटत होतं.

a

हात धुवून होताच जिज्ञासा वैष्णवीकडे वळाली.

"मला नॅपकिन देतेस प्लिज?" तिने विनंती केली.

अजूनही शक्तीच्या रक्ताने माखलेले आपले हात वैष्णवीने लागलीच स्वच्छ करून घेतले आणि नॅपकिनचा नवा बॉक्स फोडला आणि तिने नॅपकिनला आपला हात न लावता बॉक्स तसाच जिज्ञासा समोर धरला. त्यातून नॅपकिन्स ओढून स्वच्छ नॅपकिनने हात जिज्ञासा हात कोरडे करू लागली.

"या सोल्युशनला पाण्यात मिसळून बाहेर घेऊन येशील प्लिज. इन्फेक्शन होऊ नये म्हणून शक्तीची जखम स्वच्छ करावी लागेल." ती हात पुसत वैष्णवीला बोलली.

"हो." स्मित करून वैष्णवी बोलली.

आणि "थँक्स!" म्हणून जिज्ञासा बाहेर शक्तीकडे झाली.

वैष्णवी जिज्ञासाने सांगितलेले काम करून लागलीच तीही बाहेर गेली.

जिज्ञासा शक्तीपाशी बसून होती. तिच्या बाजूला टी-पॉयवर वैष्णवीने ते आणलेलं साबणाचं पाणी ठेवलं.

आणि मग जिज्ञासा आपल्या कामाला लागली.

"ते दे!" जिज्ञासाला एका मेडिकल इन्स्ट्रुमेंटकडे बोट करून म्हणाली.

तसे वैष्णवीने ते वैद्यकीय साधन, पॅकेट अर्धवट फोडून जिज्ञासाच्या समोर धरलं. आपला हात कशाला स्पर्शू नये याची वैष्णवी लक्षपूर्वक काळजी घेत होती.

"कॉटन रोलचं पॅकेट फोड." जिज्ञासा म्हणाली.

a

त्याप्रमाणे वैष्णवीने केले.

मग वैष्णवीने आधी दिलेल्या चिटल फोर्सेप्स या मेडिकल इक्विपमेंट्मध्ये ड्रेसिंग कॉटन धरला, हे इन्स्ट्रुमेंट कात्रीसदृश्य परंतु पुढून बारीकसं नागमोडं असतं व बोथट असतं, ज्यायोगे कापूस घट्ट पकडता येईल. त्याने शक्तीची जखम पुसून जिज्ञासाने रक्त मोकळं केलं. तो रक्ताळलेला कॉटन बाजूला ठेवत ती वैष्णवी म्हणाली,

"हे सिरिंज फोडून दे."

वैष्णवीने सिरिंज प्लास्टिक पाकिटातून काढून जिज्ञासाला देऊ केली.

त्या रिकाम्या सिरिंजमध्ये जिज्ञासाने वैष्णवीने आणलेलं डिसइंफेक्टंटचं पाणी भरलं. आणि जोराने फवारून तिने शक्तीची जखम धुवून घेतली. आणि पुन्हा स्वच्छ कापसाने तिने जखम कोरडी केली.

"ती व्हाईल आणि दुसरं सिरिंज देशील?" तिने वैष्णवीला विनंती केली.

"हा." तातडी करत वैष्णवी पुढे झाली. तिने जिज्ञासाने निर्देश केलेली व्हाईल व नवीन सिरिंज पॅकेट फोडून जिज्ञासासमोर धरलं.

ते घेऊन जिज्ञासाने जखमेच्या जवळ शक्तीला लोकल अनेस्थेसियाचं इंजेक्शन दिलं. जेणेकरून टाके घालताना शक्तीला त्रास होऊ नये, दुखू नये... शक्तीने खूप सोसलं असेल माझ्याशिवाय या दरम्यानच्या काळात तिच्या मनात विचार आला त्यावेळी.

पण आपली भावनाप्रधानता झटक्यात बाजूला सारून मग ती शक्तीची जखम टाके घालून शिवण्यासाठी तयार झाली.

a

सर्वप्रथम तिने लेटेक्स ग्ल्व्हज घातले. कात्री सारखाच दिसणारा निडल ड्रायव्हर घेऊन तिने टाके घालण्याची वक्र सुई त्यात घट्ट पकडली. त्यामधून सुचर्स (टाके घालण्याचा दोरा) ओवून घेतला. शक्तीची जखमेची टोके एका लाईन मध्ये यावीत म्हणून जिज्ञासाने चिमटा सदृश्य टिशू फोर्सेप्सचा वापर केला. आणि काळजीपूर्वक ती शक्तीच्या जखमेस टाके घालू लागली.

टाके घालून झाल्यावर व्यवस्थित सुचर्सला गाठ मारून ज्यादाचा धागा सर्जिकल सिजरच्या सहाय्याने जिज्ञासाने तोडला. एक चौथाई (चतुर्थांश) इंच खाली जिज्ञासाने हीच प्रक्रिया पुन्हा केली. तिने गाठ पंक्तीबद्ध ठेवली होती. आणि तिने शक्तीच्या टाके घातलेल्या जखमे भोवती किटाणू विरहित बँडेज करायला सुरुवात केली.

"यांना आत बेडवर झोपवू या. असं अवघडीत नको!" वैष्णवीने जिज्ञासाला सुचवलं.

जिज्ञासाला ते मान्य झालं. एक बँडेज रोलची लांबलचक बँडेज पट्टी हवी तेवढी कापून तिने तिची दोन्ही टोकं बांधली व शक्तीच्या गळयात घालून त्यात त्याचा हात बंदिस्त केला. मग ती उठली. शक्तीचा क्षतिग्रस्त हात सावरत धरून सांभाळून ती शक्तीला आधार देऊन उठवण्याच्या प्रयत्नात लागली. वैष्णवीने देखील समक्ष होऊन तिला मदत केली. शक्तीकला उजव्या बाजूने तिने धरले. दोघी शक्तीला गेस्ट रूमकडे नेऊ लागल्या, परंतु त्यांना ते करण्यात थोडा त्रास होऊ लागला होता. वैष्णवी शक्तीला घरात घेऊन आली, तेव्हा शक्ती थोडा तरी शुद्धीत होता, परंतु आता तो पूर्ण बेशुद्धावस्थेत गेल्याने त्याच्या शरीराला एकप्रकारे आता जडत्व आलं होतं.

a

कसंबसं शक्तीला बेडवर झोपवून मग जिज्ञासा बाहेर गेली. तिने सलाईनची बाटली, सुई, आवश्यक ती इंजेक्शन व्हाईल, सिरिंज, सर्जिकल टेप आशा लागणाऱ्या वस्तू बाहेरील टी-पॉय वरील घेऊन ती पुन्हा गेस्टरूम मध्ये आली.

अशक्त झालेल्या शक्तीला तरतरी यावी व त्याची झालेली क्षतिही भरली जावी यास्तव जिज्ञासाने शक्तीला आयव्ही चढवले. त्यात आवश्यक ती इंजेक्शन्स तिने सोडली. हे करेपर्यंत वैष्णवीने ती सलाईनची बॉटल धरली होती.

इंजेक्शन्स सोडून झाले, सलाईन शक्तीच्या शरीरात जाण्यासाठी नॉब फिरवून ते चालू देखील केले जिज्ञासाने, पण आयव्हीची बाटली अडकवायला तिथं काही नव्हतं, म्हणून जिज्ञासा ती बाटली उंचावून धरून शक्तीपाशी बसून राहिली. शक्तीच्या प्राणांचं रक्षण व्हावं म्हणून तिचं हे शक्ती बाबत प्रमोत्कट समर्पण पाहून वैष्णवी तरल भावना मनी दाटून भारावून पाहत होती. तिचे नेत्र पणावून गेले होते.

◆◆◆

तिकडे शक्तीचे उपचार चालू होते, आणि इकडे एका भग्न पावलेल्या जुन्या घरात, एक इसम खोकून खोकून बेजार झाला होता श्वास घेण्यास त्याला त्रास होत होता.. त्यामुळे. डोळ्यांतून पाणी वाहत होतं... माथ्यावरच्या, गळ्यावरच्या शिरा त्याच्या ताणल्या गेल्या होत्या... आपला घसा धरून तो तडफडत पडून होता एका बंद खोलीत... त्याचा हा बेजारपणा दूर व्हावा, त्याचे प्राण वाचावे म्हणून प्रयत्न करू शकतील असे कोणी होते का नव्हते तिथे...???

# १८. संदेहास्पद...

त्या बंद खोलीतून खोकल्याचा भयंकर आवाज येत होता.

ते असह्य होऊन एकजण दार उघडण्यास तिकडे सरसावला, तो कडी काढणार तोच, त्याचवेळी दुसऱ्याने त्याला अवरोध करून पोटाला विळखा घालून मागे खेचलं.

पहिल्या इसमाने त्याला दूर धकललं.

"मरून जाईल तो!" तो कळवळून ओरडला,

"तुला समजत नाही का? त्याला दवाखान्यात न्यायला लागेल!"

"तुला समजत नाही का?" संतापाने दुसरा ओरडला,

"त्याला दवाखान्यात नेलं तर आपली जान आफत मध्ये येईल!"

"मग म्हणून काय मरू द्यायचंय का त्याला?" पहिला किंचाळला.

"विषय फक्त आपला असता, तर त्याला नेऊ पण दिलं असतं, पण विषय देशाचा आहे... आपण तडजोड नाही करू शकत!" दुसरा समजावत ओरडला,

"याला नेला तर सगळं उघड होईल... तुला कळत नाही का?"

परंतु पहिल्याने काही विचार डोक्यात शिरू व झिरपू दिला नाही. तो पुन्हा दरवाज्याकडे सरसावला.

आणि त्याला दुसऱ्याने परत अडवण्याचा प्रयत्न केला. तो जसा वेगाने पुढे झाला, त्याला त्याहून जोराने पहिल्या इसमाने दूर ढकलून दिलं. आणि मागे खोवलेली रिव्हॉल्वर काढून त्याने त्या दुसऱ्या व्यक्तीवर रोखली.

"गप मला जाऊ दे!" तो धमकावत बोलला,

"मी माझ्या भावाला मरायला नाही सोडू शकत! जर मरण अटळच आहे, तर त्याच्यासोबत जाईन मी! पण त्याआधी त्याला वाचवण्याचा पूर्ण प्रयत्न करेन!" तो निर्णयी बोलला.

दुसऱ्याने निःश्वास सोडला. विचारांती त्याची मान असहाय्य डोलली.

"बरं, मी तुला मदत करतो, पण त्याआधी ते युरेनियम सांभाळून ठेवलं पाहिजे!" तो समजावत बोलला.

"त्याची काळजी नको. विष्णूने ते व्यवस्थित ठेवले आहे. आपल्यापेक्षा जास्त तोच युरेनियमच्या संपर्कात होता, म्हणून तर त्याला त्रास होतोय. त्याची तब्येत सांभाळणं ही आता आपली जबाबदारी आहे! युरेनियम नाही कुणाला सापडायचे! आणि इथे येईल तरी कोण?" पहिल्याने आपली विचारांची बाजू मांडली.

"तरी एक काम करू! तू जा घेऊन त्याला, मी थांबतो इथे! जर कोणी आलेच, तर युरेनियम घेऊन निघता येईल मला." दुसऱ्याने आपला विचार सांगितला.

"रास्त आहे. आता मला मदत करशील विष्णूला न्यायला?" रिव्हॉल्वर खाली करून मागे खोचत पहिला शांत म्हणाला.

दुसरा खाली मान घालून त्या बंद दाराकडे वळला.

a

"मी करतो मदत, पण मला अजूनही हे पटत नाही." त्याने आपली नाराजी आणि असंमती व्यक्त केली.

दार उघडलं त्यानेच. पहिला व्यक्ती आत झाला. त्याच्या मागून हाही आत प्रवेशला.

आजारी पडलेल्या विष्णू नामक त्या माणसाला दोघांनी दोन्ही बाजूनी घरून बाहेर काढलं.

त्या पडक्या घराबाहेर एक जुनी फिएट गाडी उभी होती. ती यांच्याशीच संबंधित होती. दोघांनी त्याला मागे बसवले आणि दरवाजा बंद करून दुसरा पहिल्याकडे वळला.

"काळजी घे! प्रॉब्लेम्स होणार आहेत हे तर आता स्पष्ट आहे... आपलं काहीही होवो, फक्त ते युरेनियम कोणाच्या हाती लागू नये हा प्रयत्न आता करायचा..." तो उदास बोलला,

"अल्लाह मेहेर करे!" त्याने दुआ केली.

पहिल्या व्यक्तीने आवंढा गिळला. त्याचा कंठ दाटून आला होता. पुढचा घनघोर अंधार त्यालाही दिसत होताच. पण त्याला याक्षणी आपण भाऊ म्हणत असलेल्या विष्णूला वाचवणं अधिक गरजेचं होतं. त्याची जोरात होकारामध्ये मान हलली आणि बॉनेटला वळसा घालून स्टेअरिंगचा त्याने ताबा घेतला.

गाडी वळून निघाली, तसा हा माणूस त्या पडक्या ओसाड घरात शिरला. त्याने दार लावून घेतलं.

a

ती जुनी फिएट मात्र मोकळया रस्त्यावरून धूळ उडवत जोमाने धावत होती. मागे विष्णू वेड्यासारखा खोकत होता, तर गाडी चालवणारा तो माणूस अत्यंत ठाम भाव चर्येवर घेऊन स्टेअरिंगवर अधिकार ठेवून होता. त्याचं एकच लक्ष होतं, काही करून याला बरं करणं, आणि याच जीव धोक्यात असेल, तर तो वाचवणं...

◆◆◆

शक्तीला लावलेली सलाईनची बाटली घेऊन जिज्ञासा बसून होती. शक्तीला रिलॅक्स वाटावं, म्हणून ती मंद आवाजात एक मधुर गाणं गुणगुणत होती. शक्तीच्या विस्कटलेल्या केसात जिज्ञासा प्रेमाने संथ हात फिरवत होती. त्यांना एकांतात सोडणे भले, असा विचार करून वैष्णवी बाहेर आली.

बाहेर येऊन तिने टेबलवर पडलेला मोबाईल घेतला आणि मेडिकलच सर्व बिल तिने ऑनलाइन पेड करून टाकलं. ते काम करत करतच तिचीही पावले आपसूकच तिच्या बेडरूमकडे वळली होती. बिचारी आज ऑफिसमध्ये तिला तो मानभंग, मानखंडना सहन करावी लागली होती. मग जखमी शक्तीच्या उपचारासाठी ओढाताण व धावपळ, या सगळयांत तिला रात्रीचं जेवण घ्यायला देखील उसंतच काय, पण विचारही मनात डोकावला नव्हता. आताही तिला भुकेची जाणीव झाली नव्हती. जाणवत होता तो थकवा, प्रचंड थकवा... तिने मोबाईल बाजूस टेबलवर ठेवून स्वतःला बेडवर झोकून दिले...

◆◆◆

a

महेश देशमुख चरफडत होता. चिडला होता तो प्रचंड... सोबत असलेल्या माणसाला त्याने त्या माणसासाठी काही अतर्क्य असणारे असे सांगितले होते आणि तो भयंकर हादरला होता.

स्पेशल इन्स्पेक्टर जनरलच्या ऑफिस मधील एक भ्रष्ट अधिकारी मसूद हैदर हा महेश देशमुखकडे इन्स्पेक्टर जनरलचा काही महत्त्वाचा निरोप घेऊन आला होता. कारभारच काळकूट असल्याने कोणा कॉन्स्टेबलला वगैरे न पाठवता मसूदला पाठवलं गेलं होतं महेशला भेटायला. दोघे एका पोलीस कोर्टर्सच्या आवारात एकांती भेटले होते. सुमसं रात्र होती, आपल्याला कोणी पाहू नये याची त्यांनी तरीही अंधारात थांबून काळजी घेतली होती. कोणत्याही प्रकारचा लाईट सोर्स जिथे पोहोचू शकत नाही अशी जागा त्यांनी भेटावयास निवडली होती.

शक्तीसेन नाईक याला महेश जीवानिशी मारणार होता, पण ते तो संधी असताना करू शकला नव्हता आणि आता शक्ती ही समोर नव्हता, त्याला संपवायला. आपली असहाय्यता दाटून आल्याने भिंतीवर महेशने आपली मूठ आदळली.

"त्या शक्तीसेनला मारायची चांगली संधी होती!" तो दात ओठ खात ओरडला,

"जे आरोप त्याच्यावर आहेत, त्यामुळे त्याचा खून सहज पचवता आला असता मला!" महेश फणफणला.

"काहीही काय? आणि कसं करणार होतास तू हे?" महेशचं विपरीत डोकं ऐकून मसूद हललाच!

a

"आत्मरक्षेसाठी त्याला मारावं लागलं, नाहीतर तो देश विघातक कारवाईत होता म्हणून नाईलाजास्तव त्याला संपवावे लागले, वगैरे काहीही बनाव करता आला असता. खोटे पुरावे तयार करणं हे काही आपल्यासाठी नवं नाही!" महेशने रागात पुन्हा दात खरखरले.

"तू शांत हो. काहीही बरळतोयस तू आता! जा झोप जरा!" मसूदने समजूतीचा सल्ला दिला.

हातची एक नामी सुवर्ण संधी हातासरशी सुटून गेल्याने तो क्रोधाने ओथंबला होता.

"मान्य आहे, शक्तीसेन आपल्या सगळयांच्या आडवं पडतो बऱ्याचदा! प्रामाणिकपणाचा लैच मोठा किडा आहे त्याच्यात, पण त्याचा खून करायचा हा विचार वेड्यासारखा आहे." मसूद हैदरने महेशला समजावण्याचा यत्न केला.

"रेस्ट घेऊन शांत हो. आणि उद्या सकाळीच आयजी सरांना भेट! हेच सांगायला आलो होतो. निरोप द्यायला सांगताना ते खफा दिसत होते. आल्या आल्या तू असा बॉम्ब फोडलास, की हे सांगायचं राहून गेलं." तो जरा कठोर आवाजात बोलला.

महेश देशमुखच्या मनात तरी तोच विचार घोळत होता, की शक्तीला आपण ठार करू शकलो नाही!

शक्ती समोर होता, त्याला मारलं असतं, तर त्याला देशद्रोही ठरवून आपण जनतेच्या नजरेत नायकच ठरलो असतो, आणि शक्तीचा खून पण पचला असता असा त्याचा घोर विचार होता. आणि तीच संधी निसटून गेली होती...

a

विचारागणिक त्याचे दात जास्तच कसले जाऊ लागले होते, अखेर, तो चरफडतच तिथून चालता झाला...

◆◆◆

ती फिकट हिरवी फिएट भरधाव वेगाने आली आणि मोकळी पार्किंग दिसली तिथे घुसली. करकचून ब्रेक दाबला गेला त्या माणसाकडून.

त्या दवाखान्यातील पेशन्ट्सच्या बाहेर असलेल्या तुरळक दोन-चार नातेवाईकांना काय झालं ते कळेनाच. रात्री हॉस्पिटलमध्ये झोप वगरे न आलेले असे विरंगुळयासाठी एवढ्या रात्रीही बाहेर येऊन कोणी बसले होते, कोणी थंड वाऱ्यात बकड्यांवर आडवे झाले होते. कोणी पाय मोकळे करत होते. एक गाडी भरधाव येऊन अशी करकचून थांबल्याने ते सारेच अचंबित झाले होते.

गाडी चालवणारा इसम लगबगीने बाहेर झाला आणि त्याने मागील दार उघडून विष्णू नावाच्या त्या इसमाला बाहेर काढलं. दार तसंच उघड ठेवून तो त्याला दवाखान्याकडे नेऊ लागला. विष्णू अविरत असा खोकतच होता. डोळयांतून पाणी येत होतं सतत त्याच्या सतत खोकत असल्याने.

बघणाऱ्यांपैकी एकजण मग पुढे झाला आणि त्याने विष्णूला आत नेण्यास त्या माणसाला हातभार लावला.

दवाखान्यात, रिसेप्शनला त्याला थांबवलं.

"डॉक्टर कुठं आहेत?" त्या इसमाने रिसेप्शनिस्टला विचारलं. त्याच्या चर्येवर काळजी तशीच होती.

विष्णूला अशी खोकल्याची राहून राहून धास लागलेली पाहून रिसेप्शनिस्ट देखील त्याच्या आजारपणाची गंभीरता समजुम होती.

"त्या समोरच्या केबिनमध्ये जा. नीलम कर्णिक म्हणून डॉक्टर आहेत तिथं." ती तत्परतेने म्हणाली.

त्याला मग तिथून समोरच्या केबिन मध्ये नेण्यात आले.

◆◆◆

उजाडलं होतं. आणखी एक मोठी आणि काळ रात्र संपली होती. परंतु हा आलेला नवा दिवस सिद्ध काही मोठी अडचण घेऊन आला होता का हे पाहणं औत्सुक्याचं होतंच...

तंद्रीतून शक्ती आहिस्ते आहिस्ते बाहेर येत होता. त्याच्या पापण्यांची फडफड होत होती. समोर एक मुलगी चहाचा ट्रे आणून त्याच्या एकदम समक्ष भिंतीनजीकच्या एका टेबलवर ठेवताना तो अंधुक पाहत होता...

"अय्यो! स्वर्गात आलो की काय?" तो एकदम उच्चारला.

"एक अप्सरा तुझ्या बाजूला पण बसली आहे!" एका मुलीचा चिडलेला आवाज घुमला. ती जिज्ञासा होती.

"म्हणजे नरकात गेलोय वाटतं...!" तो म्हणाला.

आणि जिज्ञासाने त्याला जोरात एक चापट लगावून दिली.

"नरक यातना!" तो जिज्ञासाला खिजवत उगाचच ओरडत बोलला.

चहा ठेवून वळलेली वैष्णवी हे पाहून गोंधळली होती. रात्रीची परिस्थिती आणि आत्ता या दोघांचं जे चाललं होतं... येडे आहेत का हे? तिच्या

a

मनात डोकावलं आणि तरी त्यांचं जे काही चालू होतं, त्यावर तिला हसूही येत होतं. तिने ते उघड मात्र केलं नाही. आतल्या आत ती खुसखुसत होती.

शक्ती गंभीर हसला. त्याने प्रेमाने जिज्ञासाकडे बघितलं.

"रात्रभर तू माझ्या शेजारी बसून आहेस, ही सलाईन हाती धरून. मला लक्षात आलं नसेल असं वाटतं का तुला?" तो प्रेमळ बोलला,

"तुझ्याशिवाय मी कधी कोणा स्त्रीचा विचार करू शकतो का?"

"मग तू मघाशी तिला बघून असं का म्हणालास?" ती रुसव्याने रागे बोलली.

"तुला चिडवायला मजा येते!" कुटील हसत त्याने मस्करी केली.

आणि पुन्हा त्याला जिज्ञासाच्या हातचा प्रसाद खावा लागला. आणि तो बळेच कळवळला.

वास्तविक पाहता शक्तीला जिज्ञासाला कधीच त्रास द्यायचा नसायचा. तो तिचीच तर सर्वांत अधिक काळजी करत होता, तिला दुःख तो कसा देणार होता. आपलं कर्तव्य पार पाडण्यात आपण वाहवत जातो, आणि नकळतच आपदा विपदा अंगावर ओढून घेतो आणि तिचा त्रास या बिचारीला होतो यामुळे त्याचंही मन पिळवटलं होतं, कळवळलं होतं.

आत्ताही, मागील काही तासांत तिला जो काही त्रास, दुःख, वेदना यांतून जावं लागलं होतं, त्यांतून तिला आराम मिळावा या प्रयत्नातून चालली त्याची ही कुरापत होती.

"गप ना लागतंय!" तो हसत ओरडला.

"अगं खरंच कसं मारतीयेस त्यांना...? ते अजून बरे झाले नाहीत..." वैष्णवी मध्येच बोलली.

खरं तर जिज्ञासा शक्तीला लागेल असं अजिबात मारत नव्हती. शक्ती तिच्यासाठी अत्याधिक महत्वाचा होता तिच्या आयुष्यात आणि त्याला काही होऊ नये याचसाठी तिची सतत काळजी आणि धडपड चाललेली असायची. अनेकदा तिने शक्तीला समजावलं होतं, शक्ती ऐकेल तर शपथ, आताही शक्तीला आपण जवळजवळ कायमचं गमावलंय, की काय अशी भली मोठी भीती तिच्या पोटात दडून बसली होती. तिला काही केल्या शक्तीला आपल्यापासून दूर होऊ द्यायचं नव्हतं, पण शक्ती हा तर महाहट्टी!

जवळपास आपण गमावलेला शक्ती पुन्हा प्राप्त झाला आणि आता तो पुन्हा कुठे हरवायला नको ही त्याला समज यावी यास्तव तिचा हा संताप होता, जो शक्तीवर हलके आघात करत होता. त्यात तिचं प्रेम होतं, माया होती, आपुलकी होती, आणि होता तो अधिकार...!

शक्तीने जिज्ञासाचा उगरलेला हात धरला आणि खट्याळ हसत तो मुर्दाडा सारखा तिच्या रागावलेल्या डोळ्यांत पाहत होता.

"तो माझी चेष्टा करतोय म्हणजे तो त्याच्या मस्करीच्या मूळ स्वभावात आला आहे. त्यावरून तो ठणठणीत आहे. तू नको काळजी करू." जिज्ञासा शक्तीच्या डोळ्यांत डोळे घालून वैष्णवीला म्हणाली,

"याला असंच पाहिजे! स्वतःची काळजी घेत जा असं किती सांगून कळत नाही याला..." ती त्रागा व्यक्त करत होती. तिचा राग ओसरला नव्हता.

"तुला मला मारायचंच होतं, तर उपचारच का केलेस?" तो चेष्टेत बोलला.

"तुला खरं तर चांगलंच चौदावं रत्न दाखवलं पाहिजे. त्याशिवाय सुधरायचा नाहीस!" जिज्ञासा मात्र मस्करीच्या मन:स्थिती मध्ये नव्हती,

"तुला किती वेळ सांगितलं आहे, नको त्या भानगडीत पडत जाऊ नकोस. मला वाटतं माझं आता फक्त एवढंच काम राहिलं आहे, तू कुठं तरी धडपडून यायचं आणि मी तुझ्यावर उपचार करायचे?" जिज्ञासा आपला त्रागा व्यक्त करत होती.

"डॉक्टर प्रियसी असल्याचे काही तरी फायदे घ्यायला हवेत की नकोत?" त्याने परत तिची मस्करी केली.

त्याचं असं तिरकस बोलणं जिज्ञासाला अधिकच चिडवून गेलं.

तिने यावेळी शक्तीचा जखमी हातच लक्ष बनवला. शक्ती उगाच कळवळला. जिज्ञासाला स्फुटसं रडू कोसळलं.

"अलेले... अलेले..." करत शक्तीने आहत झालेल्या, हिरमुसलेल्या एका तान्हुल्या मुलीला समजवण्यासाठी लडिवाळपणे जवळ घ्यावं तसं तिला आपल्या हृदयाशी घेतलं.

एक प्रेमळ स्मित त्याच्या ओठांवर स्थिरावलं. डोळे पाणावले त्याचे. ती केवळ हमसून रडू लागली.

"दोन दिवस पुण्याला काय गेले, काय करून घेतलंयस हे स्वतःचं...?" तिच्या अश्रुधारा लागल्या होत्या.

"जिज्ञासा, तुला माहीत आहे, माझं काम माझ्यासाठी किती महत्वाचे आहे, तू का उगाच त्रास करून घेतेस?" तो तिला समजावत म्हणाला.

"पण सतत असं वेदनेत तुला मी नाही पाहू शकत..." ती कळवली.

"जिज्ञासा, या समाजाची एकी टिकून रहावी आणि तो सुरक्षित रहावा या कर्तव्यासमोर माझ्या जीवाचं ते काय मोल?" शक्ती खरच गंभीर होऊन तिला समजावत होता.

"शक्ती..." दाटलेल्या स्वरांनी जिज्ञासा काही बोलणार होती...

तोच शक्ती मध्ये बोलता झाला,

"मी तुझी काळजी समजू शकतो. मला माहित आहे, तुलाही या लोकांची काळजी आहे, स्वार्थी नाहीस तू. आणि तुझं माझ्यावरचं प्रेमही तितकंच खरं आहे, पण माझ्या सुरक्षेचा विचार करत राहून मी या शहराचं रक्षण करण्याची जबाबदारी पण बाजूला नाही ठेवू शकत ना? आणि शिवाय या शहरात तू पण तर आहेस!" त्याने कठीं दाटलेला आवंढा गिळला.

शक्तीचं आपल्यावरील असीम प्रेम पाहून आणि आपल्या संरक्षणाची तो किती चिंता करतो, पाहून जिज्ञासा अजूनच भावूक झाली.

दोघांची एकमेकांबद्दलची काळजी बघून वैष्णवीला सुद्धा भरून आलं. *'दोघेही एकमेकांचा आधार होती, एकमेकांचा विसावा होती'*, ती विचार करत होती.

तोच, शक्तीची नजर तिच्यावर पडली. आणि त्याला तिचं अस्तित्व परत ध्यानी आलं. त्याची दृष्टी आपल्याकडे होताच वैष्णवी ओशाळली होती.

a

"च... चहा आणला होता... जिज्ञासासाठी..." ती चपापत बोलली.

आणि तिचं त्या खोलीतील अस्तित्व तिच्या आवाजाने जिज्ञासाला देखील लक्षात येऊन गेलं. ती संकोचत शक्तीच्या हृदयापासून विलग झाली. आपले अश्रू तिने लगोलग टिपले.

"स... सॉरी... वैष्णवी..." ती ओशाळत बोलली.

"क... काही हरकत नाही..." तीही ओशाळतच बोलली.

"या वैष्णवी सोनुने... हो ना? सत्यावेधीच्या फेमस न्यूज अँकर!" शक्तीने विचारलं,

"मला आठवतं तसं याच मला इथे घेऊन आल्या. हो ना?" तो वैष्णवीकडे पाहून बोलला.

"हाय!" ती म्हणाली.

शक्ती हसला.

"थँक्स!" तो गोड मंद हसत आभार व्यक्त करता झाला.

"ग्लानीतही आपल्या हे लक्षात आलं? आपण खरंच खूप हुशार आहात." ती हसून म्हणाली,

"आपण आपल्या शहराच्या सुरक्षेसाठी जे काही केलं आहे, जे काही करत आहात त्याची कृतज्ञता म्हणून मी एवढं तर करूच शकते." हे ती अत्यंत आदरयुक्त बोलली होती.

a

"पण तुम्हाला माहित होतं का? की भविष्यात कधीतरी शक्तीसेन नाईकला उचलावं लागेल? हॅचबॅक चालवताय म्हणून म्हंटलं?" शक्ती मस्करीच्या मूडमध्ये आला होता.

"तसं नाही, घरच्यांसोबत कधी कधी पिकनिक प्लॅन करते वॅगन बरी पडते त्यासाठी." तिने त्याची चेष्टा ओळखून पण उत्तर दिलं.

शक्ती रूंद हसला.

"बाय द वे, तुम्हा दोघांची ओळख कशी?" शक्तीने विचारलं.

"आम्ही एकत्र शाळेत होतो." जिज्ञासा म्हणाली,

"घट्ट अशी मैत्री नव्हती आमची, पण..." ती डोळ्यांत अपार कृतज्ञ भाव नजरेत व चेहऱ्यावर घेऊन ती वैष्णवीकडे वळली,

"खरंच. खूप खूप थॅंक्यू वैशु... तू जे केलंयस शक्तीसाठी, माझ्यासाठी, ते न भरून निघणारे उपकार आहेत... शक्तीला कुठं शोधायचं हा एक मोठा प्रश्न होताच माझ्यासमोर, तो अनायासे तुझ्यामुळे सुटला." जिज्ञासा उपकारभावाने बोलली.

"तुम्ही दोघं आता लाजवताय मला. माझ्या जागी दुसरं कोणी असतं, तरी त्यांनी हेच केलं असतं." ती ओशाळून बोलली.

"नाही! तुमच्या जागी दुसरं कोणी असतं, तर कदाचित असं वागलं नसतं. सत्याची आणि चांगुलपणाची चाड प्रत्येकालाच असते असं नाही. आणि शिवाय सत्याच्या वाटेवर चालणारे सुद्धा कधीकधी समोर आलेल्या घटनांमुळे भ्रमित होऊ शकतात. तसे दुसरे कोणी असते, तर त्यांनी शक्यतर मला पोलिसांकडे ही दिले असते कदाचित. तुम्ही मात्र माझ्याविरुद्धच्या खोट्या

a

प्रचाराला खरं मानून गैरसमजुतीने मला पोलिसांच्या हवाली न करण्याचा विचारीपणा दाखवलात व माझ्यावर इथं आणून उपचार करण्याचा निर्णय घेतलात हे खरंच कौतुकास्पद आहे!" शक्ती वैष्णवीची प्रशंसा करत ठाम बोलला.

"जिज्ञासामुळेच मला तुमची सत्यता पटली. तिच्या बोलण्यातच इतकी उत्कटता होती, की तुम्ही असं काही करूच शकत नाही हे पटून गेलं. म्हणून मी मदत केली बस." वैष्णवी आपल्या सत्कृतीचं श्रेय जिज्ञासाला देत म्हणाली.

"पण तरी तुम्ही माझ्यासाठी जे केलं ते करायला धाडसच हवं होतं. माझ्यावर जे चार्जेस आहेत, सत्य समजून ही कोणी हिंमत केली नसती. माझा खरेपणा पटला, तरी मदत करण्याचा निर्णयच घेणं यालाच मोठं काळीज लागतं." शक्ती वैष्णवीने त्याच्यावर किती मोठे उपकार केले आहेत याची जाणीव देत होता.

"असू दे आता!" वैष्णवीला लाजल्यागत झालं. ती मागे वळली व चहाचा कप घेऊन ती जिज्ञासाकडे आली.

"पण तुम्ही आमच्या ऑफिस बिल्डिंगच्या पार्किंगमध्ये पोहोचला कसे? आणि तुमची अशी अवस्था तरी कशी झाली?" तिने जिज्ञासाला चहा देत विचारलं.

"हो शक्ती. नक्की झालं काय? हे सगळं तुझ्यामागे लागलं कसं?" जिज्ञासाला गंभीर झाली.

"आपण सनराईजला गेलो होतो, तिथून या सगळ्याची सुरवात झाली. मला अडकवण्यासाठीच तो सापळा होता... सगळं सविस्तर पुन्हा सांगेन."

a

"मला कळलंय थोडं फार..." जिज्ञासा म्हणाली.

"ओके. जे युरेनियम गहाळ केल्याचा माझ्यावर आरोप केला गेला, ते युरेनियम तपासाच्या प्रयत्नात लागलो, तर या शोधात मला एक हार्डडिस्क मिळाली. ती क्रॅक करायला मी सायबर सेलच्या राजन सावतकडे गेलो. काही गोष्टी कळल्या, पण माझ्या पाठीवर कोणी असल्याचा मला संशय होता. जास्त वेळ त्याच्या सोबत थांबलो, तर त्याला काही त्रास किंवा इजा नको म्हणून तिथून मी जसा बाहेर पडलो..." शक्ती सांगू लागला, तसे सारे चित्र त्याच्या डोळ्यांसमोरून पुन्हा झरझरू लागले...

ΔΔΔ

शक्ती राजनच्या घरातून बाहेर पडला. आतून बाहेर येईस्तोवर त्याने शर्ट अंगात चढवला होता. पेन किलरचा असर कमी झाला होता त्याच्यावरचा. त्यामुळे जखमी हातात झिणझिण्या मारत होत्या. म्हणून मग त्याने हात झाडला.

शक्तीला एक माणूस दुरून चोर नजरेने पाहत होता. शक्तीच्या ते ध्यानी आलं. त्याला पाहताच त्या माणसाने आपली टू-व्हीलर चालू केली होती आणि तो शक्तीला संशय येऊ नये म्हणून हळू वेगात गाडी चालवत निघून गेला होता.

शक्ती राजनच्या घराकडे वळून वर पाहून ओरडला,

"राजन!"

राजन लगोलग खिडकीत आला. त्याने वरून पाहिलं.

"हा सर?" राजनने प्रतिसाद दिला.

तुझ्या गाडीची चावी दे!" शक्ती ओरडला.

a

दहाव्या सेकंदाला राजन पुन्हा खिडकीत आला होता. त्याने वरून आपल्या फोर-व्हीलरची चावी खाली फेकली, ती हवेतच शक्तीने झेलली आणि तो गाडीत बसून त्या इसमाच्या मागून रवाना झाला.

शक्ती पाहत होता, की त्याची नजर पडल्यावर बावरून निघालेला इसम आता वेग वाढवून त्याची बाईक दवडत होता. शक्तीची नजर पोलीसी होती. माणूस, आणि त्यातल्यात्यात गुन्हेगार ओळखायला तो चुकत नव्हता कधीच! शक्ती पहिल्याच दृष्टीक्षेपात ओळखून गेला होता, की तो माणूस त्याच्यावर नजर ठेवून होता. त्या माणसाची चोर नजर शक्तीने अस्खलित ताडली होती.

त्याची गरुडदृष्टी त्या वेगाने बाईक पळवणाऱ्या इसमावर रोखली गेली असली, तरी स्टेअरिंगवर हात अधांतरी असल्याने जखमी हात अवघडून अधिकच दुखू लागला होता. तरी त्याकडे लक्ष द्यायला त्याला आत्ता उसंत नव्हती. त्या इसमाला दबोचण्यात त्याचं सारं लक्ष लागून राहिलं होतं.

तो हाती सापडला, तर काही हाती लागण्याची शक्यता होती असा त्याचा विचार झाला होता. शक्ती पाहत होता, की समोरचा तो माणूस बाईक चालवतच मोबाईलवर कोणाशी बोलत होता.

*'हा बहुदा त्याच्या होल्डरशी बोलत असावा.'* असा शक्तीचा विचार झाला,

*'याला कुठं तरी पूर्वी बघितलं आहे, पण कुठं…'* शक्ती राहून राहून स्वतःला प्रश्न करत होता व डोक्याला ताण देऊन आठवण्याचा प्रयास करत होता.

तेवढ्यात बाईक चालवत असताच मोबाईल ठेवत असताना त्या इसमाचे लक्ष त्याच्या बाईकच्या रियर व्ह्यू मिररमध्ये गेलं. ती गाडी त्याने ओळखली. इतका वेळ तो राजनच्या घराबाहेर शक्तीवर लक्ष ठेवून तैनात असल्याने ती गाडी राजनच्या घराबाहेर होती आणि आता ती आपला पाठलाग करतोय हे त्या माणसाने बरोबर ओळखलं. तोही काही कच्चा नव्हताच. असता, तर त्याला या कामे ज्याने कोणी लावले, त्याने लावलेच नसते. शक्तीने बरेच अंतर मध्ये ठेवलं होतं, आपला चेहरा त्याला दिसू नये व आपण उलटा त्याचा पाठलाग करतोय असं त्याला समजू नये म्हणून आणि म्हणूनच शक्तीचा चेहरा तो पाहू शकला नव्हता हे खरं, पण शक्तीला राजनच्या घराबाहेर पडलेलं, त्याची नजर आपल्यावर पडलेली त्याने पहिली होती. शक्ती आपल्यावरच झडप घालू नये म्हणून तर आपण काढता पाय घेतला होता, शिवाय मागून येणारी गाडी राजनच्या घराबाहेरील. शक्तीच आपला माग करतोय हे तो समजून गेला होता. आणि मग त्याबरोबर त्याचा स्पीड अजून वाढला.

आपला त्या समोरच्या माणसाला अंदाज आला आहे हे शक्ती सुद्धा समजून गेला. त्याने ब्रेक हलके दाबत आपला वेग कमी केला आणि त्या माणसाला दृष्टी आड जाऊ दिले. शक्तीची गाडी रस्त्याच्या बाजूला लागली.

शक्तीने पॅन्टचा खिसा चापचला. मोबाईल होता. त्याने तो हाती घेतला. फ्रान्सिसला त्याने फोन लावला होता.

"हा फ्रान्सिस, एक नंबर सांगतो, त्याची माहिती काढ आरटीओ मधून!" शक्तीने फ्रान्सिसला सांगितलं.

a

तिकडून फ्रान्सिसने होकार देताच. शक्तीने त्या माणसाच्या बाईकचा नंबर फ्रान्सिसला सांगितलं.

"आणि हा, त्या बाईकला ट्रॅक कर दिवस भर. कुठे कुठे जातो, ते दिवसभराच्या लोकेशनसचे रेकर्ड्स ठेव आणि मलाही सेंड कर."

*"काही प्रॉब्लेम आहे का सर?"* फ्रान्सिस चिंतीत विचारत होता.

"बहुतेक हा माझा पाठलाग करतोय. प्लिज माहिती काढ. अँड किप मी इंफॉर्म्ड्!"

*"नक्कीच सर. पण तुम्ही सावध रहा. एनआयएचे सुशील मकवाना तुमच्या मागे हात धुवून लागले आहेत अशी माझी शंका आहे. ही व्यक्ती त्यांनी ही ठेवली असेल आपल्या मागे?"* फ्रान्सिसने आपली शंका बोलून दाखवली.

"हू नोज, कदाचित ज्या लोकांनी मला अडकवलं आहे, त्यांचा माणूस पण असेल, म्हणूनच त्याला ट्रॅक करायचं आहे. म्हणजे तो कोणासाठी काम करतोय कळेल." शक्ती विचारी बोलला.

*"मी घेतो माहिती सर, फक्त तुम्ही तोपर्यंत कुठेतरी सुरक्षित रहा. बाय!"* फ्रान्सिस म्हणाला आणि फोन कट झाला.

●●●

शक्ती दिवसभर शिवाजी पार्क नजीकच्या एका ख्रिश्चन स्मशानभूमीत एका बाकावर बसून होता. त्याच्या बाजूला राजनची त्याने आणलेली गाडी लागून होती. लपण्यासाठी कोणतीच जागा नव्हती त्याच्याकडे. आणि हितचिंतकांकडे जाऊन त्यांच्या अडचणी शक्तीला वाढवायच्या नव्हत्या.

a

स्मशान ही एकच जागा अशी होती, की जिथे मृत्यू या अंतिम सत्याला घाबरणारे, आणि ते सत्य स्वीकारण्याची इच्छा नसलेले लोक जितेपणी विनाकारण इथं येण्यास सहसा धजवत नाहीत, मृत्यूपरांत देखील इतरजण आणतात तो भाग अलग. म्हणून त्याला हीच जागा रास्त वाटली होती लपण्यासाठी. शक्तीने हुड डोक्यावर टाकून आपलं बरंचसं तोंड झाकलं होतं. त्यामुळे बाहेरून जाणाऱ्यांची नजर पडलीच, तर कोणी तरी आपल्या मृत प्रियजनाच्या आठवणीत, त्याच्या आत्म्यासाठी शांतीच्या कामनेत प्रार्थना करत इथं बसलं असावं असा विचार करून आतील या उदास व खिन्न, दुःखी आत्म्याकडे कोणी लक्ष दिलं नव्हतं.

सुदैव हेही होतं, की आज कुणाला ईश्वराज्ञा झाली नव्हती, त्यामुळे कोणाचा दफनविधी करायला म्हणून देखील इथं कुणी येण्याची आजतरी वेळ आली नव्हती. त्यामुळे शक्तीचं इथं असणं लोकांपासून अलिप्त राहिलं होतं.

संध्याकाळची सौम्य सोनेरी किरणं त्याला न्हाऊन काढत होती. अजून फ्रान्सिसचा काही रिप्लाय आला नव्हता. आल्हाद किरणं अंगावर घेऊन शक्ती फ्रान्सिसच्या उत्तराची वाट पहात होता. किरणं भलेही आल्हाद होती, शक्ती मात्र निरुत्साही होता. युरेनियमचा साठा शोधणे हे एकच त्याच्या पुढील लक्ष्य होतं तूर्तास, पण ते साधायचं कसं हे काही विचार करून त्याला न उलगडणारं कोडं बनून राहिलं होतं. आणि त्याहून दुसऱ्याच समस्या मागे लागत होत्या त्या निराळ्याच. युरेनियम कुठं असेल या पेचाला अनुलक्षण शक्तीचं गहन चिंतन चालू होतं, तो त्यात इतका बुडाला होता, की हाताला असलेल्या इजेला होणाऱ्या असंख्य पीडा त्याच्या जाणिवेतही नव्हत्या.

विचारात असतानाच शक्तीचा फोन वायब्रेट झाला. शक्तीने अधीर होऊन फोन घेतला.

*"सर, माफ करा, दिवसभर एनआयए सोबत असल्याने शक्य झालं नाही आपल्याला काही कळवायला. आता जरा बाजूला झालोय त्यांच्यापासून."* फ्रान्सिस अपराधी बोलला.

"असू दे. बोल." शक्ती त्यास अपराधी वाटून घेण्याची आवश्यकता नाही असं सूचित करणाऱ्या मृदू आवाजात म्हणाला.

*"सर, ती गाडी सतीश कुलवंत याची आहे. तो आयजी ऑफिस मध्ये ज्युनियर आहे. नवीन पोस्टिंग आहे त्याचं."*

"आयजी ऑफिस?" शक्तीला उद्गारला,

"तरीच याला कुठं तरी बघितल्याचा भास होत होताच मला." शक्ती पुढे म्हणाला,

"दुपार पासून कुठं होता तो?" शक्तीने सवाल केला.

*"पुलिस कॉर्टर्सवर!"* फ्रान्सिसचं उत्तर.

"म्हणजे त्याच्या लक्षात आलेलं, मी त्याचा उलटा पाठलाग करत आहे. म्हणूनच तो दिवसभर निष्क्रिय राहिला." शक्ती तर्कट बोलला,

"बरं, त्याची गाडी वैयक्तिक आहे, का ती डिपार्टमेंटची आहे?" शक्तीने पुढे विचारलं.

*"त्याची पर्सनल आहे, पण तरी पोलिसांच्या सेफ्टीसाठी त्यांच्या वैयक्तिक वाहनात देखील ट्रेकींग डिव्हाईस इन्स्टॉल केलेली असतातच ना सर.*

a

*त्यामुळे त्याचं प्रत्येक तासाचं लोकेशन रजिस्टर झालं आहे. दिवसभर तो त्याच्या घरीच होता. पण आता त्याची टू-व्हीलर कुठे तरी जायला रवाना झाली आहे असं आत्ताच आरटीओ मधून इंटेल आली. म्हणून बाजूला येऊन लगेच कळवावं म्हंटलं. मी तुम्हाला सर्व डेटा पाठवतो."* फ्रान्सिस पलिकडून माहिती देत बोलला.

"गुड! तू फक्त त्यानंतर आपलं सगळं संभाषण आणि मेसेजेस डिलीट कर." शक्ती म्हणाला.

*"हो सर."* फ्रान्सिस बोलला.

थोडावेळ जाऊन देऊन शक्ती भरलेल्या आवाजात बोलला,

*"फ्रान्सिस, मनातून अपराध भावना काढून टाक!"*

*"मी समजलो नाही सर..."* तिकडून फ्रान्सिसचा स्वर सुद्धा जड झाला होता.

"तुला चांगलंच कळतंय. जेव्हा पासून आपण एसपी सरांच्या निवासस्थानी भेटलो आहे, तेव्हा पासून तू माझं नांव न घेता मला सर म्हणत आहेस. मला गरज असताना तू मला इन्फॉर्मेशन देऊ शकला नव्हतास याचं गिल्ट आहे तुझ्या मनात. काढून टाक ते." शक्ती मैत्रीच्या अधिकारवाणीने बजावत म्हणाला.

*"सॉरी शक्ती!"* तिकडून भरलेल्या आवाजाने फ्रान्सिस बोलला. तो हमसू लागला होता.

फ्रान्सिस भावुक झाला आहे हे शक्ती ओळखला होता. पण आपला अपराधबोध त्याने झटकून दिला आहे हेही तो समजला, कारण डिपार्टमेंट मधल्या त्याच्या विश्वासू मित्राने पुनः त्याला नावाने हाक मारली होती.

शक्तीने भरल्या स्वराने "थँक्स!" म्हणून इकडून फोन ठेवला.

डोळ्यांत तरळलेले पाणी त्याने शर्टाच्या बाहीनेच टिपले आणि तो पुढील कामगिरीवर जाण्यास सज्ज उठला.

गाडीकडे जात असतानाच शक्तीचा मोबाईल परत वायब्रेट झाला होता. फ्रान्सिसकडून त्या पाठलाग कर्त्याचं लोकेशन आल्याचं शक्तीच्या लक्षात आलं.

गाडीचा ताबा घेऊन समोरील त्याने मोबाईल स्टॅण्डला शक्तीने मॅप काढून तो मोबाईल माउंट केला, ज्यावर तो इसम निघत असलेला रस्ता दाखवला जात होता. एक लाल डॉट आपल्या गंतव्याकडे भ्रमण करताना दिसत होता. शक्तीने झटक्यात गाडी सुरू केली आणि वळवत गाडीला वेग दिला. धुळीचा लोट उडवत गाडी भर्रकन वळून पळत सुटली...

a

# १९. प्रतिघात...

सत्यवेधी वृत्तवाहिनीचं ऑफिस असलेल्या एका विस्तीर्ण गगनचुंबी इमारतीमध्ये ती दुचाकी जाऊन स्थिरावल्याचं शक्तीच्या ध्यानी आलं. शक्तीने त्या बिल्डिंगच्या बाहेच कार पार्क केली आणि सावधगिरीने तो बेसमेंटला असलेल्या या पार्किंगमध्ये प्रवेशला.

तो ती मोटर सायकल कुठं दिसते का ते सावकाश सावध फिरून पाहत होता. आणि अचानक तो थबकला. त्याला ती गाडी दिसली होती.

एका चारचाकीपाशी ती दुचाकी थांबली होती. अवश्य हा दुचाकी धारक त्याच गाडीत होता हे शक्ती समजला.

ती एक वॅगन होती. मागील भल्यामोठ्या काचेतून शक्ती आत डोकावला होता. शक्ती पाहत होता, की गाडीत, पुढील सीटवर शक्तीचा पाठलाग करता बसला होता. मागे महेश देशमुख व सत्यवेधीचा संपादक बिपीन पुरोहित सोबत बसले होते. महेशने एक मोबाईल दोघांच्या मध्ये धरला होता.त्यावर एक चलतचित्र पळत होते, शक्तीचे!

शक्ती रफिक पटाईतच्या घरात शिरतानाचा व घरातून बाहेर पडलेल्याचा असे दोन व्हिडीओ होते ते. शक्तीच्या मस्तकी जाळ झाला. काही तरी कन्स्पिरसी शिजत आहे महेशच्या डोक्यात हे तो समजून चुकला.

त्या कार पासून बाजूला जाऊन तो एका पिलर मागे लपला. आणखीही चारचाकी तिथं असल्याने त्याला लपण्यासाठी त्याचा फायदाच झाला.

a

शक्तीने मागे होतच राजनला कॉल केला होता.

*"हा सर?"* तिकडून राजन त्वरेने फोन उचलून बोलला.

"महेश देशमुखचा फोन हॅक करता येईल? मला आत्ता तो काय बोलतोय ते ऐकायचं आहे?" शक्ती हळू आवाजात बोलला.

*"फोन चालू आहे का त्यांचा?"* राजनने विचारलं.

"नाही. त्याशिवाय शक्य आहे ना?" शक्तीने शंका केली.

*"आहे. फक्त मला एक मॅलवेअर त्यांच्या मोबाईलमध्ये इन्सर्ट करावा लागेल. मग त्यांच्या मोबाईलचा माईक ऑन करता येईल. पण सर, हे इल्लीगल नाही का? आणि अनएथिकल सुद्धा!"* राजन वैधानिक शंका विचारत होता.

"आहे, पण तो काय करतोय ते पाहणं आत्ताच्या आत्ता आवश्यक आहे. कोर्ट समोर नंतर सगळं मांडतांना त्याची सर्व जबाबदारी माझ्यावर असेल. आता इतका वेळ नाही, की त्याचा फोन हॅक करण्याची परवानगी घेता येईल. शिवाय त्यासाठी कारण काय सांगणार? असाही प्रश्न आहे. दुसरं, आत्ता खूपच तातडी आहे राजन, सत्यवेधीच्या बिपीन पुरोहितला तो भेटायला आला आहे आणि मला अंदाज आहे, की तो माझ्याविरुद्ध कसला तरी कट शिजवत आहे." शक्ती समजावत बोलला.

*"तसं असेल, तर करतो सर. काही मिनिटं द्या..."* राजन संमत झाला.

"फक्त लक्ष ठेवा की त्याला कळता कामा नये. आणि त्याचं जे संभाषण होतं, ते इकडे मला ऐकू येऊ दे आणि ते तू देखील रेकर्ड् करून त्याचं बॅक-अप ठेवून घे." शक्तीने सूचना केली.

*"नक्कीच सर!"* राजनने विश्वास दिला.

आणि तिकडून राजन करवी शक्तीला होल्डवर ठेवण्यात आले. शक्ती प्रतीक्षा करत होता. या प्रक्रियेला किती वेळ लागेल हे सांगणे त्याला कठीण होते.

काही वेळ निघून गेला. आणि त्याला मोबाईलच्या इयरपीस मधून आवाज ऐकू आला. हा आवाज राजनचा नव्हता, तर महेशचा होता!

*"आणि... काय चालू आहे?"* महेशचा आवाज.

शक्तीने गाडीकडे पाहिले. मागील काचेतून महेश दिसत होता. मोबाईल मधून येणारा स्वर आणि त्याचे लीप सिंक होते का याची त्याला खात्री करून घ्यायची होती. आणि ती खात्रीलायक झालीही. तिरकस विपीनकडे पाहणारं महेशचं तोंड तेच उच्चारत होतं, जे शक्तीला मोबाईल मध्ये ऐकू येत होतं.

बहुदा दरम्यानच्या काळात दोघांचे कामाचे बोलणे झाले होते आणि आता दोघे अनौपचारिक बोलण्याकडे वळले होते. परंतु यातूनही काही महत्त्वाचे मिळू शकते या विचाराने शक्तीचे कान त्यांच्या बोलण्याकडे तीक्ष्ण लागले.

*"त्या शक्तीसेनच्या गर्लफ्रेंडशी काही संपर्क होतोय का बघतोय... तिचा इंटरव्ह्यू मिळाला असता, तर चांगली टीआरपी मिळाली असती..."* बिपीन बोलला.

शक्तीने त्याचा स्वर आणि ओठांची हालचालही ताडून पाहिली.

*"मग नाही झाला का संपर्क?"* महेशने विचारलं.

a

*"कुठला होतोय? ती फोन उचलायला तयार नाही!"* बिपीन तिरस्कृत बोलला.

*"चढेल असणारच ती! शक्तीसेन नाईकांची प्रयसी ना?!"* महेश सुद्धा तुच्छतेने बोलला.

*"पण आता गरज नाही तिच्या बाईटची! हे व्हिडीओज म्हणजे स्फोट आहे नुसता! आपल्या वरील खुनाचे आणि युरेनियम चोरीचे आरोपांमध्ये दोषी ठरवू शकेल अशी साक्ष देणाऱ्या रफिक पटाईत या साक्षीदाराचा शक्तीसेन नाईक यांच्याकडून खून!"* बिपीन लालची हसला.

*"पण हेडलाईनच्या पुढे प्रश्नचिन्ह लावायला विसरू नका! खात्रीलायक सूत्रांच्या हवाल्याने आलेल्या या व्हिडीओजच्या आधारे बातमी करताना!"* महेश कुटील हसत बोलला.

आणि दोघे बेरकी हसले.

*"तेच करतो. ती जिज्ञासा जाऊन दे बोबलत. धिस न्यूज विल सेल लाईक अ हॉट केक इन्स्टेड ऑफ हर मिअर् इंटरव्ह्यू!"* बिपीन म्हणाला.

तसा महेश देशमुख कठोर झाला. त्याचा मोहरा आक्रसला.

*"नाही! मिळाला, तर घ्याच तिची मुलाखत. पण दाखवताना असं दाखवा, की त्यातून शक्तीची नाचक्कीच होईल. अर्थाचा अनर्थ करण्यात तुम्हा मीडियाचा हात कोणी धरू शकतं का?"* तो सक्त बोलला.

आणि दोघे अट्टहास करत हसू लागले. त्यांच्या हसण्यात आणखी एक आवाज मिसळला गेला, तो म्हणजे शक्तीचा पाठलाग करणाऱ्या त्या नव्या ऑफिसरचा.

शक्तीला राग अनावर झाला. पण कोणतीही क्रिया-प्रतिक्रिया करून त्याला त्यांच्या बोलण्यात अवरोध आणायचा नव्हता. त्याला अजून काहीसं कळतंय का बघायचं होतं, मिळाल्यास... परंतु त्यांचं संभाषण संपलं होतं.

"पाठवा लगेच ते व्हिडीओज मला."

"सबुर ठेवा. या व्हिडीओजचे सोर्स काय ते कळता कामा नये. त्यामुळे यांच्या कॉपीज बनवून तुम्हाला पेन ड्राइव्ह दिला जाईल. हा माझा माणूस घेऊन येईल ते तुमच्याकडे." बोलताना त्याची नजर सतीश कुलवंतकडे झाली.

बिपीननेही त्याला नीट पाहून घेतला. आपल्याकडे नक्की कोण येणार हे बघून ठेवणं खात्रीलायक होतं त्याच्यासाठी.

*"नांव?"* बिपीनने विचारलं.

*"तुम्हाला काय करायचंय? तो आला की पेन ड्राइव्ह घ्या त्याच्याकडणं."* महेश बिनसला.

"जसे आपण म्हणाल." बिपीनने खांदे उडवले.

पैशांनी नक्कीच बिपीन मोठा असेल; अधिकाराने महेश मोठा होता. त्याची आब आणि भिस्त बिपीन म्हणूनच ठेवून होता. अन्यथा हा आपलं काय करेल सांगणे दुरापास्तच. शक्तीच्या समाजमनावरील प्रतिमेची कशी तो मानखंडना करून ती खंड-खंड भंग करू पाहत होता आणि तेही आपलीच मदत घेऊन ये तो याचिदेही याचिडोळा पाहतच होता. आणि जर हे वास्तवात उतरले, तर शक्तीसाठी ते अजिबात भलं असणार नव्हतं. त्याला जेल शिक्षा जाऊ शकणार होती, शक्तीवर लागलेले जे आरोप हा आपल्याकरवी मजबूत करू पाहतोय, कुणी सांगावं उद्या आपला काही प्रमाद आला, आणि तो याला

खपला नाही, तर शक्तीच्या जागी उद्या आपण असू या भीतीस्तव तो महेशचा उर्मटपणा तो खपवून होता.

*"पेन ड्राइव्ह तुमच्यापर्यंत पोहोचेस्तोवर तुम्ही त्या जिज्ञासा परशुरामशी संपर्क करणं चालू ठेवा. काही करा पण तिची मुलाखत मिळवा हे व्हिडीओज आणि तिची मुलाखत सोबत दाखवा राळ उठवून द्या शक्तीसेनच्या विरुद्ध!"* महेश धगधगत्या डोळयांनी दात ओठ खात बरळला होता. आणि शक्ती ते ऐकत खांबाआडून हे पाहत होता.

*"आणि तिने दिली नाहीच तर?"* बिपीनने शंका उपस्थित केली. पुढे काय करायचे याचेही त्याला दुहेरी योजना हवी होती.

*"तर मग बोला; बघा म्हणावं जनतेला, शक्तीसेन नाईक यांच्या विरोधातील सर्व आरोप खरे असल्याशिवाय का त्यांच्या प्रयसी प्रश्नांपासून पळत आहेत..."* त्याने सुझाव दिला.

*"महेश राव! लाईन चुकली तुमची! पोलिसापेक्षा तुम्ही मीडिया मध्येच हवे होतात!"* त्याची योजना मनोमन पटून तबियत बेहद्द खुश झालेला बिपीन म्हणाला.

महेश खुदकला.

*"या आता. आम्ही पण निघतो. तासाभरात व्हिडीओज पोहोचते होतील."* महेश त्यास म्हणाला.

बिपीन स्मितावला. त्याने महेश सोबत हस्तांदोलन केलं. गाडीतून उतरून तो बिल्डिंगच्या आतून पार्किंगला येण्यासाठी असलेल्या वाटेने आपल्या ऑफिसकडे रवाना झाला.

*"तू सकाळ पासून कुठं होतास?"* महेशचा मोर्चा सतीशकडे वळला.

*"मी... मी कॉर्टर्सवर होतो."* तो घाबरून बोलला.

*"तुला शक्तीवर लक्ष ठेवायला सांगितलं होतं आणि तू बोंबलत घरात बसून होतास?"* महेश जोराचा खेकसला.

*"सर, शक्तीसेन यांची नजर माझ्यावर पडली होती, ते किती खतरनाक आहेत हे तुम्ही ओळखताच!"* सतीश रडतरावासारखं बोलला.

खरे पाहता हा सतीश कुलवंत शक्तीचे मनोमन कौतूक व आदर करत होता, पण तो चुकीच्या म्हणजे महेशच्या हाती पडल्याने त्याला असलं अनैतिक काही करावं लागतं होतं.

*"बरं बरं!"* शक्तीची आपल्या समोर प्रशंसा ऐकून महेश खवळला.

*"खरं सांगतो सर, थोडा वेळ जाऊ देऊन मी परत त्यांच्या मागावर जाणार होतो. फक्त त्यांचा संशय कमी व्हावा म्हणून मी जरा वेळ त्यांचा माग करणं बंद केलं."* सतीश आपल्यावर महेशचा रोष होऊ नये म्हणून कासावीस बडबडला.

*"ते तर करच रे, पण आता जे ऐकलंस, तेवढं काम आधी करा. आणि आता तरी काही चूक वा गफलत करू नका!"* महेश दरडावला.

तसा सतीश हललाच. एका स्प्रिंगच्या खेळण्याची स्प्रिंग असलेली मान जोराने दाबून सोडल्यास ती मान जशी डोलावी, तशी घाबरगुंडी उडालेल्या त्याची मान जोरकस हलली.

महेशने मग बिपीनला शक्तीचे रफिकच्या घरातून बाहेर पडतानाचे जे व्हिडीओ दाखवले, तो मोबाईल हस्तांतरित केला.

*"हे मोबाईल घे. आणि लक्षात ठेव, सदर व्हिडीओज कुठे आऊट होऊ नयेत म्हणून आयजी हट्टहास करत आहेत. कारण माहीत नाही, पण त्यांनी यासाठी निक्षून कटाक्ष पाळला आहे. मी मोठ्या प्रयत्नाने हे मिळवले आहेत. कोणालाही याबद्दल कळता कामा नये, म्हणून मी माझा मोबाईलच तुला देत आहे. ते व्हिडीओ नीट कॉपी करत. आणि या बिपीनला आणून दे!"* महेशने सतीशला समज दिली आणि त्याने नक्की काय करायचे आहे हे पुनः अधिसूचित केले.

सतीशची परत मान डोलली.

आणि शक्तीच्या हे पण ध्यानी आलं, की बिपीन आणि महेशच्या बोलण्यात हा सतीश काय करत होता. त्याच्यावर कामगिरी सोपवण्यासाठी त्याला बोलवण्यात आलं होतं.

*"आणि मोबाईल परत कर माझा काम झालं की! कुणाच्या हाती पडू नये याची काळजी घे."* महेशने ताकीद केली.

*"हो."* दडपलेला सतीश किमान हुंकारला.

आणि इतक्यात बिपीन बसलेला त्या बाजूच्या महेशच्या गाडीच्या खिडकीवर काठीवर टकटक झाली.

संभाषणात गढलेल्या दोघांचेही लक्ष तिकडे गेले आणि ते दचकलेच.

शक्ती तिथे उभा होता. त्यानेच काचेवर नॉक केलं होतं.

महेशची ती अवस्था काही क्षणच राहिली. शक्तीचा त्याच्यासाठी जगातील सर्वांत घृणीत असलेला चेहरा पाहून महेशचा चेहरा विकृत झाला. तिकडे पुढे ड्रायव्हिंग सीटवर बसलेला सतीश अजून त्या धक्क्यातून उभरला नव्हता.

महेश मात्र आपल्या रागाला योग्य ठिकाणी योग्य ठिकाणी चॅनेलाईज करण्यासाठी त्वेषाने गाडीतून खाली उतरला आणि तो शक्तीच्या समक्ष त्याच्या डोळयात तीव्र डोळे घालून पाहू लागला.

"का माझ्या मागे लागला आहेस कळेल?" शक्ती त्याला शांत आवाजात विचारता झाला.

"काल माझ्यावर गोळी चालवणारा तूच ना?" महेशने गुरगुरत प्रतिप्रश्न केला.

"ते फक्त डिस्ट्रॅक्शन होतं, तुला मारायचंच असतं, तर माझा नेम चुकणारा नाही!" शक्ती कठोर बोलला.

"नाकेबंदीच्या नावाखाली एका क्रिमिनलला प्रोटेक्शन देत होतात." शक्तीने आरोप केला.

"त्याची तशी मागणी होती! आणि वरिष्ठांचा हुकूम होता तसा."

"मग थेट संरक्षण का नाही? असं नाकेबंदीचं नाटक?" शक्तीने शंका काढली.

"ते वरच्यांनाच माहीत! पण तुला स्पष्टीकरण देण्याचे काही करणं झाली. तू माझा वरिष्ठ नाहीस आणि सध्या सस्पेंडेड ऑफिसर आणि फगिटिव्ह सस्पेक्ट आहेस!" महेश चिडून उद्गारला.

"गहाळ झालेलं युरेनियम कुठं आहे?" शक्तीने थेट प्रश्न केला आहे.

"ते मला का विचारतोयस? तुलाच माहीत!" महेश तुच्छ बोलला.

"तुलाही चांगलंच माहीत असेल की माझा यात हात नाही. मला अडकवण्यासाठी तूच तर हा खेळ खेळत नाहीस ना?" शक्तीने पर्याय करून पाहिला,

"आता, तुला काही माहीत असेल, तर मला ऐकायला आवडेल." शक्तीने संमोहन टाकणारं स्मित केलं.

महेशचा इतका मोठा घास नाही हे शक्तीही ओळखून होता, तरी कुणी सांगावं? शक्यता शक्तीला ताडून, जोखून पहायची होती.

शक्तीचं ते मोहन स्मित महेशच्या डोक्यात तिडीक आणून गेलं.

"तुझं हे हसू माझ्यावर काही परिणाम करणार नाही शक्तीसेन! मला काही माहीत नाही त्या युरेनियम बद्दल आणि माहीत असते, तरी मी तुला तर नक्कीच सांगितले नसते!" महेश शक्तीला नजरेनेच चाळत होता.

त्याचं नुस्तं नांवच महेश; पण खरा शिवशंकर असल्यासारखा तो आपल्या नेत्रांनी शक्तीला भस्मिभूत करू पाहत होता. पण ते याला शक्य नव्हतं तसं. येऊन जाऊन हा सामान्य माणूसच म्हणून शक्तीची भुकटी करण्यासाठी त्याने इतर काळकूट प्रपंच आरंभला होता. एक असं जहरी विष तो समाजात शक्ती विषयी पेरू पाहत होता, ज्याने शक्ती समाज मनात नैतिक दृष्ट्या एक दुरात्मा ठरणार होता...

शक्तीला किंतु ते होऊ द्यायचं नव्हतं, म्हणूनच पुढचा मागचा विचार सोडून शक्ती आता महेशला सामोरा झाला होता.

"मला फक्त एकच उत्तर दे. हे सगळं; का?" शक्तीने शांत प्रश्न केला.विचारत असताना त्याचा हात त्या आवारभर फिरला होता. सत्यवेधीच्या संपादकांसोबत केलेली डील याबाबत शक्ती विचारतो आहे हे तो या कृतीने महेश यास सुचवीत होता. आणि त्यासंदर्भात उत्तराची वाट पाहत होता. अपेक्षा नव्हतीच त्याला म्हणा... तरी रागाच्या भरात महेश काही सत्य बरळलाच, तर त्याला ते हवं होतं म्हणून तो त्याला सवाल करून उकसवत होता.

आणि शक्तीची शांतता बघून आणि हा प्रश्न ऐकून महेश अगदीच खवळला, चक्रीवादळावेळी समुद्र खवळवा तसा!

"तू विचारतोयस हे? आठवतंय, दोन लाखाच्या मामुली रकमेसाठी तू मला भ्रष्ट ठरवलंस. तू त्या गोष्टी उघड केल्यास आणि सहा महिने मला सस्पेंड केलं गेलं." महेश त्वेषाने गुरगुरला.

"ती लाच तू कुणाकडून घेतलेलीस तुला चांगलंच ठाऊक आहे. एक स्थानिक उग्रवादी संघटना होती ती. वास्तविक आतंकवादीच म्हणायला हवं त्यांना. त्यांच्या लोकांना दंगलीच्या केस मधून बाहेर करण्यासाठी तू लाच घेतली होतीस!" शक्ती त्याची कीव करत म्हणाला,

"शरमेने मला तोंड देता येत नाही म्हणून मग तू एटीयू सोडलीस आणि आत्ता याक्षणी सत्तेवर असलेल्या त्याच संघटनेशी संबंधित पक्षाच्या पॉलिटीशन्ससोबत असलेल्या सलगीच्या जोरावर तू आपल्या वरचे गुन्हे साफ करून घेतलंस आणि आयजी ऑफिस मध्ये रुजू झालास. मुद्दाम आठवण करून देतोय. लाज तर तुला वाटणार नाहीच. पण बघ, आत काही हलतं का?" शक्ती

a

डोळे बारीक करत एकुणात त्याच्या अंतर्मनाचीच उपेक्षा केली. तेही त्याला लाज वाटावी म्हणूनच.

"तू मला शिकवू नकोस!" महेशचा संताप अनावर झाला आणि त्याने आपली पिस्टल बाहेर खेचली.

गाडीत गारठलेला सतीश हे भयकर चित्र पाहून बाहेर आला. तो हळू हळू महेशकडे सरकू लागला.

"कारण काय देशील?" शक्ती बर्फाळच होता.

"ते मी बघून घेईन!" महेश किंचाळला.

तो गोळी चालवणार तोच शक्तीने वेग दाखवत महेशच्या कवटीवर डावीकडे आपल्या किकने जोराचा आघात केला. महेशला ती कळ अनावर झाली. तरी स्वतःला सावरत त्याने शक्तीवर हल्ला चढवला. पहिला जोरदार वार केला यो त्याने शक्तीच्या दुखऱ्या हातावरच. आणि त्या हाताची जखम पुन्हा भलभळलेली. शक्तीला असह्य वेदना झाल्या. आधीच दुखवलेला हात आणि त्यात त्यावर महेश सारख्या बलदंड बलभीमाचा आघात! शक्ती

इतक्यात त्वरा करत सतीशने पिस्टलच्या ट्रिगर वर कसणारा महेशचा हात खाली केला. शक्ती जमिनीवर पडून होता. आपला दुखवलेला हात त्याने धरून ठेवला होता आणि तो वर महेशकडे पाहत होता, त्याच्या पुढील चालीचा तो कानोसा घेत होता...

"प्लिज डोन्ट सर..." सतीश घाई करत बोलला.

"हा तुझा विषय नाही. निघ तू!" महेश त्याच्याही वर चिडला, पण त्याची घात-नजर शक्तीवरच होती.

a

"सर, आवर् हायर-अप्स निड हिम! इफ यू किल हिम हियर्, यू विल गेट युअर सेल्फ इन टू ह्युज ट्रबल! प्लीज यूज यूअर सेंसेस सर, प्लीज..." सतीश चिडलेल्या महेशला जिवाच्या कराराने समजावत होता.

महेशने एक चिडकी नजर सतीशवर फेकली आणि नाईलाजाने "शॅ!" असं उद्गारून आपली पिस्टल परत ठेवून घेतली.

पण तो शक्तीवर उकटं हमखास काढणार होता. त्याने एक पाऊल पुढे होत शक्तीच्या तोंडभर आपल्या बुटाचा जोरदार प्रहार केला. एक तीव्र सनक शक्तीच्या मस्तिष्कत भिणत गेली, जी त्याला बेशुद्धीच्या गर्तेत लोटत होती. शक्तीला महेशने कॉलरला धरून उठवले. त्याला एका पिलरला उभा केला त्याने आणि शक्तीला एका पंचिंग बॅगसारखा वापर करत शक्तीवर अक्षरशः मुष्टीप्रहार करू लागला, महेश हे पाहत नाहीलाजास्तव उभा होता. शक्तीचा जीव जाण्यापेक्षा हे केव्हाही चांगले असे त्याचे मन त्याला सांगत होते. समोर होऊन हे देखील करण्यापासून महेशला रोखले, तर हा शक्तीला मारूनच टाकेल. त्याहून महेशला त्याचा राग काढू देऊन मध्ये न पडलेलेच बरे त्याचा विचार चालू होता. तो त्याच्या तोंडावर स्पष्ट झळकत होता. बेशुद्धीच्या पूर्णावस्थेत हरवणारी शक्तीची नजर त्याच्यावर पडतानाच शक्तीने सतीशचा हा सारा विचार त्याच्या चेहऱ्यावरच वाचला होता. एक मंद स्मित शक्तीच्या चेहऱ्यावर चमकलं आणि शक्तीची मूर्च्छित होणारी पण करारी नजर आणि त्याचं ते मंद स्मित सहन न झाल्याने खजील होत सतीशने शक्तीवरची नजर चोरून खाली केली. परंतु तो तोवर तिथून हलणार नव्हता, जोवर महेश शक्तीला मारण्याचा जरा तरी वाव होता.

a

शक्ती मेला, तर आपली पण काही धडगत नाही ही पण त्याला धास्ती होतीच. महेश उद्या आपला लन मुलाहिजा ठेवणार नाहीच काही चूक आपल्याकडून झाली, तर कहर नाही! आणि शिवाय शक्ती मृत झाला, तर कायद्याच्या कचाट्यात याच्या सोबतच अडकू हा पेच आणि भीड आहेच.शक्ती विषयी यालाही आतून काही वाटत होतेच, जे शक्ती ओळखला होता आणि त्यामुळेच त्याच्या चेहऱ्यावर स्मित खेळले होते. शक्तीने आपली मनःस्थिती ओळखली आहे आणि तेही बेशुद्ध होताना, हे सतीशनेही ओळखले होते आणि त्यामुळेच त्याला लाजल्यासारखे झाले होते. आपण चुकतोय, चुकीच्या माणसांच्या हातातील बाहुले होतोय हे त्याला माहित का नव्हते? पण सत्याची जाण कितीही तीव्र असली, तरी भ्रष्ट, पतित, दुश्चरित्र, पथभ्रमित, पथभ्रष्ट अशा प्रशासन व राजव्यवस्था यांचा तो एक भाग आणि नाईलाजे कठपुतली बनला होता. त्याचीच त्याला लाज वाटत होती. घृणा येत होती त्याला स्वतःची आणि शक्तीनवं ते बरोबर ओळखले होते म्हणून तो अधिकच स्वतःलाच स्वतः खुजा भासत होता. सगळेच काही शक्तीसेन नाईक नसतात, जे व्यवस्था सडली असेल, तर ती तिला शरण न जाता सत्याच्याचा ध्वज फडकवत ठेवतो, अगदी प्राणांची शिकस्त करून!

तो शक्ती होऊ शकत नव्हता आणि याचीच त्याला म्हणून शरम वाटत होती. या शरमेपोटीच त्याची नजर झुकली होती.

'का नाही होऊ शकत आपण शक्तीसेन नाईक?!' तो मनाशी आक्रंदत होता...

आणि त्याचा हा प्रश्न ओळखूनच की काय शक्ती आपल्या करुणामय स्मिताच्या माध्यमातून त्याला सांगू पाहत होता,

'कोणीही शक्तीसेन होऊ शकतो, फक्त इच्छाशक्ती हवी! सत्याची साथ काही केल्या सोडणार नाही हा ठाम निश्चय हवा; मग कोणीही होऊ शकतं; शक्तीसेन!'

एवढं धैर्य सतीश मध्ये बहुदा नव्हतं, म्हणूनच तो भ्रष्टतेचा बळी ठरला होता...

शक्तीची इच्छाशक्ती मात्र जबर आहे हे महेश पाहत होता. इतके आघात एका पाठोपाठ एक करून पण तो उभा होता. त्याची वार-प्रतिवार करण्याची क्षमता राहिली नसली, तरी वार सहन करण्याची क्षमता तो देखत होता.

प्रसंगाच्या दुसऱ्या टोकाला, राजन सावत याचा उर पिळवटून राहिला असावा असं शक्तीच्या मेंदूत वाजत होतं. आपल्यावरचं राजनचं प्रेम तो जाणत होता, त्यामुळे त्याची आपल्यावर होणाऱ्या प्रचंड आघातांना ऐकूणच त्याची दुरवस्था होत असणार हे शक्तीला मनात वाटत होते, आणि जे इथं चालू आहे ते राजन महेशच्या मोबाईल माईकच्या माध्यमातून ऐकत तर होता, हे शक्तीला ज्ञात होतंच. त्याच्याच सांगण्यावरून त्याने ते केले होते. शक्तीला होणारे प्रहार राजन अलबत ऐकत होता... परंतु तो टिपूस गाळत अक्षम असा बसून न राहता, तो तडख इकडे येण्यास निघाला असणार हे शक्ती खात्रीलायक स्वतःस सांगू शकत होता.

आपल्यावर प्रेम करणारी ही निःस्पृह माणसाचं आपली ताकद आहेत असं शक्ती स्वतःला सांगत होता. त्यांच्या आणि असंख्य निष्पाप नजतेच्या

a

रक्षणासाठी तो अभेद्य उभा होता, यातूनच त्याला लढण्याची, टिकून राहण्याची 'शक्ती' प्राप्त होत होती...

आणि अखेर...

"बास करा सर, मरून जातील ते!" सतीश कळवळून पुढे झाला.

एक शेवटचा एक जोरदार तडाखा त्याने शक्तीच्या हनुवटीवर केला, तसं शक्तीचं अर्धमेलं शरीर खाली कोसळलं.

"तुला मोकाट सोडायची वरच्यांची इच्छा नसती, तर तुला कायमचा संपवला असता!" महेश क्रुद्ध खरखरला.

"फेक बाजूला त्याला, दिसायला नको कुणाला! शुद्धीवर आला की जाईल जिथं जायचं तिथं!" महेशने चिडलेल्या स्वरातच सतीशला आज्ञा सोडली.

तसा लगोलग सतीश पुढे झाला आणि त्याने शक्तीला त्याचा हात आपल्या खांद्यावर घेत उचललं आणि पार्किंगच्या एका अंधाऱ्या कोपऱ्यात नेऊन त्याने शक्तीला झोपवलं. काही जुन्या गाड्या तिथं लागून होत्या, ज्या धुळीच्या इंचभर विती एव्हढ्या माखल्या होत्या. त्या कित्येक दिवस हलल्या नव्हत्या आणि इथूनही पुढे हलण्याची शक्यता नव्हती, ज्यायोगे शक्तीला व्यवस्थित आडोसा मिळावा व तो सहसा कोणाच्या हाती लागू नये असं ठरवून, अशी योग्य जागा पाहूनच सतीशने शक्तीला विसावलं होतं.

निव्वळ नासलेल्या व्यवस्थेमुळे व त्याचा एक भाग असल्यामुळे आपला आदर्श असलेल्या व ज्याच्याकडे बघून आपण पोलीस भरती झालोय त्या शक्तीसेन नाईक बाबतच आपल्याला असं घृणीत वागावं लागत आहे

a

याची, शक्तीला धरणीवर ठेकवताना सतीशला होणारी पीडा त्याच्या नेत्राश्रूं वाटे शक्तीच्या चर्येवर ओघळत होती, जणू तो शक्तीला आपल्या चक्षु-अमृताचा अभिषेक घालून आपल्याला कराव्या लागणाऱ्या वाईट कृतीबद्दल क्षमेची याचना करत होता... सतीशचे धारोष्ण अश्रूबिंदू शक्तीला अर्धशुद्ध अवस्थेतही त्याच्या नितळ अंत:करणाची नेनिव करून देत होते... शक्तीने अजूनही पूर्णतः आपली शुद्ध हरपली नव्हतीच. यास्तव त्याला सतीशच्या पश्चात्तापाचे चांगलेच भान झाले होते...

a

## २०. नवपेच...

तिथं पडल्या पडल्या शक्तीने जाणाऱ्या एक चारचाकी व एक दुचाकी अशा वाहनांचा आवाज मूर्च्छावस्थेत असून ऐकला होता.

ΔΔΔ

शक्तीने किती सोसलं, किती मार खाल्ला त्या महेश देशमुखचा हे ऐकून जिज्ञासाला जितकी द्रवीत झाली होती, तितकीच ती संतापली होती.

"दोन ठेवून का नाही दिलंस त्याला?" जिज्ञासा शक्तीवरच भडकली. शक्तीला ते अशक्य नव्हतं हे ती का ओळखून नव्हती?!

शक्ती म्हणूनच हसला.

"त्याला लोळवणं माझ्यासाठी दोन सेकंदाचं काम नव्हतं. आपल्या जीविताचं रक्षण करण्याचा अधिकार प्रत्येकाला आहे, त्यामुळे ते गैरही ठरलं नसतं. पण मला त्याच्या तोंडून काही गोष्टी रेकर्ड्वर आणायच्या होत्या." शक्ती कुत्सित हसला,

"मला मारत असताना तो जे बरळला, ते सगळं राजनकडे मुद्रित झालं आहे." शक्तीने महेश सामोरे होऊन मार खाण्या मागचा त्याचा हेतू सांगितला.

"माफ करा, पण माझ्या समोर आपण हे सगळं बोलणं तुम्हाला योग्य वाटतं?" वैष्णवी संकोच करत बोलली.

वस्तुतः तीही शक्तीचं वदन ऐकून द्रवली होती.

a

"तुमच्यावर विश्वास ठेवण्याचं धारिष्ट्य मला तुम्हीच कृतीतून दिलं आहे." शक्ती तिच्याकडे बघून सौम्य हसला,

"आणि शिवाय सत्य हे, समाजाप्रति आपलं दायित्व जाणाऱ्या एका प्रामाणिक पत्रकाराला सुद्धा माहीत हवंच ना?!" शक्तीने आपलं स्मित दृढ रुंद केलं.

"मी फॅन आहे तुमचा!" शक्ती तिला म्हणाला.

आणि तिची लाजून मान खाली गेली. शक्तीसेन नाईक, ज्याच्याकडे इतर लोक आपला आदर्श म्हणून पाहतात, तो आपल्याला म्हणतो, की तो आपला फॅन आहे?! किती मोठी गोष्ट तिच्यासाठी!

तिला लाजलेलं पाहून शक्ती गोड हसला.

"का तिला लाजवतोयस?" जिज्ञासा शक्तीला म्हणाली.

"नो आय मिन इट! मी यांचं बातमी पत्र पाहिल्याशिवाय दिवसाचा शेवट करत नाही, तुला माहीत आहेच. शक्ती त्याच्या बोलण्यातील सत्यता अधोरेखित करत म्हणाला.

"प्लिज शक्तीसेन... असू द्या आता." वैष्णवी अधिकच ओशाळली.

"अरे, तुम्ही मला सिरियसली घेत नाही." शक्ती बोलला.

"जर इतकेच तुम्ही मला एडमायर करता, तर हे सगळं मिटल्यानंतर मला मुलाखत द्या!" वैष्णवी त्यास बोलली.

"नक्कीच!" शक्ती तातडीने बोलला.

a

"वैष्णवी, थँक्स! तुला विश्वास दाखवलास, की हे सगळं सुरळीत पार पडेल."

"का नाही? सत्य कधी पराजित होत नाही!" ती म्हणाली आणि गोड हसली.

शक्ती मात्र आतून गंभीर झाला होता. सत्य पराजित होताना त्याने कित्येकदा याचि देही याचि डोळा साक्षात पाहिलं होतं... हे वाक्य फक्त बोलण्यासच इष्ट आहे, धरातलवर अंतरिम परिस्थिती काय आहे हे पोलिसांत राहून शक्ती पदोपदी पाहत होता... कित्येक अन्याय त्याने डोळ्यांदेखत पाहिले होते... आणि तो करू काही शकला नव्हता. तिथं सत्य हरताना त्याने पाहिलं होतं, अनेकदा... अनेकदा...

तो हे बोलणार नव्हता, बोलून जिज्ञासाला तणाव द्यायचा नव्हता त्याला. आणि अंतत्तोगत्वा विजयी कोणीही होऊ, सत्य वा असत्य, शक्ती प्रयत्न मात्र पुरेपूर करणार होता. त्याला त्याच्या प्रयत्नांवर विश्वास होता, जय-पराजय या नंतरच्या गोष्टी...

"पुढे काय प्लॅन? बिपीन सरांकडे तुमचे सीसीटीव्ही फुटेज पोहोचले असतील... आता काय करायचं?" वैष्णवीने चिंतीत स्वरात विचारलं.

शक्तीची मान निश्चित डोलली. त्याने काहीतरी योजना ठरवून ठेवली होती हमखास हे त्याचं द्योतक होतं.

त्याने मोबाईल उचलला आणि राजनला कॉल केला. मात्र फोन उचलला गेला नाही, तर तिकडून बंद करण्यात आला. शक्ती बुचळकला. राजन कधीच असं करणार नाही... मग...?

a

इतक्यात डोअर बेल खणाणली आणि शक्ती सह जिज्ञासा आणि वैष्णवी देखील कटाक्ष झाल्या.

"कोण असेल?" जिज्ञासा जरा चिंतीत बोलली.

"मी बघते." वैष्णवीने धिटाई दाखवली.

"कोण असेल त्याला बाहेरूनच घालवून देते काळजी करू नको." आणि ती बाहेर झाली.

तिने दरवाजा उघडला, तसा तिने एक अनोळखी माणूस तिच्या दारात उभा पाहिला.

"कोण हवंय?" तिने विचारलं.

"शक्तीसेम नाईक!" तो तरुण बोलला.

शक्तीचे नांव ऐकताच ती घाबरली.

"ते... इथं नाहीस!" ती म्हणत तिने दार लावण्याचा यत्न केला.

पण त्याने दार धरून ठेवलं. आणि भसक्यातून तो आत सरकला.

"कुठं आहेत?" म्हणत तो घर फिरू लागला आणि अचानक एका खोलीपाशी थबकला.

आत तो शक्तीला पाहत होता.

"राजन! तू इथं?" शक्ती आश्चर्याने विचारता झाला.

आणि निमिषार्धात त्यालाच उमजलेलं, की मला शोधणं राजनसाठी काय अवघड? शक्ती स्मितावला.

a

"तुम्हाला न्यायला सत्यवेधीच्या पार्किंगला गेलो, तर तिथं तुम्ही कुठं दिसला नाही. तुम्हाला मोबाईलद्वारे ट्रेस केलं, तर इथलं लोकेशन दाखवलं. शेजाऱ्याची गाडी घेऊन तिथं आलो होतो, त्याला तिथून त्याची गाडी नेण्यास सांगून सत्यवेधीच्या टॉवर बाहेरची माझी गाडी कलेक्ट केली. इथं रात्रीच आलो होतो, जिज्ञासा मॅम देखील इथं आहेत पाहून ही जागा तुमच्यासाठी सुरक्षित आहे, इथं तुम्हाला काही इजा नाही हे लक्षात आलं. मग इथंच पहारा देत राहिलो रात्रभर. आत्ता तुमचा कॉल आला, तसं आत आलो." राजन सर्व सिनारिओ शक्तीला विदित करत म्हणाला.

राजनचं आपल्यावरचं प्रेम आणि आपल्याविषयी समर्पण बघून शक्ती गदगद झाला. जिज्ञासालाही राजनच खूपच अप्रूप वाटलं.

"भेटायची अधीरता इतकी होती साहेबांना, की मला ओलांडून साहेब घरात शिरले." वैष्णवीने केवळ नाराजी व्यक्त केली.

राजन वैष्णवीकडे वळला. त्याच्या डोळ्यात क्षमायाचना होती

"माफ करा, मला सरांची काळजीच इतकी वाटत होती, की तुम्हाला समजावत बसण्याचा धीर माझ्यात नव्हता." तो विनंतीच्या सुरात म्हणाला.

"पण तुमच्या या वागण्याने माझ्यातलं धैर्य पळालं होतं ना?" तिने नाराजी दाखवली.

"माझ्या वागण्याबाबद्दल मी आणखी एकदा माफी मागतो." राजन हात जोडून म्हणाला.

"ठीक आहे." वैष्णवी नाराजीनेच बोलली.

a

"राजन! त्या सुलेमान तोपचीची काही माहिती काढलीस?" शक्तीने त्यांच्यातील राजी-नाराजीचा व मनवण्याचे खेळ बंद करण्यासाठी विचारणा केली.

त्याला कामाविषयी बोलणं अधिक महत्त्वाचे वाटत होते. राजनने दरम्यान बरीच माहिती गोळा केली होती. शक्तीकडे वळून ती तो सांगण्यास सज्ज झाला.

दरम्यान जिज्ञासाने शक्तीची सलाईनची सुई काढली. त्या शिरेतून रक्त स्त्रवू नये म्हणून त्यावर कापसाचा बारीकसा बोळा ठेवून चिकटपट्टीने तो कापूस चिटवून ठेवला.

"सुलेमान तोपची सर, वास्तवात रफिक पटाईत याचा बॉडीगार्ड होता." राजन स्फोट करावा तसं बोलला.

शक्तीला मात्र काही वाटलं नाही, इतक्या चित्रविचित्र गोष्टी पुनः पुन्हा सतत समोर येत असल्याने त्याला धक्का बसणं बंदच झालं होतं.

"म्हणजे जतीन रफिक नांवाने राहू लागला, त्यापासून नंतर हा तोपची त्याच्या सोबत आहे. त्याला प्रोटेक्शन देण्यासाठी, पण चित्र असं उभं केलं जात होतं, की हा रफिक पटाईत सुलेमान तोपचीचा बॉडीगार्ड आहे." शक्तीने त्याला लक्षात जे आलं, ते उद्धृत केलं.

"हो सर. तसंच आहे. या सुलेमानला अध्वर्यू ग्रुप मध्ये बोर्ड ऑफ डिरेक्टर्स मध्ये घेतला होता. त्याच्या आडून सर्व व्यवहार हे जतीन पाहत होता." राजनने शक्तीच्या तर्कावर शिक्कामोर्तब केला.

"आत्महत्येचा बनाव केल्याने दर्शनी जतीनला ठेवणं शक्य नव्हतंच त्यांना, त्याच्यासाठी हा सर्व प्रपंच होता तर." शक्ती विचारी बोलला.

"ऑफकोर्स सर. आणि सर्व व्यवहारांवर नजर राहावी म्हणूनच रफिक उर्फ जतीन हा सुलेमानचा बॉडीगार्ड म्हणून त्याच्या सोबत रहायचा, ज्याने सतत त्यांच्या सोबत राहता येईल." राजनने पुष्टी जोडली.

"हा सुलेमान अध्वर्यू ग्रुपच्या कोणत्या कंपनी सीईओ, चेअरमन वगैरे त्याला केला होता का?"

"हो सर. अध्वर्यू युरोकॉर्पचा तो चेअर पर्सन होता!"

शक्तीला लख्ख उजेड पडल्यासारखं झालं. कारण ही कंपनी भारत सरकारच्या ... सोबत टाय-अप मध्ये युरेनियम खाणी खोदत होती...!

आणखी एक पुरावा शक्तीच्या गाठी आला होता.

"युरेनियम कुठं ठेवलं आहे काही समजलं?" शक्तीने तडफेने विचारलं.

"नाही. ते त्यांच्याकडून खरंच गहाळ झालंय सर. मी जतीनची हार्डड्राइव्ह पुन्हा धुंडाळून काढली. आणि बऱ्याच गोष्टी समोर आल्या. या जतीनला सर्व गोष्ट्ीिंचं डॉक्युमेंटेशन करण्याची सवय होती, तीच आपल्याला फावली आहे." राजन उत्साही बोलला.

"बोल!" शक्ती पण उत्तजेनेने भरला होता.

"युरेनियम जतीन कोल्हापूर मध्ये घेऊन आला, पण इथं त्याच्याकडून ते चोरीला गेलं. कोणी चोरलं काही माहीत नाही यांच्यातील कुणालाच."

हे स्पष्टीकरण ऐकताच शक्तीच्या डोक्यात अजूनच प्रकाश तांडव चालू झाला.

"मला का अडकवलं गेलं, याचा कारण मला आत्ता समजतंय!" शक्ती उत्तेजित उद्गारला.

"का सर?" राजनने उत्सुक प्रश्न केला.

"ते युरेनियम यांना सुद्धा शोधायचं असणार आणि त्यांच्या मार्गात मी अडथळा बनू नये म्हणूनच मला या प्रकरणात अडकवून असं फरार व्हायला भाग पाडलं आहे."

"इतकं खोल प्लॅनिंग?!" राजन अक्षरशः धक्कावला होता.

जे सामोरं आलं आहे ते ऐकून जिज्ञासाला देखील धक्का बसला होताच, परंतु बातमीदार असणारी व विचित्र विचित्र बातम्या ऐकण्याची सवय असणारी वैष्णवी देखील हादरली होती.

"आता आपल्याला काहीही करून त्या लोकांच्या आधी ते युरेनियम शोधून काढावं लागणार आहे!" शक्ती दृढ निश्चियी बोलला.

युरेनियम कोल्हापूर मध्ये आहे हे खात्रीशीर झाल्यापासून शक्तीचा सारा रोख ते शोधण्याकडेच लागले होते. शक्ती आत्तापर्यंत तेच करत होता, आणि आता तर अजून ते षडयंत्रकाऱ्यांच्या हाती नाही हे मजल्यावर तर ते प्राप्त करण्यासाठी शक्तीची इच्छा अजूनच बळावली, दृढावली होती.

अज्ञात शत्रूंच्या हाती पडण्यापूर्वी ते चोरी केलेल्या चोरांना पकडून युरेनियम मिळवण्याची त्याला अधिकच निकड वाटत होती.

a

अध्वर्यू आणि सरकार त्या युरेनियमचं काय करणार होते हेच जिथं अजून समजलं नव्हतं; तिथं एक भीती आता दुसरी निर्माण झाली होती शक्तीच्या मनी, की युरेनियम नक्की कोणी चोरले असेल आणि का? हे कोणी शत्रूराष्ट्रीय हेर, किंवा त्यांचे कोणी दहशतवादी तर नसतील? हो, तर, काय करायचं असेल त्यांना या युरेनियम पासून? आणि ते कोल्हापूर मधून बाहेर वा अगर भारताबाहेरच एव्हाना गेलं असेल, तर? देशासाठी किती मोठे विशालकाय संकट होते हे...

आणि फरार असणाऱ्या शक्तीकडे तितकी अथोरिटी नव्हती, आणि तो अजूनही अँटी टेररीजम युनिट मध्ये असताच, तरी कोल्हापूर बाहेर त्याचं कार्यक्षेत्र जात नव्हतं. त्यावेळी देखील पेच आलाच असता आणि आता तर काही अधिकार तर नाहीतच, उलट आपणच सर्वांच्या नजरेत गुन्हेगार... कसे करायचे सारे...?

शक्तीकडे या वर्षांची उत्तरे सध्या नसतील कदाचित; परंतु तो एक निक्षून जाणून होता, की काही करून युरेनियमवर आपला हात प्रस्थापित करणं आवश्यक आहे व हे शक्तीला पक्कं ठाम होतं!

पण अजूनही भीमकाय यक्ष प्रश्न होताच, की 'कसे...?'

# २१. मृत्युसामग्री...

तिकडे शक्तीचं विचारचक्र घरघरत होतं, तर इकडे एक हे उद्गृह विमान घरघरत तळ नजीक करण्याचा प्रयत्न करत होतं.

ते हेलिकॉप्टर 'एच' लिहिलेल्या मार्कवर टेकलं.

त्यातून एकजण उतरला. त्याच्या हाती एक पंधरा इंची लोह-वृत्तचित्ती डबा होता. ज्याच्यावर पिवळ्या पार्श्वभूमीवर अधिकृतपणे निर्धारित किरमिजी काळा ट्रेफॉइल चिन्हांकित असून त्यावर धोक्याची सुचना म्हणून 'हजार्ड क्लास सेव्हन' असं लेखन केले होते; जे काही विशिष्ट प्रमाणात किरणोत्सर्गी पदार्थ असतील काळजीपूर्वक हाताळण्याची सूचना म्हणून तेथे प्रदर्शित करणे आवश्यक असते.

त्यातून तो किरणोत्सारी पदार्थ असलेलं कंटेनर सत्यजितच्या फार्महाऊसला नेण्यात आले. ते मटेरियल घेऊन उतरलेला माणूस फार्महाऊसकडेच चालत येताना गृहमंत्री मधुकांत गोस्वामी आणि जनक अध्वर्यू टेरिस वरून पाहत होते. त्यांच्या जरा मागे सत्यजित ओसवाल उभा होता.

तो माणूस लगबीने ते लोखंडी सिलेंड्रीकल कंटेनर घेऊन येत असता सत्यजितच्या एका विश्वासूने त्याला वाट दाखवण्यास मधेच गाठला व त्याच्या दंडाला स्पर्श करून दिशा निर्देश करत तो त्याला घेऊन येत होता.

काही मिनिटांतच तो टेरिसवर पोहोचला त्या कंटेनर सोबत. त्याच्या हाती युरेनियम पासून संरक्षण करणारे प्रोटेक्टिव्ह गल्व्हज होते.

जनक, मधुकांत, सत्यजित हे तिघेही मागे वळले होते. सत्यजित त्यांच्या नजरेच्या टप्प्यातून बाजूला झाला, त्यांना आलेला इसम आणि त्याने आणलेले मटेरियल नीट दिसावे म्हणून.

"काही अडचण?" गोस्वामीने त्या माणसाला विचारलं.

"नाही!" तो माणूस म्हणाला.

"याला योग्य ठिकाणी पोहोचवा."

"मी जातो सोबत!" सत्यजित कार्यतत्परता दाखवत बोलला.

आपण कुचकामी नाही, तर उपयोगी पात्र आहोत असं त्याला दाखवून द्यायचं होतं, त्यासाठी त्याचा हा अट्टहास होता.

जनकची वैतागी नजर सत्यजितवर गेली.

"इसे तो बिल्कुल मत भेजना! फिर काम खराब कर देगा!" तो भडकला.

जनकची सत्यजितवर झालेली इतराजी अजून दूर झालेली नव्हती. त्याच्या माणसाकडून आपला भाऊ गमवल्याचा राग अजून होता त्याला, केवळ गृहमंत्रीने समजावलं म्हणून त्याच्या सांगण्यावरून तो गप्प होता.

"ठ... ठीक है... म... मेरा बॉडीगार्ड जाएगा साथ में इन्हे जगह दिखाने के लिए..." सत्यजित कचरत म्हणाला.

"तेरे आदमियों पर तो कतई भरोसा नहीं है!" जनकने निर्णय सत्यजितला निर्णय सुनावला.

"ही इज वन ऑफ द बेस्ट. चार लोगों की टीम है उसकी. सारे के सारे इलिट है!" सत्यजित कन्विन्स करत बोलला.

आणि त्याची नजर गृहमंत्रीवर गेली. याला समजवा अशी तो दृष्टीनेच आर्जव करत होता. ती समजून गृहमंत्री त्यालाच विचारता झाला,

"तुम्ही अमेरिकन्स बद्दल बोलताय का?" मधुकांतने प्रश्न केला.

"होय. शक्तीसेनला धूळ चारलिए त्यांनी!" त्यांची उपयोजिता अधोरेखित करण्यासाठी सत्यजितने हुकुमी वाक्य प्रविष्ट केलं.

"ये क्या मराठी में खुसुरपुसुर कर रहे हो दोनो?" जनक चिडका ओरडला.

मधुकांत त्यांच्याकडे वळला.

"ये कह रहे है, उनके आदमियों ने शक्तिसेन नाइक को भी धूल चटाई है!" तो म्हणाला.

"वह आदमी? जिसे हमने फसाया है?" जनकने शंकित विचारलं.

"हाँ वहीं!" गृहमंत्री मधुकांतने पुष्टी दिली.

"क्या वह इतना खतरनाक है, की उसका उदाहरण देना पड़ रहा है, इसके आदमियों की बढ़ाई करने के लिए?"

"मैं गृहमंत्री हूँ जनक साहब! मैं देश के हर एक पुलिस अफसर की खबर रखता हूँ! यह ऑपरेशन चालू करने से पहले मैंने शक्तिसेन की विशेष कुंडली निकाली है! और यकीन जानिए, यह आदमी सब से ज्यादा खतरनाक है! इसे खरीदा नहीं जा सकता और जिसे खरीदा नहीं जा सकता, वह आदमी कितना खतरनाक होता है, आप अंदाजा लगा सकते है!" गृहमंत्री डोळे बारीक करून तुच्छतेने बोलला.

"मैं भी यहाँ रहते हुए देखता हूँ सर, के कोल्हापुर में तो वह एक जीते जी दंतकथा बना हुआ है! लगभग सारे पुलिस ऑफिसर्स ही नहीं बल्की पुरे नगरवासी भी उसकी इज्जत करते है! पुलीस डिपार्टमेंट के सारे युनिट्स भले सुप्रीटेंडेंट या इन्स्पेक्टर जनरल की शायद ना माने, शक्ती की कोई बात खाली नहीं जाने देते!" सत्यजित बोलला.

"वह इतना बड़ा अफसर है?" जनकने शंकेने विचारलं.

"है तो वह यहाँ के डिपार्टमेंट के एंटी टेररिजम यूनिट का प्रभारी, पर उसके सिद्धान्तों की वजह है, वह लोगों के सर का ताज है!" सत्यजित नजर चोरत दबकत बोलला.

"वहीं ताज हमने मलिन किया है, ताकि हमारे किए पर किसीकी नजर ना जाए! लोग उसको उल्हाना देने में व्यस्त हो..." गृहमंत्री शेखी मारू पाहत होता.

ते पाल्हाळ आता या निकराच्या घडीला जनकला पुनः ऐकायचं नव्हतं.

"बस! इस मटेरियल के बारे में सोचो!" जनक तडकला.

"मैं इंतेजाम किए देता हूँ!" म्हणत लगोलग सत्यजित खाली पळाला.

जनकने त्याच्या त्या कर्मचाऱ्याला चिडलेल्या डोळ्यांनीच निघण्याचा इशारा केला. तो जागेवरूनच आबाऊट टर्न करून सत्यजित मागे गेला. सोबत लागलीच गेला, तो त्याला वर इथं आणलेला इसम... व आता जनक आणि गृहमंत्रीच काय ते तिथं गच्चीवर राहिले. सुटलेल्या मंद वाऱ्याने त्यांचे कपडे फडफडण्याचा आवाज होत होता, कारण तिथं भयाण गूढ शांतता भरून राहिली होती...

a

●●●

शक्ती अजून विचारांच्या गर्तेतच गोते खात होता.

"सर... पण तुम्हाला भीती नाही वाटली, की महेश देशमुख सर तुम्हाला खरंच मारून... आय मिन..." राजनला वाक्य पूर्ण करवलं नाही. तो कचरला बोलताना.

शक्ती विचारांतून बाहेर खेचला गेला त्याच्या आवाजाने. त्याचा प्रश्न त्याच्या मस्तिष्कात झिपला होता, जरी तो स्वमग्न होता, तरी. शक्ती हसला.

"अजिबात नाही! तो मारणार नाही हे मला अगदी ठाम होतं." शक्ती म्हणाला.

"कसं?" राजनने जरा रागावतच विचारलं.

"प्लॉट आर्मर!" शक्ती म्हणाला आणि हसला.

कोणालाच काही कळालं नाही, की त्याला म्हणायचे काय आहे. शक्ती अधिकच दृढ हसला.

"अरे, हे षडयंत्रकारी जे काही करू पाहत आहेत, ते करण्यासाठी त्यांना युरेनियम हवे. आणि ते तर गहाळ झाले आहे. ते शोधण्यासाठी त्यांना लोकांचे लक्ष डायव्हर्ट करणे गरजेचे होते. म्हणून तर तो आळ त्यांनी माझ्यावर टाकला.

"आणि मला फ्रीली फिरू दिलं जात आहे, कारण इथून पुढेही जे विपरीत घडेल त्याचं उत्तरदायित्त्व माझ्यावर टाकता येईल. बघ ना, जतीन म्हणजे लोकांच्या नजरेत मी युरेनियम लंपास केलंय व त्याच्या मालकाचा

खूनही केला आहे असं सांगू शकणारा रफिक पटाईत मी मारला असा आरोप सुद्धा माझ्यावरच टाकला. यावरून हे स्पष्ट होतं. म्हणजे गुन्हे करूनही ते गुन्हे माझ्यावर टाकून ते लोक, माझ्या पडद्याआड राहूनच हवं ते करू शकणार आहेत.

"जोपर्यंत युरेनियम सापडत नाही त्यांना, तोपर्यंत मला काही होऊ देणं त्यांच्या दृष्टीने इष्ट नाही. मी मरूच शकत नाही, तोपर्यंत तरी, जोपर्यंत त्यांना युरेनियम मिळून ते आपलं जे काही कार्य करायचंय ते साध्य करत नाहीत. ज्याने कुणी ही कन्सिरसीची स्टोरी प्लॅन केली आहे, त्याची ही योजनाच माझं रक्षण करत आहे, म्हणून मी 'प्लॉट आर्मर' असं म्हणालो." शक्ती हसला,

"आणि त्यांना हवं ते साध्य केल्यानंतर मी मेलो काय आणि जिवंत राहिलो काय त्यांना फरक पडणार नव्हता. महेश मला तेव्हा कदाचित मारेल पण आत्ता नाही हा माझा तर्क होता म्हणून त्याला डिवचून त्याच्याकडून सत्य जाणून घ्यायचं या हेतूने मी त्याच्या समोर झालो." तो पुढे म्हणाला.

*'एवढं जीवावर आणि अब्रूवर बेतलेलं असता हा हसतो काय?'* असं वैष्णवीला झालं.

"आणि तुमचा हा प्लॅन फसला असता तर? महेश सरांनी तुमच्यावर गन रोखली होती हे मी ऐकलं होतं." राजन काळजीने म्हणाला.

"तसं झालं का पण? सोबत असणारा सतीश कुलवत याने त्याला आठवण करून दिलीच की!" शक्तीने आपली योजना कशी ठीकच होती हे स्पष्ट करत बोलत होता,

"आणि जर महेशने ऐकलेच नसते, तर मी सवरक्षण करण्यास सक्षम आहे याची तुला खात्री आहे असे मी समजतो." शक्ती स्मित करत निवांतच बोलला.

"बघितलंस हा किती निष्काळजी आहे?" जिज्ञासाने नाराज होत आंदोलनच केलं.

"बरं सॉरी!" शक्ती बोलला. आणि तो राजनकडे बघू लागला,

"तुला अजून काही समजलंय का?" शक्तीने राजन यास विचारलं.

परंतु जिज्ञासा मधे बोलली,

"तुम्ही करा चर्चा. आम्ही ही महत्त्वाची माहिती ऐकण्याचं औचित्य नाही. मी तुला काही खायला बनवते आणि नंतर तुझ्यासाठी शॉपिंग करून येते. हॉस्पिटलला पण जायला लागेल मला." शक्ती जवळून उठत जिज्ञासा बोलली.

"मी बनवते काहीतरी, तू तुझी बाहेरील कामे आवरून ये." वैष्णवी बोलली.

"तुला ऑफिस नाही?" जिज्ञासाने असमंजस विचारलं.

"मला सस्पेंड केलं आहे." वैष्णवी नाराज बोलली.

"का?" जिज्ञासा चक्रावली होती.

"बिपीन सरांचं म्हणणं आहे, की मी तुझा शक्तीसेन यांच्यासबंधी इंटरव्ह्यू घ्यावा. एरव्ही माझी इच्छा नव्हतीच तुला त्रास द्यायची, पण आता हे सगळं समजल्यावर तर माझं धाडस नाही." वैष्णवी खिन्न बोलली,

a

"राजीनामाच देईन कदाचित आता मी..." तिने तरीही दृढ निश्चित केलं होतं.

"नाही!" शक्ती ओरडला,

"तुम्ही घ्याच हिचा इंटरव्ह्यू!" शक्तीने त्याचा निश्चय सांगितलं.

"शक्ती!" जिज्ञासाही गोंधळून ओरडली.

"हे बघ, सत्य आपल्याला कधी कळेल तेव्हा कळेल, पण जेव्हा आपल्याला कळेल, तेव्हा ते सत्य सर्व जगासमोर आणण्यासाठी आपल्याकडे एक प्लॅटफॉर्म तर हवा. केबल न्यूज पेक्षा चांगला ऑप्शन आपल्यासाठी दुसरा काय असेल? आणि शिवाय पत्रकारितेतून सत्यासाठी लढणारे राहिलेच नाहीत, तर जनतेचं हित पाहणारी व साधणारी पत्रकारिता तरी टिकेल का? यांची नौकरी टिकणं त्यासाठी पण गरजेचं आहे." शक्ती समजावत होता.

डोके गरम झालेल्या जिज्ञासाला शक्तीचा तो थंड डोक्याने केलेला गहिरा विचार पटला.

वैष्णवीला सुद्धा शक्तीच्या या विचारी प्रवृत्तीचं आणि प्रत्येक गोष्टीत फक्त जनतेची काळजी करण्याचा, त्यांच्या संरक्षणाचा, त्यांच्या हक्कांच्या संरक्षणाची चिंता प्रत्येक विचारात आपसूक करण्याचं कौतुक वाटत होतं. किती हा पराकोटीचा निःस्वार्थपणा... शक्ती बाबत तिने अनेकदा ऐकलं होतं, ती प्रत्यक्ष आता त्याचा अनुभव घेत होती. आणि या पुण्यातमाला वाचवण्यासाठी आपण धडपड केली त्याचं तिला सार्थक वाटून गेलं.

तर राजनला माहितच होतं, की आपला हा सहकारी कसा आहे, त्यामुळे तो आधीच त्याच्या प्रेमात होता. शक्तीला पाहून, त्याच्यामुळे तोही लोकांसाठी

a

जगायला शिकला होता. आत्ताच शक्तीचं बोलणं देखील त्याच्यासाठी नवीन वस्तुपाठ ठरला होता.

"पण इथं नको. स्टुडिओतच हा इंटरव्ह्यू होऊ द्या. अन्यथा माझी इथली उपस्थिती कदाचित शोधली जाईल." शक्तीने सुचवलं.

"ठीक आहे, पण आज नको. आज जरा लिव्ह घेते. काल तुमच्या बाबतीत जे घडलं आणि आत्ता जे ऐकलं, ते पचनी पडायला जरा वेळ तरी हवा. डोक्याला विश्रांती हवी आहे मला..." वैष्णवी म्हणाली.

"आपला वेळ घ्या." शक्ती तिला समंजस बोलला.

"पण शक्ती, तुला वाटतं ह े बिपीन पुरोहित आपल्याला मदत करतील सत्य लोकांपुढे मांडण्यासाठी?" जिज्ञासाने तिला सतावणारा प्रश्न केला.

"ते कसं करायचं ते मी नंतर तुम्हाला सांगेन!" शक्ती बेरकी हसला.

आपले काम काढण्याचा त्याच्याकडे उत्तम प्लॅन आहे हे सर्वच समजून चुकले, आणि हेही की शक्ती आत्ता काही सांगणार नाही!

"असो, मी जेवणाला लागते. आपण निवांत चर्चा करा." असं स्मित करून म्हणत वैष्णवी गेस्टरूम सोडून किचनकडे गेली.

"मी ही निघते. येते दिवसाची शिफ्ट संपवून. जिज्ञासा बोलली.

शक्ती हसला.

"बाय!" तो म्हणाला.

जिज्ञासाने राजन तिथं असण्याची तमा बाळगली नाही. तिने शक्तीच्या कपाळाचे चुंबन घेतले.

"काळजी घे." ती त्याला उदास म्हणाली.

"हसून जा!" शक्ती तिला बोलला.

आणि त्याची इच्छा म्हणून जिज्ञासाला गोड हसली. पण तिच्या चेहऱ्यावरच चिंतेचं जाळं विरलं नव्हतं हे शक्तीही जाणत होता.

"डोन्ट वरी!" तो गंभीर म्हणाला. त्याच्या ओठांवर तिला आश्वस्त करणारं स्मित झळकत होतं.

गंभीर तिची मान डोलली.

"टेक केअर." ती काळजीने म्हणाली,

"आणि ऐक! वैशुला तुला द्यायची औषधे सांगून ठेवते. ती घ्यायची आहेत!" तिने शक्तीला ठणकावलं.

आज्ञाधारक मुलाप्रमाणे शक्तीची मान डोलली.

"येते." म्हणत ती निघून गेली.

राजन पहात होता, कुणालाही न जुमाणणारा शक्तीसेन आपल्या प्रियसी समोर एकमद भागूबाई कसा असतो ते. शक्तीची मान त्याच्याकडे वळली. बावरून पाहणाऱ्या राजनला पाहून तो बावचळलाच जरा.

"आहे गर्लफ्रेंड, पण आई असल्यासारखी वागते." सारवासारव करण्याचा प्रयत्न करत शक्ती गडबडून म्हणाला.

"समजू शकतो त्यांची काळजी." काय बोलावं न सुचल्याने राजन अस काही म्हणाला.

a

आणि शक्तीने त्या ऑकवर्ड परिस्थितीहून वेगळा विषय बदलण्यासाठी घसा खाकरला.

"हं! बोल. काय समजलं आहे आणि?" शक्तीने खोली रिकामी झाल्यावर मागे उरलेल्या राजनला प्रश्न केला.

"ते युरेनियम कुणाला पोहोचवायचं होतं त्याचं नांव!" राजनने आणखी एक स्फोट केला.

"कोण आहे तो?" शक्ती उत्तेजित झाला.

"पूर्ण नांव नाही. फक्त इनिशियल्स आहेत आणि त्याची इतर काही माहिती पण रजिस्टर नाही त्या ड्राइव्ह वर. फक्त याला या तारखेला हे युरेनियम स्वतः पोहोच करावयाचे आहे अशी टिप्पणी आहे." राजन म्हणाला.

"इनिशियल्स काय आहेत?" शक्तीने विचारलं.

"एन. पी.!" राजन बोलला.

शक्ती ला ती अद्याक्षरे ऐकून शक्तीला काही स्ट्राईक झालं. पण त्याने तसं काही उद्धृत केलं नाही.

"आणखी काही इनिशियल्स नमूद आहेत, पण ती कोणत्या कारणे आणि कोणत्या संबंधी ते नाही समजलं. 'एम. टी.' आणि 'टी. के. अशी ती इनिशियल्स आहेत सर." राजन बोलला.

"बहुदा फक्त लक्षात राहण्यासाठी म्हणून आपण टिपण करतो तसे ते टिपण असेल. ती माहीत लिहिणे इष्ट नसल्याने ती नमूद केले गेले नाही." शक्तीने जतीनचा मानस बोलून दाखवला.

"पण सर, युरेनियम कुणाला द्यायचं वगैरे लिहिलं आहेच की, त्यातून ते अडचणीत आले असतेच, जर कधी हा लॅपटॉप इंटेलिजन्स किंवा पोलिसांच्या हाती लागला असता तर. ती माहिती लिहिली आहे, तर हे सगळं लिहायला काय प्रॉब्लेम होता?" राजनला समजत नव्हतं.

"अरे, वरील माहिती युरेनियमच्या ओथेन्टीक डीलची आहे असे दाखवू शकत होते, थोडे फार रेकर्ड् खोटे तयार केले तर. म्हणून त्यात जतीनला काही गैर वाटले नसणार. शिवाय सरकार आहेच पाठराखण करायला. पण पुढील माहिती ही सरकारलाच गोत्यात आणू शकणारी असेल म्हणून ती लिही याची या जतीनने टाळली असण्याची शक्यता आहे. सरकार गेले, तर हा पण गेला आणि याचा अध्वर्यू ग्रुप देखील गेला हे न कळण्याइतका जतीन निर्बुद्ध नव्हता!" शक्तीने जतीनचे मानस राजन समक्ष उघड केलं. राजनलाही ते पटलं.

भारत सरकार यात होतं हे आता उघड झाले होते... फक्त अध्वर्यू ही भारतातील सर्वांत मोठी बिझनेस एमपायर आणि भारत सरकार नक्की काय करण्याची मनीषा ठेवून होते, हे एक कोडे बनून राहिले होते आणि ते इनिशियल्स कोणाचे असतील हा रहस्यभेद सुद्धा अजून व्हायचा होताच. तोही मोठा पेच आता निर्माण झाला होता समोर...

"तू मेल वगैरे चेक केलेस?" शक्तीने विचार करत सवाल टाकला.

"हो सर. तिथे सुद्धा पूर्ण नावे नाहीत. फक्त इनिशियल्सचाच वापर आहे. आणि काय करायचं, कसं करायचं याची मोघम चर्चा आहे." राजन हताश बोलला.

a

"बरोबरच आहे. विषय त्यांना माहित असल्याने ते तसे बोलत होते. संदर्भ माहित असल्याशिवाय ते काय बोलतात याचा अंदाज येणे ते मेल पाहणाऱ्यांनाही कठीणच होतं, त्यामुळे असं बोलणं हे त्यांचं एकप्रकारे कोड लँग्वेज मध्ये बोलणंच होतं." शक्ती तर्क लावत बोलला.

"जतीनचे कॉल्स चेक कर. काही मिळाले तर पहा." शक्तीने अधिकची कार्यसुचना केली.

"ऑलरेडी डन सर. फ्रान्सिस कडून त्याचा नंबर मिळवून मी तोही पर्याय आजमावून पाहिला, पण नो युज... तिथंही तसंच बोलणं आहे. त्यामुळे काही ट्रेस लागत नाही." राजनने आशेच्या प्रकाशाचं ते तावदान देखील बंद केलं.

राजन इतका कार्यकुशल होता, की त्याने सर्व शक्यतांचा अभ्यास आधीच केला होता. आता जतीन कडून नवीन माहिती माही मिळेल याची आशा तेल कमी झालेल्या दिव्याप्रमाणे मंदावली होती.

युरेनियम कसं शोधावं आणि त्यामागे काय चालू आहे हे कसं हुडकून काढावं हा प्रचंड पेचप्रश्न उभा ठाकलेला होता, तरीही किंतु, शक्तीला इतकं मात्र खात्रीलायक झालं, की ही इनिशियल्स जर कोणाची आहेत हे क्रॅक करू शकलो, तर आपण सत्याच्या नजीक पोहोचण्यास बरीच मजल मारू ही शक्तीला खात्री झाली होती!!!

# २२. उमेदरश्मी...

शक्तीला जेवू घातल्यावर त्याला कशी औषधं द्यायची हे वैष्णवीला सांगून जिज्ञासा ती कार्डीएक सर्जन म्हणून काम करत असलेल्या हॉस्पिटलमध्ये गेली.

◆◆◆

हॉस्पिटलमध्ये, ती आली आहे हे समजताच डीनने तिला केबिन मध्ये बोलवून घेतलं.

ती आली तीच तिच्या समोर एक एन्वेलोप टाकलं गेलं. ती संभ्रमित झाली.

"काय आहे हे?" जिज्ञासाने बुचकळ्यात पडून प्रश्न केला.

"शक्तीसेन नाईक यांची केस मार्गी लागल्याशिवाय तू हॉस्पिटलला येऊ नयेस असं अथोरिटीजचं म्हणणं आहे." डीन सहानुभूती दर्शवत बोलला,

"आणि... हॉस्टेल देखील तुला तोपर्यंत बंद आहे. तुझं काही सामान असेल, तर तिथून हलव." त्याने नापंतीने वाक्य पूर्ण केलं.

जिज्ञासा अत्यंत चिडून त्याच्याकडे पाहत होती. तिची ती नजर त्याला इतकी बोचत होती, की तो आपली बाजू मांडत बोलू लागला,

"हे बघ, हे पर्सनल नाही... तू वाईट वाटून घेऊ नको... माझ्या हातात काही असतं तर..." डीन बोलत होता.

जिज्ञासा इथं आली होती, ते आपलं वैद्यकीय कर्म-कर्तव्य पार पाडावं म्हणून. परंतु तिच्या पदरी हे पडलं होतं. आणि तिला हे अजिबात असहनिय होतं.

जिज्ञासा मानी होती. स्वाभिमान तिच्यासाठी सर्वोपरी होता. शक्तीबद्दलची तिची आस्था, प्रेम उत्कट होतं. शक्तीवर संशय घेणाऱ्यांचे तोंडही पाण्याची तिची इच्छा नव्हती. ती बाहेर पडली, ते सस्पेन्शन लेटर अगदी तसंच्या तसंच टाकून!

डीन पुढे काय बोलू पाहत होता, ते वाक्य त्याच्या तोंडी तसंच राहिलं होतं... ते त्याने मग गिळून टाकलं, तो ऐकवणार कोणाला होता, जिज्ञासा कधीही वाटेला लागली होती.

डीनच्या केबिन बाहेरच परंतु तिला वेदिका कामत या एका अन्य डॉक्टरने गाठलं. तिच्या हाती काही रिपोर्ट्स होते.

"बरं झालं सापडलीस! तू इकडं आल्याचं समजलं तसं तुलाच भेटायला आले."

"काय प्रॉब्लेम आहे? एनिवे काहीही असो, सध्या मी काही मदत करू शकणार नाही!"

"का?" ती असमजस ओरडली.

"मला काही काळ सुट्टी दिली गेली आहे!" ती खिन्न बोलली.

"शक्तीमुळे... राईट?" वेदिका म्हणाली.

a

जिज्ञासा काही बोलली नाही.

"तरी मला वाटतं तू हे पहावंस!" वेदिका विनाविलंब जिज्ञासाला म्हणाली.

तिने तत्परतेने समोर धरलेले रिपोर्ट्स मग जिज्ञासा पाहू लागली. आणि तिचा मोहराच बदलला. डीनवर रागावलेली तिची चर्या एकाएक चिंतेने व्याप्त झाली. लाल रंगाच्या पाण्यात एक थेंब निळ सोडल्यास ती जशी पसरत जाते, तशी तिची मनःभावना निमिषात बदलली होती.

ती जरा विवंचनेत पडली.

"सी? यासाठीच म्हंटलं तू बघ जरा." वेदिका धास्तीने बोलली.

"हे इथं आहेत अजून?" जिज्ञासाने अधीरतेने विचारलं.

"हो." शीघ्रतेने बोलती झाली.

"चल दाखव मला." ती गडबडीने म्हणाली.

दोघी त्या वॉर्डकडे चालत्या झाल्या, जिथे ती गंभीर केस त्यांची वाट पहात होती...

●●●

वॉर्डमध्ये, तो एक स्पेशल वॉर्ड होता. विष्णू बेडवर पडला होता. त्याची ढास कमी झाली होती. त्यांनाही त्याच्यावर काही प्राथमिक उपचार हमखास झाले होते त्याचा हा चांगला परिणाम होता.

त्याला घेऊन आलेला इसम बाहेरच थांबवला गेला होता. त्यांचं गुपित उघडं होऊ नये यास्तव त्याचा विचार तर चालू होताच, पण दवाखाना असल्याने

a

विष्णू सोबत सतत राहू देण्याचा हट्ट त्यानेही केला नाही, आपण अधिकच जोर दिला सोबत राहण्याचा, तरीही संशय येऊ शकतो असे त्यास पुढील विचारांती वाटले होते. त्यामुळे तो वॉर्ड बाहेर थांबला होता, पण त्याने तिथली जागा कसली ती सोडली नव्हती.

"मी छातीच्या रोगांची डॉक्टर आहे. तुमचे उपचार मी करणार आहे. फक्त मला काही प्रश्नांची उत्तरे हवी आहेत. ती तुम्ही द्याल अशी अपेक्षा करते." जिज्ञासा विष्णूला आपला उद्विग्न भाव दडवून शांत ठेवत बोलली.

"हं..." विष्णू खरखरला.

"तुमचं नांव?" जिज्ञासाने विचारलं.

"विष्णू कामटे." त्याचं मोघम उत्तर.

"तुम्ही काम काय करता?" जिज्ञासाने संशयाने विचारावं तसं विचारलं.

अंगावर वीज तोडावी तसा तो चमकला.

"मी... मी..." तो अडखळला. त्याला भीती वाटून गेली होती हे सादर होते.

त्याची ही दुरवस्था डॉक्टर असणाऱ्या जिज्ञासा व वेदिका यांच्या ध्यानी न आली असती तरच नवल होते...

"मला अंदाज आहे, बेटर वे तुम्ही खरंच सांगावं." जिज्ञासा कठोर बोलली.

तरीही विष्णू काही बोलला नाही. तो मूग गिळून गप्प होता.

"वेदिका! पोलिसांना फोन लाव!" जिज्ञासा हुकमी बोलली.

a

आणि तशी वेदिका चक्रावलीच. पोलिसांना फोन करणं किती घटक ठरू शकतं हे तिच्याही ज्ञानी आलं होतं, तरी जिज्ञासा असं का बोलतीये? ते तिला काही काळ कळलंच नाही. वेदिका जिज्ञासाकडे वेधल्यासारखी पाहतच राहिली.

जिज्ञासाची नजर तिच्यावर पडल्यावर ती काय ते समजली आणि तिने मग लगोलग आपला मोबाईल काढला एप्रनच्या खिशातून. ती नंबर डायल शोधू लागली...

तसा विष्णूची रुखरुख वाढू लागली. त्याची धास्ती इतकी तीव्र झाली, की त्याला पुन्हा खोकल्याची उबळ आली.

"सापडला का नंबर?" विष्णूवरच करडी नजर ठेवत जिज्ञासाने वेदिकाला विचारलं.

"हो. हो. मिळाला." स्क्रोल करायचं थांबवून वेदिका बोलली.

"कर फोन!" जिज्ञासाला विष्णूवरच डोळा ठेवून बोलली.

वेदीकाचा हात फोन लावून कानाकडे गेला तोच...

"सोंगतो! थांबा! सांगतो!" विष्णू खोकतच बोलला.

तशी जिज्ञासा पुढे झाली. त्याची ढास कमी व्हावी म्हणून तिने त्याला औषध दिलं आणि त्याला बरं वाटून त्याचा खोकला थांबेस्तोवर ती शांत बसली.

त्याचा खोकला कमी झाल्यावर जिज्ञासा करड्या स्वरात विचारती झाली,

"सांगाल आता?" तिचा स्वर कडक होता.

"मी अध्वर्यू युरोकॉर्पमध्ये काम करतो. युरेनियमची खाण खोदण्याचं काम करतो मी. लेबर आहे तिथला." तो ठसकत बोलला.

"तरीच तुम्हाला हा डिजीज झाला आहे. तुम्ही सतत युरेनियमच्या संपर्कात असता." जिज्ञासा म्हणाली,

"तुमचे कार्डीओ रिपोर्ट देखील तेच सांगतो आहे. आपल्या एक्सरे रिपोर्ट मध्येही बारीक बारीक कण दिसतायत रेडीओएक्टिव्ह मटेरियलचे. स्वॅब टेस्टमध्ये तर चक्क प्रत्यक्षात युरेनियम आढळून आलं आहे. जिगर म्युएलर ट्यूबच्या मदतीने ते डिटेक्ट करून ते पार्टीकल्स खरेच रेडीओ एक्टिव्हिटी असल्याचं कन्फर्म केलं आहे. ब्लड आणि युरिन टेस्ट दाखवत आहे की युरेनियममुळे तुमच्या किडणीवर पण दुष्परिणाम होत आहे. कोणत्याही क्षणी ती निकामी होईल. त्यामुळे तुम्ही खोटं बोलला नाहीत ते योग्यच केलंत." ती ठणकावत बोलल्यागत बोलली आणि तिने पुढे विचारलं,

"उपचारासाठी हा दवाखाना निवडण्याचं कारण?"

"इथं जिज्ञासा परशुराम या डॉक्टर छातीच्या आजारावर उत्तम उपचार करतात अशी ख्याती आहे." तो मोठ्याने श्वास भरत म्हणाला.

"ती मीच. मीच जिज्ञासा परशुराम ठाकूर!" जिज्ञासा आपली ओळख करून देत म्हणाली.

तो ठसकत तिच्याकडे पाहतच राहिला. मग तिने काही विचार केला थोडावेळ आणि तीच म्हणाली,

"इथं तुमचे उपचार नीट होऊ शकणार नाहीत. तुम्हाला दुसऱ्या दवाखान्यात हलवावे लागेल."

आणि तीच हे वाक्य ऐकून वेदिका पुन्हा बुचकळ्यात पडली. '*हे हॉस्पिटल शहरातील बेस्ट हॉस्पिटल मधील एक आहे आणि तरी तरी जिज्ञासा याला असं का सांगत आहे?'* हेच तिला समजेना. ती वेडावून जिज्ञासाकडे पाहतच राहिली.

"तुम्हाला इथून नेण्याची व्यवस्था केली जाईल. तोपर्यंत रेस्ट करा." जिज्ञासा विष्णूला म्हणाली.

"काही धोका करायचा विचार आहे का?" विष्णूने धिटाई दाखवत थेट विचारलं.

तो हुशार आहे हे समजून मग जिज्ञासाने बनावाचा आविर्भाव सोडला व ती सत्यच बोलली,

"इथं तुम्ही राहणं धोक्याचं आहे. कोणत्याही क्षणी पोलिसांना कळेल. चालणार नाही ते तुम्हाला हे तुम्ही आत्ताच सिद्ध केलं. बेटर वे, संगतीये तसं ऐका. एक डॉक्टर म्हणून तुमचा जीव वाचवण्याचं मी व्हॅकॅन देते तुम्हाला. आशा आहे, विश्वस ठेवालं आणि तुम्हाला इथून हलवू पर्यंत तुम्ही गायब होणार नाही!" जिज्ञासा थेट निर्भीड बोलली.

तो जिज्ञासाकडे पाहत होता. तिच्या डोळ्यांत ओहून तिची सत्यता त्याला मनोमन पटला. त्याची त्याच्याही आपसूकच होकारात मान डोलली.

"आराम करा." जिज्ञासा बोलली आणि तिने वॉर्ड रिकामा केला.

वेदिकाही तिच्या मागे झाली. वॉर्ड बाहेर न थांबता त्या खालच्या फ्लोअरवर चालत्या झाल्या. जाणाऱ्या या दोन तरुण डॉक्टर्सना विष्णूचा साथीदार शंकित नजरेने पाहत होता.

त्या पायऱ्यांवरून दिसेनाशा झाल्या, तसा तो आत शिरला.

"काय म्हणत होती ती नवी डॉक्टर?" प्रथमच तो जिज्ञासाला पाहत असल्याने तो असं विचारत होता.

"इथून हलवावे लागेल म्हणत होती."

"ती जरा हुशारच दिसते.

"आहेच!" विष्णू म्हणाला.

"मग आपल्याला इथून निघालं पाहिजे." त्याने घाई केली.

"नाही!" विष्णू ठाम म्हणाला.

"वेडा झाला आहेझ का?"

"नाही, पण ती आपल्याला मदत करू शकते पोलिसपासून वाचायला."

"आणि तुला विश्वास वाटतो?" त्याने शंकेने आणि त्यापरी चिंतेने विचारलं.

"हो!" विष्णू ठाम उतरला.

"कशावरून?" इसमाचा पुन्हा काळजीचा सवाल. यावेळी त्याची ती काळजी मघाहून अधिकच होती.

"माझं मन सांगतंय..." विष्णू दृढ ठाम म्हणाला.

a

तो इतका निश्चित होता, की त्याच्या या निश्चियी मुद्रेवर या इसमाचा सुद्धा विश्वास वाटला, पण त्याचा चिंतातुर चेहरा काही कमी झाला नाही.

●●●

"देवा, मी कसली घाबरले होते, तू पोलिसांना फोन लाव म्हंटलीस तेव्हा... पण तुझा कटाक्ष झाला आणि समजले, की यू वर् जस्ट ब्लफिंग..." वेदिका उसासे टाकत म्हणाली

विस्तीर्ण अशा गोल जिन्याच्या पायऱ्या उतरत दोघी ग्राऊंड फ्लोअरला येत होत्या. इतरही काही डॉक्टर्स, पेशंट्सचे नातेवाईक वगैरे त्यांच्या आजूबाजूने वर खाली करतच होते.

जिज्ञासाने वेदिकाला काही प्रतिक्रिया दिली नाही.

हॉस्पिटलच्या निकास द्वारापाशी जिज्ञासा थांबली. ती वेदिकाकडे वळली, जी जिज्ञासा थांबताच तिच्या मागे थबकली होती.

"आपण... याला तुझ्या भावाच्या दवाखान्यात पाठव. त्याला काही कळू देऊ नको याबाबत. इथंही कोणाला काही कळता कामा नये! नाहीतर ही गोष्ट पोलिसांपर्यंत जाईल!" जिज्ञासाने वेदिकाला निक्षून सूचित केले.

"मग प्रॉब्लेम काय आहे?" वेदिकाला समजत नव्हते, की इथे उपचार करणे योग्य का वाटत नाहीये जिज्ञासाला. हे तिचेच तर हॉस्पिटल होते...

जिज्ञासाला काय धोका वाटत होता इथे त्या माणसासाठी? आणि तसे वाटण्याचे कारणच काय? सर्व तर इथे आपले, विश्वासू आहेत... हा तिचा विचार...

a

"तू पाहतीयेस ना शक्तीसोबत काय चालू आहे? त्या माणसाला पाहिलेस ना? पोलिसांचा उल्लेख केला तर त्याची काय अवस्था झाली? तो जरूर काही तरी लपवतोय. कदाचित शक्तीला त्याचा काही उपयोग होऊ शकतो."

"माझाही पण तर तोच विचार झाला, म्हणून कुणाला न कळता मी आधी तुलाच बोलले." वेदिका बोलली,

"तू आलीस हे कळताच तुझ्याकडे धावले, तू आज अली नसतेस, तरी मी फोन करून बोलावून घेतले असते." वेदिका काळजीच्या सुरात पुढे म्हणाली.

तिने समयसूचकता दाखवत जे कार्य केले होते त्यासाठी जिज्ञासाला तिची कायम ऋणी राहणार होती.

"थँक्स! ती म्हणाली,

"पण माझं चल ठीक आहे, शक्तीशी मी जोडलेली गेलेली आहेझ त्यामुळे ही शक्यता माझ्या मनात डोकावली, पण तुला असा अंदाज का आला?" जिज्ञासाने वेदिकाला विचारलं.

"सेम तसेच जसे तुला वाटले." वेदिका म्हणाली,

"आपल्याकडे युरेनियमशी संबंधित केसेस कधी येतात का? काही संबंध नाही, पण आता ती आली आणि तेव्हा, जेव्हा शक्ती या केस मध्ये गुंतलेले असताना. ऑफकोर्स ज्याला या माणसाच्या आजाराचे कारण कळेल, तो या दोन डॉट्स नक्कीच जुळवून पाहणार!" वेदिकाने आपला चपखल तर्क बोलून दाखवला.

a

"कोणालाही न कळता मला सांगण्याचा निर्णय घेतलास ते योग्य केलंस." जिज्ञासाने कृतज्ञता व्यक्त केली.

"शक्तीसेन आणि तुझ्यासाठी एवढं करणार नाही का? ते निर्दोष आहेत हे कोणी वेडाही म्हणेल किमान कोल्हापूरातला मग त्यांना यातून भद्र काढण्यासाठी काही हातभार लागू शकत असेल, तशी किमान शक्यता तरी असेल तर ते कोणी का करणार नाही?!" वेदिका हसून बोलली. तिच्या बोलण्यात आपलेपणा, मायेची आर्द्रता होती.

"थँक्स. पण वेदिका लक्षात ठेव, सद्य परिस्थितीत आपण पोलिसांवर सुद्धा विश्वास ठेवू शकत नाही. इथे कोणाकडे काही वाच्यता न करता या पेशन्ट्ला निमूट इथून तुझ्या भावाच्या दवाखान्यात जायला सांग. आणि काळजी करायचं काम नाही, तिथं व्यवस्थित उपचार होतील असा त्याला अजून विश्वास दे त्यांना. मी आत्ताच जाते तिथे!" जिज्ञासा तिला सूचित करत होती.

"आपण काही चुकीचे तर करत नाहीये ना?" इतके वेळ अंतरी दाबून ठेवलेली भीती तिने व्यक्त केली.

"अजिबात नाही!" जिज्ञासा तिला धीर देत होती,

"उलट आपणच सध्या योग्य काम करतोय हे पक्के धर!" जिज्ञासाने तिला विश्वास दिला.

"पण... इथं उपचार केलेच तर काय होईल?" वेदिकाने शंका व्यक्त केली

"शक्तीशी संबंध म्हणून मला सस्पेंड केलं य. इथल्या ओथेरिटीवर विश्वास कसा ठेवायचा?! आणि इथं उपचार केलेच, तर ही बातमी इथल्या इतर

डॉक्टर्सना समजायला वेळ लागणार नाही. पोलिसांना रिपोर्ट लागलीच होईल मग. आणि तसं झालं, तर कदाचित या पेशन्ट्च्या जीवाला धोका होऊ शकतो!" जिज्ञासा वेदिकाला वर्स्ट केस सिनारिओ सांगत होती,

"आणि हे शक्ती बाबत जे घडतंय त्याच्याशी संबंधित असतील, तर कदाचित शक्तीलाही धोका निर्माण होईल..." तिने आणखी मोठा धोका दाखवला.

वेदिका धास्तावली. परंतु तिला जिज्ञासाचे म्हणणे व सांगणे पक्के पटले होते. धक्कावलेल्या तिची होकारार्थी मान डोलली.

"तू सांगितलेलं काम कर. मी लागलीच निघते तुझ्या भावाच्या क्लिनिकला!" ती सर्व भिस्त वेदिकावर सोपवून लागलीच एग्झिट डोर मधून बाहेर पडली.

डीन जाणाऱ्या तिला आपल्या केबिनच्या फ्लोअर वरून पाहत होता स्टीलच्या रेलिंगशी उभा राहून आणि विष्णू सोबत आलेला माणूस ही पाहत होता डीनच्या वरील फ्लोअर वर खडा होऊन. त्याची मूठ रेलिंगवर कसत होती... विष्णू तर खात्रीशीर सांगत होता, पण या मुलीवर कितपत विश्वास ठेवायचा याचा तो इसम हिशोब लावू पाहत होता.

डीन व तो या दोघांचे चेहरे मख्खं होते, भावरहित! जिज्ञासाला जोखणारे दोघांचे डोळे तिची पारख करत होते, जी जाईस्तोवर...

# २३. निर्धूत...

"आजचा तुझा काय प्लॅन आहे? आज ऑफिसला जात नाहीस?" शक्तीने राजनला विचारलं.

दोघे अजून वैष्णवीच्या गेस्ट रूम मध्ये होते. शक्तीला तूर्त तरी तिथून हलण्याची परवानगी नव्हती जिज्ञासाकडून.

"रजा टाकलीय काळापासून काही दिवसांची. त्याशिवाय मी आपली मदत नाही करू शकणार." राजनने आपला विचार बोलून दाखवला.

"माझ्यामुळे किती जणांचं नुकसान होतंय..." शक्ती हळहळला.

"असं का म्हणता सर? आणि हे आपल्यासाठी तर आहेच, पण आपल्या जनतेसाठी पण आहे. आपलं काम काय आहे? त्यांचं संरक्षण. नाही का? मग ते कसंही का असेना? ऑफिसला जाऊ किंवा मग सुट्टीवर असलो काय? आपण पूर्णवेळ ड्युटीवरच असतो हेच तर शिकवलं आहे आपण आपल्या कृतीतून." राजन म्हणाला त्याला, त्याचा अपराबोध घालवण्याहेतूस्तव.

"मी स्पोईल करून ठेवलंय सगळ्यांना. हं?" शक्ती खाली मान खालून नाराजीत बोलला.

"नाही! आपण सुज्ञ आणि कर्तव्यनिष्ठ बनवलं आहे सर्वांना!" राजन त्याला समजावत म्हणाला.

शक्ती खिन्न हसला. त्याने राजनकडे बघितलं.

"एनिवे लेट्स मूव्ह फॉरवर्ड! त्या जनकचा जरा चिठ्ठा काढ! त्यातून काही माहिती नक्कीच मिळेल!" शक्ती त्याला म्हणाला.

"लगेच घरी निघतो आणि लागलीच कामाला लागतो." राजन तातडीने बोलला.

"तू याकामी लाग, मी पण जरा येतो." शक्ती त्यास म्हणाला.

त्याची मुद्रा फारच विचारी दिसत होती.

"कुठं सर?" राजन जरा टेंशन मध्ये आला.

नाही म्हणायला शक्तीची तब्येत बरी दिसत होती. तरी तो पुन्हा कोणत्या संकटात सापडला, तर याची राजनला चिंता वाटली.

"मला बहुदा अंदाज आहे हा एम डी कोण आहे!" शक्ती डोळे बारीक करडे करत म्हणाला.

"कोण सर?" राजनने भीती आणि उत्सुकता या मिश्र भावनेने विचारलं.

"राममोहन डक्रास! अ न्यूक्लिअर सायन्टिस्ट!" शक्ती गूढ बोलला.

"सर, आपल्याला शंका आहे की..." राजन अर्धवट बोलला.

त्याला वाक्य पूर्ण करण्याचा वाव मिळाला नाही, कारण वैष्णवी खोलीत प्रवेशली होती. तिच्या हाती ट्रे होता व त्यात दोन बाऊल्स, सोया व्हिजिटेबल सूपने ओतप्रोत भरलेले...

"आधी खाऊन घ्या!" वैष्णवी दोघांनाही म्हणाली.

"तुम्ही?" शक्तीने तिला विचारलं.

"घेईन. घ्या तुम्ही." ती म्हणाली आणि तिने त्याला बाऊल उचलून दिला,

"तुम्ही व्हेजिटेरियन आहात जिज्ञासा म्हणाली, म्हणून मग सोया वेजी सूप केलं. थोडी ताकद येईल याने." ती म्हणाली आणि तिने फिरून ट्रे राजन समक्ष धरला.

त्याचं तोंड थोडं वाकडं झालं.

"यांच्यामुळे मलाही घासफूस घावं लागणार आहे का?" तो नाखुषीने म्हणाला.

"त्रास होतोय का तुला? तसं असेल तर निघ तू!" शक्ती लटक्या रागाने बोलला.

"तसं नाही. घेतो. आलिया भोगासी..." तो बळेच रुसल्यासारखा बोलला.

आणि त्याने एक स्पून तोंडात भरला. त्याची नाराजी चक्क पळाली व त्याचा चेहरा लख्ख उजळला.

"टेस्टी आहे!" तो बिनदिक्कत बोलला आणि गपगप खाऊ लागला.

"अरे हो! सावकाश. ठसका लागेल." शक्ती म्हणाला.

"अधाशी आहात का?" वैष्णवी त्याला बोलली.

राजन अचानक घरात शिरल्याने ती घाबरली होती व त्यावेळेसची त्याच्या वरील तिची नाराजी तिला अजूनही खुपत होती. तशात त्याचे असे असोशीने पटापट खाणे...

"काळ पासून काही खाल्लं नाहीये मॅडम!" राजन तिला म्हणाला,

"माफ करा आणि धन्यवाद. अन्नदाता सुखी भाव!" तो म्हणाला त्याने खाण्याचा वेग काही कमी केला नाही.

"घ्या तुम्ही. मी आपल्या औषधांचं बघते." जिज्ञासा म्हणाली आणि तर तिथंच टेबलवर ठेवून ती निघून गेली.

ती गेली तसा राजन बोलला,

"सर, यांना काहीतरी कामाला लावलं पाहिजे, नाहीतर तुम्हाला इथून बाहेर पडता येणार नाही. जिज्ञासा वहिनींनी चांगलंच पढवलेल दिसतंय यांना." राजन सोया वेजी चवतच बोलला. त्याला ते इतकं आवडलं होतं, की बोलताना देखील खाण्याचा असभ्यपणा त्याने दाखवला होता.

शक्तीला हसू आलं. परंतु त्याला राजनचं म्हणणं पटलं होतं खास.

◆◆◆

स्पेशल इन्स्पेक्टर जनरलच्या वारणा कॉलनी येथील ऑफिसला स्पेशल इन्स्पेक्टर जनरल नारायण साखरकर आपल्या खुर्चीत बसला होता. त्याचा फोन घांणाणला. त्याने फोन घेतला, तसा ताडकन उभा राहिला.

पलीकडून खुद्द मिनिस्टर ऑफ होम अफिअर्स मधुकांत गोस्वामी बोलत होते. त्यांना मान देण्यासाठी आयजी खुर्चीतून उठून उभारला होता.

"जय हिंद सर!" तो सल्युट करत ओरडला.

"जय हिंद!" इकडून मधूकांत बोलला.

a

अजूनही तो सत्यजितच्या फार्महाऊस मध्ये ठाण मांडून बसला होता. आणि त्याच्या बाजूला होता जनक. त्याची तीक्ष्ण नजर मधूकांतवर होती.

त्यांच्यात झालेल्या डील प्रमाणे मधूकांत प्रत्यक्षात वागतो का हे त्यास बारकाईने पहायचं होतं.

"रफिक पटाईत केस बद्दल बोलायचं होतं. त्याचा खून कसा झाला काही समजलं?" गृहमंत्री आयजीला विचारत होता.

"डोक्यात गोळी लागली आहे सर." स्पेशल आयजी गडबडून बोलला.

"शक्तीसेन नाईक नावाच्या कोणी ऑफिसरनी त्याला मारलं म्हणतात ते खरं आहे?" मधुकांतने सत्य माहीत असून उगाच विचारलं.

"नाही सर." आयजी सत्य बोलून गेला.

"पण त्यानेच मारलंय!" गृहमंत्री भर देऊन बोलला. काय नरेटिव्ह सेट करायचं आहे याचे तो आयजीला आडून निर्देश देत होता.

त्याला नक्की काय इंप्लाय करायचं आहे ते आयजी समजला.

"ये... येस सर..." तो खडबडला.

"आणि आता, त्या रफिकचा पिच्छा सोडा. मेला तो गेला. काही चौकशी करायची नाहीये त्याच्याबद्दल! समजलं?!" मधुकांत दरडावून सांगत होता.

"हो... हो सर..." नारायण गडबडला.

"सुप्रीटेंडेंटला पण सांगा तिथल्या, की काही तपास नको म्हणून. ओके? सगळं शक्तीसेन नाईक याच्यावर शेकवा आणि मॅटर क्लोज करून टाका. कळतंय का?" गृहमंत्रीने ठणकावलं.

*"हो सर."* आयजी नारायण साखरकर अजून गडबडला होता हे फोन मधूनही मधूकांतच्या लक्षात आलं.

"आणि, त्या रात्री रफिकच्या तैनातीत कोण होतं?"

"महेश देशमुख म्हणून सिनियर इन्स्पेक्टर होते सर. आपल्या पक्षाच्या पेरेंट संघटनेशी तो एकनिष्ठ आहे. त्यामुळे विश्वासचा म्हणून त्याला तिथं तैनात केला होता." आयजी घाबरत बोलला.

"पण उपयोग काही झालं का?" गृहमंत्री भडकला,

"टर्मिनेट करा त्या कामचोरला!" गृहमंत्रीने निर्णयादेश सूनवून टाकला. त्याने फोन ठेवण्याची पूर्वसूचना आयजीला न देता फोन ठेवून दिला. तो जनककडे वळला.

"डोन्ट वरी जनक साहब. जतीन जी के बारे में अब कुछ भी बाहर नहीं आएगा। आपका एम्पायर भी अभी महफुज रहेगा। बस अब यह काम पुरा हो जाए। तो हमारी सत्ता अगले पांच, दस साल तो नहीं डिगेगी।" गृहमंत्री जनकला बोलला.

जनकच्या चेहऱ्यावरची माशी देखील हलली नाही मात्र. यांची सत्ता टिकली काय आणि गेली काय त्याला तितका फरक पडत नव्हता. त्याला फक्त त्याच्या साम्राज्याची पडली होती, जो आता सुरक्षित राहणार होता. त्यासाठी तो कदाचित अंतर्मुखी निर्धास्त झाला असावा, परंतु ते अंतर्मन खुलं करून तो या लोचट गृहमंत्रीला दाखवणार नव्हता.

●●●

गृहमंत्रीचा फोन येऊन जाताच आयजीने एसपीला फोन घुमवला होता.

आणि काही पळातचं स्पेशल इन्स्पेक्टर जनरल नारायण साखरकर यांच्या समक्ष सुप्रीटेंडेंट ऑफ पुलीस किशोर निंबाळकर बसले होते.

"काय चालू आहे काय?" आयजी नारायण साखरकर यांनी विचारणा केली.

"गोईंग विथ द प्लॅन सर!" नारायणच्या प्रश्नाचा रोख ओळखून किशोर सूचक बोलला.

"त्या रफिक पटाईत खूनाचं काय झालं?" आयजीने विचारलं.

"अजून काही प्रोग्रेस नाही." एसपीने संक्षेप उत्तर दिलं.

"ठीकच आहे. काही शोधाशोध करू पण नका. केंद्रीय ग्रहमंत्रालयाकडूनच तसे आदेश आहेत." नारायणने अगदीच वरून आलेले आदेश त्याच्या खालपर्यंत दिले.

"मला अंदाज होताच सर, म्हणूनच मी जास्त काही यात होऊ दिले नाही." आपली सुचकता दर्शवत एसपी बोलला.

"गुड. तुम्ही तुमचं काम योग्य जाणता यामुळेच सगळे खुश असतात तुमच्यावर." स्पे. आयजी नारायणने एसपी किशोरची प्रसंसा केली,

"शक्तीसेनवर दोष आलाच आहे. तेच घोडे पुढे दामटवा. आणि लक्ष भ्रमित करा लोकांचं त्या प्रकरणापासून. म्हणजे रफिक बाबत लोकांच्या मनात काही प्रश्नच उभारणार नाहीत!" तो एसपीला पुढे म्हणाला.

"या रफिक पटाईत बद्दल केंद्रीय गृहखाते इतके अस्वस्थ का आहे हे कळत नाहीये सर, की त्यांनी त्याचा तपास थांबवायला सांगावा!" एसपी असमजस बोलला.

"आपल्याला त्याच्याशी कर्तव्य नाही! आपण हुकुमाचे ताबेदार! सेंट्रल होम मिनिस्ट्रीचा आदेश कोण मोडणार?" आयजीने आपलं कर्मबंधन एसपीच्या आठवणीत आणून दिलं,

"बरं, शक्तीची काही खबर?"

"नाही. तो कुठे फिरतोय, काय करतोय हे ट्रॅक करणं शक्य नाही सर. तो शक्ती आहे, सहजासहजी कुणाला सापडायचा नाही. अनलेस त्याची स्वतःची इच्छा नसेल!" एसपीने शक्तीची अजोड क्षमता बोलून दाखवली.

a

"मला ते माहीत नाही का? भले त्याला पकडायचं नाहीये, पण प्रयत्न करा, की काही झाले, तरी शक्तीसेन नाईक आपल्या नजरेआड नाही झाला पाहिजे! वरच्यांना माहीत नाही तो काय चीज आहे, पण आपण तर ओळखतो ना? माहीत नाही हे सरकार काय करू बघत आहे, पण गृहमंत्रींनी चुकीचा माणूस निवडला आहे हे खरं. हे सगळं त्यांनाच बॅक फायर नाही झालं म्हणजे बरं!" आयजीने चिंता व्यक्त केली.

"आणि जर हे जनतेच्या नुकसानीचं असेल, तर ते बॅकफायर व्हावंच अशी मी आशा करतो!" एसपी किशोर बोलला आणि त्याने उभारून अल्युट ठोकला.

तो जाण्याची आज्ञा मागत आहे हे आय नारायण ओळखला. त्याची नजर वर होताच किशोरने स्पेशल इन्स्पेक्टर जनरलची केबिन सोडली.

बाहेर, दार उघडून एसपी गेला, तसा बाहेरील बाकावर बसलेला महेश उठून उभारला. त्याने जाणाऱ्या एसपीला सल्युट केला, पण त्याकडे अधिक लक्ष न देता मान हलवूनच महेशचा तो सल्युट स्वीकारूनच न थांबता एसपी निघून गेला. काही काळ गेलेल्या एसपीकडे पाहून मग तो गेल्याने केबिन व्यस्त नाही हे समजून महेश आयजीच्या केबिनच्या चौकटीत दार उघड धरून उभा राहिला.

"मे आय कम इन सर?" त्याने आयजीला विचारलं.

"कम!" आयजी त्याला बोलला.

आत येऊन त्याने नीट दार लावून घेतलं. आणि तो आयजी समोर येऊन उभारला. त्याने पाय आपटून एक कडक सल्युट आयजीला ठोकला.

त्याचा सल्युट स्वीकारून आयजीने त्यास विचारलं,

"शक्तीसेनचा काही ट्रेल?"

"नाही सर."

वास्तविक त्याने सतीशला शक्तीच्या मागावर लावलेले ते तो आयजीला सांगू इच्छित नव्हता, त्याने वैयक्तिक पातळीवर ते कार्य केले होते, कारण संधी साधून शक्तीचा त्याला कशाही प्रकारे बदला घ्यायचा होता.

"मग काय करताय काय तुम्ही?" आयजी त्याच्या उत्तराने भडकला.

"सॉरी सर." महेशची मान खाली गेली. तो विश्राम मध्ये मागे हात बांधून उभा होता.

"तुमच्याकडून काही काम जमत नाहीये म्हणून खुद्द माननीय सेंट्रल होम मिनिस्टर मधुकांत गोस्वामी यांनी तुला टर्मिनेट करायचे आदेश दिले आहेत. तर आता तुम्ही घरातच बसा महेश देशमुख!" आयजी कडक कठोर बोलला.

"पण सर... मी कधीच तुमच्या आदेशाबाहेर नाही... तरी तुम्ही पण माझा बळी देत आहात?" महेश दुखावून बोलला.

परंतु त्याला हे कळायला हवं होतं, की ही व्यवस्था, म्हणजे एक जंगल आहे, तशीच त्याची जडणघडण घडण सत्तेतील व अधिकारी लोकांनी केली आहे, इथे प्रत्येक जण आपापली कातडी सांभाळतो, त्यासाठी आपल्या साथीदारावर देखील वार करायला वेळ प्रसंगी कोणी मागे पुढे पाहत नाही.

गृहमंत्रीचा आपल्यावर राग नको म्हणून महेशची आपल्याप्रतिचे समर्पण स्मरणात न घेता गृहमंत्रीच्या आज्ञेचे पालन आयजी करत होता.

महेशच असं बोलणंही त्याला आवडलं नव्हतं. म्हणजे जे घडलं ते माझ्यामुळे का? आणि हा मला दोष देऊन नामानिराळा निर्दोष राहू पहात आहे का? या विचाराने आयजी नारायणच्या डोक्यातील क्रोधाची शीर तडकली.

"शट अप! फ्रॉम नाऊ ऑन, यू आर डिसमिस्ड्!" असं चिडून म्हणत आयजीने महेश समोर त्याचं टर्मिनेशन लेटर फेकलं,

"निघा माझ्या तोंडासमोरून!" लालबंद होऊन आयजी महेशवर ओरडला.

असहाय्य महेशने आयजीने त्वेषाने फेकलेलं त्याचं बडतर्फीचं पत्र उचललं आणि तो परतीच्या दाराकडे चालू लागला. त्याच्या मनात अपरंपार राग, द्वेष, रोष भरला होता. ज्या संघटनेसाठी आपण आजवर लढत आलो, त्या संघटनेच्या सत्तेतील हुकूमशहानी त्याच्या आजवरच्या सेवेची जराही जाण ठेवली नव्हती. त्याची बाजू समजून न घेता, जे घडले त्यात त्याची चूक होती तरी का की नव्हती ते न पाहता, फक्त त्यांच्या नजरेत त्यांना काही नुकसान झाले हे पाहून आपल्या नौकरी व ती पार पडण्याची आपली शपथ यांपेक्षाही त्या संघटनेप्रति व त्या राजनीतिक पक्षाच्याप्रति निष्ठावान महेशची विल्हेवाट लावली होती. त्याची विटंबना केली होती. तो ज्यांना आपलं समजत होता त्यांनीच त्याला 'निर्धूत' केलं होतं, तक्त्य केलं होतं, आपल्यापासून तोडून टाकलं होतं...

a

परंतु तो त्यांच्यावर काहीच उकटं काढू शकणार नव्हता. त्यांचं वाकडं काहीच करू शकत नव्हता. त्यांच्या समोर हा म्हणजे पर्वतासमोर एक धूलिकण...

आणि शिवाय त्यांच्यावर त्याचा रोष तसा कमीच! कारण तो एक त्या अंध अनुकरणी प्रमाणे होता, जे आपले इष्ट कितीही चुकीचे वागले अपल्याप्रति तरी त्यांची निष्ठा ढळत नाही, कारण त्यांसची जडणघडणच तशी केली जाते! उलट ते त्यासाठीही त्यांना शत्रू समजणाऱ्यांना उत्तरदायी धरतात, त्यायोगेच महेशचेही डोके तिरके चालले, त्याने या साऱ्याला जबाबदार धरले ते शक्तीसेलाच!

आणि शिवाय महेशचे या प्रकाराने डोके उघडले जरी असते, तरी या आडून देश चालवणारी एखादी विशाल, शक्तिशाली संघटना, सत्तेतील त्यांचे मांडलिक व त्याच्यापेक्षा अधिकाराने वरच्या पदावर असलेले या सत्ताधारांचे मांडलिक या उतरंडीतील या भक्षक लोकांचे तर तो काही विपरीत करू शकणार नव्हता, पण शक्तीसेन नाईक! त्याच्यामुळेच आपल्याला हा आणखी एक मानहानीकारक दिवस पहावा लागला ही त्वेष ठिणगी त्याच्या मस्तिष्कात स्फोटकाच्या बत्तीप्रमाणे सुलगली... शक्तीवर खार खात तो आपले दात एकमेकांवर रागाने घासत दातांचा अप्रिय आवाज करत तो निघून गेला...

# २४. गवसणी...

एक काळी सिडॅन रस्त्याने धावत होती...

त्या गाडीत युरेनियम घेऊन आलेला इसम. त्याने हातचे ग्लव्ज् अजूनही काढले नव्हते. मागील सीट वर तो विसावला होता, त्याच्या दोन्ही बाजूस मर्सिनरीज होते. सत्यजितने पदरी ठेवलेले मर्सिनरीज त्याला सुखरूप त्याच्या अंतिम गंतव्याकडे पोहोचवण्यात कसोशी करत बसले होते.

त्यांच्यातीलच एकजण गाडी चालवत होता, तर त्यांचा प्रमुख त्याच्या बाजूच्या पॅसेंजर सीटवर बसून होता.

●●●

गाडी एका निर्जन ठिकाणी विसावली. एक जुनं ब्रिटिश कालीन एक मजली घर सोडले, तर सारा परिसर झाडाझुडपांनी वेढला होता. एका वेगळ्याच आयामात हे अलिप्त घर असावं इतकं ते रूढ जगापासून विलग असं तुटलेलं होतं.

मर्सिनरीजच्या प्रामुखानेच उतरून तरी आजूबाजूला आधी पाहणी केली. त्याच्या पाठोपाठ मागून त्याचे लोक त्या गाडीतून उतरले होतेच. उतरताच सर्वांनी गाडीची दारं लावून टाकली होती. त्यांचीही सावध नजर इतस्ततः फिरली.

तिथं संशयास्पद असं काही भासलं नाही त्यांना. मग प्रमुखाने मागे होत मागील दरवाजा उघडला. त्यातून त्या व्यक्तीला बाहेर येण्यास खुणावले, तसा तो हाटेस्टील ते पोलादी पंधरा इंची कंटेनर घेऊन सावध खाली उतरला.

त्याच्या भिवती कडं करूनच त्याला त्या घराकडे नेलं गेलं. दारावर विशिष्ट टकटक करण्यात आली. हे पूर्वसुचनेप्रमाणे ठरले होते त्यांचे इथे येण्याआधी. बाहेर कोण आले हे आतील माणसाला कळावे आणि त्यांच्याशिवाय इतर कोणासाठी दार उघडले जाऊ नये म्हणून ही परवलीची खूण होती.

काही काळाने दरवाजा उघडला गेला, परंतु उघडणारा असा कोणी दारात नव्हता. मग गोंधळून त्याने मर्सिनरीजच्या बॉसकडे नजर टाकली. त्याने त्याला आत जाण्यास खुणावले. आणि आम्ही बाहेरच थांबतोय काळजी नको असं सुचवणारी मान डोलावली.

तो युरेनियम असणारा इसम मग दीर्घ श्वास घेऊन आत पाऊल टाकता झाला. तो आत प्रवेशला, तसं ते पॉलिश्ड् ओकचं चकचकीत दार आपसूक उघडलं होतं, तसं आपसूकच बंद झालं.

◆◆◆

गृहमंत्री समोर सुशील सावधान उभा होता.

"प्रोग्रेस?" गृहमंत्रीने प्रश्न केला.

"वी आर वर्किंग ऑन इट सर." किंचित शब्दांत नेमकं उत्तर द्यावे म्हणून तो बोलला.

मात्र ते गृहमंत्रीला खपले नाही.

a

"मी पत्रकार आहे?" मधुकांतने तिरकस विचारलं.

"हं?" गृहमंत्री असं का विचारत आहेत न कळल्याने सुशील उद्गारला.

"मी पत्रकार आहे का?" मधुकांत खेकसला.

"न... नाही सर..." सुशील चपापला.

"मग त्यांना द्यायची उत्तरे तुम्ही मला का देत आहात?" गृहमंत्रीने त्रागा केला.

"माफ करा सर." सुशील खाली पाहून माफीच्या सुरात बोलला.

"असं ऐकलंय, की शक्तीसेन नाईक कोल्हापूर पुलिस डिपार्टमेंटच्या अँटी टेररीजम युनिटचे प्रभारी या प्रकरणामागे आहेत असे ऐकले आहे. खरे आहे?" गृहमंत्री मधुकांतने सगळं खरं माहीत असून सुशीलला काय समजले आहे पहावे म्हणून काही माहीत नसल्याचा आव आणत विचारलं.

"शोध, तपास चालू आहे. इथली सर्व पुलीस व्यवस्था त्यांना वाचवण्याचा मागे आहे असे दिसते, कुणाकडून को-ऑपरेशन नाही. अडथलेच येताहेत फक्त सर... त्यामुळे वेळ लागतोय." सुशीलने काहीतरी उत्तर करावं म्हणून तो बोलला.

"आणि त्यात साक्षीदार मरण पावत आहेत हो ना?" गृहमंत्री चिडला.

हा राग जनतेच्या सुरक्षितेततेच्या विचारारून व काळजीतून आला नव्हता, त्याचे कारण काय होते हे त्याला स्वतःला नेमके माहीत होते.

"सॉरी सर!" सुशील उगाचच अपराध शिरी घेऊन बोलला.

a

"त्या रफिक पटाईतचा खून कुणाच्या माथ्यावर टाकायचाय आम्ही?" सुशीलला अपराध बोध देत गृहमंत्री मधुकांत गोस्वामी किंचाळला.

या एका गोष्टीने त्यांच्या पक्षाने मांडलेला खेळ उधळला गेला असता, याचा त्याला राग आला होता. गायब युरेनियमची चिंता नव्हती, ते परत मुबलक उपलब्ध होणार होतंच, पण रफिक उर्फ जतीनचा खून जनकला राग आणून गेला होता आणि त्या रागापोटी तो सारा मांडलेला सत्तेचा सारीपाट उधळायला निघाला होता याचा राग होता गृहमंत्रीला, जो सुशीलवर फुटत होता.

"संशय शक्तीसेन नाईक यांच्यावर आहे." सुशील म्हणाला.

तसाही शक्तीवर संशय टाकण्यात आला होताच. त्यात नवीन काही नव्हते. आपण काम करत आहे असं दाखवायला बोलला होता.

"त्या शक्तीसेन नाईकचा नाद सोडा थोडावेळ आणि लुप्त झालेलं युरेनियम आधी शोधा! ते कोणा शत्रूराष्ट्राच्या हाती किंवा देशातीलच कोणा विघ्नसंतोषी घटकांच्या हाती लागलं तर काय होईल याचा विचार करा जरा!" गृहमंत्री तडकला.

"युरेनियमच्याच शोधात आहे सर. शक्तीसेन नाईक सापडले, तर युरेनियम सापडेल."

"आणि त्याच्याकडे ते नसेल तर? याचा विचार केलात कधी?"

"होय आणि त्या मार्गाने देखील शोध चालू आहे सर."

"मग रिजल्ट का नाहीत! दोन आठवडे देतोय! गहाळ झालेलं युरेनियम सापडलं पाहिजे. नाही तर नौकरी सोडायला तयार रहा!" गृहमंत्रीने अंतिम निर्णय सुनावला.

a

"हो सर." खाली मान घालून म्हणाला.

"निघा आता!" गृहमंत्री रागाने पाहत त्याला हाकलून पावत होता.

दुसऱ्या सेकंदाला सल्युट ठोकून तो बाहेर झाला.

●●●

येऊन तो बाहेर त्याच्यासाठी उभ्या गाडीत ड्रायव्हर सीट शेजारील पॅसेंजर सीटवर बसला. आत त्याचा जो बुजरा आविर्भाव होता, तो खाडकन उतरवून त्याने पुन्हा आपला मिश्किल व कुटील चेहरा धारण केला.

"क्या बोले गृहमंत्री जी?" ड्राइवहिंग सीट वरील सुशीलच्या सहकाऱ्याने त्याला विचारलं.

"दो विक्स की मूहलत दी है! तबतक युरेनियम नहीं धुंढ निकाला तो मुझे नौकरी से हाथ धोना पडेगा!" तो मनसोक्त मोकळं स्मित करत म्हणाला.

"साले ये पॉलिटीशन्स!" तो सहकारी घृणेने दात खात उद्गारला.

सुशील खुदकला.

"त्यांना शिव्या देण्यापलिकडे आपण काही करू शकत नाही!" तो नाईलाजास्तव खिन्न बोलला आणि पुन्हा एक रूंद स्मित त्याच्या ओठांवर खेळलं,

"चलो!" हात करत तो आपल्या त्या सहकाऱ्याला म्हणाला.

सहकारी मात्र अजून चिडलेलाच होता. त्याने गाडी मात्र हकायला चालू केली होती...

◆◆◆

वैष्णवी शक्तीला औषधे देत होती. त्याचा खुराक घेऊन होताच पाण्याचा रिक्त ग्लास घेऊन खोलीतून बाहेर जाताना वैष्णवीचा मोबाईल वाजला. तिने पाहिलं, तर फोन जिज्ञासाचा. ती लगोलग फोन घेते.

"बोल ना." ती म्हणाली.

"वैशु, एक पत्ता पाठवत आहे. त्या पत्त्यावर शक्तीला घेऊन ये." जिज्ञासा बोलली.

रिक्षात बसून ती वेदिका कामतच्या भावाच्या क्लिनिकच्या दिशेने जात होती.

"काही विशेष घडलं आहे का?" जरा गंभीर होऊन वैष्णवीने विचारलं.

तिच्या वागण्या-बोलण्यातील वेगळेपणा शक्ती आणि राजनलाही जाणवला. आता काय विपरीत घडले आहे याचा अंदाज घेण्याहेतु ते दोघेही तिच्याकडे काळजीपूर्वक पाहू लागले.

"बहुदा शक्तीची मदत होईल असं काही सापडलं आहे. प्लिज तिथे घेऊन ये त्याला. मी तिकडेच जात आहे." ती मोजके पण सूचक बोलली.

बोलत असतानाच तिची नजर एका मिनी ॲम्ब्युल्सवर स्थिर होती. तयात विष्णू होता, त्याच्या साथीदारासोबत, आणि वेदिका... तीही रुग्णाची काळजी घेण्यासाठी त्याच्यापाशी बसून होती...

इकडे शक्ती व राजन दोघे कासावीस.

"काय झालंय?" शक्तीचा अधीर प्रश्न.

"जिज्ञासा म्हणाली तुम्हाला मदत होईल असं काही तिला सापडलं आहे." वैष्णवी त्याला म्हणाली,

"मला एक पत्ता पाठवणार आहे, तिथे तुम्हाला घेऊन यायला सांगितले आहे तिने." वैष्णवीने माहिती पुरवली.

"असं काय मिळालं तिला? आणि तेही तिच्या हॉस्पिटलमध्ये?" शक्ती गोंधळून म्हणाला.

विचार करण्यात अर्थही नव्हता. सांगितलेल्या पत्त्यावर गेल्यावर काय ते कळणारच होतं. त्यामुळे विचार करून उगाच वेळ दवडण्यात अर्थ नव्हता.

तोच मेसेज टोन वाजली वैष्णवीच्या मोबाईलची.

"जिज्ञासाचाच आहे. लोकेशन सेंड केलंय तिनं." वैष्णवी धीरगंभीर बोलली.

"मी गाडी काढतो." घाईने म्हणत राजन बाहेर पळाला.

शक्ती उठू पाहत होता. वैष्णवी आधार द्यायला सामोरी झाली. तिची तत्परता पाहून ती मदत करू पाहत आहे हे समजून...

"आवश्यकता नाही." शक्ती हसून म्हणाला.

"जिज्ञासा मला ठणकावून गेली आहे आपली काळजी घ्यायला." वैष्णवी म्हणाली.

तिने शक्तीचा हात खांद्यावर घेतला व त्याला बाहेर नेऊ लागली. शक्ती पाऊल टाकत हसला. म्हणाला,

"वेडी आहे ती. भलती काळजी करते माझ्यासाठी."

"पण आपलं कोणी असणं हे चांगलंच नाही का?" वैष्णवी त्याला म्हणाली.

"उत्तम आहे!" शक्ती तिला म्हणाला.

जिज्ञासा त्याच्या आयुष्यात असणं तो भाग्यशाली मानत होता हे त्याच्या त्या उत्साही उद्धृतावरून वैष्णवीच्या चपखल ध्यानी आलं.

●●●

वैष्णवीच्या घराच्या निकास द्वारापाशी, दिवसाढवळ्या शक्तीला घराबाहेर आणणं जोखमीचे होते. तो कोणाच्या दृष्टीस पडला, तर त्याची माहिती कोणीही पोलिसांना देण्याची शक्यता नाकारता येत नव्हती. आणि पोलिसांकडून ती बातमी नको त्या लोकांपर्यंत आपसूक पोहोचली असती. शक्तीला कोणाच्याही डोळ्याआड नेणे इष्ट होते.

म्हणून मग वैष्णवीने शक्तीला एक मास्क देऊ केला, जो दारा शेजारीच अडकवून ठेवला होता.

"आपल्याला कोणी ओळखू नये ना." ती मास्क देण्यामागील आपला विचार बोलली.

तिचा प्रसंगावधानी विचार बघून प्रभावित होत शक्तीने ओठांचा चंबू करून भुवया उडवल्या.

a

"धोरणी आहात." तो तिला म्हणाला.

"पत्रकार म्हंटलं की ते आलंच नाही का?"

शक्ती हसला. त्याला ते पटलं होतं. शक्तीने मास्क चढवला तोंडावर आणि मग वैष्णवीने त्याचा उजवा हात आपल्या खांद्यांवर धरून बाहेर काढले.

पाहणाऱ्या कोणाला आता एका आजारी माणसाला दवाखान्यात नेले जात आहे असाच त्याचा भास व समज होणार होती.

बाहेर राजनने देखील शक्ती कोणाला दिसू नये आणि दिसला, तर पाहणाऱ्याला रिएक्ट होण्यासही वेळ मिळू नये इतक्या जोरात गाडी येथून दामटवायचा विचार केला होता. त्या विचारांची परिणती म्हणूनच त्याने गाडी अगदी गेटला सटून लावली होती व ती चालूच ठेवली होती.

शक्तीला धरून आणलेले पाहत असता तोही खालू उतरू लागला त्याच्या मदतीला. परंतु त्याला ड्रायव्हिंग सीटचे दार उघडलेले पाहताच, शक्तीने त्याला तिथेच बसून राहण्यास खुणावलं. राजन मग उघडलेले दार ओढून बसून राहिला.

वैष्णवी शक्तीला घेऊन येत असताच, एका शेजारीणीने बघितलेच.

"काय गं? हे कोण? काय झालंय काय?" तिने चौकशी केली.

वैष्णवी सह शक्ती आणि गाडीतील राजन यांचा श्वासच अटकळला.

"भाऊ आहे. आजारी आहे खूप. शहरात दाखवायचं म्हणून गावाहून आला आहे रात्री." कोणी पाहिले आणि विचारलेच, तर म्हणून आधीच मनाशी ठरवून ठेवलेले उत्तर तिने दिले.

a

"बरं. बरं. काळजी घे." ती म्हणाली आणि वाटेला लागली.

तिघांचेही अडकलेले श्वास मोकळे झाले.

वैष्णवी आणि शक्ती गाडीपाशी पोहोचले तसे राजनने मागील दार उघडून दिले त्यांना.

वैष्णवीने शक्तीला मागे बसवले आणि तीही फिरून जाऊन त्याच्या शेजारी बसली.

"दार लॉक नाही करत?" राजनने वैष्णवीला विचारलं.

"दाराला सेल्फ लॉक सिस्टीम आहे." शक्ती बोलला.

शक्तीच्या निरीक्षण कौशल्यावर वैष्णवीला आश्चर्य वाटलं. काल रात्री पासूनच्या एवढ्या धकाधकीत शक्तीने हे देखील नोटीस केलं होतं. राजनला देखील अप्रूप वाटलं होतं, की आपल्या हे ध्यानी पण आलं नाही मघापासून.

"कुठे?" त्याने वैष्णवीला विचारलं.

तिने मोबाईल गाडीशी कनेक्ट करून आलेले लोकेशन गाडीच्या स्क्रिनवर शेअर केलं. नकाशा दिसताच राजनने मग सर्व दारे लॉक केली आणि गाडी त्या गंतव्याच्या दिशेने पळवण्यास सुरवात केली...

a

## २५. अर्धसत्य...

महेश राग भरलेल्या चेहऱ्याने बसून होता. त्याच्या शेजारी गाडीत सतीश बसून होता. एक पेन ड्राइव्ह महेशने त्याला हॅन्ड ओव्हर केला.

"तुला माहीत आहे काय करायचंय!" तो कडक आवाजाने त्याच्याकडे न पाहताच बोलला.

सतीशची मान डोलली.

"निघ!" महेश त्याला म्हणाला.

दुसऱ्याच क्षणी सतीश गाडीतून उतरला. आपल्या बाईकवर बसून निघून गेला. जाताना महेश त्याला पाहत होता. त्याची तीक्ष्ण नजर भविष्याचा वेध घेत होते, की या पेन ड्राइव्ह मधील व्हिडीओजमुळे शक्तीच्या प्रतिमेला किती क्षति पोहोचेल याची तो गणना करत होता. शक्तीच्या प्रतिमा भांजनासाठी आरंभलेला खेळ तो पुढे नेऊ पाहत होता...

◆◆◆

शक्तीला घेऊन राजन आणि वैष्णवी जिज्ञासाने सांगितलेल्या क्लिनिकला आले. त्याला आधाराला धरूनच आत नेण्यात आले. शक्तीला वास्तविक त्याची आवश्यकता नव्हती. पण कुणाला संशय येऊ नये यास्तव हे सारं चाललं होतं.

a

शक्तीला थेट त्या वॉर्डला नेण्यात आले, जिथं विष्णू आणि त्याचा साथीदार थांबवले गेले होते. जिज्ञासा, वेदिका आणि तिचा भाऊ उमेश तिथं उपस्थित होते.

विष्णूला ऑक्सिजन लावलं गेलं होतं. सलाईन वगैरे देखील दिसत होतं, प्राथमिक उपचार जिज्ञासाने एव्हाना सुरू केले होते त्याच्यावर.

शक्ती राजन व वैष्णवी सोबत आला, तसा विष्णू व त्याचा साथीदार त्याचाकडे असमंजस पाहू लागले.

आणि शक्तीने दोघांचा आधार सोडून स्वतःच्या पायांवर ताठ उभा राहत तोंडावरील मास्क काढला. त्याची भेदक नजर विष्णूवर गेली आणि विष्णू हबकलाच.

त्याच्या साथीदारांची वेगळी ती काही अवस्था नव्हती.

"तुम्ही..." तो भांबावला. जणू शक्ती त्याच्या खास परिचयाचा होता.

"मी शक्तीसेन नाईक! मला वाटतं तुम्ही ओळखलं आहे मला." आणि त्याची नजर विष्णू जवळच उभारलेल्या माणसावर गेली,

"काय? गॅब्रिएल एगोस्टीनो?" शक्ती त्याला म्हणाला.

आणि त्याचे त्राणच गेल्या सारखे त्याला झाले.

"तुम्ही ओळखता यांना?" राजन चक्रावला.

"गॅब्रिएल भाई वर्षाभरापूर्वी पर्यंत डिस्ट्रिक्ट स्पेशल ब्रँचचे प्रभारी म्हणून कार्यरत होते. त्यावेळी पंतप्रधान कोल्हापूरच्या दौऱ्यावर आले होते तेव्हा त्यांच्या सुरक्षेची जबाबदारी डिस्ट्रिक्ट स्पेशल ब्रँचवर होती. त्यांचा दौरा झाला

a

आणि काही दिवसांतच गॅब्रिएल भाईंनी राजीनामा दिला. कारण काय ते कोणालाच कळलं नाही. मला वाटतं आता कदाचित ते सांगतील!" शक्ती गॅब्रिएलच्या डोळयांत डोळे घालून पाहत होता,

"पण जिज्ञासा, तुला हे कुठं भेटले?" हसऱ्या त्याची मान जिज्ञासाकडे वळली.

"शक्ती! यांची ही अवस्था कशामुळे झाली आहे ठाऊक आहे? युरेनियमच्या खाणीत काम करतात हे. हेच त्यांना हॉस्पिटलमध्ये घेऊन आले होते आमच्या." जिज्ञासा विष्णू बाबत माहिती देत शक्तीला म्हणाली.

"कुठे?" शक्तीने विचारलं.

"मला वाटतं मी रजा घ्यावी. आपलं चालू द्या." उमेश मधेच म्हणाला,

"मला पेशन्ट्स पण अटेन करायचे आहेत आणि ही तुमच्यातील बोलणं पण तुमच्यात राहिलेलं बरं." तो हसला.

"मीही येते." वेदिका म्हणाली आणि त्याच्या पाठोपाठ बाहेर झाली.

"मला वाटतं माझंही काम झालंय आता. मी पण निघते घरी." तीही निघून जात होती, पण...

"नाही तुम्ही थांबा बाहेर, कदाचित गरज पडेल तुमची!" शक्ती तिला म्हणाला.

"बरं. आहे मी बाहेर." ती म्हणाली व बाहेर जाऊन थांबली.

"कुठे ते तू सांगत होतीस..." शक्ती जिज्ञासाला म्हणाला.

"मी सांगतो!" गॅब्रिएल बोलला,

"अगदी सगळं सांगतो." त्याची मान खाली होती.

"राजन, हे सगळं तुझ्या मोबाईलमध्ये व्हिडीओ रेकॉर्ड कर!" शक्ती गॅब्रिएलवर नजर ठेवूनच म्हणाला.

राजनने सूचित कृती केली.

तोपर्यंत गॅब्रिएल गप्प होता. त्याला चावी देण्यासाठी म्हणून मग शक्ती बोलला,

"मी ऐकतोय."

त्याचं ते बोलणं ऐकताच गॅब्रिएल बोलू लागला,

"मागे पंतप्रधान जेव्हा आले होते, त्यावेळी काही भयंकर गोष्टी कळल्या. तुम्हाला माहित आहे, फॉरेनर्सची माहिती ठेवणं, त्यांची चौकशी करणं, इंटेलिजन्स गोळा करणं, व्हीआयपी व्हीव्हीआयपी लोकांना प्रोटेक्शन देणं इत्यादी कामे डिस्ट्रिक्ट स्पेशल ब्रँचकडे असतात.

"पंतप्रधान आले, तेव्हा काही पाकिस्तानी लोक देखील इथं दाखल झाले होते. त्यांच्यावर लक्ष ठेवलं, तेव्हा समजलं, की ते पाकिस्तानी एजंट होते. त्यांच्यातील एकजण, खुद्द पाकिस्तानची टेररीजम, इप्सियोनाज, इत्यादी विरुद्ध कारवाई करणारी तिथली काऊंटर इंटेलिजन्स व सिक्युरिटी एजन्सी 'फेडरल इन्वेस्टीगेशन एजन्सी'चा डिरेक्टर जनरल हकीम सईद होता व आपल्या एका एजंट सोबत तो आपल्या पंतप्रधान यांना भेटला होता. पंतप्रधान यांच्या सुरक्षेच्या तैनातीत असल्याने त्या माणसाला आयडेंटिटीफाय करणं अवघड झालं नाही.

"त्यांची सर्व बातचीत मी टॅप व रेकॉर्ड केली. आणि जे समजलं, ते भयावह होतं. माननीय पंतप्रधान आणि पाकिस्तानी पंतप्रधान मिळून आपल्या देशात काहीतरी घडवू पाहत होते. फक्त नक्की काय ते काही समोर आलं नाही. या मिटिंग मध्ये गृहमंत्री तर होतेच, पण जनक अध्वर्यू हा बिझनेस टायकून देखील होता.

"आणखी एक आसामी होती तिथं; आणि ती म्हणजे पंतप्रधान यांच्या पक्षाची जी पेरेंट संघटना आहे, एकसंध भारत संघटना, त्यांचे प्रमुख!"

"मनोहर कौशिक?" शक्तीने विचारलं?

"होय तेच. आणि ही गोष्ट मी एसपींना सांगितली. एसपी आधी बरेच पॉजिटिव्ह होते, पण काही तासांतच त्यांनी हे सगळं उडवून लावलं. कदाचित वरून त्यांना काही धमकी वगैरे मिळाली असावी. मी मग आयजी यांनाही कळवलं, पण त्यांनी जाग्यावरच मला गप्प केलं. मी समजून चुकलो, की ते अगदी लहानपणापासून त्या संघटनेशी जुडलेले आहेत, तर तेही आपल्याला काही मदत करणार नाहीत या प्रकरणात, उलट त्या लोकांचाच मार्ग सुकर करणार. त्यांनी तर मी गप्प बसलो नाही, तर मला आणि माझ्या सोबत आलेल्या इन्स्पेक्टर इस्माईल मुल्ला यालाच नको त्या खोट्या आतंकवादी कारवाईत आरोपी म्हणून गुंतवू अशी धमकी दिली. इस्माईल आहेच मुसलमान आणि मी ख्रिश्चन. आताच्या घडीला, आम्ही आहोतच संख्येने बहुल असलेल्या जनतेच्या नजरेत या देशाचे दुय्यम नागरिक. लोकांना आम्ही आतंकवादी आहोत हे पटायला आणि यांनीही ते पटवायला तरी कुठचा वेळ लागणार होता. मुस्लिम म्हणजे देशद्रोही, आतंकवादी हे समीकरण याच लोकांनी तर समाजात

रुजवले आणि रुळवले आहे. आणि ख्रिश्चन तरी यांच्या नजरेत कुठले देशभक्त? ख्रिश्चनांच्या बाबतीत आम्हाला राईस बॅग म्हणून हिणवले जातेच. आमचे इमान हे फक्त दोन बोरी तांदळाचे मोहताज आहे यांच्या दृष्टीत..." तो अपरिमित दुःखी, पीडित अंतःकरणाने खिन्न बोलत होता...

"आम्ही घाबरलो नाही, पण दुःख मात्र झालं. आमचा नाईलाज झाला. मी करू काहीच शकत नाही, याचा राग येऊन म्हणून मग निराश होऊन मी राजीनामा दिला." गॅब्रिएलने इती केली.

"मला बोलला असतात, तर आपण नक्कीच काहीतरी केलं असतं." शक्ती त्याला म्हणाला. तोही दुःखी झाला होता.

"दोन वाईट अनुभव आल्यावर माझी नाराजी झाली. निराश झालो अगदी. तुमच्याकडेही येऊन काही फायदा होईल असे वाटले नाही. माफ करा..." गॅब्रिएल खिन्न माफीच्या सुरात बोलला.

हेच ओळखलंत तुम्ही मला? तुम्हाला सुद्धा वाटलं, की मी पण पलटेन?" शक्ती गॅब्रिएलला जाब विचारत होता.

गॅब्रिएल शरमेने खाली पाहत होता. शक्तीची मान विष्णूकडे वळली,

"आणि हे पिक्चर मध्ये कसे आले?" शक्तीने विष्णूबद्दल पृच्छा केली.

विष्णू ऑक्सिजन मास्क काढून काही बोलू पाहत होता, पण गॅब्रिएलने त्याला विश्रांती घेण्यास त्याच्या हातावर हात ठेवून इशारा दिला.

"हा अध्वर्यूंच्या खाणीत काम करतो. शेजारी राहतो माझ्या. काही दिवसांपूर्वी याला देखील तिथं काही कानावर पडलं. साधारण अर्धा किलो युरेनियम कोल्हापूर मध्ये पाठवले जाणार असल्याचे त्याने सुलेमान टोपचीच्या

तोंडून ऐकलं. तो ते काम कसं करायचं याबद्दल आपल्या बॉडीगार्डला विचारत होता.

"तो बॉडीगार्ड म्हणजे जतीन अध्वर्यू होता." शक्ती शांत भाव ठेवून बोलला.

"काय?" गॅब्रिएल अविश्वासाने उडालाच!

"होय. कसं ते नंतर सांगतो, आपण पुढे सांगा." शक्ती थंड मस्तकाने बोलला.

"ती गोष्ट विष्णूने मला सांगितली. आणि मला मग लिंक्स लागल्या, की पंतप्रधान यांची कोल्हापूर मधील भेटीतील योजना आणि ही युरेनियमचं कोल्हापूर मध्ये येणं यात काही लिंक तर नसेल? म्हणून मग मी ते युरेनियम आपल्या ताब्यात घ्यायचा विचार केला. त्यानंतर तुमच्यावर ते बालंट आलं, कसं ते कळायला मार्ग नाही, पण मी ही ते नाटक चालू दिलं, कारण..."

"कारण सगळे माझ्या मागे पडले, तर तुम्हाला लपून राहणं सोपं होईल, तुमच्यापर्यंत कोणी पोहोचणार नाही असा तुमचा विचार झाला." शक्तीने त्याची योजना पूर्ण केली.

"डोक्यात तर तसंच होतं. पण दहा वर्षे हा त्या खाणीत काम करत आहे. अध्वर्यू आपल्या कामगारांच्या सुरक्षिततेची अजिबात काळजी घेत नाहीत. त्यांना फक्त युरेनियम उपसून बक्कळ पैसे कमवायचा आहे. ते आपल्या नौकरांवर तो का उधळलतील?!" गॅब्रिएल चिडून बोलला,

"त्यामुळे त्याला सतत युरेनियमच्या संपर्कात असल्याने हे आजार जडले आणि ते हाताबाहेर जात असल्याने आम्हाला याच्या उपचारासाठी बाहेर पडावं लागलं."

"हे इथं कसे?" शक्तीने नकळता प्रश्न केला.

"तिथं त्याला काही धोका नको म्हणून काम सोडून यायला मीच याला सांगितलं विष्णूला. शिवाय ते युरेनियम इथं येत असताना त्याच्यावर लक्ष ठेवणे पण तर गरजेचे होते. याने या गोष्टी सांगताच मी इस्माईलला सगळं कळवलं आणि तोही मग काही दिवसांची सुट्टी घेऊन माझ्यासोबत झाला.

"अध्वर्यूचे खाजगी विमान उजळाईवाडीला उतरले, तसे आम्ही इस्माईलच्या चुलत भावाला हाताशी धरून तोपचीची गाडी रस्त्यातच पंक्चर केली. त्याच्या दुकानाच्या काही अंतर मागे आम्ही हे घडवून आणलं होतं. साहजिक गाडी दुरुस्तीसाठी त्याच्या दुकानावर आली. मग टायर दुरुस्ती करण्याचे नाटक करून मी आणि इस्माईलने, आम्ही त्या गाडीत मागे ठेवलेले युरेनियम हस्तगत केले. हा त्यांच्या मागोमाग येत असल्याने सर्व विवरण आम्हाला कळत होतेच. त्यावरून हे प्लॅनिंग केलं होतं. त्यांना कधी अंदाज नाही माहीत नाही, की आम्ही युरेनियमलाच हात घातला आहे. पण नंतर कळालं, ते थेट आपल्याबद्दलच..." गॅब्रिएलने कथन संपवले.

कारण पुढे काय झाले, ते शक्तीला माहीत होते, त्याच्यासोबतच ते जे घडले होते... आणि पुढे बोलण्याचं तसं धाडसही गॅब्रिएलला झालं नाही. कारण आपल्यामुळे शक्तीने खूप सोसलं आहे याचं दुःख व अपराधबोध देणंही त्याला बोचत, जाचत होता.

"तुम्ही लोकांनीही माझा डिकॉय म्हणून वापर केला तर?!" शक्ती हसला.

"म्हणजे?" गॅब्रिएल गोंधळला.

"म्हणजे युरेनियम गायब झाल्याने ते शोधण्यासाठीच आणि लोकांचं लक्ष तिकडून हटून कुठेतरी डायव्हर्ट करण्यासाठीच माझ्यावर हे बालंट टाकलं गेलं आहे. मला अटक करून प्रकरण मिटल आहे असं दाखवलं गेलं असतं, पण एसपी सरांनी हुशारी दाखवली आणि त्यांनी मला मोकळं फिरू देण्याची आयडिया त्या लोकांच्यात प्रविष्ट केली, कदाचित त्यांचं चित्त त्यांना नक्कीच खात असेल, म्हणूनच त्यांनी या सगळयाचा समारोप करायचं काम माझ्यावर सोपवलं." शक्ती हसला.

"आता काय आदेश आहे?" गॅब्रिएलने विचारलं.

"क्लोजर टू धिस इशू!" शक्ती निश्चियी बोलला.

आणि शक्तीने राजनला रेकॉर्डींग बंद करण्यास सांगितले. त्याच्या सांगण्यानुसार राजनने रेकॉर्डिंग बंद केलं.

"युरेनियम कुठं आहे?" शक्तीने गॅब्रिएलला प्रश्न केला.

"विष्णूच्याच घरात आहे. स्वयंपाक घरात पुरून ठेवलं आहे ते. इस्माईल लक्ष ठेवून आहे तिथं." गॅब्रिएलने उत्तर केलं.

मग शक्तीचे काही काळ विचारचक्र चालले. आणि तो ताडकन राजनकडे वळला,

a

"तू लगेच पंतप्रधान, गृहमंत्री, एकसंध भारतचे अध्यक्ष, जनक अध्वर्यू या सगळयांचे सगळे कॉल, मेसेज, मेल, इत्यादी सर्व रिकर्ड्स काढ. इफ पॉसिबल, त्या पाकिस्तानी एफआयएच्या डिरेक्टर जनरलला व त्याच्यासोबत मिटिंग मध्ये हजर एफआयए एजंटला पण धुंडाळ. कुठाय बघ तो. पूर्ण सायबर सेल कामाला लाव, हवं असेल तर! एस.पी. सरांना वर्दी देऊन ठेव. ते सगळं लीगल कसं होईल याकडे लक्ष देतील आणि आपल्याला कव्हर पण देतील." शक्तीने राजन यास ऑर्डर दिली,

"या सगळयांची एकमेकांशी फोनवर, ऑनलाईन वगैरे काय काय चर्चा होत होती, त्यांचा नेमका काय प्लॅन आहे या विषयी त्यांच्यात काही बोलणं झालं आहे का, त्यावर विशेष लक्ष दे. शोध." त्याने राजनला पुढे सूचना केली.

"हो सर." राजनने सल्युट करून तो ताठ होत तातडीने बोलला.

"आणि ते रेकॉर्डिंग तुझ्याकडेच ठेव. काय करायचं ते वेळ आली की सांगेन." शक्ती त्याला म्हणाला.

"हो." राजन म्हणाला आणि सांगितलेले काम करण्यास निघाला सुद्धा.

"मी काय करायचंय?" गॅब्रिएलने विचारलं.

"ते युरेनियम माझ्या सुपूर्द!" शक्ती त्याला सूचक म्हंटला.

गॅब्रिएलची काळजीची नजर विष्णूवर गेली. शक्ती ते समजला, की त्याची चिंता याला वाटत आहे. त्यामुळे...

"तुम्ही त्यांची चिंता करू नका. ते आता एकदम सुरक्षित हातात आहेत." तो जिज्ञासाबद्दल त्याला विश्वास देत म्हणाला,

a

"आणि इथं कोणी यांना शोधत येणार नाही. ते सुखरूप राहतील." शक्तीने हमी दिली.

"शक्ती, लहानपणापासून हा मला भावासारखा आहे." त्याचे नेत्र द्रवले. तो प्रेमाने विष्णूच्या माथ्यावरून हात फिरवत होता.

विष्णूच्या डोळ्यांतूनही नेत्रांमृत ओघळत होते. त्याने असहाय असा खाली लटकलेला हात आपल्या हाती घेतला. आणि त्यालाच हा धीर देऊ लागला.

"तुम्ही काही काळजी करू नका. मी आहे." जिज्ञासा त्याला आश्वसत म्हणाली.

गॅब्रिएलने डोळे मिटले. एक दीर्घ श्वास घेतला. आणि काही तरी मनाशी निर्धार करून त्याने बंद डोळे मिटले. शक्ती त्याच्या नजरेत एक दृढ निश्चय निश्चित पाहत होता...

# २६. कालमेघ...

"तयार?" शक्तीने स्फुरण भरलेल्या गॅब्रिएलला एक भुवई उंचावत विचारलं. त्याच्या चेहऱ्यावर एक प्रगल्भ स्मित खेळत होतं.

"एट नेशन्स सर्व्हीस सर!" सावधान होत गॅब्रिएलने कडक सल्युट ठोकला. त्याच्या बुटांच्या टाचा एकमेकांवर आपटून जोरकस आवाज झाला होता.

त्यावरून तो किती तयार आहे हे शक्तीला उमगलं आणि तो स्मितावला.

मग तो जिज्ञासाकडे वळला.

"वैष्णवी यांना आत बोलावं." तो तिला म्हणाला.

"हो." म्हणून ती दाराकडे गेली. ते खोलून तिने वैष्णवीला हाक दिली,

"वैशु, आत ये."

बाहेरच उभी वैष्णवी लागलीच आत झाली. जिज्ञासाने पुन्हा दार लावून घेतले.

"काय काम होतं का?" वैष्णवीने विचारलं.

"तुम्ही तयारीत रहा. तुम्हाला जिज्ञासाची मुलाखत घ्यायची आहे!" शक्ती म्हणाला.

"कधी?" तिने न समजून विचारलं.

"सांगतो!" शक्ती विचारी हसला,

"आणि खेदाने सांगतो, आपण आपली आजची सुट्टी रद्द करा."

"मी ऑफिसला जायचंय?"

"हो. तिथली परिस्थिती देखील आपल्याला समजली पाहिजे!" शक्ती तिला म्हणाला,

"मला लवकरात लवकर या प्रकरणाचं क्लोजर हवं आहे. तिथं लक्ष ठेवा. उद्या मुलाखतीला जिज्ञासा तयार आहे सांगा तुमच्या बॉसला. आणखी देखील बऱ्याच स्फोटक न्यूज घेऊन येत आहे म्हणावं. फक्त काय ते त्यांना सांगू नका."

"त्यासाठी मला तर ती आधी माहीत असली पाहिजे." वैष्णवी त्याला मस्करीत बोलली.

"ते आहेच." शक्ती हसला,

"उद्यापर्यंत गुपितच राहू द्या!" तो तिला म्हणाला.

"गुड विथ मी!" वैष्णवी त्याला म्हणाली,

"निघते मी." वैष्णवी म्हणाली आणि सर्वांची रजा घेऊन ती गेली.

"मी काय करायचंय?" जिज्ञासाने शक्तीला विचारलं.

"सध्यातरी, विष्णू यांची शुश्रूषा!" शक्ती तिला काम देत म्हणाला,

"खूप केलं आहे यांनी देशासाठी; आपल्यासाठी. आता आपल्याला यांची काळजी घ्यायला हवी!" तो सांगत होता.

ते पटून जिज्ञासाची होकारार्थी मान डोलली.

"आणि गॅब्रिएल, आपण माझ्या समवेत चला." शक्ती गॅब्रिएल बोलला.

गॅब्रिएल अगदी एका पायावर तयार होता, पण...

"कुठे?" त्याने शक्तीला विचारलं.

"युरेनियम सुरक्षित करण्यासाठी!" शक्ती त्याला म्हणाला.

आणि तो दरवाजाकडे वळला. जिज्ञासाला त्याला सामोरी होती, ती काळजीत पडली होती. शक्तीची कालची दुरवस्था अजूनही तिच्या मनपटलावरून हटली नव्हती. तशात तो असं भलतं धाडस करू जात होता.

"काळजी नको. एक अत्यंत कार्यकुशल, प्रामाणिक आणि निष्ठावान असे सुजाण नागरिक आता माझ्यासोबत आहेत, ज्यांना फोर्समध्ये काम करण्याचा उदंड अनुभव आहे." शक्ती तिला धीर देत म्हणाला आणि गोड हसला.

जिज्ञासाने भावुक होऊन शक्तीला आलिंगन दिलं. तिने डोळे भरून आले होते. त्यानेही तिच्या डोक्यावर हात फिरवून तिला धीर दिला. त्याचेही डोळे ओलावले होते.

"सगळं ठीक होईल." तो तिला आश्वस्त करत म्हणाला.

काही वेळ असा एकमेकांच्या प्रेमकवेत घालवून मग ते विलग झाले. शक्तीने तो वोर्ड रिकामा केला. विष्णूच्या माथ्यावर प्रेमाने हात फिरवून गॅब्रिएल सुद्धा शक्तीच्या मागुती गेला.

●●●

शक्ती गॅब्रिएलची गाडी चालवत होता,

a

"वाईट वाटलं हे जाणून, की तुम्हाला असं वाटतंय, की तुम्ही या देशात बहुसंख्यक जन-समाजाकडून तुम्हा लोकांना दुय्यम दर्जाचे नागरिक समजलं जातंय असं तुम्हाला वाटतं..." शक्ती गॅब्रिएलला दुःखी बोलला.

"का? नाहीये का तसं? नाही समजलं जात का आम्हा मुस्लिम आणि ख्रिश्चनांना दुय्यम? कदाचित नंतर तर आम्हाला नागरिक म्हणूनही जमत धरलं जाणार नाहीये... पण हे लोक हे विसरतात, की आम्ही इथलेच आहोत. आमचे पूर्वज इथलेच. कोणी बाहेरचे नाही इथे! आम्हीही तितकेच देशभक्त आहोत, जितके, की ते!" गॅब्रिएल रागेच तडफेने बोलला,

"आज मुस्लिम यांच्यावर शेकत आहे, त्यांना त्रास भोगावा लागत आहे. उद्या ख्रिश्चनांवर डूख धरला जाईल, त्याची पायाभरणी पण झाली आहेच, व तशी सुरवात देखील झाली आहे. आणि मग नंतर हा आगडोंबाचा लोट हिंदू म्हणवणाऱ्या असंख्य समुदायांना देखील जाळल्याशिवाय राहणार नाही हे सत्य नाही का? आज जे हिंदू आहेत, ते आमच्या समाप्ती नंतर वेगवेगळ्या जातीत वर्गीकृत केले जातील पूर्वीसारखे, आणि त्यांनाही संपवलं जाईल हे उघड नाही का? फक्त ते आत्ता कुणाला दिसत नाही. कुणाला ते बघायचं नाही...!!!" त्याने आपला त्रागा व्यक्त केला.

"मला कळत नाही असं वाटतं का तुम्हाला? म्हणून तर लढायचं आहे! हार मानायची नाही! हे माझं ब्रीद आहे!"

"पण आपली ताकद अपुरी आहे..." गॅब्रिएलने त्वेषाने असहायता व्यक्त केली

"तुम्हाला तसं वाटतंय. पहा किती मोठा जनसमुदाय आहे. त्यांना फक्त सत्य दाखवण्याची आवश्यकता आहे. तेच ताकद आहेत! भारताची जनता हीच एक मोठी जनशक्ती आहे, जिने ठरवलं तर ती काहीही करू शकते. त्या शक्तीला फक्त योग्य मार्ग आणि दिशा देणं गरजेचं आहे! आपण सबुरीने हे केलं पाहिजे, नाही की हार मानून प्राणहीन बसलं पाहिजे..." शक्ती त्याच्या उदास मनाची मरगळ घालवू पाहत होता.

"आपल्याकडे बघून तोच तर धीर आला आहे..." गॅब्रिएल आशेने म्हणाला.

"तो धीर तुमच्यात आधीपासूनच होता, त्याशिवाय लोकांच्या सुरक्षेसाठी तुम्ही युरेनियम आपल्या ताब्यात घेतलं नसतं." शक्ती त्याचे कौतुक करत म्हणाला.

"परंतु आमची धाव तिथंपर्यंत! फक्त युरेनियम लपवून आम्ही गप्प बसलो. या राज्यकर्त्यांना, या घृणीत व घातकी राजकारणाला आणि या कुजलेल्या प्रशासन व व्यवस्थेला आव्हान देण्याचं धैर्य आमच्यात नाही, जे तुमच्यात आहे." गॅब्रिएल आपली कुवत समजून होता व त्याचीच त्याला अधिक कीव येत होती. त्याला शब्द देत तो दुःखी, अपराधी बोलला.

"आपण केलंत ते खूप केलंत. कृपया स्वतःला दोष देऊ नका." शक्तीने त्याचा अपराधबोध कमी व्हावा यास्तव त्यास धीर दिला.

"पण एक युरेनियमचा लॉट उडवून काय उपयोग? त्यांच्याकडे खाणीच्या खाणी आहेत. हवा तेवढा उपसा ते करू शकतात."

शक्तीला एकदम तडकल्यासारखं झालं.

"त्यावर कोणाची नजर?"

"नाही... विष्णू इकडे आहे, तोही आजारी. तिथं कोणी विश्वासू नाही. शिवाय देशातील सर्व खाणी त्यांच्याकडे. एकाच खाणीतून पुन्हा पुन्हा युरेनियम काढलं जाईल असंही नाही." गॅब्रिएल झिटलून म्हणाला. आपल्या अगतिकतेवर तो स्वतःच खूप रागावला होता,

"जे हाती लागला आहे, त्याचा गैरवापर होऊ नये म्हणून त्याची काळजी घेतोय." श्रमी तो कष्टी, मलूल असं बोलला.

"आपल्याला जास्त काळ त्या दबावाखाली राहावे लागणार नाही. कृपया रस्ता सांगा." शक्ती त्यास म्हणाला.

आणि काही विचार करून त्याने गॅब्रिएलला विचारलं,

"आपल्याकडे मोबाईल आहे?"

"हा." तो म्हणाला.

"गिव्ह इट टू मी." शक्तीने त्याला विनंती केली.

गॅब्रिएलने त्याला फोन दिला. शक्तीने नंबर डायल करून फोन स्पीकरवर टाकला आणि मोबाईल त्याने डॅशबोर्डवर ठेवला.

*"हा सर?"* तिकडून राजनचा आवाज आला.

"काय सुरू आहे?" शक्तीने विचारलं.

"आपण सांगितलेलं कामच करतोय सर." राजन त्याच्या घरातील कम्प्युटर समोर बसून होता.

"आणखी एक काम द्यायचंय तुला!" शक्ती म्हणाला.

"ऑर्डर सर!" तत्परता दाखवत राजन म्हणाला.

"नवीन युरेनियम कोल्हापूर मध्ये आलंय का जरा चेक कर. अध्वर्यू, पंतप्रधान, गृहमंत्री कुणाच्या तरीबोलण्यात वगैरे आलं असेल. त्याकडे पण लक्ष दे आणि माहिती काढ जरा." शक्तीने अधिकची सूचना केली.

"आपल्या ते आवर्जून सांगण्याची गरज नाही सर. मी सगळा डेटा काढेनच." राजन स्क्रिन वरील माहिती चाळत बोलत होता.

"ते तू करशीलच, पण डोक्यात रजिस्टर व्हावं म्हणून मुद्दाम सांगितलं." शक्तीने विश्वास दाखवला व सुचनेमागील आपला हेतू कथन केला.

"हो. सर. आपण काळजी करू नका. काम होईल." कीबोर्डवर बोटे चालवत राजन बोलत होता.

"धन्यवाद. ठेवतो." शक्ती म्हणाला. आणि त्याने फोन कट केला.

"हा पोरगा एकटं एवढं सगळं करू शकेल?"

a

शक्ती हसला.

"तुम्हाला त्याची कपॅसिटी माहीत नाही म्हणून असं विचारताय." शक्ती त्याच्याकडे पाहून बोलला.

आणि त्याने गाडीचा स्पीड वाढवला...

◆◆◆

फार्महाऊसच्या ग्राऊंडवर गृहमंत्री गोल्फ खेळत होते. ब्लॅक कॅट कमांडोज त्या ग्राऊंडच्या सभोवार त्यांच्या सुरक्षेसाठी उभे होते.

सत्यजित धावतच तिकडे आला. तो अगदीच अगतिक व अधीर दिसत होता.

"एवढं जोखमीचं काम चालू आहे आणि आपण गोल्फ खेळत आहात?" एक परफेक्ट गोल घेण्याच्या प्रयत्नात असलेल्या मधुकांतला सत्यजित चिंतेच्या सुरात बोलला.

"एव्हरीथिंग इज गोईंग फाईन एट लास्ट. मग थोडी विश्रांती मी देखील दिसर्व्ह करतो. नाही का?" गोल्फ बॉल हिट करून मधुकांत ताठ होत म्हणाला.

गोल्फ बॉल गडगडत जाऊन होल मध्ये जाऊन विसावला. ते पाहून मधुकांत आनंदला.

"एक विचारू?" सत्यजित प्रश्नांकित बोलला.

त्याचा मोहरा संकोच व भीती असे दुहेरी संमिश्र भाव झळकवत होता. जो माणूस भेटायला आला होता, तो कोणत्या राष्ट्राचा असावा हे सत्यजितने त्याच्या दिसण्या व बोलण्याच्या लहेजावरून बरोबर ताडलं होतं आणि

म्हणूनच तो चिंतातुर झाला होता. आणि नक्की नेमकं हे आपले सत्ताधारी लोक काय करायच्या विचारात आहेत या चिंतेपोटी त्याला त्यासंदर्भात काही प्रश्न सतावत होते...

"बोला. इथं जनक नाही!" मधुकांतने त्याची मस्करी केली.

"आपण देव-धर्माचं राजकारण करतोच! धर्मा-धर्मात, जाती-जातीत फूट फाडून ध्रुवीकरण करण्यात आपण बऱ्यापैकी यशस्वी झालो आहोत... राज्य, प्रांत, भाषा यांचं त्या त्या राज्यांत जहाल अस्मितेचं राजकारण करून आपण समाजा-समाजात बरीच भांडणे घडवून आणून आणि दुफळी माजवली आहे, जी आपल्यासाठी बराच फायदाही होत आहे. जनतेत 'एकसंध भारत' हा हुकुमी नारा आहेच! खोटा प्रचार करण्यासाठी आणि आपला उदोउदो करण्यासाठी सर्व मेन स्ट्रीम मीडिया, सोशल मीडिया देखील आपण खरेदी करून आपल्या बाजूने केला. विरुद्ध पक्षातील भ्रष्ट लोकांना भीती, लोभ, धमकी शक्य त्या प्रकारचा वापर करून आपण आपल्याकडे वळवून घेतले. जे स्वच्छ होते, जे झुकले नाहीत, त्यांच्यावर खोट्या केसेस घालून आत टाकले, त्यांचे पार्टी फंड्स सिज केलेत, त्यांचे पक्ष संपवले. शिवाय सर्व स्वायत्त संस्था अगदी सर्व तपास यंत्रणा, सुप्रीम कोर्ट पर्यंत सगळे सर्व कोर्ट्स, आणि अगदी इलेक्शन कमिशन सुद्धा आपल्या हाती घेतलंय आपण आपली माणसं तिथं बसवून. तरी हे इतकं घातक काही तरी करण्याची काय गरज?" सत्यजितने आपली शंका विचारली.

"का? आपल्याला दुःख होतंय, की भीती वाटतीये?" चेष्टा करत मधुकांत म्हणाला.

a

"दुःखाचा प्रश्नच नाही. आणि आपण आहात तोवर भीती कसली? फक्त मनात प्रश्न आला म्हणून विचारलं." सत्यजित बोलला.

यावर मधुकांत हसला. हे हसू सत्यजितच्या अबोध बुद्धीची कीव करणारं होतं. त्याने सत्यजितच्या खांद्यावर हात ठेवला,

"असं बघा, सत्ता हातांत शाबूत ठेवण्यासाठी, आपण इलेक्शन्स जाता-जाता जिंकू शकतो. त्याची तरतूद तर आपण हमखास केली आहेच. पण आपण कसं जिंकलो, हे लोकांना कळता कामा नये ना?! त्यांना वाटलं पाहिजे ना, की त्यांनीच आपल्याला जिंकून दिलं आहे. त्यासाठीच हा सारा प्रपंच! हा सगळा द्रविडी प्राणायाम लोकांना त्यांच्याच हाती सत्ता आहे, संविधानात सांगितल्याप्रमाणे 'लोकं' हेच 'सार्वभौम सत्ता' आहेत अशा भ्रमात त्यांना ठेवण्यासाठी!

"सत्यजित जी, देव-धर्म, एकसंध भारत, लबाड आर्थिक गणितं, खोटा विकास अशा गोष्टी सर्वांवरच संमोहन टाकतात असं नाही. या सगळयांच्या पलिकडे काही मूर्ख लोक देशभक्त पण असतात, आणि एकत्रित त्यांचीच संख्या अधिक आहे. म्हणून काहींना देशभक्तीची घुट्टीही पाजवावी लागते. ज्याची अभिरुची जशी, तसे सुखकारक चित्र त्यांच्यासाठी उभे करावे लागते. धर्माचा अफू सगळयांनाच धुंद करतो असं नाही, म्हणून मग देशभक्तीची भांग काहींना पाजावी लागते साहेब! राष्ट्रभक्ती ही एक अशी नशा आहे, की सगळेच या नशेत धुत्त होतात. आपणच या राष्ट्राला सुरक्षित ठेवू शकतो, हे लोकांना दाखवावे लागेल ना? मग हा देशभक्त मोठा जनसमुदाय आपल्या मागे उभा

राहिलाच म्हणून समजा. हेच तर राजकारण आहे; आपलं!" गृहमंत्री अट्टहास करत कुटील बेरकी हसला.

हे ऐकून भेदरलेल्या सत्यजितने आवंढा गिळला. त्याला आपल्यालाच साडूची भीती वाटून गेली त्याच्या दानवी हास्याने...

"कळतंय आम्ही हे सारं का करत आहोत?!" मधुकांतने टरकलेल्या आपल्या साडूला प्रश्न केला.

आणि सत्यजितची होकारात मान हलली ती आपसूकच...

"ते जाऊ द्या; तुम्ही इथे कसे?" मधुकांत सत्यजितकडे पाहून विचारता झाला.

"तुम्हाला भेटायला कोणी आलं आहे." सत्यजित जरा चिंतेतेच बोलला.

मधुकांतची नजर एकदम बेरकी झाली.

●●●

मधुकांत समोर तो माणूस बसला होता. सत्यजितला त्या मिटिंग मध्ये थांबण्याची परवानगी नव्हती. आणि जनक देखील त्याच्या इतर कामांना सांभाळायला म्हणून तिथं अधिक न थांबता आपल्या मूळ शहरी निघून गेला होता.

"और कितना वक्त लगनेवाला है?" तो इसम जाब विचारावा अशा भाषेत विचारत होता.

"क्या तुम भूल रहे हो, की तुम किससे बात कर रहे हो बरखुरदार?" गृहमंत्री त्याच्यावर बरसला,

"तुम एक मामूली अय्यार हो और वह भी एक दुश्मन देश के! और मैं इस हिंदुस्थान मुल्क का वज़ीर-ए-दाखिला! अपनी औकात और हद दोनों मत भूलो! नहीं तो तुम्हे यहाँ के सबसे बेकार जेल में सड़ाने के लिए मुझे एक सेकेंड का वक्त नहीं लगेगा! मेरे सामने बैठने की हिंमत नहीं है किसी की! खुद को खुशकिस्मत समझो!"

"मुआफी चाहूँगा... वजीर-ए-आज़म के हुक्म पर हमारे डिरेक्टर जनरल ने आपसे मुलाकात करने कहा, इसलिए..." तो चाचरत बोलला.

"यहाँ रौब झाडने आ गए?" गृहमंत्रीने गुर्मीने भुवई उडवली.

"नहीं। ऐसा नही है जनाब। लेकिन सुना है, की यूरेनियम यहाँ के किसी अफसर ने चुरा लिया है, और वह हाथ नहीं लग रहा। इसलिए इंक्वायरी करने आया हूँ। गर आपको मेरा बर्ताव गुस्ताखी भरा लग रहा है, तो मैं आपसे तहे दिल से माफी चाहता हूँ।" तो दिलगिरी व्यक्त करत म्हणाला.

ते माफी मागणं हे वरवरचं होतं हे तर गृहमंत्री पण जाणून ओळखून होता.

"सब काबू में है, आपके रहनुमाओं को कह दो, की फिक्र ना करें!" गृहमंत्री अधिकाराने आणि अति आत्मविश्वासाने बोलला.

"अगर आपका काम हो जाएगा, तो हमें भी आपसे हमारे पाकिस्तान के इलेक्शन्स में मदद मिलेगी ऐसी हमारी ख़्वाहिश है..." तो बोलत होता तोच...

"पूरी होगी! पहले हमारा काम तो हो जाने दो बच्चे!" गृहमंत्री त्याला तोडत करारी बोलला.

a

तसा तो गुप्तहेर घाबरला.

"दो हप्तों में काम पुरा हो जएगा, उसके बाद जंग का एलन कर दो!" स्वतःस कौटिल्य समजणारा गृहमंत्री डोळे बारीक करून त्या गुप्तहेरावर गुरगुरत बोलला.

"मैं हमारे लीडरों को यक़ीन दिलाने की कोशिश करूँगा! सुक्रिया!" तो म्हणाला आणि त्याने ते फार्महाऊस सोडले.

"साले बदजात!" गृहमंत्री त्याची त्यांच्या प्रतिची त्याच्या मनातील अपरंपार घृणा त्यांच्याच समजल्या जाणाऱ्या भाषेत व्यक्त करत होता. वास्तविक या भाषेचं मूळ आणि जन्म हा इथलाच. अस्सल भारतीय! हिंदी आणि उर्दू या काही दोन नाहीत, तय एकच भाषा; फक्त लिपी वेगळी. असो...

●●●

आपल्या गाडीत येऊन बसत तो पाकिस्तानच्या 'फेडरल इन्वेस्टिगेशन एजन्सी'चा एजंट एफ.आय.ए.च्या डिरेक्टर जनरलशी मोबाईलवरच बोलत होता.

"यह वज़ीर खुद को बड़ी तोफ समझता है, जनाब!" तो पलीकडे वर्दी देत होता,

"अगर इसका हमें हमारे इलेक्शन में काम ना होता, तो इसको यहीं के यहीं ठोक देता!"

a

फेडरल इन्वेस्टिगेशन एजन्सीचा डिरेक्टर जनरल इस्लामाबाद मधील आपल्या हेडकॉर्टर्सच्या आपल्या वातानुकूलित कार्यकक्षात बसून आपल्याच एजंटवर आगपाखड करत होता...

"और पकड़े जाते बेवकूफ!" तिकडून याचा डिरेक्टर जनरल खेकसला.

फेडरल इन्वेस्टिगेशन एजन्सी ही पाकिस्तानच्या पंतप्रधानाच्या अंकित असणाऱ्या 'इंटेरियर सिक्योरिटी ऑफ पाकिस्तान'च्या अंतर्गत असणारी एक काऊंटर-इंटेलिजन्स आणि सिक्योरिटी एजन्सी आहे.

"परवाह नहीं! यहाँ फांसी होती, पर पाकिस्तान में तो मुझे वतनपरस्ती का ख़िताब मिल जाता!" एजंट बेफिकरीने म्हणाला.

"यू हर वक्त जान हथेली पर लेकर घूमना मुनासिब नहीं है!" डिरेक्टर जनरल झापत म्हणाला.

"हम मुल्क के लिए मरने मारने के लिए किसीं भी पल तैयार है जनाब!" एजंट आत्मस्फुरणेने म्हणाला.

"उसका भी एक न एक दिन वक्त आता है! मरने के लिए उतावले मत बनो बेवकूफ! और बताओ, क्या कह रहा था, हिंदुस्तान का सबसे लोकप्रिय गृहमंत्री?!" तो उपहासाने बोलला.

"दो हफ़्तों में उनका यूरेनियम बम बनाने का काम पूरा हो जाएगा!" एजंटने कृशियल माहिती पुरवली.

"और उसके बाद तुम्हे क्या करना है, तुम्हे पता है?!" टिकडून या एफआयए एजंटला आठवण करून दिली.

"जी जनाब! इनका मनसुबा मुक्कमल हो जाने पर वह युरेनियम बम हासिल करना!" तो कत्मकठोर बोलला.

त्या बाजूने फोन बंद झाला, तसं इकडे या शेजारच्या देशाच्या निष्ठावान गुप्तहेराने आपली गाडी चालू करून जोराने वळली. तो भरकन भरधाव निघून गेला फार्महाऊस मागे टाकून...

# २७. प्राप्ती...

"शक्तीसेन नाईक!"

तो अविश्वासाने उडालाच होता. शक्तीला समोर उभा पाहून त्याचे नाव मोठ्यांदा ओडल्यानंतर त्याची वाचाच बसली.

तो सहज तेव्हा झाला, जेव्हा मागून गॅब्रिएल आत आला. गॅब्रिएलला पाहून आता इस्माईल बोलण्याच्या स्थितीत तरी आला होता.

"हा... हे... इथं काय करत आहेत..." इस्माईल अस्फुट बोलला.

"रिलॅक्स. आपल्याला मदत करायला आले आहेत." गॅब्रिएल त्याला शांत करण्यासाठी म्हणाला.

"मदत? पोलिसांकडून मदत झाली असती, तर काय हवं होतं? सगळेच्या सगळे सत्तेचे गुलाम झाले आहेत." इस्माईल पावसाळलेल्या काळ्या मेघांप्रमाणे गडगडला.

"हे तुम्ही बोलताय? स्वतः पोलीस असून?" शक्ती मधे बोलला.

"आमचे स्वाभिमान अजून जिवंत आहेत. आणि म्हणूनच आम्ही इतरांपेक्षा वेगळे आहोत!" इस्माईल त्याच्यावर ओरडला.

"आपण एकाच नावेत स्वार आहोत इस्माईल भाई." शक्ती ठेवणीतील हसू हसून म्हणाला त्याच्या नजरेत सहानुभूती होती,

"तुम्हाला काय वाटतं? मला यात का अडकवलं गेलं आहे? त्यांना फक्त एक बळीचा बकरा हवा होता म्हणून? त्यासाठी त्यांना कोणीही चालतच असतं

की. मग मीच का? माहीत आहे? कारण त्यांच्या मार्गात मीच मोठा अटकाव ठरलो असतो. एकतर माझ्यासमोर यांचं काही चाललं नसतं, किंवा मी त्यांना किमान मोठा अवरोध निर्माण करूच शकलो असतो म्हणून मला असं दर दर की ठोकरे खाण्याच्या कामाला लावलं आहे, जेणेकरून मी त्यांच्या मार्गात आडवा येऊ नये!" शक्ती हसत बोलला.

इस्माईलच्या चेहऱ्यावरची किंतु किमान माशी हलली नाही. मग त्याला विश्वास देण्यासाठी गॅब्रिएलच समोर झाला.

"शक्तीसेन नाईक खरं बोलत आहेत इस्माईल. त्यांचं आणि आपलं मिशन वेगळं नाही. आणि इथून पुढे त्यांच्याच आदेशानुसार आपण कार्य करायचं मी ठरवलं आहे." तो समजावत म्हणाला.

"विष्णू कुठं आहे?" इस्माईल चिडून विचारत होता.

"सुखरूप आहे." शांत असणारा शक्ती विश्वास देत म्हणाला.

"कुठं ठेवलं आहे त्याला?" इस्माईल ओरडला.

"आहेत एका क्लिनिकमध्ये. शक्तीसेन नाईक यांच्या मैत्रीण त्याची काळजी घेत आहेत."

इस्माईल अजूनही सामान्य झाला नव्हता.

"तुम्हाला माझ्याविषयी विश्वास का वाटत नाहीये? मला ओळखत नाही आहात का तुम्ही?" शक्तीने सामंजस्याने विचारलं,

"मी दगा देईन असं का वाटतं तुम्हाला?" शक्ती कलकळला.

a

"सगळयांचे इमान डोलले आहेत आत्ताच्या काळात! आयजीला छडयंत्राबद्दल सांगायला गेलो, त्यानंतर जे छळ झालेत डिपार्टमेंट मध्ये माझे, ते माझे मलाच माहीत आहेत. डिपार्टमेंट मध्येच कशाला, पण कुठे पैसा तर कुठे धर्माच्या खुळया समजुतींपायी बंधुता, एकता, सौहार्द नष्ट झाले आहेत एकूणच भारतीय समाजातून! कुणाचा भरवसा धरावा?" इस्माईल ओरडला.

"चूक आमचीच झाली, आम्हीच तुम्हा लोकांना विश्वास आणि हमी देऊ शकलो नाही." शक्ती खिन्नतेने खेद व्यक्त करता झाला. अपराध भावनेने त्याची मान खाली गेली होती.

"असं बोलून देखील तुम्ही लोक आमच्यावर अन्याय करता! कारण, असं बोलून तुम्ही आम्हाला दुय्यमच ठरवता आहात! आम्ही इथं राहण्यास लायक आहोत, की नाही हे प्रमाणपत्र तुम्ही आम्हाला का द्यावं? आमच्या सुरक्षिततेची हमी तरी तुम्ही आम्हाला का द्यावी? आम्ही इथे आश्रित नाही तुम्ही आमच्याशी सहानुभूती दाखवायला! हा देश जेवढा तुमचा, तेवढा आमचा आहे! आणि आम्ही इथे सुरक्षित आहोत हे आम्हाला कुणी सांगावं लागावं हा अपमानच नाही का? नाही का ही हीन वागणूक?" इस्माईल शक्तीवर राग काढत होता.

आयजीचा राग शक्तीवर निघत होता, हे शक्ती समजून चुकला. तो एकूणच इस्माईलचा त्रागा समजत होता. आपली ही बोलयनातून झालेली चूक त्याला चांगलीच उमगली...

"सॉरी! माझ्या लक्षात नाही आलं... इथून पुढे मी चुकून अशा आशयाचेही काही बोलणार नाही..." शक्तीचे डोळे पाणावले.

a

आपल्याच घरात आपले बांधव किती मानहानीचं, अपमानाचं, बेअब्रूचं आणि अवहेलनेचं जीवन जगतात, आणि यामुळे आपल्या विषयी यांची मने कशी कलुषित होतात याची शक्तीला तीव्र जाणीव झाली...

या दोघांप्रति देखील त्याला भलतं कौतुक वाटलं, की आयजीने यांचा अपमान करून व यांना खोट्या देशद्रोही आरोपांत फसवण्याची त्याने धमकी देऊन, गप्प बसण्यास प्रवृत्त करावे म्हणून प्रसंगी छळ आरंभून, देखील हे दोघे त्याचा राग डोक्यात घालून घेऊन देश विघातक कारवाईत पडले नाहीत, तर उलट हा देश सुरक्षित रहावा यासाठी आपल्या परीने लढत आहेत. त्याच्या ध्यानी हे देखील आलं, की ज्या अल्पसंख्याक नागरिकांना त्यांचे फक्त धर्म वेगळे आहेत म्हणून हिणवले जात आहे, कष्टीले, नाडले, ताडले जात आहे ते देखील यांच्यापेक्षा वेगळे कुठे आहेत? काही जण अत्याचार सहन न होऊन जातात विपरीत मार्गाला, पण बहुतांश हे अपमानांचा व अवहेलनेचे जहाल काळकूट घोट घेत आयुष्य कंठतात, नेऊन जातात, पण देशाविषयी आपली निष्ठा सोडत नाहीत... हे दोघे अशांचे जणू प्रतिनिधीच!

"सतत आम्हालाच का सिद्ध करावं लागतो आमचा प्रमाणिकपणा, आमची देशभक्ती...? हा देश जितका तुमचा तितका आमचाही आहे!" इस्माईल ओरडला.

"मान्यच!" सौम्य प्रेमळ हसून शक्ती म्हणाला.

"या देशावर तुमचा जितका अधिकार तितका आमचाही आहे. त्यामुळे तुमच्या मान्यतेची गरज नाही आम्हाला!" इस्माईल अधिकच चिडून ओरडला.

"हेही मान्य!" शक्ती मंद कोमल स्मित करत अखिल बहुसख्यांकांचा दोष शिरी घेऊन इस्माईल यास बोलला.

आणि तो पुढे झाला. अपार करुणा त्याच्या कमलवदनावर होती. कोमल हास्य त्याच्या ओठांवर तरळत होतं, तर डोळयांत न सामावणारं प्रेम होतं.

त्याने इस्माईलला घट्ट आलिंगन दिलं. आणि इस्माईलचा बांध तुटला. तो शक्तीच्या बाहूपाशांत लहान लेकरसारखा रडू लागला...

गॅब्रिएल सुद्धा बराच भावुक झाला होता. दाटलेल्या क कंठातील आवंढा त्याने गिळला, पण डोळयांचे काय? त्यांतून ओघळणारे अश्रू तर तटवून धरता येत नाहीत, परत पाठवता येत नाही... त्यांनी बंड केलेच. आणि त्याच्या गालांवर ओघळले.

"कोणत्याही धर्मापेक्षा राष्ट्र सर्वोपरी आहे. भले आपली युनिट्स वेगळी असतील, पण आपण आहोत एकच पोलीस फोर्स! आपल्याला एकत्र या आपल्या प्रिय राष्ट्राच्या आणि या राष्ट्रातील एकूण सर्व जनतेच्या सुरक्षेसाठी लढायचं आहे. आणि आपण लढता आहात, सर्वांना माफ करून आपण त्यांच्या जीवितासाठी लढता आहात... धन्यवाद...! धन्यवाद...!!!" शक्ती मायेने इस्माईलला म्हणाला. त्याच्याही डोळयांतून अश्रूधारा लागल्या होत्या... त्या क्षमायाचना व कृतज्ञता अशा दोन्हीच्या एकाचवेळी होत्या...

◆◆◆

बिपीन आपल्या कक्षात बसून होता. दार वाजलं, तसं त्याने वर पाहिलं, तर त्याला काचेतून पलीकडे सतीश उभा असल्याचं दिसलं. त्याने त्यास आत

येण्याची खूण केली. सतीश आला, तो खिशात हात घालूनच. त्याने पेन ड्राइव्ह काढला खिशातून आणि बिपीनच्या समोर टाकला. काही न बोलता तो निघूनही गेला.

तो गेल्यावर त्याच्यामागे दार लागलं, तही बिपीनची नजर पेन ड्राइव्हकडे वळली. अधशासारखं त्याच्यावर लपकुन त्याने पेन ड्राइव्ह त्याच्या पीसीला अटॅच केला. त्यातील कंटेंट तो पाहू लागला. महेशने आश्वासन दिलेले व्हिडीओज त्याला मिळाले होते. त्याचे डोळे मोठे झाले. विकट लोभी हास्य त्याच्या डोळ्यांवर चमकू लागले. त्याच्या चष्म्याच्या काचेवर मॉनिटर वरील व्हिडीओचं उलट प्रतिबिंब पळत होतं, त्यातच त्याचे हावरट डोळे विचित्र विभत्स दिसत होते.

त्याने लगेच महेशला फोन घुमवला.

"मिळालं?" महेश एका बारला बसून होता. बऱ्यापैकी चढली होती त्याला.

"हो तेच सांगायला फोन केलाय." बिपीनने निर्वाळा दिला.

"आता तर हे शक्तीने रफिक पटाईतच्या खुनाआधी त्याच्या घरात शिरण्याचे आणि त्याच्या खुनानंतर त्याच्या घरातून बाहेर पडण्याचे व्हिडीओ अजून खास झाले आहेत बिपीन साहेब!" मद्याचा मोठाला घोट घेत महेशने मसाला शेंगदाणा दाताखाली दाबला.

"कसं?" बिपीन गोंधळला.

"कारण वरची मंडळी रफिक पटाईतची केस दाबू पाहत आहेत. आता या मागे कारण काय आहे, ते तुम्हीच शोधून काढा! या एका प्रकणरावर तुमचं चॅनेल नाही मोठं झालं, तर बघा!" महेश बोलला आणि हसू लागला.

काही प्रॉब्लेम व्हायचा नाही ना?" बिपीन टेन्शन मध्ये आला.

"नाही. नाही..." महेश म्हणाला आणि त्याने फोन कट केला.

काही प्रॉब्लेम आलाच बिपीन आणि त्याच्या चॅनेलला, तर याच्या तिर्थरूपांचं कुठं काय जाणार होतं?

"माझी नौकरी गेली ती शुल्लक शक्तीसेन आणि त्या रफिक पटाईतमुळे! आयजीनेही माझी निष्ठा लक्षात ठेवली नाही. आता या बातमीने काही प्रॉब्लेम आलाच, तर या दोघांना येईल! शक्तीला समाज दोषी म्हणून बघेल आणि आयजीला सत्ताधारी फोडून खातील! आणि यात तुझं चॅनेल बंद पडलं, तर मला काय रे त्याचं सोयरसुतक!" महेश स्वतःशी बडबदला आणि त्याने एका घोटात पेग रिता केला. त्याचं तोंड विचित्र झालं, ते मद्य त्याचा घसा जाळत पोटात गेलं होतं...

इकडे बिपीनने व्हिडीओज क्लोज करून पेन ड्राइव्ह डिटॅच करून ठेवला व तो त्याकडे पाहत राहिला...

◆◆◆

इस्माईल व गॅब्रिएल मिळून त्या जुन्या पुराण्या घराच्या स्वयंपाकघरातील चुलीजवळ आधीच उकरून व माती सारून ठेवलेली जागा खणत होते. शक्ती त्यांच्या मागे उभा होता. कंटेनर लागताच खुदाई थांबली. गॅब्रिएलने युरेनियमचा तो कंटेनर शक्तीच्या हवाली केला.

"आता काय ऑर्डर्स आहेत." गॅब्रिएलने विचारलं.

"ऑर्डर्स वगैरे काही नाही. जे करायचं ते मिळून. तूर्तास आपण विष्णूला प्रोटेक्शन द्यावं असं मी सुचवेन. त्यांच्या लक्षात आलं आणि त्यांनी विष्णूला शोधायचा प्रयत्न केला, तर त्याच्याजवळ कोणी असलेलं बरं." शक्ती त्याला म्हणाला.

"आणि आपण काय करणार आहात?" इस्माईलने विचारलं.

"अजून बऱ्याच गोष्टी आहेत. गरज पडली, तर संपर्क करेन. जिज्ञासा आहेच तिथे, आणि नसली, तरी त्या क्लिनिकचा नंबर मिळवणं काही अवघड नाही. मी आपली कार घेऊन जातोय हे युरेनियम कुणाच्या दृष्टीस पडता कामा नये." शक्ती बोलला आणि...

"येतो." म्हणून निघून गेला.

इस्माईल आणि गॅब्रिएलने एकवारपरस्पर नजर टाकली आणि मग निर्धाराने तेही बाहेर पडले.

◆◆◆

"तू आली आहेस याचा अर्थ मी असा घेतो, की तू सांगितलेलं काम पार पडलं आहेस!" बिपीन त्याच्या केबिन मध्ये समोर उभ्या वैष्णवीला म्हणाला.

"होय सर."

"गुड. मला खात्री होती तू हे घडवून आणशीलच.

a

"पण सर, जिज्ञासाची अशी इच्छा आहे, की तिची मुलाखत उद्या घ्यावी."

बिपीन थोडा विचारात पडला. त्याचं लक्ष सतीश देऊन गेलेल्या पेन ड्राइव्हवर पडलं. तो दुविधेत आहे हे ध्यानी येऊन वैष्णवी त्याच्या विचारांना प्रभावित करण्यासाठी बोलली,

"कदाचित उद्या शक्तीसेन स्वतः देखील भेटतील... काही तरी गौप्यस्फोट करणार आहेत म्हणे ते. म्हणून तर जिज्ञासा देखील आपल्याशी लाईव्ह बोलायला तयार झाली." वैष्णवी त्याच्या विचारांना चालना देत बोलली.

हे ऐकून बिपीन अगदी खुलला.

"काय तू हे खरं बोलतेस?" त्याने हर्षभरीत विचारलं.

"हो सर." ती त्याला आशवस्त करत म्हणाली.

तो हसतच अचानक विचारी बनला.

"आता मोठा पेच झाला बघ." तो म्हणाला.

"काय सर?" तिने विचारलं.

"अगं, शक्तीसेन नाईक खुनी आणि युरेनियम चोर असल्याच्या प्रकरणात साक्षीदार असणारा रफिक पटाईत मेलाय आणि त्याचा खून शक्तीसेन यानेच केला आहे असा संशय निर्माण करणारा पुरावा हाती आला आहे. या पेन ड्राइव्ह मध्ये तसे व्हिडीओज आहेत. मग हे आता टेलिकास्ट करायचे की नाही, ते कळत नाही बघ."

"माझं ऐकाल तर, आपण उद्यापर्यंत वाट पाहू सर. एकदा शक्तीसेन आणि जिज्ञासा यांच्याशी संवाद होऊ देत. मग हे व्हिडीओज चालवू अधिक वाईड कॉन्टेक्स्ट मिळेल आपल्याला न्यूज करायला."

"अगं पण ज्याने हे माझ्यापर्यंत पोहोचवलं आहे, तो जीव खाईल माझा जर आपण हे दाखवलं नाही तर."

"काही तरी कारण काढून टाळा उद्यापर्यंत सर. जर विचारणा झालीच तर. कारण उद्या कदाचित शक्तीसेन यांनी आपलं निर्दोषत्व सिद्ध करणारं काही मांडलं, तर उगाच माफी मागण्याची नाचक्की गुदरेल तुमच्याबर!" तुमच्यावर या शब्दावर वैष्णवीने विशेष भर दिला होता.

आणि त्याचा परिणाम देखील टू द पॉईंट झाला.

"तू बरोबर बोलतेस. थांबू उद्यापर्यंत!" बिपीन राजी झाला.

आणि काळजीत पडलेली वैष्णवी मनस्वी सुखावली.

a

# २८. द्वंद्वयुद्ध...

शक्ती फिएट घेऊन राजनकडे आला. सोबत आणलेलं युरेनियम कंटेनर घेऊन तो घराच्या दाराशी आला. त्याने हुडी घातली होती कोणी पाहिलेच ओळखू नये म्हणून.

त्याने बेल वाजवून दुसऱ्या मिनिटाला राजनने येऊन दरवाजा खोलला होता. तोवर शक्ती आपण कोणाच्या नजरेस पडू नये याची कागजी घेत हुडीच्या आत आपलं तोंड लपवून खाली पाहत होता. राजनने दार उघडताच तो लागलीच आत झाला.

घरात, शक्तीची हुडी खाली गेली व त्याच्या मानेवर विसावली. शक्तीचा चेहरा राजनला दृष्टिगोचर झाला.

"सर तुम्ही...?" तो बोलला.

आणि त्याचे लक्ष शक्तीच्या हातातील पंधरा इंची सिलेंड्रीकल कंटेनरकडे गेलं. बरीच माती लागली होती त्या कंटेनरला तरी त्यावरच लिखित 'हजार्ड सेव्हन' त्याने वाचलं...

"हे... हे..." त्याची बोबडी वळली होती.

"बरोबर. युरेनियम आहे हे!" शक्ती त्याच्या मनातील वाक्य ओळखून म्हणाला,

"अखेर सापडलं..." शक्ती पुढे म्हणाला.

"कोणाकडून?" राजनने विचारलं.

"म्हणजे? काय अजूनही युरेनियम आहे? काही कळलंय का तुला नवीन?" शक्तीने राजनच्या प्रश्नातील बिटविन दि लाईन्स वाचल्या होत्या म्हणून त्याचा असा प्रश्न.

"येस सर! आणि हे कोणाला पोहोचवायचं होतं, त्याचा तुमचा अंदाज पण बरोबर होता!" राज घनगंभीर बोलला.

शक्तीने दुसऱ्याच क्षणाला ते युरेनियम कंटेनर राजनच्या हाती सोपवलं आणि तो बाहेर धावला.

हे व्यवस्थित ठेव सांगण्याची त्याला आवश्यकता भासली नाही, कारण राजन ते ओघानेच करणार होते हे तो जाणत होता.

◆◆◆

शक्ती त्या ब्रिटिशकालीन घराचा चकचकीत दारासमोर उभा होता. मागे त्याने आणलेली फिएट लागली होती.

भयाण शांतता होती इथे. आणि हीच भयानक शांती कोणत्या तरी अघटिताची व संकटाची चाहूल आहे हे शक्तीला जाणवलं होतं.

त्याला हेही जाणवलं, की त्याच्या मागे पावलांचे आवाज होऊन थांबले आहेत. तो मागे वळला. आणि त्याच्या दृष्टीस पडले, ते सत्यजितने पाळलेले मर्सिनरीज...

"माय माय माय... हिअर वी गो अगेन. वी हॅव मीट वन्स अगेन मिस्टर शक्तीसेन!" शक्तीवर आपली 'एम 4' सब-मशीन गन रोखून मर्सिनरीजचा बॉस म्हणाला.

त्याच्या कमरेला डावीकडे 'सिग सॉर पी थ्री ट्वेन्टी' पिस्टल होलस्टरला लटकत होती, तर उजव्या मांडीला 'एम सेव्हेन बेयनेट' (संगीन, चाकू) लटकत होता.

काळ्या गॉगल मधून तो शक्तीकडे पाहत होता.

"अमेरिकन एक्सेन्ट, होल्डिंग एम फॉर कार्बाईन! यू आर प्रिटेंडिंग, बट यू आर नॉट मर्सिनरीज! यू गाईज आर बिलॉन्गिंग टू द आर्मी ऑफ युनायटेड स्टेट्स ऑफ अमेरिका!" शक्ती डोळयांत डोळे घालून तीक्ष्ण पाहत त्या घटप्रमुखाला म्हणाला.

"एम फोर कार्बाईन्स आर युज्ड बाय लॉट्स ऑफ कन्ट्रीज... इट इज इव्हन रोमिंग आराउंड दि ब्लॅक मार्केट!" प्रमुख हसून बोलला.

"या बट नो अदर् वन वुड कॅरी दि एम सेव्हेन बेयनेट विच इज युज्ड बाय दि यू एस आर्मी पर्सनल्स! मेड इन यू एस टू युज विथ एम सिक्सटीन अँड अलसो कंपॅटीबल विथ दि एम फोर कार्बाईन!" शक्ती आपल्या बुद्धीची चुणूक दाखवत म्हणाला,

"या... अँड इफ दे मे बी टेल द फॉल्स, बट व्हॉट अबाऊट युअर टॅग्स? दे डोन्ट लाय!" शक्ती बुद्धीमत्तेचे प्रमाण देत हसला.

आणि त्या प्रमुखाचं लक्ष त्याच्या गळयाकडे गेलं. त्याचा आर्मी टॅग त्याच्या शर्टाच्या बाहेर लटकत होता. आपली चूक लक्षात येऊन मग तो हसला. आणि त्याची नजर वर शक्तीकडे झाली,

"वी शुड्न्ट बी वेअरिंग दिज..." तो स्वतःशीच म्हणाला,

"आवर् डम असेस्!" प्रमुख हसून म्हणाला.

"मला वाटलं नव्हतं, की यात अमेरिका देखील सामील असेल." शक्ती त्याला बेरकी नजरेने पाहत बोलला.

मराठी तर त्या प्रमुखाला कळलं नाही, पण शक्ती काय म्हणाला असेल, याचा अंदाज त्याला आला.

"वी आर् जस्ट वॉचर्स!"तो शक्तीला म्हणाला.

"बट, इफ अमेरिका वॉज डुईंग एनिथिंग हियर्, देन यू वुड नॉट वेअर् दिज टॅग्स, सो दॅट इफ समथिंग हॅपन्स टू यू, यू वुडन्ट बी आयडेंटिफाईड, बट सिंन्स यू आर् वेअरिंग दिज, इट मिन्स दॅट द इंडियन गव्हर्नमेंट अँड दि अमेरिका इस इन कोलीजन, इजंट इट?!" शक्तीने डोळे बारीक करत विचारणा केली.

परंतु तो प्रमुख शक्तीच्या बुद्धिमतेची प्रशंसा करत हसला होता.

"आव्हर् रिसेन्ट गिव्हन जॉब इज टू हँडल डर्टी जॉब्स फॉर् दि अमेरिका!" प्रमुख कुटील हसत बोलला.

"व्हॉट इज दि बिझनेस हिअर् फॉर् अमेरिका देन?" शक्तीने बारीक नजर करत प्रश्न केला.

"सॉरी फ्रेंड! आय कॅनॉट टेल यू!" प्रमुख हसला.

त्याच्या सोबत्यांनी आपल्या गन्स शक्तीवर जलद रोखल्या. गन्सचा आवाज होताच त्यांच्या प्रमुखाने हाताची मूठ वर करून त्यांना त्यांचा हल्ला होल्ड करण्यास सांगितले. तो अजूनही हसत होता.

"देअर इज नो ऑर्डर्स टू किल यू! बट यू हॅव कमी अ लॉंग वे, सो वी डोन्ट हॅव दि चान्स टू टेक राईट नाऊ!" त्याने थोडा विचार केला आणि तो शक्तीकडे बघून म्हणाला,

"आह... लेट्स मेक अ फेअर डील! वन ऑन वन. जस्ट यु अँड मी! अफ्टर् ऑल, वी हॅव टू सेटल व्हॉट वी हॅड लेफ्ट लास्ट टाइम ऑन सत्यजित्स हॉटेल! व्हॉट से?" तो हसून म्हणाला.

"एक्सेप्टेड!" शक्ती अभिमानी हसला.

प्रमुखाने मग आपली सब-मशीन गन आपल्या एका सोबत्याकडे फेकली. त्याने ती अलगद झेलली.

आणि पुढच्याच क्षणाला तो शक्तीवर धावला होता.

त्याने एक जोरदार मुष्टीप्रहार शक्तीवर केला. त्याचे लक्ष शक्तीची छाती होतं. शक्तीने डोन्ही हात क्रॉस करून तो वार हातांवर तोलला, पण त्या प्रहरात बळ इतके होते, की शक्ती घसटत मागे झाला काही इंच.

परंतु तो थांबला नाही, तसाच त्या प्रमुखाचा हात धरून शक्तीने त्याला आपल्या पाठवर घेऊन धुळीत आदळले.

शक्तीच्या जखमी हाताला झटका बसला. त्याने आपला हात धरून ठेवला.

ही घटना पाहताच त्या प्रमुखाचे साथीदार पुढे सरसावले. पण प्रमुखाने उठत त्यांना गप्प राहण्यास खुणावलं आणि त्याने पुन्हा शक्तीवर अटॅक केला. तो जसा समोर आला शक्तीने आपला तळपाय त्याच्या तोंडावर मारला, इतक्या जोरात, की त्याचं कमरेपासून वरचं शरीर मागे फोर्सने झुकलं गेलं, आणि त्यामुळे तो पाठवर दानकन आदळला.

एक साधा पोलीस ऑफिसर आपल्यावर भारी पडत आहे हे पाहून त्या प्रमुखला आपल्या संपूर्ण आर्मी ट्रेनिंगचीच लाज वाटून गेली.

यावेळी शक्तीने त्याच्या वार करण्याची वाट पाहिली नाही. प्रमुख हातावर आपलं शरीर तोलून शरीराला हेल देऊन पायावर येण्याच्या प्रयत्नात होता, तोच जसे त्याचे शरीर वर आले, शक्तीने हवेत उडी घेऊन आपला गुडघा त्याच्या जबड्यावर जोरात दिला. प्रमुखाचे पाय जमिनीला लागण्याआधीच तो हवेत होता, तोच शक्तीचं गुडघा जबड्यावर पडला होता. तो मागे जाऊन परत जमिनीत आदळला. त्याचे खांदे फक्त आपटून तो उलटा मागे पोटावर आदळला होता व चेंडूचा टप्पा व्हावा तसा इंचभर टप्पा खाऊन तो परत पोटावर स्थिर झाला. आता तो चांगलाच चिडला. आपले डोमही हात आपटून धूळ उडवत तो पायावर झाला.

त्याने शक्तीवर पुन्हा हल्ला चढवला. शक्तीला आता यात जास्तवेळ घालवायचा नव्हता. त्याच्या दिशेने येणाऱ्या या अमेरिकीच्या दोन किक्स त्याने हाताने ब्लॉक केल्या. त्याने जेव्हा मुष्टी प्रहार करायला उजव्या हाताची मूठ शक्तीवर फेकली, शक्तीने ती मनगटापाशी आणि आपल्या हाताचा हेल देऊन त्याने त्याला खाली खेचलं. तो अमेरिकी आपल्या गुडघ्यांवर आला. आपली मांडी शक्तीने पुन्हा त्या प्रमुखाचा कपाळावर जोरात मारली. तो मागे पडत होता, पण शक्तीने त्याला पडू न देता परत आपल्याकडे खेचलं. आणि जसा तो समोर आला, शक्तीने पुन्हा त्याच्या कपाळावर आपल्या गुडघ्याने आघात केला. तो वार इतक्या जोराचा होता, की अमरिकी मर्सिनरी शक्तीच्या पकडीतून सुटून डोक्यावर आदळला.

तो तडफडू लागला, त्याला आता उठून उभे राहण्याची क्षमता राहिली नव्हती.

a

"आय वोन्ट किल यू. जस्ट रीट्रीट अँड लेट मी डू माय जॉब!" शक्ती त्याला ठाम म्हणाला.

आपल्या बॉसची अशी भीषण अवस्था शक्तीने केलेली पाहून त्याचे सोबती चिडले आणि त्यांतील एकाने शक्तीवर गोळी देखील झाडली.

ती गोळी अंगावर झेलण्यासाठी शक्ती तिथं थांबला नव्हता. तो जाग्यावर वळून मागे झेपावला होता. जमिनीवर रोल करून तो त्या घराकडे पळाला. त्याच्यावर गोळयांचा वर्षाव होत होता, शक्ती तिरकी उडी घेऊन एका पिलर मागे दडला. गोळया मोठाल्या खिडकीवर लागून कच्चा तडकल्या. छिद्रे पडून गोळया घरात शिरल्या होत्या. आपल्या बॉसची दुरवस्था केलेल्या शक्तीवर ते इतके खार खाऊन होते, की इथे सुरक्षेसाठी ते तैनात आहेत हे त्यांच्या ध्यानीही राहिलं नव्हतं.

आता गोळयांचा मारा शक्ती लपलेल्या पिलरवर रोखला गेला होता. त्या पिलरच्या ठिकऱ्या ठिकऱ्या उडत होत्या. शक्ती काय करावे याचा विचार करत इतस्ततः पाहत होता. आणि त्याची नजर फुटलेल्या खिडकीच्या काचांवर गेली.

त्याने पळत जाऊन खिडकीचा वरचा भाग पकडला आणि पले पाय एकसाथ त्याने तडकलेल्या कांचावर मारले. काच फुटून शक्ती आत गेला व उभारला आपल्या पायांवर. उडी घेऊन काच तोडून आत आलेल्या शक्तीचे पाय काचांवर पडले होते खरे, पण पायांत बूट असल्याने त्यांच्या पायांना क्षति झाली नव्हती. त्याला सावरायला वेळ न देता गोळया फेकणारे चौघेही त्याच खिडकीतून आत शिरले होते. खिडकीकडे पळताना देखील त्यांनी गोळयांचा मारा चालूच ठेवला होता. खिडकीतून आत प्रवेशतानाच काय तो बंद झाला होता काही काळासाठी.

a

दरम्यान ते गोळया झाडतच खिडकीकडे पळत असताना शक्ती उडी घेऊन एक सोफ्याच्या मागे लपला होता.

आत आलेले चौघे शक्तीला धुंडाळून लागले, तक्षणी शक्तीने त्याच्याकडील 'अशानी' पिस्टलने एकाची गोळी चालवणारा हात भेदला. पॉईंट थर्टी टू कॅलिबर जवळून एकदम वर्मी लागली होती व त्याच्या खांद्याजवळ होल करून रक्त घेऊन दुसरीकडून बाहेर पडली होती. त्यासोबत तो अमेरिकी देखील आडवा झाला होता. कण्हत तो वळवळू लागला. वेदना सहन करण्यापलीकडे होत होत्या त्याला.

अचानक काय झालं हे इतर तिघांना कळायला उशीर झाला, आणि त्या मधल्या काळाचा शक्तीने बरोबर उपयोग केउन घेतला. तो ताडकन उभारला. आणि त्याने गन्स चावणारे तिघांचेही हात पटापट निकामी केले. त्याने कुणाला जीवे मात्र मारलं नाही. ही त्याची कृती फक्त स्वतःचे रक्षण करण्यासाठी होती.

तो तडफडणाऱ्या त्या लोकांकडे पाहतच होता, की त्यांचा प्रमुख एक पिस्टल हाती घेऊन लडखडत चालत येताना शक्तीला दिसला. खिडकीपाशी काही हालचाल झाल्याने त्याने तिकडे मान फिरवली होती.

तर त्या विव्हळणाऱ्या सैनिकांचा प्रमुख सिग सॉर आपल्या हाती तोलून शक्तीच्या दिशेने दगमगणारे एकेक पाऊल सांभाळत टाकत शक्तीच्या दिशेने येत होता. त्याची पिस्टल खालच्या दिशेने होती, त्याचे बोटही ट्रिगरवर नव्हते. म्हणून शक्तीनेही त्याची मोडीफाईड 'अशानी' प्रमुखावर न रोखता खालीच करून ठेवली होती. परंतु तो अत्यंत सावध नजरेने त्याच्याकडे पाहत होता. प्रमुखाची नजर पण शक्तीच्या नजरेला एकटक भिडली होती.

"नाऊ आय अंड्डस्टॅण्ड, वाय दे ऑल आर् अफ्रेड् ऑफ यू! यू आर् दि डेडली कॉम्बिनेशन ऑफ इंटेलिजन्स, मेंटल अँड फिजिकल स्ट्रेंथ!" तो

शक्तीच्या नजरेत नजर घालून पापनीही न लावता शक्तीच्या दिशेने गडमगत संथ चालत बोलला.

तो शक्तीच्या अगदी सामने येऊन थांबला. त्याचे डोळे शक्तीच्या डोळ्यांत रुतले होते.

शक्तीकडे पाहतच त्याने खालच्या दिशेने गोळ्या चालवल्या. इथपर्यंत येत असताना त्याने पडलेली आपली माणसे कुठे आहेत हे पाहून घेतलं होतं. त्यांना न पाहताच त्याने त्यांचा ठराविक वेध घेतला होता. शक्ती देखील हे होत असताना एकटक रोख त्याच्या नजरेत पाहत होता. दोघांच्याही पापण्या जराही लावल्या नव्हत्या.

""दे आर् गोईंग टू डाय बाय आव्हर् गव्हर्नमेंट एनिवे!" अमेरिकन प्रमुख म्हणाला.

"हू आर् यू?" शक्ती त्याच्या डोळ्यात डोळे घालून विचारत होत्व.

"ल्यूटनंट ल्युकस एडकिन्स!" तो म्हणाला.

"वाय? यू आर् हियर्?" शक्तीने त्याला विचारलं.

ल्यूटनंट ल्युकस एडकिन्स हसला.

"नाऊ देअर् इज नो कम्पल्शन टू फॉलोव्ह द ऑर्डर्स एनिमोअर्, आय कॅन टेल तू!" ल्युकस बोलला,

"वी वर् मॉनिटरिंग दि ऍक्ट्स ऑफ युअर गव्हर्नमेंट. सो थिंग्स डोन्ट गो आऊट ऑफ हॅन्ड्स. अफ्टर् ऑल, इट इज इन्वोल्व्ह्ड् दि युरेनियम." त्याने शक्तीला सांगितले.

"व्हॉट दे आर् विथ इट?" शक्तीने विचारलं.

"डोन्ट नो. वी ओन्ली हॅड ऑर्डर्स टू किप एन आय अँड इंफिल्ट्रेट इफ दि थिंग गोज व्हर्स!" त्याने उत्तर दिले,

a

"अँड दॅट्स वाय वी केम हियर् एज मर्सिनजरीज." एडकिन्सने कथन पूर्ण केले.

"डज सत्यजित नो दॅट यू आर अमेरिकन मिलिटरी." शक्तीचा सवाल.

"नो. ओन्ली योर् होम मिनिस्टर अँड प्राईम मिनिस्टर नो थिस!" ल्युकसने उत्तर दिले.

आणि दुसऱ्याच क्षणी त्याने स्वतःची पिस्टल स्वतःच्या कनपट्टीला लावली, व डोळे मिटले. शक्तीने त्याची गन पकडली. तसे ल्युकसने आपले डोळे उघडले. शक्तीचा हात त्याने बाजूला झटकला.

"वी अमेरिकन्स लिव्ह विथ डिग्निटी. लुजिंग एज लाईक डाईंग टू अस!" तो म्हणाला.

आणि ल्युकस एडकिन्स आपल्या गुडघ्यांवर झाला. त्याने डोळे मिटून घेतले आणि एक आवंढा गिळून त्याने 9×19 एमएम पॅराबेलम बुटेल आपल्या डोक्यात प्रविष्ट केली आणि तो जाग्यावरच आडवा झाला!

शक्ती सुन्न व अन्यमनस्क भावनेने त्याच्याकडे पाहतच राहिला. त्या अमेरिकन आर्मी पर्सनलच्या डोक्याच्या चिंध्या होऊन रक्त काळया चकचकीत फरशीवर वाट मिळेल तिकडे धावत होतं...

"रेस्ट इन पीस, ल्यूटनंट!" शक्ती भावुक म्हणाला.

# २९. पूर्णसत्य...

शक्ती एका अँटिक लाकडी खुर्चीवर बसून होता. ही देखील ओक लाकडाचीच बनली होती व मऊ असं लेदर कुशन बसण्याच्या व टेकण्याच्या जागी स्टीलच्या खिळ्यांनी ठोकलेलं होतं.

त्याच्या समोर बसला होता, एक अपंग वयोवृद्ध माणूस. व्हीलचेअरवर असलेल्या त्याचे पाय कमरेपासून खाली लुळे पडलेले होते. त्याच्या वरच्या शरीरापेक्षा ते पाय बारीक होते, हे पॅन्ट असून ध्यानी येत होतं. त्या माणसाची नजर सभोवार फिरत होती, मेलेले अमेरिकन्स इतस्ततः

शक्तीच्या डाव्या हातात त्याच्या कडील मोबाइल होता, रेकॉर्डिंग चालू करून आणि उजव्या हातात सिग सॉर होती, एडकिन्सची!

आणि तो समोरच्या माणसाच्या डोळ्यांत बघत होता, जणू त्या डोळ्यांच्या गहिरेपणात उतरून त्याच्या अंतःकरणाचा ठाव तो घेऊ बघत होता.

तो माणूस देखील शक्तीच्या नजरेला नजर भिडवत बसून होता, आपल्या चष्म्यांच्या काचेतून त्याला बघत.

"नलिन प्रभू! न्यूक्लिअर सायंटिस्ट!" शक्ती म्हणाला आणि हुंकारून हसला,

"या लोकांना कदाचित माहीत नव्हतं, की ते कोणाला प्रोटेक्ट करत आहेत, नाही तर यांची तुमच्या डोक्यात गोळ्या घातल्या असत्या." शक्ती त्या इसमाला म्हणाला,

"माझ्याकडे जास्त वेळ नाही, सो लॉंग स्टोरी शॉर्ट, तुमच्याकडे असलेली सर्व माहिती मला हवी आहे. अन्यथा आपली इथली उपस्थित अमेरिकी गव्हर्नमेंटला मी स्वतः कळवेन, की इराकला कधी काळी न्यूक्लिअर वेपेन बनवायला मदत करणारा व तुम्हाला हवा असलेला फरारी इथं आहे!" शक्ती त्यास म्हणाला.

"होऊ डू यू नो मी?" नलिन त्याच्या खर्ज्याच्या आवाजात शक्तीवर गुरगुरला.

"मी सध्या सस्पेंडेड असेन मिस्टर प्रभु, परंतु मी कोल्हापूर पोलीस डिपार्टमेंटच्या अँटी टेररीजम युनिटचा प्रभारी आहे. शहरात कोण कोण राहतो, त्याची संपूर्ण माहिती माझ्याकडे आहे!

"मला माहित आहे, की तुम्ही नव्वदीच्या दशकात गल्फ वॉर चालू होतं, तेव्हा इराकला न्यूक्स बनवायला मदत करत होतात. पण हे युद्ध संपल्यानंतर अमेरिकेने इराकचा न्यूक्लिअर प्रोग्रॅम नष्ट केला. आणि तिथून तुम्ही जीव वाचवून पळून आलात, येताना आपल्या विमानाचा अपघात झाला, आणि त्यात आपण आपले पाय गमावले ते कायमचे. आपल्या काही नातेवाईकांशी संपर्क साधून आपण इथं कोल्हापूरात वास्तव्याला आलात ते तेव्हापासून इकडे आहात, सगळ्यांपासून अगदी लपून.

"आजपर्यंत तुमच्या पासून काही धोका संभवत नव्हता, म्हणून तुम्हाला काही त्रासही दिला नाही आम्ही. पण आता आपण पुन्हा एक्टिव्ह झालेले दिसता. ही बातमी जर अमेरिकेला समजली, तर? काय होईल? भारत सरकारचं

जे काही चालू आहे, त्याचा पाठींबा तर ते लढून घेतलीच, पण तुम्हाला देखील कायमचं गप्प करतील!" शक्ती धमकावत होता.

"आणि जर त्यांनी तसे केले नाहीच, तरी मी करेन! याने! या मेलेल्यांपैकी एकाची सिग सॉर! तुम्हाला मारून यांनी आत्महत्या केली, स्टोरी पटणारी आहे नाही का? आणि जरी माझ्यावर आळ आलाच, तरी आधीच माझ्यावर एवढे चार्जेस आहेत, त्यात हा एक!" शक्ती खोल आवाजात बोलला.

"तुला कळत नाहीये तू काय करतोयस!" प्रभू याने शक्तीला चेतावणी देण्याचा प्रयत्न केला.

"जाणून घ्यायचं आहे, की सरकार काय करतंय!" शक्ती ठणकावून म्हणाला,

"का हे युरेनियम इथं आणलं जात आहे? तुम्ही युरेनियम बॉम्ब बनवत आहात का? आणि हो, तर सरकारची यातली भूमिका देशाच्या जनतेला विधायक आहे, की हानी करणारी! बोला!" शक्ती शांतपणे पण धमकावत बोलला.

आणि त्याने सिग सॉर प्रभूवर ताणली. त्याचा धीर गळला आता आणि तो बोलू लागला,

"भारत सरकार..." तो थांबला आणि त्याने स्वतःच्या बोलण्यात सुधारणा केली,

"सत्तेवर असलेली जनहित पार्टी येत्या निवडणुकीत आपली सत्ता टिकवण्यासाठी संसदेवर अणुबॉम्ब टाकण्याचा आतंकवाद्यांचा प्लॅन आहे असा बनाव, खोटं चित्र उभं करणार आहेत!" प्रभू गंभीर सांगता झाला.

"इलेक्शन जिकणं इतकाच हेतू आहे, तर मग खरा अणुबॉम्ब का बनवला जात आहे? फक्त बोलण्यातून ही हवा केली जाऊच शकते की! लोकांच्या मनात त्यातूनही संशय निर्माण होतोच की!" शक्तीने विचारणा केली.

"पण यांना संशय नाही खात्री निर्माण करायची आहे जनतेच्या मनात, की हेच त्यांचे मसीहा, उद्धारकर्ते आणि संरक्षक आहेत! हेच जर दुसरे सरकार असते, तर भारतात अणुस्फोट झाला असता. आम्ही आहोत म्हणून ते शक्य झालं नाही! अणुबॉम्ब खरेच दाखवला, तर तर लोकांना हे खात्रीशीर पटेल! असा त्यांचा कयास आहे!" प्रभू म्हणाला.

"आणि हे सगळं साधणार कसं होतं?" शक्तीने सवाल केला.

"अणुबॉम्ब बनवणे माझे काम होते, त्या पुढे हा प्लॅन इम्प्लिमेंट कसा करणार याबद्दल मला माहिती नाही!" प्रभू ठाम म्हणाला.

त्याच्या डोळयांत शक्तीने सत्यता वाचली.

"तुम्हाला इतर इक्स्पर्ट्सची सुद्धा गरज पडेल ना? बाकीचे कुठे आहेत? असं नाही की तुम्ही एकट्याने बॉम्ब बनवू शकता! ते शक्य नाही!" शक्ती म्हणाला.

"संध्याकाळ पर्यंत येणार होते, पण कदाचित आता त्यांचं येणं रहित होईल." नलिन सूचक बोलला.

शक्ती हे सगळं उधळून लावणार आहे तसा त्याने चंग बांधला आहे हे तो आतापर्यंत समजून चुकला होता. आणि इथं जे घडलं, ते गृहमंत्री व पंतप्रधान यांना कळल्याशिवाय का राहणार होते...?!

"अलबत! मी सत्ताधारी पक्षाचा आणि त्यांच्या संघटनेचा सगळा मनसुबा बाद करणार आहे, त्यामुळे ते इथं येऊच शकणार नाहीत." शक्ती म्हणाला आणि,

"यूरेनियम कुठं आहे?" शक्तीने निर्वाणीचा सवाल टाकला.

त्या प्रश्नाबरोबर नलिन प्रभूची व्हीलचेअर हलली. तो आत गेला. शक्ती जगाचा हलला नाही. कारण नलिन काही प्रमाद करणार माही याची त्याला निश्चिती होती.

नलिन त्याच्या बेडरूमला आला. एका हायटेक तिजोरीचा लॉक त्याने आपल्या थबप्रिंटने खोललं. आत फक्त युरेनियमचं कंटेनर होतं, ते घेऊन व तिजोरीचं द्वार तसाच ठेवून तो पुन्हा बाहेर आला, म्हणजे त्याला घेऊन त्याची व्हीलचेअर बाहेर आली.

त्याने ते शक्तीसमोर धरले. शक्तीने घेतले ते. आणि त्याने बाजूला त्याच्या मागे असलेल्या एका लाकडी टेबलवर ठेवले. मग त्याने सिग सॉर मधील गोळ्या रिकाम्या केल्या, फक्त एकच गोळी त्याने त्यात ठेवली व ती पिस्टल कॉक करून त्याने ती नलिन समोर धरली व दुसऱ्याच क्षणी त्याने आपली अशानी हाती घेतली.

"एकच गोळी आहे यात." सिग सॉर विषयी शक्ती बोलत होता,

"जर ती माझ्याकडे वळली, तर मी तर जागेवरून हळू शकतो, पण आपण नाही सायंटिस्ट सर!" शक्ती त्याला बोलला.

"याची गरज आहे?" नलिन घाबरला होता,

"तुला हवं ते तू साधलंस ना?" त्याने शक्तीला विचारलं.

"इथून पुढचा काळ तुमच्यासाठी कठीण असणार आहे. मग जनहित पार्टीवाले जिंकोत अथवा हारोत! मी तुमच्या मुक्तीची कामना करतोय." शक्ती म्हणाला आणि मागे वळून त्याने कंटेनर ताब्यात घेतला.

आणि तो दरवाज्याकडे चालूही लागला. त्याच्या मागे एक आवाज झाला होता त्यासोबत एक स्पार्क देखील. शक्तीने तरी मागे बघण्याची तसदी घेतली नव्हती. कारण गोळी त्याच्यावर चालवली गेली नाही हे तो जाणून होता...

शक्ती थबकला, समोर एक शव आलं होतं. अविश्वासाने मेलेल्या त्या एडकिन्सच्या शवाकडे तो पाहत राहिला काही काळ, तोच एकजणाने त्याच्यावर ग्लॉक सेव्हेंटिन पिस्टल रोखली होती.

"जिथे जाता तिथे मृतदेहाचे सडे पाडता, हं? काय शक्तीसेन?" तो इसम म्हणाला आणि शक्तीने त्याच्याकडे बघितलं.

त्याच मोडलेल्या खिडकीतून सुशील आत येऊन थांबला होता. त्याने शक्तीवर गन रोळली होती खरी, पण त्याचे उजवे बोट ट्रिगरवर न असता बॅरलला समांतर होते. एवढेच नाही, तर त्याने पिस्टलची सेफ्टी सुद्धा अनलोक केली नव्हती याचे शक्तीने निरीक्षण केले होते. आणि त्यामुळे याच्याकडून काही धोका नाही हे देखील शक्तीच्या लक्षात आलं होतं. शक्तीने त्याला आजमावायचं ठरवलं. नक्की हा कोण आणि काय आहे ते त्याला जाणून घ्यायचं होतं.

"हे सगळं का? कशासाठी? स्वतःला निर्दोष सिद्ध करायचं सोडून हे युरेनियम हस्तगत करण्याच्या मागे का लागला आहात?" सुशीलने रोखून शक्तीला प्रश्न केला.

"कारण, मला स्वतःला निर्दोष सिद्ध करण्यापेक्षा भारतीय जनतेची सुरक्षितता अधिक महत्त्वाची आहे! युरेनियम वाईट आणि चुकीच्या हातात पडण्याआधी मला ते शोधायचं होतं!" शक्ती त्याची भूमिका ठामपणे स्पष्ट केली.

सुशीलची पिस्टल अजूनही शक्तीवर रोखलेलीच होती, त्याने ओठ एकत्र करत भुवया उडवून शक्तीच्या या जनतेप्रति असलेल्या समर्पणाची प्रशंसा केली.

"तुम्ही कदाचित मला ओळखलं नाही. मी सुशील मकवाना. एनआयए. तुमची केस मी सांभाळतोय!" सुशील सर्व्हिस पिस्टल खाली करत शक्तीला म्हणाला.

"मग मला अटक करणार आहात?" शक्तीचा कडक सवाल.

"ते करायचं असतं, तर तेव्हाच केलं असतं, जेव्हा तुम्ही तुमच्या एसपींना त्यांच्या निवासस्थानी भेटून गेलात." सुशील हसून शक्तीसाठी गौप्यस्फोट ठरेल असं बोलला.

"तेव्हापासून तुम्ही माझ्या मागावर आहात तर." शक्ती शांत बोलला.

"हो!" सुशील हसला.

"तरी तुम्ही होऊ दिलंत जे होतंय ते." शक्तीची बारीक नजर करून शंका.

"कारण तुम्ही निर्दोष आहात याची मला खात्री झाली होती." सुशीलचा खुलासा.

"कशी?" शक्तीचा प्रश्न.

"तुम्ही जिज्ञासा यांना लिहिलेल्या पत्रावरून. त्यात तुम्ही त्यांना उद्देशून जे लिहिलं होतं, ते कोणीही दोषी व्यक्ती तसं लिहिणार नाही. त्यांच्याबद्दलची तुमची काळजी तर त्या पत्रात दिसत होतीच. पण त्यात तुम्ही त्यांना सांगितलं आहे, की तुमच्यावर जे लांछन व आरोप केले गेले आहेत, ते खोटे आहेत आणि सत्य लोकांसमोर आणण्यासाठी तुम्ही जात आहात. एखादा मनुष्य खाजगी पत्रात स्वतःला निर्दोष सांगत आहे, तर यात नक्कीच तथ्य असलं पाहिजे. शिवाय अनेकांचे प्राण धोक्यात येण्याची शक्यता आहे आणि ते होण्यापासून तुम्ही रोखण्याचे प्रयत्न करणार आहात असाही तुम्ही त्या पत्रात उल्लेख केला होता. त्यातून आपण आपल्या कर्तव्याबद्दल जागरूक आहात हे दिसत होते. एक दोषी गुन्हेगार, असं सगळं का लिहून ठेवील, असा प्रश्न त्यामुळे उपस्थित होणं स्वाभाविक होतं. त्यामुळेच तुम्ही नक्कीच निर्दोष असला पाहिजे हे न कळण्याइतका मी तरी मूर्ख नाही!" सुशील शक्तीला उत्तरला व हसला,

"तेव्हा पासूनच मी तुमचा माग सोडला. आणि तुम्हाला आपलं निर्दोषत्व सिद्ध करता यावं म्हणून मी तुमच्या मार्गात आडकाठी ठरलो नाही. आणि शिवाय, आत्ता मी तुमचं आणि या नलिन प्रभू साहेबांचं सगळं बोलणं ऐकलं आहेच. आता तर शंकेला जागा अजिबातच नाही. नाही का?!" त्याचं हसणं रूंद झालं.

a

"म्हणजे तुम्ही आतापर्यंत सर्वांना खेळवतच होतात तर?!" शक्ती भावरहित विचारत होता.

त्याच्या या वाक्यावर सुशील खुदकन हसला.

"मग आता काय करणार आहात?" शक्तीने त्याच्या डोळ्यांत रोखत भावरहित विचारलं.

"डू यू हॅव पॉपकॉर्न? कारण मी मागे सरकून खेळ बघत बसणार आहे!" तो हसला आणि त्याने आपली गन खाली घेतली.

"बेटर वे. मी सुचवेन; की मागे राहून बघ्याची भूमिका घेण्यापेक्षा, तुम्ही या लढाईत भाग घ्या! आपलं कर्तव्य राजकारण्यांप्रति नाही, तर जनतेप्रति आहे. आपण पब्लिक सर्व्हन्ट्स आहोत, ना की पोलिटिकल सर्व्हन्ट्स!" शक्ती त्याला म्हणाला आणि तो वळून मुख्य दाराकडे चालला.

शक्ती जे बोलला, त्यावर सुशील खरोखर विचारमग्न झाला होता.

●●●

दरवाज्याच्या लॉकवर गोळी घालून शक्तीने दरवाजा उघडण्याचा मार्ग प्रशस्त केला होता. येताना तो घेऊन आलेल्या फिएट मध्ये बसून निघूनही गेला होता...

◆◆◆

शक्ती दुसरंही युरेनियम कंटेनर घेऊन आलेला पाहून राजन अवाक होता. शक्तीला इंन्विन्सिबल का म्हंटलं जातं याचा त्याला प्रत्यय आला होता चांगलाच.

ते कंटेनर देखील राजनने एका फायबरच्या जाड काळ्या ब्रिफकेस मध्ये आधी आणलेलं युरेनियम कंटेनर ठेवलं होतं, त्याच्या शेजारी हे देखील युरेनियम कंटेनर ठेवण्यात आलं.

टी-पॉयवरून ते बाजूला ठेवण्यास राजन वळला तसा शक्ती बेडरूमच्या सोफ्यावर विसावला.

"यू वोन्ट बिलिव्ह सर, मला काय समजलं आहे?" राजन घाबऱ्या आवाजात म्हणाला.

"जनहित पार्टी युरेनियम बॉम्ब बनवून त्याचा उपयोग संसदेवर हल्ला करण्याचा बनवा उभा करणार आहेत!" शक्तीनेच स्फोट केला.

झालं ही तसंच. ब्रिफके मागील टेबलवर ठेवून शक्तीकडे वळणारा राजन चाटच पडला.

तुम्हाला कसं..." आणि मग तो समंजस हसला,

"नलिन प्रभूकडून समजलं असणार. पण आता आहे कुठं तो?"

"जिवंत नाही!" शक्ती चप्पट चेहऱ्याने म्हणाला.

"कसं?" राजनने विचारलं.

"आत्महत्या केली त्याने." शक्तीने भावरहित सांगितलं.

"सर, पण मला कळत नाही, फक्त इलेक्शन जिंकायला इतकं मोठं षडयंत्र?" राजन धास्तावला.

"कदाचित हे इलेक्शन त्यांना भारताचं शेवटचं इलेक्शन ठरवायचं असेल?" शक्तीने राजनला वाटत होती त्याच्यातून मोठी भीती दाखवली, जी त्याला दिसत होती.

हे ऐकून राजन उडालाच! त्याचसाठी कोणत्या अणुबॉम्बची आवश्यकता पण नाही भासली. ते काम शक्तीच्या अंदाज वर्तनाने केलं होतं.

"म्हणजे आपल्याला म्हणायचं आहे, की ही निवडणूक जिंकून भारतातील लोकशाहीच संपवण्याचा विचार तर जनहित आणि एकसंध भारत करत नाहीयेत?"

"मला तसा अंदाज आहे, नाही तर इतकं मोठं षडयंत्र, ज्यात युरेनियम बॉम्ब, एक एटम बॉम्ब इंव्होल्व आहे, दुसरं काही कारण दिसतं तुला?"

भ्यायलेल्या राजनची नकारात मान हलली.

"हुकूमशही आणायची आहे त्यांना?" घाबरलेल्या राजनने स्पष्ट विचारलं.

"आत्ता तरी परिस्थिती काही वेगळी आहे का?" मख्खं चेहऱ्याच्या शक्तीचं त्याला प्रतिप्रश्न.

"आता सांग, काय काय समजलं? नक्की इग्झिक्युशन प्लॅन काय होता यांचा?" शक्ती राजनला विचारत म्हणाला. त्याने 'होता' असं क्रियापद वापरलं होतं मुद्दाम, कारण सत्ता पक्ष जे करू जात होता, ते शक्तीने बहुतांशी हाणून पाडले होते.

"पूर्वी कोल्हापूर मध्ये पंतप्रधान यांचा दौरा झाला, त्यावेळी मिटिंग मध्ये जे जे हजर होते त्यांचे रेकॉर्ड्स काढले, तेव्हा बऱ्याच गोष्टी समोर आल्या, त्या अशा..." संदर्भ देऊन राजनने स्पष्टीकरणाला सुरवात केली,

"एकसंध भारतचे कार्यकर्ते मुस्लिम नांव धारण करून हे संसदेवर अणुबॉम्ब हल्ल्याची धमकी देण्याचे काम करणार होते. म्हणजे हा अणुबॉम्ब

a

बनवला तर जाणार होता, पण त्याचा फक्त प्रॉपर्टी म्हणून उपयोग केला जाणार होता या नाट्यात!

"मग सरकार कडून खरेच काही मुस्लिम तरुणांना या संसदेवर अणुबॉम्ब हल्ल्याच्या धमकीच्या प्रकरणात अटक केली जाणार होती, व नलिन प्रभूच्या लीडरशिप खाली बनवलेला अणुबॉम्ब यांनीच बनवला आहे असे दाखवून त्यांच्याकडे तो सापडल्याचे दाखवणार होते. देशात एकदम राष्ट्रवादाची आणि मुस्लिम द्वेषाची एकाचवेळी लाट निर्माण होण्यासाठी हे करण्यात येणार होते. यामुळे हिंदू मुस्लिम ध्रुवीकरण होऊन त्याचा मतं मिळवण्यासाठी वापरत केला जाणार होता. अशाप्रकारे ते अधिकाधिक सीट्स जिंकून आणण्याच्या प्रयत्नात होते सर." राजन सांगत होता,

"अजून एक गोष्ट समोर आली आहे सर, मी एकसंध भारतचे अध्यक्ष मनोहर कौशिक यांचे रेकॉर्ड्स चेक केले, तेव्हा दोन व्यक्तींशी त्यांचा अलीकडे सतत संपर्क दिसून आला."

"कोण आहेत ते?" शक्तीने प्रश्न केला.

"माणिक त्यागी आणि तरुण कर्णिक!" राजनने ती नावे सांगितली.

"म्हणजे जतीन अध्वर्यूकडे सापडलेल्या इनिशियल्सची पूर्ण नावं ही आहेत तर!" शक्ती म्हणाला,

"यांचे गृहमंत्री व पंतप्रधान यांच्याशी काही लिंक्स!" शक्तीने पुढे विचारलं.

"आहेत सर. त्याच्याशीही या दोघांच्या मिटिंग्स व बोलणे झाले आहे अलिकडे!" राजनने माहिती पूरवली.

"पण एक गोष्ट लक्षात येत नाही, की यात पाकिस्तानचा नक्की काय रोल आहे? म्हणजे पाकिस्तान मधील आतंकवादी संघटना या कारवाईची जबाबदारी घेणार होतं, पण म्हणजे आणखी एक शत्रूचं चित्र जनहितला उभं करायला सोपं होतं हे बरोबर? पण पाकिस्तानला यात सोबत घेणं धोका नाही का? कारण सर, पाकिस्तानी संस्था फेडरल इन्व्हेस्टीगेशन एजन्सीचा डिरेक्टर जनरल आणि इथला त्यांचा एजंट यांचं संभाषण ऐकलं, तेव्हा समजलं, की या संसदेवर अणुबॉम्ब टाकण्याच्या धमकीच्या प्रकरणानंतर ते हा अणुबॉम्ब हस्तगत करण्याच्या तयारीत आहेत. जर असं झालं असतं, तर धोका भयंकर मोठा होता..." राजनने भीती चित्र दाखवले.

"अणुबॉम्ब बनवण्यासाठी लागणारे युरेनियम हे सहज मिळणं दुर्मिळ आणि दुर्लभ गोष्ट आहे. ती भारतातील या मुस्लिम लोकांकडे कशी आली? हा प्रश्न उभा राहिला असता. पाकिस्तानला इथं इन्वॉल्व्ह् करून घेतल्याने त्यांच्याकडून युरेनियम इथल्या मुस्लिमांना प्राप्त झालं असं चित्र यांना उभं करायचं होतं असं दिसतं. पण सत्ता पक्षाच्या हे गावी देखील नसेल, की पाकिस्तानी एजंट तो अणुबॉम्ब घेऊन पळण्याच्या विचारात आहे."

"इंटेलिजन्सला हे ठाऊक नसेल?" राजनची शंका.

"अगदी नॅशनल सिक्योरिटी एडवाईजर पासून सगळ्याच इंटेलिजन्सच्या व इन्वेस्टीगेटिव्ह एजन्सीजच्या डिरेक्टर पदी एकसंध भारताचेच पिठ्ठू बसलेले आहेत. तुला वाटतं, त्यांनी लक्ष दिलं असेल?" शक्तीचा प्रतिसवाल.

a

"म्हणजे पाकिस्तान यांना इलेक्शन जिंकायला मदत करणार होते आणि तिकडे इथला सत्ता पक्ष पुन्हा सत्तेवर आल्यावर त्यांना इलेक्शन जिंकायला मदत करणार होतं." राजन विचारी बोलला आणि आणखी एक शंकेने त्याच्या डोक्यात तडाखा दिल्याने त्याने शक्तीकडे पाहिलं,

"पण तिकडची सत्ता तर आर्मीच्या इशाऱ्यावर चालते. तिथे त्यांना इलेक्शन जिंकण्याकसाठी आशा उठाठेवी करण्याची काय गरज? आर्मी तसेही आपलाच माणूस पीएम पदी ठेवेल." राजने विचारलं.

"तुझ्या लक्षात आलेलं नाही. इथं आयएसआय इन्वॉल्व्ह नाही, तर एफआयए इन्वॉल्व्ह आहे. आयएसआय ही आर्मी धार्जनी आहे, तर एफआयए ही संस्था तिथल्या पंतप्रधान धार्जनी आहे. तिथला विद्यमान पंतप्रधान तिथली आत्ता आर्मीकडून काढून घेऊन स्वतःच्या हाती घेण्याच्या विचारात असावा. तू अलीकडे ऐकलं असशील, की तिथे पीएम व आर्मी जनरल यांच्यात सतत खटके उडत असतात. आर्मी पीएमची उचलबांगडी करण्याचाही प्रयत्नात आहे तिथे पाकिस्तानात. म्हणून आपली सत्ता टिकवण्यासाठी जनहितचे पंतप्रधान व पाकिस्तानचे पंतप्रधान यांची हातमिळवणी आहे ही. आणि कळस म्हणजे यात गोष्टी बिघडू नयेत म्हणून अमेरिका नजर ठेवून होती. त्यांची एक छोटी सैनिक तुकडी इथे सत्यजित यांची मर्सिनजरी टीम म्हणून राहत होती. तो अणुबॉम्ब चोरीला जाऊ नये अगर त्याचा गैरवापर होऊ नये म्हणजे त्याचं चुकून वा मुद्दामहून एक्सप्लोड होऊ नये, म्हणून ते नजर ठेवून होते या सर्व प्रकरणावर! पण सत्यजितला ते आर्मी पर्सनल्स आहेत हे माहीत नसावं बहुतेक. नाही तर त्याने नलिनच्या घराबाहेर त्यांना तैनात केलं नसतं. गृहमंत्रीने ही लोकं भाडोत्री

a

सैनिक म्हणून यांच्याकडे पाठवली असतील आणि याने पदरी ठेवून घेतली असतील." शक्तीने त्याचा तर्क सांगितलं, जो त्याने अचूक ओळखला होता.

"काय लोकं आहेत ही सर... इतकी हिडीस?! इथे आपल्या लोकांना सांगणार ते आपले दुष्मन! तिकडे ते त्यांच्या लोकांना सांगणार आपण त्यांचे दुष्मन. आणि हे भांडण कालातीत ठेवून हे दोन्हीकडचे सत्तापिपासू लोक आजन्म सत्ता उपभोगणार?! किती राक्षसी आहे हे." राजन उद्विग्न झाला.

"जे आहे ते असं आहे राजन!" शक्ती शांत म्हणाला.

"पण अमेरिका याला मान्य कशी झाली?"

"त्यांना भारतात व पाकिस्तानात पंतप्रधान पदी आपल्याला हवी ती लोकं हवी असतील, तर ती का या कन्स्पिरसीला विरोध करतील? एज लॉंग एज, हे अणुबॉम्ब सेफ राहील... म्हणून तर एक सैनिक तुकडी त्यांनी इथं प्लांट केली." शक्तीने डोकं लावलं.

"पण अणुबॉम्ब निर्मिती कोल्हापूर मध्ये का? ते नाही समजलं मला..." राजन कळकळीने म्हणाला.

"नलिन प्रभू क्रिप्लड (अपंग) होता. पायाखाली त्याची बॉडी हलत नव्हती. त्याला इकडे तिकडे नेणे यांना प्रशस्थ वाटले नसेल. आणि इथे लक्ष ठेवायला गृहमंत्रीचा सांडू होताच की. सत्यजित जैसवाल! म्हणून कोल्हापूर!" शक्तीने शंका निरसली.

"पण आता काय करायचं सर?" राजनचा स्वाभाविक प्रश्न.

"पंतप्रधान आणि गृहमंत्री कुठं आहेत?" शक्तीने डोक्यात काही योजना तडकल्याने विचारलं.

"पंतप्रधान दिल्लीत, पण गृहमंत्री इथेच आहेत." राजन सहज सांगून गेला.

"फोन लाव!" शक्ती तीक्ष्ण नजरेने ठाम म्हणाला.

"सर?!" राजन अविश्वासाने पाहतच राहिला!

"हो." शक्ती एवढं म्हणाला त्याला. कारण राजन त्यांचे इंटेन्शन समजला होता, हे शक्ती समजला होता.

शक्तीचा आत्मविश्वास बघून राजनची पण भीड चेपली. त्याने लगेच गृहमंत्रीला फोन केला, पण आपला नंबर तिकडे दिसू नये किंवा ट्रॅक केला जाऊ नये याची त्याने बरोबर काळजी घेतली होती, आपली टेक्निकल एक्सपर्टाईज वापरून...

तिकडून फोन उचलला गेला...

"शक्तीसेन बोलतोय!" डोळे एकदम तीक्ष्ण ठेवून शक्ती म्हणाला.

तिकडे फार्महाऊसवर सोफ्यावर बसलेला गृहमंत्री 'शक्तीसेन' हे नांव ऐकून रागात अक्षरशः बुडाला.

"भेटायचं आहे! पंतप्रधान साहेबांना पण बोलावून घ्या!" शक्ती त्यांना ऑर्डर देत म्हणाला.

"तुला मोकळं सोडून चूक केली! आत अडकवला असता, तर अशी हिंमतच करू शकला नसतास!" क्रोधाने लाल होत गृहमंत्री बुदबुदला.

चिडल्यामुळे त्याने दात असे दाबून धरले होते, की शब्द तोंडातल्या तोंडात धुमत होते त्याचे.

"युरेनियम माझ्याकडे आहे. दोन्ही! तुमचे नलिन साहेब यांनी आत्महत्या केली आहे. प्रोटेक्शनसाठी ठेवलेले सत्यजितचे भाडोत्री सैनिक, जे मूलतः अमेरिकन सैनिक होते, त्यांनी देखील आत्मघात केला आहे. आणि हे सगळं तुम्हाला आणि तुमच्या पक्षाला आणि हो, तुमच्या बाप असलेल्या आतंकवादी संघटनेला!" शक्ती दिवचणारं बोलला.

आणि ते चांगलंच झोंबलं गृहमंत्रीला.

"तू!" तो ओरडला.

पण गृहमंत्री पुढे काही बोलणार तोच शक्ती त्याला तोडत म्हणाला,

"जे बोलायचंय ते समोर बोला! वाट बघतोय!" शक्तीने निर्वाळा दिला आणि गृहमंत्रीच्या तोंडवर फोन कट केला.

गृहमंत्रीने क्रोधाक्रांत होऊन फोन फेकून दिला. त्याची कनपट्टी रागाने लालबुंद झाली होती. तो धुमसत होता...

त्याने दुसरा फोन उचलला. दरम्यान त्याचा काही विचार झाला होता. त्याने थेट आयजीला कॉल केला,

*"आयजी! गृहमंत्री बोलतोय! मला शक्तीसेन नाईक मेलेला हवा आहे!"* तो डोळ्यांतून आग ओकत दात ओठ खात बोलला.

a

# ३०. अनैच्छिक...

महेश अजूनही घोटतच बसला होता, इतक्यात त्याचा फोन वाजला. त्याने टेबलवर गुरगुरणाऱ्या आपल्या मोबाईलबर नजर टाकली, तर स्पेशल आयजीचं नांव शो होत होतं. त्याने तुसडेपणानेच फोन उचलला.

*"शक्तीचा बदला घ्यायचा आहे? त्याला संपवण्याचे आदेश आले आहेत. आणि हे काम करायला तुला खासच आवडेल!"* तिकडून फक्त एवढंच विचारलं गेलं आयजी कडून.

आणि महेशची प्यायलेली सगळी चटक्यात उतरली. एक राक्षसी हसू त्याच्या ओठांवर आलं. आणि त्याने तो फोन कट होताच, सतीशला फोन लावला,

"सतीश कुलवंत! शक्तीसेन कुठं आहे पहा जरा!" त्याने हुकूम सोडला.

◆◆◆

"विष्णू यांच्या प्रकृतीत आता बराच सुधार आहे. आता मला शक्तीला भेटलं पाहिजे." जिज्ञासा इस्माईल आणि गॅब्रिएलला बोलली.

"हे धोकादायक आहे." गॅब्रिएल भीती व्यक्त केली,

"बाहेर काय चालू आहे आपल्याला माहीत नाही."

"शक्ती देखील जखमी आहे. तो कसा आहे बघितलं पाहिजे मला." जिज्ञासा कळकळीने म्हणाली.

"मग तुम्ही एकट्या जाऊ नका. मी सोबत येतो. गॅब्रिएल थांबेल इथे विष्णू जवळ." इस्माईल म्हणाला.

a

जिज्ञासाने ते मान्य केलं. न मान्य करून तिला एकटीला इथून यांनी हलू दिलं नसतं. तिच्या सोबत लागलीच इस्माईल बाहेर पडला.

•••

डॉक्टर सुमेधची गाडी घेऊन इस्माईल व जिज्ञासा आले होते. गाडी एका कापड दुकानाबाहेरून जात असताना जिज्ञासाने गाडी थांबवण्यास सांगितले. गॅब्रिएल थांबला.

जिज्ञासा त्याला सांगून हात गेली. काही वेळाने परत आली, तो एक नवा कोरा थ्रीपीस कोट घेऊन.

तिथंच एक केमिस्ट दुकान होतं, शक्तीची हाताची जखम ध्यानी येऊन तिने त्या दुकानातून हाताला एक आर्म स्ट्रॅप खरेदी केला आणि ती गाडीत येऊन बसली.

गाडीत बसताच तिने राजनला फोन लावला होता,

"शक्ती कुठं आहे माहीत आहे?" तिने त्याला विचारलं.

*"आपण सेफ आहात ना? काही गडबड किंवा पाठलाग तुमचा?"* तिकडून विचारलं गेलं.

"मी सुरक्षित आहे. पाठलाग वगैरे काही नाही. शक्ती कुठं आहे? ती उत्तरली.

*"शक्ती सर माझ्यासोबत आहेत! माझ्या घरी!"* राजनने सांगितलं.

●●●

मग गाडी पुन्हा रवाना झाली, ते थेट येऊन थांबली राजनच्या घरापाशी.

गाडी चालवत असताना, इस्माईल आणि त्याच्या बाजूची जिज्ञासा सतीशला दिसली. ही गाडी राजनच्या घराकडे चालली होती.

त्याने लगेच महेशला फोन लावला.

"सर, तुम्ही शक्ती सरांना शोधायला सांगितलं, म्हणून मी आधी राजन सावत यांच्याच घरी पाहिलं, ते इथंच आहेत. आणि त्यांची प्रियसी व इस्माईल मुल्ला सर इथं आले आहेत." सतीश कुलवंतने महेशला माहिती पुरवली.

महेश त्याच्या घरी शक्तीचा वेध घेण्यासाठी तयार झाला होता. आपली पिस्टल तो मॅगझीनमध्ये गोळ्या भरून लोड करीत होता. सतीशची माहिती ऐकून त्याचे हात थांबले.

"इस्माईल? तो तिथं काय करतोय?" महेश असमंजस खवळला.

"माहीत नाही सर." सतीश बोलला.

"लक्ष ठेव! ते निघाले की सांग!" महेशने ऑर्डर दिली.

आणि मॅगझीन आपल्या पिस्टलमध्ये सारून त्याने स्लाईड ओढून ती लोड केली, त्यावेळी लोह एकमेकांना घसल्याचा कर्कश आवाज झाला, तो महेशला मधुर वाटून गेलं.

"हो सर." सतीश म्हणाला व कॉल कट करून तो जिज्ञासा व इस्माईलला राजनच्या घरात प्रवेशताना पाहू लागला.

राजनने येऊन त्यांच्यासाठी दार उघडलं होतं. ते आत शिरताच पटकन त्याने इकडे तिकडे सावध नजर टाकून दार लावून घेतलं होतं.

a

●●●

राजनच्या बेडरूममध्ये जिज्ञासा पोहोचली, तशी ती रिलॅक्स झाली.

"थँक् गॉड तू ठीक आहेस. पण तरी भांडण करून आलेला दिसतोयाच!" ती त्याची अवस्था बघून उखडली.

"माफ कर. पण हे सगळं थांबवण्याशिवाय गत्यंतर नाही." तो म्हणाला.

मग नाईलाज करून तिने सोबत आणलेला सूट शक्तीला देऊ केला.

"काय पार्टीला जात नाही मी!" शक्ती तिची चेष्टा करत म्हणाला.

"युद्ध हे तुझ्यासाठी सोहळ्यापेक्षा कमी असतं का?" जिज्ञासाने उलट त्याचीच खेचली,

"जा चेंज कर!" ती त्याला म्हणाली.

शक्तीचा जिज्ञासा पुढे नेहमीच नाईलाज असायचा. एरव्ही कुणाला न जुमाणणारा शक्ती आपल्या प्रियेसमोर कसा चिडीचूप असतो हे पाहून राजन व इस्माईल यांना देखील गुदगुल्या झाल्या होत्या.

शक्ती त्या सूटची केस घेऊन घेऊन उठला आणि बाथरूम मध्ये गेला.

"दाढी पण करा जरा. किती दिवस झाले, खुटरे वाढवून ठेवले आहेत कोण जाणे!" ती म्हणाली.

पंधरा मिनिटांत शक्ती बाहेर आला. चकचकीत दाढी करून जिज्ञासाने आणलेला नेव्ही ब्लू थ्री पीस सूट त्याने घातला होता. आतील शर्ट एकदम पंधरा शुभ्र. पॅन्ट देखील नवव्ही ब्लू. नवीन असल्याने कपडे अगदी चमकत होते.

a

"आता माणसात आलास!" जिज्ञासा त्याला म्हणाली.

शक्ती फक्त हसला. जिज्ञासाने त्याच्याकडे जात आणलेला आर्म स्लींग स्ट्रॅप त्याच्या गळयात अडकवला आणि त्याचा जखमी हात त्यात बंद केला.

"आता जास्त त्रास देऊ नको हाताला. आराम पडावा म्हणून हा स्ट्रॅप आणला आहे. काढू नको." ती त्याला ताकीद देत बोलली.

"होय." शक्ती हसून म्हणाला.

लागलीच जिज्ञासाने नेव्ही ब्लू कलरचा टाय शक्तीच्या गळयात बांधला. शक्ती अगदी रुबाबदार दिसू लागला होता. जिज्ञासाला थोडं भरून आलं, तिने शक्तीला आलिंगन दिलं. शक्तीचा कंठही सद्गदीत झाला होता.

"आता येतो." आवेग आवरून शक्ती म्हणाला.

"कुठं?" तिने काळजीने विचारलं.

"पंतप्रधान आणि गृहमंत्री यांच्या सोबत अपॉइंटमेंट आहे!" तो क्षणात गंभीर झाला.

जिज्ञासाला कळले नाही नेमके काय चालू आहे.

"या सगळ्या मागे आपले राज्यकर्ते आहेत." राजन तिचा गोधळ कमी करायला बोलला.

आणि जिज्ञासा अधिकच भ्यायली.

"तू जाऊ नको." तिने गळ घातली. आणि तिने त्याचा हात घट्ट पकडला, त्याला अडवायला.

a

"जावं लागेल. हे प्रकरण मिटवायला हवं आपल्याला." शक्ती तिला समजावत म्हणाला.

आणि त्याने तिचा हात बाजूला करून आपला हात सोडवून घेतला. जिज्ञासाला रडू आलं. डोळे भरले तिचे...

"काही होणार नाही." शक्ती तिला आश्वासन देत म्हणाला.

"मी येतो बरोबर." इस्माईल तडफेने बोलला.

"नाही तुम्ही यांची काळजी घ्या." शक्तीने त्याच्यावर काम सोपवलं.

इस्माईल मग जिज्ञासाला घेऊन जाऊ लागला. जिज्ञासाला भावुक झाली होती, कदाचित पुन्हा भेट होईल का नाही अशी शंका कदाचित तिला वाटत होती. पण शक्ती ऐकणार नव्हता. ती नाईलाजास्तव इस्माईल सोबत निघून गेली. जाताना तिने शक्तीकडे पाहिले देखील नव्हते. आपण ऐकत नाही हे पाहून ती आपल्यावर नाराज झाली आहे हे शक्ती समजून चुकला, पण इलाज नव्हता.

जिज्ञासा इस्माईल सोबत गेली, तसा शक्ती पुन्हा कर्मकठोर झाला.

"गृहमंत्री कुठं उरलेत म्हंटलास?" शक्तीने राजनला विचारलं.

"सत्यजित जैसवाल याच्या फार्महाऊसवर. मी तो पत्ता लोकेट केला आहे, पाठवतो तुम्हाला." राजन म्हणाला.

"आणि, काय आपण भारताच्या ब्रॉडकास्टिंग सॅटेलाईट हॅक करू शकतो?" शक्तीने अचानक असंबद्ध प्रश्न केला.

"इन्क्रीप्टडेड नसतील, तर ते शक्य आहे. पण मोठी मशिन्स लागतील, या कम्प्युटर्सचा काही उपयोग नाही."

शक्तीने तेवढंच ऐकलं आणि त्याने लगेच राजनचा मोबाईल उचलून एक फोन लावला.

"जतीन! काम आहे!" तो पलीकडील व्यक्तीला म्हणाला.

जतीन त्याच्या गुप्त खोलीत बसून होता, ती जी फक्त शक्तीला माहीत होती.

"आह... साहेब, एकदाची आठवण झाली म्हणायची, सुरवातीपासून लक्ष ठेवून आहे तुझ्या केसवर. म्हंटलं आता येशील मग येशील... पण देर आए दुरुस्त आए!" तो खुश होत म्हणाला,

"ऑर्डर करा!" तो शक्तीला बोलला.

"ब्रॉडकास्टिंग सॅटेलाईट हॅक करायची आहे!" शक्ती असं म्हणाला की जणू काही ही मोठी गोष्ट नाही.

आणि शक्तीचा हा 'वाईल्ड थॉट' ऐकून जतीन जोरजोरात हसू लागला. हाती काहीतरी तुफानी गवसण्याचा आनंद होता तो.

"अब आएगा मजा!" जतीन चेकाळून म्हणाला.

इकडे शक्तीने फोन ठेवला.

"याला तुझ्या रिकवायरमेन्ट्स सांग. किती टीम लागणार, मशिन्स काय काय लागणार सगळं!" शक्ती राजनला मोबाईल परत करत म्हणाला.

राजन सुन्न होता.

"पण सर, हे करणं म्हणजे... इल्लीगल तर आहेच, पण... हा देशद्रोह तर ठरणार नाही ना...?" राजन मरणप्राय घाबरला होता.

"देश वाचवायला करतोय आपण हे राजन. आणि ही एक बॅक-अप आहे. आपल्याला हे करावंच लागेल असे नाही, फक्त तयारीत रहायचं आहे. पण एक लक्षात ठेव, हॅकिंग तर आपल्याला करावंच लागेल. तू तयारी कर. सगळी जबाबदारी माझ्यावर!" शक्ती त्याला बळ देत म्हणाला.

◆◆◆

इस्माईल गाडी पळत होता, तर अचानक एक गाडी त्याच्या आडवी लागली. त्यसंतुन काही गुंड खाली उतरले.

दरवाजा लॉक होता इस्माईल चालवत असलेल्याच्या गाडीचा, तर त्या लोकांनी काचाच फोडल्या आणि दार जबरदस्ती उघडून मागे बसलेल्या जिज्ञासाला बाहेर खेचली. इस्माईल तिला वाचवायला पुढे झाला लगोलग ड्रायव्हींग सीट वरून उतरून तर त्याला गोळी घालून जागीच ठार केले गेले. जिज्ञासा मरणप्राय घाबरली. शक्तीला कळण्याची तिला संधी मिळणार नव्हती.

तिला त्या गुंडांनी आपल्या सोबत गाडीत घालून नेले. आपले काय होईल याची चिंता तिला कमी सतावत होती, परंतु आपल्यामुळे इस्माईल मारला गेला याचं दुःख तिला मोठं होतं... आणखी एक चिंता तिला लागली होती, की यांनी आपल्याला काही केलेच, तर शक्तीची अवस्था काय होईल... तुटून जाईल तो...

a

## ३१. प्रकटीकरण...

शक्तीला अडवणूक न करता आत येऊ दिलं गेलं होतं, फक्त त्याला तपासलं गेलं होतं. त्याच्याकडे कोणती गन सापडली नव्हती, पण त्याला अटॅच केलेला हिडन कॅमेरा व व्हॉईस रेकॉर्डिंग करण्यासाठी त्याला छुप्या लावलेल्या सर्व वायर्स सिक्योरिटीज कडून काढून टाकल्या गेल्या. त्याचा मोबाईल काढून घेतला गेला होता. त्याच्या हाती तीच ब्रिफकेस होती, ज्यात राजनने युरेनियम असलेली दोन्ही कंटेनर्स ठेवली होती.

"उसमें क्या है?" शक्तीला ब्रिफकेस संबंधी सिक्योरिटी कडून पृच्छा झाली.

"वहीं; जो तुम्हारे मलिक चाहते है!" शक्ती तिरकस बोलला.

एका सिक्योरिटीने ती ब्रिफकेस ओढली. ती टेबलवर ठेवून त्याने ती उघडून बघितली. कन्फर्म झाल्यावर त्याने ती शक्तील परत केली. दरम्यान शक्ती त्यांच्याकडे तिखट नजरेने फक्त पाहत होता.

●●●

शक्तीला एक खोलीत भल्या मोठ्या खोलीत आणलं गेलं. श्रीमंतीचं प्रतीक म्हणून ती खोली कोणालाही दाखवता अली असती अशी ती विस्तीर्ण खोली अनेक उंची व महागड्या वस्तू, फर्निचर, भित्तिचित्रे वगैरेसे सुसज्ज होती.

आणि समोर मखमली अशा वेगवेगळ्या सोफ्यांवर बसले होते, विद्यमान पंतप्रधान व गृहमंत्री!

a

"सर, ही हॅज बिन वायर्ड् अँड विथ कॅमेरा!" शक्तीला घेऊन आलेला सिक्योरिटीने सल्यूट केला व नंतर सदर माहिती पंतप्रधान व गृहमंत्री या दोहोंना दिली,

"बट वी हॅव इरेडिकेटेड् दोज!" त्याने काळजीचे कारण नसल्याचे पुढे सांगितले.

"कोई नहीं, यह चाहकर भी हमारा कुछ बिगाड़ नहीं कते!" कुलीन छद्मी हसत म्हणाला.

शक्तीला त्या खोलीत सोडून त्याला घेऊन आलेली व्यक्ती मग पंतप्रधान व गृहमंत्रीला सल्यूट ठोकून निघून गेली.

"आओ शक्तीसेन! गृहमंत्री जी ने बताया, की आप हमसे मिलना चाहते है, देखिए कितने तत्काल आए हम आपसे मिलने. हमारा जीवन ही है देश के नागरिकों को समर्पित. इनकी सेवा ही तो हमारा धर्मकर्तव्य है!" पंतप्रधान कुलीन शर्मा म्हणाला.

"अपना नाटक बंद करेंगे?" शक्ती करड्या नजरेने म्हणाला.

"उसमें क्या है?" मधुकांतने विचारलं.

"जे तुम्हाला हवं आहे." शक्ती म्हणाला.

"देर आए दुरुस्त आए! लाओ इधर, फिर हम तुम्हे माफ कर देंगे!" कुलीन शक्तीला म्हणाला.

"गलती, नहीं गुनाह तुम करो, और माफी भी हमसे चाहो?!" शक्ती उखडला.

"आमच्या समर्थकांच्या नजरेत आम्ही कधी चुकत नसतो!" मधुकांतने मग्रुरी दाखवत डोळा मारला.

"देखो बात का बतंगड मत बनाओ। वह बॅग इधर लाओ!" कुलीन ओरडला.

"ऐसें नहीं। मुझे कुछ चाहीए!" शक्ती बोलला.

"देखा मधुकांत! हर एक की कोई ना कोई किंमत होती है!" कुलीन म्हणाला आणि शक्तीकडे त्याने पुन्हा पाहिले,

"हमारे साथ हो जाओ और तुम्हे जो चाहे मिल जाएगा!" कुलीनने शक्तीस ऑफर दिली.

"मेरे सवालों के जवाब!" शक्ती थेट म्हणाला.

"बोल! काय हवंय!" मधुकांत मधे पडला.

"मैं ही क्यों? मुझे ही क्यों चुना गया फसाने के लिए?!"

"क्योंकि तुम्हें वफ़ादारी की खुजली सबसे ज्यादा है। अगर यूरेनियम कोई चोरी न करता, तो यह सब करने की हमें आवश्यकता ही नहीं थी। पर चोरी हुआ यूरेनियम ढूंढना था, हमारा प्लान बाहर न खुले इसका भी हमें ध्यान रखना था। क्योंकि ऐसा होता, तो जनता का हमारे प्रति विश्वास उड़ जाता। और यह बात हमारे और हमारी सत्ता के लिए घातक साबित होती। चोरी करने वाला तुम्हारी तरह वफ़ादार होता, तो यह प्लान बाहर खुल ही जाता, हमें पता नहीं था, कि इसके पीछे साधारण चोर थे, या कोई वतनपरस्त, इसलिए हमें किसी न किसी जूठे केस में फसाना आवश्यक बना। तुम्हारी निष्ठा के कारण तुम इस काम में रोड़ा न बनो, इसलिए तुम्हें चुना गया।" त्याला कुलीन कडून उत्तर दिलं गेलं.

"आपको लोगों को भ्रमित कर इलेक्शन जितने के लिए और उसके लिए पाकिस्तान का थ्रेट खडी करनी चाही, कि उनकी कोई आतंकी संगठन अपने भारतीय संसद भवन पर हमला करनेवाला है, ऐसा जनता को दिखाने के लिए सिर्फ एक कहानी खड़ी करनी थी, तो यूरेनियम बॉम्ब ही क्यों? कोई भी साधारण इक्सलोजीवह से काम चल जाता! जनता की जान सचमुच इतने बड़े पैमाने पर खतरे में डालने की क्या जरूरत थी? आपको पता है, नहीं है, मुझे नहीं पता, पर जो पाकिस्तानी एजंट यहाँ है, उसे ऑर्डर्स है, की आपके इलेक्शन जितने के बाद उस बॉम्ब को चोरी किया जाए! अगर ऐसा हुआ, तो वे लोग उस बॉम्ब को हमारे देश के खिलाफ इस्तेमाल कर सकते है, ऐसा डर नहीं लगा आपको!" शक्तीने सांगितले.

"आयबी उसके ऊपर ध्यान रखें हुए है, आप चिंता न करे!" कुलीन बोलला.

"मेरे सवाल का जवाब नहीं मिला!" शक्ती कठोर बोलला.

"आपको जवाब न दिए बिना कैसे चलेगा? आप तो जनता हो!" मधुकांत कुत्सित बोलला,

"वह इसलिए, की जितना बड़ा थ्रेट हो, उतने ज्यादा लोग डरेंगे! और जितने लोग डरेंगे, उतना बड़ा फायदा होगा!" मधुकांत कुटिल हसला.

शक्तीला किळस वाटून गेली,

"यू गाईज आर् सेडिस्ट!" शक्ती दात खात त्यांना बोलला.

दोघे निर्लज्ज हसले फक्त.

a

"बॉम्ब बनाएंगे आप लोक, उसके बाद पकड़ा जाएगा मुसलमानों को, जनता को दिखाया जाएगा, कि उनके रिलेशन पाकिस्तान से है, वे यह बॉम्ब संसदपर फोड़नेवाले थे, उनको इसके लिए यूरेनियम मिला पाकिस्तान से! वे बॉम्ब फोड़े उसके पहले हमने उन्हें पकड़ लिया! अगर हम सत्ता में रहे, तोही यह देश सुरक्षित हाथों में है, और देश को मजबूत रखना है, तो आनेवाले इलेक्शन में हमें ही वोट दे! सही?" शक्तीने करड्या नजर व आवाजात विचारलं.

"अरे हाँ भाई हाँ!" शक्तीची टर उडवत कुलीन म्हणाला.

"पाकिस्तान को अपने साथ में कर लिया। पाकिस्तान तो खुद इस हमले की जिम्मेदारी नहीं ले सकता, ऐसा होता, तो अंतराष्ट्रीय स्तर पर उसे बहुत कुछ झेलना पड़ता, तो प्लान यह बना, कि पाकिस्तान ने ही पाले हुए एक आतंकी संघटन को इसकी जिम्मेदारी लेने को कहाँ जाए! ताकि अगर पाकिस्तान का कोई आतंकी संघटन खुद आगे आकर इसकी जिम्मेदारी लेती, तो कहानी और भी ऑथेंटिक होती, और देश में राष्ट्रवाद की भावना को बड़े पैमाने पर तूल मिलती! नहीं?" शक्तीने सवाल केला व जवाब माहीत असल्याने तोच बोलत राहिला,

"जो भगवान और धर्म के नामपर नहीं बहकते, या किसी और धर्म के होते है, वह भी इस देशभक्ती की भावना से प्रेरित हो आपके पीछे खड़े हो सकते है, इसमें पाकिस्तानी आतंकी संगठन का नरेटिव्ह दिखाया जाए तो क्या कहने?! जनता तो पागल हो उठेगी! आप जुठमुठ करवाई दिखाएंगे और जनता को दिखाएंगे, कि देश कैसे सुरक्षित हाथों में है?! बस! फिर जनता का राष्ट्रवाद और

a

देशभक्त कहलानेवाला बड़ा हिस्सा आपकी जेब में।" शक्तीने तीक्ष्ण विचारलं व तो पुढे म्हणाला,

"इस तरह आपकी ताक़द बढ़ सकती है यहीं योजना थी ना?!" शक्तीने सांगता केली.

पंतप्रधान कुलीन शर्मा व गृहमंत्री मधुकांत गोस्वामी हे दोघेही नुसते हसले.

त्यांचं हसणं पुष्टी जाणून शक्ती बोलत राहिला,

"पाकिस्तान के पीएम को अपनी कुर्सी बचाने के लिए आपकी जरूरत है, वहाँ आर्मी उसे हटाने की फिराक में है, इसलिए उसे भी वहाँ की आवाम का बल हासिल कर इलेक्शन जीतकर सत्ता हाथ में रखने के किए आपकी जरूरत है। वहाँ भी यहीं खेल खेला जाता, जो यहाँ आप खेलने वाले थे! नहीं?! फिर पाकिस्तानने ही बताई एक आतंकी संघटन से यहाँ के पकड़े गए मुसलमानों की जूठी बातचीत उन भारतीय मुसलमानों के पीसी, लॅपटॉप, मोबाईल हॅक करके उनमें डलवाए जाते, और उन भारतीय मुसलमानों के खिलाफ जूठे सबूत खड़े किए जाते।

"कुल मिला के; यह सब जनता को सच लगे इसलिए असलियत में बॉम्ब बनाया जा रहा था। एकबार वह बन जाए तो रेंडमली कोई भी मुस्लिम वेलफेयर संघटन पकड़के उन्हें देश अंतर्गत आतंकवादी संगठन बताकर और उनके पास यह बॉम्ब मिला है ऐसा दिखाकर उनको अंदर करते तुम, और वे सब सड़ते जिंदगी भर अंदर। अगर कभी निर्दोष साबित होकर वे बाहर भी आ जाए, तो उनकी जिंदगी हमेशा के लिए बर्बाद!" शक्ती विचारत होता.

a

"को लैटरलडैमेज होते रहते है दोस्त!" कुलीन म्हणाला.

"हाँ! एक उदाहरण उसका मैं भी हूँ!" शक्ती बोलला.

मधुकांत हसला.

"तुम सब जान ही चुके हो, तो हमसे क्या जानना चाहते हो?" कुलीन म्हणाला.

मतलब पाकिस्तान का भी डर, और यहाँ के मुसलमानों के प्रति भी धृणा बढ़ेगी। एक पथ दो काज, यहीं ना?" शक्तीची नजर कठोर होती.

"सही है!" गृहमंत्री हसला.

"सिर्फ चार महीनों में आनेवाले चुनाव जितने के लिए इतनी बड़ी साजिश? आप अपने ही लोगों से जुठ बोल रहे है? आप समझते क्यों नहीं, कि आप लोग देश की अखंडता पर घाव कर रहे है, नागरिकों को एकदूसरे से लड़ा रहे हो! देश के असली टुकड़े आप कर रहे हो!"

"बहुत सेह लिया तेरा!" कुलीन ओरडला,

"राजनीति अब तू हमें सिखाएगा? यह सब किए बिना वोट बैंक तय्यार नहीं होती! सब अगर खुश हो गए, तो उनको हमारी जरूर क्यो पड़ने लगी?"

"तो इसलिए आप जनता को इस लायक बनाकर छोड़ रहे है, कि वह सिर्फ जीने मात्र को बहुत बड़ी उपलब्धि समझे?" शक्ती रागाने फणफणत ओरडला.

"चिल्लओ मत! होश रखो, कि किसके सामने बोल रहे हो।" कुलीन उखडला.

a

"हाँ! देश के प्रधानमंत्री और गृहमंत्री! इस देश की जनता के नौकर!" शक्ती त्यांनाच आठवण करून देत म्हणाला.

"देखो तुम!" मधुकांत चिडला.

कुलीनने त्याच्या हात धरून त्याला गप्प केलं. त्याला बोलू दे असा तो इशारा होता, शक्तीला काय काय समजल आहे है त्याला जोखायचं होते,

"देखते है, इन्हें क्या क्या पता चला है!"

"बस यही है!" शक्ती बोलला.

"आप काफी होशियार है शक्तिसेन जी!" मगे रेलत कुलीन हसत म्हणाला.

"लोगों के बीच दरार पैदा कर आप लोग अपनी राजनीतिक रोटियां सेकते हो। आप लोगों को जरा भी दया है के नहीं!" शक्ती जाब विचारत होता.

"बाकी सब जाने दो! अपनी कीमत बोलो!" कुलीन म्हणाला.

"मेरी कीमत आप के कूवत से बाहर है, मिस्टर कुलीन शर्मा जी!" शक्तीचा आविर्भाव बदला आणि तो एकदम विजयी बनला,

"आप की आपके पार्टी की, आपके संघटन की, किसी की औकात नहीं ऐसे नागरिक को खरीदना, जिसे उसके हक मालूम हो! और जो इस देश के प्रति समर्पित हो, और ना की किसी पार्टी विशेष के! एक जागरूक नागरिक कभी भी सड़ी हुई सत्ता के सामने नहीं झुकेगा, जो इस देश के संविधान को मानता हो और उसकी रक्षा करने के लिए हर वक्त कटिबद्ध हो!" शक्ती त्यांना त्यांच्या लायकी दाखवत बोलला,

"देखते है, कब तक नहीं टूटते?" ओठांची एकच बाजू रुंद करत कुलीन हसला आणि त्याने एक पॅड चालू करून शक्तीकडे.

ती स्क्रिन पाहून शक्ती धक्कावला. त्यात जिज्ञासाला एका खुर्चीवर बसवलं गेलं होतं आणि तिच्या मागे तिच्या डोक्यावर पिस्टल रोखून एकजण उभा होता.

"क्या अब ख्याल बदलने का इरादा है?" कुलीनने विचारलं.

"मैं सत्यवादी हूँ! विवेकवादी हूँ! तुम अगर सोचते हो यह कर के में डर जाऊँगा, तो तुम गलत हो!" शक्ती ठाम निश्चयी म्हणाला.

"तुम्हारी प्रेमिका तुम्हे सुन सकती है, यह जानते हो? क्या लगेगा उसे जानकर, कि तुम्हे उससे ज्यादा अपनी अकड़ प्यारी है!"

"वह समझ सकती है, की यह मेरी अकड़ नहीं, मेरी इस देश के प्रति आर् इस जनता के प्रति कर्तव्य मेरे स्वार्थ से बहुत बड़ा है!" शक्ती म्हणाला.

"तुम हमें टेस्ट कर रहे हो, ऐसा दिखाकर की तुम्हे परवाह नहीं, ताकि हम उसका उपयोग न जानकर उसे छोड़ दे!" मधुकांत हसला.

"तुम्हारी तरह मैं एक अंदर एक बाहर ऐसा नहीं हूँ!" शक्ती धर गभीर बोलला. तो परकोटीची कोशिश करून स्वतःला भाव रहित ठेवण्याची प्रयत्न करत होता.

""चलो, तो फिर हम उसे मार दे, तो तुम्हे कोई फर्क नहीं पड़ेगा!" मधुकांत म्हणाला.

a

शक्ती काहीच बोलला नाही, मनात डोक्यात त्याच्या हलकल्लोळ माजला होता.

"शक्ती... तू माझ्यासाठी एक कर्तव्यनिष्ठ व सुजाण नागरिक असल्याचं आपलं कर्तव्य विसरू नको. आणि मला माहित आहे, तू विसरणार नाहीसच. फक्त लक्षात ठेव, शेवटचं सांगू इच्छिते, आय लव्ह यू..." जिज्ञासा निश्चयी बोलली, तिच्या दोन्ही नेत्रातून अश्रू अविरत ओघळत होते, पण तिला दुःख नव्हतं. तिला पश्चात्ताप नव्हता कसचा.

शक्तीच्या पण नेत्रधारा लागल्या. त्याने डोळे मिटून घेतले, तरी त्याच्या डोळयांतून पाणी वाहने काही रुद्धले नव्हते. त्याच्या असहाय्यतेची चीड आली होती त्याला. त्याला संधीच नव्हती, अन्यथा त्याने जिज्ञासाला वाचवायला पुरजोर प्रयत्न केला, असता, नव्हेतर वाचवलेच असते, पण आता तो आपलं आणि जिज्ञासाचं दुर्भविष्य पाहू शकत होता... निस्सहाय...

त्याला फक्त चालवलेला आवाज आला. काय झालं होतं हे तो समजून चुकला होता. त्याच्या प्राणप्रिय जिज्ञासाला तो वाचवू शकला नव्हता...

"महेश!" मधुकांत ओरडला.

तसा तो आत आला ती आपली पिस्टल सज्ज ठेवूनच. त्याने शक्तीच्या डोक्याला गन लावली.

"इसे ले जाओ! क्या करना है,तुम जानते हो!" मधुकांत महेशला बोलला.

"बिलकुल सर!" महेश राक्षसी हसत होता.

a

शक्ती अजूनही डोळे मिटून सुन्न, अन्यमनस्क बसला होता. त्याच्या जखमी हाताला धरूनच ओढत महेश त्याला बाहेर घेऊन गेला.

"इसे हम रख लेते है!" ती ब्रिफकेस झाकून स्वतः कडे ओढत कुलीन शक्तीला म्हणाला होता.

पण शक्तीच्या त्याच्या ते ध्यानात आलं होतं की नाही कोण जाणे...

◆◆◆

एका सुदूर जंगलात शक्तीला आणलं गेलं होतं. गाडीपासून दूर त्याच्या पाठवर बंदूक रोखून महेश त्याला चालवत होता. शक्तीचा एक मोकळा हात त्याच्या डोक्याच्या मागे लागला होता, त्याने काही गुस्ताखी करायला नको, म्हणून त्याचा स्वतंत्र असलेला हात वर करवला होता.

"तुला अडकवायचं प्लानिंग कुणी केलं जाता जाता ऐकून जा. तेवढाच आत्मा शांत होईल तुझा. एसपीने सर्वांत प्रामाणिक म्हणून गृहमंत्रीला तुझं नांव सांगितलं, तेव्हा तुझ्यापर्यंत खोटी युरेनियम तस्करीची बातमी कशी पोहोचवायची याचा विचार होत होता, तेव्हा तुझ्या खबरीबद्दल मीच सांगितलं. आणि त्या खबरीपर्यंत पोहोचवल्या गेलेल्या माहितीवर तू कारवाई करणार हे ऑब्वियस होतं, मग काय अडकत गेलास...

"तुझ्या गर्लफ्रेंडला पण त्यांच्या दावणीला मीच लावलं. तुला काय असंही संपवलं असतं, पण त्या आधी तुला मरणाच्या वेदना द्यायच्या होत्या मला. आणि आता स्वतः तुझा खात्मा! माझी नौकरी गेली तुझ्यामुळं! आता तुझ्याचमुळं मला ती परत मिळेल! इथं तुझा खून... ट्र्चॅ! एन्काऊंटर आणि तिकडे माझी नौकरी परत कदाचित बढती पण! आणि एका पलायन करणाऱ्या

युरेनियम चोर आणि खुन्याला मारल्याबद्दल समाजात हिरोचा टॅग!" शक्तीच्या मागून चालतच महेश त्याच्या पाठीत त्याची कोल्ट 1911 '.45 एसीपी' रूतवून बोलत होता.

शक्ती अचानक चालायचं थांबला! त्यामुळे महेशला देखील थांबावं लागलं. त्याने 1911 पिस्टलची नळी शक्तीच्या पाठीत रूतवून त्याला पुढे चलण्यास गती देण्याचा यत्न केला, पण शक्ती जागच्या हलला नाही.

शक्तीचे काम अजून संपलेलं नव्हतं. मग शक्तीला संपून कसं चालेल...?!

शक्ती उलट गळयात असलेल्या डाव्या हाताच्या बाजूने गतीने फिरला आणि त्याने कोपराने महेशच्या हातची गन बाजूला केली. फायर झालं, पण गोळी तिरकी निघून गेली. मग शक्तीने उजव्या हाताने त्याचा गन असलेला उजवा हात घट्ट पकडला. हे करत असताना अंगठा आणि तर्जनी मधील जाड त्वचा 1911 पिस्टलच्या हॅमर व बॅरलच्या मधे येईल अशी शक्तीने काळजी घेतली होती, जेणेकरून महेशकडून ट्रिगर दाबलं गेलंच, तरी हॅमर गोळीच्या प्रायमरवर आदळून फायर होणार नाही, तर ते शक्तीच्या अंगठा व तर्जनी दरम्यानच्या मांसल त्वचेवर आदळेल.

शक्तीने महेशला आपल्या उजव्या पायाकडे ओढत त्याने आपला गुडघा महेशच्या पोटात ठेवून दिला व मग बुटाच्या आघाताने त्याला मागे जमिनीवर आपटले, महेश काही इंच हवेत उडून जमिनीवर कोसळला, तेव्हा त्याची 1911 शक्तीच्या उजव्या हातात आली होती.

शक्तीने एका क्षणाचा विलंब न लावता महेशच्या दोन्हीही पायांत 1911 ची एक एक गोळी प्रविष्ट केली.

"तू हे सगळं सांगितलं नसतंस, तरी मी शोधून काढलं असतं!" शक्ती त्याला म्हणाला,

"तू माझ्यासोबत जे केलंस त्याच्यासाठी मी तुला माफ केलंही असतं, पण जिज्ञासा गेली तुझ्यामुळं! त्यासाठी मी तुला कधी माफ नाही करणार! पण घाबरू नको, मी तुला मारणार नाही. तुला शिक्षा होईल ती कायद्याच्या मार्गानेच!" शक्ती त्याला म्हणाला.

आणि त्याला तिथेच सोडून तो त्याची गाडी घेऊन चालता झाला. महेश तिथंच विव्हळत पडला होता. स्वतःच्या बडबोलेपणाला दोष देत. आपण आधीच याला संपवायला हवं होतं, असंही त्याला झालं, पण त्यावेळीही शक्तीने काही मार्ग काढून स्वतःला वाचवलं असतं हे त्याच्या गावी आलं नाही...

गाडीतून जाताना शक्तीने फ्रान्सिसला फोन लावता होता, त्याला हकीकत अवगत करवून, लोकेशन पाठवून इथं तळमळत पडलेल्या महेशला उचलण्याचं काम शक्तीने त्याच्यावर सोपवलं होतं...

पळून न जाता आल्याने तिथेच पडून राहिलेल्या महेशला मग नंतर फ्रान्सिस येऊन घेऊन गेला होता.

a

## ३२. नागरिकशास्त्र...

दुसरा दिवस उजाडला, तसा शक्ती सत्यवेधीच्या ऑफिसला आला. त्याच्या हाती दोन ब्रिफकेस होत्या. त्याला पाहताच वैष्णवी त्याच्याकडे धावली.

"जिज्ञासा कुठं आहे?" तिने बेचैन विचारलं.

शक्ती काही बोलला नाही.

"तिला काही..." वैष्णवी भ्याली.

"आज आपल्यात नाही ती..." शक्ती जड अंतःकरणाने म्हणाला.

वैष्णवीला मोठा धक्का होता. काल ती हसतखेळत भेटली होती, ती आज त्यांच्यात नाही हे तिला अनाकलनीय होतं, अविश्वसनीय होतं तिच्यासाठी... ती सुन्न झाली...

"वी हॅव टू डू आवर् जॉब!" कर्मकठोर शक्ती वैष्णवीला वास्तवात आणून तिला कर्तव्याची जाणीव करून देत बोलला.

तिला आश्चर्य वाटलं, इतकं होऊन शक्ती वैफल्यग्रस्त न होता अजूनही आपल्या कर्तव्याचाच विचार करतोय...? हाच खरा कर्मयोगी!! हाच खरा कर्मयोगी!!!

●●●

काही क्षणातच शक्ती बिपीनच्या समोर त्याच्या कक्षात बसला होता.

a

त्याला सगळे एव्हीडेन्स दाखवले गेले होते. आणि हे सर्व पाहून बिपीन आणि वैष्णवी दोघेही बधिर झाले होते.

"मी... मी हे नाही दाखवू शकत..." कापऱ्या आवाजाने डोक्यावर साचलेला घाम पुसत बिपीन म्हणाला.

घाम पुसताना त्याच्या डोळ्यांवरचा चष्मा हलला होता, तोही सरळ करण्याचं भान त्याला राहिलं नव्हतं.

"तुमची सगळी हिस्ट्री आहे माझ्याकडे! पैसे घेऊन तुम्ही कशा बातम्या दाबता, किंवा शासन व प्रशासनातल्या लोकांच्या सांगण्यावरून तुम्ही कसे नरेटिव्ह्ज सेट करता. कसं तुम्ही पैसे घेऊन विशिष्ट पॉलिटिकल पार्टी आणि व्यक्तींचे अजेंडे जनतेसमोर रेटता, खोट्या बातम्या सांगता आणि जनतेला भ्रमित करता हे सगळं मला ठाऊक आहे. आपल्या चॅनेलचे मालक प्रखर दीक्षित यांच्या सांगण्यावरून ही अभद्र आचार नीती आपण अवलंबली आहे हेही मी जाणून आहे.

"माझ्या बाबतीतही तुमचे महेश सोबत काय डील झाले होते याचे देखील माझ्याकडे पुरावे आहेत. आता एकतर मी सांगतोय ते प्रसारित करा, नाही तर तुमच्या विरुद्धचे पुरावे पोलिसांकडे जातील. कोर्टातून तुम्ही इन्फ्लुइन्स वापरून सुटालही, पण तुमचं चॅनेल तोपर्यंत बरबाद होईल आणि तुमचा मालकही! मग तो तुमची काय अवस्था करेल हे विचारात घ्या!" शक्ती त्याला विचार करायला वेळ देत थांबला,

"शिवाय लोकांचा विश्वास उडेल तुमच्यावरून तो वेगळा. आणि कोणीही अमरपट्टा घेऊन आला नाही, जो आला तो जाणार, मग व्यक्ती असो,

कोणता पक्ष असो, की कोणती संस्था. उद्या ना परवा हे लोक सत्तेवरच राहिले नाहीत, तर? ही शक्यताही लक्षात घ्या! काय करताय ठरवा!" काही काळाने शक्ती बिपीनला म्हणाला.

बिपीन कमालीचा दडपणाखाली आला. तिरका झालेला चष्मा काढून टेबलवर टाकत दडपलेला बिपीन विचार पक्का करत वैष्णवीला म्हणाला,

"वैशु, लाईव्ह जा!"

●●●

मधुकांत आणि कुलीन ती न्यूज बघत होते. सत्यजित देखील तिथंच होता. त्यानेच यांना येऊन वर्दी दिली होती.

सदर प्लॅनिंगशी संबंधित सर्व व्हिडीओ क्लिपिंग्स, ऑडिओ रेकॉर्डींग्स, फोन डिटेल्स, मेल डिटेल्स सर्व सर्व जे काही असेल ते वैष्णवी दाखवत होती...

"फोन लावा या चॅनेलच्या संपादकाला!" मधुकांत सत्यजितवर ओरडला.

कुलीनची वेगळी अवस्था नव्हती, तोही भयानक चिडला होता.

सत्यजितने बिपिनला फोन लावण्याचा प्रयत्न केला, पण रिंग पूर्ण झाली, तरी बिपीनने फोन उचलला नव्हता.

"उचलत नाही!" सत्यजित काळजीने म्हणाला.

"मैं ही देखता हूँ!" कुलीन ओरडला.

आणि त्याने आपल्या मोबाईल वरून एक फोन लावला... इन्फोर्मेशन आणि ब्रॉडकास्टिंग मिनिस्ट्रीला तो कॉल होता!

a

"सत्यवेधी करके एक मराठी न्यूज चॅनेल है, इसका ब्रॉडकास्टिंग रुकवा दो! उनका लायसेन्स सस्पेंड कर दो। टोटल ब्लॅक आऊट कर दो! फौरन!" रागाने फणफणत कुलीन ऑर्डर देत ओरडला.

●●●

अचानक स्टुडिओतील चॅनेलची स्क्रिन ब्लॅक झाली.

"काय झालं?" शक्तीने विचारलं.

"ब्रॉडकास्टिंग मिनिस्ट्रीने चॅनेल टेक डाऊन केलं आहे!" बातमीपत्र करणाऱ्या वैष्णवीने निराशेने उत्तर दिलं.

आणि काही काळासाठी ब्रॉडकास्टिंग मिनिस्ट्री तर्फे सत्यवेधीचं लायसेन्स सस्पेंड करून चॅनेल ब्लॅक आऊट केल्याचा मेसेज त्यावर शो होऊ लागला.

शक्ती मात्र हरला नव्हता. त्यानेही एक फोन केला.

""एज आय प्रिडिक्टेड्!" फोन कानाला लावत शक्ती पुटपुटला,

"झाली हॅक?" त्याने फोनमध्ये विचारलं.

"गुड टू गो सर!" राजन म्हणाला.

राजनच्या घरच्या टेरिस वर सगळा सेट-अप उभा केला होता. एक भला मोठा अँटिना ब्रॉडकास्टिंग सॅटेलाईटकडे तोंड करून उभा होता. एक छोटा पण, ताकदीने उदंड असा सुपर कम्प्युटर त्यांना साथ देत होता. राजन एका मोठ्या कम्प्युटर स्क्रिन समोर बसून होता. की-बोर्डवर त्याची बोटे चालत होती.

a

"सॅटेलाईट इन्क्रीप्टेड नव्हती, त्यामुळे इट वॉज इसी लाईक वॉकिंग ऑन दि आईस केक!" जतीन बोलला. त्याला या कठीण समयी देखील खाणं सुचत होतं, म्हणूनच त्याची ही उपमा.

राजनच्या सोबत जतीन, हा देखील तिथं कम्प्युटरवर खाटपिट करत होता. यानेच ही सर्व साधने उपलब्ध केली होती.

जतीन काळे, हा कधी काळी डार्क वेबच्या माध्यमातून जगभरात इल्लीगल एक्टीव्हीटी करणारा आणि आता ते सर्व धंदे बंद करून शक्तीला गरज पडेल तेव्हा त्याला मदत करणारा. एकाच जागी बसून याचं शरीर स्थूल झालं होतं...

"ही आमची सुरक्षा व्यवस्था..." शक्ती स्वतःशीच खेदाने म्हणाला,

"असो, सत्यवेधी चॅनेलवरचं लाईव्ह सेशन देशातील सर्व भाषांच्या सर्व चॅनेल्सवर दिसलं पाहिजे! शक्यतर सोशल मीडिया, स्ट्रीमिंग साईट्स, ऑनलाईन व्हिडीओ साईट्स, अल्टर्नेट डिजिटल मीडिया, समांतर वृत्त-संचार माध्यम, आणि सर्वांचे मोबाईल्स यांवरही हे लाईव्ह सेशन दिसले जाईल असं बघा! आणि ब्रॉडकास्टिंग मिनिस्ट्रीला ती चॅनेल्स ब्लॅक आऊट करणे शक्य होणार नाहीत, एप्स क्रॅश अगर बॅन करता येणार नाहीत, सॅटेलाईट टेक डाऊन करता येणार नाही याची काळजी घ्या!" शक्तीने सूचना केली.

"आय आय कॅप्टन!" जतीन उत्साहाने चमकत्या डोळ्यांनी म्हणाला.

भारतीय ब्रॉडकास्टिंग सॅटेलाईट हॅक करण्यासारखं काहीतरी भलंमोठं, अवाढव्य तुफानी करायला मिळतंय म्हणून तो भलताच चांगला चेकाळला होता.

त्याला फार मजा वाटत होती... शक्तीने त्याला काही तरी तुफानी करण्याचं काम सोपवलं होतं, त्यामुळे तो शक्तीवर बेहद्द खुश होता, एरव्ही त्यांचे रिलेशन हे लव-हेट रिलेशनच... (याचा अनुभव आपण 'अंतःपुर' मध्ये घेतला आहे.) पण शक्तीची कोणती ऑर्डर हा कधी न मोडणारा. आणि आता तर एक विलक्षण काम शक्तीने त्याच्यावर सोपवलं होतं. तेव्हापासून त्याच्या मेंदूत अड्रेनलिन जोमाने वाहत होते.

"पुट मी ऑन द लाईव्ह देन!" शक्ती त्या दोघांना म्हणाला.

आणि सोबत आणलेल्या दोन केस घेईन तो स्टुडिओ सेट-अप मध्ये गेला.

"लेट मी टेक द चार्ज फ्रॉम हिअर!" शक्ती वैष्णवीला म्हणाला.

वैष्णवी खुर्चीतून उठली. शक्ती त्याच अँकरच्या खुर्चीवर विराजमान झाला. यावेळी शक्ती जिज्ञासाने तिच्या अंतिम क्षणी (जो जिज्ञासाला आणि शक्तीलाही वाटला नव्हता, की तिचा अंतिम क्षण ठरेल अशावेळी) त्याला प्रेमाने आणलेला नेव्ही ब्लू रंगाचा थ्री-पीस सूट परिधान करून होता. त्याच रंगाचा जिज्ञासानेच त्याच्यासाठी घेतलेला टाय तो घालून होता. त्याने अँकरचा इयरपीस कानात अडकवला.

*"सर, यू आर लाईव्ह!"* त्याच्या कानात राजनचा आवाज घुमला.

a

शक्तीने स्क्रीनवर नजर टाकली, तो लाइव्ह दिसत होता.

आणि मग; शक्तीने बोलायला सुरुवात केली,

"नमश्कार! मैं शक्तीसेन नाईक! कोल्हापुर पोलिस डिपार्टमेंट के एन्टी टेररिजम यूनिट का प्रभारी हूँ। मैं आज हिंदी में ही बात करूँगा, क्योंकि सब सुन, समझ सके!"

संपूर्ण भारताच्या सर्व चॅनेल्सवर, आणि जिथे जिथे भारतीय चॅनेल्स दिसतात, त्या त्या सर्व देशांत शक्ती त्या सगळ्या चॅनेल्सवर शक्ती दिसत होता, ऐकू जात होता...

"आप शायद जानते होंगे, की अभी मैं सस्पेंडेड हूँ, क्यों? यह भी जानते होंगे! यूरेनियम चोरी का मुझ पर आरोप है! और इसी यूरेनियम से संबधित दो खून के आरोप भी मुझपर लगाए गए है!" असं म्हणून शक्तीने ग्लव्ह्स चढवले आणि एक ब्रिफकेस उघडली.

त्यातून शक्तीने दोन कंटेनर्स काढले आणि ते समोरील न्यूज टेबलवर ठेवले.

"यही वह युरेनियम है!" एका कंटेनरवर हाथ ठेवून शक्ती म्हणाला,

"आणि यह दुसरा कंटेनर भी युरेनियम का ही है, यह दुसरा युरेनियम... एक्चुअली यह दोनों युरेनियम कहाँ से आए, यह आपको कुछ देर में पता चल जाएगा!"

आणि वैष्णवीला त्याने सूचक हाक मारली,

"वैष्णवी!"

a

ती काय ते समजली, तिने आपल्या ऑपरेटरला इयरपीस द्वारे अधिसूचन दिले.

"ब्रॉडकास्ट एव्हरीथिंग लाईव्ह!" ती बोलली.

आणि राजन आणि शक्तीने मिळून जमा केलेले सर्व पुरावे स्क्रिनवर दिसू लागले... अगदी अथ पासून इती पर्यंत...

यात ना जतीन अध्वर्यू सुटला, ना जनक अध्वर्यू, ना पंतप्रधान कुलीन शर्मा, ना गृहमंत्री मधुकांत गोस्वामी, ना मनोहर कौशिक, ना आयजी नारायण साखरकर, ना महेश देशमुख, ना जिग्नेश ओसवाल, ना सत्यजित जैसवाल, ना अगदी बिपीन पुरोहित!

त्यांच्या मिटिंग्स, त्यांचे सर्व संभाषण, अगदी पाकिस्तानी, अमेरिकी यांचे सामील असणे, आणि इलेक्शन जिंकण्यासाठी त्यांनी आखलेला अघोरी प्लॅन! अगदी सगळं सगळं, ज्यात प्रमुख भूमिकाच होती, युरेनियमची!!!

●●●

कुलीन, मधुकांत आणि सत्यजित हे सर्व पहात होते.

अधीर बेचैन कुलीन फोनवर लागला होता,

*"सॉरी सर, द सॅटेलाईट इज आऊट ऑफ आवर् कंट्रोल्स... वी आर् हेल्पलेस... वी आर् नॉट एबल टू डू एनिंथिंग..."* तिकडून अपराधी व माफीच्या आर्जवी आवाजात असमर्थता दर्शवली गेली.

"भाड में जाओ!" कुलीन ओरडला आणि त्याने मोबाईल फेकून दिला!

a

गृहमंत्री मधुकांतने हार मानली नाही, त्याने फोन केला, सुशीलला.

"सुशील मकवाना, सत्यवेधी के ऑफिस जाके शक्तीसेन को रोको!" मधुकांत ओरडला.

"सॉरी सर, मैं अभि कुछ काम में फसा हूँ!" म्हणत सुशीलने फोन कट केला. त्याने फोनच उचलला होता, तो गृहमंत्रीची मजा घेण्यासाठी.

तो त्यावेळी आपल्या टीम सोबत तो थांबलेल्या सरकारी रूममध्ये नाश्ता करत, शक्तीलाच टिव्हीवर पहात होता,

"शक्तीसेन आपण मला म्हणालात, कृती करा. हीच माझी कृती, की स्वतः गप्प बसून राहून तुम्हाला बोलू देणं." तो मोठ्यांदा हसला... आणि त्याने चिझ पिझ्झाच्या मोठ्या स्लाईसचा मोठा मोठा बाईट घेतला.

मधुकांतला चिडण्यात वेळ घालवायचा नव्हता, त्याने लगेच स्पेशल आयजीला फोन लावला.

●●●

आयजी शक्तीला रोखण्यासाठी मधुकांतची ऑर्डर घेऊन आपल्या गाडीपर्यंत पोहोचलाच होता, तेवढ्यात एसपी त्याच्यासमोर उभा ठाकला, आणि आयजी एसपीचा सूचक हसरा चेहरा पाहून जागीच गोठला.

●●●

सत्यवेधीच्या ऑफिस स्टुडिओमध्ये,

a

युरेनियम जतीन अध्वर्यू पासून कसे गायब झाले, आणि ते चोरणारे कोण होते हे सांगणारी गॅब्रिएलची कबुली देखील दाखवली गेली. आणि लगतच नलिन प्रभूची कबुली, जी शक्तीने रेकॉर्ड केली होती, तीही प्रसारित केकी गेली.

त्या पुरावा दर्शवणाऱ्या व्हिडीओज व व्हॉईस रेकॉर्डींग्स नंतर आली, अखेरची ध्वनीफीत, जिथे महेश देशमुख शक्तीला मारण्यास नेत असता शक्तीला कसे अडकवलं गेले, जिज्ञासाचे अपहरण करून तिला कसे पंतप्रधान व गृहमंत्रीपर्यंत पोहोचवले गेले याबाबत बडबडला होता.

आणि अंतत्तोगतवा; सगळं सगळं जनतेसमोर उघड झालं होतं...

सर्व दाखवून संपल्यावर ती चित्रे परत परत मागे पळू लागली, व पुढे असलेला शक्ती बोलू लागला,

"आपने अब सब सच देख, सुन लिया है। शायद इससे आप एक बात समझ गए होंगे, और नहीं तो मैं समझाता हूँ; एक बात जान लीजिए, राजनीति में कुछ भी दुर्घटना से नहीं होता। यदि ऐसा दिखता है, तो आप शर्त लगा सकते हैं, कि वह ऐसा ही घटित हो इसी तरह से योजना बनाई गई होती है।" शक्ती थांबला.

लोकांना सगळं पचवनतासाठी त्याने थोडा वेळ दिला आणि मग बोलू लागला,

"इनका सच सामने लानेवालों की आवाज ये सत्ताधारी कैसे दबाते है, यह कोल्हापूर की जनता ने देख लिया है अभी अभी। क्या हुआ यह पुरे भारत को मैं बताता हूँ। आपको बता दूँ, कि जो चॅनल आप देख रहे है, यह कोल्हापुर का लोकल चॅनल है, इसपर पहले भी यह सब जानकारी दी जा रही थी, तो इस

चॅनल का ब्रॉडकास्ट ही रुकवा दिया गया सत्ताधारियों की तरफ से। इसलिए हम ब्रॉडकास्टिंग सैटेलाइट ही हैक करके अपनी आवाज पूरे भारत में आप तक पहुंचा रहे है। इस तरह ये लोग अपनी अभिव्यक्ति को दबा रहे है। इसका ताजा उदाहरण आपके सामने है। मुझे यकीन है, की इन लोगोंने सैटेलाइट ही बंद करने की कोशिश भी की होगी, मग ऐसा न हो इसका इंतजाम भी हमने पहले की किया है।

"तो अब आप को पता चल गया होगा, कि इन यूरेनियम कन्टेनर्स की सारी हकीकत क्या है! मेरी मंशा खुद को बेकसूर साबित करने की नहीं थी, मुझे यह यूरेनियम कब्जे में लेना था, ताकि किसी के द्वारा इसका दुरुपयोग ना हो। ताकि आप सब सुरक्षित रहे। और अब यह आपके सामने है!

"भले इस यूरेनियम बम का उपयोग सिर्फ भय, और डर पैदा करने के लिए होनेवाला था, पर अगर यह किसी गलत हाथों में पड़ जाता, तो सब की जान खतरे में पड़ जाती, पर इतनी चिंता थोड़ेही पड़ी है, इन सत्तापिपासुओं को, की आपका विचार कर सके!

"आपके वोट मिले इसलिए यह सब षडयंत्र रचा गया! अब आपको विचार करना है, कि क्या इन राजनेताओं के पीछे पागल होना है, या नहीं! ऐसे लोगों को सिर पर उठाकर मत नाचो, जो ऐसी भ्रष्ट और अभद्र कुरापातें करके देश में मिलजुलकर रह रहे भाई-भाई में दरार डालते है!" शक्ती म्हणाला आणि त्याने दुसरी ब्रिफकेस उघडली.

त्यातून त्याने एक पुस्तक बाहेर काढले. भले जाडजूड होते. त्याने ते उभे धरले, त्यावर लिहिले होते,

a

'भारताचे संविधान!'

"आपको पता ही होगा, कि यह क्या है? जी हाँ! भारत का संविधान! यह है, हमारा 'आयडिया ऑफ इंडिया!' देश का बल्कि यूँ कहूँ, तो दुनिया का सबसे श्रेष्ठ और शक्तिशाली डॉक्युमेंट! इतना ताकदवर, की कोई वेद, कोई कुरान, कोई बाइबल, या दुनिया के किसी भी धर्म के कोई भी धर्मग्रंथ इसके सामने नहीं ठहर सकते! क्यों पता है? क्योंकि यह भारत का संविधान किसी भगवान, गॉड या अल्लाह को समर्पित नहीं किया गया! बल्कि यह समर्पित किया गया है, इस देश के लोगों की तरफ से इस देश के लोगों को। हमारी हजारों सालों की गुलामी और अन्याय को ख़त्म किया है हमारे संविधान ने।

"जिसकी शुरुआत ही होती है, **'हम भारत के लोग!'** इस वाक्य से। ध्यान दे; **'हम भारत के लोग!'** मतलब यहीं पर, उद्देशिका के पहले ही वाक्य में संविधान ने हमें , **'हम भारत के लोग!'** कहकर **'एक'** किया है। आगे हमारा संविधान कहता है," असं बोलून तो संविधान उघडून प्रस्तावना वाचू लागला,

"हम भारत के लोग, भारत को एक सम्पूर्ण प्रभुत्व-संपन्न समाजवादी, पंथ-निरपेक्ष, लोकतंत्रात्मक गणराज्य बनाने के लिए तथा उसके समस्त नागरिको को: सामाजिक, आर्थिक और राजनैतिक न्याय, विचार, अभियक्ति, विश्वास, धर्म और उपासना की स्वतंत्रता, प्रतिष्ठा और अवसर की समता प्राप्त कराने के लिए तथा उन सब में व्यक्ति की गरिमा और राष्ट्र की एकता और अखंडता सुनिश्चित करने वाली बंधुता बढ़ाने के लिए दृढ़संकल्प होकर अपनी इस संविधान सभा में आज तारीख 26 नवंबर, 1948 ई. (मिति मार्गशीर्ष शुक्ल सप्तमी, सवंत दो हजार छह विक्रमी) को एतद द्वारा इस संविधान को अंगीकृत,

a

अधिनिमित और आत्मापिर्त करते है। हम भारत के नागरिक यह संविधानहमें समर्पित करते है।" संविधान बंद करके शक्ती ते उभेच धरतो व पुढे बोलू लागला,

"जैसा की हमने अभी पढ़ा, यह संविधान हमें बताता है, कि इस देश में देश का नागरिक सर्वोपरि है, सर्वोच्च स्थान पर है, इसलिए लोकतंत्र सर्वोपरि है।

"सत्ता के केंद्र हम हैं, 'हम भारत के लोग!' इस देश के अगर मालिक कौन है, तो वह है इस देश के सारे के सारे नागरिक! और इसमें वर्ण, जात, धर्म, लिंग, इत्यादि किसी का भेद नहीं! सब समान है! सब को समान अधिकार है! सभी एकसमान हक़दार है, एकसमान मालिक है भारत देश के!

"यह सारे अधिकार हमें किसी भगवान, किसी धर्म, किसी धर्मपुस्तक, किसी जाति, किसी पंथ, या किसी वर्ण ने नहीं दिए है, यह दिए है, इस संविधान ने। और इसीलिए हम 'भारत के लोगों' की धर्म पुस्तक एक ही हो सकती है, और वह है यह 'संविधान!'

"वैसे संविधान को धार्मिक पुस्तक कहना संविधान का अपमान है, पर क्या करूँ? आप लोग धर्म से ऊपर उठकर कुछ देखना ही नहीं चाहते, इसलिए मैं ऐसा कह रहा हूँ। इसलिए यह कह रहा हूँ, कि आप किसी भी धर्म और धर्म पुस्तक के अनुयायी बनने के बजाय हमारे संविधान के अनुयायी बनें, जो भारत के नागरिक यानी आपके अधिकारों की बातें करते हुए आपको सर्वोच्च रखता है।

"खैर, आप कहेंगे, कि सब एक कैसे है? तो जानिए, कि यह संविधान सबको समान अधिकार प्रदान करता है। संविधान में बताए गए सारे अधिकारों के समान वितरण के साथही, संविधान सब को एकसमान मतदान का अधिकार

a

भी देता है। और उस वोट की कीमत भी एकसमान है, चाहें वह फिर अमीर से अमीर हो या गरीब से गरीब। फिर चाहे वह सवर्ण से सवर्ण हो या पिछड़े से पिछड़ा। पढ़ा-लिखा हो या कम पढ़ा-लिखा।

"देश के हर एक नागरिक को वोट का अधिकार तो संविधान देता ही है, सिवाय सबके वोट की कीमत एक ही तराजू में तौलता है। कोई उच्च-नीच नहीं है, इस देश में सब एकही स्तर पर है, सब का स्थान एक है और वह सब इस संविधान की वजह से।

"सबको एकसमान रोजगार के मौके, एवं सबको अपनी उन्नति करने के समान मौके भी यहीं संविधान देता है। सबको समान न्याय का अधिकार संविधान ही सबको देता है। कानून के सामने कोई ऊपर नहीं, कोई नीचा नहीं। यहाँ भी सभी एकही स्तर पर है। यहाँ तक कि चुनाव लड़ने का अधिकार भी संविधान सबको समान तरीके से देता है।

"और यहीं हर स्तर पर एकसमानता हमारा संविधान हमें प्रदान करता है। सबको एकही पायदान पर खड़ा करता है। कोई बड़ा नहीं, कोई छोटा नहीं है। इस सबसे स्पष्ट होता है, कि सभी का मूल्य एकही है, संविधान की नजरों में।

"अगर शासन, प्रशासन और न्यायपालिका में बैठे लोग अगर भेदभाव करते है, अन्याय करते है, तो यह उनका दोष है, और उनके दोषों के लिए हम संविधान को दोष नहीं दे सकते। अगर किसी पर अन्याय होता है, तो दोष संविधान का नहीं, बल्कि उच्च पदों पर बैठे लोग, जो संविधान का ठीक तरह से पालन नहीं करते, दोष उनका है। हमें उनसे प्रश्न करने चाहिए, ना कि संविधान का द्वेष!

"यह वह किताब है, जो सिर्फ आपको सारी ताक़द और सारे अधिकार प्रदान नहीं करती है, बल्कि साथ ही यह संविधान आपको हर प्रकार की स्वत्रंतता भी प्रदान करता है, यहाँ तक कि मन चाहा धर्म स्वीकार करने की, उसका पालन करने, मन चाहा खाने, मन चाहा कपड़ा पहनने की भी। और इसलिए सभी धर्मों के लोगों के लिए यह संविधान एकसाथ ही पवित्र है! जब हम सब भारत के 'एक नागरिक' है, तो यह किताब हम सब भारतीयों के लिए एक ही पवित्र किताब है, और दूसरी कोई नहीं!

"पर ध्यान रहें, संविधान जनता के हाथों सत्ता तो सौंपती है, किंतु यह सत्ता अपने साथ लेकर आती है, कुछ कर्तव्य, कुछ जिम्मेदारीयाँ भी! संविधान सिर्फ हक़ की बात नहीं करता, वह नागरिकों को कुछ कर्तव्य भी सौंपता है। और सबसे पहले हमारा यह कर्तव्य है, कि इस संविधान का पालन हर भारतीय नागरिक को करना है! संविधान के आदर्श, भारतीय संस्था, राष्ट्रध्वज और राष्ट्रगीत का आदर करना भी जिम्मेदार का हिस्सा है। यह सामान्य चीजें तो हम जानते है, पर और भी कई कर्तव्य है, जैसे; भारतीय स्वतंत्रता संग्राम में जिन उदात्त आदर्शों ने स्वतंत्रता संग्राम को प्रेरणा दी, उनका संगोपन करना, यानी - समता, प्रेम, सहिष्णुता, अहिंसा, न्याय और शांति!

"भारतीय सार्वभौमिकता, एकता और एकात्मकता बनाए रखने और उनका संरक्षण करने का कर्तव्य भी सर्वोपरि है। और भी कुछ कर्तव्य संविधान हमें बताता है। जैसे, जब भी देश को जरूरत पड़े, देश की सेवा और देश संरक्षण में भारतीय नागरिक को अपना योगदान देना। धर्म, भाषा, प्रादेशिक अस्मिता, वर्गीय व वर्ण भेद इन सब से ऊपर उठकर अखिल भारतीय जनता में एकात्मता

a

और बंधुभाव को बढ़ाना। महिलाओं की गरिमा को कम करनेवाली प्रथाओं को त्यागना। हमारी मिश्रित सांस्कृतिक विरासत को महत्व देना और उसका संरक्षण करना। वनों, झीलों, नदियों और वन्य जीवन सहित प्राकृतिक पर्यावरण की रक्षा और सुधार करना और जीवित प्राणियों के प्रति दया दिखाना। वैज्ञानिक दृष्टिकोण, मानवतावाद, आविष्कारशीलता और सुधारवाद का विकास करना। सार्वजनिक संपत्ति की रक्षा करना और हिंसा का सख्ती से त्याग करना। राष्ट्र गतिविधि और उपलब्धि के उच्च स्तर तक पहुंचना जारी रखे, इसके लिए व्यक्तिगत और सामुदायिक गतिविधि के सभी क्षेत्रों में अंतिम उपलब्धि के लिए प्रयास करते रहना। इसके अलावा, छह से चौदह वर्ष की आयु के बच्चों को यथा लागू शैक्षिक अवसर प्रदान करना। यह कुछ कर्तव्य है, जो संविधान हमें पालन करने कहता है।

"मैं यहाँ पूछना चाहता हूँ, क्या हम इसमें से किसी एक कर्तव्य का पालन भी करते है? चलो छोड़ो, क्या हमें यह कर्तव्य भी मालून है? हमारे कितने राजनेताओं को यह कर्तव्य मालूम है? उनको मालूम करने की इच्छा भी नहीं, पर देश के नागरिक कहलाने वाले हम लोगों को भी क्यों आवश्यकता नहीं लगती, की इन कर्तव्यों को जान ले और इनपर अमल करें?!

"शिक्षा जैसे मूलभूत अधिकार पर तो इन सत्ताधारियों ने सबसे अधिक टॅक्स लगाकर रखा है, ये यह नहीं चाहते की आप पढ़े। स्वतंत्र विचार करने की क्षमता आप में आ गई, तो इनके बहकावें आप कहा से आओगे? आप के बच्चें पढ़-लिख गए, तो भविष्य में इनकी निर्बुद्ध सेना कैसे तैयार होगी? आपको यह भी पता होना चाहिए, कि आपके कफ़न तक पर इन्होंने टॅक्स लगाकर रखा हैं,

a

के आप चैन से मर भी नहीं सकते! ऐसे आपका मरण भी महंगा कर रखा है इन लोगों ने। और यह सब हो रहा है धर्म की आड़ में, ताकि आप धर्म, मजहब इन जैसी निर्रथक बातों में अटके रहे और ये और इनके धन की लालसा रखनेवाले प्रिय उद्योगपति मित्र आपका धन, आपकी संपत्ति चोरी कर सके।

"कृपया इसपर ध्यान दें, कि भारत किसी धर्म विशेष का द्वेष करने से, किसी जाती विशेष, किसी वर्ग विशेष, किसी वर्ण, किसी लिंग विशेष की घृणा करने से महान नहीं बनेगा! यह हमारा प्रिय भारत देश तब महान बनेगा, जब हम संविधान ने हमें दिए हुए इन कर्तव्यों का कठोरता से पालन करें।

"भले कोई धर्मग्रंथ ना पढें, लेकिन एक बार अपना संविधान जरूर पढ़ें, वे लोग तो अवश्य पढ़ें, जो कहते है, कि संविधान में समानता नहीं है। और अगर पूरा भी पढ़ना ना हो, तो इसकी प्रस्तावना तो जरूर पढ़ें। पूरे संविधान का सार है यह! इसी में आपको सारे नागरिकों को मिले समान अधिकारों का दर्शन होता है। जिसकी शुरवात ही है, 'वी द पीपल ऑफ इंडिया; 'हम भारत के लोग'! ना की हम हिंदू, या हम मुसलमान, या हम सिख, या हम ख्रिश्चन, या हम बौद्ध, या हम जैन, या हम लिंगायत, ना हम कोई अन्य धर्म के लोग। तो यह देश किसी एक धर्म से नहीं, बल्कि इस देश के लोगों से चलता है, लोग यानी मानवता!

"इसलिए किसी व्यक्ति विशेष के भक्त मत बनो, ना किसी पॉलिटिकल पार्टी के भक्त बनो, मैं कहूँगा कि भक्त ही ना बनो, क्योंकि इससे आप विचार करने की क्षमता खो दोगे। और अगर भक्त फिर भी बनना ही है, तो सत्यभक्त बनो, सत्य के आग्रही बनो। विवेकवाद के भक्त हो। अहिंसा के भक्त हो। भक्त बनना है, तो असली देशभक्त बनो, और सच्चे देशभक्त का कर्मकर्तव्य क्या है?

a

वह है, इस देश को इस देश की सरकार से बचाना, चाहे वह सरकार किसी की भी हो, किसीं भी राजनीतिक पार्टी की हो।

"देखिए यह पहले समझने वाली बात है, कि जनता का काम ही है, सरकार ने बनाए कानून और जारी की हुई पॉलिसीज में कमियाँ खोज निकालना, ताकि उन कानून और पॉलिसिज को जनता के भले के लिए ही सुधारा जा सके। तो कोई सरकार पर टिका टिप्पणी करता है, तो वह जनता के भले के लिए होता है, ना कि इसलिए, कि प्रश्न करनेवाला और सरकार का विरोध करनेवाला देशद्रोही, राष्ट्रद्रोही है।

सरकार का विरोध यानी राष्ट्र का विरोध ऐसा नहीं होता। इस गुलामी मानसिकता से बाहर आईए। बल्कि सत्ता से सवाल करना ही असल में देशभक्ति करने का सबसे आसान तरीका है, जिससे जनता का भला हो सके। सरकार जनता के दबाव रहेगी, तो ही सरकार आपके हित की करेगी वरना सिर्फ अपना खुद का हित ही देखेगी, और अपनी ही मनमानी करेगी। क्योंकि देखो, सत्ता दिमाग खराब करती है, तो यह इस देश के देशभक्त नागरिकों का आद्य कर्तव्य है, की सत्ताधारियों पर अपना अंकुश रखकर सत्ताधारियों के दिमाग को काबू करें, उन्हें खराब ना होने दे। तो यह अच्छे से समझलो, कि सत्ता में बैठे लोगों की हर गलत बात को मानना और उन गलत निर्णयों का समर्थन करना ही असल में देशद्रोह और राष्ट्रद्रोह है।

"जब हम कहते है, कि जनता ही स्वामी है, जनता ही राजा है, तब मीडिया भी उसमें आती है, तो मीडिया को भी सत्ता के विरोधियों की तरह ही काम करना होता है। पर क्या मीडिया ऐसा करती है, मीडिया को सोचना होगा!

"और प्रशासन में बैठे लोग, न्यायपालिका में बैठे लोग भी, यह ना भुले, कि यह संस्थाऐं स्वायत्त और स्वतंत्र है, और इन्हे स्वतंत्र रखने का विशिष्ट कारण है। और वह इसलिए है, कि इनका दुरुपयोग सत्ताधारी ना करें। तो यह आपका उत्तरदायित्व है, की आप सत्ता के अधीन ना हो और अगर सत्ता में बैठे लोग गलती करें, जनता पर जुल्म और अन्याय करने लगे, तो उनके रक्षा के लिए सत्ता को भी चुनौती दे, उनके खिलाफ खड़े रहे और जनता के साथ उनकी आवाज बनकर डटे रहे।

"अगर सत्ताधारकों पर जनता का अंकुश नहीं रखा गया, इनपर नियंत्रण नहीं लगाया गया, तो सत्ताधारी बेछूट होकर मनमानी करने लगेंगे। आप पर अन्याय करते रहेंगे, आपको निचोड़ते, दबाते, कुचलते रहेंगे, आपको अज्ञानता में रखकर, मूर्ख बनाकर आपको आपस में ही लडाएंगे और खुद सत्ता का आनंद भोगेंगे।" शक्ती थोडं थांबला, श्वास भरून तो बोलू लागला,

"हमें ध्यान में रखना होगा, कि कोई भी देश जमीन से नहीं बनता, देश बनता है, वहाँ के लोगों से। भारत भी यहाँ के नागरिकों से बना है, यह बात जान लो, मान लो, ठान लो। और एकदूसरे का द्वेष, अपने ही देशबंधुओं से घृणा और नफरत करना छोड़ दो। इन स्वार्थी राजनेताओं की ताक़द ही है, आप लोगों का एक ना होना! धर्म, जाती, वर्ण, पंथ से ऊपर उठो, और एक देश बनकर उभरो, तो कोई तुम्हारा इस्मेमाल अपने राजनीतिक या व्यक्तिगत फायदे के लिए नहीं कर पाएगा।

"जब तुम एक हो जाओगे, तब तुम सब में ताक़द आएगी, सत्ता में बैठे तुम्हारे नौकरों को सवाल करने की! हाँ! नौकर! इन्हे राजा समझने की गलती

a

मत किजिए! सत्ता में आपके द्वारा बिठाए गए लोग आपकी संपत्ति के सिर्फ विश्वस्त मतलब ट्रस्टी हैं। हम लोग यहीं बात भूल जाते है, कि सत्ता में बैठे लोग हम भारतीय नागरिकों के नौकर मात्र है। जब आप के पास उन्हें वहाँ बिठाने की शक्ति है, तो उन्हें वहाँ से हटाने की ताक़द भी तो आपही के पास है, जो इसी संविधान ने दी है। तो क्यों डरते हो? क्या कोई मालिक अपने नौकर से डरता है? तो आप लोग क्यों डरते हो? हमारा काम करने के लिए, हमें सुविधा मिले इसके लिए हमने उन्हें वहाँ कुर्सी पर बिठाया है। वे सब हमारे रहमोकरम पर होते है, हम उनके नहीं। हम उनके मोहताज़ नहीं, वे हमारे मोहताज़ है। अगर वे तुम्हे लड़ाए, तो सवाल करो, अगर वे तुम्हें अच्छी सुविधाएं ना उपलब्ध कराए, तो सवाल करो, इतने सवाल करो, कि वे रड जाए। वे हमारे राजा नहीं, हम जनताजनार्दन राजा है, और हमें यह अधिकार दिया है, इस किताब ने, हमारे इस संविधान ने!

"मैं प्रशासन और न्याय पालिका में बैठे लोगों को और भी कुछ कहना चाहूँगा, हम सब इस देश की जनता के सेवक है, ना कि राजनेताओं के! राजनेता हमारे मालिक नहीं है, हमारे मालिक इस देश की जनता है। बल्कि ये राजनेता भी हमारी तरह ही भारतीय जनता के चाकर ही है, तो आप प्रशासन और न्याय संस्थाओं में बैठे लोग उनसे डरना छोड़ दे। जिस जनता के पैसों से हमारे वेतन, पगार होते है, हमारे परिवार का पेट भरता है, उन हमारे मालिकों के प्रति कृतज्ञता और वफ़ादारी निभाओ। जो सचमुच हमारे मालिक है, उनकी नौकरी करो, ना कि जूठे मालिक होने का ढोंग करनेवाले और उसके घमंड में रहनेवाले राजनेताओं की। और इसलिए सत्ता में बैठे लोग अगर गुनाह करें, तो उनसे डरे

बिना उनपर करवाई करें। अगर आपको किसी से डरना ही है, तो जनता से डरो, सत्ता में बैठे लोगों से नहीं।

"संचार माध्यम, यानी मीडियावालों, आपसे भी मुखातिब होना चाहूँगा, आपको लोकतंत्र का चौथा स्तंभ कहा जाता है, आप ही मजबूत नहीं रहोगे, तो देश की नींव डगमगा जाएगी। देश की जनता के आवाज हो आप। जनता का ही एक हिस्सा हो। आपही सत्ता की बोली बोलोगे, तो जनता के बोल सत्ताधारियों तक कौन पहुँचाएगा? वे सत्ताधारी, जिन्हें सत्ता हमने पकड़ाई है।

"जनता के साथ साथ, मैं सार्वजनिक प्रतिष्ठानों के सारे पदस्थ, लोकतांत्रिक संस्थाओं के पदाधिकारी, सभी सुरक्षा बलों के सारे रक्षण अधिकारी, सभी न्याय संस्थाओं के कुल न्यायाधीश, सारे सरकारी एवं व्यक्तिगत संचार माध्यमों में काम करनेवाले लोग, इत्यादि सभी से मेरा प्रश्न है, क्यों डरते हो आप सब लोग सत्ताधारियों से? चाहे सत्ता किसी की भी आए, वे कुछ वक्त के लिए वहाँ है। वे कभी ना कभी जाएँगे, अनंतकाल के लिए वे नहीं है वहाँ, तो डर क्यों?

"क्या नौकरी खोने का डर है आपको? या मृत्यु का भय हैं? ध्यान रहे; स्वार्थ से बड़ी देशभावना होनी चाहिए। और वह आप में हो, तो आपको किसी का डर नहीं सताएगा।

"दूसरी बात, अगर आप लोग सच्चे और ईमानदार रहे, तो डर काहे का? इसलिए सच्चाई का रास्ता अपनाओ, डर अपने आप खत्म हो जाएगा। और भले आप का डर खत्म ना भी हो, तो भी आप हमेशा सच ही बोलें। सत्ता को आईना दिखाए। क्योंकि, यहीं हमारा राष्ट्र कर्तव्य है। हमे दो मार्गों में से एक को

a

चुनना होता है, एक अनीति का आसान रास्ता और दूसरा नैतिकता से पुर्ण महाकठिन रास्ता, अब यह हमपर है कि हम चयन किसका करते है।" शक्तीने एकणाऱ्यांना विचार करायला थोडा वेळ दिला व तो पुन्हा बोलू लागला,

"हम जनता को धर्मांध बनाकर उसकी आड़ में आज सारे बिज़नेसेस, पब्लिक सेक्टर्स और प्राकृतिक एकाधिकार, सरकारी एकाधिकार, तकनीकी एकाधिकार और भौगोलिक एकाधिकार जैसे मोनोपॉली सेक्टर्स कुछ गिनेचुने लोगों को सौंप दिए जा रहे है, उनको बेच दिए जा रहे है, जिनपर इस देश की आवाम का हक, और अधिकार है। यह जो संस्थाऐं है, वे आपकी, हम जनता की मिल्कियत है। सरकारी तिजोरी की संपत्ति जो आपकी हैं, वह भी यह लोग खुद के लिये खर्च कर रहे हैं। और यह भी एक बड़ा राष्ट्रद्रोह ही है।

"जल, जंगल, जमीन बड़े बड़े उद्योगपतियों को सौंप दिए जा रहे है, और वे उद्योगपति लोग अपने फायदे के लिए इन प्राकृतिक संपत्ति को उजाड़ रहे है, तबाह कर रहे हैं, जो आप लोगों की संपत्ति है। आप की जेब का पैसा उनके जेब में डाला जा रहा है।

"और आपको यह बताकर भ्रमित किया जा रहा है, की यहीं विकास है। आपका ध्यान असल समस्याओं की तरफ ना जाए और इनको आपके माध्यम से राजनीतिक सत्ता बारंबार मिलती रहे इसलिए आपको भगवान के नाम पर, धर्म के नाम, जाति और वर्णों के नाम पर एकदुसरे से आपस में लड़ाया जा रहा है। आपसी भाईचारा खत्म करने के लिए आपको धर्मों में, जाती में, वर्णों में फिर से बांटा जा रहा है, जो हमारे राष्ट्रपुरुषोंने अपार कष्ट सहकर महत्प्रयासों से देश

व समाज से उखाड़ फेंके है। परस्पर धार्मिक सद्भाव बिगाड़कर आपका खून बहाया जा रहा है, आपके ही हाथों।

"आपको राष्ट्रवाद, देशभक्ती, धर्म, जाति, वर्ण ऐसे कई भ्रमों में ड़ालकर अपनों का खून बहाने के लिए उकसाया जा रहा है। और आपको दिखाया जा रहा है, कि यह आपके हक़ की ही बात हो रही है। पर उल्टा आपको अलग अलग करके खत्म किया जा रहा है। और इनके बहकावे में आकर आप भी एकदूसरे को मार भी रहे हैं।

"इतने पर ये लोग नहीं रुकते, भगवान और धर्म का हथियार तो ये इस्तेमाल करते ही है, परंतु इतने से इनकी दाल नहीं गलती, देव और धर्म से कुछ लोग प्रभावित होते है, उतने से इनका चुनाव जीतने का और सत्ता टिकाए रखने जैसे राजनैतिक लाभ उठाने का काम पूरा नहीं होता है, तो और लोगों को प्रभावित कर अपनी तरफ करने के फिर भगवान और धर्म के साथसाथ ये सत्तासक्त सत्ता-बुभुक्षु फिर राष्ट्रवाद और देशभक्ती के नामपर भी आपको अलगाववादी, उग्रवादी बना रहे है ये। और आप बन भी रहे है, इन विकृत अभद्र भावनाओं को ही राष्ट्रवाद और देशभक्ती समझकर। जहाँ संविधान हमें समाज में वैज्ञानिक दृष्टिकोन बढ़ाने का कर्तव्य सौंपता है, वहाँ हम कहाँ धार्मिक बातों में और धार्मिक कर्मकांडों में उलझे हुए हैं?!

"मेरे भाइयों और बहनों, ऐसे धार्मिक राजनीति करनेवाले लोगों का और इनकी पार्टी का समर्थन करना मतलब देशभक्ती और जो इन्हें विरोध करें वह देशद्रोही ऐसा आपके मन में बिठाया जा रहा है, और ऐसा मानकर आप बेवकूफ बन भी रहे है। आप लोग राजनेताओं की जूठी बातों में आकर उन्हें ही अपना

a

दुश्मन मान और समझ बैठ रहे है, जो आपके अधिकारों और हक़ों की बातें करते है। धार्मिक राष्ट्रवाद की राजनीति करनेवाले इन राजनेताओं के बहकावें में आकर देशद्रोही तक करार कर देते हो इन आंदोलकारियों को। और उन्हें भी, जो इनके राजनैतिक विरोधी है।

"फिर आप आपके इन तथाकथित धर्मरक्षक राजनेताओं के विरोधियों से लड़ पड़ते है। वे विरोधी, जो सिर्फ राजनैतिक या वैचारिक विरोधी है, परंतु असल में भारत के नागरिक, यानी आपके ही अपने भाई बहन है।

"याद रखें, कि संविधान देश के राजनीतिक पक्षों को धर्म के आधार पर राजनीति करने के लिए सख्त पाबंदी लगाता है। यानी, कोई पक्ष धर्मपर आधारित न हो सकता है, न होना चाहिए। और जो राजनीतिक दल किसी भी धर्म के आधार पर राजनीति करते है, वे संविधान संगत नहीं हो सकते। तो हमारा यह भी कर्तव्य है, कि ऐसे पक्ष और दलों को हम अपना समर्थन ना दे, इन्हें बहिस्कृत करें, उखाड़ कर फेंक दे; फिर वे किसी भी धर्मपर आधारित राजनीति दल क्यों न हो।

"इन व धर्मांध राजनीतिक दलों का कुटिल खेल समझिए! यह आपके माध्यम से, आपका ही उपयोग करके आपके लोकतंत्र को नष्ट कर दे रहे है। आँखे और दिमाग खोल के देख तो जरा। संविधान में जिनकी रक्षा करने के लिए कहा गया, उन्ही सब को इन लोगों की तरफ से नष्ट और तहसनहस किया जा रहा है।

"धर्म के धर्मांध कुटिल खेल में आपको फँसाकर यह कुछ चुनिंदा लोग देश की अपनी अर्थव्यवस्था बर्बाद कर दे है, और आपको चित्र दिखाया जा

a

रहा है, कि देश प्रगति कर रहा है। आपकी ये लोग यह स्थिति करना चाहते है, की आप सिर्फ जीने भर को अपनी उपलब्धी समझों, इसलिए आपको उतना ही अनाज दिया जा रहा है, जितने से आपका पेट भर सके। ना कि आपको रोजगार दे रहे है, कि आप आत्मनिर्भर हो सके। आत्मनिर्भर तो सिर्फ इनका नारा है, वास्तव में ये लोग आपको इनपर निर्भर बनाकर आपको वैचारिक गुलाम बनाना चाहते है। यह देश और यह संविधान भ्रष्ट सत्ताधारियों की और इन लालची उद्योगपतियों की बपौती नहीं है, अगर किसी की है भी, तो आप लोगों की है!

"इसलिए हर नागरिक का कर्तव्य है, कि वह देश और संविधान की रक्षा करें, शासन का कर्तव्य है, कि जनता, जो इस देश की असली मालिक है, उनके हित और सुरक्षा के लिए कानून बनाए। जनता के हित एवं अधिकारों की रक्षा करने के लिए भी कानून बनाए, पॉलिसीज बनाए। उनको सेवाएं प्रदान करें, प्रशासन का कर्तव्य है, कि शासन द्वारा दि जानेवाली सेवाएं जनता तक पहुंचाए, हर एक नागरिक और सत्य की रक्षा करें। न्यायपालिका का कर्तव्य है, की जनता को समान अधिकार, समान न्याय मिले यह सुनिश्चित करना, और पत्रकारिता का कर्तव्य है, की सत्य बोले, जनता की आवाज, उनकी मांगे जनता के प्रतिनिधियों तक पहुंचाए और अगर प्रतिनिधि जनता की सेवा न करते हुए उनका शोषण करें, तो जनता के प्रतिनिधि बनकर सत्ता में बैठे प्रतिनिधियों को सवाल करें व उन्हें आईना दिखाए!

"और सत्ता में विराजमान लोग फिर भी न सुने, तो जनता का यह भी कर्तव्य है, उनके निचे से सत्ता की कुर्सी खिसका ले।

a

"मैं तो कहता हूँ, कि माननीय उच्च, सर्वोच्च न्यायालय एवं चुनाव आयोग का अब यह आदि कर्तव्य बनता हैं, कि इन लोगो को चूनाव लडने पर ही पाबंदी लगाएं।

"मैंने दिखाए तथ्यों के आधार पर आपने अभी देखा भी, कि कैसे आनेवाला चुनाव जीतने के लिए जनहित पार्टी एवं एकसंध भारत संघटनाने जनता को, देश को, संविधान को, लोकतंत्र को एवं इन सब का एकत्रित प्रतीक जो संसद भवन है, उसे घोर खतरे में डालनेवाली भयावह साज़िश रची, जो आज आपके सामने खुल चुकी है।

"इनकी योजना अनुसार वे आगामी चुनाव जीतकर वापिस सत्ता में आना चाहते है और ऐसा हुआ, तो फिर जनता को निचोड़ने का काम होगा। जनता का शोषण ना हो यह देखना अब न्यायपालिका का प्रथम कर्तव्य है।

"मेरे देशवासियों, मी भाइयों और बहनों, हम सब अपने अपने कर्तव्य अगर ढंग से निभाए, तो देश में शांति और खुशहाली अपने आप निर्माण हो जाएगी, तभी देश बिना किसी रुकावट से उन्नति और प्रगति कर पाएगा। और इसकी शुरवात होगी, आनेवाले लोकसभा चुनाव में आपके एक वोट से।

"बोलते बोलते एक बात याद आई, यह संविधान आप नागरिकों के हाथों में असीमित सत्ता देता है, इतनी बड़ी शक्ती प्रदान करता है, पर आज कुछ लोग इसी संविधान को बुराभला कहते है। दुख की बात है, की इसमें कई उच्च शिक्षित नागरिक भी है। उन्हें संविधान समझ लेना चाहिए एक बार। कुछ तो संविधान को तारतार करना चाहते है, और सत्ता में बैठे लोग भी तो उसी फिराक में है। इसको साधने के लिए यह लोग राष्ट्रीय एकात्मता और संवैधानिक

संस्थाओं को पहले नष्ट कर दे रहे है। इसलिए तो इन्हें भारी मात्रा में विजय प्राप्त करनी है, ताकि ये संविधान को ही हटा सके। तो अब भारत के सच्चे नागरिक होने के नाते हमारा यह प्रथम कर्तव्य है, कि ऐसा न होने दे।" एवढं बोलूं शक्ती काही क्षण थांबला.

आणि त्याने शेवटचा व्हिडीओ लावायला वैष्णवीला क्यू दिला. तिला माहीत नव्हतं त्या व्हिडिओत काय आहे. पण तो महत्त्वाचा जाणून तिने ऑपरेटरला तशी सूचना दिली. आणि...

दुसऱ्याच क्षणी जिज्ञासाला गोळी घालून जीवे मारलेला व्हिडीओ स्क्रिनवर दिसू लागला होता... हा व्हिडीओ मिळवणे हे शक्ती आणि राजनची कारागिरी होती. कुलीनचा पॅड हॅक केला होताच राजनने, त्यातूनही तो व्हिडीओ कॉल मिळाला होता, ज्यात त्याच्या मारेकऱ्याने जिज्ञासाला डोक्यात गोळी मारली होती.

अचानक अनपेक्षित समोर आलेला तो व्हिडीओ पाहून वैष्णवीला रडू कोसळलं, लाईव्ह चालू असल्याने ती मूकपणेच रडत होती... दोन्ही डोळयांचे अश्रू थांबत नव्हते तिचे...

"अपने देश के लिए, सत्य के लिए मेरी एकलौती सबसे प्रिय व्यक्ती मुझे खोनी पड़ी, जिसे मैं जान से भी ज्यादा, बेइंतिहा प्यार करता था और वह भी मुझसे जान से ज्यादा चाहती थी। उसका नाम, जिज्ञासा था..." शक्तीने दाटलेला आवंढा गिळला, त्याचे नेत्र बगावत करून अविरत बरसू लागले होते, त्याच्या पापण्या लवणंही थांबलं होतं...

काही काळ घेत स्वतःला सावरून जड अंतःकरण व जडावलेल्या आवाजाने तो बोलू लागला,

"देश ही के लिए और आपके सुरक्षा के लिए किसी खेद भावना के बिना वह मौत को गले लगा गई। वह मुझ से कही दूर होने के कारण मैं भी जिज्ञासा को बचा न सका। उसी वक्त भी जिज्ञासा आपही की सुरक्षा के बारे में सोच रही थी, अपने देखा। आपने यह भी देखा और सुना, कि मुझें भी मारने की कोशिश हुई। पर मैं आपके सामने यह सत्य लाना चाहता था, इसलिए मैंने खुद को बचा लिया। वरना जिज्ञासा बिना जीना मुझे बिल्कुल ही गवारा नहीं।

"बैरहाल मैं यह हरगिज़ नहीं कहूँगा, कि हम दोनों ने आपके लिए बहुत बड़ा त्याग किया है। पर इतना जरूर कहूँगा, कि इतना सब सहन करने के बाद, फिर भी मैं खड़ा रहा, डटा रहा, लड़ता रहा, और आगे भी लड़ता रहूँगा, आपके लिए। इस देश की सुरक्षा और अखंडता के लिए। मैं शिकायत नहीं करूँगा, सिर्फ इतना पूछूंगा, कि इस देश की अखंडता को बनाए ना रखने के लिए, एकजुट ना रहने के लिए, उसे बांधे ना रखने के लिए, इन स्वार्थी और घातकी लोगों से देश की रक्षा करने हेतु ना लड़ने के लिए आपके पास क्या कारण है?!" शक्तीने जाब विचारावा तसा प्रश्न केला.

"ये सत्ता के इच्छुक लोग भ्रष्टाचार करके हमें और हमारे देश को नुकसान पहुंचाते हैं; हमारे बीच अफवाह पैदा करके हममें दरार डालके एक दूसरे को लड़ाते है; क्या ये लोग कभी हमारी हित की करेंगे?! मुझे तो उत्तर 'नहीं' ही मिलता है!" शक्ती पुढे बोलत राहिला,

"महाभारत में बताया गया है, की कैसे गृहयुद्ध के कारण हस्तिनापुर नष्ट हो गया, कृष्ण का यादव वंश भी गृहयुद्ध में समाप्त हो गया, इससे हम कुछ सीखते क्यों नहीं? क्यों हम अपनी जूठी आस्था, उच-नीचता को लेकर लड़

a

झगड़ते है, और अंत में एकदूसरे को मारकर खुद भी समाप्त हो जाते है? हम एक देश में रहते है, देश संस्कृति से बनता है, हम जंगल में नहीं रहते, की एक नस्ल को जीते रहने के लिए दूसरी नस्ल बर्बाद व नष्ट कर दी जाए। संस्कृति अपने साथ ले आती है, सभ्यता, और यहीं सभ्यता हमें जानवरों से अलग बनाती हैं। इस सभ्यतापूर्ण संस्कृति में, गाँव में, देश में आपसी कड़वाहट के बिना सब मिलजुलकर एकसाथ रह सकते है, और हम रह भी रहे थे। अचानक क्या हो गया है? कुछ राजनीतिक पार्टियाँ भड़कती है, और आप पागल से हो जाते है? कहाँ गया हमारा विवेक, कहा गयी हमारी सहिष्णुता? कहा गई हमारी एकता, वह गंगा-जमनी तहजीब?

"जो देश अहिंसा के गीत गाता था, आज वही देश हिंसा के नारों की चीखें निकाल रहा है, और अपने ही देशवासी भाइयों को ही मार रहा है?!" शक्ती काही आठवल्याने थांबला व ती गोष्ट संगण्यास त्याने आरंभ केला,

"यहाँ एक लोककथा आद आई वह सुनना चाहूँगा, जो महाभारत युद्ध के बाद कि है। जब युदिष्ठिर स्वर्ग पहुँचे, तो वहाँ सुयोधन सहित सभी कौरव उनके स्वागत के लिए खड़े थे। युदिष्ठिर चिढ़ गए, उन्होंने पूछा, कि 'भीम, अर्जुन, सहदेव, नकुल, द्रौपदी कहा है?' धर्मराज यम ने उत्तर दिया, 'नरक में।' तो युदिष्ठिर और क्रोधित हो उठे। कहने लगे, 'यह कैसा न्याय है, की जो अधर्मी थे उन्हें स्वर्ग में स्थान और जो जीवनभर धर्म के लिए लड़े वह नरक की यातनाएं भोग रहे है?' उसपर धर्मराज यमने उत्तर दिया, कि 'कौरव अपना कर्मकर्तव्य करते हुए युद्धभूमि में मृत्यु को प्राप्त हुए है, इसलिए वे स्वर्ग के भागी होते है, और आप पांडव हमेशा इसी दंभ में रहे, कि 'हम ही धर्म की रक्षा कर रहे है, यह अहंकार ही उनके नरक का कारण बना है, और अब आप भी नरक के लिए प्रस्थान करें, क्योंकि आपने

a

इन्हें मारने के बाद भी और खुद की मृत्यु हो जाने के उपरांत भी इन्हें क्षमा नहीं किया।'

"यही है भारतीय संस्कृति; जो प्रेम, दया, क्षमा, करुणा, उदारता, सौहार्दभाव, पर आधारित है। यह भावनाएं आती है, सहिष्णुता व अहिंसा के भाव से, जो अंत्तः में शांति प्रस्थापित करती है। संस्कृति के नाम पर हर वक्त लड़ाई करनेवालों, मैं आप से पूछता हूँ, कि कहा गई हमारी असल सहिष्णु संस्कृति?!" शक्ती सात्त्विक संताप व्यक्त करत जाब विचारत गरजला व मग स्वतःस शांत करून बोलू लागला,

"हालांकि संविधान हम लोगों को हमें जो चाहे उस धर्म का पालन करने की आजादी देता है, परंतु भारत देश का ऐसा अपना कोई धर्म नहीं। भारत और भारत का संविधान धर्मनिरपेक्ष है। और इसलिए, कोई धर्म बचाना और किसी धर्म के लिए लड़ना यह भारत की समस्या नहीं है, भारत की समस्या है; बेरोजगारी, उत्तम शिक्षा न मिल पाना, उत्तम स्वास्थ्य सुविधा न मिलना, महंगाई, गरीबी, भुखमरी, भ्रष्टाचार, किसानों की समस्याएं, महिलाओं की दयनीय अवस्था, पर्यावरण की बेशुमार लूट और उसकी की जानेवाली बर्बादी, और ऐसी अनगिनत कई समस्याएं है, पर यह आप लोगों को दिखाई क्यो नहीं देती?

"क्या धर्म के पीछे आप इतने अंधे हो गए है, कि आप को जीने के लिए जो बेसिक मांगे है, वह भी आपकी पूरी नहीं हो रही, फिर भी आपको चल रहा है? क्यों, तो दुश्मन समझे जानेवाला देश और यहाँ के परधर्मीयों की बुरी हालत होती देख आप का मन संतोष और गर्व से भर रहा है! कैसी यह आसुरी प्रवृत्ति है? हम ऐसे तो नही थे। और यह भी प्रश्न आपके मन में उठना चाहिए, कि दुश्मन देश की बुरी हालत और यहाँ के दूसरे धर्म के लोगों की प्रताड़ना से आपका पेट भर रहा है क्या? क्या ऐसा करके आपकी थाली में अन्न आ रहा है?

a

"यह भी देखने मिलता है, कि विशिष्ट धर्म के लोग कोई ख्रिश्चन धर्म स्वीकारें, तो जिस धर्म से वे परिवर्तित हुए है, उस धर्म के लोग उन्हें राईस बैग करके चिढ़ाते है। कोई मुस्लिम हुआ तो उसका भी अपमान और अवहेलना करते है। पर यह बहुसंख्यक धर्म के लोग इसपर विचार नहीं करते, कि क्यों उन लोगों को धर्म परिवर्तन करने की इच्छा हुई। अपने धर्म का प्रचार करने का अधिकार सबको है, धर्म परिवर्तन करने के लिए कोई जबदस्ती लेकिन नहीं कर सकता। ऐसा कोई कर रहा है, तो वह बिल्कुल ही गुनाह है, पर इसकी जांच तो हो। पहले ही आप उन्हें दोषी ठहराकर बैठ जाते हो। और अगर किसीके जबरदस्ती किए बिना फिर भी लोग अपने मन से अगर दूसरे धर्म में जा भी रहे है, तो गलती किस की है, इसपर तो विचार करो।

"और एक बात हम हमेशा चिल्लाते रहते हैं, मुस्लिम बहुल देश वहाँ के अल्पसंख्यकों और हिंदुओं पर अत्याचार करते हैं, लेकिन साथ ही हम यहाँ उससे अलग और क्या कर रहे हैं? वहीं सब ना?! अगर वे लोग वहाँ के अल्पसंख्यकों के साथ जो अन्याय व अत्याचार कर रहे है, वह गलत है, तो आप यहाँ के अल्पसंख्यकों के साथ वहीं सब करें तो वह सब सही कैसे हो जाता है? हम भी यहाँ के मायनॉरिटीज के अधिकार नकारें, उन्हें मारे-पिटे, अपमानित करें, उनका नागरिकत्व भी नकारे, और यहाँ तक कि धर्म के नाम पर उन्हें जान से भी मार डाले; तो उन देशों में, जो वहाँ के मायनॉरिटीज पर अत्याचार करते है, उनमें और हममें क्या अंतर रह जाता हैं? यदि आप बदला लेने के लिए ऐसा कर रहे हैं यह आपका इसपर तर्क है, तो यहाँ अपने ही भाइयों को मारने से उन देशों को क्या ही फर्क पड़नेवाला है? यह बात हमारे दिमाग में क्यों नहीं आती?

a

"चलो हम मान भी लेते है, कि कुछ का दिमाग बिगड़ गया है, क्योंकि इस सत्य को भी नकारा नहीं जा सकता, तो भी कुछ मुट्ठीभर भटके लोगों का दोष संपूर्ण धर्म-समुदाय पर कैसे डाला जा सकता है? दो-चार, बिस-पच्चीस, कुछ सेकडों, या चलो कुछ हजार पकड़ लेते है, कि जो देश विघातक कार्यों में लगे है, या आतंकी संगठनों से मिले हुए है, फिर भी तो क्या उन लोगों के गुनाहों के लिए, क्या उनके पूरे धर्म-समाज को दोषी ठहराना क्या उचित है?

"हम उन्हें कष्ट देंगे, प्रताड़ित करेंगे, मारेंगे, और उसके लिए उन्होंने अगर बगावत कर दी, या उनकी तरफ से हल्का सा प्रतिकार भी कर दिया गया, तो हम उसके लिए वापिस उन्हीं को दोषी ठहराते है? और यदि यही बर्ताव बाहर हमारे धर्म भाइयों के साथ अन्य धर्म के लोग करें तो मात्र वह गलत। तब हमारी जान जलती। हम रुदन करते है, कि देखो वे लोग हमारे लोगों के साथ कैसा जानवरों जैसा, अमानवीय व्यवहार करते है, कैसे वे हमारे धर्मबंधुओं पर अन्याय करते है, नहीं? पर क्या कभी हम, कभी भी अपने गिरेबाँ में झाकेंगे, की नहीं?

"और फिर, जब किसी को भी कोई भी धर्म अपने इच्छा अनुसार स्वीकारने का या निधर्मी रहने का भी अधिकार जब यही संविधान देता है, तो क्या इन लोगों को अपमानित कर आप इस संविधान का ही अपमान नहीं करते?! जरा तो सोचो! मेरे भाइयों।

"ऐसा बर्ताव करके अपने महापुरुषों और स्वतंत्रता सेनानीओं के कष्ट, त्याग कृपया पानी में मत बहाओ। अपने इन महान पुरखों ने अपने खून ने सिंचे इस देश को बर्बाद अपनेही हाथों से खुद ही मत करो, और किसी को तहसनहस भी मत करने दो। हमेशा यह याद रखना है हमें, कि कोई अमर नहीं है इस दुनिया

a

में, तो किस जूठी गरिमा, जूठे अस्तित्व, किस जूठे धर्म और जूठे संस्कृति को, जो हमारे ही कल्पना से उपजी, जन्मी है, को बचाने की जूठी लड़ाई हम लड़ रहे है?! क्या यह मूर्खता नहीं है?!

"इसलिए, मेरी सबसे गुज़ारिश है, कि सभी एकदूसरे से प्रेम से रहिए, एकदुसरे का आदर सम्मान करते हुए भाईचारे से, बंधुभाव से रहिए। यही हमारी ताक़द है, यही हमारे देश की ताक़द है। हमारी एकजुटही हमारी शक्ति है, इसलिए यह सत्ता और ताक़द के भूखे लोग हमें तोड़ना चाहते है, अलग करना चाहते है। और उनकी यह मंशा पूरी हो, इसलिए जूठा इतिहास, जूठी कहानियाँ फैलाकर आपको इन प्रपोगेंडाज फसाकर आपको अलगाववादी, उग्रवादी, कट्टर एवं फ़सादी बनाया जाता है।

"यह सोचने की बात है, कि चार-पाँच सौ सालों पहले, हजार साल पहले किसी धर्मविशेष ने अन्याय किया हो, तो उसका दोष आज के नागरिकों पर कैसे आ जाता है? क्या अगर आपके परदादा ने लिसी का कत्ल किया हो और उसके लिए आपको फाँसी दी जाए तो क्या आप इसे न्यायसंगत और वाजिब मानेंगे?! नहीं ना? तो कभी किसीने आप के पुरखों पर आक्रमण किये, आपके पुरखों पर अन्याय किए, इसकी सजा आप आज उनके अभी के धर्मबंधुओं को देंगे? क्या यह न्याय्य है? उत्तर मिलता है, 'बिल्कुल नहीं!'

"और ऐसे भी तो सोचो, कि भले उनका धर्म अलग हो, पर ये है, तो यहाँ के मूलनिवासी, तो ये अंत में हुए अपने भाई बंधुही ना?! ये लोग आक्रमणकारियों के साथ कहीं बाहर से नहीं आए। मतलब तुम्हारे अपने भाई, सिर्फ उन्होंने अपना धर्म बदल लिया किसी कारण वश कुछ साल, कुछ पीढ़ी

a

पहले, तो वे पराए हो गए? यह तो कोई अक्ल बात नहीं हुई। हम तो बाहर से आनेवालों को भी अपने देश में समाहित करने की बात करते है, तो जो मूलतः यहाँ के है, उनपर अन्याय क्यों करते हो भाई? क्यों करते हो इतनी घृणा अपनेही देश बांधवोंसे? कहाँ से आती है इतनी नफरत? यह नफरत और भेदभाव आप में भर दिया जाता है, भगवान के नाम पर, धर्म और जाति के नाम पर; कभी इसकी शुरवात परिवार के अंदर से होती है, तो कही राजनैतिक दलों से। ऐसे दल, जो आप में फूट और भेद डालकर आपपर राज करना चाहते है।

"क्योंकि यह लोग डरते है, कि अगर हम सब एक रहे, प्रेम और सद्भावना से रहें, तो हमें नफरत की जरूरत नहीं पड़ेगी और इस वजह से फिर हमे 'इनकी' जरूर नहीं पड़ेगी। इनकी सत्ता चली जाएगी, इनकी ताक़द, जो सत्ता और पैसों में निहित है, इनसे छीन जाएगी, तो ये नष्ट हो जाएंगे, इनका अस्तित्व खत्म हो जाएगा। और ये खत्म होना नहीं चाहते, इसलिए दंगा भड़काकर, द्वेष, घृणा, नफरत फैलाकर हमें हमेशा एकदूसरे के खिलाफ खड़े करते है। हमे आपस में लड़ाते है और इसीमें हमें व्यस्त रखते हैं।

"आँखें खोल के देखो तो नजर आएगा, कि इनके द्वारा लोकतांत्रिक संस्थाओं को और खुद लोकतंत्र को ही खत्म किया जा रहा है। लोकतांत्रिक संस्थाओं के उच्चपदों पर आपने समविचारी आदमी बिठाए है इन्होंने। और साथ ही सत्ता में बैठे यह लोग राजनीतिक विरोधियों को भी जेल में ड़ालकर, या खरीदकर नष्ट कर रहे है, ताकि ये लोग आपके हाथों से सत्ता छीन सके!

"विपक्ष सिर्फ राजसत्ता में बैठे पक्ष का विरोधी नहीं होता, सदन में वह आपकी आवाज होता है, इनको खत्म करके सत्ता पक्ष सिर्फ अपने विरोधी नष्ट

a

नहीं कर रहे, ये नष्ट कर रहे है, आपकी आवाज को; जो फिर कभी आपकी तरफ से इनके खिलाफ ना उठ सके।

"संचार माध्यम, जो सत्ता को आपकी तरफ से सवाल करता है, उन्हें भी खरीदकर और जो ना बिके उन्हें डराकर जेब में किया गया है। और इस तरह यह जो, संचार माध्यम है, जो आपकी आवाज है, इन्हें इस्तेमाल किया जा रहा है, आपही के खिलाफ! इन्ही के माध्यम से फिर आपको जुठ परोसा जा रहा है। और सत्तापक्ष इन्ही संचार माध्यमों का उपयोग करके फिर खुद की प्रतिमा आपके नजरों में बड़ी करने लगा है। कृपया मेरा अनुरोध है जनता से, कि इन सबसे परे असल सत्य को देखें; कि किस तरह आपकी आवाज को दबाया जा रहा है। यह लोग ही आपकी तरफ से सत्ता पर अंकुश रखते है, अगर यहीं नष्ट हो गए, तो आपकी आवाज हमेशा के लिए खत्म हो जाएगी। ना आप कुछ कह सकेंगे और आपने तब भी सत्य बोलने का प्रयास भी किया, तो ना आपकी सुनी जाएगी। आपको भी फिर नष्ट किया जाएगा। इसकी शुरुआत भी हो चुकी है, किसानों की हालत देखो, सामाजिक कार्यकर्ताओं की हालत देखो, देखो उन लोगोंके साथ क्या हो रहा है, जो आपके हक के लिए, आपकी पर्यावरणीय संपत्ति बचाने के लिए आंदोलन कर रहे है, लड़ रहे है। अब आप उनके साथ खड़े नहीं रहे, और ये लोग सत्ता द्वारा मिटाए गए, तो जब आपको जरूरत होगी, तब आपकी तरफ से बोलनेवाला तब कोई नहीं होगा। इसलिए अब हमें तय करना है, कि क्या हम यह होने देंगे? क्या हम एकदूसरे से लड़कर मर जाए और इनको इसका फायदा पहुंचाए, या एक होकर अपनी उन्नति का मार्ग प्रशस्त करें!

a

"मैं आपसे दिलों जान से यह गुज़ारिश करता हूँ, कि कृपया किसीं भी धर्म विशेष को माननेवाली पॉलिटिकल पार्टी के खोखले और झुठे धर्मवाद और राष्ट्रवाद के जाल में मत फसिए! वे कभी आपके हित और भले का नहीं करेंगे। इनके फैलाए नफरत और भेदभाव की भावना में बहकर नष्ट मत करिए अपनी ही यह धीरोदात्त व सर्वश्रेष्ठ धरोहर अपनेही हाथों से।

"कुछ नहीं पड़ी तुम्हारे धर्म की इन्हें! इन्हें सिर्फ सत्ता चाहिए, ताकि ये भ्रष्टाचार कर सके। क्योंकि फिर देश की, आपकी सभी प्रकार की साधन संपत्ति, उद्योग किन्हीं गिनती के बड़े उद्योगपतियों के स्वाधीन की जा सके। और उनमें से नवीन निर्माण हुई संपत्ति भी इन्ही के और अपने जेब में डाली जा सके। कृपया ध्यान दे; कि यह मैं हर धर्म के लोगों को कह रहा हूँ, किसी एक के नहीं!

"अब तुम्हे तय करना है, की तुम्हे तानाशाही, किसी का अधिनायकत्व अपने ऊपर चाहिए, जो तुमसे सत्ता छीन कर तुम्हे, इस देश के असली मालिकों को गुलाम बनाए, याकि लोकतंत्र और संविधान, जो तुम्हे सत्ता का केंद्र बनाते है, सारी सत्ता और ताक़द आप में फैलाते है।

"ध्यान दीजिए, कि यह संविधान उसके भी हक़ों और अधिकारों की रक्षा करता है, जो संविधान पर यकीन नहीं करता। और इसलिए इस संविधान को बचाने की जरूर है, ताकि आपकी, जनता की सत्ता बची रहे, आपके अधिकार बचे रहे। इसलिए इस संविधान को बचाने के लिए लड़ो। संविधान बचाओ। यहीं वक्त है।" शक्तीने एक दीर्घ श्वास भरला व तो पुढे म्हणाला,

"यह समझ लीजिए दोस्तों, हमारे देश में प्रेसिडेंशियल डिमॉक्रेसी यानी राष्ट्रपति लोकतांत्रिक प्रणाली नहीं है, बल्कि पार्लियामेंट्री डिमॉक्रेसी यानी

a

संसदीय लोकतांत्रिक प्रणाली है। हम सीधे राष्ट्रपति या प्रधानमंत्री नहीं चुनते, हम सांसद चुनते है, और वे सांसद संसद भवन में जाकर हमारी तरफ से प्रधानमंत्री का चयन करते है, ये सब लोक हमारे प्रतिनिधि है। पुनः कहता हूँ, यह हमारे लिए काम करते है। यह हमारे राजा नहीं है। ना हो सकते है, जबतक संविधान है!

"और इसलिए हमें इस संविधान की रक्षा करनी है, ताकि हम हमारी सत्ता का, हमारे हितों का, अधिकारों का और कर्तव्यों का भी हम ही संरक्षण कर सके।

"मैं यहा कहना चाहता हूँ, कि किसी प्रधानमंत्री का चेहरा देखकर मतदान मत करो। आप यह देखो, कि आपकी चुनावी क्षेत्र में जो उम्मीदवार खड़े हैं, उनमें कौन शिक्षित है, कौन भ्रष्ट नहीं है, कौन ईमानदार है, कौन वफ़ादार है, कौन सदाचारी है, कौन तुम्हारे काम कर सकता है, कौन तुम्हारी सुनेगा, कौन धर्म और जाति से ऊपर उठकर सबको साथ लेकर चलेगा, सब की किसी भी प्रकार की मदद करेगा, कौन शिक्षित और पढ़ा-लिखा है, और क्या उसे संविधान का ज्ञान है, और क्या वह संविधान पर अमल करता है, यह सब देखकर ही उसे चुनें।

"यह अच्छी तरह से समझ लीजिए, कि प्रधानमंत्री चुनना हमारा काम नहीं है, सांसद चुनना हमारा काम है। तो योग्य उम्मीदवार को चुनो और उसे सदन में भेजो, वह आपकी ओर से आपके लिए प्रधानमंत्री चुन लेगा। और जब आप योग्य उमीदवार चुनकर सदन में भेजोगे, तो वह भी योग्य उम्मीदवार को ही प्रधानमंत्री बनाने के लिए वोट डालेगा।

"इसी तरह, जब विधान सभा चुनाव हो तो सही विधायक चुनें, वही विधान सभा सदन में जाकर आपके लिए मुख्यमंत्री चुनेगा। हम तो ये गलती करते है, कि ग्राम पंचायत चुनाव में भी हम प्रधानमंत्री का चेहरा और उसकी पार्टी को देखकर वोट कर रहे हैं। कृपया ध्यान में रखे, कि किसी भी चुनाव में अपने निर्वाचन क्षेत्र में खड़े उम्मीदवारों में से सर्वश्रेष्ठ उम्मीदवार को अपने प्रतिनिधि के रूप में चुनें।

"इस तरफ आप इस देश की, इस संविधान की और इसने दिए अधिकारों और कर्तव्यों की रक्षा कर सकेंगे। और फिर, इतना करने भर से ही हमारा काम खत्म नहीं होता, बल्कि यहाँ से हमारा काम असल में सुरु होता है, क्योंकि चुनाव के बाद सदन और कुर्सी में बैठे लोग आपके लिए काम करते है, के नहीं यह देखना आपका कर्तव्य है, और वे ऐसा ना करे तो उन्हें सवाल करने की जिम्मेदारी भी आपही की है। उनपर जनता के हितों के लिए विधायक काम करने के लिए दबाव डालने का और सत्य के आग्रही रहकर वे आपकी सेवा करें, वे भ्रष्टाचार से दूर रहे इसके लिए सत्ताधारियों पर दबाव बनाए रखने का काम भी आपका है।" शक्ती नागरिकशास्त्र थोडक्यात समजावण्याचा यत्न करत होता, तो पुढे म्हणाला,

"मैं फिर एक बार कहता हूँ, मेरा यह सब प्रपंच खुद को बेगुनाह साबित करने के लिए नहीं था, या यह दिखलाने के लिए कि मैंने और मेरी प्रेमिका जिज्ञासा ने आप के लिए बहुत बड़ा त्याग किया है, या आपपर कोई उपकार किए है, बल्कि आप तक सत्यता पहुँचना, बस इतकासा मक़सद था मेरा!" अंतिम तो निर्वाणीचं बोलला,

a

"सो मैंने किया। एकबार फिर मैं आपसे कहता हूँ, किसी धर्म, जाती, वर्ण, भाषा, प्रांत, लिंग इत्यादि इन सब जूठी अस्मिताओं से ऊपर उठो और एक सच्चा मानव बनों। किसी का भक्त बनना ही है, तो देश का भक्त बनो, और फिर बाद में देशभक्ति से भी ऊपर उठकर मानवता के भक्त बनो। अगर आप धर्म के बिना रह ही नहीं सकते, तो मानवता को अपना धर्म बना लो। मानवता के पालनकर्ता बनो; वह मानवता; जो सहिष्णुता, बंधुता, समता, उदारता, सौहार्दभाव, एकात्मता, सत्य, वैश्विक प्रेम, अहिंसा और शांति की प्रतिनिधि एवं पुरस्कर्ता है।

"अंत में मैं आपसे इतनी ही अपील करूँगा, जाग जाइए! कुछ भी बनने से पहले 'भारत के नागरिक' बनें। कृपया मतदान करते समय और बाद में भी पुरे पाँच साल अपने विवेक से काम लें। धन्यवाद!" एवढं बोलून शक्ती जागचा उठला.

# ३३. पुनरुत्थान...

वैष्णवीने जे काही केलं, त्यासाठी तिचे अनंत उपकार मानून शक्ती सत्यवेधीच्या स्टुडिओ मधून बाहेर पडला.

वैष्णवीला शक्तीसमोर काय बोलावे हेच सुचत नव्हते. जिज्ञासाचा मृत्यू तिच्यासाठी मोठा धक्का होताच, पण हे अभाळाएव्हढं दुःख अंतरी साठून देखील, तरी शक्ती जनतेचे रक्षण करण्याच्या त्याच्या कर्तव्यापासून हटला नव्हता हे पाहून ती शक्तीविषयी अपरिमित कृतज्ञभावाने भरली होती. ती उच्चकोटीची भावना तिच्या डोळ्यांत आसवांच्या रूपात दाटली होती...

●●●

युरेनियम कंटेनरर्सची ब्रिफकेस आणि संविधान असलेले ब्रिफकेस घेऊन शक्ती सत्यवेधीच्या ऑफिस मधून खाली उतरत असताना एसपी त्याच्या समोर आला. त्याने एक लेटर त्याच्यासमोर धरलं.

"तुझं सस्पेन्शन कॅन्सल केलं आहे." एसपी त्याला म्हणाला.

"आपल्याला आणखी एक सस्पेन्शन लेटर तयार ठेवावं लागेल सर. कारण या दरम्यान नाही म्हंटलं तरी काही इल्लीगल कारवाया मला कराव्या लागल्या. आय वॉन्ट प्रॉपर प्रोबेशन अगेस्ट मी फॉर दॅट! माझ्यावर योग्य ती कारवाई व्हावी अशी मी मागणी करतो." शक्ती निश्चयी म्हणाला.

"तुझी इच्छा पूर्ण होईल शक्ती. आणि आम्हाला सुद्धा प्रायश्चित्त हे घ्यावंच लागेल. पण आत्ता तुला जे सत्याचं आणि न्यायाचं काम करायचं आहे, त्यासाठी हे पत्र महत्त्वाचं आहे!" एसपी लेटर शक्ती समक्ष करत,

"फॉर् नाऊ यू आर् फ्री टू डू दि राईट, दि जस्ट!" तो त्याला म्हणाला.

आणि शक्तीची नजर एकदम तीक्ष्ण कठोर झाली.

◆◆◆

एव्हाना कोल्हापूर पोलीस फोर्सने सत्यजित जैसवालच्या फार्म हाऊसला घेराव घातला होता. पंतप्रधान, गृहमंत्री आणि सत्यजित हे कुठेही पलायन करून नयेत म्हणून आधीच सदर दक्षता घेण्यात आली होती.

पंतप्रधान, गृहमंत्री व सत्यजित असलेल्या खोलीत शक्ती प्रवेशला. त्याने जिज्ञासाला अंतिम क्षणी त्याला प्रेमाने दिलेला नेव्ही ब्लू थ्री पीस सूट घातला होता. जिज्ञासानेच काळजीने दिलेल्या शोल्डर स्ट्रॅपमध्ये त्याने आपल्या हाताला आराम दिला होता. शक्तीच्या मागून एटियुचे ऑफिसर्स होते.

"देशद्रोह, दहशतवाद भ्रष्टाचार, जनतेत भेदभाव निर्माण करून देशात अशांतता पसरवणे, देशातील सौहार्द नष्ट करणे, देशाला धोका निर्माण होईल असे षडयंत्र रचणे अशा आरोपांखाली मी तुम्हाला अटक करतोय!" शक्ती म्हणाला. पंतप्रधान व गृहमंत्री यांना त्यांचे आरोप कळवून तो जाण्यास वळला, काही विचार येऊन त्याची मान आज वळली,

"आणि सत्यवेधीचं चॅनेल ब्लॅक आऊट केलं त्यासाठी, धन्यवाद! त्यामुळं मी माझं म्हणणं संपूर्ण देशासमोर आणि जगासमोर मांडू शकलो!" शक्ती त्यांना उद्देशून म्हणाला.

a

पंतप्रधान कुलीन मग्रूरीत हुंकारला. नजर एकदम तीक्ष्ण करडी करून तो शक्तीला बघत होता.

"तुम्हे सच में लगता है, की यह सब करके तुम हमें हरा सकते हो? हम जेल में रहकर भी चुनाव लड़ सकते, है जब तक हमारे ऊपर आरोप सिद्ध न हो जाए! और हमे सजा ना सुनाई जाए।

"तुम्हें लगता है, यह सारी संस्थाऐं जहाँ हमारे ही छद्मी बैठे है, तब हमें सजा भी हो पाएगी? और हिंदुस्तान की आवाम, तुम कितना भी सच चिल्ला चिल्ला के उन्हें बताओ, वह हमारी भक्ति में इतने लीन है, कि जो हम कहेंगे, वही वे मानेंगे!" पंतप्रधान कुलीन शर्मा गुर्मीत अभिमानी बोलला. एक गर्वाने भरलेलं विकट स्मितहास्य त्याच्या चेहऱ्यावर होतं.

शक्ती वळला नाही, त्याने फक्त मान तिरकी केली.

"मुझे इस देश की जनता पर, उनके विवेक वर विश्वास है। और भले मैं हार जाऊ, मुझे इस बात का संतोष होगा, की मैंने कमसकम कोशिश तो की!" शक्ती ठाम म्हणाला.

आणि तो पुढे चालला, त्याच्या मागून एटीयु ऑफिसर्स मार्फत कुलीन, मधुकांत आणि सत्यजितला अटक करून नेले गेले.

"अगर जनता का बड़ा हिस्सा हमसे दूर हो जाए और उनके रोष और दबाव की वजह से हमें सजा हो भी जाए, तो भी सजा पूरी करने के छह साल बाद हम वापस से चुनाव लड़ सकते है। तब क्या होगा ऑफिसर?!

"और अगर आवाम हमें नकार भी दे ना, तो भी हम या हमारा संगठन हमारी कठपुतली वहाँ बिठाकर पर्दे के पीछे से हमें चाहिए वैसी सरकार चला

सकते है। इसलिए इस गलतफहमी में मत रहो, कि तुमने हमें हरा दिया है।" पंतप्रधान कुलीन शर्मा विखार ओकतच होता.

शक्तिसोबत आलेल्या ऑफिसर्सच्या घोळक्यातून चालता चालता छद्मी हसत पंतप्रधान कुलीन शर्मा शक्तिसेन नाईकला आव्हान देत होता. ते आव्हान शिरी धरायला शक्ती अगदीच तयार होता,

"अगर ऐसा है, तो हर बार मुझे अपने रास्ते में खड़ा पाओगे।" शक्तीनेही कुलीनच्या पुढे चालता चालताच त्याला सुनावले.

◆◆◆

शक्तीच्या त्या ब्रॉडकास्टचा सकारात्मक परिणाम झाला होता, इथं अटकी झाल्यानंतर त्याच सोबत भारतात वेगवेगळ्या ठिकाणी वेगवेगळ्या तपास यंत्रणांमार्फत स्पेशल आयजी, जनक अध्वर्यू, एकसंध भारतचे अध्यक्ष मनोहर कौशिक अशांना अटक केली गेली होती... मनोहर कर्णिक, कुलीन शर्मा, मधुकांत गोस्वामी यांनी रचलेल्या षडयंत्राला आकार देण्यासाठी निवडलेल्या गेलेल्या माणिक त्यागी आणि तरुण कर्णिक यास देखील आत घेतले गेले.

करवाई तर होत होती खरी, परंतु ती विवेक आल्याने व सत्याची चाड आल्याने होती, की ग्लोबल प्रेशरमुळे; हे कळण्यापलिकडे होते खरे...

◆◆◆

शक्तीला त्याचं सस्पेंशन कॅन्सल झाल्याचं लेटर देताच एसपीने सर्व प्रथम तिथेच सत्यवेधीचा संपादक बिपीन पुरोहितला कब्जात घेतलं होतं, महेश सोबतच्या त्याच्या सभाषणामुळे बिपीनवर आभाळ कोसळलं होतं. नंतर

a

बऱ्याच गोष्टी बाहेर पडल्या, ज्याचा उल्लेख शक्तीने बिपीनसमोर केला होता, आणि मग त्या खुलाशांच्या हवाल्याने सत्यावेधीचा मुख्य मालक प्रखर दीक्षित याला पकडण्याचे आदेश देखील सुप्रीटेंडेंट किशोर निंबाळकर यांनी आपल्या एका पोलीस तुकडीला जारी केले व त्यानुसार सत्यावेधीच्या मालकाला देखील जेरबंद करण्यात आलं होतं, कारण त्याच्या इच्छेनुसार संपादक असलेला बिपीन पत्रकारितेची प्रतारणा करणार नाही हे उघड होते. असो...

जे परराष्ट्रीय गुप्तहेर इथं होते, त्यांना देखील पकडून त्यांना ताकीद देऊन त्यांच्या त्यांचे देशांना रवाना केलं गेलं.

पाकिस्तानच्या फेडरल इन्व्हेस्टीगेशन एजन्सीच्या एजटने मात्र कोल्हापूर एटीयुचे पोलीस आल्यावर तो राहत असलेल्या खोलीत डोक्यात गोळी घालून आत्महत्या केली. एकवेळ एका क्षणाची वेदना त्याला परवडणारी होती, पण पकडले गेल्यानंतर होणाऱ्या चौकशीच्या वेदना त्याला नको होत्या, आणि नको होते आपल्याच देशाला व पंतप्रधानांना धोक्यात घालणं. तिकडून हुकूम आला होता, त्याबरहुकूम त्याने तामिल केली होती.. त्याचा मृतदेहच काय तो सापडला होता ऑफिसर्सना...

◆◆◆

पुढे, शक्तीने युरेनियम कंटेनर्स सुशीलच्या हवाली केले आणि पुढील कारवाई करण्यास सूचना दिली... सुशील देखील ते अवघं एक किलो युरेनियम घेऊन आपल्या एनआयएच्या टीम सोबत दिल्लीला रवाना झाला...

◆◆◆

राजन व जतीन यांची शक्तीने भेट घेतली. जिथून सॅटेलाईट हॅकिंग घडवले गेले होते, जतीन काळेचे गुप्त ठिकाण, तिथे शक्ती त्यांना भेटायला आला होता. त्यांनी जे केले, त्यासाठी त्यांचे आभार मानायचे होते त्याला.

जतीनला वास्तविक अटक होणार होती. राजनवरही कारवाई व्हायची होती. परंतु हे माहीत असून देखील दोघेही त्याबाबत अजिबात निर्धास्त व समाधानी वाटले शक्तीला.

कृतज्ञ शक्तीने दोघांना प्रेमालिंग दिले.

"सॉरी, माझ्यामुळे तुला अटकेला सामोरं जावं लागतंय." शक्ती जतीनला म्हणाला.

"तेरे लिए कुछ भी! आणि हे फक्त तुझ्यासाठी नव्हतंच मित्रा, जर देशाचीच वाट लागली असती, तर बाहेर राहून तरी मी काय केलं असतं? तुला माहीत आहे, स्वातंत्र्य प्रिय आहे मला!" ओठांची तिरकी लकेर खेचत जतीन हसला. आणि त्याने एक डोळा मिचकवला.

शक्ती दुःखी चेहऱ्याने हसला व राजनकडे वळला,

"माफ कर. जिथे तू म्हणतोस, मीच तुला नैतिकतेच्या मार्गावर चालायला प्रेरणा दिली, तिथे मीच तुला गैर प्रकार करायला उद्युक्त केलं. माझ्या सोबत आता तुझ्यावरही कारवाई होईल." शक्ती खिन्न राजनला म्हणाला.

"सर, पर्याय नव्हता. मी समजू शकतो." त्याने शक्तीला अपराधबोधातून बाहेर येण्यासाठी आश्वस्त केलं.

राजनचे सांत्वनापर बोल ऐकून शक्तीची फक्त मान हलली. आतून तो कष्टीच होता.

शक्तीला ठाऊक होते, हे सर्व मार्गी लागल्यावर त्याच्यावरही यांच्या समवेतच कारवाई व्हायची होती. परंतु तो त्यासाठी अगदी तयार होता. त्यानेच तर हे मागून घेतले होते.

राजन व जतीन पुलीस हेडकॉर्टर्सला रवाना झाले, तसे शक्तीने एक फोन लावला.

"मला माहित आहे, तू या प्रकरणावर सुरवातीपासून लक्ष ठेवून आहेस शौर्यजीत! आणि हेही ध्यानात आहे माझ्या, की तू आयबीचा डिरेक्टर यामुळेच आहेस, की तू एकसंध भारतचा समविचारी आहेस आणि त्यांच्या अजेंड्यावर काम करत आहेस." शक्ती बोलत असता पलिकडून त्याला टोकलं गेलं.

इंटेलिजन्स ब्युरोचा डिरेक्टर शौर्यजीत कोल्हापूरमध्ये हजर त्याच्या हॉटेल रूममध्ये बसून बोलत होता,

"तू समजतोयस तसं नाही शक्ती..."

"मला मूर्ख बनवू नको शौर्य, कुलीन शर्मांने मग्रुरीत स्वतः कबूल केलं आहे, की सर्वच इंटेलिजन्स एजन्सीज त्याच्या व त्याच्या संघटनेसाठी काम करत आहे. तू इथेच आहेस हे मला ठाऊक नाही असे समजू नको. कोल्हापूरच्या इंच अन इंचावर माझं लक्ष असतं.

"मित्र आहेस, म्हणून तुला एकच बजावून सांगतोय, धर्माच्या नावाखाली देशविघातक कारवायांत सहभागी होणे बंद कर आणि देशसेवेच्या कार्यात खऱ्या अर्थाने लाग. अन्यथा या केसचं ज्यूरिसडिक्शन कोल्हापूरात

a

आहे, ध्यानात घे मी काय म्हणतोय...! वाटल्यास, ही धमकी समज!" शक्ती म्हणाला आणि त्याने फोन ठेवला.

इकडे खुद्द इंटेलिजन्स ब्युरोचा डिरेक्टर असलेला शौर्यजीत अक्षरशः दबावात आला. शक्ती जे बोलतो, ते करण्यात तो कसूर करत नाही हे त्याचा मित्र असल्याने शौर्यजीत चांगलाच जाणून होता...

◆◆◆

विष्णूला पाहण्यासाठी शक्ती उमेशच्या क्लिनिकला पोहोचला होता. विष्णूची परिस्थिती आता बरीच सुधारली होती. जिज्ञासाच्या उपचार शुश्रूषाचा तो परिणाम होता. त्याला पाहून शक्तीला थोडं समाधान वाटलं, जातानाही जिज्ञासा आपलं वैद्यकीय कर्तव्य पार पाडून गेली होती याचा अभिमान वाटला शक्तीला. विष्णू, गॅब्रिएल, सुमेध आणि वेदिका हे मात्र जिज्ञासा गेल्याने शक्तीकडे हळहळ व सांत्वना व्यक्त करत होते...

◆◆◆

इस्माईलचे शासकीय इतमामात अंत्यविधी चालू होते. तिरंग्यात लपेटून त्याच्या शवाला आणलं गेलं होतं. स्वतः शक्ती गॅब्रिएल व इतर पोलीस ऑफिसर्स सोबत इस्माईलचं ताबूत घेऊन अंत्यविधीच्या जागी आला. एका कर्तव्यनिष्ठ नागरिकाला, एका कर्तव्यनिष्ठ पोलीस अधिकाऱ्याला मानवंदना द्यायला सर्व पोलीस डिपार्टमेंट, प्रशासनातील मंडळी तर होतीच, परंतु कोल्हापूरची जनता देखील या शूराला आपली कृतज्ञता वहायला एकत्र झाली होती. सगळे शोकमग्न होते. ज्या धर्मसमूहाला सतत आपली देशनिष्ठा साबित

करावी लागते, त्याच समूहातील एकाने देशासाठी आपल्या प्राणाचे बलिदान देऊन आपली उत्कट देशभक्ती व राष्ट्रनिष्ठा दाखवून दिली होती. कदाचित त्याचा मृतात्मा म्हणत असावा, की आता तरी आमच्या राष्ट्रभक्तीवर संशय घेतला जाऊ नये... पण हे होणार होते का...? मोठा प्रश्न शिल्लक होताच...

शक्ती व गॅब्रिएल करवी इस्माईलच्या शवावरील तिरंगा काढून घेतला गेला. तो व्यवस्थित गुंडाळून ठेवण्यात आला. तिरंग्याचा अपमान होऊ नये याची विशेष काळजी घेतली गेली होती. इस्माईलच्या शवाला खणलेल्या खड्यात सोडण्यात आले. शक्तीसेन सोबत कोल्हापूर पुलीस डिपार्टमेंटच्या सर्व ऑफिसर्सनी व इतर शासकीय प्रशासकीय अधिकाऱ्यांनी इस्माईलला एक एक करून फुलमाळा अर्पण केल्या व त्याला अखेरचा सल्युट केला.

शासकीय इतमानात अत्यंविधी होत असल्याने इस्माईलला मानवंदना म्हणून पुलीस बँडद्वारे 'संवेदना संगीत' वाजवून त्यानंतर पोलीसांनी बंदुकीच्या फैरी झाडून इस्माईलला सलामी दिली गेली. विष्णूने इस्माईलला मूठमाती दिली होती. इस्माईलचे कोणी नसल्याने त्याचा चुलत भाऊच हे कार्य करायचा, परंतु विष्णू आणि इस्माईल मधलं बंधुप्रेम तो जाणून होता, आणि म्हणून त्यानेच विष्णूला इस्माईलचं कार्य करण्यास विष्णूला सुचवलं होतं, 'त्याशिवाय कदाचित इस्माईलला जन्नत नशीब नाही व्हायची' इस्माईलचा भाऊ विष्णूला म्हणाला होता.

अखेर, एका मुस्लिमचे दफनविधी एक हिंदू करत होता. अंतत्तोगतवा कोण हिंदू? कोण मुस्लिम? दोघे बंधूप्रेमाच्या नात्यात बांधले गेले होते. आणि हेच खरे होते, शाश्वत होते; ना की कोणतीही काल्पनिक धार्मिक ओळख. असो,

इस्माईलचे अंत्यविधी करत असता, अपार दुःख विष्णूच्या डोळ्यांत भरलं होतं, जे अश्रू वाटे दृश्य होत होतं...

इस्माईलचा दफनविधी पार पडला, तसे दुःख अनावर होऊन वर्दीतला गॅब्रिएल शक्तीच्या खांद्यावर डोकं टाकून रडू लागला. शक्तीच्या अंगावर देखील त्याची वर्दी होती. तो भरल्या नजरेनेच माती टाकून बंद केल्या जाणाऱ्या इस्माईलच्या त्या दफनजागेकडे पहात होता. असंख्य जनतेचे प्राण वाचवल्याबद्दल व जिज्ञासाचे रक्षण करताना मृत्युमुखी पडलेल्या इस्माईलचे तो असंख्य वेळा आभार मानत होता. दुःख अनावर झालेला विष्णू देखील शक्तीच्या आधारप्राप्तीसाठी धावला होता. हमसून हमसून तो शक्तीला बिलगून रडत होता. गॅब्रिएल व विष्णू सर्व प्रोटोकॉल्स विसरून शक्तीच्या खांद्यावर शोकनिचरा करत होते, तर शक्ती इस्माईल विषयीचं स्वतःचं दुःख व अपराधबोध दाटवून त्या दोहोंना सांत्वना देत होता.

◆◆◆

कोल्हापूर सीपीआरचं मॉर्ग,

जिज्ञासाचं पोस्टमार्टेम इव्हना झालं होतं, तिला बॉडी बॅग मध्ये गुंडाळण्यात आलं, होतं आणि म्हणून का होईना तिच्या शरीराचा विभत्सपणा शक्ती पासून लपला होता, तिचं छिन्नभिन्न झालेलं मस्तक तो पाहू शकलाच नसता... उन्मळून पडला असता तेथेच तो..

जिज्ञासाचे छिन्नविच्छिन्न मस्तक असलेले ते बॉडी बॅगमध्ये बांधलेलं अचेतन शरीर त्याच्या समोर टेबलवर पडलं होतं. पायांत त्राण नसलेला शक्ती

सुन्नसा तिच्याकडे चालत होता... तिच्या पर्यंतचा दरम्यानचा प्रवास त्याला युगांचा वाटत होता.

डोळ्यांत अविश्वास साठलेला तो भरलेल्या डोळ्यांनी तो तिच्याकडे संथ लावले टाकत होता.

अंततः तो तिच्यापर्यंत पोहोचला, आणि अचानक त्याला वास्तवात खेचल्यासारखं झालं. एकदम त्याला रडू कोसळलं आणि तो जिज्ञासाच्या मृत देहाला आवेगाने कवटाळून तो फुटून फुटून रडू लागला...

दुसरीकडे, आतापावेतो, जिज्ञासाचा मारेकरी देखील पकडला गेला होता. पण शक्तीला त्याचं सोयरसुतक राहिलं नव्हतं...

◆◆◆

शक्ती एकटा उभा होता, जिज्ञासाची चिता धगधगत होती. अंत्यसंस्कारासाठी आलेले सर्व निघून गेले होते, शक्ती एकटा उरला होता... हे सूचक चिन्ह होतं का त्याच्या भविष्याचं... त्याच्या आयुष्याभराच्या एकाकीपणाचं...

त्याने भले आपलं सर्वस्व गमावलं होतं, परंतु गमावली नव्हती, ती त्याची अंतरस्फुरणा, सत्यासाठी लढण्याची त्याची उमेद!

तो ठाम होता! नजरेत निश्चयांचा महासागर सामावून तो जिज्ञासाच्या चितेचा धगधगता आगडोंब पाहत होता, त्याचे अश्रू जिज्ञासाच्या अस्तिज्वाला प्रतिबिंबित करत होते...

# समाप्त...?

**नाही!!!**

**ही तर नवी सुरवात आहे...!!!**

# समारोपाचे शब्द

मला माझ्या कथा नैतिकतापूर्ण ठेवायला आवडतात. माझ्या कथा या डिटेक्टिव्ह फिक्शन, एक्शन, थ्रिलर असतात, पण या कथांमधून व कथांच्या नायकांच्या माध्यमातून नीतिमत्ता वाचकांमध्ये झिरपावी असा आग्रह असतो माझा. म्हणूनच माझे सर्व नायक हे नीती व सत्य यांच्यासाठी सतत संघर्ष करत असतात.

शक्तीसेन नाईक याची कथा लिहिताना तर मला विशेष त्रास होतो, कारण त्याच्या कथा या कायदा व सुव्यवस्थेला धरून असाव्यात असा माझा आग्रह असतो. आणि त्या चौकटीत कथा बसवणं हे महाकठीण कार्य असतं. शक्तीसेनच्या बाबतीत नेहमी असं होतं, की मला कथा न्यायची एका बाजूने असते, तर शक्तीसेन ती दुसऱ्याच बाजूने नेण्यासाठी संघर्ष करत असतो.

अखेर त्याच्याशी मीच संघर्ष सोडला, अंतःपुर मध्येही व इथे गर्भगृह मध्येही. अन्यथा त्याच्याशी भांडत बसलो असतो, तर या दोन्ही कथा पूर्णच झाल्या नसत्या. आणि गर्भगृह तर खूपच गरजेची होती पूर्ण करणे.

सांगायची गोष्ट अशी, की कसं आहे, कल्पनेने लिहिताना तुम्हाला कशाची पाबंदी नसते, पण जिथे आपलं पात्रच पोलीस आहे तिथं, तो कायदा सोडून कसाही वागलेला कसा दाखवता येईल? म्हणून ही कथा मला कायद्याबरहुकूम न्यायची होती... आणि त्याच संघर्षात ही कथा पडून होती... पण आता कथा घेऊन येणे गरजेचेच वाटत असल्याने मग ही कथा मी पात्रांच्याच हवाली केली. त्यांनाच कथा ड्राइव्ह करू दिली...

दुसरा आग्रह हा होता, की संपूर्ण कथा कोल्हापूरमध्ये घडावी. कारण प्रस्तुत कथा, ही अंतःपुरचा पूर्वार्ध आहे, अंतःपुरचा प्रिक्वेल. शक्तीसेन सदर कथेत कोल्हापूर पोलीस डिपार्टमेंटच्या अँटी टेरिरीजम युनिटचा प्रभारी असल्याने त्याचे कार्यक्षेत्रच कोल्हापूर आहे. तशात त्याच्यावर काही आरोप लागल्याने तो फरारी. अशावेळी तपास करत कोल्हापूर मधून बाहेर जाणे त्याला शक्य नाही. मग हे सगळं कोल्हापूर मधून कसं घडवायचं याची मोठी कसरत होती माझ्यासमोर. पण कथेचा जो विषय होता, त्यानुसार कथा फक्त कोल्हापूरमध्ये घडणे तसे अशक्यच होते. त्यातही मानसिक संघर्ष चालू होता व त्यामुळेही कथा पडून होती. पण जेव्हा कथेतील पात्रांवरच कथा सोपवली, तेव्हा तेच घटना घडवत गेले व मार्ग प्रशस्त होत गेला आणि कथा निर्माण होत गेली.

पण त्यामुळेच मग शक्तीसेन हा या कथेत थोड्या काही इल्लीगल गोष्टी करताना दिसतो, पण ते सत्य शोधून काढण्यासाठी आणि जनतेच्या सुरक्षेसाठीच करतो. जसे, की मोबाईल हॅकिंग, नव्हे तर अगदी ब्रॉडकास्टिंग सॅटेलाईट हॅकिंग दाखवले आहे, शक्तीसेनला असे करताना दाखवणे म्हणजे कायदेसंगत होईल का असा खूप संघर्ष झाला डोक्यात, कथा थोडे दिवस तशीच पडली. पण मग विचार झाला, जरी हे इल्लीगल व गुन्हेगारी कृत्य असले, तरी शक्तीसेनला जे सांगायचं आहे (प्रकरण 32 नागरिकशास्त्र) ते देशातील लोकांपर्यंत एकाचवेळी पोहोचवायचं असेल, व यात सरकारचा हस्तक्षेप नको असेल, तर हेच करणे गरजेचे आहे. शक्तीला हातात ऑथरीटी नसताना त्याला संशयित वाटणाऱ्या लोकांविषयी तो पुरावे कसे गोळा करेल? त्यामुळे त्याला

संशयितांचे मोबाईल हॅक करणे तर गरजेचे आहे. त्याशिवाय तो पुरावे गोळा कसे करेल? या विचाराने मनाचे समाधान झाले व मग शक्तीला हे मी करू दिले. पण त्याचे प्रायश्चित्त व्हावे म्हणून अखेर त्याबद्दल शक्ती एसपीकडे स्वतःसाठी प्रॉपर ट्रायल देखील मागतो.

■■■

ही कथा मी लिहीत होतो, तसंच प्रतिलिपी एपवर अपलोड करत होतो, तेव्हा काही वाचकांकडून बरेच वाईट अनुभव आले, त्यांची संख्या कमी असली, तरी आपल्या देशातील लोकांची मानसिकता किती कलुषित झाली आहे त्याचा अंदाज देणारी आहे. इथेही जे वाचक असतील त्यांतील देखील काही लोकांना ही कथा अप्रिय वाटेल यात शंका नाही. पण एक सांगतो, की कुणाच्या प्रिय-अप्रियतेसाठी मी लिहीत नाही. मी लिहितो, ते नैतिकतेसाठी, सत्यासाठी!

पुढे काही प्रतिक्रिया जशाच्या तशा देत आहे -

प्रतिलिपीवर एकाने कमेंट केली, की "खतरनाक. काल सुसंगत असे काही असू नये ही अपेक्षा."

मला कळलं नाही, की ही धमकी होती की काळजी?! मी त्यांना दिलेले उत्तर दिले,

"आभार. दोन वर्षापूर्वी ही कथा सुचली होती, ती आत्ता लिहितोय... पहिल्या चॅप्टर्सच्या डेट्स आपण पाहिल्या तर आपल्या लक्षात येईल... कथा

a

पूर्णतः काल्पनिक आहे. राजकारण काय आणि कसं असतं हे लोकांना कळावं म्हणून हा लेखन प्रपंच."

एका मॅडमनी लिहिलं, की...

"तुमचे लिखाण एक काल्पनिक कथा म्हणून नेहमीच आवडले...!! पण ही कथा, त्याची संकल्पना फार बेक्कार आणि निव्वळ कुठल्यातरी विद्वेषाचे फळ आहे...!!! एकांगी सर्वधर्मसमवाद काहीच कामाचा नाही...!!! हिंदू धर्माएवढा सहिष्णू धर्म नाही.. कारण मुळात हिंदू ही एक संस्कृती आहे...!!! स्वधर्माचे स्वतःच्याच देशात पुनरुज्जीवन करणे हा हेतू वाईट नाहीच...!! या कथेचा आसरा घेऊन विद्यमान पंतप्रधान, गृहमंत्र्यांविरुद्ध वातावरण बनवण्याचा असा प्रयत्न आपल्या सारखा लेखक करतो याचे वाईट वाटते...!!!

लेखन कितीही उत्तम जमले असले तरी उद्देश केवळ मनोरंजनाचा आहे असे वाटत नाही..!! त्यामुळेच रेटिंग कमी आणि ही कमेंट केली आहे..!!

आपल्यासारख्या उत्तम लेखकाकडून प्रेरणादायक, समाजहितकारक लेखनाची अपेक्षा आहे, आपल्याच देशाच्या राज्यकर्त्यांविरुद्ध जनमत तयार होईल असे एकांगी आणि भडकाऊ लेखन आपल्याकडून अपेक्षित नाही...!!!

शेवटची निवडणूक ठरवण्याचा प्रयत्न, त्यासाठी अणुबॉम्बचा फार्स हे खोडसाळ आरोप विद्यमान भाजप आणि पंतप्रधान-गृहमंत्र्यांविरुद्ध गेली ८-९ वर्षे होत आहेत आणि तरीही बऱ्याच ठिकाणी निवडणुका अत्यंत शांततेत पार

पडलेल्या आहेत... त्यामुळे या कथेचा गाभा कुठे निर्देश करतो हे पाळण्यातले पोर ही सांगेल....!!!

आपला उपमर्द करण्याचा हेतू नाही, पण एक सुजाण नागरिक म्हणून जे खटकले ते सांगितले...!!!"

सुजाण नागरिकांची किती चुकीची व्याख्या यांना माहीत आहे हाच विनोदाचा भाग आहे. मीही त्यांना उत्तर दिले,

"मी पण सुजाण नागरिक आहे म्हणूनच लिहिले आहे. एवढंच सांगेन, जागे व्हा!"

आता यांच्या प्रतिक्रियेचे विश्लेषण करू -

यांनी माझ्याविषयी जी आपुलकी दाखवली, माझ्या लिखानावर यांचे प्रेम आहे आणि मी प्रेरणादायी व समाजहिताचे कार्य करू शकतो अशी अपेक्षा या माझ्याकडून ठेवतात हे पाहून मी त्यांचा असंख्य ऋणी आहे. पुढे जे मी विश्लेषण करत आहे, त्यात त्यांचा अपमान करण्याचा कोणताच हेतू नाही. पण त्यांचं बोलणं किती चुकीचं आहे हे मला नमूद करावेच लागेल. त्यामुळे मी हा प्रपंच करतो आहे.

तर मुळात, या ताई सहिष्णू असत्या, तर माझ्याशी वाद घालायला आल्या नसत्या. त्यांनी इग्नोर केलं असतं, मी जे लिहिलंय ते पटलं नसेल तर. मी फक्त मनोरंजनासाठी लिहीत नाही. इथेच या मला ओळखायला चुकल्या. नाहीतर ढीगभर कथा घेऊन आलो असतो मी, फक्त मनोरंजन करायचे असते तर. या म्हणतात, माझ्या सारख्या उत्तम लेखकाकडून प्रेरणादायक, समाजहितकारक लेखनाची अपेक्षा आहे, मग या कथांच्या माध्यमातून मी दुसरं

a

काय करतोय? आणि जर मी तसे करत नाही असे यांना वाटत असेल, तर यांची प्रेरणादायक, समाजहिताची व्याख्याच चुकीची आहे. यांच्या प्रिय राजकीय व्यक्ती व गटाला फायदा व्हावा म्हणून व यांच्या विद्वेषी भावनांना पोषक ठरेल असे लेखन मी केलं, तरच यांच्याकडून मला प्रेरक व समाजहितकारक म्हणून मान्यता मिळणार का? यांच्या बोलण्यातून तर तेच स्पष्ट होतं.

आय एडमिट, आय वेंट टू फार् विथ दि एटॉमीक बॉम्ब, आय शुड् युज सम एक्सप्लोजिव्ह, दॅट वुड बी सफिशिएन्ट फॉर् दि स्टोरी. पण; कथा सुचली त्यावेळीच त्यात युरेनियम आले. तसे सुरवातीची प्रकरणे लिहिली सुद्धा. आणि आता लवकरात लवकर कथा पूर्ण करायची असल्याने मला ते एकदम शॉर्ट नोटीसवर बदलता आले नाही. कारण तसे करता कथाच अनेक स्तरांवर बदलावी लागली असती. आणि मला तर निवडणूक आधी कथा वाचकांच्या भेटीला आणायचीच होती. असो...

आता दुसरे; अरे, मीच या कथेतून सांगत आहे, की एकमेकांचा द्वेष करू नका, तरी या दीदी माझ्यावरच मी द्वेष पसरवतोय असा आरोप करतात म्हणजे हे हास्यास्पद आहे. जर उच्चपदस्थ व्यक्ती देशात दंगली करून द्वेषाला आग देत असेल, तर ते चुकीचे आहे असे म्हणणे व त्याबद्दल लिहिणे हे चुकीचे कसे? आणि तसे बोलले, तर आम्हीच द्वेषभावना ठेवणारे व द्वेषभावना पसरवणारे, वाढवणारे? काय विनोद आहे हा! वर म्हणे एकांगी 'सर्वधर्मसमवाद' काही कामाचा नाही. मग खरे द्वेष पसरवणारे आम्ही, की हे?!

धर्माचे पुनरुज्जीवन म्हणे. पण मुळात माणसाला जगण्यासाठी देव आणि धर्माची गरज लागत नाही असे माझे स्पष्ट मत आहे. प्राण्यांपेक्षा जर

a

आपण व आपली बुद्धी उन्नत आहे असं आपण समजतो, तर जर प्राण्यांना देवाची व धर्माची आवश्यकता वाटत नाही, आणि तरीही ते बरोबर जगत असतातच, आणि आपल्यापेक्षा उत्तम जीवन जगत असतात. तर स्वतःला 'हुशार' समजणाऱ्या माणसाला या देव, धर्म अशा 'लंगड्या' कुबड्यांची आवश्यकता असावी हेच मुळात मला पटत नाही! आपण फक्त आपल्या कल्पनांनी आपले स्वतःचे व्याप, त्रास आणि अडचणी वाढवल्या आहेत व यापायी जगणं किचकट आणि अवघड करून टाकलं आहे एकूण मानवजातीचं. जगात काही शाश्वत नाही, एवढी एक गोष्ट ध्यानात ठेवली, की सगळ्या खोट्या व खुळचट कल्पना, त्यांतून येणाऱ्या अस्मिता व त्यांच्या बद्दलचे गर्व, अभिमान खाडकन गळून पडतात.

बरं! धर्माचे पुनरुज्जीवन करताय, करा... पण तुमचे ते पुनरुज्जीवन परधर्मीयांच्या द्वेषावर कसे उभारलेले असते? शिवाय धर्म पुनरुज्जीवनाचे काम एखाद्या राजकीय पक्षाचे कसे असू शकते? मुळात संविधान जर असे सांगत असेल, की राजकारण हे धर्म विरहित असावे, तर एखादा पक्ष धर्माच्या आधारावर उभा असेल, तर तेच मुळात संविधान बाह्य आहे आणि त्यामुळे तो पक्ष आपणच बहिष्कृत केला पाहिजे! पण तुम्हाला तुमच्या धर्माचे पुनरुज्जीवन करायचे आहे ना! मग तुमच्या डोक्यात असे योग्य प्रश्न का येतील?

आणि या मॅडमनी हे लक्षात घ्यावं, की ज्या धर्माच्या पुनरुत्थानासाठी या माझ्याशी वाद घालत आहेत, तो धर्म 'पुनरुज्जीवित' झाला, तर यांना सती जावे लागेल... यांच्या भावी पिढीतील मुलींना शिक्षण नाकारले जाईल, खुद्द यांना घरात कोंडले जाईल, यांचे स्वातंत्र्य हिरावले जाईल... न जाणो अजून

a

काही काही... आणि ते होऊ नये म्हणून आम्ही कंठशोष करत गळे काढतो. बरं ठीक, की तुम्ही तुमचा धर्म (जो मुळात मरणासन्न नाही, उगाच तुम्हाला तसे भ्रम दिले आहेत तुमच्या प्रिय राजकारण्यांकडून, पण असो) जगवण्याचा प्रयत्न करताय, आपण मानू, की तुम्हाला तुमच्या धर्माच्या पुनरुज्जीवनाची काळजी आहे, पण म्हणून त्यासाठी तुम्ही काय इतर धर्मीयांना संपवणार काय? सर्वधर्मसमभाव काही कामाचा नाही असे जेव्हा या म्हणतात, त्यातून याच दुष्विचारांची प्रखर दुर्गंधी येते. तुम्ही तुमचा धर्म वाचवण्यासाठी व वाढवण्यासाठी इतर धर्मीयांवर अन्याय करणार?! या ताईंच्या लिखाणातून तर तेच स्पष्ट होतं. आणि म्हणून तर या ताई हे सगळं करणाऱ्या पक्षाला आणि त्या पक्षातील नेत्यांना पाठिंबा देत आहेत, त्यांची पाठराखण करत आहेत.

मला दुसरं कौतुक व अप्रूप वाटतं, की यांना मी इतका ताकदवर वाटतो, की माझ्या एका कथेने यांच्या लिडरांची सत्ता उन्मळून पडेल, नष्ट होईल... असे झाले, तर मी माझे लिखाण सार्थकी लागले असेच समजेन. परंतु यांचा जितका फाजील आत्मविश्वास आहे माझ्यावर, तितका माझाच माझ्यावर नाही.

असो, मी कथेत विद्यमान पंतप्रधान, गृहमंत्री, त्यांचा पक्ष यांच्यावर त्यांची नावे घेऊन आरोप केलेला नाही त्यांच्यावर. माझ्या कथेतील खलपात्रं केवळ पंतप्रधान व गृहमंत्री आहेत म्हणून त्याच्या समर्थकांनी गैरसमज का करून घ्यावा? मग सदर लोक तसेच वागत आहेत याचा पुरावाच हे समर्थक देत नाहीत का? आणि त्यांना ते मान्यही आहे असंही दिसतं.

सविस्तर बघू, आता विचार करण्यासारखी गोष्ट ही, की मी कथेत कुठेही ना खऱ्या जगातील यांच्या प्रिय सत्ता पक्षाचा उल्लेख केला आहे, ना विद्यमान

पंतप्रधान यांचा उल्लेख केला आहे, ना विद्यमान गृहमंत्री यांचा उल्लेख केला आहे, तरी यांना असे का वाटत आहे, की ही कथा त्यांच्या बद्दलच व त्यांच्या विरोधात आहे? मी तर असे कुठेही म्हणत नाही. मी कथा काल्पनिकच आहे असे म्हणतो. असे असताना यांना 'खात्री' का वाटावी? की सदर कथा मी सत्तापक्ष आणि विद्यमान पंतप्रधान, गृहमंत्री यांच्या विरोधातच लिहिली आहे? फक्त गृहमंत्री व पंतप्रधान हे माझ्या कथेचे व्हिलन आहेत म्हणून? मराठीत एक म्हण आहे, 'खाई त्याला खवखवे' किंवा हिंदीत त्याला 'चोर की दाढी में तिनका' म्हणतात. म्हणजे आपले खऱ्या आयुष्यातील पंतप्रधान व गृहमंत्री व त्यांचा पक्ष तसेच वागतात हे या समर्थकांना पटते असा याचा अर्थ होत नाही का?

जेव्हा या ताई यांच्या 'धर्माचं पुनरुज्जीवन करणे' असं म्हणतात, तेव्हा त्यासाठी यांच्या प्रिय सत्ताधाऱ्यांनी कितीही क्रूर, विद्वेषी, खुनशी वागले तरी यांच्याकडून ते समर्थनीय आहे हे सुस्पष्ट होते.

म्हणजे याचा अर्थ हा होतो, की यांचे प्रिय सत्ताधारी तसेच वागत आहेत ही गोष्ट हे लोक स्वतः मान्य करतातच, पण यांचा पाठींबाही आहे त्या गुन्ह्यांना. आणि ही खूप चिंताजनक बाब आहे. त्यांचा तसा पाठिंबा नसता, तर अन्यथा या ताई व पुढे नमूद आणखी जण माझ्याशी वाद घालत बदले नसते. आणि यांनी मनानेच माझी कथा व विद्यमान पंतप्रधान, गृहमंत्री यांच्या भलत्या लिंक्सही जोडल्याच नसत्या, मी ही कथा काल्पनिक आहे असं सांगत असूनही.

बघा ना, इलेक्टोरल बॉण्ड व असे अजून काही मोठे असे भ्रष्टाचार व घोटाळे विद्यमान सरकारचे बाहेर आले, स्त्रियांवर यांच्याच पक्षाशी निगडीत लोकं कसे अत्याचार करतात, एवढेच नाही तर बलात्कार करून मारून फेकून

a

देतात, एक ना अनेक असे असंख्य अक्षम्य गुन्हे यांचे बाहेर येऊन देखील जनता जागृत होणार नसेल, तर या देशाचे रक्षण कसे व्हावे? बरं पुन्हा, हे आरोप मी करत नाही. ज्या बातम्या आपल्या पर्यंत पोहोचल्या त्यांच्या आधारावर बोलतो आहे. कोणाला दोषी ठरवण्याचा अधिकार मला अलबत नाही. असो, तर -

मला तर वाटतं, की हे समर्थक जागेच आहेत, फक्त यांना ते बघायचं नाही. यांच्या दृष्टिकोनात जोपर्यंत भाजप त्यांच्या धर्माचे रक्षण करत आहे, तोपर्यंत त्यांची कोणतेही पापे हे लोक खपवून घेण्यास तयार आहेत, म्हणूनच त्यांचे गुन्हे उघड असून यांना ते पहायचे तर नाहीतच, उलट हे त्यांच्याबाजूने युक्तिवाद करून त्यांची पाठराखण करत असतात.

काही जणांना भाजपला पाठिंबा देऊन चुकलो असे वाटत असेलही, पण त्यांना चूक कबुल करायची नसते म्हणून ते त्यांचे समर्थन करून समाज व स्वतःला फसवत असावेत.

पण जनता झोपलीए असं म्हणता येत नाही यासाठी आणखी काही निरीक्षणे - भक्तांना सगळं कळतंय, फक्त त्यांना तेच पाहिजे आहे म्हणून ते डोळे बंद करतात, भाजप, मोदी, शहा यांचं काही बाहेर आलं तरी. उलट त्यांचा भ्रष्टाचार व गुन्हे याचं हे समर्थन करतात, कारण त्यांना चुकीचे म्हंटलं, तर त्यांना पाठिंबा देणारे आपणही चुकीचे आहोत असे म्हणावे लागेल आणि त्यासाठी या भक्तांची तयारी नसते, आम्ही चुकूच शकत नाही आणि सपोर्ट करत असलेली पार्टी व त्यांतील माणसेही चुकीची असू शकतच नाहीत असा फाजील आत्मविश्वास जो आहे त्यांच्यात. तर काही भक्तांना भापजचा क्रूरपणा,

खुनशीपणाच हवाच असतो, म्हणून ते त्यांच्या गुन्ह्यांकडे व भ्रष्टाचारांकडे दुर्लक्ष करतात, नव्हे तर समर्थनच करतात.

मुळात जनता झोपलेली नाहीच, ती जागृत व्हायला. फक्त सत्ताधारी पक्ष त्यांच्या धर्माचे रक्षण करत आहे या गैरसमजुतीपायी हे लोक या सगळ्यांकडे दुर्लक्ष करत आहेत. आणि जे आवाज उठवतात, त्यांना दोष देत आहेत. हे थांबलं पाहिजे, थांबवलं पाहिजे जनतेतील या मोठ्या गटाने, जे यांना पाठिंबा व समर्थन देत आहेत. हेच 'सुजाण नागरिकांचे' काम आहे. ना की सरकारला संरक्षण देणे!

परस्पर धार्मिक सद्भाव ठेवा, सर्वांना समान अधिकाराने वागवा, असं या कथेतून सांगणारा मी यांना द्वेष पसरवणारा वाटतो, आणि जे या स्वतः त्यांच्या प्रतिक्रियेतून विष ओकत आहेत, ते विद्वेषी नाही यांच्या दृष्टीने... म्हणजे काय उपहास आहे हा...

इथे या समारोप मनोगतात मी स्पष्ट नावे घेतोय, कारण मला प्रतिकिया देणारे असं समजतात, की भाजप, पंतप्रधान मोदी व अमित शहा यांना डोक्यात ठेवून मी कथा लिहिली आहे. त्यासाठी त्यांनी जे युक्तिवाद मांडले, ते फक्त खोडण्यासाठी मी देखील यांची नावे घेत आहे. कथेचा या कोणाशी काही संबंध नाही हे मी पुन्हा स्पष्ट करतो, जर त्यांना तसे वाटत असेल, तर त्यांना हे मान्य आहे की सदरहू लोक तसेच वागत आहेत, याची पुष्टी तेच करत आहेत असा माझा उलट युक्तिवाद असेल.

a

एक तर फिदीफिदी हसणाऱ्या इमोजी कमेंट करून एक स्टार देतोय प्रतिलिपीवर. हा पण धर्मवेडा आणि सध्याच्या सरकारचा प्रियकर. याचा टिळा लावलेला व गडद भगवा झब्बा घातलेला फोटो पाहूनच मला वाटलेले, की जेव्हा कथा पुढे सरकेल व शक्तीसेनच्या माध्यमातून वाचकांना कथेतील खुलासे होत जातील, तेव्हा याला ते अजिबात आवडणार नाही व तेच झाले, जोपर्यंत कथेत सरकार विरोधात खुलासे झाले नव्हते, हा 5 स्टार देत होता, आणि जिथे प्रकरण 26 'कालमेघ' आले व सरकारचा उल्लेख झाला षडयंत्रात, तिथून याचे रेटिंग 1 वर घसरले आणि उपहास करणाऱ्या इमोजीज टाकू लागला. खरा उपहास हाच इसम आहे, कारण याला सरकारकडून किती उल्लू बनवलं गेलं आहे व अजूनही बनवलं जात आहे हे याच्याच गावीही नाही. मूर्ख!

वास्तविक हा माणूस माझ्या कथांचा व शक्तीसेनचा फॅन. गेली दीड वर्षे हाच माझ्या मागे लागला होता, गर्भगृह पूर्ण करण्यासाठी, पण जेव्हा गर्भगृह पूर्ण झाली, तेव्हा ती त्याच्या डोक्यात फिट झालेल्या नटेरिव्हशी पूर्ण भिन्न दिसल्यावर त्याने द्वेष करायला सुरू केलं.

बरं हा कथेचे रेटिंग कमी व्हावे म्हणून प्रकरण 26 पासून प्रत्येक प्रकरणाला 1 स्टार देत होता, कारण रेटिंग कमी झाले, तर त्यामुळे कदाचित कथा लोकांपर्यंत पोहोचणार नाही व किंवा पोहोचली, तर लोक कथा बकवास आहे समजून वाचणार नाहीत असा त्याचा समज असावा. पण त्याची बिचाऱ्याची ताकद कमी पडत आहे. 5 पैकी 4.9 रेटिंग आहे, अजून तरी. पुढे काय होईल माहीत नाही. या महाशयांना मी एवढंच म्हटलं, की "यावरून तुमची योग्यता समजली. हे असं वागून मी जे लिहिलं आहे, ते तुम्हीच सिद्ध करत

आहात त्याबद्दल धन्यवाद!" त्यानंतर त्यांनीही काही लिहिलं, ते मात्र मी वाचलं नाही. म्हंटलं, कुठे त्यांचा नादाला लागून मानसिक स्वास्थ्य बिघडवून घ्या?!

ज्या ज्या प्रकरणात पंतप्रधान, गृहमंत्री असा उल्लेख आहे, ज्या प्रकरणात मी एकात्मता, परस्पर धार्मिक सद्भाव व आदर, इतर धर्मियांचे अधिकार मान्य करून त्यांना समान आदर देण्याच्या विषयी लिहिले आहे, मायनॉरीटीच्या अधिकार व हक्कांविषयी उल्लेख केला आहे, त्या-त्या प्रकरणांचे रेटिंग कमी केले जात आहे. लोकांची मानसिकता काय घाण लेव्हलला नेऊन ठेवली आहे, किती राग व द्वेष भरवला आहे एकमेकांबद्दल या राजकारण्यांनी लोकांच्या मनात हे पाहण्यासाठी हे उत्तम पुरावे आहेत. आणि मुळातच अल्पसंख्याकांबद्दल राग असल्याने ही दुष्भावना अधिकच लवकर फोफावलेली व वाढीस लागलेली दिसून येते.

तरी त्या प्रकरणांचे रेटिंग्स 4.6 च्या वर आहे किमान आतातरी, हे विशेष. नागरिकशास्त्र या 32 व्या प्रकरणाला देखील 4.7 रेटिंग आहे. हा विजयच म्हणायचा. पण ज्या प्रकरणाला सर्वांत जास्त रेटिंग हवं त्यालाच एव्हरेज रेटिंग आहे. आणि हीच शोकांतिका आहे. तरी ते रेटिंग 4.2 वर नेले होते. ज्यांना द्वेष नकोय त्यांनी रेटिंग वाढवलं आहे नंतर, हे दिसून आले व किमान 4.7 पर्यंत आणले. म्हणजे ते विचार पटणारे देखील मोठ्या संख्येने आहेत व ते संघर्ष करत आहेत द्वेषाविरुद्ध. हे देखील दाखवणारा हा पुरावा आहे असे मी म्हणेन. हे सगळं अजून तरी असं आहे. पुढील माहीत नाही, पण द्वेषाचा विजय होऊ नये, प्रेम व आपलेपणाच जिंकावा हीच अपेक्षा.

a

मला याच गोष्टीचं वाईट वाटतं, की जनतेला त्यांच्या अधिकारांचे व त्यांच्या कर्तव्यांचे प्रबोधन केलेले, संविधान व नागरिकशास्त्र समजावून सांगितलेले नकोय. त्यांना रसच नाहीये या गोष्टींत. सरकार जे करतंय ते देशासाठी उत्तमच आहे असं सरकारनेचं केलेल्या जाहिरातींवर अंधपणे विश्वास ठेवून हे लोक याचं भ्रमात गुरफटले गेलेत व मूर्ख बनत आहेत. सत्य शोधण्याची यांची मानसिकता मेली आहे. जे शोधतात, त्यांनाच उलट शिव्या घालतात, सरकारद्रोही व देशद्रोही म्हणून. आणि नागरिकशास्त्र या प्रकरणाला एव्हरेज रेटिंग मिळणे हे त्याच गोष्टीने द्योतक आहे, जरी काहीजण रेटिंग घसरू नये म्हणून संघर्ष करत असले तरी.

जनता जागृत व्हावी आणि लवकरात लवकर व्हावी ही आशा आहे. ही आशा कधी पूर्ण होते वा पूर्ण होते, की नाही कुणास ठाऊक... आपण प्रयत्न करत रहायचं, हेच मात्र आपल्या हाती...

द्वेषाचं आणखी एक उदाहरण आठवतंय, आणखीन एका माझ्या वाचकाने त्यांच्या इंस्टा स्टोरी वर एका वयस्कर माणसाचा व्हिडीओ लावला होता, बोलणारे ते कोण होते माहीत नाही मला, पण सांगत होते, की गांधीजींनी भगत सिंग यांना वाचवायला मदत केली नाही. गांधीजी व इर्विन यांच्यात जो करार झाला, तेव्हा इर्विनने भगतसिंग यांच्याबद्दल आपल्याला काही विचारायचे नाही का असे भेटीच्या अखेर विचारले, तर गांधी म्हणाले, की 'तो

तुमच्या कायद्याचा प्रश्न आहे.' आता किती भयंकर मोठा व खोटा अपप्रचार आहे हा?

मग मी त्यांना गांधीजी यांचे पत्र पाठवले, जे गांधीजी यांनी लॉर्ड इर्विन याला लिहिले होते, ज्यात त्यांनी भगत सिंग, सुखदेव आणि राजगुरू यांची फाशी इर्विनने थांबवावी यासाठी गांधीजींनी स्वतःच्या इन्फ्लुइन्सचा वापर करून इर्विनवर दबाव टाकण्याचा प्रयत्न केलेला स्पष्ट दिसून येतो.

मी ज्या पत्राची लिंक आणि फॅक्टचेक केलेल्या वेबसाईटची लिंक संबंधिताला सेंड केल्या, त्या पुढीलप्रमाणे -

1) https://www.mkgandhi.org/faq/q26.php

2) https://www.google.com/amp/s/factly.in/gandhi-on-multiple-occasions-appealed-to-lord-irwin-for-suspension-of-bhagat-singhs-execution/amp/

आणि मी पुढील मेसेज लिहिला -

- "गांधीजींनी व्हाइसरॉय इर्विनला भगत सिंग, राजगुरू, सुखदेव त्यांच्या फाशी थांबवण्यासाठी लिहिलेले पत्र. यातून हे देखील लक्षात येते, की त्यांच्यात फाशी रोखण्यासाठी या पत्राच्या आधीही बोलणे झाले होते त्यावेळी इर्विनने तसे करण्यास असमर्थता दाखवली होती, तरी गांधीजींनी परत पत्र लिहिले होते, की आणखी एकदा विचार करावा आशा अर्थाने. तेच हे पत्र. शिवाय आणखी एक गोष्ट लक्षात येते, ती ही की गांधीजी आपल्या इन्फ्लुइन्सचा दबाव देखील इर्विनवर टाकण्याचा प्रयत्न केला होता. आणि हेही कळते, की गांधीजी भगत सिंग यांच्या हिंदुस्थान सोशलिस्ट रिपब्लिकन असोसिएशनच्या सुद्धा संपर्कात

होते आणि या तिघांची फाशी कशी रोखावी याबद्दल त्यांच्यातही चर्चा झाली होती."

तर त्यावर युक्तिवाद करण्यापेक्षा, त्यांनी मला विचारलं, की "तुम्ही 'गांधीवादी' आहात का?" हा प्रश्न मला असा भासला, जणू ते मला विचारत आहेत, 'आपण आतंकवादी आहात का?' किंवा 'तुम्ही तालिबानी आहात का?' म्हणजे मला या प्रश्नाचं औचित्यच समजलं नाही. असो.

माझं त्यावर उत्तर होतं, "सत्य हे सत्य आहे, ते नाकारणार का तुम्ही? मी सत्याच्या बाजूचा आहे, कोणताही टॅग मी लावून घेत नाही स्वतःला. भगतसिंगना वाचवायला गांधीजींनी काही केलं नाही असं तुम्ही म्हणता म्हणून सत्य दाखवलं. ते नाकारणार का आपण? फक्त तुम्हाला गांधी आवडत नाहीत म्हणून..."

यावर त्यांचे उत्तर आले, "तसे काही नाही, पण असे म्हणतात. काय खरं, काय खोटं म्हणून मी ती रील स्टोरीला लावली, एवढेच आहे ते. महात्मा गांधींच्या काही गोष्टी मला मला आवडतात एवढंच आहे."

आता याचे विश्लेषण करू -

खरे-खोटे करण्यासाठी कोणी स्टोरी ठेवणार नाही, तर तत्पूर्वी फॅक्ट चेक करेल आणि यांना गांधींच्या काही गोष्टी आवडत असत्या, तर त्यांनी आधी फॅक्ट चेक करण्याचेच काम केले असते. त्यांच्याबद्दल खोटं पसरवणारी स्टोरी ठेवून रिकामे झाले नसते. इथेच यांचा युक्तिवाद खोटा ठरतो. मी सत्य दाखवल्यावर त्यांना बोलायला जागाच उरली नव्हती, म्हणून फक्त त्यांनी माघार घेतली इतकंच. त्यांचा उद्देशच मुळी गांधीबद्दल अफवा पसरवून त्यांच्याबद्दल

राग आणि द्वेष पसरवण्याचाच होता असा माझा समज आहे. कारण तसा तो नसता, तर आधी त्यांनी सत्य शोधलं असतं.

दुसरी गोष्ट, बरं मी असलो गांधीवादी, तरी तो काय गुन्हा आहे का? हिंसेवर आणि असत्यावर उत्तर 'गांधीवाद' आहे, आणि हा पर्याय कुणाला परवडणारा नाही, म्हणून मलिन केला जातो. तो गढूळ करायचा असेल तर, गांधींना दुष्ट ठरवणे क्रमप्राप्त आहे. नाही का? म्हणून हा प्रपंच चालू असतो, गांधींच्या विरोधात.

त्यांच्या वरील उत्तरावर मग मी त्यांना इतकंच म्हणालो, "हो. कोणतीही माहिती समोर आली, तर ती चेक करावी. नाही तर आपल्याकडून चुकीच्या गोष्टी समाजात प्रविष्ट होतात, ते होऊ नये अशी आपणच काळजी घेतली पाहिजे... शक्य झालं, तर गांधींनी लिहिलेलं ते पत्र किंवा त्याची लिंक स्टोरीला ठेवावे, त्यामुळे ज्यांना ज्यांना गैरसमज आहे, त्यांचा गैरसमज दूर होईल."

परंतु त्यांनी ते वाचून सोडून दिले. मला खात्री आहे, त्यांनी ते पत्र स्टोरीला ठेवलं नसेल. का करतील ते, आमचा जर गांधींविषयी द्वेष आणि खोटंच पसरवायचा उद्देश व हेतू असल्यावर आम्ही सत्य कळून घेण्याची तसदी आम्ही का घेऊ? किंवा सत्य समजलं, तरी ते जगाला ओरडून का सांगू? बरोबर ना?

'काय खरं काय खोटं' माहीत नसताना, सत्य जाणून न घेता ती खोटी स्टोरी ठेवण्याची कमाल त्यांनी केली, पण सत्य समजल्यावर ते मात्र त्यांनी इमानेइतबारे दडवले. हा पूर्वग्रहदूषितपणा नाही का?

पण यांचे समविचारी जे समाज विघातक करणार ते सगळं खपवून घेतलं जातं या लोकांकडून...

आणि उखडणार आमच्यावर आम्ही सत्य बोलतो म्हणून, आणि दोष पण आमच्यावरच लावणार, की आम्ही द्वेष पसरवत आहोत... किती हा विखारी कोडगेपणा?

मागील दोन वर्षांतील गोष्ट आहे. नरेंद्र दाभोलकर यांचा स्मृतिदिन होता म्हणून त्यांचा फोटो व त्यांचा विचार मांडणारे त्यावरचे एक लिखाण जे महाराष्ट्र अंधश्रद्धा समितीने फेसबुकला पोस्ट केली होती, ती मी माझ्या व्हॉट्सएप स्टेटसला ठेवली होती. आणि संध्याकाळी मला एक फोन आला, बोलणारे सुमारे 65-70 वर्षं दरम्यानचे माझे एक मध्यमवर्गीय, रिटायर्ड वाचक होते, इंजिनिअर आहेत म्हणे ते. ते मला म्हणाले, 'दाभोळकर हिंदू विरोधी होते तुम्हाला माहित आहे का? ते हिंदू धर्मातील अंधश्रद्धांवर बोलायचे.' एकतर यावर कोणत्याही विवेकी माणसाचा आक्षेप असूच कसा शकतो हेच मला समजेना. मी त्यांना म्हणालो, "तुमचा धर्म कुणी स्वच्छ करत असेल, तर ते तुम्हाला का नकोय."

तेव्हा मग त्यांची भाषा बदलली, म्हणाले, 'नाही. तोपर्यंत ते मला आवडत होते, पण त्यांनी त्यांच्या मुलाचं नांव हमीद ठेवलं, तेव्हापासून ते आवडायचे बंद झाले?'

म्हणजे काय लेव्हलचा हा मुर्खपणा आहे. आता हा काय पैमाना असू शकतो का? ही काय फुटपट्टी असू शकते का? पण आपल्या द्वेषाचे समर्थन

करण्यासाठी हे काहीही युक्तिवाद देतील. अशाने हे लोक स्वतःलाच फसवत आहेत. आणि जरी हे सत्य असेल, तर ते अजूनच काळजी करण्यासारखे आहे. कारण एखादा व्यक्ती फक्त आपल्या मुलाचे नांव मुस्लिम उत्पत्तीचे ठेवतो, म्हणून एवढ्याशा शुल्लक कारणाने तो धर्मरक्षकांच्या द्वेषाचे कारण बनू शकतो.

मग मी उहासाने त्यांना म्हणालो, "मग माझं नांव पण सूरज आहे. मी काय करायला हवं? बदलून घेऊ का नांव?"

अगदी नावावरून सुद्धा डिस्क्रिमीनेट करतात हे पाहून डोक्यात तिडीक जाऊन प्रश्न केला मी. कारण सूरज हे नाव सुद्धा मुस्लिम आहे असे काहीजण समजतात, पण ते तसे नाही. 'सूरज' हे नांव अनेक धर्म व अनेक संस्कृती व अनेक भाषांमध्ये सूर्याला पर्यायवाची म्हणून वापरतात. पण एवढे या लोकांना कुठंचे समजायचे?

असो, तर ते पुढे म्हणाले, 'तसं नाही, पण हे मुस्लिम हिंदूंशी कसे वागतात ते तुम्हाला माहित नाही. मी दुबईत कामाला होतो, तिथले लोक हिंदूंशी कसे वागतात तुम्हाला माहित नाही.' हिंदूंनी स्वतःच्या रक्षणासाठी हत्यारे ठेवली पाहिजेत इथपर्यंत बोलले ते महाशय. मला विचारत होते, 'मुस्लिमांजवळ कधी राहिला आहात का? तर तुम्हाला खरी परिस्थिती कळेल.' वगैरे.

मीही त्यांना जाणीव करून दिली, की 'मी जिथे राहतो, तिथली पुढची गल्लीच मुस्लिम बहुल आहे. आणि कधीच आम्हाला त्रास झाला नाही.' पण हे बोलत असताना मी त्यांना हे सांगायला विसरलो, की त्यावेळी माझ्या स्वतःच्या घरातच दुसऱ्या मजल्यावर मुस्लिम कुटुंब रहात होते. (वास्तविक तीन ते चार मुस्लिम कुटुंब माझ्या राहत्या घरी भाड्याने रहायला होती. आणखी

a

एक नमूद करण्यासारखी गोष्ट ही, की आमचा एक हॉल आम्ही ख्रिश्चनांना प्रार्थनेसाठी दिला आहे. आणि त्यांच्याकडून देखील आम्हाला कधीच कुठला धार्मिक त्रास झाला नाही.) घराजवळ दोन गल्ली सोडून मस्जिद आहे व तिथूनही कधी उपद्रव होईल असं घडलं नाही. एकदा तर माझ्या मित्राला नमाज पढायचे होते म्हणून मी मस्जिद मध्येही जाऊन बसलो होतो, पण एकानेही मला इथं का आलास किंवा इथं का बसला आहेस म्हणून विचारलं नाही. असं काहीकाही कारणाने अनेकदा मी मित्रांसोबत मशिदीत गेलो आहे.

माझे किती तरी मुस्लिम मित्र आहेत. कधी आमच्यात वावगं बोलणं होत नाही. किंवा कधी आम्ही वेगवेगळया धार्मिक विचारांच्या घरातून आहोत असं जाणवतही नाही, अगर तसं ध्यानातही येत नाही. अगदी शिवजयंती मध्येही हे उत्साहाने व हिरीरीने सहभागी होतात ते. मुद्दाम मी हे सांगतोय, कारण छत्रपती शिवाजी महाराजांचे नांव घेऊन हिंदू मुसलमान यांच्यात भेद करण्याचे सुद्धा जे घाण राजकारण चालू आहे त्यामुळे हे प्रखरश्याने नमूद करावेसे वाटले.

असो, तर मी त्या काकांच्या अजेंड्याला मान्य होत नाही म्हणून त्यांनी अखेर फोन ठेवला.

त्यांचा युक्तिवाद मला त्यावेळी चपखलपणे खोडून काढता आला नाही, नंतर त्याच्यावर विचार झाला. म्हणून तो इथे देत आहे, की - ज्या देशात ज्या धार्मिक आस्था मानणारे लोक अधिक आहेत, ते तिथल्या अल्पसंख्याकांवर अत्याचार करतातच, आपल्या इथे तर दुसरे काय होते आहे? पण स्वतःच्या डोळयांतील कुसळ दिसत नाही, नाही का?

a

श्रीलंकाचं उदाहरण जवळ आहेच. बौद्ध धर्म स्वीकारलेला देश. बौद्ध धर्माचा पायाच अहिंसा, प्रेम, शांती, करुणा हे आहेत. पण तिथले बौद्ध ही शिकवण विसरून तिथल्या अल्पसंख्याक व परधर्म आचरण करणाऱ्यांवर अत्याचार केल्याच्या बातम्या आपण वाचल्या आहेत. मी तर धर्मच त्यागला पाहिजे म्हणतो, पण असं म्हणताना हे बोलणं देखील बाळबोध ठरेल, की धर्म त्यागल्यावर सगळे शहाणे सुरते होतील. नाही, तेव्हा दमन करण्यासाठी दुसरं काहीतरी शोधलं जाईल. ही भावना येते स्वतःला श्रेष्ठ समजण्यातून. त्यामुळे तिथे धर्म नसेल, तर कदाचित दुसरं काही तरी येईल. आणि अत्याचार चालूच राहतील... मानवाचा हा स्वभावधर्मच आहे हा.

माणूस जातीचाच प्राणी, म्हणून तो कितीही सिव्हीलाईज्ड् झाला, तरी त्यांचं उपजत, अंगचं पशुपण काही सोडत नाही. जंगलात जसं मोठा भक्षक प्राणी लहान प्राण्यांना खातो किंवा पाण्यात जसं मोठा माझा लहान मासे व जलचर प्राण्यांना खातो. तसंच आपण अजूनही वागतो, संस्कृती निर्माण करून देखील. संस्कृतीने सभ्यता व संस्कार सोबत घेऊन यायचे असते, आपण मात्र संस्कृती तर निर्माण केली, पण जंगलराज याचंच आपण पालन करतो आहोत अजूनही.

म्हणून आम्हाला कोणाला तरी संपवण्याची इच्छा होत राहते. म्हणून त्यासाठी आम्हाला कळपाचा मुखीया, राजा हवा असतो. म्हणून संस्कृतीने सोबत घेऊन आलेली लोकशाही आपल्याला नकोशी वाटते, जिथे सर्व एक स्तरावर समान अधिकारी आहेत.

a

असो, तर लोकांना हे सध्या सत्तेतील लोक कसे उल्लू बनवत आहेत याचे आणखी एक उदाहरण देतो, महत्वाचे वाटते म्हणून, तशी उदाहरण भरपूर आहेत... असो... तर...

10 जानेवारीला प्रकाश परांजपे म्हणून एक फेसबुक मित्र आहे (त्यांची माझी वैयक्तिक ओळख नाही. त्यांच्या पोस्ट्स पटल्याने त्यांना रिक्वेस्ट टाकली होती) त्यांनी एक फेसबुक पोस्ट केली होती, त्याचा स्क्रिनशॉट मी माझ्या इन्स्टाग्राम स्टोरीला ठेवला,

ती पोस्ट जशीच्या तशी, अशी -

"२०१४ नंतर स्वतःला देशभक्त म्हणवणाऱ्यांचे पूर्वज १९४७ पूर्वी ईंग्रजांची जीहुजुरीच करत होते. जिनांच्या पाकिस्तानच्या मागणीला न सावरकरांनी विरोध केला ना १९२५ साली स्थापन झालेल्या संघाने. मात्र गांधींनी फाळणी का स्वीकारली हा आक्षेप घ्यायला संघ व संघावाले सगळयात पुढेच असतात १९४७ मध्ये संपुर्ण देश जेव्हा स्वातंत्र्य दिवस साजरा करीत होता तेव्हा ७९ वर्षाचा म्हातारा गांधी नौखालीत आजच्या बांगलादेशात अल्पसंख्यांक हिंदुंचे संरक्षण करीत होता आणि संघ काय करीत होता हे मात्र विचारू नका. तो हे स्वातंत्र्य खोटे आहे म्हणत काळा दिवस साजरा करत होता. स्वयंघोषित देशभक्तांचे वास्तव या चंद्रकांत झटाले यांच्या पुस्तकावर आधारीत"

यावर मग हे वाचून माझ्या एका मित्राने मला मेसेज केला, तो असा -

"पाकिस्तान वेगळा झाला खरं तर ही चांगलीच गोष्ट झाली. जर वाईट गोष्ट काय झाली असेल, तर ती ही की पाकिस्तान सोबतच्या वॉर मध्ये नेहरूनी कश्मीर वापस का नाही घेतला."

त्यावर मी त्याला दिलेले उत्तर -

"प्रथम, तू हा मेसेज गांधी, नेहरू यांच्या बद्दलच्या द्वेषातून केला आहेस हे मला माहित आहे, तरी तूला सत्य जाणून घ्यायचं आहे असं समजून मी उत्तर देतोय. द्वेष करण्यासारखं त्यांनी काय केलं आहे ते मात्र न कळण्यापलीकडचं आहे. असो... अनेको राष्ट्रप्रेमी आणि राष्ट्रहित पाहणाऱ्यांनी सोबत निःस्वार्थपणे एक राष्ट्र उभा केलं आणि आज त्यांचेच वंशज त्यांना शिव्या देत आहेत. हे म्हणजे मुलाने आज्या पणज्याला तुम्ही आमच्यासाठी काय केलं असं कृतघ्नपणे उद्धट विचारल्यासारखं आहे.

"पाकिस्तान वेगळा झाला हे तुझं बोलणं नक्कीच दुर्दैवी आहे. आरएसएस आणि भाजपची हीच तर देन आहे, त्यांनी अविचारी आणि अ-अभ्यासू लोक निर्माण केलेत आणि करत आहेत. असो. पण त्यांना बोलल्यावर तू ट्रिगर झालास, आणि त्यांचा नाकर्तेपणा लपवण्यासाठी तू पोकळ युक्तिवाद करायला आलास. नेहरू, गांधी किंवा अन्य कोणी काय केलं हे विचारत असताना त्यांनी देशासाठी काय केलं हे तर जग जाहीर आहे. फक्त थोडं वाचन करावं लागेल. त्यांना ऐकावं लागेल जे पुराव्यानिशी बोलतात. पण त्याचवेळी सावरकर, हिंदू महासभा आणि आरएसएस कुठं होते संपूर्ण स्वातंत्र्य लढ्यात?

"कुठेच नाही. उलट देश तोडण्याचे त्यांचे प्रयत्न चालू होते. द्विराष्ट्र सिद्धांत सावरकरांनीच मांडला. जिनाच्या पाकिस्तान निर्मितीच्या मागणीला

a

सावकार पाठिंबा देतात. (आणि तुम्हीही म्हणता, की पाकिस्तान वेगळा झाला हे बरं झालं.)

"आणि या लोकांचे वैचारिक वंशज आज आम्हाला देशभक्तीचं प्रमाणपत्र देणार? हे स्वतः देशभक्त आहेत काय? तर नाही. फक्त देशभक्ती या गोंडस नावाखाली एक मूर्ख अंधभक्तांची ट्रोल आर्मी हे लोक तयार करत आहेत. देशभक्त होण्याऐवजी एक चांगले व डोळस नागरिक होणे अधिक आवश्यक आहे, कारण हिच खरी देशभक्ती आहे. आपल्या पूर्वजांबद्दल, ज्यांनी देश स्वतंत्र करायला आपलं जीवन वेचलं त्यांच्याबद्दल कृतज्ञ असणं हीच तर देशभक्ती आहे. देश हा जमिनीने नाही बनत; देश बनतो, तो माणसांनी! आणि हे नेहरू सकट त्यावेळच्या सर्व स्वातंत्र्य सेनानींना माहीत होतं, जे दुर्दैवाने आपण दुर्लिक्षत करतोय. त्यावेळी देशासह कश्मीर मधील आपल्या माणसांना संरक्षित करणं हे अधिक महत्त्वाचे होते.

"ठीक आहे पाकिस्तान वेगळा झाला हे तुमच्या दृष्टीने योग्य आहे हे जरी धरले, तर मग गांधींच्या व नेहरूंच्या नावाने गळे का काढायचे मग? की त्यांच्यामुळे वेगळा झाला म्हणून? बरं पाकिस्तान वेगळा झाला नसता, तर कश्मीरचा प्रश्न उभाच राहिला नसता हे कसं लक्षात येत नाही तुमच्या. का आपल्या पोकळ हिरोजचं समर्थन करतांना काहीही बिना सिरपैर युक्तिवाद मांडायचाच.

"नेहरू व गांधी नक्कीच शक्तिशाली होते, पण इंग्रज व जिना त्यांना जुमानत नव्हते. शिवाय, निर्णय कोणी एक घेत नसतो. नेहरूंना तर कश्मीर हवा होता, कारण त्यांचा जन्मच तिथला आहे. पण पटेल यांचं मत होतं, की कश्मीर

गेला तरी चालेल. त्याच्यापेक्षा इतर संस्थानं अधिक महत्वाची आहेत. पण नेहरूंनी हट्टाने कश्मीर मिळवला आहे. आणि तोही पूर्ण! हो पूर्ण! कारण पाकव्याप्त कश्मीर जो आहे तो भारताचाच आहे. भाजप व आरएसएस एवढी टिपण्णी करतात, मग हा प्रश्न येतोच, की त्यांनी का नाही बरे 10 वर्षांत कश्मीरचा तो भाग परत मिळवला? चूक काढायच्याच तर सगळ्यांच्या काढा ना. सोयीनुसार का?

"कोणत्याही राजकारण्याच्या आहारी सुजाण नागरिकांनी जाऊ नये हे सुज्ञ नागरिक असण्याचं पहिलं व महत्वाचे लक्षण आहे. ते असलं काही बोलतच असतात, कारण लोकांमध्ये फूट पडावी. त्यामुळे आरएसएस आणि भाजपकडून काही वक्तव्य आलं, तर ते आधी खोटं आहे हे ध्यानात घ्यावं. कुठून ही काही माहिती कानावर पडली, तर ती खरी न मानता स्वतः शोध घ्यावा व सत्य समजून घ्यावे हे समजदार नागरिकाचं दुसरं लक्षण.

"जेव्हा आपण त्याकाळच्या नेत्यांवर आणि स्वातंत्र्य सेनानींबद्दल बोलतो, तेव्हा आधी स्वतःला त्या ठिकाणी ठेवावं. आणि त्यावेळी आपण काय केलं असतं याचा विचार करावा. नक्कीच आपल्यासारख्या सामान्यांना ते प्रेशर पण सहन झालं नसतं. पण आता इतक्या वर्षांनंतर आपण त्यांच्या चूका काढत आहे. इंग्रजांचे रट्टे आणि गोळ्या खायला नव्हतो ना आपण; आता सुखासुखी स्वातंत्र्यात जगतो, म्हणून असलं नेत्यांच्या चुका काढणं सुचतं. तेही त्यांनी न केलेल्या. कुठल्या तरी भपंक राजकारण्यांच्या वक्तव्यावरून. हे लोक कधी तुला पुरावे देणार नाहीत, संदर्भ देणार नाहीत. तरी मूर्खासारखे लोक त्यांचं बोलणं सत्य मानतात. त्यांचंच ऐक, जे तथ्य, सत्य आणि पुरावे देऊन बोलतात.

a

स्वतः अभ्यास कर. अजूनही इतिहास, नागरिकशास्त्र अभ्यास. आणि अभ्यास चालूच असला, तर वाढव, एवढंच सांगेन."

"काही लिंक्स खाली देत आहे त्या नक्की बघ. ऐक." लिंक्स -

1) https://youtu.be/xQz5yG6T5Jo?si=zVjkOciayGoZHroC

2) https://youtu.be/Z9C6YS_qYe8?si=QhgVdNScTYSNyZ50

3) https://www.youtube.com/live/VWbzrsZY0xs?si=EXbRckp3ycCULWqG

"या चॅनेलवरच नेहरूंबद्दल पूर्ण 8 भागांची सिरीज आहे. तीही बघ. नेहरू कळतील..."

त्यावर किमान ते व्हिडीओ त्याने बघावेत, तर नाही. लगेच तो युक्तिवाद करायला धावला आणि पुढचा मूर्खपणा करून बसला तो असा -

"मला एकच सांग भावा, तू राहूल गांधीला वोट देणार का येत्या इलेक्शन मध्ये? काँग्रेस हिंदू विरोधी आहे याची जाणीव आहे का तुला? मुस्लिमनी हिंदूंच्या सोबत काय केले आहे माहीत आहे का तुला? तुझ्या पूर्वजांनी काय सहन केले हे माहीत आहे का तुला? नाही. म्हणून ते सपोर्ट करत आहेस तू काँग्रेसला. पहिला स्वधर्माविषयी आस्था जागी होऊ दे तुझ्यात. मग माझ्याशी बोल."

a

आणि हे जसेच्या तसे मी इथे देत आहे. मला कळत नाही, हे शाळेत झोपा काढतात का? मोठे झाल्यावर एवढ्या खुळचट कल्पना इतक्या सहजासहजी कशा पेरता येतात यांच्यात? तर याचेही उत्तर आहे. हे लोक मुळातच धर्माचे संस्कार झालेले असतात. त्यामुळे मग धर्माला धरून काहीही सांगितले, की ते यांना लगेच पटते. मी फक्त त्याचे म्हणणे कसे खोटे आहे हे सांगितले. त्याला दाखवून दिले, की नेहरूंनी कश्मीर कसा भारतात आणला, तर त्याने मग युक्तिवाद करायला काही नाही म्हणून विषय भलतीकडे फिरवला. मी एकदा तरी म्हणालो या आमच्या संवादात, की मी काँग्रेसला पाठींबा देतोय? फक्त त्याच्या खोट्या आरोपांची सत्यता त्याला दाखवून देत होतो, पण या लोकांना रोगच लागला आहे, सगळं फक्त राजकारणाच्या चष्म्यातून बघायचं आणि समोरचा सत्य जरी मांडत असला, पण ते त्यांच्या आवडत्या पार्टीच्या व राजकीय व्यक्तीच्या विरोधात आहे असं समजून मग असंबद्ध काहीतरी बडबड करायची. आणि सत्य बोलणाऱ्याला देशद्रोही, शत्रू वैगरे मानून मोकळं व्हायचं. पण मी स्पष्ट बोलतो, जर कोणी देशद्रोही असेल, तर या घाण विचारसरणीचे लोक आहेत आणि हे मी 'डंके की चोट' वर बोलत आहे!

असो, मी त्याला मग पुढील रिप्लाय केला,

"म्हणून म्हणतो अभ्यास कर आणि बोल. माझ्याकडे असल्या मूर्खपणाला उत्तर द्यायला वेळ नाही... अनफॉलो केलास तर उत्तम." आणि त्याला मीच ब्लॉक करून टाकला.

तर हा माझा शाळकरी मित्र बरं का? समाजमान्य सक्सेसफुल असण्याच्या ज्या कल्पना आहेत, त्यानुसार हा माझ्यापेक्षा अधिक सक्सेसफुल

बरं का? पण तुमच्याकडे डिग्री आहे व तुम्ही चार पैसे कमवता म्हणून तुम्हाला अक्कल आहेच असं होतं नाही हे इथं स्पष्ट होतं.

या उदाहरणावरून समजलं असेल, की काय लेव्हलला लोकांना मूर्ख बनवलं गेलं आहे. आणि ते मूर्ख बनण्यातच धन्यता मानत आहेत, यांनी ठरवलंच आहे, की यांना जागे व्हायचे नाही, जे गुन्हेगारीचे, द्वेषाचे व भ्रष्टाचाराचे साम्राज्य पसरवले जात आहे ते खपवून घ्यायचे आहे यांना आणि का, तर यांचा लाडका पक्ष व लाडके राजकारणी यांच्या धर्माची रखवाली करत आहेत, सो कॉल्ड धर्म रक्षण करत आहेत.

देशाची बरबादी होण्यात या लोकांचा मोठा हात आहे, हे मी खात्रीने सांगतो.

द्वेषाच्या आगीत होरपळून देशबांधव एकमेकांना नष्ट करू नयेत व पर्यायी देशच नष्ट करू नयेत यास्तव परत वर म्हंटल्याप्रमाणे, आपण बदल घडावा यासाठी प्रयत्न करत रहावेच लागणार आहेत... मी काय करू शकतो, तर लिहू शकतो. म्हणून मग लिखाणातून समाज जागृतीचं (आता हा खूपच मोठा क्लेम आहे, पण दुसरी कोणती फ्रेज सुचत नाही म्हणून हे म्हणत आहे) काम करत आहे.

'धर्माचं रक्षण करणं' ही कन्सेप्टच मला समजत नाही. ज्या कोणत्याही धर्माला रक्षणाची गरज पडते, तो प्रत्येक धर्म नष्ट झालेलाच बरा, नाही का? आणि मी हे सर्वच धर्माबाबत बोलत आहे. कारण प्रत्येक धर्माच्या लोकांना त्यांचा धर्म हा असुरक्षितच वाटत असतो. धर्म रक्षिला गेला, तर आपले

a

अस्तित्व टिकून राहील असा यांचा गैरसमज असतो. म्हणून यांचा आटापिटा चालू असतो धर्म रक्षणासाठी.

पण जेव्हा माणसाने देव व धर्म यांची कल्पनाच केली नव्हती, तेव्हाही मानव होताच व त्याचे भौतिक व सामाजिक अस्तित्वही होते ही साधी बाब या धर्मपालक व धर्मरक्षकांच्या गावी येत नाही. बरे, या धर्मपालक लोकांना सत्य माहीत आहे व आपली सत्ता टिकविण्यासाठी लोकांना मूर्ख बनवत आहेत, असे जरी असले, तरी ज्यांना धर्माच्या नावाखाली मूर्ख बनवले जात आहे, त्यांनी तरी याचा विचार करावा, की देव-धर्म व अगदी देश ही संकल्पना नव्हती, तरी तेव्हाही माणूस होता. पण नाही येत असे काही त्यांच्या डोक्यात. ही शोकांतिका आहे. लहानपणी कधी डोक्यात फिट केलेलं ते सत्यच आहे असे मानून ते मरेपर्यंत भ्रमात जगत राहतात. धर्मासाठी मरणे व मारणे इथपर्यंत त्यांची विकृती जाते कधीकधी...

सर्व धर्मांतील सर्वच धर्मविश्वासू इतके धर्मांध असतात, की या अशा तकलादू धर्मांना 'तथाकथित' वाचवण्यासाठी मग कोणताही गुन्हेगारी व असंवैधानिक मार्ग स्वीकारावा लागला, तरी चालणार आहे यांना. ही प्रचंड मोठी काळजीची गोष्ट आहे. ते स्वतः हे करू शकत नाहीत, म्हणून यांच्या दृष्टीने जे यांचे लाडके राजकारणी हे करत आहेत त्यांना हे जोमाने पाठिंबा देत आहेत.

आणि तुम्ही कितीही जोर लावा, पण धर्म हा नष्ट होणारच कधी न कधी. तुम्ही कितीही 'एडीचोटी का जोर लावा.'

ते कसं त्यासाठी आपण आपल्या आपलं जवळचंच एक उदाहरण बघू - हडप्पा, मोहेंजोदडो या संस्कृती घेऊ. त्या लोकांच्याही काही मान्यता

a

असतील, त्यांची स्वतःची संस्कृती, सभ्यता असेल. त्यांना त्यावेळी वाटलं नसेल, की हे टिकावं? पण किती टिकली? त्यांची भाषा देखील आपल्याला आज वाचता येत नाहीये.

अजून अशा कितीतरी पुरातन संस्कृती आहेत ज्या नष्ट झाल्या, ज्यांचे देव आज कोणी पूजत नाही, धर्म कोणी पाळत नाही, भाषा कोणी बोलत नाही. पण काही फरक पडला आहे का या पृथ्वीवर त्याचा?

आपलं पण कधी न कधी तेच व्हायचं. त्यामुळे ही धर्मांधता काही कामाची व उपयोगाची नाही. जिथे आपण माणूस अमर आणि शाश्वत नाही, तिथे आपल्या माघारी आपणच आपल्या कल्पनेने निर्माण केलेल्या या गोष्टी नष्ट झाल्याचं, तर आपल्याला दुःख होण्याचेही कारण नाही. दुःख व्हायला आपण इथं असणार तर आहोत का? मग कसल्या नको त्या संस्कृती रक्षणाच्या, धर्म रक्षणाच्या, भाषा रक्षणाच्या, इत्यादी अस्मितांमध्ये अडकून बसलोय? मानव बुद्धीने जर इतर प्राण्यांपेक्षा प्रगल्भ आणि उन्नत असेल, तर याच बुध्दीचा उपयोग माणूस स्वतःला बंधनं घालून घेण्यात करतो हाच मुळात वेडेपणा आहे. आपण खरंच बुद्धिमान आहोत, तर मुक्त असायला हवे आपण. पण आपण स्वतःला भ्रामक कल्पनांत जखडून ठेवलंय, त्यांना आपलं अस्तित्व मानून त्या खोट्या अस्मिता कुरवळण्यासाठी एकमेकांशी भांडतो आहोत. काय मूर्खपणा आहे हा...!

आणखी एक चीड आणणारी घटना आठवली -

जेव्हा साक्षी मलिक, विणेश फोगट, बजरंग पुनिया हे ब्रिजभूषण शरण सिंग याने केलेल्या लैंगिक छळाविरुद्ध आंदोलन करत होते. तेव्हा त्यांनी त्यांचे मेडल्स ते गंगेत अर्पण करणार असल्याचे जाहीर केले होते. ती स्टोरी मी व्हॉट्सएप स्टेटसला लावली, तर एक भाजप व मोदी समर्थक मला मेसेज करतो, की 'आधी करा म्हणावं.'

तर आणखी एकाने मला प्रत्युत्तर म्हणून एक स्टेटस ठेवला ज्यात साक्षी व विणेश यांना पोलीस मारत होते व त्यांचे रक्त सांडलेले ते फोटो होते. त्यावर तो पुन्हा दात काढत हसण्याचे इमोजी लावून होता. याला असुरी आनंद मिळत होता, त्यांना मारून त्यांचे रक्त काढलेले बघून. या नीच स्तरावर सत्तेतील राजकारण्यांनी तुम्हाला नेऊन ठेवलं आहे आणि तुम्हाला त्यात वावगं काही वाटतही नाही.

आता आपण म्हणाल, की त्याने मला प्रतिउत्तर म्हणून हे केलं असं मी कशावरून म्हणतो? तर मी स्टेटस ठेवण्यापूर्वी त्याने एकही राजकीय स्टेटस तोवर कधी ठेवला नव्हता. पण माझा स्टेटस त्याला त्याच्या प्रिय मोदींवरची टीका वाटली म्हणून त्याने मोदींची पाठराखण करताना दोषी असणाऱ्या ब्रिजभूषण याचं पण समर्थन करून टाकलं. बरं हा चित्रपट सृष्टीत दिग्दर्शक म्हणून काम करणारा व्यक्ती बरं! हे असले कलुषित मनाचे आणि निर्बुद्ध आंधळे लोक कलेच्या क्षेत्रात भरल्यावर समाजाला आरसा तो कोणी दाखवायचा? किंवा समाजाच्या बाजूने कोणी आवाज उठवायचा? हे असले लोक मग त्या कलेचा वापर करून समाज विघातक कार्यच करणार...

a

हे असल्या हलक्या मनोवृत्तीचे विशिष्ट राजकारणी प्रेमी, खुनशी डोकी असलेले समर्थक, पुन्हा हेच छत्रपतींच्या नांवाने घसा बसूपर्यंत ओरडणार. पण स्त्रियांवर अन्याय अत्याचार करणाऱ्यांचं समर्थन करणार, हे करणाऱ्यांना डोक्यावर घेऊन नाचणार. यावेळी महाराजांची शिकवण कुठं जाते? का महाराज फक्त दंगा घालण्यासाठी आहेत तुमच्यासाठी? या राजकारण्यांनी किती द्वेषी, अमानवीय, असंवेदनशील बनवलं आहे या समाजाला, धर्म आणि देवाचं नाव घेऊन? म्हणजे तुमचा आवडता, प्रिय राज्यकर्ता खरा, बाकी सगळे एकजात खोटे? किती भोळेपणा आहे हा? मुळात सत्तेवर असणाऱ्यांना तुम्ही राजा मानता हाच मोठा मूर्खपणा आहे.

स्त्रीची अवहेलना झालेने यांना काही फरक पडत नाही, कारण हे मानत असलेल्या धर्मात व संस्कृतीतच स्त्रीला दुय्यम स्थान आहे आणि तेच संस्कार तर यांच्यावर झालेले. तसं बघायला, स्त्रियांची ही स्थिती प्रत्येकच धर्म व संस्कृतीत आहे, तर दोष कोण एकाला का द्यावा...

आणखी एकाचा रिव्ह्यू आला गर्भगृहवर. ते कोल्हापूरचे होते. ते म्हणतात,

"आपली कथा खूपच सुंदर आणि जागेला खिळवून ठेवणारी आहे. पण भारत देशात देशभक्त मुस्लिमांना कोणी ही आतंकवादी म्हणत नाही, देशभक्तच म्हणतात. पण सगळे आतंकवादी मुस्लिम असतात हे पण सत्य आहे. याउलट 85% हिंदू असणाऱ्या देशात मुस्लिम आनि ख्रिश्चन लोकांना जास्त सवलती मिळतात, त्यांचेच जास्त लाड केले जातात, एक गट्ट मते मिळतात म्हणुन."

a

मी त्यांना दिलेलं उत्तर असं,

"मुद्दा तो नाहीच कथेचा. आपण प्रकरण 32 नागरिकशास्त्र हे वाचावे म्हणजे मला काय सांगायचे आहे ते समजेल. कथा आवडली त्याबद्दल धन्यवाद."

दुसरी कमेंट मी अशी केली त्यांना -

"मुस्लिम व ख्रिश्चन यांना जास्त सवलती मिळतात हे आपल्या डोक्यात भरवलं गेलं आहे राजकीय लोकांकडून. जर संविधानात सर्वांना समान स्थानावर ठेवलं आहे व एकच दर्जा दिलाय त्यामुळे तिथेच हा युक्तिवाद फोल होतो सर.

"सगळे मुस्लिम आतंकवादी असतात असे म्हंटलं, तर मग भारतातील पण सर्व मुस्लिम आतंकवादी आहेत असा अर्थ होतो, आणि हे खरं नाही. आपला एखादा मुस्लिम मित्र असेलच की. आणि कोल्हापूरात तर हिंदू आणि मुस्लिम हे कधीच वेगळे नाहीत. शाहू महाराजांची ती शिकवण नाही आपल्याला. त्यांनी सर्वंच धर्म, जाती, जमातींसाठी, सर्वांच्या न्याय्य हक्कासाठी, सर्वांच्या शिक्षणासाठी एकाचवेळी काम केले. त्यांनी कधी भेदभाव केला नाही. आणि त्यांच्याच कोल्हापूर मध्ये राहून आपण असा विचार करणे बरोबर नाही असे मला वाटते."

आता यांच्या कमेंटचं डिसेक्शन करू. मुस्लिम व ख्रिश्चनांना जास्त सवलती मिळतात असा त्यांचा अक्षरशः आरोप आहे. त्यांच्या बोलण्यात हा राग निहित आहे, की हिंदूंपेक्षा त्यांना जास्त सवलती मिळतात. आणि हा रोख नक्कीच आरक्षण बाबतीत सुद्धा असणार हे उघडच आहे.

a

पण लोक एक लक्षात घेत नाहीत, की आरक्षण किंवा कोणत्याही सवलती या धर्माच्या आधारवर नाहीत, तर त्या कॅटेगरीज वर आधारित आहेत. या कॅटेगरीज सामाजिक व आर्थिक स्तरांवर अवलंबून आहेत. कारण असंख्य वर्षं जे सामाजिक वर्ग मागे राहिले त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात येता यावं आणि त्यांना सामाजिक समान वागणूक, समान अधिकार, समान संधी व समान न्याय मिळावेत म्हणून. आणि त्या कॅटेगरीजमध्ये मग हिंदूंमधील काही अप्रगत समजल्या जाणाऱ्या जाती जमाती देखील येतात. मग तुम्ही हा आरोप कसा करू शकता, की मुस्लिम व ख्रिश्चन यांना जास्त सवलती मिळतात? व यावर राग धरू शकता?

आणखी एक गोष्ट ध्यानात घेऊ, की ज्यांना आरक्षण मध्ये स्थान नाही असे हिंदू ज्यांना आरक्षणात स्थान आहे अशा हिंदूंचा देखील द्वेष करतात. का तर ते ओपन कॅटेगरी मध्ये येतात व त्यांना आरक्षणाचा लाभ मिळत नाही व यांना मिळतो. म्हणून तर ते स्वतःला सवर्ण समजतात. त्यांना वाटतं, की हे आरक्षण मिळणारे लोक त्यांचा हक्क मारत आहेत. पण धर्मशास्त्राप्रमाणे ब्राह्मण वर्ग सोडला, तर सगळेच एका पंगतीतले आहेत ही गोष्ट हे स्वतःला श्रेष्ठ समजणारे ध्यानातच घेत नाहीत. हे फक्त ओपन मध्ये आहेत म्हणून स्वतःला विलग समजत, स्वतःला उच्चवर्णीय हिंदू समजत आहेत... आणि त्यांच्या नजरेत जे खालचे आहेत, ज्यांना आरक्षणाचा लाभ मिळत आहे, त्यांचा दु:स्वास करत आहेत. किती अज्ञान आहे हे...

माझा एक जैन मित्र मागे मला म्हणाला होता, की 'संविधानात समानता नाही' म्हणून.

a

हा असं का बोलला याला उघड कारण होतं, हा भाजप समर्थक. कधी काळी याचे आजोबा आमच्या गावातील भाजपचे अध्यक्ष. लहानपणापासून हे वायरिंग साहजिक याच्यात झालेलं हे उघड आहे. घरात सतत गोदी मीडिया चालू असतो.

त्याला मी फक्त एवढंच म्हणालो, की 'संविधान वाच एकदा.'

जैनांनी हे ध्यानी घ्यावं, की ज्या हिंदुत्ववादाची पताका हे लोक डोक्यावर घेऊन नाचत आहेत, त्यांच्या पूर्वजांची दुर्दशा याच धर्मपंडितांनी केली होती, म्हणून तर त्यांनी 'हिंदू' धर्म त्यागून 'जैन' पंथ स्वीकारला होता. यांचं दुर्दैव हे, की यांनी आपला इतिहासच पाहण्याची कधी तसदी घेतली नाही. आज हे आरक्षणात बहुतांश ओपन मध्ये पडतात म्हणून स्वतःला सवर्ण समजून ब्राह्मण्यवादाच्या वळचणीला जाऊन बसले आहेत आणि बहुजनांचा दुस्वास करत आहेत, त्यांना आरक्षण मिळते म्हणून. पण भविष्यात हे हिंदुराष्ट्र झालेच, तर यांना मानाचे स्थान मिळेल का याचा विचार यांनीच करावा.

माझे मित्र हर्षवर्धन यादव यांनी जैन धर्मावर त्यांचे काही अभ्यासपर लेख मला वाचायला पाठवले. त्यातून मला समजले, की इसवीसनपूर्व सहाव्या शतकातील जैन धर्माचे 24 वे तिर्थंकर भगवान महावीर यांचे पहिले तत्वच समानता हे होते. त्यांनी आर्थिक व सामाजिक समानतेचा प्रचार व प्रसार केला होता. जैन धर्मात अगदी सुरवातीपासून लोकशाही हा महत्त्वाचा पाया दिसून येतो. भगवान महावीरांच्या काळातच वज्जी महाजनपद, ज्याची राजधानी वैशाली होते, तेथे एक समृद्ध प्रजासत्ताक अस्तित्वात होते. वैशाली सोबतच

a

लिच्छवी, शाक्य, मल्ल व अजूनही काही जनपदे प्रजासत्ताक गणराज्ये म्हणून त्याकाळी अस्तित्वात असल्याचे दिसून येते.

स्वातंत्र्य, सह-अस्तित्व, सहिष्णुता, बंधुता, अहिंसा, अपरिग्रह (सर्वसंग परित्याग) यासोबतच भगवान महावीर यांच्याकडून सापेक्षतावादाचे तत्व जैन विचारधारेत महत्त्वाचे मानले गेले आहे, सापेक्षता म्हणजे सर्वांना समान संधी. कोणी उच्च नाही, कोणी निच्च नाही हे देखील यातून सांगितले गेले. सामाजिक दुफळी कमी करण्यासाठी सापेक्ष धोरण आचरल्याचे दिसून येते.

परंतु आज हाच जैन समाज आरक्षण मिळणाऱ्याच्यासाठी नाके मुरडतो. जेव्हा माझा जैन मित्र संविधानात समानता नाही म्हणतो, तेव्हा तो अनुसूचित जाती जमातींना मिळत असलेले आरक्षण डोक्यात ठरवूनच बोलत होता हे मला तक्षणी स्पष्ट झालं होतं. आरक्षणात ओपन मध्ये पडल्यानेच हे लोक स्वतःला सवर्ण समजत आहेत हे स्पष्ट होते इथे. आपले विचारधन व आचरण पद्धतीच हे जैन लोक ब्राह्मण्यवादाच्या नादी लागून विसरून चालले आहेत. जैन धर्माची स्थापनाच मुळात वैदिक ब्राह्मण धर्मातील यज्ञ व कर्मकांड यांच्या विरुद्ध धार्मिक सुधारणा करण्यासाठी झाला आणि आज हाच जैन समाज ब्राह्मण्यवादी मानसिकतेला डोक्यावर बाळगून एकाधिकारशाहीचा पुरस्कार करत आहेत. यांनी खरेच आपला इतिहास अभ्यासावा.

लिंगायतांची गती पण यांच्यासारखीच. भले काही लिंगायत ओबीसी मध्ये मोडतात, तरी ते इतर जाती जमातींना हीन लेखताना दिसतात. कारण यांच्यात ब्राह्मण्य इतकं भिनलं आहे, की बसवेश्वर यांनी जे करू नका असे सांगितले आहे, म्हणजे भेदभाव, तेच हे लोक करत सुटले आहेत. बसवेश्वर

a

आपल्या वचनांतून वारंवार सांगतात, की 'अभिषेक घालू नका. मंदिरे बांधू नका. निसर्गाला देव माना बाकी देव कोणता नाही... दगडाच्या नागाला पूजता, खरा नाग दिसला की त्याला मारता याला काय म्हणावं?' प्रेम, बंधुत्व, समता, यांची शिकवण दिलीच शिवाय महात्मा बसवेश्वर यांनी जातीव्यवस्थेपासून मुक्त असलेल्या समाजात सर्वांना समान संधी दिल्या आणि शारीरिक कष्टाचा उपदेश केला, ज्याला ते कायक असे म्हणत. असं बरंच ज्ञान बसवण्णा देतात, व स्वतः पुढे होऊन सुधारणावादी कार्यही करतात, पण कधी कोणी त्यांचे चरित्र, त्यांनी लिहिलेली वचने वाचली आहेत? कर्मकांडे करण्यात व जातीभेद इमनाने पाळण्यात लिंगायत समाज अगदी मश्गुल आहे. प्रति ब्राम्हण व्हायचे आहे ना यांना. आणि हे समजतात ही तसेच स्वतःला...

काही वर्षांपूर्वी एक लिंगायत पुरोहित मला म्हणाले, की 'स्त्रियांनी मंदिराच्या गाभाऱ्यात प्रवेश करू नये. स्त्रीच्या बांगडीचा स्पर्शही होता कामा नये पिंडीला.'

मला अक्षरशः चीड आली, परंतु मी काही बोललो नाही. मूर्खाला कितीही खोडा, त्याच्या डोक्यात प्रकाश नाही पडायचा. म्हंटलं याच्या डोक्यात प्रकाश पडायचा असता, तर मुळात हा जंगम झालाच नसता. म्हणून तंडलो नाही त्याच्याशी.

पण मला हा आघात होता, की जिथे बसवेश्वरांनी महिलांना पुरुषांच्या समान स्थान मिळवून दिले, तिथे त्याच लिंगायत पंथाचा एक जंगम (पुरोहित) 'हे' म्हणतो.

देशातील आद्य लोक-संसद जिला अनुभव मंडप म्हंटले जायचे, ती निर्माण करण्याचं श्रेय बसवण्णांना जातं. जिथे स्त्री व पुरुष समान अधिकारी होते. भारतीय लोकशाहीचं चित्रण या अनुभव मंडपात दिसतं, जिथं समाज जीवनावर वाद विवाद करण्याचा अधिकार पुरुषांइतकाच स्त्रीला होता. ग्रंथ निर्माण करण्याचा अधिकार पुरूषांसोबतच स्त्रीयांना दिला गेला होता. 770 सदस्यांपैकी 60 स्त्रिया होत्या अनुभव मंडपात. हा आकडा दिसायला आता जरी लहान वाटत असला, तरी आपण हे 12 व्या शतकाविषयी बोलतोय. हे ध्यानात घेता हा आकडा किती मोठा आहे हे समजून येते. शिवाय लिंगायत झालेल्या स्त्रिया मोठ्या प्रमाणात होत्या. त्यांनाही तेच समान अधिकार असणार, जे पुरुषांना होते हे उघड आहे.

असे असता लिंगायत शरण (लिंगायत पुरुष अनुयायी) व अगदी शरणी (लिंगायत स्त्री अनुयायी) ही आता स्त्रियांचा अधिकार नाकारत आहेत? त्यांना हीन व तुच्छ लेखत आहेत?!

स्त्रीचा विटाळ जर यांना होतो, तर मग स्त्रीच्याच योनीतून जन्म घेणाऱ्या या सर्वच धर्मांच्या धर्ममार्तंड, धर्मरक्षण, धर्मवाहकांना आपल्या शरीराचा विटाळ का वाटत नाही?! याचं कारण आहे, की तिथं काम करत असते, ती श्रेष्ठत्वाची व स्वतःवर फाजील प्रेम करणारी भावना.

असो...

सदर महाशयांनी कथा पूर्ण वाचली व आता यांची संपूर्ण कथेवर नवीन प्रतिक्रिया आली आहे, ती अशी -

a

"खूप छान कथा. पण सध्याचे राजनीती बघता कोणी नेता असे करू शकणार नाही. पण 12-15 वर्षांपूर्वी नक्की झाले असते. वैसे "अबकी बार 400 पार"

काय बोलावे? यांना कथा आवडली म्हणून आनंद मानावा, की कथा वाचून देखील यांच्या डोक्यात प्रकाशच पडला नाही यांचे दुःख करावे? म्हणजे 'व्यक्ती पूजा करू नका, कारण ते करणं तुमच्यासाठी घातक आहे. विवेकाने व तर्कसंगत विचार करा.' हे सांगणारे संपूर्ण रामायण वाचून पुन्हा हे 'अबकी बार मोदी 400 पार' म्हणजे 'रामाची सीता कोण?' असं म्हणून निघाले. जर हे असेच होणार असेल, तर ही माझी हारच ना? कथा आवडून पण जर माझे म्हणनेच यांच्यापर्यंत पोहोचत नसेल, तर ही हारच माझी... पण काहीजण व कोणीतरी असतील, जे विवेकवादी व तर्कशुद्ध होतील म्हणून प्रयत्न हा चालूच ठेवायचा... असो तर;

मी यांना उत्तर पाठवले ते असे -

"लोकांना बेसिक संविधान समजावे, आपली नागरी कर्तव्ये काय आहेत आणि मतदान करताना कसे केले पाहिजे, नेता कसा निवडला पाहिजे अशा गोष्टी समजवून सांगण्यासाठी हा लेखन प्रपंच होता. तेवढं वाचकांपर्यंत पोहोचलं की माझी कथा सफल झाली असे मी मानेन. हे समजावून सांगण्यासाठी जशी पात्रे आवश्यक होती, तशी ती आली आहेत. बाकी काही उद्देश नाही कथेचा. आपण स्टिकर्स स्वरूपात दिलेल्या प्रोत्साहनासाठी अनेक धन्यवाद."

a

ही माझी प्रतिकिया त्यांनी लाईक केली आहे. पण तरी डोके उघडले आहे का ते त्यांनाच माहीत.

उदारणे देत गेलो, त्यांची स्पष्टीकरणं देत गेलो, तर कादंबरी पेक्षा समारोपाचे विवेचनच मोठे होईल. पण वानगी दाखल व माझा मुद्दा स्पष्ट करण्यासाठी काही उदाहरणे दिली, जी ठसठशीत माझ्या डोक्यात राहिली आहेत. आता या मनोगतावरून व कादंबरी वरून देखील मला अनेकांकडून जाब विचारला जाईल हे उघड आहे. कदाचित ही कादंबरी बहुतांशी लोकांच्या नावडतीची बनेल. पण म्हणून सत्य बोलायचे का थांबायचे?

वर एका मॅडम यांचा रिव्ह्यू दिला, त्यात त्या म्हणत आहेत, की मी प्रपोगेंडा करतोय सरकार विरोधात. पण ज्यांना असे वाटते, की विशिष्ट पक्ष आणि सरकार यांच्या विरुद्ध अपप्रचार करत आहे, उलट तेच तो पक्ष किती चांगला आहे हे सांगण्यासाठी खोटा व जनतेची दिशाभूल करणारा प्रचार करत असतात असे मी म्हणेन.

मी इथं सांगू इच्छितो, 'एव्हरी स्टोरी इज प्रपोगेंडा!' कारण प्रत्येक लेखक कथेतून अखेर त्याचे विचारच मांडत व वाचकांपर्यंत पोहोचवत असतो. फक्त प्रश्न हाच असतो, की तो चांगला प्रपोगेंडा आहे, की वाईट प्रपोगेंडा. जर हे तथाकथित धर्मरक्षक व त्यांचे समर्थक अनेक माध्यमांतून वाईट व खोटा, समाजविघातक प्रपोगेंडा पसरवून जर समाजाचं मनोबल बिघडवत आहेत, तर आम्ही 'गुड प्रपोगेंडा' करून समाजाचं डोकं ठिकाणावर रहावं याचा प्रयत्न का करू नये? आमचा आवाज कदाचित त्यांच्या एवढा मोठा नसेल, पण म्हणून आम्ही सत्यासाठी ओरडायचं थांबायचं का?

a

पण असो...

जाता जाता अखेरची एक आठवण सांगतो, जी महत्त्वाची वाटते, मागील वर्षी माझ्या आईच्या मामांच्या श्राद्ध विधीला मी त्यांच्या गावी गेलो होतो. तिथे जमलेले बरेच शेतकरी व काही नोकरदार. शेतीवर बोलता बोलता विषय आला, तो पंजाब, हरियाणाच्या शेतकऱ्यांनी दिल्लीत केलेल्या कृषी कायद्याविरोधी आंदोलनावर. सर्व शेतकऱ्यांचे एकमताने हेच म्हणणे होते, की त्यांनी ते आंदोलन करून आमचे नुकसान केले. आणि नोकरदार देखील त्यांच्या हो ला हो देत होते. मला ते एकूणच असह्य झालं. हे लोक यांच्याच हक्कांबद्दल किती इग्नोरंट व अज्ञानी आहेत असं वाटलं. शांत व अगदी लाजाळू स्वभावाचा, पण डोक्यात तिडीक जाऊन मी बोललो, त्यांना मला जितकं समजलेलं तितकं समजावून सांगितलं, की हे आंदोलन कसं गरजेचं होतं व संपूर्ण भारतभर पसरलेल्या शेतकऱ्यांना संरक्षण मिळावं म्हणून ते शेतकरी तिथं लढत होते. आणि तुम्ही त्यांनाच बोलताय? ते कायदे लागू झाले असते, तर तुमचा फायदा नाही नुकसान होतं, ते होऊ नये म्हणून ते तिथं बसून होते.

यावर मग एक नोकरदार नातलग म्हणाले, की 'हे कायदे कोणी समजावून का सांगत नाही.' म्हणजे गैरसमज व्हायचा नाही असा त्यांचा मतितार्थ.

तेव्हा मी म्हणालो, की "जे समजावून सांगतात, त्यांना तुम्ही शिव्या देता."

सर्वच शांत झाले होते. त्यांना पटलं होतं कदाचित, की जे आंदोलन झालं, ते त्यांच्या नुकसानीचं नव्हतं, तर त्यांचे नुकसान होऊ नये यासाठी होतं.

तेव्हा एक गोष्ट लक्षात आली, की खोटा प्रचार करून सत्ताधाऱ्यांतर्फे व त्यांच्या समर्थकांतर्फे लोकांना कसं भ्रमित केलं जातं व त्यांच्या चांगल्यासाठी सुद्धा जे आंदोलन करतात त्यांच्या विरुद्धच यांना कसं भडकवलं जातं. परंतु हेही ध्यानी आलं, की व्यवस्थित समजावलं, की बहुतांश जनता समजते देखील.

आता सांगायची गोष्ट, की मतदान कुणाला करावे हे मी सांगू शकत नाही, तो माझा अधिकारही नाही आहे. पण कुणाला करू नये हे मी सांगूच शकतो. देशातील नागरिकांत वाद, भांडणे पेटवून देऊन देशाची शांती व बंधुता बिघडवण्याचे काम करणाऱ्यांना नका करू मतदान. पण पुन्हा; ते देखील तुमच्या विवेकावर अवलंबून आहे, की तुम्ही काय करता...

इथे हेही नमूद करणे मी माझे कर्तव्य समजतो, की सगळेच काही वाहवत गेलेत असे नाही. आतापर्यंत काही चांगल्या प्रतिक्रिया सुद्धा आल्या. त्यांना नावानिशी शाऊट आऊट देणे मला गरजेचे वाटते, कारण बेशुद्ध झालेल्या या समाजात कोणीतरी चेतनामय शिल्लक आहे हे समजलं पाहिजे. त्यामुळे त्यातील महत्वाच्या वाटणाऱ्या प्रतिक्रिया इथे देतोय.

'नेहा भिडे' नावाच्या एक वाचक नागरिकशास्त्र प्रकरणावर प्रतिक्रिया देताना म्हणाल्या -

"संविधानावरचं तुमचं भाषण व्हायरल व्हायला हवं. उत्कृष्ट, लिहीत रहा, जय श्री राम।"

त्यांचा हा मेसेज इंग्लिशमध्ये होता. प्रकरण 32 बद्दल त्या बोलत आहेत इथे. त्यांनी आक्षेप घेतला नाही. उलट त्यांना वाटतं, की हे व्हायरल व्हायला हवं. पण त्या शेवटी जय श्री राम लिहायला विसरल्या नाहीत. पण असो, तुम्ही देव माना, कुठला मानायचा तो माना, मला तोपर्यंत आक्षेप असण्याचं कारण नाही, जोपर्यंत देव मानणारे लोक त्या समजुतींपायी देश व समाज गढूळ, कलुषित व खंड खंड करण्याच्या कारवाईत सहभागी होत नाहीत. आणि ज्या अर्थी यांचा संविधानावर विश्वास आहे, त्याअर्थी त्या कधी या घोर कर्मात लागणार नाहीत असे वाटते.

धनश्री कमलापुरे नागरिकशास्त्र या प्रकरणासाठी लिहितात,

"नेहमी प्रमाणे हा भाग ही उत्कृष्ट लिहला आहे... नागरिकशास्त्र हे नुसते शास्त्र नसून ते सर्व नागरिकांचे शस्त्र आहे हे तुम्ही तुमच्या लिखाणातून दाखवून दिले आहे... समता बंधुता... खुप उत्तम लिखाण केले आहे. या भागांमधून तुमच्या उच्च विचाराची प्रगल्भता दिसून येते... असंच दर्जेदार साहित्य लिहत राहा... खूप खूप शुभेच्छा..."

कथा पूर्ण वाचून धनश्री कमलापुरे यांनी पुन्हा एक प्रतिक्रिया दिली, त्या म्हणतात-

"सर्वोत्तम लिखाण... तुमची कोणतीही कथा एक चांगला संदेश देते. सर्वांनी वाचावी अशी ही मस्ट रीड स्टोरी आहे... सस्पेन्स, ट्विस्ट, टर्नस् नी कथा शेवट पर्यंत वाचकांना खिळवून ठेवते... असंच उत्तम लिखाण करत

राहा... तुमच्या कथांचा खजाना वाचायला नक्कीच आवडेल... खूप शुभेच्छा..."

आणखी एक प्रतिक्रिया होती, ती अशी, सचिन अलोनी लिहितात -

"हार्टीएस्ट काँग्रेच्युलेशन्स फॉर् रायटिंग वेरी इंटरेस्टिंग थ्रिलर स्टोरी. किप इट अप. ऑल द बेस्ट."

यांनी कथेच्या कंटेंटवर काही भाष्य केलं नसलं, तरी या कमेंटवरून त्यांना कथा आवडली आहे असे दिसते.

संदीप पवार म्हणून वाचक गर्भगृहसाठी लिहितात,

"फरच अप्रतिम कथानक.. विलोभनीय कथा रचना.. उत्कट देशप्रेम... प्रेम और भावना यांचा सुरेखा संगम... मित्रप्रेम, कर्तव्य और जबाबदारी... सर्वच ओटप्रोत होतं कथानक... आपल्या नवीन लिखित प्रतीक्षा..."

या प्रतिक्रियांचं द्योतक आहे, की अजून तरी समाज पुरता अचेत झाला नाहीये. समाजाची मनं मेलेली नाहीयेत. कोणीतरी सजग आहे अजून, पूर्ण संवेदना मेलेल्या नाहीत समाजातल्या. आणि ती कोण आहेत हे समजावे म्हणून त्यांची नांवे देखील मुद्दाम नमूद केली आहेत. असो...

पुन्हा सांगतो, कथा १००% काल्पनिक आहे, तरी यात कुणाला खऱ्या जीवनतातील चित्रण जाणवले, तर तो त्यांच्या दृष्टीकोनाचा तो भाग आहे.

आणि तसे आपल्याला दिसत असेल, तर माझ्या लिखाणाला तुम्हीच सत्य ठरवत आहात व पुष्टी देत आहात. तसे जर कोणाला वाटलेच, तर मला दोष न देता सत्य व कल्पना यांची एकमेकांत किती सरमिसळ झाली आहे व हे देशाला किती घातक असेल याचा विचार करावा.

पुढील कथा प्रबोधन पर नसेल कदाचित, मनोरंजन हा हेतू अग्रणी असेल त्यात. तरी नवीन कथा घेऊन येइपर्यंत मी आपली रजा घेतो.

संपूर्ण कथा वाचल्याबद्दल अनेक अनेक धन्यवाद!!!

महत्त्वपूर्ण सूचना :-

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

© All kind of copyright solely remains to the writer Suraj Kashinath Gatade.

a

# सूरज काशिनाथ गाताडे यांची यापूर्वीची प्रकाशित पुस्तके

१) द डेथ ऑफ लिंकन्स् मदर (सायंटिफिक क्राईम थ्रिलर)

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/death_of_lincolns_mother_suraj_gatade.pdf

२) डेथ विल (मिस्टर वाघची पहिली कथा - सायंटिफिक सायकॉलॉजिकल क्राइम थ्रिलर)

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/death_will_suraj_gatade.pdf

३) दे किस्ड् बाय मिस्टेक (रोमँटिक कॉमेडी/ट्रॅजेडी)

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/kiss_surajgatade.pdf

४) द पॅरासाइट (सायन्स फिक्शन)

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/parasite_suraj_gatade.pdf

५) फ्लेम (म्युसिकल - फॅन्टसी/सायकॉलॉजिकल/ट्रॅजेडी/लव स्टोरी या चार विविध कथा प्रकारांचा कथा संग्रह)

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/flame_suraj_gatade.pdf

६) अ हेवी प्राईझ् - (सायंटिफिक/मिस्ट्री/एक्शन/सायकॉलॉजिकल/थ्रिलर)

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/ahp_suraj_gatade.pdf

७) डेडली मिटिंग्स् - (सायंटिफिक/मिस्ट्री/एक्शन/सायकॉलॉजिकल/थ्रिलर)

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/deadly_meeting_wagh_suraj_gatade.pdf

८) एजंट - X - (सायंटिफिक/मिस्ट्री/एक्शन/सायकॉलॉजिकल/थ्रिलर)

a

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/agent_x_suraj_gatade.pdf

९) तूमाझासांगाती - (सायन्सफिक्शन)

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/tu_majha_saangaati_suraj_gatade.pdf

१०) वृत्र (सायकॉलॉजिकल/एक्शन/मिस्ट्री/थ्रिलर)

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/vrutra_suraj_gatade.pdf

११) अ प्योर वन

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/the_pure_one_suraj_gatade.pdf


१२ ) अंतःपूर

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/antahpur_suraj_gatade.pdf

१३) LCB केस फ़ाईल ००


https://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/case_file_00_suraj_gatade.pdf



सूरज गाताडे
दि डेथ ऑफ लिंकन्स मदर


अ हेवी प्राईझ


सूरज गाताडे
एल. सी. बी.
केस फाईल


सूरज


"इब्लिस"
सूरज गाताडे


सूरज गाताडे
डेथ विल



सूरज गाताडे
डेडली मीटिंग्ज


सूरज गाताडे
दे
किस
बाय मिस्टेक



सूरज गाताडे
वृत्र


सूरज गाताडे


सूरज गाताडे
अंतःपूर


सूरज गाताडे


सूरज गाताडे
एजंट एक्स
X


सूरज गाताडे
'अ प्योर् वन-दि एप्रिल चेज्!'